विषय काव्य
नं. ३८

पं॰ विठ्ठलकृत

# सुश्लोकलाघव

मराठी भाषांतरासहित.

प्रकाशकः--लक्ष्मण नारायण गोडबोले.
म्यानेजर डी. एस्. आणि कंपनी.
बुकसेलर्स बुधवार पेठ, पुणें सिटी.

REFBK-0001466

किंमत दीड रुपया.

आधुनिक भगवद्भक्त व कविवर्य

कै० विठोबाअण्णा दप्तरदारकृत

# सार्थ-सुश्लोकलाघव.

भाषांतरकार

सुप्रसिद्ध

‘ महाराष्ट्रभाषाचित्रमयूर ’

## कृष्णाजी नारायण आठल्ये.

प्रकाशक

**लक्ष्मण नारायण गोडबोले,**

म्यानेजर डी. एस्. कंपनी बुकसेलर

बुधवार पेठ, पुणें सिटी.

मुद्रक:—केशव रावजी गोंधळेकर,

“ जगद्धितेच्छु ” प्रेस, ४३२ शनिवार पेठ, पुणें.

जुलै, सन १९१७ इ.

किंमत १॥ रु.

दा. क्र.

या पुस्तकासंबंधी सर्व प्रकारचे हक्क प्रकाशकानें
आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.

REFBK-0001466

REFBK-0001466

सत्पुरुष आणि सत्कवि

# विठोबाअण्णा दप्तरदार.



जन्म शके १७३५ पौष कृ० ३०.

मृत्यू शके १७९५ चैत्र कृ० १२.

सत्पुरुष आणि सत्कवि

# विठोबाअण्णा दप्तरदार ह्यांचें चरित्र.

॥ बोधलाभजनरंजनो जनिप्रेमगीतरासिकः कवीश्वरः ॥
॥ ब्रह्मपद्धतिसुतोषभागयं विठ्ठलः स इति को न संवदेत् ॥ १ ॥*

रघुवीर विठ्ठल बेदरे.

---

* अण्णांचे द्वितीय चिरंजीव परलोकवासी रघुवीरराव ऊर्फ भाऊसाहेब हे नेहमीं वडिलांच्या सान्निध्यानें चांगले शास्त्रसंपन्न झाले होते व त्यांची कवित्व शक्तीही उत्तम होती. तीर्थरूप कैलासवासी झाले, तेव्हां त्यांनीं शोकाकुल अंतःकरणानें अनेक कविता करून आपली पितृभक्ति व्यक्त केली. त्यांतील हें एक पद्य होय. ह्यात त्यांनीं द्व्यर्थ साधून पंढरपूरनिवासी श्रीविठ्ठल व आपला पिता विठ्ठल ह्याचें मोठ्या मार्मिकतेनें वर्णन केलें आहे. भाऊसाहेब म्हणतात:—

पंढरीचा विठ्ठल कसा आहे ? " बोधला-भजन--रंजनः " बोधला नामक भक्ताच्या भजनानें संतोषित होणारा. पक्षीं माझा पिता कसा आहे ? बोध—लाभ—जन—रंजनः"—उपदेशाचा लाभ देऊन, जनास तृप्त करणारा. आणखी तो विठ्ठल कसा आहे ?—" जनि—प्रेमगीत—रसिक "—जनि ह्या नांवाची जी नामदेवाची दासी, तिनें प्रेमयुक्त गायिलेल्या गीतांची आवड धरणारा. पक्षीं माझा पिता ? जनीं—प्रेम—गीत—रसिकः—" जनामध्यें प्रेमळ गीत गायनाविषयीं निपुण. आणखीं तो विठ्ठल कसा ?—" "कवीश्वरः—" सर्व ज्ञानीजनामध्यें श्रेष्ठ म्हणजे सर्वज्ञ. पक्षीं माझा पिता कसा? 'कवीश्वरः' म्हणजे कवींमध्यें श्रेष्ठ. तो विठ्ठल —' ब्रह्मपद्धतिसुतोषभाक् " ब्रह्मज्ञानपद्धतीच्या मार्गांत तृप्त होणारा. पक्षीं हा विठ्ठल ? "ब्रह्मपद्धति—सुतोषभाक्"—म्हणजे ब्राह्मणांचा आचारविचार, स्नान,

मोंगलाईत कलबुर्ग्याच्या शेजारीं बेदर ह्या नांवाचें एक गांव आहे. तेथें अण्णांचे पूर्वज रहात असत. ह्या गांवावरूनच त्यांच्या वंशास बेदरे हें उपनांव चालत आहे. बाळाजीपंत हे अण्णांचे आजे. हे शांडिल्य गोत्री देशस्थ ब्राह्मण. सुमारें सवाशें वर्षांपूर्वीं बाळाजीपंत ह्यांनीं आपल्या कर्तबगारीवर पेशव्यांकडून कऱ्हाड पेट्यांत दप्तरदारीची वंशपरंपरेची सनद मिळविली. त्या वेळीं श्रीमंत माधवराव ऊर्फ रावसाहेब पेशवे ह्यांची कारकीर्द चालू होती. बाळाजीपंतास दप्तरदारीची सनद मिळतांच ते कुटुंबसुद्धां श्रीक्षेत्र कऱ्हाड येथें येऊन राहिले. कऱ्हाड हें आधींच क्षेत्राचें स्थान; कृष्णा आणि कोयना ह्यांचा संगम; ब्राह्मण वस्ती मोठी. तेव्हां अशा ठिकाणीं बाळाजीपंत ह्यांचें चित्त सहज रममाण झालें.

बाळाजीपंतांस महादजी बल्लाळ, आणि त्र्यंबक बल्लाळ असें दोन पुत्र होते. बाळाजीपंत वारल्यानंतर वडिलांची दप्तरदारीची जागा, सनदेप्रमाणें आपणांस मिळावी म्हणून महादाजीपंतांनीं पेशवे सरकारकडे बोलणें लाविलें. नानाफडणिसांनीं त्यांच्या चांगुलपणाविषयीं खात्री घेऊन वारसाचा हक्क पाहून, हुशारपणा मनांत आणून, कऱ्हाडच्या सुभेदारास त्यांस दप्तरदारीच्या जागीं रुजू करून घेण्याविषयीं हुकूम दिला. त्याप्रमाणें महादाजीपंत आपल्या वडिलांच्या नोकरीवर रुजू झाले.

त्या वेळीं त्यांचें वय अवघें पंधरा वर्षांचें होतें. तरी थोडक्याच दिवसांत त्यांनीं चांगली लोकप्रियता संपादन केली. त्यांस सर्व लोक तात्या असें म्हणत. तात्या मोठे सत्वस्थ, सुशील, आणि स्नानसंध्याशील ब्राह्मण होते. त्यांच्यावर सुभेदाराचा मोठा लोभ असून, त्यांचें लोकांत मोठें

---

संध्या, होम, हवन, पूजा, अर्चा, नेमधर्म—येणेंकरून संतोषित होणारा असा. तेव्हां—" अयं-सः-विठ्ठलः-इति-कः-न-संवदेत्—" ह्या माझ्या पित्यासही गुणसादृश्यावरून " विठ्ठल " असें कोण म्हणणार नाहीं ? सर्वच म्हणतील असा भाव. विठोबाअण्णा सोमयाग, इत्यादि महायाज्ञिकांतही अत्यंत निष्णात होते, यावरून ब्रह्मपद्धति सुतोषभाक् हे रघुवीररावजींचे उद्गार किती सार्थ आहेत, याजबद्दल वाचकांसही साक्ष पटेल.

वजन असे. **महादाजीपंतांस** रामचंद्र नांवाचा पुत्र झाला. तो चांगला हुषार होता. चवदापंधराव्या वर्षींच वडिलांबरोबर कामकाज पाहूं लागला होता. परंतु परमेश्वरानें त्यास आयुष्य फार कमी केलें. तो आपल्या पंधराव्या वर्षींच अकस्मात् वारला. आणि **तात्यांस** पुत्रशोकाचें दुःख सहन करावें लागलें. शिवाय त्या मुलाच्या पाठीमागें अनेक मुलें झालीं, परंतु एकही जगेना. ह्यामुळें तात्यांच्या मनास फार उदासीनता प्राप्त झाली.

शेवटीं परमेश्वरास करुणा येऊन **पौषकृष्ण अमावास्या शके १७३५** ह्या दिवशीं कऱ्हाड क्षेत्रांत आमचेचरित्र नायक अवतरले. त्यांचें नांव **विठ्ठल** असें ठेविलें. हें मूल नवानवसाचें असल्यामुळें पुत्रोत्सवही मोठ्या थाटाचा झाला. **तात्यांच्या** इष्टमित्रांसही फार संतोष झाला. परंतु पुष्कळ मुलें अल्पायुषी झालीं असल्यामुळें त्या पुत्राविषयीं आईबापांस मोठी काळजी वाटे. त्यांत धडधडीत अमावास्या जन्मस्थानीं म्हणजे मोठेंच अभद्र ! पण चमत्कार पहा, त्याच अमावास्येवर जन्मलेल्या विठ्ठलानें उत्तम प्रकारें संसार केला, इतकेंच नव्हे तर आपलें नांव चिरस्थायी करून ठेवलें.

देवाच्या दयेनें **विठ्ठल** चालताबोलता होऊन बालक्रीडा करूं लागला. तो आंगापिंडानें चांगला सुदृढ असे. मुलगा लाडका, त्यानें कांहीं केलें तरी कोणी हुं कीं चूं ह्मणावयाचें नाहीं. शाळेचें नांव काढिलें कीं, **विठोबाचें** रडणें, ओरडणें सुरू झालेंच. लहान आहे, मोठा झाल्यावर चट् निवळेल, असे दिवस चालले. दहा वर्षें झालीं तरी **विठोबास** अक्षरसंस्कार नाहीं. अशा स्थितींत एके दिवशीं दसऱ्याचा सण आला. **विठोबास** उत्तम पोषाख घालून तात्या आपल्याबरोबर वाड्यांत घेऊन गेले. त्यावेळीं **बाजिराव लिमये** सुभेदारांच्या जाग्यावर होते. त्यांनीं **विठोबास** कांहीं प्रश्न विचारले. त्यांचीं उत्तरें **विठोबानें** चांगलीं दिलीं. सुभेदारसाहेब ह्मणाले, **विठोबा**, तूं कोणत्या शाळेंत जातोस ? हें ऐकतांच त्यानें लाजेनें तोंड खालीं केलें. **तात्यांनीं** व इतर लोकांनीं सांगितलें कीं, यास अजून अक्षरसंस्कार सुद्धां झाला नाहीं. हें ऐकून सुभेदार **विठोबास** ह्मणाले, कायरे **विठोबा** ? हे

काय सांगतात? छे छे! फार वाईट! अशानें तात्यांचें नांव तूं पुढें कसें चालविणार? यामुळें विठोबा फार खजील झाला. या सुभेदाराच्या भाषणानें विठोबास उपरती झाली व पुढें तो दररोज शाळेंत जाऊं लागला. यामुळें तात्यासाहेबांस आनंद झाला.

विठोबा घरानाजिक असलेल्या थोट्या पंतोजीच्या शाळेंत जाऊं लागला. व त्यानें उत्तम अभ्यास केला. सहा महिन्यांत मोडी अक्षर तर इतकें घटाविलें कीं, साऱ्या शाळेंत विठोबाच्या हातचे कित्ते! अशा प्रकारें ज्या सुभेदारांनीं त्यास हिणाविलें होतें, त्या सुभेदारसाहेबांकडून त्यानें ६ महिन्यांच्या आंत शाबासकी मिळविली, तेव्हां विठोबाच्या मनाचें समाधान झालें.

विठोबा वयांत आल्यावर, तात्यांनीं त्याच्या लग्नाचा निश्चय केला व विरमाडकर म्हणून एक नमांकित गृहस्थ होते, त्यांची कन्या वधू नेमस्त केली. मोठ्या थाटानें सोहळा झाला. विठोबाच्या कुटुंबाचें नांव ' गयाबाई. ' तेंच सासरीं चालत असे. लग्नांत विठोबाचें वय १२ वर्षांचें होतें.

विठ्ठलपंत लेखनीबहाद्दर झाल्यानंतर, त्यांस तालमीचा नाद लागला. ते पोहण्याचे कामांत फार पटाईत असत. ते एका स्नेह्यास बरोबर घेऊन कृष्णा नदींतून पलीकडे जात व पलीकडचे पांच चार मोठमोठे दगड घेऊन अलीकडे येत. अशा प्रकारें दगड जमवून, तेथें त्यांनीं एक मारुतीचें देऊळ बांधिलें. तें अद्याप कायम आहे.

नंतर विठ्ठलपंत हे आप्पा पुराणिक, ह्मणून एक विद्वान् गृहस्थ होते त्यांजकडे संस्कृत शिकावयास जाऊं लागले. पण त्यावेळीं छापील पोथ्या नव्हत्या. त्या फार दुर्मिळ असत, ह्मणून हातानें लिहून घ्याव्या लागत. विठ्ठलपंताचें मोडी अक्षर उत्तम होतें. परंतु बालबोध लिहिण्याचा सराव नव्हता. ह्मणून त्यांनीं मोडींतच रूपावळी, समासचक्र वगैरे पोथ्या लिहून घेतल्या, व त्याच वेळीं मोडींतील ऱ्हस्वदीर्घाबद्दल नियम बांधून तयार केले! नंतर रघुसर्ग वगैरे बरेंच व्युत्पत्तिज्ञान करून घेतलें.

ही गोष्ट विठ्ठलपंतांच्या वडिलांस ह्मणजे तात्यांस माहीत नव्हती. तात्यांनीं सहज एके दिवशीं आप्पाशास्त्री यांस आपल्या घरीं पुराण सांगावयास बोलाविलें. घरचीं सर्व बायकामुलें पुराण ऐकावयास बसलीं. पुराणसमाप्तीपूर्वीं शास्त्रीबुवांनीं १०।२० श्लोक सांगावयाचे शिल्लक ठेवून ते उठले, आणि तात्यांस ह्मणाले, "आतां हा पुढील भाग आपल्या चिरंजिवांच्या मुखानें ऐकावा." हें ऐकून तात्यांस फार आश्चर्य वाटलें. कारण मुलगा संस्कृत शिकत होता, ही गोष्ट त्यांना मुळीं माहीत सुद्धां नव्हती. असो, विठ्ठलपंतांनीं ते श्लोक सांगितले. त्यांची ती रसाळ वाणी ऐकून सर्वांसच आनंद झाला. मग प्रत्यक्ष तात्यांस किती कौतुक वाटलें असेल हें सांगणें नकोच.

तात्या फार प्रसन्न झाले व त्यांनीं आप्पाशास्त्री यांस त्या दिवसापासून आपल्या घरीं येऊन राहण्याची विनंती केली. आप्पाशास्त्र्यांच्या मागेंहि बायकामुलांचा कांहींच व्याप नव्हता. ते सडेच होते. ह्यास्तव तात्यांच्या विनंतीस मान देऊन, तेही घरीं येऊन राहिले. त्यांच्यापाशीं विठ्ठलपंतांनीं रघु, किरात, कुमार, माघ, नैषध, हीं पंचकाव्यें म्हटलीं. शास्त्रीबुवांचा विठ्ठलपंतांवर फार लोभ असे. ते म्हणाले, "विठोबा! तूं मला अन्नाला लाविलेंस. याकरितां आम्ही तुम्हांला आजपासूनच 'अण्णा' च म्हणणार." आणि त्याप्रमाणें ते विठलपंतांस अण्णा म्हणूं लागले व तेच 'विठोबाअण्णा' हें त्यांचें नांव कायम राहिलें. अण्णांची बुद्धि इतकी तीव्र होती कीं, पुढें अण्णांच्या शंका त्यांच्या गुरूंनांच निवारण होईनाशा झाल्या. गुरूची मति शिष्यापुढें कुंठित होऊं लागली. तेव्हां ते एके दिवशीं कोणास न विचारतां कोठें निघून गेले! त्यांचा पुष्कळ शोध केला, तरी पत्ता लागला नाहीं. म्हणून तात्यांस व अण्णासही अत्यंत वाईट वाटलें. आप्पाशास्त्र्यांकडून अण्णांस व्युत्पत्तिज्ञान चांगलें झालें. परंतु व्याकरणाचा अभ्यासमात्र तसाच राहिला.

नंतर कऱ्हाड येथें कांहीं मंडळींनीं श्रीकृष्णाबाईचा महोत्साह सुरू केला त्यांत अण्णा कीर्तन करूं लागले. एका संन्याशापाशीं अण्णांनीं गायनाचा अभ्यास उत्तम केला होता. प्रथम वर्षीं कीर्तनाचा रंग साधा-

रण होता. परंतु पुढें पुढें त्यांचें कीर्तन अगदीं अप्रतिम होऊं लागलें. ह्या कीर्तनांत आपल्या कविता असाव्या म्हणून **अण्णांनीं** कविता करण्याचाही परिपाठ सुरू केला. ' **हरि हा आनंदाचा कंद** ' हा अण्णांचा अगदीं पहिला कटिबंध. त्याची जडणी किती अप्रतीम व मनोहर आहे हें सुप्रसिद्धच आहे. ह्या कीर्तनामध्यें **बाबाजोशी** म्हणून एक मोठे विद्वान् रसिक होते. ते:हा कटाव ऐकून म्हणाले, " **अण्णावर भगवत्प्रसाद** आहे, एरवीं असें कवन व्हावयाचें नाहीं. "

पुढें **अण्णांनीं गुंडाचार्य घळसासी** ह्यांच्यापाशीं व प्रसिद्ध **नारायणचार्य गजेंद्रगडकर** ह्यांच्यापाशीं वैय्याकरणाचा अभ्यास केला. परंतु गांवांत नैय्यायिक कोणी नसल्यामुळें तो अभ्यास तसाच राहिला.

**अण्णा** कोणताही संस्कृत ग्रंथ लावण्यामध्यें फार तरबेज असत. **अण्णांचे** जवळ **व्यंकटराव जांभळे** यांनीं वैद्यक ग्रंथ वाचण्यास सुरवात केली. तेव्हां **अण्णांनीं भाऊ टोणपे मालखेडकर**, यांजपाशीं वैद्यशास्त्राचा अभ्यास करून **जांभळे** यांस त्या ग्रंथांची माहिती करून दिली.

**औंध संस्थानांत विनायक बाबुराव बापट** हे पोतनीस होते. ते एकदां **अण्णास** ह्मणाले, आम्ही जो मजकूर देऊं त्याजवर आपण कविता कराल काय? तेव्हां त्यांचें ह्मणण्याप्रमाणें **अण्णांनीं** त्यांच्या समक्ष लागलीच कविता करून दिली. हे पाहून **बापट** यांस फार आश्चर्य वाटलें, व त्यांनीं त्यांच्या शीघ्रकवित्वाबद्दल मनापासून तारीफ केली. हा सर्व अभ्यास **अण्णांनीं** पांच दहा वर्षांतच आटोपला. नंतर विसाव्या वर्षीं त्यांनीं " **शिवस्तुति** " व पंचविसाव्या वर्षीं " **गजेंद्रचंपु** ' अशीं संस्कृत काव्यें केलीं. त्याचप्रमाणें पुढें " **सुश्लोकलाघव** " " **हेतुरामायण** " " **प्रबोधोत्सवलाघव** " " **प्रयोगलाघव** " " **नित्यक्रमलाघव** " " **संकल्प** " " **रामतापिनी** " " **विवाहतत्त्व** " " **साधुपार्षद लाघवम्** " " **एकादशीविचार** " इत्यादि ग्रंथ केले. **अणांनीं** एकादशीविचारावर तर पुष्कळच उहापोह केला. व कारण नसतां तोच विषय काढला, यावरून जणों काय आपला काल एकादशीसच होणार ही गोष्ट अण्णास पूर्वींच कळली असावी, असें मनांत आल्यावांचून राहत

नाहीं. तसेंच ते संस्कृत भाषा शिकण्यास व बोलण्यास सोपी पडावी ह्मणून, "सत्पदार्थ लाघव" ह्मणून सर्व पदार्थांच्या नांवाचा एक कोश करीत होते, परंतु तो अपुराच राहिला. ईश्वराची इच्छा!

अण्णास विसावें वर्ष लागतांच ते आपल्या वाडिलांचें काम पाहूं लागले. पुढें अण्णांचे वडील आपल्या वयाच्या साठाव्या वर्षीं वारले. तेव्हां अण्णा अठ्ठावीस वर्षांचे होते. पुढें वेशवाईचा अभाव झाल्यामुळें अण्णांचा वंशपरंपरागत नोकरीचा हक्क बुडाला. परंतु सातारच्या महाराजांकडून त्यांस दुय्यम कारकुनीची जागा मिळाली.

पुढें एके वेळीं अण्णांचे कीर्तनास "शेषगिरराव मामलेदार" वगैरे मंडळी बसली होती. त्यांत हरीबा नाना नेवासकर हे सावकारही होते. ह्यांची वाणी सदोष म्हणून प्रसिद्ध असे! ह्या गृहस्थानें अण्णांचें कीर्तन श्रवण करून, प्रसन्न मनानें शाबासकी दिली. त्याबरोबर अण्णा घेरी येऊन पडले. तेव्हां पुढें शेषगिररावांनीं अण्णांस कीर्तन करण्याचें सोडून देण्यास सांगितलें व तें त्यांनींही मान्य केलें.

पुढें दोन वर्षांनीं म्हणजे अण्णांचे तिसाव्या वर्षींच त्यांची प्रियपत्नी वारली. त्या वेळीं अण्णांस सितारामपंत ऊर्फ बापुराव थोरले चिरंजीव, रघुवीरराव ऊर्फ भाऊसाहेब धाकटे, व भवानीबाई ह्या नांवाची कन्या अशीं तीन अपत्यें होतीं. पत्नी सुशील, स्वतः तरुण व मुलें लहान लहान. तेव्हां अण्णास पत्नीनिधनाचें किती दुःख झालें असेल बरें? परंतु त्यांतले त्यांत अण्णांची मातोश्री हयात होती, ही एक समाधानाची गोष्ट. पुढें अण्णांस द्वितीय संबंध करण्याबद्दल बरेच लोकांनीं आग्रह केला. परंतु अण्णांनीं तसें कांहीं न करतां लागलीच भक्तिमार्गाकडे वळले.

एकदां दुःखें येऊं लागलीं ह्मणजे, एकामागें एक तयार असतातच. त्याप्रमाणें पत्नी निवर्तल्यास २ वर्षें झालीं नाहींत तोंच मातुश्री निवर्तल्या! तेव्हांपासून त्यांनीं पागोटें घालण्याचें वर्ज्य केलें. हें व्रत त्यांनीं आजन्म पाळलें. व पुढें आबामहाराज यांजपाशीं वेदशास्त्रांचा अभ्यास केला, आणि अमृतराय सत्पुरुषापासून मंत्रोपदेश घेतला व पुराण सांगण्यास प्रारंभ केला. पुढें कांहीं दिवसांनीं आण्णास पक्षघात वायूचा विकार

झाला. त्यांत फक्त '**राम**' मात्र ह्मणत. त्याजवर बरेंच उपचार केले तेव्हां थोडासा गुण येऊन ते हिंडूंफिरूं लागले. त्यांचे वडील चिरंजीव **बापुसाहेब** हे त्यांचेजवळ फारसे नसत. दुसरे **भाऊसाहेब** हे मात्र **अण्णांचे** जवळ रात्रंदिवस असत. त्यांची बुद्धिहि उत्तम होती. त्यांनींही अनेक संस्कृत कविता केल्या आहेत व **अण्णांच्या** '**गजेंद्रचंपू**' वगैरे ग्रंथांवर त्यांच्या संस्कृत टीका आहेत. त्यामुळें त्यांचा शास्त्रांत उत्तमच परिचय झाला.

इ. स. १८६८मध्यें मुंबईस **विष्णुशास्त्री पंडित** यांनीं '**स्त्री पुनर्विवाह**' सशास्त्र आहे; असा वाद उपस्थित केला. तेव्हां त्यांचा निकाल करण्याकरितां सातारकर पंडितांनीं अण्णांची प्रार्थना केली व ती त्यांनीं मान्य केली. परंतु हा प्रसंग कसा पार पडेल याची त्यांस फार चिंता पडली. पुढें ते **औंध** येथें गेले, तों एके दिवशीं रात्रीं स्वप्नांत एक स्त्री येऊन, तिनें **अण्णांच्या** मस्तकीं वरदहस्त ठेवून "चिंता करूं नको" ह्मणून आशिर्वाद दिला. पुढें **अण्णा** हे **सवालाखी अष्टग्रास गोविंद धोंडदेव लिमये** उर्फ **रावसाहेब** वकील यांचेकडेस गेले. व तेथें दोन महिने मुक्काम करून, त्यांच्या घरचे संस्कृत ग्रंथ पाहून विवाहासंबंधानें काय काय नियम आहेत, ते त्यांनीं काढले. व त्यांचीं टांचणें घेऊन, परत **औंधास** आले. आणि "**विवाहतत्त्व**" ह्मणून ग्रंथ तयार केला.

पुढें पुणें मुक्कामीं पुनर्विवाहासंबंधानें मोठा वाद होण्याचा निश्चय झाला. तेव्हां **श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य-मठ संकेश्वर** यांचेबरोबर **अण्णाही** पुण्यास आले. व त्यांनीं त्या पक्षाचे मुख्य वाद करणारे **नारायणाचार्य गजेंद्रगडकर** ह्यांस पुष्कळ साह्य केलें. त्यांनीं तुळसीबागेंत वगैरे पुराण सांगितलें. त्यावेळीं लोकांची फारच गर्दी झालेली होती. पुनर्विवाहवाद खलास झाल्यानंतर ते मुंबईस गेले. तेथेंही त्यांची फारच वाहवा झाली. पुढें **कुरुंदवाड** व **जमखिंडी** येथें त्यांस बोलावणें आलें व तेथेंही त्यांचा फार सत्कार झाला. ह्या स्वारी-

मुळें पुनर्विवाहाच्या वादास झालेलें त्यांचें हजार दीड हजार रुपये कर्ज फिटलें. ही एक आनंदाची गोष्ट होय.

पुढें त्यांस पुनः अर्धांगवायूचा विकार झाला. तेव्हां बापूसाहेब हे औंधास होते त्यांस बोलावून आणिलें. **औंधास बाळशास्त्री बापट** म्हणून प्रसिद्ध वैद्य होते त्यांनीं अण्णांस औषध देऊन बरें केलें.

प्रतिवर्षीप्रमाणें रामनवमीचा शेवटचा उत्साह **अण्णांनीं** यथासांग सिद्धीस नेला. पुढें वद्य दशमी आली. उत्साहास बरेच लोक आले होते. **गणेश सितारामशास्त्री** सुभेदारसाहेब इंदूर हे विलायतेंत सरकारी कामाकरितां गेले होते. ते शुद्ध होण्याचा शास्त्रार्थ पहावयाकरितां आले होते. त्यांस अण्णांनी शास्त्रार्थ काढून दिला. व प्रायश्चित्तास मुहूर्त काढून देऊन त्यांची इंदुरास रवानगी केली.

नंतर दशमीचे दिवशीं रात्रीं मध्यान्हीस, **अण्णांच्या** पाठींतून एकाएकीं कळ निघाली, व ते घाबरे झाले. कऱ्हाड येथील प्रसिद्ध वकील **रामभाऊ भागवत** व **अण्णा** यांचा फार घरोबा होता. त्यांस बोलावून आणून **अण्णा** म्हणाले, माझा आतां भरंवसा नाहीं. माझ्या मागें रामनवमीचा उत्साह चालावा; मुलांनीं नोकरीचाकरी करू नये; इत्यादि हेतु कळविले. नंतर नेहमींप्रमाणें भजन सुरू झालें. पाठींतील कळ अमळ कमी झालीशी वाटली. असें करतां करतां उजाडलें.

**शके १७९५ चैत्र कृष्ण एकादशीच्या दिवशीं** प्रातःकाळींच **अण्णा** म्हणाले, मला फार तृषा लागली. म्हणून घरात नैवद्याची लवकर तयारी केली. **अण्णानीं** प्रातःकाळींच स्नान, संध्या, पूजा, इत्यादि नित्यकर्म आटोपून खारकांच्या क्षीरीचा दाशरथी **रामचंद्रास** नैवद्य समर्पण केला. नंतर अपराधस्तोत्र म्हणून तीर्थ घेऊन तुळसीपत्राचा स्वीकार केला. व अतिशय तृषा लागली होती म्हणून, क्षिरीचा प्रसाद सेवन करून उदक प्राशन करण्याकरितां पाण्याचें पंचपात्र हातीं घेतलें. नित्य संप्रदायाप्रमाणें प्राशनापूर्वीं " **श्रीराम** " असा मोठ्यानें नामघोष करून, उदक मुखांत घातलें. झालें ! संपलें ! त्यांचे पंचप्राण रामनामाबरोबरच चित्स्वरूपास मिळाले. व देह मात्र अवशेष राहिला ! हातांतील पंचपात्र धाडकन

खालीं पडलें. जिवास क्लेश न होतां, एकादशीला, आणि अशा प्रकारें मरण येणें म्हणजे सामान्य पुण्याई नव्हे. घरांतील मनुष्यें बाहेर येऊन पाहतात, तों हा विपरित प्रकार ! बापूसाहेब व भाउसाहेब उभयतां चिरंजीव औंधास होते. त्यांस ताबडतोब मनुष्य पाठवून आणलें व सर्वांनीं अण्णांचें देहसार्थक केलें. अण्णांचे मागें रावनवमीचा उत्साह अध्याप चालू आहे. व वडील चिरंजीव नोकरी न करितां घर सांभाळून राहिले.

हें सर्व चरित्र त्यांच्या वडील चिरंजीवांनींच स्वमुखें आम्हांस सांगितलें. विस्तृत चरित्र पाहणें असेल तर ' केरळकोकिळ ' वर्ष ७ अंक ९ पहावा.

अण्णांचे द्वितीय चिरंजीव रघुवीरराव उर्फ भाऊसाहेब हें अण्णांच्या सन्निध असल्यामुळें अण्णाकडून त्यांस बरीच माहिती मिळालेली होती. अण्णा समाधिस्थ झाल्यावर त्यांविषयीं संस्कृत कविता भाऊसाहेबांनीं केलेल्या आहेत. यावरून रघुवीररावजींची विद्वत्ता व कविताशक्तिही सामान्य नव्हती, हेंही वाचकांच्या लक्षांत येईल.

अण्णांच्या पश्चात् रघुवीररावही फार दिवस राहिले नाहींत. दोन वर्षांच्या आंतच तेही निवर्तले. असो. अशाप्रकारें हें अण्णासारख्या सत्पुरुषाचें चरित्र वाचकांस सादर केलें आहे तें श्रीरामचंद्रास व परलोकवासी आण्णांच्या आत्मस्वरूपास प्रिय होवो आणि तें आमच्या वाचकांचें मन संतोषित करो.

ऐशा उत्तम गुणीं विशेष ॥ तयास ह्मणावें पुरुष ॥
जयाच्या भजनें जगदीश ॥ तृप्त होय.

उत्तम गुणीं शृंगारिला ॥ ज्ञानवैराग्यें शोभला ॥
तोचि एक जाणावा भला ॥ भूमंडळीं ॥

दासबोध.

---

# प्रस्तावना.

सुश्लोकलाघव श्लोकं, विचित्रानंददायकं ॥
सकलाः स्पृहयंत्येव, हरिदासा विशेषतः ॥ १ ॥

'योगायोग' हा कांहीं विलक्षण असतो. तो एखाद्या वेळीं दैवयोगानें म्हणा, किंवा पितरांच्या पूर्व पुण्याईनें म्हणा, ज्या वेळीं जमून येतो, त्या वेळीं जो मनाला आनंद होतो, तो अवर्णनीय असतो. सदुद्योग केल्यानें प्रत्येकाच्या मनास समाधान हें होतेंच होते. पण त्यांतही आपल्या मनाला आवडणारा, पारमार्थिक, अशा विषयाचा उद्योग सुदैवानें हातीं आला, तर जें मनाचें समाधान होतें तें केवळ कल्पनातीत असतें. ह्या 'सुश्लोकलाघव' ग्रंथाचें भाषांतर करतांना तशाच सुखाचा अनुभव आमच्या अंतःकरणास घडला आहे. त्याचें थोडेंसें तरी दिग्दर्शन केल्यावांचून, आमच्यानें राहवत नाहीं. आमचा वेदविद्येचा अभ्यास झाल्यानंतर, ज्या आमच्या वंशांत इंग्रजी शिक्षणाचा कधीं गंधही नव्हता, बालबोधाशिवाय मोडी अक्षरसुद्धां वाडवडिलांस येत नव्हतें; जमाखर्चसुद्धां बालबोधींत चालत; घरांत वैदिक पोथ्यांशिवाय इतर एकही पुस्तक ज्या आम्हांस माहीत नव्हतें; त्या आमच्या ह्या नवीन शिक्षणाचा 'श्रीगणेशा' कऱ्हाड क्षेत्रांत होत असतां आमचें वसतिस्थान प्रस्तुत 'सुश्लोकलाघवाचे' कर्ते कविवर्य **विठोबाअण्णा** दप्तरदार ह्यांच्या वाड्याच्या अगदीं नजीक होतें. त्यांनीं वाड्यांतच स्थापन केलेल्या श्रीरामाच्या भजनपूजनाच्या वेळीं, आम्ही नित्य तेथें जात असूं. अण्णा हे र, ट, फ, अक्षरें जुळवून कविता करणाऱ्यांपैकीं नव्हते. तर त्यांची काव्यस्फूर्ति केवळ नैसर्गिक असे. त्यांच्या वाणींतून जे प्रेमोद्गार बाहेर पडत, ते काव्यरूपानेंच बाहेर पडत असत. व जवळ असलेली त्यांची शिष्य मंडळी त्या त्या कविता ऐकून उतरून ठेवीत. ते सकाळसंध्याकाळ आपल्या उपास्य देवतेपुढें बसून, करुणा भाकूं लागले, म्हणजे लेकरूं जसें आईपुढें गया-

-चया करीत असतें, त्या प्रमाणें त्यांच्या वाणींतून निरंतर भक्तिरसानें, प्रसादानें, व उपरतीनें परिप्लुत झालेले विचार काव्यरूपानें भराभर बाहेर पडत असत. व त्या मनोविकारानें भरलेल्या अंतःकरणामुळें नेत्रांतून घळघळ सारखे प्रेमाश्रु वाहत असत. ही स्थिति आम्हीं प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिली होती व त्यामुळेंच त्यांच्यावर, त्यांच्या काव्यावर बालपणापासूनच आमचा प्रेमभाव जडला होता. अण्णांची केव्हांही स्मृति झाली कीं, त्यांची मूर्ति अद्याप डोळ्यांसमोर उभी राहते. त्या वेळीं त्यांच्या काव्यांतील हृद्गत समजण्याइतकें जरी आमच्या आंगीं ज्ञान नव्हतें तरीं जीं कांहीं थोडींबहुत मराठी पदें वगैरे समजत, त्यांवरून त्यांच्या ठिकाणीं अत्यंत प्रेमादर उत्पन्न होत असे. त्या वेळीं अशा सत्पुत्पुरुषाची सेवा पुढें मागें आपल्या हातून कांहीं होईल अशी कल्पना स्वप्नांतसुद्धां कधीं आली नव्हती. असें असतां त्याच सत्पुरुषाचें विस्तृत चरित्र लिहिण्याचा प्रसंग आला, त्यांचीं साधनें खुद्द त्यांच्याच घरीं व त्यांच्या चिरंजिवांकडून उपलब्ध झालीं. इतकेंच नव्हे, तर त्यांच्या ग्रंथांतील प्रधानग्रंथ जो ' **सुश्लोकलाघव** ' त्याचा अर्थ विशद करून रसिकांपुढें ठेवण्याचा प्रसंग आला; तेव्हां आमच्या मातापितरांच्या पूर्वपुण्याईचीच धन्यता वाटूं लागली, ह्यांत विशेषसें नवल नाहीं. आजच्या ग्रंथासोबत अण्णाचें सचित्र अल्प चरित्र जोडलेंच आहे. परंतु ज्यांना त्यांचें विस्तृत चरित्र पाहणें असेल त्यांनीं ' केरळ कोकिळ ' वर्ष ७ अंक ९ मध्यें अवश्य पहावें. कारण त्यांच्या सर्व ग्रंथांतील नमुन्यासह तें वाचावयास मिळेल. असो.

अण्णांच्या कवितेंतील मुख्य व श्रेष्ठ गुण म्हटला म्हणजे भक्तिरस व प्रसादचातुर्य हा होय. तो गुण पुरापूर रीतीनें व्यक्त झालेलें स्थळ म्हटलें म्हणजे त्यांचा संस्कृत व मराठी पदसंग्रह हें होय. कारण तो विषय त्यांनीं आत्मोद्धाराकरितां व लोकोद्धाराकरितांच केलेला आहे. आणखी तो विषय पारमार्थिकच असल्यामुळें त्यांत ते गुण विशेष दृष्टीस पडावेत हें स्वाभाविकच आहे. परंतु अण्णांच्या इतर काव्यग्रंथांतून हा विषय जरी व्यापलेला आहे, तरी त्यांत काव्यपटुत्व व चातुर्य हा गुण प्रधान आहे. उदाहर-

णार्थ, ‘ गजेंद्रचंपू ’ व ‘ सुश्लोकलाघव ’ ह्या दोन ग्रंथांत काव्यपटुत्व, रचनाचातुर्य, व कल्पनाकौशल्य हेच गुण पदोपदीं दृष्टीस पडतात. त्यांत भक्तिरस व प्रसाद नाहीं असें तर नाहींच; परंतु त्यांत जें रचनाचातुर्य भरलेलें दृष्टीस पडतें, त्यापेक्षां ते गुण कमी प्रमाणांतच आहेत, असें म्हणावें लागतें. आणि त्यावरून अण्णा हे शीघ्रकवि होते व त्यांच्या वाणींतून निरंतर भक्तिपर काव्यें स्वाभाविकपणें बाहेर पडत, असें जें आम्हीं वर म्हटलें आहे तेंसुद्धा निदान ह्या दोन काव्यांच्या संबंधानेंतरीं थोडें गौणच म्हणणें भाग येतें. काव्यशक्ति कितीही शीघ्र असली तरी सुश्लोकलाघवांतील द्व्यर्थी, त्र्यर्थी, अर्थ साधून कविता करणें बरेंच जड जाईल ह्यात तिळमात्र शंका नाहीं. अण्णांससुद्धां सुश्लोकलाघवांतील द्व्यर्थी, त्र्यर्थी, अर्थ साधून कविता करणें बरेंच जड गेलें असेल. यांत तिळमात्र शंका नाहीं. त्यांस सुद्धां ह्या ग्रंथाची रचना करतांना थोडातरी विचार हा करावा लागलाच असेल असें आम्हांस वाटतें. हें म्हणणें जरी खात्रीचें नसलें तरी तसा संभव तरी खरा. आणि तसें नसून भक्तिपर पदांप्रमाणेंच जर सुश्लोकलाघवांतील श्लोक सहज स्फूर्तीनें झाले असतील तर, अण्णांच्या बुद्धिमत्तेस काय उपमा द्यावी हेंच आह्मांस समजत नाहीं. असो.

वरच्या सर्व प्रतिपादनावरून ही गोष्ट लक्षांत येईलच कीं, प्रस्तुत ग्रंथ सारा श्लेषमयच असल्यानें, त्यात काव्यरचनेनें चातुर्य ओतप्रोत भरलेलें दिसून येतें. श्लेषासारखा अंतःकरणास आल्हाद देणारा अलंकार दुसरा कोणताच नाहीं म्हटलें तरी चालेल. आणि तो साधण्याला जितकें चातुर्य व कौशल्य लागतें तितकें काव्यांतील इतर आंगांत क्वचितच लागत असेल. म्हणूनच खुद्द प्रस्तुत कवीनें, वरच्या मथळ्यांतील श्लोकांत सांगितलें आहे कीं, सुश्लोकलाघवांतील श्लोक मनुष्यमात्राला कांहीं विलक्षण आनंद देणारे आहेत. ते ‘ सकलां ’ ना पाहिजे पाहिजे असेंच वाटतील. पण त्यांतून ‘ स–कलां ’ ना म्हणजे कुशल लोकांनातर फारच प्रिय होतील. तसेंच ‘ हरिदासांना ’ म्हणजे ईश्वरभक्तांनाही त्यांत भगवंताचे गुणानुवाद वर्णन केलेले असल्यामुळें, प्रिय होतीलच; पण हरि-

दासाचा धंदा करणारांना म्हणजे वक्त्यांनांही ते जीव कीं प्राण वाटतील असें जें म्हटलें आहे तें अगदीं यथार्थ आहे.

ह्या ग्रंथांत कथासूत्र किंवा ठरीव विषय असा कांहींच नाहीं. सर्व श्लोक स्फुटच आहेत, असें म्हटलें तरी चालेल. तथापि कांहीं विषयांची निवड करतां येईल. कारण ह्यांत नवविधा भक्तीचें निरूपण हें एक स्वतंत्रच प्रकरण आहे. तसेंच मोरोपंताच्या सन्मणिमालेप्रमाणें, श्रीसमर्थ रामदास, जयरामस्वामी, ज्ञानदेव, तुकाराम, कबीर, कमाल, सावता माळी, नामदेव, जनाबाई, इत्यादि साधूंचीं वर्णनेंही आलेलीं आहेत. श्रीरामदास स्वामींचें वर्णन तर अण्णांनीं अगदीं मनापासून व अत्यंत विस्तृत केलें आहे. इतकेंच नव्हे, तर समर्थांच्या ध्यानाचें एक सबंध मोठें गद्यच्या गद्यच ह्यांत गोवलें आहे. ह्यावरून त्यांच्याविषयीं अण्णांच्या मनांत अत्यंत पूज्य भावना असल्याचें स्पष्ट दिसून येतें. ह्याशिवाय, तंबाखू, जर्दा, मांजर ढेंकूण इत्यादि विनोदपर व हास्यकारक प्रकरणेंही अनेक आहेत. एकंदरींत भर सभेंत विद्वज्जनांचें ज्यांना मन अगदीं प्रसन्न करून घेणें असेल, त्यानें ह्या सुश्लोकलाघवांतील कांहीं चुटके पाठ केले तरी तो तें काम अगदीं लोकोत्तर करील ह्यांत शंका नाहीं. म्हणूनच अण्णांच्या पद्यानें कीर्तनांत जशी रंगदेवता प्रफुल्लित झालेली दृष्टीस पडते, तशी ती अन्यत्र क्वचितच आढळते. अण्णासारखा विद्वान्, छंदशास्त्र पारंगत, व प्रसाद हस्तगत झालेला असा कवि प्रस्तुत काळीं परमदुर्मिळ होय. एवढेंच नव्हे, तर 'सुश्लोक' करण्यामध्यें पंडित म्हणविणारे 'यमके' कवि किंवा कवितादेवीला भूषित व सुस्वरूप करण्यामध्यें नावाजल्या गेलेल्या आर्यांचे आर्य कवि जे मोरोपंत ते सुद्धां अण्णापुढें थोडें तरी मागेंच राहतील, असें विधान केलें तरी सुद्धां फारसा बाध येईल असें वाटत नाहीं. अशी अण्णांच्या काव्यामृताचा ज्यांनीं यथेच्छ रसास्वाद घेतला असेल, त्यांची खात्री झाल्यावांचून राहणार नाहीं.

अण्णांचें श्लेष साधण्याचें चातुर्य इतकें सरस, हृदयंगम व कौतुकास्पद आहे कीं, त्यांजपुढें एकाक्षरी, द्व्यक्षरी इत्यादि कोश जणूकाय हात जोडून उभेच आहेत असें वाटतें. अण्णांच्या बुद्धिमत्तेचें व विद्वत्तेचें काय

काय म्हणून वर्णन करावें ? अण्णा हे अनेक शास्त्रांत प्रवीण असल्याचें त्यांच्या चरित्रावरून दिसून येईलच. वैद्यशास्त्र त्यांना चांगलें अवगत असून ते स्वतः अनेक व्याधिग्रस्थ लोकांस आपलीं औषधें देऊन, रोगमुक्त करीत असत. हीं त्यांनीं संपादन केलेलीं अनेक औषधें, ह्या सुश्लोकलाघवांतील कितीएक श्लोकांत श्लेषार्थानें सांगितलीं आहेत. तेव्हां त्यांची तारीफ काय सांगावी ? उदाहरणार्थ ६६,७३,७४,७५, ७६ इत्यादि श्लोकांमध्यें निरानिराळीं औषधें सांगितलीं आहेत. परंतु, श्लोक १९२ मध्यें पृथु राजा मधुवनामध्यें तपश्चर्या करीत होता. या पौराणिक कथेच्या आधारानें मधु म्हणजे मध आणि वन म्हणजे पाणी एकत्र करून तें औषध सेवन केलें असतां, विशाळ दोंदाच्या साक्षात् गणपतीचासुद्धां अस्थिपंजर शिल्लक राहील ! ह्या वैद्यशास्त्रांतलि श्लेषार्थांत सांगितलेल्या औषधांबद्दल आमच्या वैद्यविशारद कविश्रेष्ठांचें कोणास बरें कौतुक वाटणार नाहीं ? हें तर असोच; पण वैय्याकरण हें शास्त्रच आधीं किती कठीण ! आणि त्यांतून पाणिनीच्या सूत्रांतील नियमांचें व प्रत्ययांचे श्लेष साधणें कितीबरें कठीण काम ? तें एका प्राचीन संस्कृत कवीनें 'राजतरंगिणी' नांवाच्या प्रसिद्ध ग्रंथांतमात्र साधलें आहे. परंतु त्याच तोडीचें किंबहुना त्याहून सरसही प्रस्तुत कवीनें तें ह्या सुश्लोकलाघवांत सावलें आहे. अशी सुश्लोकलाघव महोदधीमध्यें मज्जन होणाऱ्या रसिकांची खात्री झाल्यावांचून राहणार नाहीं. उदारणार्थः—श्लोक ८,८२, १४७,१४८,३०१ पहा. ह्या श्लोकांतील भावार्थ लक्षांत येण्याला वाचकसुद्धां वैय्याकरणचि पाहिजे. अशा प्रकारें अण्णांच्या कवित्वाबद्दल तारीफ करावी तितकी थोडीच आहे.

ह्या सुश्लोकलाघवरूपीं काव्यामृताचा संस्कृत भाषेंतूनच यत्किंचित् घुटक्याचा रसास्वाद ज्यानें अंतःकरणांत सेवन केला असेल, त्यालासुद्धां ह्या अपूर्व ग्रंथाचें यथेच्छ पान करण्याविषयीं अत्युत्कृष्ट इच्छा उत्पन्न होईल, यांत तिळमात्र शंका नाहीं. ह्या ग्रंथाचें भाषांतर आम्ही करीत आहों असें ऐकून प्रसिद्ध, विद्वान् व लेखनपटु रा.रा.म. ह्.—मोडक बी,ए, ह्यांनीं अत्यंत समाधान व्यक्त केलें. त्याचप्रमाणें दुसरे गृहस्थ रा. रा.

नेमचंद वालचंद वकील उस्मानाबाद ह्यांची व आमची सहज गांठ पडली असतां, आम्ही सुश्लोकलाघवाचें भाषांतर करीत आहों असें त्यांस समजलें. तेव्हां ते या पुस्तकाचे आश्रयदाते झाले इतकेंच नव्हे, तर या ग्रंथाचे छापून तयार झालेले फार्मतरी आपल्या दृष्टीस पडावेत, म्हणून ते मुद्दाम आमच्या घरीं आले. व प्रथम "तो वैय्याकरणाचा आठवा श्लोक ज्यामध्यें 'भवंतः' ह्या कर्त्यांचा व 'प्रयच्छत' या क्रियापदाचा श्लेष साधला आहे, त्याचा अर्थ मला पाहूंद्या." असें म्हणाले. व तो अर्थ पाहिल्यावर ते अत्यंत खूष झाले. साहित्यशास्त्रांमध्यें शृंगाररसाला अग्रस्थान दिलेलें आहे व त्याशिवाय प्राकृतजनांचेंही रंजन होत नाहीं, हें लक्षांत आणून लोकाचारास मान देण्याकरितां अण्णांनीं शृंगाररसाचेही बरेच श्लेष आणिलेले आहेत. उदाहरणार्थ २८०।४२४ वगैरे श्लोक पहावेत. परंतु सद्यःस्थितीला ते अनुरूप नाहींत, व शोभण्यासारखेही नाहींत; हें मनांत आणून आम्हीही एक दोन श्लोकांचा श्लेषार्थ न देतां तेथें फक्त फुल्याच घातल्या आहेत. पण चाणाक्ष वाचकांना थोड्याशा विचारांतीं त्यातील श्लेषही ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहींत.

अण्णांच्या कृतीचें जसें कौतुक वाटतें त्याप्रमाणेंच वरील वकीलसाहेबांच्या रसिकतेचेंही कौतुक वाटतें. ज्याप्रमाणें सिंह, वाघ व बकरा एकत्र पाणी पितात; यःकश्चित् कुत्रें वाघाबरोबर कुस्ती खेळतें; हत्ती सायकल चालवतात; घोडीं मृत्यूचें सोंग घेतात; इत्यादि अलीकडच्या सर्कसींतील प्रकार पाहिले म्हणजे, प्रेक्षकांचें मन प्रसन्न होऊन आतां कशाकशाचें व कोणत्या चमत्काराचें किती किती वर्णन करावें ? करीन तितकें थोडें. असेंच प्रत्येकाचें मनांत येतें. त्याप्रमाणेंच ह्या सुश्लोकलाघवांतील श्लेषरचनेच्या अद्‌भुतपणामुळें आमची अवस्था झाली आहे. ह्याकरिता आतां अधिक विस्तार न करितां हें सर्व पाहण्याचें काम व त्याचा निर्णय करण्याचें काम आम्ही आमच्या रसिक वाचकांवरच सोंपवितों. आणि अशा कठीण व कल्पनातीत रचनाचातुर्याच्या ग्रंथाचें भाषांतर करण्याचा योग येऊन तें परमेश्वरकृपेनें आज तडीस गेलें याबद्दल मनाला जो एकप्रकारचा अप्रतिम आनंद झाला आहे तो व्यक्त करण्याला अधिक योग्य

शब्द सुचणें शक्य नसल्यामुळें, गीतासमश्लोकीच्या परिसमाप्तीच्या वेळीं कविवर्य वामन पंडितांनीं जे उद्गार काढिले आहेतः—

॥ माता धन्य पिता धन्य, धन्य धन्य सुहृत् सखे ॥

तेच उद्गार आम्हीही काढुन आमच्या कृतीची पूर्णता करितों.

एकदां रामजोशी कीर्तन करीत असतां व त्या कीर्तनास प्रसिद्ध कवि मोरोपंत समक्ष बसले असतां, जोशीबुवांनीं आपल्या आवडत्या पंताच्याच आर्या लाविल्या. एका आर्येचे दोन तीन अर्थ सांगितले. आणि नंतर विनयानें श्रोत्यांस म्हणाले, " हे इतके अर्थ मीं आपल्या मतीप्रमाणें लाविले आहेत. परंतु—पंतांच्या विशाळ दोंदाकडे बोट दाखवून व थोडें हंसून म्हणाले,—याउप्पर ह्या पोटांत आणखीं किती भरले असतील ते कोण जाणे ! " त्याप्रमाणेंच अण्णांनीं ह्या काव्यांत एका शब्दाचेंचसें काय परंतु एक एक अक्षराचेसुद्धां दोन दोन तीन तीन अर्थ साधले आहेत. ते बुद्धीच्या आटोक्यांत आले तेवढे यथामति सांगितले आहेत. परंतु अण्णांच्या कोट्यांची व श्लेषांची इतकी समृद्धि असते कीं त्या संपतां संपतच नाहीं. तेव्हां आणखीसुद्धां आमच्या लक्षांत न येण्यासारखे श्लेष व अर्थ अद्याप राहिले नसतील कशावरून ? ह्याकरितां पुनः पुनः वाचून, आणखीं कांहीं तशीं स्थलें किंवा अर्थ किंवा कोटया आढळल्यास त्यांचा आम्ही द्वितीयावृत्तीच्या वेळीं अवश्य उल्लेख करूं. अथवा कोणा रसिक व मार्मिक गृहस्थांस तसा कांहीं निराळा अर्थ किंवा श्लेष आढळल्यास व यांनीं कृपा करून आम्हांस कळविल्यास त्याचाही आम्ही आदरपूर्वक विचार करूं इतकें सांगणें इष्ट दिसे.

पुणे भवानी पेठ, तांबेकराचा वाडा.
ता. २२ जून १९१७.

कृ. ना. आठल्ये.
भाषांतरकर्ता.

# अनुक्रमणिका.


| श्लोक. | विषय. | अर्थ. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| १ | श्रीरामचंद्राचें व कवीचें सादृश्य ... | अर्थ २ | १ |
| २ | पंचायतनास वंदन ... ... | अर्थ ५ | २ |
| ३ | ॐकाररूपी शंकर... ... .. | अर्थ २ | ५ |
| ४ | हरीहरास वंदन ... ... ... | अर्थ २ | ६ |
| ५ | ग्रंथोद्देश ... ... ... | अर्थ २ | ७ |
| ६ | कोणतीही कृति सदोषच असते. ... | अर्थ १ | ८ |
| ७ | निर्दोष करणें हें सज्जनांचें व्रतच आहे. ... | अर्थ १ | ९ |
| ८ | फार खुबीदार [ वैय्याकरण ] श्लेष ... | अर्थ १ | ९ |
| ९ | मौजेचा श्लेष ... ... ... | अर्थ १ | ११ |
| १० | सज्जनांच्यापुढें दोष रहात नाहींत ... | अर्थ १ | १२ |
| ११ | कवितेचें व वेश्येचें साम्य ... ... | अर्थ १ | १२ |
| १२ | सुश्लोकलाघव महात्म्य ... ... | अर्थ १ | १३ |
| १३ | ” | अर्थ १ | १३ |
| १४ | ” | ” | १३ |
| १५ | ” | ” | १३ |
| १६ | मायेचें स्वरूप ... ... ... | अर्थ १ | १४ |
| १७ | गुरूचें महात्म्य ... ... ... | अर्थ १ | १४ |
| १८ | नृसिंहाचा ‘ गुरु गुरु ’ शब्द... ... | अर्थ १ | १५ |
| १९ | ‘ जगन्मिथ्या ’ उत्कृष्ट श्लेष... ... | अर्थ १ | १५ |
| २० | माया व ब्रह्म ... ... ... | अर्थ १ | १६ |
| २१ | मिथ्यत्व ... ... ... | अर्थ १ | १६ |
| २२ | शंकर व विष्णु ह्यांचें ऐक्य ... ... | अर्थ २ | १७ |
| २३ | धन ... ... ... ... | अर्थ १ | १९ |
| २४ | धन ... ... ... ... | अर्थ १ | १९ |

| श्लोक. | विषय. | अर्थ. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| २५ | संख्येवर श्लेष ... ... ... | अर्थ १ | २० |
| २६ | चित्ताचा क्षय ... ... ... | अर्थ १ | २१ |
| २७ | समाधि ... ... ... | अर्थ १ | २२ |
| २८ | मनोरूप वृत्ती ... ... ... | अर्थ १ | २२ |
| २९ | सागर आणि भवसागर ... ... | अर्थ २ | २३ |
| ३० | अध्यात्म ज्ञानदीप... ... ... | अर्थ १ | २३ |
| ३१ | अत्मज्ञानरूपी सूर्य... ... ... | अर्थ १ | २४ |
| ३२ | आत्मज्ञान ... ... ... | अर्थ १ | २५ |
| ३३ | मोक्षाचा लाभ ... ... ... | अर्थ १ | २५ |
| ३४ | परब्रह्मप्राप्तीचा मार्ग ... ... | अथ २ | २५ |
| ३५ | संसार... ... ... ... | अर्थ १ | २६ |
| ३६ | सागर व भवसागर... ... ... | अर्थ २ | २७ |
| ३७ | अज्ञानांधकारांतून रक्षणकरणारा रवि ... | अर्थ २ | २७ |
| ३८ | आत्मज्ञान ... ... ... | अर्थ १ | २९ |
| ३९ | पंचाक्षरी मंत्र ... ... ... | अर्थ २ | ३१ |
| ४० | परब्रह्माचा लाभ ... ... ... | अर्थ २ | ३१ |
| ४१ | मोठें अक्षर ... ... ... | अर्थ २ | ३२ |
| ४२ | हरीचें सारथ्य ... ... ... | अर्थ २ | ३३ |
| ४३ | हरीचें सहाय्य पाहिजे ... ... | अर्थ १ | ३४ |
| ४४ | शरीरशुध्यर्थ भक्ति... ... ... | अर्थ २ | ३४ |
| ४५ | हरीशीं तादात्म्य ... ... ... | अर्थ २ | ३६ |
| ४६ | परब्रह्माशीं ऐक्य ... ... ... | अर्थ २ | ३७ |
| ४७ | शंकराची भक्ति ... ... ... | अर्थ २ | ३७ |
| ४८ | भवन असून वन... ... ... | अर्थ २ | ३८ |
| ४९ | जीवन्मुक्तालासुद्धां भक्ति पाहिजेच ... | अर्थ २ | ३९ |
| ५० | रामाच्या भजनांत आनंद ... ... | अर्थ २ | ४० |
| ५१ | सगुण भक्ति ... ... ... | अर्थ २ | ४० |

| श्लोक. | विषय. | अर्थ. | पृष्ठ |
|---|---|---|---|
| ५२ | निष्काम भक्ति ... ... ... | अर्थ २ | ४१ |
| ५३ | ब्राह्मणांना भक्तीनेंच मुक्ति मिळेल ... | अर्थ १ | ४२ |
| ५४ | भक्तीचें महात्म्य ... ... ... | अर्थ २ | ४२ |
| ५५ | प्रेमावाचून दुसरें कांहीं नको. [ ह्यांत ' मा ' यमक साधलें आहे. ] | | ४३ |
| ५६ | पार्वतीपाशीं मागणें ... ... | अर्थ १ | ४३ |
| ५७ | मी रामाचेंच भजन करीन [मेचा अनुप्रास ] | अर्थ १ | ४४ |
| ५८ | संसारतापाला उपाय ... ... | अर्थ २ | ४४ |
| ५९ | यातायातीला उपाय ... ... | अर्थ २ | ४५ |
| ६० | आसक्तीला उपाय... ... ... | अर्थ १ | ४५ |
| ६१ | भवभुजंगाला उपाय ... ... | अर्थ १ | ४६ |
| ६२ | संसार नाहींसा करण्यास उपाय ... | अर्थ २ | ४६ |
| ६३ | अज्ञानांधकार ... ... ... | अर्थ १ | ४७ |
| ६४ | संसार तरणोपाय ... ... ... | अर्थ २ | ४७ |
| ६५ | अरण्य व संसारारण्य ... ... | अर्थ २ | ४८ |
| ६६ | भवपित्ताला उपाय [ औषध ] ... | अर्थ २ | ४९ |
| ६७ | संसाररूप विहीर ... ... ... | अर्थ १ | ५० |
| ६८ | " ... ... ... | " | ५० |
| ६९ | संसार तरणोपाय ... ... ... | अर्थ १ | ५० |
| ७० | " ... ... ... | " | ५१ |
| ७१ | संसारनदीला दोन उपाय ... ... | अर्थ १ | ५१ |
| ७२ | अज्ञानाला उपाय ... ... ... | अर्थ १ | ५१ |
| ७३ | भवज्वरावर उपाय [ औषधी ] ... | अर्थ २ | ५२ |
| ७४ | संसाररूप रोग [ औषधी ] ... ... | अर्थ २ | ५३ |
| ७५ | " [ औषधी ] ... ... | अर्थ २ | ५३ |
| ७६ | दारिद्र्यरोगावर [ औषधी ] ... ... | अर्थ २ | ५४ |
| ७७ | कलीचें वर्णन ... ... ... | अर्थ २ | ५४ |

| श्लोक. | विषय. | अर्थ. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| ७८ | कलीची धुमाकूळ ... ... ... | अर्थ ३ | ५४ |
| ७९ | कलीचा प्रभाव ... ... ... | अर्थ २ | ५६ |
| ८० | कलीप्रभाव ... ... ... | अर्थ २ | ५७ |
| ८१ | ,, | ,, | ५७ |
| ८२ | रामपर अर्थ असून[ वैय्याकरण ] ... | अर्थ २ | ५८ |
| ८३ | आत्मलाभाचा मार्ग ... ... | अर्थ १ | ५९ |
| ८४ | रामभक्तीचा महिमा ... ... | ,, | ६० |
| ८५ | रामनाम ... ... ... | ,, | ६० |
| ८६ | वंशमाहात्म्य ... ... ... | ,, | ६० |
| ८७ | ,, ... ... ... | ,, | ६१ |
| ८८ | ,, ... ... ... | ,, | ६१ |
| ८९ | देवाचा हव्यास ! ... ... ... | ,, | ६२ |
| ९० | शंकराची लीला ... ... ... | ,, | ६३ |
| ९१ | धनप्राप्तीचामार्ग ... ... ... | ,, | ६३ |
| ९२ | हरीची लीला ... ... ... | ,, | ६४ |
| ९३ | धनसंपादनाचे मार्ग... ... ... | ,, | ६४ |
| ९४ | लक्ष्मीपतीचें द्रव्य ... ... ... | ,, | ६५ |
| ९५ | अपुत्राला गति ... ... ... | ,, | ६५ |
| ९६ | सगुणाशिवाय निर्गुण नाहीं ... ... | अर्थ २ | ६६ |
| ९७ | परमेश्वराचा थोरपणा ... ... | अर्थ २ | ६६ |
| ९८ | चित्पावन ब्राह्मणांचें विष्णूशीं साम्य ... | अर्थ २ | ६७ |
| ९९ | ,, | अर्थ २ | ६८ |
| १०० | हरीला प्रिय तो सर्वांस प्रिय ... ... | अर्थ २ | ६९ |
| १०१ | कोदंड धारण ... ... ... | अर्थ २ | ६९ |
| १०२ | कमलधारणोद्देश ... ... ... | अर्थ २ | ७० |
| १०३ | चक्रधारणोद्देश ... ... ... | अर्थ २ | ७० |
| १०४ | विष्णुपदाचें महात्म्य ... ... | अर्थ २ | ७१ |

| श्लोक. | विषय. | अर्थ. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| १०५ | ,, | ,, | ७१ |
| १०६ | विदेहभाव ... ... | ... ,, | ७२ |
| १०७ | शंकराची भक्ति ... ... | ... ,, | ७३ |
| १०८ | विदेहस्थिति ... ... | ... अर्थ २ | ७३ |
| १०९ | उज्वलता ... ... | ... ,, | ७३ |
| ११० | श्रवणभक्ति ... ... | ... अर्थ २ | ७४ |
| १११ | ,, ... ... | ... ,, | ७४ |
| ११२ | ,, ... ... | ... अर्थ १ | ७५ |
| ११३ | हरीचे गुणानुवाद... ... | ... अर्थ २ | ७५ |
| ११४ | समानशीलत्व ... ... | ... अर्थ १ | ७६ |
| ११५ | कर्णाचे व कर्णाचें साम्य ... | ... अर्थ २ | ७६ |
| ११६ | कर्णाची प्रार्थना ... | ... अर्थ २ | ७७ |
| ११७ | श्रवणभाक्ति ... ... | ... अर्थ २ | ७८ |
| ११८ | कीर्तन ... ... | ... अर्थ २ | ७९ |
| ११९ | यास्काचार्यांचें म्हणणें ... | ... अर्थ १ | |
| १२० | भगवन्नाम ... ... | ... अर्थ २ | ८० |
| १२१ | नामरत्न ... ... | ... अर्थ १ | ८० |
| १२२ | रामनाम ... ... | ... अर्थ १ | ८० |
| १२३ | नाम पराङ्मुख ... ... | ... अर्थ २ | ८१ |
| १२४ | नामरसायन ... ... | ... अर्थ २ | ८१ |
| १२५ | पातकीही नामानें उद्धरतो ... | ... अर्थ २ | ८२ |
| १२६ | रामरूपजननी ... ... | ... अर्थ १ | ८२ |
| १२७ | नामरसाचें श्रेष्ठत्त्व... ... | ... अर्थ १ | ८२ |
| १२८ | नाममाधुर्य ... ... | ... अर्थ १ | ८३ |
| १२९ | नामरूप आम्रफल... ... | ... अर्थ १ | ८३ |
| १३० | रामाच्या सान्निध्यानें चंद्राचें महत्त्व | ... अर्थ १ | ८३ |
| १३१ | ,, ... ... | ... अर्थ १ | ८४ |

| श्लोक. | विषय. | अर्थ. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| १३२ | ” . ... ... ... | ” | ८५ |
| १३३ | ” ... ... ... | ” | ८५ |
| १३४ | ग्रहामध्यें चंद्राचें महत्त्व ... ... | अर्थ १ | ८६ |
| १३५ | चंद्राची योग्यता वाढली ... ... | अर्थ १ | ८६ |
| १३६ | आम्रच प्रिय कां ? ... ... | अर्थ १ | ८७ |
| १३७ | मदनाचें महत्त्व कां ? ... ... | अर्थ १ | ८८ |
| १३८ | रमेचें महत्त्व कां ? ... ... | ” | ८८ |
| १३९ | रकाराला महत्त्व कां ? ... ... | अर्थ २ | ८९ |
| १४० | नामाचा पराक्रम ... ... | अर्थ १ | ८९ |
| १४१ | नामाचा पराक्रम रामापेक्षां अधिक ... | ” | ९० |
| १४२ | रामनामामृत ... ... ... | ” | ९० |
| १४३ | संन्यास ही शिक्षाच आहे. ... ... | ” | ९१ |
| १४४ | रामनामांत महावाक्य ... ... | ” | ९१ |
| १४५ | रामनाम कसेंही घ्या ... ... | ” | ९२ |
| १४६ | नामाशिवाय वाणी शोभत नाहीं. ... | अर्थ २ | ९२ |
| १४७ | वैय्याकरणी अच्युत ... ... | अर्थ २ | ९३ |
| १४८ | वैय्याकरणी रामचंद्र ... ... | ” | ९४ |
| १४९ | रामचंद्र व अग्नि ... ... | ” | ९५ |
| १५० | वाणीची प्रार्थना ... ... | ” | ९६ |
| १५१ | वाणीचें व कर्णाचें सादृश्य ... ... | अर्थ २ | ९७ |
| १५२ | जिव्हेची प्रार्थना ... ... | अर्थ १ | ९८ |
| १५३ | शुकाचार्य व पोपट ... ... | अर्थ २ | ९८ |
| १५४ | कीर्तनांतील टाळी ... ... | अर्थ २ | ९९ |
| १५५ | मुकालावणें ... ... | अर्थ १ | १०० |
| १५६ | निद्रा ही कुंभकर्णाची स्त्री ... ... | अर्थ १ | १०० |
| १५७ | स्मरण ... ... | ” | १०० |
| १५८ | चित्त वानरासारखें आहे. ... ... | अर्थ २ | १०१ |

| श्लोक. | विषय. | अर्थ. | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १५९ | चित्ताला उपदेश ... | ... अर्थ १ | १०२ |
| १६० | ,, | ... ,, | १०३ |
| १६१ | ,, | ... ,, | १०३ |
| १६२ | ,, | ... ,, | १०४ |
| १६३ | ,, | ... अर्थ २ | ००४ |
| १६४ | ,, | ... अर्थ १ | १०५ |
| १६५ | प्ऱ्हाद नामस्मरणच कां करूं लागला ? | ... ,, | १०५ |
| १६६ | पादसेवन ... ... | ... अर्थ ३ | १७५ |
| १६७ | पादसेवनानें वैकुंठप्राप्ती ... | ... अर्थ १ | १०६ |
| १६८ | विष्णुपदसेवा टाकूंनका ... | ... अर्थ ३ | १०७ |
| १६९ | रामपदाचा आश्रय ... | ... अर्थ २ | १०७ |
| १७० | विष्णुपदच श्रेष्ठ ... | ... अर्थ १ | १०८ |
| १७१ | लक्ष्मी कमल धारण करते | ... ,, | १०८ |
| १७२ | लक्ष्मी आपल्यां कन्येला ह्मणते | ... ,, | १०८ |
| १७३ | विष्णु आंगठा कां चोखतात ? [उत्कृष्ट] | ... ,, | १०९ |
| १७४ | माहेरीं राहण्यांत आनंद | ... ,, | १०९ |
| १७५ | लक्ष्मी पादसेवा कां करते ? | ... ,, | ११० |
| १७६ | नील कमलाची तपश्चर्या | ... ,, | १११ |
| १७७ | तांबड्या कमलाची इच्छा | ... ,, | ११२ |
| १७८ | नलीन ही मलीन होतें | ... ,, | ११२ |
| १७९ | नखेंदुहून इंदू कमी | ... ,, | ११३ |
| १८० | अर्चन ... | ... अर्थ ३ | ११४ |
| १८१ | रामाच्या आराधनेचें फळ ... | ... अर्थ १ | ११४ |
| १८२ | सगुणध्यानाची महती ... | ... अर्थ २ | ११५ |
| १८३ | श्रीफल ... ... | ... अर्थ २ | ११५ |
| १८४ | तुलसर्चि प्रेम ... ... | ... अर्थ १ | ११६ |
| १८५ | रामाला तुलसी प्रिय ... | ... ,, | ११७ |

| श्लोक. | विषय. | अर्थ. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| १८६ | अपामार्ग श्रीहरी धारण करतो ... | ,, | ११७ |
| १८७ | रामचंद्रापुढें नृत्यगायन ... ... | ,, | ११७ |
| १८८ | हात अपराधी होत नाहीं. ... ... | अर्थ २ | ११८ |
| १८९ | मनाचा चांगुलपणा ... ... | अर्थ १ | ११८ |
| १९० | धन्य होत ... ... | अर्थ २ | ११९ |
| १९१ | नयनांचे परमेश्वराशीं साम्य [फार उत्कृष्ट] | अर्थ २ | ११९ |
| १९२ | मधुवन [ औषधी ] ... ... | अर्थ २ | १२० |
| १९३ | वदंन ... ... ... | अर्थ १ | १२१ |
| १९४ | मस्तकास बोध ... ... ... | अर्थ १ | १२१ |
| १९५ | अक्रूरावर उत्प्रेक्षा ... ... | ,, | १२२ |
| १९६ | दास्य ... ... ... | ,, | १२२ |
| १९७ | ज्ञानानेंच मुक्ति ... ... | ,, | १२३ |
| १९८ | ' दासोहं ' असें ह्मण ... ... | ,, | १२३ |
| १९९ | मारुतीचें दास्य ... ... | ,, | १२४ |
| २०० | श्रीरामदास हो ... ... | ,, | १२४ |
| २०१ | निर्हेतुक सेवा ... ... | ,, | १२५ |
| २०२ | मारुतींनीं दास्य कां पतकरलें ! ... | ,, | १२६ |
| २०३ | पित्याच्या धन्याचें दास्य ... | ,, | १२६ |
| २०४ | परमेश्वराचा दासच बुद्धिमान् होय ... | ,, | १२७ |
| २०५ | विपरीतभाव होत नाहीं. ... | ,, | १२७ |
| २०६ | सख्य ... ... ... | ,, | १२८ |
| २०७ | परमेश्वराशीं सख्य करणेंच उचित ... | अर्थ १ | १२८ |
| २०८ | आत्मानिवेदन ... ... ... | अर्थ १ | १२९ |
| २०९ | बळीनें आत्मार्पण करण्याचें कारण ... | ,, | १२९ |
| २१० | मनास बोध ... ... ... | ,, | १३० |
| २११ | आशा सोडली म्हणजे नाश नाहीं. ... | ,, | १३० |
| २१२ | आशा नसेल तो मुक्त ... ... | ,, | १३० |

| श्लोक. | विषय. | अर्थ. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| २१३ | याचना म्हणजे यातना ... | ... अर्थ २ | १३० |
| २१४ | आशा व निराशा ... | ... अर्थ २ | १३१ |
| २१५ | स्त्री आणि अस्त्री ... | ... ,, | १३१ |
| २१६ | तोंडल्याचा दोष ... | ... अर्थ १ | १३२ |
| २१७ | स्त्रीसंगती ( अनुप्रास ) ... | ... ,, | १३२ |
| २१८ | दुष्ट स्त्री ही नरकरूप ... | ... अर्थ २ | १३३ |
| २१९ | स्त्रीलंपट ... | ... ,, | १३३ |
| २२० | पामा व रामा ... | ... अर्थ २ | १३३ |
| २२१ | स्त्रियांचे स्तन ... | ... ,, | १३४ |
| २२२ | रामभक्तानें स्त्री सोडावी ... | ... अर्थ १ | १३५ |
| २२३ | स्त्री, पुरुषार्थांची हानी करणारी | ... ,, | १३५ |
| २२४ | स्त्री, तारणारी नौका ... | ... अर्थ २ | १३५ |
| २२५ | स्त्री दैन्य उत्पन्न करील काय ? | ... अर्थ २ | १३६ |
| २२६ | कुटुंब व शेर ... ... | ... अर्थ १ | १३६ |
| २२७ | मनाला बोध ... ... | ... ,, | १३७ |
| २२८ | बायकामुळें खरजेसारखी ... | ... अर्थ २ | १३७ |
| २२९ | स्त्रीरूपी जाळें ... | ... ,, | १३८ |
| २३० | द्रव्यसंग्रह करूं नकोस ... | ... ,, | १३८ |
| २३१ | मोह हा किती जबरदस्त ! ... | ... ,, | १३८ |
| २३२ | सुवर्णाचा संपर्क सोडला तर साधूपेक्षां श्रेष्ठ | अर्थ २ | १३९ |
| २३३ | वादग्रस्त धन ... ... | ... ,, | १३९ |
| २३४ | स्त्रीलंपटपणा सोडून दे [ उत्कृष्ट ] | ... अर्थ २ | १४० |
| २३५ | स्त्री व धन [ उत्कृष्ट ] ... | ... ,, | १४० |
| २३६ | शानि ... ... | ... अर्थ १ | १४१ |
| २३७ | पुरुष निर्माण करून व्यर्थ ... | ... अर्थ २ | १४२ |
| २३८ | इंद्रियाधीनपणा ... ... | ... अर्थ १ | १४२ |
| २३९ | प्रभ्रांतच उत्तर ... ... | ... ,, | १४३ |

| श्लोक. | विषय. | अर्थ. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| २४० | कां मरतोस ? ... ... ... | ,, | १४३ |
| २४१ | ब्राह्मणांनीं काय करावें ? ... ... | ,, | १४३ |
| २४२ | कामक्रोधापेक्षां लोभ फार कठीण ... | ,, | १४४ |
| २४३ | मोहाकुल ... ... ... | ,, | १४५ |
| २४४ | नरकोपास्थिति ... ... ... | ,, | १४५ |
| २४५ | यःकश्चित् कारणावरून रागवणारे ... | अर्थ १ | १४६ |
| २४६ | मत्सर हा ब्राह्मण्याची हानि करणारा आहे | अर्थ २ | १४६ |
| २४७ | श्रेष्ठ कर्म केल्यानें दुर्गति प्राप्त होत नाहीं | ,, | १४६ |
| २४८ | शांत असतो तो सुखी ... ... | अर्थ १ | १४७ |
| २४९ | शमाचें साधन ... ... | ,, | १४७ |
| २५० | शांत कोण ? ... ... | अर्थ १ | १४७ |
| २५१ | अविद्यारूपी भांग ... ... | ,, | १४८ |
| २५२ | दांत ... ... ... | अर्थ २ | १४८ |
| २५३ | उपरम ... ... ... | ,, | १४८ |
| २५४ | सदा समाधान ... ... ... | ,, | १४९ |
| २५५ | श्रद्धा ... ... ... | ,, | १४९ |
| २५६ | क्षमा ... ... ... | ,, | १५० |
| २२७ | शुचि आणि अशुचि ... ... | ,, | १५० |
| २५८ | शंकर हा दोषाचा साठा ! ... ... | ,, | १५० |
| २५९ | केवळ पाठांतर ... ... ... | ,, | १५१ |
| ४६० | परमार्थाचें कारण ... ... ... | ,, | १५१ |
| २६१ | अर्थज्ञानाशिवाय वेदाध्ययन ... ... | अर्थ १ | १५२ |
| २६२ | वेदार्थज्ञ [ प्रश्नांत उत्तर ] ... ... | ,, | १५२ |
| २६३ | शास्त्रविरहित मार्ग... ... ... | अर्थ २ | १५२ |
| २६४ | काव्यव्यासंगाला धिःकार ... | अर्थ २ | १५३ |
| २६५ | भागवतस्थिति उत्तम ... ... | अर्थ १ | १५३ |
| २६६ | भागवत हें आई सारखें सुखवाह ... | अर्थ १ | १५४ |

पृ. ८३ ८१


| श्लोक. | विषय. | अर्थ. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| २६७ | तपस्व्यांना स्त्रीसमागमेच्छा ... | ,, | १५४ |
| २६८ | गृहस्थाश्रम ... ... | ,, | १५४ |
| २६९ | याचकांना आश्रय देणारा ... | ,, | १५५ |
| २७० | आचारानें विचारानें वागणें ... ... | अर्थ २ | १५५ |
| २७१ | ढोंगानें सन्यास घेतला तरी हित होतें | अर्थ २ | १५६ |
| २७२ | मोक्षमार्गीत भगवन्नाम पुरे ... ... | ,, | १५६ |
| २७३ | पाय घट्ट धरणें ... ... | अर्थ १ | १५६ |
| २७४ | अज्ञानांधकारांत परमहंस ... | अर्थ २ | १५७ |
| २७५ | परमहंसाची संगति ... ... | अर्थ २ | १५८ |
| २७६ | परमहंसाच्या दर्शनानें रामाची प्राप्ती ... | अर्थ २ | १५९ |
| २७७ | हंसपद [ काकपद ] ... ... | अर्थ २ | १५९ |
| २७८ | ,, ... ... ... | अर्थ २ | १६० |
| २७९ | सूर्यकांत ... ... ... | ,, | १६० |
| २८० | कौटिल्य हेंच बंधनास कारण [ श्रृंगार ] | ,, | १६० |
| २८१ | सत्संगाचा महिमा ... ... | अर्थ २ | १६१ |
| २८२ | जगासीं उदासीन ... ... | अर्थ २ | १६१ |
| २८३ | साधूंच्या आचारानें वागणें ... ... | ,, | १६२ |
| २८४ | कुटिल असेल तो अपूर्ण ... ... | अर्थ २ | १६२ |
| २८५ | मोक्षाचीं साधनें [ व्याकरण ] ... | अर्थ १ | १६३ |
| २८६ | सदाचारी ब्राह्मण ... ... | अर्थ २ | १६३ |
| २८७ | योग आणि भोग ... ... | ,, | १६४ |
| २८८ | भक्तीचीं चिन्हें ... ... | ,, | १६५ |
| २८९ | रामचंद्राचें सामर्थ्य ... ... | ,, | १६५ |
| २९० | साधु आनंदमयच असतात. ... ... | अर्थ २ | १६५ |
| २९१ | ,, ... ... ... | अर्थ १ | १६६ |
| २९२ | श्रेष्ठ लोक अविकृत असतात ... | अर्थ २ | १६६ |
| २९३ | कुलीन लोक ... ... ... | अर्थ १ | १६७ |

| श्लोक. | विषय. | अर्थ. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| २९४ | श्रेष्ठ मनुष्यांना विकल्प येत नाहीं. | ... अर्थ २ | १६८ |
| २९५ | ब्राह्मणाची भक्ति ... | ... ,, | १६८ |
| २९६ | ब्राह्मण श्रेष्ठ ... ... | ... ,, | १६८ |
| २९७ | शूराचें लक्षण ... ... | ... अर्थ ३ | १६९ |
| २९८ | हंसाचें लक्षण ... ... | ... अर्थ २ | १६९ |
| २९९ | ज्ञानरस चाखणारे ब्राह्मण ... | ... ,, | १७० |
| ३०० | ज्ञानी निरभिमान असतात. ... | ... अर्थ १ | १७० |
| ३०१ | सत्संगती [ वैयाकरण ] ... | ... ,, | १७१ |
| ३०२ | पुरुषाचें उपकार हेंच कर्तव्य | ... ,, | १७१ |
| ३०३ | उदार पुरुष ... ... | ... अर्थ २ | १७१ |
| ३०४ | ईश्वरभक्ताचे तर्क नष्ट होतात | ... अर्थ १ | १७२ |
| ३०५ | ब्रह्मज्ञानी ... ... | ... अर्थ २ | १७२ |
| ३०६ | भास्कराचार्य व लीलावती | ... ,, | १७३ |
| ३०७ | महात्मा आवडत नाहीं. ... | ... ,, | १७३ |
| ३०८ | विषयाचा सत्कार ... | ... अर्थ १ | १७४ |
| ३०९ | विरळा मनुष्य ... ... | ... ,, | १७४ |
| ३१० | ,, ... ... | ... अर्थ २ | १७५ |
| ३११ | नीच लोकही प्रसादास पात्र होतात | ... ,, | १७५ |
| ३१२ | नारदाचें वर्णन ... ... | ... अर्थ २ | १७६ |
| ३१३ | ,, ... ... | ... अर्थ १ | १७६ |
| ३१४ | पर्वतऋषि गातात... ... | ... ,, | १७७ |
| ३१५ | बदरीफलांचा महिमा ... | ... ,, | १७७ |
| ३१६ | कृष्णद्वैपायन ... ... | ... अर्थ २ | १७७ |
| ३१७ | व्यासास वंदन ... ... | ... अर्थ २ | १७८ |
| ३१८ | आशेचा त्याग करणारे शुकाचार्य | ... अर्थ २ | १७८ |
| ३१९ | शुकाचार्य ... ... | ... अर्थ १ | १७८ |
| ३२० | द्राक्षांची व मिरचीची रुचि एक | ... अर्थ २ | १७९ |
| ३२१ | शबरी शरधारीच आहे ... | ... ,, | १७९ |

| श्लोक. | विषय. | अर्थ. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| ३२२ | बोरें दान देऊन उद्धार ... | ... ,, | १८० |
| ३२३ | शबरीची सेवा ... ... | ... ,, | १८० |
| ३२४ | मारुती कपि नव्हे कवि आहे... | ... अर्थ १ | १८० |
| ३२५ | मारुती विद्वान् कसा ? ... | ... ,, | १८१ |
| ३२६ | बिभीषणाचें वर्णन ... | ... अर्थ २ | १८१ |
| ३२७ | कबीराचें वर्णन ... | ... ,, | १८१ |
| ३२८ | ज्ञानवान् ब्राह्मण ... | ... अर्थ २ | १८२ |
| ३२९ | कमालाची स्तुति ... | ... अर्थ १ | १८३ |
| ३३० | तुलसीदास ... ... | ... अर्थ २ | १८४ |
| ३३१ | ममतेनें मोहित झालेला ( तुळसीदास | ... अर्थ १ | १८४ |
| ३३२ | रामदासस्वामींची योग्यता ... | ... ,, | १८५ |
| ३३३ | रामाचा दास परब्रह्माशीं लीन होतो | ... अर्थ २ | १८६ |
| ३३४ | रामदासाच्या घरांत कल्याण ... | ... अर्थ २ | १८६ |
| ३३५ | रामदासाचा चरणरज ... | ... ,, | १८६ |
| ३३६ | रामदास हा रामच आहे ... | ... ,, | १८७ |
| ३३७ | रामदासाची व मारुतीची तुलना | ... अर्थ २ | १८७ |
| ३३८ | अकोपयुक्त ... ... | ... ,, | १८८ |
| ३३९ | श्रीराम मातेप्रमाणें आहेत ... | ... ,, | १८९ |
| ३४० | अकामता ... ... | ... ,, | १८९ |
| ३४१ | वेणूबाईचें वर्णन ... ... | ... अर्थ २ | १८९ |
| ३४२ | रामदासांची निधनतिथि ... | ... अर्थ १ | १८९ |
| ३४३ | समाधिकाल ... ... | ... अर्थ १ | १९१ |
| ३४४ | ,, ... ... | ... ,, | १९१ |
| ३४५ | देहत्याग केव्हां करावा ? ... | ... ,, | १९१ |
| ३४६ | शनिवारचा दिवस... ... | ... ,, | १९२ |
| ३४७ | शुक्लपक्षांत मरण येऊं नये ... | ... अर्थ २ | १९२ |
| ३४७ | शुक्लपक्षाची नवमी ... | ... ,, | १९३ |

| श्लोक. | विषय. | अर्थ. | पृष्ठ. |
| --- | --- | --- | --- |
| ३४९ | देवांची व पितरांची प्रार्थना ... ... | ... अर्थ १ | १९३ |
| ३५० | श्रीरामदास हे हनुमानच ... | ... ,, | १९४ |
| | गद्य [ रामदासाचें वर्णन ] ... | ... | १९५ |
| ३५१ | जन्माचें सार्थक ... ... | ... अर्थ १ | १९८ |
| ३५२ | दासबोधाचें वर्णन... ... | ... ,, | १९८ |
| ३५३ | रंगनाथस्वामीचें वर्णन ... | ... अर्थ २ | १९९ |
| ३५४ | ,, ... ... | ... ,, | १९९ |
| ३५५ | ,, ... ... | ... अर्थ १ | १९९ |
| ३५६ | ,, ... ... | ... ,, | २०० |
| ३५७ | आनंदमूर्ति ... ... | ... अर्थ २ | २०० |
| ३५८ | केशवस्वामीचें वर्णन ... | ... अर्थ १ | २०१ |
| ३५९ | कृष्णाप्पांचें वर्णन ... | ... अर्थ २ | २०१ |
| | गद्य--बळरामावर उत्प्रेक्षा ... | ... | २०१ |
| ३६० | अमृतराय ... ... | ... अर्थ १ | २०४ |
| ३६१ | अमृत व सारस्वत... ... | ... अर्थ १ | २०४ |
| ३६२ | सिद्धराज ... ... | ... अर्थ २ | २०५ |
| ३६१ | रामचंद्र पंडित ... ... | ... अर्थ ३ | २०५ |
| ३६४ | रामचंद्राची कृत्रिमता ... | ... अर्थ १ | २०६ |
| ३६५ | लोकोत्तर रामचंद्र... ... | ... अर्थ २ | २०६ |
| ३६६ | शेषाचे उपकार ... ... | ... अर्थ १ | २०७ |
| ३६७ | राधा ... ... | ... अर्थ १ | २०७ |
| ३६८ | राधेचें निस्सीम प्रेम ... | ... अर्थ १ | २०८ |
| ३६९ | राधेचें वर्णन ... ... | ... अर्थ २ | २०८ |
| ३७० | वळीची सत्वशीलता ... | ... अर्थ १ | २०९ |
| ३७१ | उद्धव हा साक्षात् माधव ... | ... अर्थ २ | २०९ |
| ३७२ | भगवत्कृपेचें माहात्म्य ... | ... ,, | २१० |
| ३७३ | अर्जुनाचें वैभव देवाधीन ... | ... अर्थ २ | २१० |

| श्लोक. | विषय. | अर्थ. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| ३७४ | अर्जुनाला गीतेचा लाभ ... ... | अर्थ २ | २१० |
| ३७५ | अर्जुनाच्या शस्त्राचें तेज ... ... | ,, | २११ |
| ३७६ | द्रौपदी ... ... ... | अर्थ १ | २११ |
| ३७७ | भक्तीनें श्रीहरीचें दर्शन ... ... | अर्थ १ | २११ |
| ३७८ | भीष्म ... ... ... | अर्थ २ | २१२ |
| ३७९ | विदुर ... ... ... ... | अर्थ १ | २१२ |
| ३८० | जोंधळ्याच्या कण्या ... ... | ,, | २१३ |
| ३८१ | पुंडरिक [ पांढरें कमळ ] ... ... | ,, | २१३ |
| ३८२ | शंकराचार्य व मध्वाचार्य ... ... | अर्थ २ | २१३ |
| ३८३ | मत्स्येंद्रनाथ [ फार उत्कृष्ट ] ... ... | ,, | २१४ |
| ३८४ | ,, ... ... | ,, | २१५ |
| ३८५ | गोरक्ष... ... ... ... | ,, | २१५ |
| ३८६ | नाथपंथ ... ... ... | अर्थ १ | २१६ |
| ३८७ | निवृत्ति ... ... ... | ,, | २१६ |
| ३८८ | ज्ञानदेव ... ... ... | ,, | २१६ |
| ३८९ | खेचर ... ... ... | अर्थ २ | २१७ |
| ३९० | नामदेवाची सेवा ... ... ... | अर्थ १ | २१७ |
| ३९१ | दामाशेटी ... ... ... | अर्थ २ | २१७ |
| ३९२ | जनी ... ... ... ... | अर्थ २ | २१८ |
| ३९३ | सावता माळी ... ... ... | अर्थ १ | २१८ |
| ३९४ | माधवदास ... ... ... | ,, | २१८ |
| ३९५ | दत्तात्रय ... ... ... | अर्थ २ | २१९ |
| ३९६ | कावडीनें पाणी आणलें ... ... | ,, | २१९ |
| ३९७ | गाऊबा ... ... ... | ,, | २२० |
| ३९८ | विश्वंभरभट आणि लीला ... ... | अर्थ २ | २२१ |
| ३९९ | मुक्तेश्वराची वाणी... ... ... | अर्थ १ | २२२ |
| ४०० | खडीसाखरेचा प्रसाद ... ... | अर्थ १ | २२२ |

| श्लोक. | विषय. | अर्थ. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| ४०१ | मुक्तेश्वरांची चार पर्वें .. ... | ,, | २२३ |
| ४०२ | दामाजीपंत ... .. ... | ,, | २२३ |
| ४०३ | तुकारामाचे अभंग .. ... | अर्थ २ | २२४ |
| ४०४ | तुकाराम ... ... ... | अर्थ १ | २२४ |
| ४०५ | तुकारामाचा प्रसाद ... ... | अर्थ २ | २२४ |
| ४०६ | आनंदसुत ... ... ... | अर्थ २ | २२५ |
| ४०७ | आनंदतनय आणि अग्नि ... ... | ,, | २२६ |
| ४०८ | आनंदतनय ... ... ... | ,, | २२६ |
| ४०९ | ,, ... ... ... | ,, | २२७ |
| ४१० | वामन पंडित ... ... ... | अर्थ १ | २२७ |
| ४११ | गिरिबाईना ज्ञानबोध ... ... | ,, | २२८ |
| ४१२ | वामन व गिरीश ... ... ... | ,, | २२८ |
| ४१३ | मोरोपंत व विनायक ... ... | अर्थ २ | २२९ |
| ४१४ | मयूरेश ... ... ... | ,, | २२९ |
| ४१५ | मयूरेश व मोर ... ... ... | अर्थ २ | २२९ |
| ४१६ | कालिदास ... ... ... | अर्थ १ | २३० |
| ४१७ | ,, ... ... ... | ,, | २३१ |
| ४१८ | कालिदास ... ... ... | अर्थ २ | २३१ |
| ४१९ | भारवी ... ... ... | ,, | २३१ |
| ४२० | सूत व सारथी ... ... ... | अर्थ १ | २३२ |
| ४२१ | सूत ... ... ... | ,, | २३२ |
| ४२२ | सूताची निवड ... ... ... | ,, | २३२ |
| ४२३ | दुष्टाचें चरित्र ... ... ... | अर्थ २ | २३३ |
| ४२४ | नीच व नरक ... [ शृंगार ] ... | ,, | २३३ |
| ४२५ | परस्त्रीसंग ... ... ... | अर्थ १ | २३३ |
| ४२६ | लोक नरकाचा आश्रय करतात ... | ,, | २३४ |
| ४२७ | मोहानें ग्रस्त झालेले लोक ... ... | ,, | २३४ |

| श्लोक. | विषय. | अर्थ. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| ४२८ | स्वर्गाची इच्छा ... ... ... | ,, | २३५ |
| ४२९ | ,, ... ... ... | ,, | २३५ |
| ४३० | मनुष्यापेक्षां पशु बरा ... ... | ,, | २३५ |
| ४३१ | विठ्ठलाशीं विपरीत असणारा [ उत्कृष्ट ] | ,, | २३६ |
| ४३२ | हरीचा द्वेष ... ... ... | ,, | २३६ |
| ४३३ | स्वार्थी ज्ञान ... ... ... | ,, | २३६ |
| ४३४ | खळें आणि खळ... ... ... | अर्थ २ | २३७ |
| ४३५ | कृतघ्न ... ... ... | ,, | २३७ |
| ४३६ | मूर्ख विघ्न आणण्यांत पटाईत... ... | ,, | २३९ |
| ४३७ | चंद्राचें उदाहरण ... ... ... | अर्थ १ | २३८ |
| ४३८ | खलावरचे उपकार व्यर्थ ... ... | ,, | २३९ |
| ४३९ | मूर्खांची संगती ... ... ... | अर्थ २ | २३९ |
| ४४० | कविराज ... ... ... | ,, | २४० |
| ४४१ | वाङ्मयांतील रस ... ... ... | ,, | २४० |
| ४४२ | सरस्वती ही सत्कवींची वाणी... ... | अर्थ ३ | २४० |
| ४४३ | स्त्री व कविता ... ... ... | अर्थ २ | २४१ |
| ४४४ | काव्य करा ... ... ... | अर्थ १ | २४१ |
| ४४५ | चंद्र हा जड आहे ... ... | ,, | २४१ |
| ४४६ | चांगला कवि जारासारखा आहे ... | अर्थ २ | २४२ |
| ४४७ | कवितारूप साध्वी ... ... | अर्थ १ | २४३ |
| ४४८ | प्रसादरहित कविता ... ... | ,, | २४३ |
| ४४९ | वाईट कविही वेदांती होईल ... | अर्थ २ | २४४ |
| ४५० | वाईट कविता दुर्योधनाची बुद्धि ... | ,, | २४५ |
| ४५१ | कवीचें अंतरंग कोणास कळतें ? ... | ,, | २४६ |
| ४५२ | चांगला कवि आणि वाईट कवि ... | अर्थ १ | २४६ |
| ४५३ | सुकवि व कुकवि ... ... ... | ,, | २५६ |
| ४५४ | काव्यगुणविरहित कविता ... | ,, | २४७ |

| श्लोक. | विषय. | अर्थ. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| ४५५ | कवितेंत हरिगुणाशिवाय मनोहरपणा येत नाहीं | अर्थ२ | २५७ |
| ४५६ | वाणी आणि नदी ह्यांचें साहश्य ... | अर्थ २ | २४८ |
| ४५७ | जिवन्मुक्तांचें कवन ... ... | ,, | २४८ |
| ४५८ | श्लोकाला सुश्लोकता ... ... | अर्थ १ | २४८ |
| ४५९ | काव्यांतील पानचटपणा ... ... | अर्थ २ | २४९ |
| ४६० | सरस्वती व लक्ष्मी ह्यांचें वांकडे ... | अर्थ १ | २५० |
| ४६१ | श्रेष्ठ ब्राह्मणांची विद्या ... ... | अर्थ २ | २५० |
| ४६२ | धर्माप्रमाणेंच कार्य घडतें ... ... | अर्थ १ | २५० |
| ४६३ | लक्ष्मी शहाण्यावर कृपा कां करीत नाहीं ? | ,, | २५१ |
| ४६४ | चंद्र व रामचंद्र ह्यांचें साम्य ... ... | अर्थ २ | २५१ |
| ४६५ | रामराज्य ... ... ... | अर्थ २ | २५२ |
| ४६६ | ,, ... ... ... | अर्थ १ | २५३ |
| ४६७ | मार्गणगणाची इच्छा ... ... | अर्थ २ | २५३ |
| ४६८ | स्वाती आणि रोहिणी ... ... | अर्थ १ | २५४ |
| ४६९ | रोहिणीची प्रार्थना ... ... | ,, | २५४ |
| ४७० | रोगसागरतरणी ... ... ... | ,, | २५५ |
| ४७१ | नारसिंहवर्णन ... ... ... | ,, | २५५ |
| ४७२ | कऱ्हाडे ब्राह्मणांचें शंकराशीं साम्य ... | अर्थ २ | २५५ |
| ४७३ | पार्वतीचें म्हणणें ... ... ... | अर्थ १ | २५६ |
| ४७४ | तांडवोत्सव ... ... ... | ,, | २५७ |
| ४७५ | शंकरा हा पार्वतीचा आराधी-भुत्या ... | अर्थ २ | २५७ |
| ४७६ | काशीमध्यें शिवाचें मुक्तिछत्र ... ... | अर्थ १ | २५८ |
| ४७७ | मार्तंडाचें ( खंडोबाचें ) वर्णन ... | अर्थ १ | २५९ |
| ४७८ | ,, | अर्थ १ | २५९ |
| ४७९ | काशीचें वर्णन ... ... | ,, | २५९ |
| ४८० | गंगेचें वर्णन ... ... | अर्थ १ | २६० |
| ४८१ | करवीराचें [ कोल्हापूरचें ] वर्णन ... | ,, | २६० |

| श्लोक. | विषय. | अर्थ. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| ४८२ | पृथ्वीचें वर्णन ... ... | ,, | २६१ |
| ४८३ | शास्त्र्याचें वर्णन ... ... ... | अर्थ २ | २६२ |
| ४८४ | ,, ... ... ... | ,, | २६२ |
| ४८५ | वैद्याचें वर्णन ... ... ... | अर्थ १ | २६२ |
| ४८६ | रोग्याचें वर्णन ... ... ... | ,, | २६३ |
| ४८७ | वैद्याची संगति ... ... ... | अर्थ २ | २६३ |
| ४८८ | सभ्याचें वर्णन ... ... ... | अर्थ १ | २६४ |
| ४८९ | गहाण ठेवणें ... ... ... | ,, | २६४ |
| ४९० | कामांध ... ... ... | ,, | २६४ |
| ४९१ | नैय्यायिक ... ... ... | ,, | २६५ |
| ४९२ | प्रश्नांत उत्तरें ... ... ... | ,, | २६५ |
| ४९३ | महादेवाला सुद्धां भिक्षा मागावी लागते | ,, | २६६ |
| ४९४ | मातापितारांप्रमाणें क्रिया ... ... | ,, | २६६ |
| ४९५ | मैत्री ... ... ... ... | अर्थ २ | २६७ |
| ४९६ | मित्रांचा पत्रव्यवहार ... ... | ,, | २६७ |
| ४९७ | मित्रांचें पत्र ... ... | अर्थ २ | २६७ |
| ४९८ | इंद्राचा प्रश्न व त्यांतच उत्तर ... | अर्थ १ | २६८ |
| ४९९ | प्रश्नोत्तर ... ... ... | अर्थ १ | २६९ |
| ५०० | पर्जन्य ... ... ... | ,, | २६९ |
| ५०१ | शीतकाल ... ... ... | ,, | २६९ |
| ५०२ | थंडी ... ... ... | ,, | २७० |
| ५०३ | उष्म्याचा आश्रय ... ... | अर्थ २ | २७० |
| ५०४ | पूर्वेकडील मेघ ... ... ... | अर्थ १ | २७१ |
| ५०५ | मकरारंभ ... ... ... | ,, | २७१ |
| ५०६ | तिळासारखी राघेची अवस्था ... | अर्थ २ | २७२ |
| ५०७ | उष्णकाळ ... ... | अर्थ १ | २७२ |
| ५०८ | वसंतऋतु व ध्वजारोपण ... | अर्थ १ | २७२ |

| श्लोक. | विषय. | | अर्थ. | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| ५०९ | प्रातःकाळ ... ... ... | | ,, | २७२ |
| ५१० | सुदिन व दुर्दिन ... ... | | ,, | २७३ |
| ५११ | पुरुषचर्या ... ... ... | | ,, | २७३ |
| ५१२ | अविनय ... | [ उत्कृष्ट ] | ,, | २७३ |
| ५१३ | बहिर्दृष्टि लोक ... ... ... | | ,, | २७४ |
| ५१४ | फार अर्थात प्रतिष्ठा नाहीं | [ वैय्याकरण ] | ,, | २७४ |
| ५१५ | मूर्खांची संगत ... ... ... | | अर्थ २ | २७५ |
| ५१६ | आधाराला मोठे लोकच योग्य ... | | अर्थ १ | २७५ |
| ५१७ | आशेखोर ... ... ... | | ,, | २७५ |
| ५१८ | भोजन ... ... ... | | ,, | २७५ |
| ५१९ | देशस्थांचे व शंकराचें साम्य | [ उत्कृष्ट ] | अर्थ २ | २७६ |
| ५२० | मांजर ... ... ... | | अर्थ २ | २७६ |
| ५२१ | श्रृंगीचें वर्णन ... ... ... | | ,, | २७७ |
| ५२२ | तंबाकू ... ... ... | | अर्थ २ | २७७ |
| ५२३ | जर्दा ... ... ... | | अर्थ २ | २७८ |
| ५२४ | भ्रताराच्या प्रियवस्तूचा संग्रह ... ... | | अर्थ १ | २७९ |
| ५२५ | सायंकाळ ... ... ... | | अर्थ १ | २७८ |
| ५२६ | कुत्रा व मनःसंयमी ... ... | | अर्थ २ | २७९ |
| ५२७ | ढेंकूण व रावण | [ उत्कृष्ट ] ... | अर्थ २ | २८० |
| ५२८ | संभोग ... ... ... | | अर्थ २ | २८१ |
| ५२९ | स्तन ... ... ... | | अर्थ १ | २८१ |
| ५३० | ,, ... ... ... | | अर्थ २ | २८२ |
| ५३१ | मेघाची वृष्टि ... ... ... | | अर्थ १ | २८२ |
| ५३२ | आकाशांतील मेघ... ... ... | | अर्थ २ | २८२ |
| ५३३ | ,, ... ... ... | | ,, | २८२ |
| ५३४ | नवराबायकोचें खोंचदार भाषण ... | | अर्थ २ | २८३ |
| ५३५ | स्तनाच्छादन ... ... ... | | अर्थ १ | २८३ |

| श्लोक. | विषय. | अर्थ. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| ५३६ | म्हाताऱ्याची दुसरी बायको... | ... ,, | २८३ |
| ५३७ | ,, ... ... | ... अर्थ २ | २८४ |
| ५३८ | ,, ... ... | ... अर्थ २ | २८४ |
| ५३९ | परस्त्रीपराङ्मुख ... ... | ... अर्थ २ | २८५ |
| ५४० | जरा ... ... | ... अर्थ १ | २८५ |
| ५४१ | ,, ... ... | ... ,, | २८६ |
| ५४२ | ,, [ वैय्याकरण ] ... | ... अर्थ २ | २८६ |
| ५४३ | चंद्रावरचे डाग ... ... | ... अर्थ १ | २८७ |
| ५४४ | माझा हेतु ... ... | ... अर्थ १ | २८७ |
| ५४५ | कृष्णाशिवाय हातांत घेणार कोण ? | ... अर्थ २ | २८८ |
| ५४६ | कृष्णाशिवाय तारणारा कोण ? | ... ,, | २८८ |
| ५४७ | रामकृष्णास वंदन ... | ... अर्थ १ | २८८ |
| ५४८ | माझें सर्वस्व तूं ... ... | ... ,, | २८९ |
| ५४९ | माझी कविता लपविणारा ... | ... ,, | २८९ |
| ५५० | ग्रंथकर्त्याचें नाम ... ... | ... ,, | २८९ |
| ५५१ | श्रीरामाची प्रेरणा... ... | ... ,, | २८९ |
| ५५२ | कालनिर्देश ... ... | ... ,, | २९० |
| ५५३ | समाप्ति ... ... | ... ,, | २९० |


---

## चुकीची दुरुस्ती.

पान १६९–' ज्यांचीं ब्रह्मसूत्रें ' येथपासून तों श्लोक २९८ च्या प्रारंभापर्यंतचा मजकूर पान १७८ तील ३१६ श्लोकाच्या अर्थाच्या ' पुनः पुन्हा वंदन करतों. ' ह्याच्यापुढें पाहिजे तो चुकून ह्या पृष्ठांत पडला गेला आहे.

श्री.

पंतविठ्ठलकृत

# सार्थ सुश्लोकलाघव.

[ हें अद्भुत व रसिकमनोहर काव्य श्रीक्षेत्र कऱ्हाड येथील राहणार कै० विठ्ठलपंत ऊर्फ विठोबाअण्णा दप्तरदार ह्यांनीं रचलेलें प्रसिद्धच आहे. अण्णा हे महान् भगवद्भक्त असून श्रीरामचंद्र हें त्यांचें उपास्य दैवत होतें. त्यास अनुलक्षून हें काव्य रचलें आहे. ह्या काव्यांत बहुतेक अथ-पासून तों इतिपर्यंत श्लेषालंकार साधलेला आहे. एकाच शब्दांत अनेक अर्थ साधणें ह्याला श्लेष असें ह्मणतात. हा अलंकार साधणें अत्यंत कुशलतेचें काम आहे. तें साधण्याला विलक्षण बुद्धिचातुर्य लागतें. प्रस्तुत कवीनें एका शब्दाचे दोन अर्थ तर काय, पण पांच पांच अर्थसुद्धां साधल्याचें पंचायतनवर्णनावरून वगैरे दिसून येईलच. अशा काव्याचें भाषांतर केवळ सरळ रूपानें देतां येणार नाहीं हें उघड आहे. कारण ह्यांत जो काय लोकोत्तरपणा भरला आहे तो शब्दचमत्कृतींतच भरलेला आहे. ह्यास्तव मुळांतील तींच पदें मध्यंतरीं घेऊन त्यांचा खुलासा केल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. कारण हें काव्य व त्यांतील द्व्यर्थ शब्दांच्या चमत्कृति ध्यानांत घेतल्यावांचून खरें मर्म कळणें व आल्हाद होणें शक्य नाहीं. हें जाणून तसाच क्रम धरला आहे.

ह्या काव्याच्या नामनिर्देशापासूनच श्लेष साधण्याला आरंभ केला आहे. कसा तो पहा. ' सुश्लोकलाघव ' हें ह्या काव्याला नांव दिलेलें आहे. ह्यांतील एक अर्थ रामपर असून दुसरा काव्यपर आहे. सु ह्मणजे उत्तम आहे, श्लोक ह्मणजे कीर्ति ज्याची असा ' राघव. ' ह्मणजे ' र ' ह्या अक्षराच्या ठिकाणीं ' ल ' किंवा ' ल ' अक्षराच्या ठिकाणीं ' र ' घेतला तरी चालतो. ह्मणून हीं दोन्ही अक्षरें संस्कृतांत एकरूपच आहेत

असें मानतात. ह्या नियमानुसार येथें मूळांतील 'लाघव' शब्दाच्या ठिकाणीं राघव शब्द घेतला आहे. आतां दुसरा काव्यपर अर्थ असा—सु ह्मणजे उत्तम श्लोकामध्यें ह्मणजे 'शार्दूलविक्रीडित' 'इंद्रवज्रा' इत्यादि वृत्तांमध्यें साधलेलें लाघव ह्मणजे चमत्कार. अर्थात् ह्या काव्यामध्यें महात्मा श्रीरामचंद्र ह्यांचे गुणानुवाद असून निरनिराळ्या सुंदर श्लोक वृत्तांमध्यें श्लेषालंकारात्मक अनेक अर्थचमत्कृति साधल्या आहेत. असें हें कवीनें द्वियोजनात्मक द्व्यर्थी नांव दिलें आहे. त्याला आतां आरंभ करूं. ह्यांतील पहिला श्लोक असा आहे:—]

अलंकृतिपरिष्कृतः सुरसभावने पंडितः।
प्रनष्टखरदूषणः प्रथितचारुवृत्तस्थितः॥
प्रमोदयति यः सतः सुगुणतः स्वकश्लोकतः।
प्रभू रविकुलाग्रणीः कविवरेण्यवद्राजते॥ १॥

ह्यांत चौथ्या चरणामध्यें सूर्यवंशांतील मुकुटमणि जो प्रभु श्रीरामचंद्र तो उत्तम कवीप्रमाणें शोभतो. असें ह्मटलें आहे. तेव्हां रामचंद्र व कवि हे सारखे कसे? एकच लक्षणें किंवा विशेषणें उभयतांनाही कशीं लागू पडतात हें वरच्या तीन चरणांत दाखविलें आहे. रामचंद्र कसा आहे? तरः—

'अलंकृतिपरिष्कृतः'—नानाप्रकारच्या रत्नखचित भूषणांनीं खचलेला असा; आणखी कसा? तरः—

'सुर–सभा–अवने–पंडितः'—देवांच्या समुदायांचें संरक्षण करण्याविषयीं समर्थ किंवा वाकबगार असा; आणखी कसा? तर—

'प्रनष्टखरदूषणः'—खर, दूषण ह्या नांवाच्या राक्षसांचा नाश करणारा; आणखी कसा? तर—

'प्रथित–चारु–वृत्त–स्थितः'—आपल्या मनोरम चरित्राला अजरामर करून ठेवणारा; आणखी कसा? तर—

'प्रमोदयाति यः सतः सुगुणतः स्वकःश्लोकतः'—आणि आपल्या कीर्तीच्या व सद्गुणांच्या योगेंकरून सज्जनांना आनंदित करणारा असा.

आतां हींच लक्षणें उत्तम कवीला कशीं लागतात तीं पहा. कवि कसा आहे? तर—

'अलंकृतिपरिष्कृत:'—अनेक प्रकारच्या साहित्यालंकार योजनेमध्यें कुशल असा; आणखी. कसा ?

'सु–रस–भावने–पंडित:'—शृंगार, वीर इत्यादि उत्तमोत्तम रस उत्पन्न करण्यामध्यें समर्थ असा; आणखी कसा ? तर–

'प्रनष्टखलदूषण: '–निंदकांच्या निंदारूप अपवादाचें उच्छेदन करणारा [ यांत 'खर' शब्दाच्या ठिकाणीं पूर्वी सांगितलेल्या नियमाअन्वयें 'खल' असें केलें आहे. ] आणखी कसा ? तर—

'प्रथित–चारु–वृत्त–स्थित:'—उत्तम प्रकारच्या श्लोकवृत्तांची योजना करणारा. आणखी कसा ? तरः—

' प्रमोदयति–य:–सत:–सुगुणत:–स्वकश्लोकत: ' जो आपल्या रचलेल्या काव्याच्या योगानें व आपल्या अंगच्या सद्‌गुणानें सज्जनांना आनंद देणारा असा असल्यामुळें. श्रीरामचंद्र हा कवि श्रेष्ठाप्रमाणेंच शोभतो.

दुसऱ्या श्लोकांत विष्णु, गणपति, शंकर, सूर्य व देवी आदिकरून पंचायतन हें एकरूपीच असल्यानें त्यांनांही नमस्कार करतात.

पद्मोल्लासकरं द्विजेश्वरभृतं गोपालकं सद्गुणैः ।
संसेव्यं हरिसादरं मधुपरोत्कंठं गिरीशाश्रितम् ॥
भक्त्या नौमि निरंतरं सुरहरं लंबोदरं शंकरं ।
देवं तिग्मकरं हरप्रियतरं तेजो जगत्सुंदरम् ॥ २ ॥

कवि शेवटच्या दोन चरणांत ह्मणतातः—

श्रीविष्णु, गजानन, शंकर, सूर्यनारायणदेव व शंकरास अत्यंत प्रिय असणारी त्रिभुवनसुंदरी आदिशक्तिदेवी ह्या सर्वांनाही सदासर्वदा नमस्कार असो. ह्या पांचही देवता एकरूप कशा आहेत त्या सात लक्षणांनीं सांगितल्या आहेत. अर्थात् ह्या सात विशेषणांचे प्रत्येकीं निरनिराळे पांच अर्थ होतात.

प्रथम विष्णु घेऊं. विष्णु कसा आहे ? तर—

पद्मा–उल्लासकरं–द्विजेश्वरभृतं–गोपालकं–सद्गुणैः संसेव्यं–हरिसादरं–मधुपरोत्कंठं–गिरीशाश्रितम्—

लक्ष्मीला आनंद देणारा; गरुडाचें पालन करणारा; धेनूंचा प्रतिपालक; सात्वतादिगण ज्याची सेवा करीत आहेत; हलि ह्मणजे बळराम ह्याच्यावर अत्यंत पूज्यबुद्धि ठेवणारा ( ह्यांतही पूर्वीं सांगितलेल्या नियमाप्रमाणें 'हरि'चें हलि केलें आहे. ) ' मधु—पर—उत् कंठं ' मधुनांवाच्या शत्रूचा शिरच्छेद करणारा; आणि गोवर्धन पर्वताला धारण करणारा असा. ह्यांत 'उत्कंठं' ह्या शब्दाचा 'उद्गतः कंठः यस्य' असा विग्रह करून ' शिरच्छेद करणारा ' असा अर्थ केला आहे.

आतां हींच विशेषणें गणपतीकडे कशीं लागतात तीं पहाः——

ज्याच्या शुंडादंडावर जाळी आहे असा; मोठमोठ्या दंतांनीं युक्त; गो ह्मणजे वाणी—सरस्वती--हिचें पालन करणारा; ' गणानांत्वा गणपतिं हवामहे ' ह्या मंत्रांत सांगितलेल्या गणांचा स्वामी; कोमल हिरव्या रंगाचे दूर्वांकुर धारण करणारा; मधुप ह्मणजे भृंग हे ज्याच्या गंडांतून निघत असलेल्या मदस्रावाविषयीं उत्कंठित होत असून, शिवाचा आश्रय करणारा असा.

आतां शंकर कसा आहे ? तर—

( पद्मोल्लास करं ) पद्मासन घालून बसलेला; ( द्विजेश्वर—भृतं ) चंद्राला धारण करणारा—चंद्रचूड; ( गो—पालकं ) नंदीचें पालन करणारा; ( सद्गणैः—संसेव्यं ) प्रमथादिगण ज्याची सेवा करतात असा; ( हरि—सादरं ) विष्णूवर ज्याची भक्ति आहे असा; ( मधुप—रा—उत्कृष्टः कंठः ) भृंग व मेघ ह्यांप्रमाणें उत्कृष्ट आहे कंठ ज्याचा असा; नीलकंठ; ( गिरीश—आश्रितम् ) कैलासावर राहणारा.

आतां सूर्य कसा आहे ? तरः—

( पद्म—उल्लास—करं ) कमलाला विकासित करणारा;( द्विजेश्वर—भृतं) चंद्राला प्रकाश देणारा; ( गो—पालकम् ) किरण धारण करणारा; (सद्गणैः—संसेव्यं ) वेदादि सद्गणांनीं पूजित असा; ( हरि—सादरं ) अश्व आहे वाहन ज्याचें असा. ह्यांत ' हरि—साद—लं ' असा विग्रह करून घोड्यानें गति प्राप्त होते असा अर्थ साधला आहे. येथें शेवटचा ' र ' अक्षराच्या ठिकाणीं ' ल ' अक्षर घेऊन ' ला ' ह्या धातूपासून लाति—ह०

घेणारा—मिळविणारा—असा अर्थ होतो. ( मधुपरा—उत्कंठं ) मधुपर ह्मणजे भृंग हे ज्याच्यासाठीं उत्कंठित होतात असा; कमलांतील मध भक्षण करण्यासाठीं भृंग नेहेमीं कमलांत बसलेले असतात व सूर्यास्त झाला ह्मणजे तें कमल मिटतें. त्यामुळें ते त्यांत अडकून बसतात व पुन्हा सूर्योदय होईपर्यंत तें कमल प्रफुल्लित होत नसल्यामुळें त्यांनाही सुटकेला मार्ग नसतो ह्मणून ते सूर्योदय केव्हां होईल ह्यासाठीं उतावीळ झालेले असतात. अशी कविकल्पना असल्याचें प्रसिद्धच आहे. ( गिरीश—आश्रितम् ) उदयाचलावर विराजमान होणारा असा.

आतां देवी आदिशक्ति कशी आहे ? तरः—

( पद्म—उल्लास—करं ) कमलाप्रमाणें शोभायमान हात आहेत जीचे; ( द्विजेश्वर—भृतं ) सुरथसमाधि नांवाच्या क्षत्रियांचे व वैश्यांचे संरक्षण करणारी; ( गोप—अलकं ) मेघासारखे काळे कुळकुळीत आहेत केंस जीचे; ( सद्गणैः—संसेव्यं ) ब्रह्मादि देवताही स्त्रीरूपानें जिला सेवन करतात ( अशी ‘ चंडीस्तवा ’ मध्यें कथा आहे ) अशी; ( हरि—सादरं ) सिंह आहे वाहन जिचें अशी. (मधु—पल--उत्कंठं ) मद्य आणि मांसहीं आहेत प्रिय जिला अशी; ( गिरीश—आश्रितम् ) शंकराचा किंवा हिमालयाचा आश्रय करणारी अशी.

अशा पंचायतनरूपी देवतांस नमस्कार असो.

आतां ओंकाररूपी सर्व ब्रह्मांडाचें आदिबीज जो शंकर त्याला नमस्कार करतात. व शंकर, हा ओंकारस्वरूप कसा तें सांगतात.

महेशार्धेंदुलसित बिंदुभूतामरापग ॥
शक्त्याश्लिष्टतनो शांत जगद्बीजाय ते नमः ॥ ३ ॥

शंकरा! तूं कसा आहेस? तर (महा+ईश) सर्वदेवांत श्रेष्ठ; (अर्ध+इंदु+विलसित ) कपाळावर अर्धचंद्र धारण करून शोभणारा; ( बिंदुभूत+अमरापग ) गंगाप्रवाहाच्या तुषारानें युक्त; ( शक्ति+आश्लिष्ट+तनु ) आदिशक्ति जी पार्वती तिला आलिंगन देणारा; किंवा तिला अर्धांगी धारणकरून अर्धनारी नटेश्वराचें रूप धारण करणारा; आणखी कसा ? ( शांत )

' श ' हें अक्षर आहे अंतीं ज्याच्या ( महे+श ) असा; किंवा नित्य समाधिस्थितींत मग्न असणारा; आणखी कसा ? तर ( जगत्–बीज ) जगताचें बीजरूप असा. कारण सर्व ब्रह्मांड हें आदिशक्तीशीं एक–रूप झाल्यामुळेंच ह्या सर्व ब्रह्मांडाची उत्पत्ति झाली आहे, ह्मणून तो ही जगद्बीजच होय.

आतां प्रणव ह्मणजे ॐकार कसा आहे ? तर तोही ( महा+ईश ) सर्वश्रेष्ठच आहे; कारण यच्चयावत् ब्रह्मांडाची उत्पत्ति त्याच्यापासूनच झाली आहे. आणखी तोही चंद्रकोरेनें मंडितच आहे. कारण त्याच्याही मस्तकावर अर्धचंद्र आहेच. ( ॐ ही आकृति पहा. ) आणखी ॐकाराच्या मस्तकावर बिंदूही आहेच. तो ही शक्तिशीं ह्मणजे आपल्या आध्यात्मिक शक्तिशीं एकरूपच झालेला आहे. आणखी तो शांतस्वरूप असून सर्व ब्रह्मांडाच्या उत्पत्तीचें बीजही तोच आहें. ह्यास्तव हें जगद्बीजरूप शंकरा ! तुलाही नमस्कार असो. तंत्र शास्त्रामध्यें ॐकाराचे बिंदु, नाद, कला आणि शांत असे चार अवयव असल्याचें प्रसिद्ध आहे. ते चारही अवयव शंकर व ॐकार ह्यांमध्येंही समसमानच आहेत असा भाव.

**अवनप्रवणो नित्यं कृतकुंजररंजनः॥**
**करोतु कुशलं कोऽपि हरिर्वः खलदुःसहः ॥ ४ ॥**

शंकराला नमन केलें. आतां हरीचा ह्मणजे विष्णूचाही प्रसाद असावा ह्मणून त्याची प्रार्थना करतात. परंतु हरीचें स्मरण होतांच ' हरि ' ह्मणजे सिंह ह्याचेंही स्मरण झाल्यावांचून राहत नाहीं. व हरि ह्मणजे सिंह–वनराज–ह्याचा स्वभाव मनांत आला ह्मणजे पोटांत भीतिही उत्पन्न झाल्यावांचून राहत नाहीं. परंतु तो वनांत राहणारा हरि अगदीं वेगळा व हा भगवान् हरि अगदीं वेगळा आहे. ह्याला भिण्याचें मुळींच कारण नाहीं, हें दर्शविण्यासाठीं त्या वनांत राहणाऱ्या हरीचे ह्मणजे सिंहाचे गुण व भेद दाखवितात. सिंह हा कसा आहे ? तर ( वन+प्रवण ) ह्मणजे वनांत राहण्याची आवड धरणारा; आणि हा परमेश्वरस्वरूप हरि कसा आहे ?

तर ( अवन+प्रवण ) ह्मणजे वनांत राहण्याची त्याला कधीं आवड तर नाहींच; पण उलट तो ' अवन ' म्हणजे दुसऱ्याचें संरक्षण करण्याकडेच ज्याची प्रवृत्ति आहे असा; म्हणजे वनराज हरि हा नेहमीं मारक आहे, आणि हा ईश्वररूपी हरि नेहमीं तारक आहे. आणखी वनराज हरि कसा आहे ? तर ( कृत+कुंजर+अरंजनः ) हत्तीच्या हृदयांत भीति उत्पन्न करणारा; पक्षीं हा हरि कसा आहे ? तर ( कृत+कुंजर+रंजनः ) गजेंद्रासारख्या भक्ताचें रंजन करणारा, आल्हाद देणारा असा. आणखी वनराज हरि कसा आहे ? तर ( खर+दुःसहः ) याच्या तीव्र नखांचा मारा अत्यंत दुःसह म्हणजे भयंकर असा. येथें पूर्वींच्या नियमाप्रमाणेंच ' ल ' च्या ठिकाणीं ' र ' घेतला आहे. पण सर्वेश्वरस्वरूप हरि कसा आहे ? तर ( खल+दुःसहः ) दुष्टजनांना मात्र तापदायक. त्याच्यापासून भक्तांना कधींच ताप होत नाहीं. किंवा दुर्जनांना मात्र दृष्टीसमोर नकोसा वाटतो, पण भक्तजनांना त्याच्या शिवाय दुसरें विश्रांतिस्थानच नाहीं असें वाटतें. अशा प्रकारचा हा जो लोकविलक्षण केवळ अद्भुत हरि म्हणजे विष्णु तो आपणां सर्वांचें कल्याण करो.

आतां प्रस्तुत ग्रंथ कशाकरितां व कोणाकरितां केला आहे हें खालच्या श्लोकांत कवि सांगतात.

सुविचित्रबाणरचनं सुजनाः सुश्लोकलाघवं श्रयत ॥
स्पष्टं नृणां प्रतिष्ठा दृष्टा नूनं यतो जनस्थाने ॥ ५ ॥

ह्यांत द्व्यर्थीशब्द आहेत तेः—

१ सुविचित्र बाण रचनं=अद्भुत शर लाघव; किंवा शब्दरचनेचे चमत्कार ( श्लेष. ) बाण=शर किंवा शब्द.

२ सुश्लोक लाघव=अलौकिक महात्म्याचा श्रीरामचंद्र; किंवा उत्कृष्ट श्लोकबद्धरचनेंत साधलेले चमत्कार असा ' सुश्लोकलाघव ' ह्या नांवाचा हा ग्रंथ.

३ प्रतिष्ठा=वस्ती किंवा मान सन्मान.

४ जनस्थान=नाशिक; किंवा लोकसमाज, सभा.

" सुजनहो ! मनुष्यांना सभेमध्यें मान सन्मान मिळविण्याची जर

खरी खरी इच्छा असेल तर त्यांनीं उत्कृष्ट शब्दरचनेंत साधलेले नानाविध चमत्कार ज्यांत स्पष्टपणें दृष्टोत्पत्तीस येतात अशा 'सुश्लोकलाघव' नामक ग्रंथाचा आश्रय करावा. अर्थात् ह्या ग्रंथाचें पठण केलें असतां कोणत्याही मनुष्याच्या आंगीं चातुर्य प्राप्त होऊन लोकांतही त्याला मान मिळेल हा भावार्थ."

अथवा दुसरा अर्थ—सुजनहो! जनस्थान म्हणजे नाशिक येथें प्रत्यक्ष ज्या श्रीरामचंद्रानें आपल्या शरसंधानाचें कौशल्य दाखवून खरदूषणादि राक्षस मारून कायमची वस्ती केली, त्या पुण्यश्लोक रामचंद्राचाच आश्रय करावा.

आतां 'मनुष्य हा चुकीस पात्र आहे, ह्या नियमान्वयें मनुष्याची कोणतीच कृति निर्दोष अशी बहुधा आढळत नाहीं. तेव्हां प्रस्तुत 'सुश्लोकलाघव' नामक ग्रंथांतही कांहीं ना कांहीं तरी दोष असण्याचा संभव आहे. मग असला हा ग्रंथ लोकांपुढें आणला तरी कशाला? असा कोणीं आक्षेप घेतल्यास त्याचें उत्तर कवि सांगतातः—

न त्याज्यं सहजं सदोषमपि हे कौंतेय कर्म स्वकं।
प्रारंभः सकलः सदोष इति हि श्रीवासुदेवो जगौ॥
तत्काव्यप्रतिमा यतश्च सहजा नो कृत्रिमातो बुधा-
स्त्यक्त्वा दोषभयं सुदूरतरतो युक्तोऽभवद्विठ्ठलः॥ ६॥

"अर्जुना! आपलें सहज--ह्मणजे जन्मसिद्ध कर्तव्य सदोष--दोषयुक्त असलें तरी सुद्धां तें सोडतां कामा नये. कारण निखालस निर्दोष असें जगामध्यें कोणतेंच कर्म नाहीं." असें साक्षात् श्रीकृष्णांनींच गीतेमध्यें सांगून ठेविलें आहे. तीच आज्ञा शिरसा वंद्य करून ह्या काव्याचीही माझ्या अंतःकरणांत स्वाभाविकच स्फूर्ति उत्पन्न झाली आहे. तिच्या मध्यें कृत्रिमपणा असा कोणताच नाहीं. हें सर्व लक्षांत आणून 'दोष राहातील' ही भीति लांब झुगारून देऊन विठ्ठल कविही हें काव्य करण्यास उद्युक्त झाला आहे. यांत 'सहज' ह्या शब्दावर श्लेष आहे.

आणि तसें करण्याला दुसरेंहि एक कारण आहे तें असें:—

अज्ञानादथवा प्रमादवशतः काव्यं सदोषं भवे-
त्तन्निंदास्पदमित्युपक्रममिमं कुर्यां न वै तर्ह्यहम् ॥
कर्तुं हैहयराजपुंगवमिवाप्येतत्सदोषं पुन-
र्निर्दोषं न धृतव्रताः कविकुलोत्तंसा भवंतो यदि ॥ ७ ॥

अज्ञानानें म्हणा कीं गैर समजुतीनें म्हणा, काव्यामध्यें दोष हे घडावयाचेच. आणि दोष दृष्टीस पडले म्हणजे लोक हे टीका करावयाचेच; तेव्हां असल्या खटपटींत आपण न पडावें हेंच बरें; परंतु आपण सर्व ज्ञाते आहांत; कवि अहांत. आणि सदोषाला निर्दोष करावें हें आपलें वंशपरंपरागत चालत आलेलें व्रत आहे. कशावरून म्हणाल तर कवि-कुलांतील श्रेष्ठ जो परशुराम--भृगु--म्हणजे शुक्र किंवा कवि त्याच्या वंशांत जन्मलेला तो भार्गव म्हणजे परशुराम त्याला 'कविकुलोत्तंस' असें म्हटलें आहे. त्यानें सहस्रार्जुन हा सदोष असतांही त्यास निर्दोष करून टाकलें. येथें 'दोष' ह्या शब्दांत श्लेष साधला आहे. दोष म्हणजे अपराध, चुका; हा एक अर्थ, व दोष म्हणजे हात हा दुसरा अर्थ. अर्थात् सहस्रार्जुनाचे दोष म्हणजे हस्त हजार होते ते सर्व छेदून टाकून त्याला निर्दोष म्हणजे हस्तशून्य करून टाकला. हेंच आपल्या कविकुलाचें व्रत आहे. आणि तेंच चालविण्याविषयीं आपण कंकण बाधलें आहे. म्हणूनच मी हें काव्य करावयाच्या भानगडींत पडलों, नाहीं तर कधींच पडलों नसतों. सहस्रार्जुनाचे दोष सहस्र होते तेसुद्धां आपण नाहींसे करून त्याला निर्दोष करून सोडलें, मग माझ्या काव्यांत एखाददुसरा दोष राहिला असल्यास तो काढून तें माझें काव्य सहज निर्दोष करून टाकाल हा मला भरवसा आहे असा भाव.

निर्दोष काव्य होण्याला सुद्धां एक मार्ग आहे. तो कोणता ? हें खालील श्लोकांत सांगितलें आहे.

पंतो यद्यहमेष माधवमिलन्मूर्धन्यमध्यस्थितो ।
दोषस्तर्हि न चाश्रयिष्यदणुरप्येतं प्रबंधं नवम् ॥
तस्माद्वेदपुराणशास्त्रनिपुणाः सभ्या भवंतः स्वयं ।
प्रायश्चित्तमिह प्रयच्छत ततो दोषः कुतः स्थास्यति ॥ ८ ॥

सध्यां मी बोलूनचालून 'पंत' (विठ्ठलपंत) आहें; अर्थात् गृहस्थाश्रमी आहें; संसारी आहें. तोच मी, जर—

'**माधवमिलन्–मूर्धन्य–मध्यस्थितः**' परमेश्वराशीं एकरूप झालेले जे [ भगद्भक्त ] भक्तशिरोमणी त्यांच्या पंक्तींत बसणारा असतों, किंवा [ ह्याच पदाचा दुसरा अर्थ ] '**इं माधवाय पुष्णैनमः**' असा केशवाचा एक न्यास आहे. त्या तंत्रावरून 'इ' ह्मणजे माधव असा अर्थ निघतो. अर्थात् माधव म्हजणे 'इ' ह्या 'इ' शी मिळालेला मूर्धास्थानांतून प्रगट होणारा जो 'ट' वर्ग त्याचा मध्य म्हणजे 'ड' हा माझ्यामध्यें असतां, अर्थात् 'ड' शीं 'इ' मिळाली म्हणजे 'डि' हें अक्षर होणार तें जर माझ्यामध्यें असतें तर म्हणजे 'पंत' ह्याच्या मध्यें 'डि' हें अक्षर असतें तर मी 'पंडित' झालों असतों. एकंदरींत भावार्थ हा कीं, जर भगवद्भक्त शिरोमणींत माझी गणना असती, किंवा मी जर पंडित असतों, तर ह्या माझ्या नवीन रचलेल्या काव्यांत अणुमात्र दोष आढळला नसता. पण मी भक्तवद्भक्तही नाहीं व पंडितही नाहीं. परंतु आपण स्वतः वेदशास्त्रपुराणनिपुण अहांत. सभ्य अहांत. ह्या करितां आपण मला कांहीं तरी प्रायश्चित्त द्या. म्हणजे दोषरहातील कोठें ? ह्या श्लोकांत '**भवन्तः**' व '**प्रयच्छत**' ह्या दोन शब्दांत फार मौजेचा श्लेष साधला आहे. '**भवंतः**' ह्याचा एक अर्थ तुम्ही किंवा आपण असा आहे; व दुसरा अर्थ '**समर्थ**' आहे. ह्यांतील तुम्ही किंवा आपण हा अर्थ घरला तर त्याला 'प्रयच्छंत' असें क्रियापदाचें रूप पाहिजे. तरच तो तृतीय पुरुषीं आज्ञार्थीं प्रयोग शुद्ध होतो. तेव्हां अर्थात् मूळ श्लोकांत असलेलें 'प्रयच्छत' हें क्रियापदाचें रूप अशुद्ध किंवा दोषास्पद ठरतें. पण तोच 'भवंतः' ह्या पदाचा समर्थ हा अर्थ घरला म्हणजे 'प्रयच्छत' हेंच क्रियापदाचें रूप शुद्ध व बरोबर होतें. ह्मावरून कवि म्हणतात 'विद्वज्जनहो ! आपण जर 'भवंतः' म्हणजे जसेच्या तसे कायम रहाल, आपल्याकडे समर्थपणा न घ्याल तर 'प्रयच्छत' हें माझें क्रियापद अशुद्ध ठरून हें माझें काव्य सदोषच राहील. परंतु आपण आपल्या अंगीं समर्थत्व घ्याल तर तत्काल तें संबोधन होऊन 'प्रयच्छत' हें माझ्या काव्यांतील क्रियापद शुद्ध

ठरून माझें काव्य निर्दोष होईल. हा आपल्या सामर्थ्याचा प्रत्यक्षच प्रभाव पहा ह्मणजे झालें ! पंतांचें सर्व काव्य श्लेषमय चातुर्यानें डवरलेलेंच आहे. परंतु ह्या श्लोकांतील ‘ भवंतः ’ व ‘ प्रयच्छत ’ ह्या दोन शब्दांतील श्लेषाबद्दल त्यांचें जितकें अभिनंदन करावें तितकें थोडेंच होईल, ह्यांत शंका नाहीं.

ज्ञात्यांनीं कवीच्या कवित्वांतील दोष काढण्याच्या कामांत कितीही प्रतिकूलता दर्शविली तरीसुद्धां स्वभावतःच निर्दोष करण्याचा जो त्यांच्या अंगचा स्वाभाविक धर्म तो कधींच नष्ट होणें शक्य नाहीं. हें दर्शविण्यासाठीं खालच्या आर्येची रचना किती समर्पक केली आहे ती पहा.

नूनं निसर्गतः कविरूढमलप्रशमने हि सरसानाम् ॥
प्रतिकूलतापि न भवेदनर्थकृत्कतकवत्कदाचिदपि ॥ ९ ॥

कवीच्या काव्यांतील दोष असतील ते काढून त्यास निर्दोष करणें हा ‘ सरस ’ पुरुष असतील, पक्षीं रसिक किंवा ज्ञाते असतील त्यांचा स्वभावधर्मच आहे. ते जरी त्याच्या कितीही उलट झाले तरी, ‘ कतक’ ह्मणजे निवळीच्या बीप्रमाणें त्यांचा स्वभाव बदलावयाचा नाहीं. ‘ कतक ’ ह्मणजे निवळीचें बी; हें तुह्मी कितीही गढूळ पाण्यांत टाका. तें उलटें पडो कीं सुलटें पडो. पाण्यांतील गाळ रसातळाला जाऊन पाणी हें निर्मळच व्हावयाचें तें चुकावयाचें नाहीं. तद्वत् ‘ सरस ’ लोकांनीं कितीही उलट बाजू घेतली तरी ‘ सरस ’ ते ‘ सरस ’ च ! ते कधीं नीरस व्हावयाचे नाहींत. कवीचें काव्य निर्दोष करणें हाच त्यांचा धर्म. तो कधींही विपरीत व्हावयाचा नाहीं. ह्यांत ‘ सरस ’ व ‘ कतक ’ ह्या शब्दांवर कोटी केलेली आहे. म्हणजे सरस व कतक हे दोन्हीही शब्द उलटे लिहा कीं सुलटे लिहा; ( प्रतिकूलतापि ) उलट वाचा कीं सुलट वाचा. ते मूळ रूपाप्रमाणें कायमच असावयाचे; ( अनर्थकृत् ) त्यांच्या अर्थात् कधींच बदल व्हावयाचा नाहीं. तद्वत् रसिक लोकांची व ज्ञात्यांची गोष्ट ही तशीच निवळीच्या बियाप्रमाणें आहे.

किं काव्याद्विरमेयमत्र हि कथंचिद्दोषसंभावना-
न्न ह्येतत्तु निरूपणीयमबुधस्याग्रे विविच्य क्वचित् ॥
किंत्वेतस्य सतोऽसतोऽपि च पुनः पात्रं स्मृताः सूरयो।
दोषावस्थितये तु किं कथय रे कल्पेत सूर्यागमः ॥ १० ॥

न जाणों काव्य केलें आणि त्यांत दोष राहिले तर ? अशा भीतीनें मुळीं काव्य करूंच नये कीं काय ? अवश्य करावें. तें आह्मांला अज्ञानापुढें थोडेंच न्यावयाचें आहे ? कारण, काव्य चांगलें असो कीं वाईट असो; तें पहावयाला ज्ञातेच पात्र आहेत. आणि ज्ञाते ह्मटले कीं अज्ञानतमाला प्रतिसूर्यच होत. मग बाबा ! सूर्योदय झाला असतां दोष कसे राहतील ? सांग बरें. किंवा दोष असतांना सूर्योदय तरी कसा होईल? येथें दोष ह्मणजे प्रमाद; आणि दोषा म्हणजे रात्र. असा श्लेष साधला आहे. सूर्योदय झाल्यावर रात्र असणें शक्य नाहीं. किंवा रात्र असतां सूर्योदय होणें शक्य नाहीं. कारण, सूर्योदय होतांच रात्रीं चमकणारे दिवे सुद्धां निस्तेज होतात, मग रात्रीची गोष्ट कशाला पाहिजे ? तद्वत् ज्ञाते जवळ आले असतां काव्यांत दोष राहाणार नाहींत, किंवा काव्यांत दोष असल्यास ज्ञातेही जवळ येणार नाहींत, हा भाव. 'सूरयः'--अनेक सूर्य.

विविधार्थवशा कविता वेश्येव विभात्यतश्च तां प्रति यः ॥
भूषाकरणसमर्थो दोषासंगं स एव विदधातु ॥ ११ ॥

कविता आणि वेश्या ह्या दोघीही सारख्याच आहेत. कविता कशी आहे ? ( विविध--अर्थ–वशा ) परोपरीचे अर्थ उत्पन्न करणारी; पक्षीं वेश्या कशी आहे ? तर मुबलक द्रव्य, दागदागिने घालील त्यालाच वश होणारी. अशा प्रकारें तिला परोपरीच्या अर्थांनीं व अलंकारांनीं सजविण्यास जो समर्थ असतो, तोच निर्दोष काव्य करील. पक्षीं वेश्येच्या अंगावर बाळ्या, बुगड्या, गोट, पाटल्या इत्यादि हजारो दागिने घालून तिला नखशिखांत सुवर्णालंकारांनीं मढवून काढण्याचें ज्याच्या अंगांत सामर्थ्य असेल, तोच तिच्या रात्रीच्या विलासाच्या सुखास पात्र होईल.

ह्यांत ' दोषा-संग ' ह्या शब्दांत श्लेष आहे. दोष ह्मणजे प्रमाद; व दोषा म्हणजे रात्र. दोष-असंग; दोषा-संग.

इतिहासपुराणागमविचक्षणादूषणस्य बलिनोऽपि ॥
सुश्लोकलाघवस्य श्लोके किल नामशेषतैव स्यात् ॥ १२ ॥

सत्कीर्तिमान् रामचंद्राच्या कीर्तीपुढें, दूषण राक्षस मोठा बलाढ्य होता तरी सुद्धां जसा नामशेष होऊन गेला; त्याप्रमाणेंच इतिहास, पुराण व वेद ह्यांच्या दृष्टीनें कोणीं कितीही ह्या ग्रंथाला नांवें ठेवलीं तरी तीं ह्या सुश्लोकलाघवाच्या कीर्तीपुढें नामशेषच होऊन जातील.

मूर्ध्न्यंजलिं विरचयन्मुहुरर्थयेऽहं ।
सुश्लोकलाघवमहो शृणुतानसूयम् ॥
जायेतचेतासि ततः सुमहाप्रसादः ।
स्यादेव वागविषयः सहजप्रमोदः ॥ १३ ॥

अहो ! आपल्यास हात जोडून व मस्तक नम्र करून प्रार्थना आहे कीं, आपण दोषदृष्टि न ठेवतां हा ' सुश्लोकलाघव ' ग्रंथ श्रवण करा. म्हणजे आपल्या अंतःकरणास अत्यंत प्रसन्नता उत्पन्न होऊन रसाळ वाणीच्या योगानें केवळ अनिर्वचनीय असा आल्हाद वाटेल.

सुश्लोकलाघवश्लोकं विचित्रानंददायकम् ॥
सकलाः स्पृहयंत्येव हरिदासा विशेषतः ॥ १४ ॥

ह्या सुश्लोकलाघवांतील श्लोक कांहीं विलक्षण आनंद देणारे आहेत. ते सर्वांनाच विशेषेंकरून ( स+कला ) कलायुक्त-चतुर पुरुषांना तर हवे हवेसे वाटतील. हरदासांना तर काय अगदीं जीव कीं प्राण; अथवा दुसरा अर्थ-ह्या सुश्लोकलाघवांतील ( रामाचें ) चरित्र कांहीं अपूर्व आनंददायक आहे. तें सर्वांना पुनः पुनः ऐकावेंसेंच वाटेल. हरिदासांना ह्मणजे परमेश्वरभक्तांना तर तें विशेषच !

सुश्लोकलाघवश्लोकः प्रस्तुतो जनसंसदि ॥
न कस्मै रोचतां नूनमेकां खरचमूं विना ॥ १५ ॥

सुश्लोकलाघवांतील श्लोक*पक्षीं रामाचें चरित्र आज लोकांपुढें आलें तर तें ( खर–चमूं–विना ) खर–राक्षस–वर्गाशिवाय अथवा गाढवांच्या तांड्याशिवाय, किंवा ( खल–चमूं–विना ) ‘ र ’ च्या ठिकाणीं ‘ ल ’ केला तर दुर्जनांच्या टोळीशिवाय आवडणार नाहींत असें कोणाला ?

यदेवानिभृतं सत्यं तन्नित्यं वस्तु कीर्त्यते ॥
नास्त्येव या विचारेण सा मायेत्यभिधीयते ॥ १६ ॥

जिच्यामध्यें सत्यच भरलेलें असतें, त्याच वस्तूला नित्य असें ह्मणतात, अथवा दुसरा अर्थ ( नि+भृतं ) ‘ नि ’ ह्या अक्षराला जोडलेलें जें ( स+त्य ) त्य हें अक्षर–ह्मणजे त्य ह्या अक्षराशीं संयोग पावलेलें जें ‘ नि ’ अक्षर अर्थात् ( नित्य ) तीच वस्तु नित्य असें ह्मणतात. आणि ( विचारेण ) विवेकबुद्धीनें जी नष्ट होते तिला माया असें ह्मणतात. अथवा ( वि–चारेन ) गरुड आहे वाहन ज्याचें अशा विष्णूच्या उपासनेनें जिचा नाश होतो तिला माया असें ह्मणतात. ‘ मा ’ ह्म० नाहीं आहे ‘ या ’ जी. ती; हाच श्लेष.

श्रीगुरोः करुणापांगपीयूषपिठरो हि यः ॥
न तमःसंभवा बाधा तस्य स्याददितिदुस्सहा ॥ १७ ॥

ह्या श्लोकांत दोन शब्दांत श्लेष आहेत.

( १ ) श्रीगुरु=बृहस्पति अथवा उपदेश करणारा गुरु.

( २ ) तम—राहू अथवा अज्ञान.

ह्यावरून ह्या श्लोकाचे दोन अर्थ होतात तें असेंः—

( १ ) ज्याच्यावर गुरूची गुरुग्रहाची करुणामृत कटाक्षाची वृष्टि होईल, त्याला अत्यंत दुःसह असणारी राहूची पीडा कधींही होत नाहीं. अथवाः—

---

* येथें ‘ श्लोक ’ असे जरी म्हटलें आहे, तरी ह्या काव्यांत कोठें कोठें संस्कृत व प्राकृत आर्याअसून एक दोन संस्कृत ‘ गद्यें ’ हीं आलेलीं आहेत. ह्यावरून ‘ श्लोक ’ ह्याचा अर्थ, पद्यें, छंद, किंवा ‘ प्रबंध ’ असाच अर्थ येथें गृहित धरला पाहिजे.

( २ ) सद्गुरूची कृपामृतदृष्टि ज्याच्यावर फिरते, त्याला अज्ञानापासून होणारी दुःसह पीडाही कधीं होत नाहीं.

परमपदविजित्यै नैव सद्वंशभूति-
र्मतिरपि न वयो वा सद्गुरुः किंत्विहैकः ॥
इति कथयितुमीशः संसदस्तंभमध्या-
द्गुरु गुरु गुरु शब्दं व्याहरन्नाविरासीत् ॥ १८ ॥

परम पदाची प्राप्ति होण्याला चांगलें कुल, संपत्ति, बुद्धि किंवा वय ह्यांपैकीं कशाचीही गरज लागत नाहीं. तर इहलोकीं एक सद्गुरु असला कीं पुरे. ही गोष्ट प्रऱ्हादाच्या कथेवरून स्पष्टच दिसते. कारण, नारदांनीं त्याला गर्भामध्यें उपदेश केल्याचें प्रसिद्ध आहे. हेंच सांगण्यासाठीं परमेश्वर नारसिंह अवतार घेऊन 'गुरु गुरु गुरु गुरु' असा शब्द करीत सभास्थानांतील खांबामध्यें प्रगट झाला ! येथें 'गुरु गुरु गुरु गुरु' हा शब्द सिंहाच्या शब्दाचें अनुकरण असून त्याचा अर्थ सद्गुरु होतो हें सांगणें नकोच.

नगघटितं चलघटितं जडोपरचितं च तत्कलोपचितम् ॥
मिथ्या सकलजगदिदं सत्यं किं तु प्रतिष्ठितं ब्रह्म ॥ १९ ॥

आतां परमपदप्राप्तीसाठीं सद्गुरु जें ज्ञान देतात तें कोणतें ? तर—

नग घटितं—चल घटितं—नग ह्म० पर्वत आणि चल ह्म० पशुपक्षी वगैरे ह्यांनीं युक्त असें जग—म्हणजे स्थावरजंगमात्मक हें सर्व जग असून तें—' जड–उपरचितम् '—

जड वस्तूंनींच ( अज्ञानानें ) भरलेलें आहे. अर्थात् सर्व दृश्य वस्तूच त्यांत भरलेल्या आहेत. इतकेंच नव्हे तर. ' तत्–कलोपचितम् '—

ईश्वराची चित्कला–आदिशक्ति ही त्यांत व्यापून राहिली आहे, तथापि–

' मिथ्या सकल जगत्- इदं,—हें सारें जग असत्य किंवा अशाश्वत आहे. सारें जगच जर अशाश्वत तर मग ( सत्यं किंतु ? ) सत्य तरी काय ? तर—'प्रतिष्ठितं ब्रह्म'—

त्रिकालाबाधित सर्वत्र व्यापून राहिलेलें जें परब्रम्ह तें. हें गुरूचें सांगणें

तर असोच. पण ' सकल जगत् ' ह्या शब्दांतून सुद्धां तोच अर्थ निघतो. कसा ते पहाः—

'सकल जगत्'—हा शब्द घेतला तर (न+ग+घाटितं) त्यांत 'ग' नाहीं अशी कल्पना करूं तर तेंच पदः—'सकल जत्'—

असें राहील. नंतर ( च–ल–घटितं ) त्यांतूत ' ल ' हें अक्षर कमी केलें, तर—'सकजत्'—

असें पद शिलक राहतें. त्यांतूत ( जडो दरचितं ) ह्या वाक्यांतील ' ड ' व ' ल ' हे संस्कृतांत एकरूपच मानतात त्या नियमाप्रमाणें ) ( ज–लोपचित् ) ' ज ' या अक्षराचाही लोप केला म्हणजे तें अक्षर काढून टाकलें तरः--'सकत्'—

असें पद रहातें. त्यांतून ( क—लोपचित् ) कचाही लोप केला. म्हणजे तेंही अक्षर कमी केलें, तरः—'सत्'—

येवढेंच पद शिल्लक राहतें. तेच ' प्रतिष्ठितं ब्रह्म ' त्रिकालाबाधित सर्वव्यापी परब्रह्म होय. हेंच ज्ञान गुरुमुखानें कळतें.

मायाब्रह्मसमागमादुदितवानेषः प्रपंचो मृषे-
त्येवं सत्यपि सत्यतामुपदिशंत्येकेऽस्य तान् ( तत् ) किं ब्रवे ॥
आदौ ब्रह्म नपुंसकं सुविदितं जायास्य माया वशा ।
किं ताभ्यामुदितस्य तस्य जगतः सत्यत्वगंधोऽप्यहो ॥ २० ॥

माया व ब्रह्म ह्यांच्या संयोगापासून उत्पन्न झालेला हा संसार खरोखर मिथ्या आहे. असें असतांही कित्येक विद्वान् लोक तो सत्य असल्याचेंच प्रतिपादन करतात. तेव्हां त्यांस काय म्हणावें ? अहो असें पहा ! ब्रम्ह हेंच आधीं नपुंसक असल्याचें जगजाहीर आहे. आणि त्याची स्त्री कोण ? तर म्हणजे माया. ती बोलून चालून वांझोटी. असें असतां त्यांच्या पासून हें जग निर्माण झालें म्हणणें ह्यांत काडीइतकें तरी खरें आहे का?

वंध्यायास्तनयः सुगंधिसिकतातैलैः समभ्यज्य च ।
स्नात्वा मांगलिकैः कुरंगसलिलैर्धृत्वा खपुष्पस्रजम् ॥
कर्तुं वांछति गार्दभेन विधिना षंढस्य पुत्र्या सहो-
द्वाहं तत्र च दक्षिणा चल सखे पारेपरार्धं मिलेत् ॥ २१ ॥

दोघे सोबती रस्त्यानें चालले असतां एक दुसऱ्यास ह्मणतो ‘अरे गड्या! तूं असा भलतीकडे कोठें जातोस? चल; आज दक्षणेची लाट आहे’. दुसऱ्यानें विचारलें ‘बाबा कोठें ? आणि कोणाचें लग्न आहे ?’ पहिला म्हणाला ‘ तुला अद्याप खबरच का नाहीं ? तर ऐकः ’—

“अरे ! त्या वांझेचा मुलगा आहेना ? त्याला वाळूच्या अत्तरानें न्हाऊं माऊं घालून मृगजळाचे हांडेच्या हांडे ओतून स्नान वगैरे घालून आकाशाच्या फुलांचे हारतुरे चढविले आहेत. ( अरे पण मुलगी कोणाची ? आणि कोणत्या विधीनें लग्न व्हावयाचें ? ) अरे ! ती हिजड्याची मुलगी आहेना ? तिच्या बरोबर—गांधर्व विधीनें—नव्हे गर्दभाविधीनें लग्न व्हावयाचें ठरलें आहेन् काय ? चल, चल, पाय उचल. ( अरे पण दक्षणा किती आहे ? ) खुळ्या? दक्षणा किती म्हणून काय विचारतोस ? त्यांना काय भीक लागली आहे कीं काय ? दक्षणेची अगदीं रेलचेल ! परार्धाच्याही वर ! परार्ध हाच संख्येचा शेवट, ह्याच्यावर म्हणजे शून्य, नकारघंटा ! ”

ह्याच तोडीचा ह्या प्रपंचाचा मासला आहे !

> **शैलाधीशधरः कुमारदूषितः सत्याऽन्वितोऽब्जांकितो ।**
> **गंगाभूतियुतो विनायकहितश्चक्षुःश्रवोभूषितः ॥**
> **इत्थं नाम मनागपि प्रथयते नोमाधवो माधवा-**
> **द्भेदं यश्च विभाति सोऽतिमगुणस्थानोत्थितो नान्यथा ॥ २२ ॥**

अशा प्रकारें सर्वत्र एक परब्रम्हच जर भरलेलें आहे, तर शिव निराळा, विष्णु निराळा असे जे भेद दृष्टीस पडतात तें कां ? तर बाबा ! तें मायेमुळें दिसतात इतकेंच. वस्तुतः त्यांत भेद नाहीं. ते एकरूपच आहेत. कसें तें पहा.

खालचीं सात लक्षणें किंवा विशेषणें शंकर व विष्णु ह्या उभयतांसही लागतात. अर्थात् तीं द्व्यर्थी आहेत.

( १ ) **शैला धीश धरः**—शंकर कसा आहे ? ( शैलाधीश+धरः ) कैलास पर्वतावर राहणारा; आतां विष्णु कसा आहे ? तर गोवर्धन पर्वत धारण करणारा.

(२) कुमार हर्षित:-शंकर हा आपला पुत्र कार्तिकस्वामी ह्याला पाहून आनंदित होणारा; आणि विष्णु हा (कु-मार) भूदेवीला व मदनाला पाहून संतुष्ट होणारा;

( ३ ) सत्यान्वितो:—शंकर हा सत्या ह्म॰ पार्वतीसह शोभणारा आणि विष्णु हा सत्यभामेसह शोभणारा—

( ४ ) अब्जांकितो:—शंकर हा चंद्रानें युक्त; आणि विष्णु हा शंखानें ( अप्-ज ) व कमलानें युक्त.

( ५ ) गंगाभूतियुतो:—शंकर हा गंगा आणि विभूति ह्यांनीं युक्त, व विष्णु गंगेच्या उगमानें युक्त.

( ६ ) विनायकहित:—शंकर हा गणपतीचें हित करणारा, आणि विष्णु हा ( वि+नायक हित ) पक्षीनायक जो गरुड त्याचें हितकरणारा;

( ७ )चक्षुश्रवोभूषित:—शंकर हा नागभूषणांनीं सुशोभित होणारा. व विष्णु हा शेषावर शयन करण्यांत भूषण मानणारा; अशा प्रकारें—

( ८ ) उमा+धव ह्म॰ शंकर आणि ( मा+धव ) ह्मणजे विष्णु ह्या नांवांमध्यें सुद्धां भेद असलेला मनाला भासत नाहीं. आणि ज्याला तो भासेल तो मनुष्य ( सत्त्व, रज आणि तम ह्यांतील ) शेवटच्या गुणामध्यें म्हणजे तमामध्यें अंधकारामध्यें—अज्ञानामध्येंच—गुरफटलेला आहे म्हणून समजावें. दुसरा मार्गच नाहीं. ' उमाधव ' आणि ' माधव ' हे शब्द जरी घेतले तरी सुद्धां त्यांमध्यें तत्त्वत: भेद नाहींच, व तो ' अंतिम गुणस्थाना ' मुळेंच झालेला आहे. ' अंतिम गुणस्थान ' ह्यावर खालील श्लेष केलेला आहे. संस्कृत व्याकरणांत ' इ ' ' उ ' ह्यांचीं ' ए ' ' ओ ' हीं अनुक्रमें रूपांतरें होतात. ( उदाहरणार्थ 'नी' चें 'ने' व ' चुर ' ह्याचें ' चोर ' होणें) ह्याला गुण असें म्हणतात. ह्यांतील ' अंतिम गुण ' म्हणजे ' ओ ' त्याचें स्थान, ( ' स्थानेऽतरतम: ' ह्या सूत्रानें ' ओ ' व ' उ ' हे दोन्हीही ओष्ठ्यवर्ण असल्यानें ) ' उ ' अर्थात् ' उमाधव ' ह्यांत ' माधव ' ह्यापेक्षां ' उ ' कार तेवढाच काय तो अधिक आहे.

वित्तार्थं यतसे भृशं यदनिशं शंसार्थमप्यात्मनो ।
व्यर्थं तन्मम मित्र तत्र भवतो नात्यंतिकं स्यात्सुखम् ॥
गुर्वाराधनतत्परेण मनसा कुर्वात्मशं साधनं ।
किं तस्मिन्नुपलभ्यते न हि धनं नो वात्मनः शंसनम् ॥ २३ ॥

हें पहा गड्या ! कितीही यातायात करून द्रव्य मिळाविलें, किंवा आपली कीर्ति वृद्धिंगत होण्यासाठीं तें हवें तसें खर्च केलें, तरी तें सारें व्यर्थ आहे त्याच्यापासून खरें खरें सुख ह्मणून जें काय आहे तें कांहीं प्राप्त होणार नाहीं. पण तेंच जर सद्गुरूवर भक्ति ठेवून निर्मळ अंतःकरणानें 'आत्मशं–साधन' म्हणजे आपल्या कल्याणाचें कांहीं साधन केलें, तर त्यांत काय मिळणार नाहीं ? धन मिळावयाचें नाहीं, का आपली कीर्ति व्हावयाची नाहीं ? सर्व कांहीं मिळेल. सर्व कांहीं ( आत्म–शं–साधन ) ह्यामध्येंच आहे. ह्या शब्दांत सुद्धां तें प्रत्यक्ष असलेलें दिसतेंच आहे. ह्याच शब्दाचा ( आत्मशंसा–धन ) आपलें कीर्तिरूप धन असा विग्रह केला म्हणजे झालें. ह्या श्लोकांत 'आत्मशं=साधनं' व ( आत्मशंसा–धनं ) असा श्लेष साधल्याचें प्रत्यक्ष दिसतच आहे.

तद्वित्तं त्वसुखं जनस्य नियतं यत्प्रार्थ्यते कुप्रभो-
र्वित्तः सत्तम वित्तचित्तजमदोन्मत्तेन चित्तेन यः ॥
कुत्योऽहं कथमस्मि कोऽहमिति तत्कुर्वात्मनः सर्वदा ।
सद्युक्त्या बहुशोधनं न बहुशस्तत्रापि किंस्विद्धनम् ॥ २४ ॥

अरे भल्या गृहस्था ! आपल्या श्रीमंतीच्या मदानें उन्मत्त झालेल्या एखाद्या ( वित्तः ) सुप्रसिद्ध नीच राजाजवळ याचना करून द्रव्य आणलें तर तेंही ( असुखं-जनस्य ) मनुष्याला दुःखकारकच होतें. अथवा [ असु-खंजनस्य ] प्राणघातालाही कारणीभूत होतें. [ असुखं जनस्य ह्यांत श्लेष आहे हें सांगणें नकोच. ] ह्याकरितां द्रव्यासाठीं दुसऱ्याकडे जाऊन याचना करण्याची गरज नाहीं. तर 'मी कोठून आलों ?' 'मी आतां कसा आहें ?' 'मी हा कोण ?' ह्याचें आपल्याच मनाशीं नीट

रितीनें ' बहु शोधनं ' कर म्हणजे त्यांतच धन मिळणार नाहीं काय ? हवें तितकें मिळेल. फार तर काय, पण 'बहुशोधनं' हा शब्दच प्रत्यक्ष पहा म्हणजे झालें. त्यांतच पाहिजे तेवढें द्रव्य आहे. ' बहुशो+धनं ' असा शब्द लिहावा म्हणजे त्याचा अर्थ पुष्कळसें द्रव्य असाच आहे. असें संशोधन शब्दांत सुद्धां जर धन सांपडतें, तर तें आत्मसंशोधनांत म्हणजे आत्मानात्म विचारांत तरी कां सांपडणार नाहीं ? पाहिजे तितकें सांपडेल. आत्मानात्म विचार केल्यानें ऋद्धिसिद्धी सुद्धां घरीं चालत येतील असा भाव. आणखीं ' बहु शोधन ' पुष्कळ विचार केला तर ' बहुशो–धन ', पुष्कळ द्रव्यही संपादन करतां येतें असा व्यवहारांतही अनुभव आहेच.

मिलेद्यदयुतं धनं तदधनं धनं यत्तु वै ।
मिलेत नियुतं धनं निधनमेव तज्जायते ॥
तथा धनपरार्धकं निखिलभावहीनात्मकं ।
तदक्षरपदांतरे स्थितमरे धनं सर्वथा ॥ २५ ॥

मनुष्याची आशा इतकी बलवत्तर आहे कीं, कितीही धन मिळालें तरी त्याला तें पुरेसें होत नाहीं, आणि विपुल द्रव्य मिळालें तर तें उलट दुःखदायक मात्र होतें. म्हणून परमपद प्राप्त करून घेणें हेंच खरें धन होय. हेंच व्यक्त करून दाखविण्याकरितां कवि म्हणतातः–

समजा कीं, एखाद्याला ' अयुत ' म्हणजे दहा हजार रुपये मिळाले तरी त्याला ते कांहींच नव्हेतसे वाटतात व आपण दरिद्रीच आहों असें वाटतें. हें ' अयुत ' शब्दावरूनच दिसून येतें. ( अ+युत ) ' अ ' ह्या अक्षरानें युत म्हणजे युक्त जें धन तें; अर्थात् ' अ ' हें अक्षर धन ह्या शब्दास जोडलें तर ' अधन ' म्हणजे दरिद्री असाच शब्द होतो. तात्पर्य, अयुत ह्मणजे दहा हजार रुपये मिळाले काय आणि न मिळाले काय सारखेच. अशी मनुष्याची समज होते. बरें; ( नियुत ) म्हणजे एक लाख-रुपये मिळाले तर ते त्या मनुष्याला ( नि+युत ) ' नि ' ह्या अक्षराशीं ' युत ' ह्मणजे युक्त झालेल्या--जोडलेल्या--'धना' प्रमाणेंच होतात. 'धन' ह्याला ' नि ' जोडली ह्मणजे ' निधन ' अर्थात् ' मरण ' असा शब्द

होतो. म्हणजे लाख रुपये मिळाले तर तेही मृत्यूसारखेच दुःखप्रद होतात. कारण, लाखों रुपये जवळ असले ह्मणजे कोण केव्हां येईल व कोण प्राण घेईल ह्याची रात्रंदिवस जिवाला धास्ती असते. अर्थात् ही श्रीमंती नव्हे, तर तें खरोखर मरणच होय. बरें, त्याहूनही अधिक ह्मणजे 'परार्ध' रुपये मिळाले तरी ती संख्या केवळ आभावरूप–शून्यवत्‌च–असून नसल्यासारखीच होय. 'धन' ह्या शब्दाचे 'ध' आणि 'न' हे दोन भाग झाले. त्यांतला परार्ध ह्मणजे दुसरा (पर) 'अर्ध' ह्मणजे उत्तरार्ध जो 'न' त्याचा अर्थ 'कांहीं नाहीं, 'शून्य' असाच होतो. कोणतीही गोष्ट प्रमाणांत पाहिजे. अति झाली ह्मणजे तीही नसल्यासारखीच होते. ह्मणूनच 'अति तेथें माती' अशी ह्मण पडली आहे. तेव्हां खरें धन कोठें आहे ह्मणशील तर तें नेहेमीं 'अक्षर पदांत'च. अ ह्मणजे नाहीं क्षर ह्म० नाश ज्याला त्या अविनाशी पदांतच असतें. हें लक्षांत ठेवावें. ह्यांत 'अक्षर पदांत' ह्या शब्दावरही श्लेष आहे तो असा. अपासून क्षपर्यंत जीं वर्णाक्षरें आहेत त्यांतच 'धन' हीं अक्षरें आहेत. अर्थात् 'धन' हा शब्द अक्षरांत–पक्षीं परब्रह्मांतही आहेच. इतकेंच नव्हे तर त्याच्या 'पदांत' ही आहे. ह्मणजे 'प' आणि 'द' ह्या दोन अक्षरामध्यें ही धन आहेच. उदाहरणार्थ 'त थ द ध न प फ' असा क्रम घेतला तरी 'द' अक्षराच्या व 'प' अक्षराच्या मध्यें 'धन' हीं अक्षरें येतात हें तात्पर्य.

**आत्मनो बंधने हेतु चित्तं क्षिणु हि यत्नतः ॥**
**चित्तस्य तस्य क्षयतः केवला चित्प्रकाशते ॥ २६ ॥**

आत्मा हा मायेनें बद्ध झालेला आहे. त्यांतून त्याची मुक्तता होण्यासाठीं कसेंही करून चित्त हळु हळु क्षीण करीत गेलें पाहिजे. विषयावरून चित्त हें हळू हळू मुरडलें पाहिजे. 'तस्य चित्तस्य' त्या चित्ताचा क्षय झाला म्हणजे शुद्ध राहिलेलें जें चित् तें अपोआपच प्रगट होतें. ह्या 'तस्य चित्तस्य' ह्या शब्दांतही हाच श्लेष आहे. [चि+त्त] ह्या शब्दांतील 'तस्य' म्हणजे 'त' ह्या अक्षराचा क्षय झाला कीं [चित्त –त=चित्] चित् ब्रह्म हेंच शिलक राहतें.

सत्यां विरक्तौ विपिनेऽपि वासे सत्यप्यथ ब्रह्मभवोपदेशे ॥
निवृत्तिसिद्धिः परमा समाधाने वे त्युवाचेह मृकंडुसूनुः ॥ २७॥

अरण्यांत जाऊन राहावें, खरें खरें वैराग्य धारण करावें, असा ब्रह्मदेवानें व शंकरांनीं उपदेश केलेला आहे खरा; परंतु परिपूर्ण निवृत्ति किंवा मनोजय पाहिजे असेल तर तो मात्र समाधींत स्थिर झाल्यावांचून प्राप्त होणार नाहीं. त्याला समाधि हा एकच मार्ग. असें मार्कंडेयांनीं सांगितलें आहे.

अये मनोमत्तमतंगजोऽयमितस्ततश्चंक्रमणो रजोभिः ॥
क्रीडन्सदा पिप्पलभोगतुष्टस्तच्छांतये त्वं हरिमाश्रयस्व ॥ २८ ॥

अहो ! हा मनोरूप मत्त झालेला हत्ती [ रजोभिः ] रजोगुणांनीं युक्त होऊन-पक्षीं अंगावर धूळ घेऊन-सदासर्वकाल हिकडे तिकडे नाचत असतो. आणि विषयोपभोगांत-पक्षीं [ पिप्पल-भोग-तुष्टः ] पिंपळाचीं लांकडें मोडून-खाऊन मजा मारतो. त्याला मारावयाचा असेल तर हरीचा म्हणजे विष्णूचा-पक्षीं सिंहाचाच-आश्रय केला पाहिजे.

मर्यादा न च यस्य यो मृतमयो यस्मिंच्छुचिर्नीचगैः ।
संतर्प्यो न च वाडवः किल जलैर्न स्वातिवर्षेऽपि वा ॥
मुक्ता नित्यममंदरागमथनादुच्चैःश्रवा वा हरि-
र्नो लभ्यस्तदयं भवो हि नितरां वारां निधेर्दुस्तरः ॥ २९ ॥

हा आपला समुद्र एक वेळ कसातरी तरून जातां येईल. पण संसाररूप महासागर तरून जाणें महाकर्म कठीण आहे. तरी मनुष्यानें दृढतर प्रयत्नानें समुद्राचें मंथन केल्यास ज्याप्रमाणें रत्नें प्राप्त होतात, त्याप्रमाणें आटोकाट प्रयत्न केल्यास अशा दुर्धर प्रपंचरूपी महासागरांतही भगवंताची प्राप्ति होते. हें श्लेषालंकारानें ह्या श्लोकांत सूचित केलें आहे. तें असेंः—

पृथ्वीवरचा समुद्र कसा आहे ? तर तो आपली मर्यादा उलंघन करून जात नाहीं ' पण संसारसमुद्र कसा आहे ? तर त्याला [ मर्यादा न च यस्य ] त्याला मर्यादा म्हणून कसली ती नाहींच; तो अमर्यादच आहे.

आणखी समुद्र कसा आहे ? तर [ अमृतमयः ] जलानें भरलेला; आणि भवसागर कसा आहे ? तर [ मृतमयः ] मरणानें भरलेला; आणखी समुद्र कसा आहे ? तर [[ यस्मिन्शुचिः--वाडवः—निचगैःकिल जलैः-न संतर्प्यः ] ज्याच्यांतील वडवाग्नि, पर्वतांतून नद्यांच्या रूपानें वाहत आलेल्या यच्चयावत् जलानेंसुद्धां, शमन होत नाहीं; पक्षीं भवसागर कसा आहे ? तर [ यस्मिन्—शुचिः वाडवः—नीचगैः—किल—जडैः न संतर्प्य—] त्याच्यांतील पवित्र ब्राह्मणही नीचाकडून कितीही द्रव्य मिळालें तरी तृप्त होत नाहींत. त्यांची आशा वाढतच असते. आणखी समुद्र कसा आहे ? तर [ स्वाति—वर्षेधि—वा ] स्वातीचा पर्जन्य पडल्यावांचून त्यांतून [ मुक्ताः ] मोत्यें किंवा [ नित्यम—अ—मंदर--अग--मंथनात् ] नेहमीं मंदराचलानें मंथन केल्याखेरीज त्यांतून [ उच्चैःश्रवा--वा--हरिः ] उच्चैःश्रवा नांवाचा घोडाही [ न लभ्य : ] हींही निघत नाहींत. आतां भवसागर कसा आहे ? तर त्यांतूनही [ स्व--अतिवर्षे—अपिवा ] कितीही द्रव्य खर्च केलें तरी [ मुक्ताः ] जीवन्मुक्तांचा लाभ होत नाहीं. किंवाही [ नित्यम् ] नेहमीं [ अमंद--राग मथनात् ] अधिक विषयसेवनानें [ उच्चैश्रवाः ] ज्याची कीर्ति त्रिभुवनांत दुमदुमून राहिली आहे असा [ हरिः ] भगवान् विष्णु ह्याचा लाभ घडत नाहीं. [ तत्--अयं ]ह्यावरून हा [ भवः—हि ] संसार [ वारांनिधेः ] महासागरापेक्षांही [ दुस्तरः ] तरून जाण्याला [ नितरां ] अत्यंतकठीण आहे.

विहीनः स्नेहलेशेन निर्दशश्च निरंजनः ॥
अध्यात्मज्ञानदीपोऽयं तमो हंत्यचलप्रभः ॥ ३० ॥

हा अज्ञानरूप अंधःकार नाशावयाला अध्यात्म ज्ञानदीप हाच समर्थ आहे. इतर दिव्यामध्यें तेल भरून ठेवावें लागतें. पण हा अध्यात्म ज्ञान-रूप दिवा कसा आहे ? तर [ विहीन—स्नेहलेशेन ] ह्यांत स्नेह—तेल—पक्षीं ऐहिक विषयावरील ममता—निखालस टाकावी लागते. आणखी आपल्या साध्या दिव्याला वात लागते; हा अध्यात्मज्ञानदीप कसा आहे ? तर [ निर्दश्च ] ह्याला वातीची गरज नाहीं. पक्षीं बाल्य, तारुण्य

ह्या दशांची अर्थात् अवस्थांची अपेक्षा नाहीं. आणखी हा दीप कसा आहे ? तर [ निरंजनः ] ह्याला काजळी नाहीं. पक्षीं विषयसंबंध नाहीं. आणखी कसा ? तर [ अचल +प्रभः ] ह्याचा प्रकाश नेहेमीं स्थिर असतो आणि इतर दिवे [ चल—प्रभः ] वाऱ्यानें ज्योत हालल्यानें त्यांचा प्रकाशही हालतो. आणखी अध्यात्मज्ञानदीप कसा ? तर [ तमो—हंति ] संसारास मूळ कारण जो अज्ञानांधकार तो नाहींसा कारणारा असा आहे. अर्थात् सामान्य दीपाहून हा अध्यात्मज्ञानदीप फार विलक्षण होय.

**कर्मसाक्षितिरोभावे दोषावाप्तिरुदीर्यते ॥**
**आविर्भावे पुनस्तस्य सर्वतः सुदिनं भवेत् ॥ ३१ ॥**

हा [ कर्मसाक्षी ] ह्मणजे आत्मज्ञान रवि अस्तास गेला तर [ दोषः-- अवाप्तिः--उदीर्यंते ] दोष उद्भवू लागतात. पक्षीं [ कर्मसाक्षी ] ह्मणजे सूर्य, अस्तास गेला असतां [ दोषा--अवाप्ति--उदीर्यंते ] रात्र पड-ण्यास प्रारंभ होतो. आणि तो पुन्हा उदयास आला असतां जिकडे तिकडे [ सुदिनं ] ह्मणजे सुकृत उभें रहातें. पक्षीं पुन्हा सूर्योदय झाला असतां जिकडे तिकडे [ सुदिन ] उत्तम दिवस सुरू होतो. ह्यांत 'कर्मसाक्षी' ह्मणजे आत्मा हा एक अर्थ व कर्मसाक्षी ह्मणजे सूर्य हा दुसरा अर्थ. असा द्यर्थ साधला आहे.

**इतरभजनघनरसतः फलनिष्पत्तिर्न संभवेदिति न ॥**
**मुक्ताः परंतु मन्ये स्वातिघनरसं विना न जायेरन् ॥ ३२ ॥**

तर मग आत्मज्ञानाच्या उपासनेशिवाय इतर देवतांची उपासना वगैरे केल्यास कांहींच फल प्राप्त होणार नाहीं कीं काय ? अशी कोणी पृच्छा करील त्यास सांगतातः—

ह्यांत [ इतर—भजनघनरसतः ] ह्याचा एक अर्थ—इतर देवतांच्या दृढ भक्तिरसानें कांहींच फल मिळावयाचें नाहीं असें नाहीं, तर स्वर्गादि इतर फळें त्याच्या पासूनही प्राप्त होतील. परंतु [ स्व--अति घनरसं विना ] आत्मज्ञानाच्या दृढतर रसाशिवाय [ मुक्ताः ] जीवन्मुक्त मात्र

कोणी होणार नाहीं. ह्यास दृष्टांतपर दुसरा अर्थ. [ इतर-भ-जन-घन रसतः ] म्हणजे इतर कोणत्याही नक्षत्रांच्या पावसाच्या पाण्यानें कोणतेंच पीक होणार नाहीं असें नाहीं. तर मृगादि नक्षत्रांच्या पर्जन्यानें बाजरी, जोंधळा, तांदूळ वगैरे धान्यें होतील. परंतु [ स्वाति-घन-रसं विना ] स्वातीच्या पावसाशिवाय [ मुक्ताः ] मोतीं मात्र उत्पन्न होणार नाहींत. स्वातीच्या पर्जन्यानें मोतीं उत्पन्न होतात हें मत सुप्रसिद्धच आहे.

संसारिणामिहामृतलाभोऽमृतमध्यवर्तिनामपि न ॥
मीनानामिव तत्राप्रत्यङ्मुखतैव जायते विघ्नः ॥ ३३ ॥

आत्मा किंवा ब्रह्म हें सर्वत्र व्यापलेलेंच आहे. आम्ही संसारी लोक त्यांतच राहतों; मग त्याचा लाभ आम्हांला कां होत नाहीं ? तर बाबा ! ह्या संसारिकांची गोष्ट माशासारखी आहे. मासे रात्रंदिवस पाण्यांतच राहतात, तरी त्यांस पाणी पितां येत नाहीं. कारण त्यांचें तोंड खालीं असतें. हीच त्यांची अडचण. ह्याकरितां ते पाण्याच्यावर तोंड करून उडी मारतील तेव्हांच त्यांस पाणी प्यावयास सापडतें. त्याप्रमाणें सांसारिक लोक ' अमृता ' मध्यें-परब्रह्मांमध्येंच राहतात तरी त्यांस ' अमृत ' ह्मणजे मोक्ष प्राप्त होत नाहीं. कारण त्यांचें मुखही माशाप्रमाणेंच खालीं असतें. अर्थात् आत्मज्ञानाभाव असून त्यांची विषयांकडे प्रवृत्ति असते. हेंच त्यांना विघ्न होय. तेच उर्ध्वाभिमुख होतील म्हणजे संसारांतून बाहेर पडतील तर त्यांसही अमृताचा म्हणजे मोक्षाचा लाभ होईल.

स्त्रीत्वं न पुंस्त्वं न नपुंसकत्वं न वा विभक्तिर्वचनं न यत्र ॥
तस्याव्ययस्य प्रतिलब्धयेऽत्र स्वस्थानमेवोपादिशंति संतः ॥३४॥

तर मग अविकृत असें जें अव्यय किंवा अविनाशी परब्रह्म, तें प्राप्त करून घेण्याला मार्गतरी कोणता ? तो संतांनींच सांगून ठेवला आहे. तो असाः—

ह्यांत ' अव्यय ' व ' स्वस्थान ' हे दोन शब्द द्व्यर्थी आहेत. व्यय ह्मणजे नाश ज्याला नाहीं तें अव्यय; परब्रह्म; हा एक अर्थ.

आणि व्याकरणांतील ' शब्दयोगी ' ' केवलप्रयोगी, ' ' उभयान्वयी' इ० ' अव्यय ' हा दुसरा अर्थ. स्वस्थाने=म्हणजे स्व+स्थाने आत्म्याच्याच ठिकाणीं; मनांत; हा एक अर्थ, व पाणिनीच्या व्याकरणसूत्रांतील जो ' स्वरादिगण ' त्यांत; हा दुसरा अर्थ.

आतां व्याकरणांतील अव्यय कसें आहे ? तर तें स्त्रीलिंगीही नव्हे पुलिंगीही नव्हे; व नपुसंकलिंगीही नव्हे. किंवा त्याला प्रथमा द्वितीया, तृतीया अशा विभक्तीही लागत नाहींत, अथवा एकवचन अनेकवचनही लागत नाहीं. आतां हें अव्यय मिळेल कोठें ? असा प्रश्न केल्यास संत ह्मणतात पाणिनीनें जीं व्याकरणाचीं सूत्रें केलीं आहेत त्यांत ' स्वरादि गणाच्या' स्थानामध्यें पहा म्हणजे तेथें सारीं अव्ययेंच आहेत. तेथें मिळेल.

दुसरा अर्थ—त्याचप्रमाणें अव्यय म्हणजे निर्विकार असें जें परब्रह्म तें पुलिंगीही नव्हे, स्त्रीलिंगीही नव्हे, किंवा तृतीयप्रकृतिही नव्हे. आणखी तें विभक्तीनें 'म्हणजे विशेष भक्तीनें—सगुणभक्तीनेंही व्यक्त होत नाहीं. अथवा ज्याचे विभागही करतां येत नाहींत. आणखी कसें ? तर ज्याचें ' प्रवचन ' म्हणजे कीर्तन करतां येत नाहीं; वेद सुद्धां ' नेति नेति ' म्हणतात. अर्थात् तें अनिर्वचनीय आहे. तेव्हां तें कोठें मिळेल ? तर संत ह्मणतात, तें ' स्व ' स्थानीं म्हणजे आपल्याच अंतःकरणांत आत्मज्ञानानें किंवा विवेकबुद्धीनेंच प्राप्त होईल. त्याला शोधावयाला कोठें दूर जावयास नको हा भाव.

अचलः किल संसारो नृणां परम दुःखदः ॥
तत्र स्वरूपसंधानं मन्येऽहं सुखसाधनम् ॥ ३५ ॥

ह्या श्लोकांतही दोन अर्थ साधले आहेत. पहिला अर्थः—

हा सारा संसार [ अ-चल ] म्हणजे जड—अज्ञानमूलकच—असल्यामुळें तो मनुष्याला अत्यंत दुःसह होतो. तो सुखावह होण्याला [ स्व-रूप--संधान ] आत्मस्वरूपावर लक्ष्य ठेवणें—आत्मज्ञान प्राप्त करून घेणें—येवढेंच काय तें साधन आहे.

दुसरा अर्थ—हा सारा संसार [ अचल ] म्हणजे पर्वतासारखाच

असल्यामुळें तो मनुष्यालाही अत्यंत दुःसह होतो. तो सुखावह होण्याला [ स्वरोः—उपसंधानं ] वज्राची उपासना करणें हाच एक खरा उपाय आहे. अर्थात् आत्मज्ञान हेही वज्रासारखेंच स्वतः अभेद्य आहे ;व संसाराचा भेद करणारें आहे. असा भाव. वज्राशिवाय पर्वताचा भेद होत नाहीं.

संसारसागरस्त्वेष दोषाकरसमुद्भवः ॥
तच्छोषकारकं ब्रह्मतेज एकं विराजते ॥ ३६ ॥

आपला साधा समुद्र कसा आहे ? तर [ दोषा—कर—समुद्भवः ] दोषा ह्म॰रात्र उत्पन्न करणारा जो चंद्र, तो ज्याच्यापासून उत्पन्न झालेला आहे असा; समुद्रमंथनाच्या वेळीं समुद्रांतून चौदा रत्नांपैकीं चंद्र हें एक रत्न उत्पन्न झाल्याची कथा प्रसिद्धच आहे. तेव्हां हा आपला साधा समुद्र पुष्कळ बरा. पण हा संसारसमुद्र कसा आहे ? तर ( दोष—आकर समुद्भवः ) दोषांची केवळ खाणच; तेव्हां त्याला ( शोषकारक ) शोष करण्याला [ ब्रह्म- तेज ] ह्मणजे ब्रह्मज्ञान हेंच समर्थ आहे. दुसरा अर्थ— आपल्या साध्या समुद्राचें शोषणसुद्धां ब्रह्मतेजानेंच केलें होतें. तें ब्रह्मतेज कोणतें ? तर ' तच्छोष—कारकं ' ' कारक ' म्हणजे कुंभापासून उत्पन्न झालेला जो आगस्ति ऋषि--ब्राह्मण तोच एक समर्थ झाला.

दोषोद्रेकभवे प्रभूततमसि व्याप्ते द्विजानां व्रजो ।
मूढो नष्टसुदृक् समीपगमपि स्थाणुं परं स्वाश्रयम् ॥
द्रष्टुं न क्षमते चरंति परितः किंचात्मघोषद्विष-
स्तत्रानंतपदोदयः सुखयिता स्यात्कर्मसाक्षी विभुः ॥ ३७ ॥

ह्या श्लोकांत ' द्विज ' ह्या शब्दांत द्व्यर्थी श्लेष साधून त्याचे दोन अर्थ केले आहेत व त्याशिवाय इतर शब्दांतही मोठे चातुर्यजनक श्लेष साधलेले आहेत. ' द्विज ' ह्या शब्दाचा मूल अर्थ दोन जन्म घेतलेला असा आहे. ह्यावरून द्विज ह्मणजे पक्षी असा एक अर्थ होतो व दुसरा अर्थ ब्राह्मण असा होतो. अंड्यांत उत्पन्न होणें हा एक जन्म; आणि अंडें फोडून बाहेर येणें हा दुसरा जन्म. ह्मणून त्याचा एक अर्थ

पक्षी; व ब्राह्मणाचा व्रतबंध होण्यापूर्वीचा एक जन्म आणि व्रतबंध झाल्यानंतरचा दुसरा जन्म असें समजतात. ह्मणून त्याचा दुसरा अर्थ ब्राह्मण असा आहे. ह्या श्लेषावरून या श्लोकाचे दोन अर्थ मनाला किती प्रसन्न करतात तें पहा:---

**पहिला अर्थ**–[ दोषा--उद्रेक--भवे ] मध्य रात्र झाली म्हणजे [प्रभूत-तमसि ] जिकडे तिकडे गर्द अंधार माजून राहतो आणि [ द्विजानां व्रजः ] पक्ष्यांचे कळप अगदीं गडबडून जाऊन त्यांच्या [ नष्टसुदृक् ] डोळ्यांना कांहीं दिसत नाहींसें होतें. [परं स्वाश्रयम् ] ज्याच्यावर ते बिनघोर बसलेले असतात तो ( स्थाणुं ) वृक्ष [ समीपगमपि ] अगदीं जवळ असूनही त्यांना दिसत नाहीं. आणखी [ किं चात्मघोषाद्विषः ]( ह्या शब्दांततर विशेष चातुर्य दिसून येतें ) आपल्याच नांवाचा जप करणारे म्हणजे कावळे [ कावळ्यांला संस्कृत शब्द काक असून तेही ' का, का ' असाच नेहेमीं शब्दोच्चार करतात म्हणून ते आपल्याच नांवाचा घोष करणारे होत. ] त्यांचे [ द्विषः ] द्वेष्टे म्हणजे घुबड; [ चरंति परितः ] त्यांच्यासभोंवार हल्ला करण्यासाठीं घिरट्या घालीत असतात. अशा स्थितींत त्यांना संकटांतून मुक्त करून [ सुखविता ] सुखी करणारा असा [ अनंत पदोदयः ] आकाश मार्गांत उदय पावणारा [ सर्वसाक्षी ] यावत्स्थूलसूक्ष्म पदार्थ पहाणारा [ विभुः ] एक सूर्यनारायणच समर्थ होय.

**दुसरा अर्थ**—[ दोष–उद्रेक–भवे ] हजारों दोष उत्पन्न झाले म्हणजे [ प्रभुत--तमसि ] जिकडे तिकडे अज्ञानच माजून राहतें आणि [ द्विजानां--व्रजः ] ब्राह्मणांचे समुदायही गडबडून जाऊन [ नष्टे सुदृक् ] त्यांची तीव्र दृष्टि ( अर्थात् त्यांचें ज्ञान ) असतांही त्यांस कांहीं कळत नाहीं. फार काय सांगावें ? [ पर स्वाश्रयम् ] ज्याच्या आश्रयावर ते जगलेले असतात, वावरत असतात, तो [ स्थाणुं ] आत्मा--परमात्मा [ समीपगमपि ] अगदीं जवळ -प्रत्यक्ष हृदयांत असतांही त्यांना दिसत नाहीं. आणखी [ किंचात्म--घोष--द्विषः ] आपल्या आत्मस्वरूपाचाच जे ध्यास करणारे असतात त्यांचे, म्हणजे आत्मज्ञान्यांचे जे द्वेष्टे-अर्थात् पाखांडी [ चरंति परितः ] सभोंवती घिरट्या घालीत असतात.

अशा स्थितींत त्यांना संकटांतून मुक्त करून [ सुखविता ] सुखी करणारा असा [ अनंतपदोदयः ] विष्णूच्या पदकमलापासून उत्पन्न होणारा जो [ सर्वसाक्षी ] यावत्स्थूलसूक्ष्म पदार्थ जाणणारा [ विभुः ] एक परमात्माच समर्थ होय.

तात्पर्य, एकामागून एक दोष उत्पन्न होत गेले म्हणजे जिकडे तिकडे अज्ञानच अज्ञान माजून रहातें आणि ब्राह्मण लोकही वेडे बनतात. त्यांच्या डोळ्यांवर अज्ञानाचें पटल चढून ज्या आत्म्याच्या आश्रयानेंच ते आपल्या आयुष्याचे दिवस कंठित असतात, तो त्यांच्या अगदीं जवळ-प्रत्यक्ष हृदयांत-असूनही त्यांस दिसेनासा होतो. मग आत्मज्ञानाचेंच चिंतन करणाऱ्यांचे जे पाखांडी, त्यांचा त्यांच्या सभोंवार पडलेला पाळा पडून ते भांबवल्यासारखे होतात. ह्या संकटांतून सोडवून त्यांना सुखित करणारा म्हटला म्हणजे परमपदापासून उदय पावणारा एक सर्वसाक्षी प्रभु म्हणजे आत्मज्ञानरूपी सूर्यनारायण हाच होय.

आत्माराम इहैक एव तनुते पुंसां परां निर्वृतिं ।
संसारातपतापतप्तवपुषामत्यंतदुस्थात्मनाम् ॥
पूर्णाखंडरसेन बिभ्रति भृशं सर्वागमाः सद्द्रुमिं ।
यत्रामी शुकनीलकंठकपिराड्हंसा रमंतेऽनिशम् ॥ ३८ ॥

[ संसारातपतापतप्तवपुषां ] संसाराच्या दुःसह तापानें ज्यांच्या आंगाची लाही लाही होते आहे, व जे [ अत्यंत-दुस्थात्मनाम् ] अमंगल जागेमध्यें कुचमत पडलेले आसतात अशा [ पुंसां ] पुरुषांना आल्हाद देण्याला व गारीगार करून सोडण्याला ज्यांत अमृताचीं कुंडें तुडुंब वाहून चाललीं आहेत, भक्तिरसाचे जिवंत झरे वाहत आहेत, व प्रेमाचीं कारंजीं उडत आहेत; आणि वेद व शास्त्ररूप गोड व मधुर रसांच्या फळांनीं गजबजलेले वृक्ष दाटून राहिले आहेत, आणि ज्यामध्यें पोपट, मोर, मोठमोठे वानर व हंस इत्यादि वन्य प्राणी रात्रंदिवस विहार करीत आहेत असा [ आत्मा--आराम ] आत्मा हाच कोणी एक आराम म्हणजे बाग-अर्थात् आत्मोद्यान-हेंच कायतें एक स्थळ आहे.

ह्यांत [ आत्मा+आराम ] ह्मणजे आत्मा हेंच कोणी एक उद्यान असा एक अर्थ व आत्मा (आत्माराम) हा दुसरा अर्थ. [अत्यंत दुस्थात्मनाम्] दुर्विषयांत गुरफटलेले असतील त्यांना हा एक अर्थ व दुसरा अर्थ दूषित हवेच्या ठिकाणीं कुचमत असतील त्यांना [ सर्व+आगमाः ] सारे वेद हा एक अर्थ आणि सारे वृक्ष हा दुसरा अर्थ. [ सद्रार्चे ] उत्तम स्वादिष्ट हा एक अर्थ; आणि सत् म्हणजे ब्रह्म त्याची रुचि म्हणजे गोडी अर्थात् ब्रह्मज्ञानफलाच्या रसानें म्हणजे भक्तिरसानें थबथबलेले. आणखी [ शुकनीलकंठकपिराट्- हंसाः ] पोपट, मोर, मोठमोठे वानर व हंस हा एक अर्थ आणि शुकाचार्य, महादेव, हनुमान् इत्यादि परमहंस हा दुसरा अर्थ.

सारांश, संसार तापानें ज्यांचा देह होरपळला असेल, ज्यांच्या अंतः-करणाची तगमग होत असेल, व जे दूषित विषयांच्या वातावरणांत कुच-मत असतील, अशा पुरुषांना आराम देणारें ह्या जगांत आत्मोद्यान हेंच एक रमणीय स्थान होय. इतर कोणत्याही उद्यानांत गेलें तरी, अंतःकर-णाची खरी शांति होणार नाहीं. कारण इतर बागेमध्यें आंबे, फणस, संत्रें, नारिंगें ह्यांचेच वृक्ष असतात. परंतु ह्या आत्मोद्यानांत वेद, शास्त्रें, पुराणें ह्यांचेंच वृक्ष घनदाट लागून गेलेले आहेत. इतर वृक्षांपासून उसाचा, आंब्याचा, द्राक्षाचा रस हेच मिळतील. पण ह्या शास्त्रवृक्षांपासून अनु-पम स्वादिष्ट असा ब्रह्मज्ञानरस किंवा भक्तिरसच निघतो आणि त्या भक्त्यमृताचेच जिकडे तिकडे पाट वाहत असतात. त्याचे अखंड झरे व कारंजीं उडत राहतात. असें रमणीय व फलपुष्पांनीं युक्त उद्यान दुसरें कोठें बरें सांपणार ? इतर उद्यानांत राघू, मोर, वानर व राजहंस इत्यादि वन्य व जडमतीचे प्राणीच रहातात, परंतु ह्या आत्मोद्यानांत खरे खरे वनांत राहणारे वैराग्यसंपन्न व ज्ञानसंपन्न परमहंस महात्मेच रात्रंदिवस विहार करीत असतात. ह्मणून संसारताप शमन करणारें आत्मोद्यान हेंच एक स्थान आहे. दुसऱ्या कोणत्याच ठिकाणीं चित्ताला आराम होणार नाहीं.

योो वै पंचमहाभूतविवर्तपरिबाधितः ॥
तस्य ब्रह्मविचारोऽयं साक्षात्पंचाक्षरी मतः ॥ ३९ ॥

ह्यांत श्लेषात्मक शब्द आहेत ते:---

( १ ) [ पंच--महाभूत- विवर्त-परिबाधा ] पृथ्वी, आप, तेज, वायु इत्यादि पंचमहाभूतांच्या भ्रमानें जे घुमत असतात; हा एक अर्थ; व पांच मोठमोठ्या [ भूतांच्या ] ह्मणजे पिशाचांच्या [ विवर्तानें ] म्हणजे झपाट्यानें जे बडबड करतात हा दुसरा अर्थ.

( २ ) [ पंचाक्षरी ] पांच अक्षरांचा ( मंत्र ) हा एक अर्थ; आणि पंचाक्षरी ह्मणजे भूतबाधा नाहींशी करणारा मंत्री; हा दुसरा अर्थ.

ह्यांना अनुसरून दोन अर्थ निष्पन्न होतात ते असे:—

**पहिला अर्थ:**—मनुष्य जन्मास येतो ह्मणजे काय ? तर त्याचा पंच-भूतात्मक देह तयार होतो. पण पंचमहाभूतें हीं जड असल्यामुळें त्यांचे विचारही तसेच जड किंवा भ्रांतिमूलक असतात. त्यामुळें जडदेह हाच आपला आत्मा ह्या भ्रमांतच तो गिरक्या रात असतो. आणि त्या भ्रमाच्या अनुरोधानेंच त्याचें भाषण व व्यवहार चालतात. हा जो मायात्मक किंवा अज्ञानात्मक भ्रम असतो त्यामुळेंच त्याला इहलोकांतलि संसाराच्या अनेक यातना सोसाव्या लागतात. त्यांतून पार होण्याला—तो भ्रम दूर होण्याला—षडाक्षरी मंत्र, द्वादशाक्षरी मंत्र वगैरे असतात त्याप्रमाणें [ ब्र—ह्म—वि—चा—र ] हा पंचाक्षरी—पांच अक्षरांचा मंत्र हाच एक रामबाण उपाय आहे.

**अथवा दुसरा अर्थ**—पंचमहाभूतें हीं भूतें ह्मणजे महत्तत्त्वें नसून तीं खराखरच ब्रह्मसंबंध, झोटिंग ह्यांच्यासारखीं मोठमोठीं भूतें—पांच पिशाचेंच आहेत. त्यांनीं ज्याला झपाटलें असेल, तो वेडे वेडे चार करतो. त्यांतून बरें करण्याला ‘ ब्रह्मविचार ’ म्हणजे आत्मानात्म विचार करणें हाच एक भूतें काढणारा प्रत्यक्ष ‘ पंचाक्षरी ’ म्हणजे मांत्रिक आहे हें लक्षांत ठेव. तात्पर्य, देहात्मबुद्धींत गोते खात असलेल्या जिवाची सुटका होण्याला—परब्रह्माचा विचार करणें—आत्मानात्म विवेक करणें—हाच खात्रीचा उपाय आहे. अन्य कोणताही उपाय नाहीं.

न योगे नैव करणे मूलाधिष्ठानमिष्यते ॥
मूलाधिष्ठानसंप्राप्तिर्भजने सहजा नृणाम् ॥ ४० ॥

ह्या श्लोकांत ' योग '' करण '' ' मूलाधिष्ठान ' व ' भजन ह्या शब्दांत श्लेष साधला असल्यामुळें ह्याचेही खालीं लिहिल्याप्रमाणें दोन अर्थ होतात.

**पहिला अर्थ**—[ मूल+अधिष्ठान ] ह्मणजे मूळ निर्विकार परब्रह्म हें [ योगें ] कर्मयोग, ज्ञानयोग, अष्टांगयोग इत्यादिकांमध्यें किंवा [ करणे ] ज्योतिष्टोमादियज्ञयाग इत्यादि कर्मांमध्येंही [ न+इष्यते ] सांपडत नाहीं. पण [ नृणाम् ] मनुष्यानें [ भजने ] ईश्वरभजन, भक्ति केली तर त्या भक्तीमध्यें त्याच [ मूलाधिष्ठान--संप्राप्ति ] मूळ परब्रह्माचा लाभ [ सहजा ] सहजासहजीं होतो.

**दुसरा अर्थः**—[ मूल+अधिष्ठान ] मूळ नक्षत्राचें स्थान ह्मणजे जागा पाहणें असेल तर ती [ योगे ] विष्कंभ, प्रीति इत्यादि पंचांगांतील योगामध्यें किंवा [ करणे ] बव, बालव, इत्यादि पंचांगांतील करणांमध्येंही [ न+इष्यते ] सांपडावयाची नाहीं. पण [ नृणाम् ] मनुष्यानें [ भ—जने ] भ म्हणजे नक्षत्र ह्यांच्या जनांत ह्मणजे समुदायांत तपास केल्यास त्याच [ मूल+अधिष्ठान—संप्राप्ति ] मूळ नक्षत्राचें स्थान [ सहजा ] आपोआप सांपडेल.

> बालाः स्थूलाक्षरोपास्तिप्रतिकूला भवंति चेत् ।।
> सूक्ष्माक्षरं न लेखार्हस्थिति तत्करगं भवेत् ।। ४१ ।।

ह्या श्लोकाचे दोन्हीही अर्थ क्रमानेंच पदशः देतों. म्हणजे कोण-कोणत्या शब्दावर श्लेष आहेत तें सहज ध्यानांत यइल.

**पहिला अर्थः**—[ बालाः ] लहान मुलांना [ चेत् ] जर [ स्थूल—अक्षर --उपास्ति--प्रतिकूल ] मोठें अक्षर काढावयाचें आवडेना असें [ भवेत् ] झालें, तर [ सूक्ष्मा—अक्षरं ] बारीक अक्षरानें [ लेख--अर्ह--स्थिति ] पत्रें वगैरे लिहिण्याइतकी योग्यता [ तत्--करगं--न--भवेत् ] त्याला कधींच प्राप्त व्हावयाची नाहीं. तद्वत्—

**दुसरा अर्थः**—[ बालाः ] अज्ञ जनांना [ चेत् ] जर [ स्थूल--अक्षर- उपास्ति ] सगुण स्वरूपाची उपासना [ प्रतिकूलं--भवेत् ] आवडे-

नाशी झाली तर, [ सूक्ष्म--अक्षरं ] सूक्ष्म असें जें परब्रह्म त्याची अ• निर्गुणाची उपासना करण्याइतका [ लेख--अर्ह--स्थिति ] देवत्त्वाचा--सात्विक भावनेचा खरा अधिकार [ तत्--करणं--न भवेत् ] कधींच प्राप्त व्हावयाचा नाहीं. सगुणोपासनेचा कंटाळा आला तरी मोठें अक्षर वळवून वटाविल्याखेरीज जसें बारीक अक्षरांचें पत्र लिहितां येत नाहीं, त्याप्रमाणें सगुणोपसना मनांत दृढतर ठसल्याशिवाय कोणी निर्गुणोपासना करावयाच्या भरीस पडेल तर तो, त्या अधिकारास पात्र नसल्यामुळें ती त्यास साधावयाची नाहीं. तात्पर्य, सगुणोपासना आधीं अंतःकरणांत नीट ठसवून घेऊन मग हळू हळू निर्गुणोपासनेचा अभ्यास केला तरच ती साधेल. नाहीं तर दोनीही उपासना नष्ट होऊन ' इदंच नास्ति परं न लभ्यते ' ह्या कण्युक्तिप्रमाणें मनुष्याला धड कोणतीच उपासना साध्य व्हावयाची नाहीं.

यदि न हरेः सारथ्यं गुरोर्नरोऽधिगतशास्त्रविद्योऽपि ॥
जायेत कलिभवमहाभारतरणदाक्षिणःकथंकारम् ॥ ४२ ॥

मनुष्य कितीही योग्य असला तरी त्याला परमेश्वराचें साह्य हें पाहिजेच. त्याची कृपा असल्याशिवाय त्याच्यानें कांहींच होणार नाहीं. हें दर्शविण्यासाठीं कवि सांगतात:—

पहिला अर्थ दृष्टांतपर आहे तो असा—[ नरः ] अर्जुन हा [गुरो] गुरूपासून—द्रोणाचार्यापासून [ आधिगत--शास्त्रविद्या अपि ] धनुर्विद्या, शास्त्र इत्यादिकांमध्यें निपुण होता तरी त्याचें [ हरेः—सारथ्यं ] जर भगवंतांनीं सारथ्य पतकरलें नसतें तर तो [ कलिभव--महाभारतरण--दक्षिणः] कलहापासून उद्भवलेलें जें महाभारत घनघोर युद्ध त्यांत ' दाक्षिणः ' ह्मणजे विजयी [ कथंकारम्--जायेत ] ग्रंथांत वर्णिल्याप्रमाणें कुशल अथवा निपुण कसा झाला असता! कधींच झाला नसता असा भाव. तद्वत्—

दुसरा अर्थः—[ नरः ] मनुष्य [ गुरोः ] सद्गुरूपासून [ अधिगत शास्त्रविद्या--अपि ] कितीही विद्यां व शास्त्रें पढला तरी त्याला [ यदि ] जर [ हरेः—सारस्थ्यं-न ] श्रीहरीची कृपा अनुकूल नसेल तर तो [ कलिभव-महाभार--तरणं ] कलियुगांत उत्पन्न झालेल्या महादोषांचाभार घेऊन

भवसागरांतून तरून जाण्याविषयीं [कथंकारम्] कोणत्या प्रकारें [दक्षिण] समर्थ [जायेत] होईल ! होणार नाहीं हें तात्पर्य. कोणताही मनुष्य कितीही विद्वान् व योग्य असला तरी, त्याला भगवंताची कृपा ही अवश्य पाहिजेच.

सत्तारकः स्याद्भजनेन युक्तो नृणां समृद्धः किल सत्पथोऽपि ॥
साहाय्यकं चेन्न शतह्रदाया घनाघनः किं जलदानदक्षः॥४३॥

मनुष्य कितीही धर्मशील व सन्मार्गवर्ति असला तरी तो भक्तिमान् असल्याशिवाय उद्धारक होण्याला समर्थ नाहीं, हें मेघाच्या दृष्टांतानें ह्या श्लोकांत व्यक्त करून दाखविलें आहे ह्यांतील अर्थ वाचला ह्मणजे त्यांतील श्लेषही ध्यानांत येतीलच.

[सत्--तारकः स्यात्] उत्तमोत्तम तारका उगवलेल्या असल्या, [भ--जनेन-युक्तः] नक्षत्र पुंजांनीं सारें आकाश भरलेलें असलें, [समृद्धः--किल--सत्पथः अपि] अनंत आकाशाचें सारें विस्तीर्ण पटांगण जरी पसरलेलें असलें तरी, [घनाघनः] भरून आलेला मेघ [शतह्रदाया--न--सहायं चेत्] त्याला जर विद्युल्लतेचें सहाय नसेल तर तो [जलदान--दक्षः किं?] जोराची पर्जन्यवृष्टि करावयाला समर्थ होईल काय ? कधींच होणार नाहीं. तद्वत् [दुसरा अर्थ] [नृणां] मनुष्य [किल--सत्पथोपि समृद्धः] धर्माचरणांत किंवा सन्मार्गांत कितीही परिपूर्ण असला, तरी [भजनेन--युक्तः] तो भजनानें युक्त असेल, खरा भक्तिमान असेल, तरच [सत्ता-रकः--स्यात्] तो श्रेष्ठ प्रतीचा उद्धारक होईल. भक्ति नसेल तर त्याला सद्गुरुपदाची योग्यता येणार नाहीं असा भाव.

हरिपरिचरणं वृषानुबद्धं विहितं क्षेत्रविशुद्धयेऽथ तत्र ॥
घनसुभगमहोदयामृतार्द्रे प्रभवति सत्प्रहितं स्वलब्धिबीजम्॥४४॥

आत्मज्ञानाचें बीज अंतःकरणांत रुजून तें फलद्रूप होण्याला काय काय साधनें लागतात तीं ह्या श्लोकांत शेताचा दृष्टांत देऊन सांगितलीं आहेत. हे दोन्ही अर्थ मनांत घेतले म्हणजे ह्यांतील सर्व श्लेष ध्यानांत येतील.

पहिला अर्थ--[ अथ ] ( हें आरंभदर्शक अव्यय आहे.) [ क्षेत्र--विशुद्धये ] शेताची मेहनत मशागत नीट व्हावी म्हणून प्रथमतः [ हरि- परिचरणं ] [ ' र ' च्या ठिकाणीं ' ल ' ह्या पूर्वोक्त नियमाप्रमाणें किंवा रूढीप्रमाणें येथें ' हलि--परिचरणं ' असें पद घ्यावयाचें. ] तें नांगरून भुसभुशीत करून [ वृषा-- अनुबद्धं ] बैलांकडून तुडविणें [ विहितं ] हेंच प्रशस्त होय. नंतर त्यावर [ घन--सुभगं-महोदयामृतार्द्रे ] मृगादि उत्तम नक्षत्रांचा यथाकालीं पर्जन्य पडून चांगली घात आली ह्मणजे त्यांत [ सत्--प्रतिहतं ] चांगलें खोल टाकलेलें [ स्वलब्धि--बीजम् ] संपत्ति मिळविण्याचें साधन असें बीज [ प्रभवति ] जोमांत उगवून तें वाढीस लागतें; तद्वत्--

दुसरा अर्थ-- [ क्षेत्र--विशुद्धये ] मनासहित देह पवित्र होण्याकरितां प्रथमतः [ हरि--परिचरणं ] श्रीहरीची भक्ति करावी. [ वृषा--अनुबद्धं ] स्वधर्माप्रमाणें आचरण ठेवावें. हेंच [ विहितं ] योग्य आहे. ह्मणजे त्या पुनीत झालेल्या [ घन--सुभगं--महोदयार्द्रे ] घनश्यामवर्ण अशा भगवंताच्या कृपेनें आर्द्र झालेल्या ( सर्व प्राणिमात्रांवर प्रेम करूं लागल्यामुळें ) आपल्या अंतःकरणांत [ सत्--प्रहितं ] सद्गुरूच्या उपदेशानें [ स्वलब्धिबीजं ] अध्यात्मज्ञानरूप गुप्त बीज पेरलें जाऊन तें [ प्रभवति ] जोमानें वर येऊन वाढीस लागतें.

तात्पर्य, शरीरशुद्ध्यर्थ प्रथम श्रीहरीची भक्ति करावी; स्वधर्माप्रमाणें आचरण ठेवावें; हेंच आपलें कर्तव्य आहे. तें झालें ह्मणजे भगवत्कृपेनें त्यांत सात्विकादि भाव भरून तें निरहंकार होतें. आणि मग त्या निर्मल अंतःकरणांत सद्गुरूपदेशानें आत्मज्ञानाचें बीज खोल जाऊन पडलें कीं, त्याचा मोड तरारून तें पीक फोपावतें. अर्थात् मनुष्याचें अंतःकरण आत्मज्ञानानें परिप्लुत होतें.

न शास्त्राभ्यासंगान्न च विवरणान्नानुकरणा-
न्न संकल्पान्नैवाध्यवसितिविधानादपि मुहुः ॥
नृणां साक्षात्प्रादुर्भवति सुरतानंदविभवो ।
विना रामासंगाद्विविधकरणव्यूहसुभगात् ॥ ४५ ॥

श्रीरामचंद्राची दृढतर भक्ति केल्याशिवाय व तिचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्याशिवाय आत्मसाक्षात्काराची प्रचीति यावयाची नाहीं. हें ह्या श्लोकांत दृष्टांतरूपानें दर्शविलें आहे. पाहिला अर्थ दृष्टांतरूप आहे तो असा:—

पहिला अर्थ—[ रामा–संगात्–विविध करण–व्यूह–सुभगात् ] स्त्रीचा प्रत्यक्ष समागम, कीं, ज्यांत पुष्पें, माला, अत्तर, गुलाब इत्यादि उपचार, ह्यांनीं सुखांत भर पडली आहे. नानाप्रकारचे विलास ह्यांचा उपभोग घेतल्या [ विना ] शिवाय केवळ [ शास्त्रव्यासंगात् ] कामशास्त्र पढल्यानें किंवा [ विवरणात् ] त्याचें वर्णन करीत बसल्यानें, शृंगारपर गोष्टी सांगितल्यानें अथवा [ अनुकरणात् ] नुसते हावभाव केल्यानें किंवा [ संकल्पात् ] मनांत मांडे खाल्ल्यानें किंवा [ अध्यवसित्‌विधानात्–अपि मुहुः ] पुनःपुन्हा त्याचा ध्यास घेऊन बसल्यानें [ सुरत–आनंद–विभवः] स्त्रीसुखाच्या आनंदाच्या खऱ्या रहस्याचा [ साक्षात् ] प्रत्यक्ष अनुभव [ न–प्रादुर्भवति ] कधींच येणें शक्य नाहीं. त्याप्रमाणेंच—

दुसरा अर्थ—[राम असंगात्‌विविधकरण-व्यूह-सुभगात्] श्रीरामचंद्राची निःसीम भक्ति,व नानाप्रकारचीं उत्तमोत्तम साधनें [विना] केल्याशिवाय केवळ [ शास्त्र-व्यासंगात् ] न्याय, तर्कशास्त्रादिकांच्या अभ्यासानें किंवा [ विवरणात् ] त्यांचें विवरण केल्यानें अथवा [ अनुकरणात् ] त्याप्रमाणें वागण्याचा आव आणल्यानें किंवा [ संकल्पात् ] नुसते बेत करीत बसल्यानें किंवा [ अध्यवसित—विधानात्-अपि-मुहुः ] धूप, दीप, नैवेद्याचें वारंवार अवडंबर माजविल्यानें सुर–ता—आनंदे—विभवः] आपल्या अंगीं असलेला मूळचाच जो देवपणा, त्याच्या आनंदाचा प्रभाव [ सक्षात् ] प्रत्यक्षपणें कधींच [ न–प्रादुर्भवति ] अनुभवाला येणार नाहीं.

तात्पर्य, आपल्या हृदयामध्यें आत्मारामाची वस्ती असल्यानें आपणही देवतारूपच आहोंत. पण त्या देवपणाचा प्रभाव श्रीरामाची प्रत्यक्ष भक्ति व तदनुरूप साधनें केल्याशिवाय आपल्या अनुभवास येणें कधींच शक्य नाहीं. दृढतर भक्तीनें व त्याच्याशीं तादाम्य झाल्यानेंच त्याचा अनुभव घडतो.

खगासने भव्यगुणेंतरेण वरं शरं रीतिधरं नियोज्य ॥
उपासनस्यातिबलेन सौम्य त्वं सूक्ष्मलक्ष्यं प्रति विध्य शीघ्रम्॥४६

सूक्ष्म असें जें निर्गुण परब्रह्म त्याच्याकडे अनुसंधान कसें लावावें हें धनुर्धराच्या दृष्टांतानें ह्या श्लोकांत व्यक्त केलें आहे. पहिला दृष्टांतपर अर्थ आहे तो असाः--

पहिला अर्थ--[ सौम्य ] हे सुजना ! [ भव्य--गुणे ] भक्कम मौर्वी लावलेल्या अशा [ खग--आसने ] धनुष्याला [ रीत--धरं ] पितळेच्या कोरेचा [ वरं ] उत्कृष्ट [ शरं ] बाण [ नियोज्य ] लावून तो [ अंतरेण ] खूप मागें ओढून [ उपासनस्य--आतिबलेन ] धनुर्विद्या नैपुण्याच्या अत्यंत कुशलतेनें [ त्वं ] तूं [ सूक्ष्म--लक्ष्यं--प्राति ] अत्यंत सूक्ष्म असें जें पुढें असलेलें निशाण त्यावर रोखून-- नीट शिस्त लावून [ शीघ्रम् ] झटपट सोडून [ विध्य ] त्याचा भेद कर.

दुसरा अर्थ--[ सौम्य ] हे सुजना ! [ भव्यगुणे ] उत्तमोत्तम गुणांनीं युक्त असा जो [ खग--आसने ] गरुडवाहन विष्णु त्याच्यामध्यें [ अंतरेण-री-इति धरं ] मध्यंतरीं ' री ' हें अक्षर घातलेला असा [वरं] श्रेष्ठ [ शरं ] शर [ श--र ह्याच्यामध्यें ' री ' हें अक्षर घातलेला [शर ] म्हणजे ' शरीर ' [ नियोज्य ] अर्पण करून [ उपासनस्य-आति-बलेन ] प्रचंड भक्तीच्या बळानें तद्रूप होऊन ( त्वं ) तूं ( सूक्ष्म--लक्ष्यं--प्रति ) अत्यंत सूक्ष्म अर्थात् अदृश्य--दृष्टिगोचर होणारें नव्हे असें जें परब्रह्म किंवा आत्मज्ञान-त्याच्याकडे ( शीघ्रम् ) झटपट [ विध्य ] लक्ष लाव.

शंकरे भक्तिमान् स्याच्चेच्छं करे तस्य निश्चितम् ॥
या तनावात्मबुद्धिस्तु यातना सा सनातनी ॥ ४७ ॥

[ शंकरे ] शंकराच्या ठाईं [ भक्तिमान्--स्यात् ) दृढ भक्ति ठेवली तर [ तस्य ] त्याच्या [ करे ] हातांतच [ शं ] आपलें कल्याण आहे [ निश्चितम् ] ह्यांत शंका नाहीं. [ तनौ--आत्म--बुद्धिस्तु ] देह हाच आत्मा अशी बुद्धि [ या ] जी [ सा ] तीच [ सनातनी ] निरंतरची [ यातना ] होय.

तात्पर्य, शंकरावर भक्ति ठेविली असतां खरोखर ज्ञापलें कल्याण आपल्या हातांतच असतें. आणि देहात्मबुद्धि धरणें हीच जन्मोजन्मीची यातना आहे हें लक्ष्यांत ठेवावें. ह्यांत ' शंकर ' येवढ्याच शब्दांत काय तो श्लेष आहे.

बह्वर्भकं महाभगमपि कांताभरसमन्वितं भवनम् ॥
भवति सदाभरणस्थलमपि भावस्थितिविवर्जितं तु वनम् ॥४८॥

**पहिला अर्थः**—[ बह्वर्भकं ] विपुल संतति [ महा--भगमपि ] अतुलसंपत्ति; [ कांता--आभरसमन्वितं ] अलंकार भूषणांनीं युक्त स्त्री असें [ भवनम् ] घर असलें तरी व [ सदा—भरण—स्थलमपि ] सदा सर्वदा तेथें सर्वांना अन्न वस्त्र मिळत असलें तरी, [ भाव-स्थिति-विवर्जितं तु ] त्यांत भाव म्हणजे भक्ति नसेल तर ' भवन ' असूनही ' वन ' म्हणजे अरण्यच [ भवति ] होतें.

**दुसरा अर्थ**—' भवनं ' ह्या शब्दांत श्लेष साधला आहे. ' भस्य भवर्णस्य अवस्थानेन हीनं भवनं ' असा विग्रह केला म्हणजे ' भवन ' ह्या शब्दांतील ' भ ' कार काढून टाकला असतां बाकी ' वन ' म्हणजे अरण्यच राहतें. दुसरा ' भावस्थितिविवर्जितं ' हाही श्लेषच आहे. [ भ–अवस्थिति–विवर्जितं ] ' भ ' हें अक्षर ह्या सर्व श्लोकांतूनच काढून टाकलें, तर सर्व संततिसंपत्तीनें भरलेल्या वरच्या घराचीही दुर्दशा होऊन तेंही ' वन ' म्हणजे अरण्यच होतें. कसें तें पहाः—

[ बह्वर्भकं ] ह्या पदांतील भ काढला म्हणजे [ बह्वर्कं ] असें पद राहतें. त्याचा अर्थ पुष्कळशीं रुईचीं झाडें असलेलें; अथवा खडखडीत उन्हाळा असून जेथें छाया म्हणून कसली ती नाहीं असें. आतां [ महा-भगमपि ] असें मूळ पद आहे त्यांतील ' भ ' अक्षर काढलें म्हणजे [ महा—अगमपि ] मोठमोठाले पर्वत भरले आहेत असें; [ कांताभर-समन्वितं ] ह्यांतील ' भ ' काढला म्हणजे [ कांतार–समन्वितं ] घोर अरण्यानें युक्त असें; [ भवनम् ] ह्यांतील ' भ ' काढला म्हणजे वन हेंतर प्रत्यक्षच राहिलेलें दिसतें. [ सदाभरणस्थलमपि ]

ह्यांतील ‘ भ ’ काढला म्हणजे [ सदारणस्थलमपि ] भेगा पडलेल्या भू-भागांनीं युक्त असें; त्याचप्रमाणें भवन शब्दांतील [ भावास्थितिविवर्जितं ] ‘ भ ’ काढला असतां बाकी ‘वन’ च राहतें. म्हणजे ‘ भवन ’ असलेलेंसुद्धां वन होऊन जातें. ‘ भक्ति ’ ह्या शब्दांतील ‘ भ ’ हें एक अक्षर नसलें तर त्या घराची येवढी दुर्दशा होते म्हणजे तेंच घर अरण्यवत् होतें. मग ‘भक्ति’ हीं दोन्हींही अक्षरें नसतील तर त्या घरावर किती घोर प्रसंग गुदरेल ह्याची कल्पनाच केली पाहिजे.

मुमुक्षवः संपरिशीलयंतु जनाःसनादच्युतसद्गुणांस्तान् ॥
यतो हि मुक्ता अपि तैर्विमुक्ताः सद्यो विभक्ताः पतिता भवंति ४९

( १ ) अच्युत–अ–च्युत=विष्णु, किंवा च्युत-वेगळा, भ्रष्ट-होणार नाहीं असा.

( २ ) सद्गुणान्—सत्—गुणान्=उत्तम गुण, किंवा भक्कम, बळकट दोरा.

( ३ ) मुक्ताः=मोत्यें, किंवा जीवनन्मुक्त.

( ४ ) विभक्ताः=निराळे होतील ते अभक्त, भक्तिहीन. ह्या शब्दांत श्लेष साधला आहे. तो जमेस धरून अर्थ केला असतां तो असा होतो:–

[ मुमुक्षुवः—जनाः ] मोक्षाची इच्छा करणाऱ्या लोकांनीं [ अच्युतसद्गुणान्—तान् ] श्रीकृष्ण परमात्म्याच्या उत्तमोत्तम गुणांचा [ सनात् ] नेहेमीं [ संपरिशीलयंतु ] नीट विचार करीत असावा. ते गुण मोत्यांप्रमाणें आहेत. किंवा ते गुण ज्यांच्यापाशीं वास करतात तेही [ मुक्ताः ] जीवन्मुक्तच होत. हे जीवन्मुक्त त्या सद्गुणापासून जोंपर्यंत च्युत झाले नाहींत, भ्रष्ट झाले नाहींत तोंपर्यंत ते [ विमुक्ताः ] मुक्तच असतात. गुण म्हणजे दोरा असा दुसरा अर्थ आहे. , त्यांत जोंपर्यंत मोत्यें असतात तोंपर्यंत तींही सुटींच असतात. कारण तीं कांहीं त्या दोऱ्याशीं चिकटलेलीं—एकरूप झालेलीं नसतात. तरी पण तीं त्यापासून पतित होत नाहींत. गळून पडत नाहींत. त्याप्रमाणें भगवंताच्या गुणाशीं जीवन्मुक्तही अविभक्त आहेत तेथपर्यंत तेही जीवनन्मुक्तच असतात. परंतु

[ सद्यः ] तेच जर [ विभक्ताः ] विभक्त होतील, भक्तिहीन होतील तर ते सुद्धां [ पतिताः ] भ्रष्टच [ भवंति ] होतील.

तात्पर्य, जीवन्मुक्त झाले तरी सुद्धां त्यांच्यामध्यें भक्ति ही पाहिजेच. भक्तिसूत्र आहे तावत्कालपर्यंत तें कसेंही वावरलें तरी चालेल. पण तेंच त्यांचें भक्तिसूत्र तुटून तें परमेश्वरापासून विभक्त झाले तर तेही भ्रष्ट झाल्यावांचून राहणार नाहींत.

श्रीरामपादांबुजसेवकेभ्यः कथार्चनध्यानपरायणेभ्यः ॥
सांतानिकामोदकशायितेभ्यो रोचेत किं रेऽमृतसंपदेभ्यः॥ ५० ॥

रामाच्या सेवेमध्यें व भजनपूजनामध्यें जो आनंद होतो, त्याच्या पुढें मोक्षही फिका आहे. हें दर्शविण्यासाठीं कवीनें हा श्लोक केला आहे. ह्याचे दोन अर्थ होतात.

पहिला अर्थ-- [अरे ]अहो ! [श्रीरामपादांबुजसेवकेभ्यः] श्रीरामचंद्राच्या चरण कमलसेवेंत निरंतर मग्न असणारे; [ कथा-र्चन-ध्यान-परायणेभ्यः ] किंवा त्याचे गुणानुवाद श्रवण करण्यांत, त्याची पूजाअर्चा करण्यांत, त्याची ध्यानधारणा करण्यांतच जे दंग होऊन [ शांतानिकामोदकशायितेभ्यः ] रामसेवेच्या प्रभावानें प्राप्त होणाऱ्या ब्रह्मलोकाच्याही वरचा जो 'सांतानिक' नांवाचा लोक, तेथें पोचून तेथील अखंड रामसेवामृताचा उपभोग घेऊन त्याच आनंदांत तल्लीन होणारे जे लोक आहेत, [ एभ्यः] त्यांना [अमृतसंपत्] मोक्षसंपात्ति [ रोचेत--किं ] बरी वाटेल काय ? कधींच वाटणार नाहीं. आतां ह्यास दृष्टांतपर—

दुसरा अर्थ—[ सांतानिकामोदकशायितेभ्यः ] सांतानिक म्हणजे दुधावरची सायच रोज खाऊन मजा मारीत असतील त्यांना [ अमृत— संपत् ] दूध चांगलें असलें तरी कधीं रुचेल काय ? कधींच रुचणार नाहीं. श्रीरामचंद्राच्या सेवामृतापुढें मोक्षही फिका वाटतो हें तात्पर्य.

न पूजनं नो भजनं च यत्र न बंदिभावो न च मूर्तिवीक्षा ॥
फलं च किं तादृशवस्तुनः स्यादतोऽपगर्वत्वममुष्य लोके॥ ५१॥

[ यत्र ] ज्या ठिकाणीं [ न पूजनं ] पूजाअर्चा नाहीं; [ न भजनं ]

भक्तिभाव नाहीं; [ न–वंदिभावा ] किंवा जेथें नमस्कारादि प्रभुचरणीं सर्वस्वार्पणदर्शक कृत्यें नाहींत; अथवा [ न—च—मूर्तिवीक्षा ] जेथें सगुण दर्शन नाहीं; तेथें [ तादृश—वस्तुतः—स्यात् ] ( वस्तु=परब्रह्माचें ज्ञान ) अशा परमार्थज्ञानानें [ फलं—च—किं—स्यात् ] फलप्राप्ति ती काय होणार ! [ अतः ] तर [ अमुष्य लोके ] परलोकांत कोरडा [ अपवर्गत्वं न ] मोक्ष येवढेंच(लोके) ह्या लोकांत एक [ अमुष्य वस्तुनः] त्या वस्तूचें फल म्हणजे [ अ—पवर्गत्व ] प वर्ग म्हणजे प, फ, ब, भ व म हीं अक्षरें काढून टाकलीं तर ' पूजनं ' ' भजनं ' ' बंदिभाव ' ' मूर्तिवीक्षा ' हे शब्द जसे निरर्थक व अर्थशून्य होतात त्याप्रमाणेंच 'भजन' पूजन व नमन व सगुणरूप दर्शनाशिवाय इतर साधनेंही मोक्षा-संबंधानें निष्फल होत. वरच्या शब्दांतून विविक्षित अक्षरें काढून टाकलीं तर बाकी राहिलेले शब्दही निरर्थक झालेले स्पष्ट दिसतात. तद्वत् भजन, पूजन, नमन, सगुणरूपाच्या दर्शनाशिवाय इतर साधनेंही सगुणदृष्टीनें मोक्ष मिळविण्याला असमर्थ होत हा भावार्थ.

आदिमा भक्तिरित्येतत् सर्वसज्जनसंमतम् ॥
यद्यनाशोचिता सैव मुक्तिर्भवति निश्चितम् ॥ ५२ ॥

निष्काम भक्ति असणें हीच मुक्ति होय हें ह्या श्लोकांत दर्शवून त्यांत ' आदिमा ' आणि ' यद्यनाशोचिता ' ह्या शब्दांचे श्लेष अत्युत्कृष्टच साधले आहेत. पहिला अर्थ सरळ असून दुसरा श्लेषात्मक आहे.

पहिला अर्थ–[ आदिमा ] भक्ति श्रेष्ठ आहे [ भक्तिः–इति–एतत् ] हे [ सर्व–सज्जन–संमतम् ] सर्व सज्जनांना मान्यच आहे. आणि [ सा–एव ] तीच [ यदि–अनाशोचिता ] काम्य फलें सोडून केली तर तीच [ मुक्तिः भवति ] मुक्ति होते.

दुसरा अर्थ—भक्ति ह्या शब्दांत अद्याक्षर ' भ ' आहे, त्या भका-काराऐवजीं मकार घातला [ आदि मा ] व [ यदि अ–नाश–उ–चिता ] त्यांतील अ काराचा नाश करून–अकार काढून टाकून -त्याला जर ' उ ' कार ' चिता ' जोडला. म्हणजे-म अक्षरांतील अकार काढला म्हणजे

बाकी म अक्षर राहतें त्याला ' उ ' जोडला तर ' मु ' हें अक्षर होते. त्याच्यापुढें ' क्ति ' हें आहेच आहे. म्हणजे भक्तीचीच मुक्ति झाली. हा प्रत्यक्ष शब्दरचनेंतही अनुभव आहे असा भाव.

मातंगोऽपि प्राप मुक्तिं दुरापां भक्त्या पद्मं पद्मनाभे समर्प्य ॥
तद्विप्राद्याः शुद्धजन्मान एवं नैवेष्यंते शार्ङ्गिणः प्रीणनाय ॥ ५३ ॥

[ भक्त्या ] भक्तीनें [ पद्मनाभे ] विष्णूला [ पद्मं ] एक कमळ [ समर्प्य ] समर्पण केल्यामुळें [ मातंगः--अपि ] हत्तीला [ गजेंद्रासारख्या पशूला सुद्धां ] [ दुरापां ] दुर्लभ अशी [ मुक्तिं ] मुक्ति [ प्राप ] मिळाली [ तत् ] तर मग [ शुद्धजन्मान एव ] पवित्र अशा कुलांत जन्म घेतलेले जे [ विप्र--आद्याः ] ब्राह्मणादि लोक [ शार्ङ्गिणः ] विष्णुला [ प्रीणनाय ] प्रसन्न करून घेण्याकरितां [ न-एव-इष्यंते ] तसे कां झटत नाहींत ? ह्यांत ( मातंग ) ह्याच शब्दावर कायतो श्लेष आहे. मातंग ह्या शब्दाचा एक अर्थ हत्ती असून दुसरा अर्थ मांग असा आहे. ह्यावरून मांगासारख्या नीच वर्णांतील लोकांनासुद्धां जर मुक्ति मिळते, तर ती ब्राह्मणादि उच्च कुलांतील लोकांस कां बरें मिळणार नाहीं ? अवश्य मिळेल. पण तो प्रयत्न कोणीच करीत नाहींत असा भाव.

यत्तु भगवदपराधस्थितमपि जघन्यकर्मनिरतत्वात् ॥
पुरुषोत्तमे भवेच्चेद्दृढभावं दृश्यतेऽस्य गतिरूर्ध्वम् ॥ ५४ ॥

मनुष्य परमेश्वराच्या घरीं कितीही अपराधी असला, आणि तो जर भक्तिमान् आहे तर तो कधीं अधोगतीला जाणार नाहीं. उच्च पदावरच चढेल हें ह्या श्लोकांत सांगितलें आहे. हा श्लोक द्व्यर्थी असून त्याचा—

पहिला अर्थ हा—( जघन्य--कर्म-निरतत्वात् ) अश्लाघ्य कर्म केल्याच्या योगानें एखादा मनुष्य ( यत्तु ) जरी ( भगवदपराधस्थितमपि ) भगवंताचा अपराधी असून ( पुरुषोत्तमे ) भगवंताच्या ठिकाणीं त्याची ( दृढभावं ) निस्सीम भक्ति ( भवेच्चेत् ) असेल तर ( अस्य-गतिः—ऊर्ध्वम् ) त्याची गति ऊर्ध्व म्हणजे उन्नत असलेलीच ( दृश्यते ) दृष्टीस पडते. यास दृष्टांत म्हणून दुसरा अर्थ दिला आहे तो—

शृंगारपर असून प्रसिद्ध 'सुभाषितरत्नभांडागारांतील, 'विपरीत रतिक्रिया' ह्या प्रकरणासारखा असल्यामुळें तो देणें आह्मांस प्रशस्त वाटत नाहीं. तरी चाणाक्ष वाचकांस त्याची बरीच कल्पना होईल.

मा राजकृपा मा रामा मा कुमारसुखगरिमा ॥
माराज मा स्वमहिमा पदपद्माराधनेऽस्तु ते प्रेमा ॥ ५५ ॥

( मा—राज ) हे लक्ष्मीपते ! ( मा राज कृपा ) मला कोणत्याही राजाची कृपा नको; ( मा रामा ) मला स्त्री नको; किंवा (मा कुमारसुखगरिमा ) मुलाबाळांचें अनुपम सौख्यही मला नको. ( मा--स्वमहिमा ) माझी कीर्तिसुद्धां मला नको. मला फक्त ( ते ) तुझ्या ( पद–पद्म–आराधनेस्तु ) चरणकमलाच्या आराधनेचें ( प्रेमा—अस्तु ) प्रेम असावें येवढेंच तुला माझें मागणें आहे. ह्यांत श्लेष कोठें दिसत नाहीं. परंतु 'मा' ह्या अनुप्रासाचा चमत्कार आहे.

उदारांस्त्वदृते नान्यान् प्रपश्यम्यायि पार्वति ॥
श्रीरामभक्तिमाणिक्यमदेयमपि देहि मे ॥ ५६ ॥

[अयि–पार्वति] हे पार्वती ! [त्वदृते] तुझ्याशिवाय ( त्वत्+ऋतें) उदार मला कोणीच दिसत नाहीं. [ न–अन्यान्–प्रपश्यामि ] मी दुसरी कोणीच पाहिली नाहीं. म्हणून तुझ्यापाशीं मीही एक मागणें मागतों. तें कोणतें ? तर [श्रीरामभक्तिमाणिक्यं ] श्रीरामचंद्राचें भक्तिरूप माणिक हें अत्यंत मौल्यवान् व तुला अत्यंत प्रिय असल्यामुळें [ अदेयम्—अपि ] दुसऱ्याला देण्याला योग्य नव्हें, तथापि माझी गरिबी पाहून माझ्या भिडेकरितां तरी तें (मे) मला [ देही ] दे. येवढीच तुला प्रार्थना आहे.

ह्यांत [ उ–दारा ] येवढ्या एकाच पदावर काय तो श्लेष आहे. 'उ' म्हणजे शंकर, त्याची जी दारा म्हणजे स्त्री ती उदारा. शंकर हे उदार असल्याचें प्रसिद्धच आहे. उपमन्यूनें वाटीभर दूध मागितलें होतें त्याला त्यांनीं सारा क्षीरसागरच देऊन टाकला ! भस्मासुरानें शंकरालाच नष्ट करून पार्वती हस्तगत करण्यासाठीं 'मी ज्याच्या मस्तकीं हात ठेवीन त्याचें भस्म व्हावें' असा वर मागितला. त्यालाही 'तथास्तु' म्हणाले.

असे जे दानशूर शंकर त्यांची अर्धांगी तूं. तेव्हां तूं उदार असशील ह्यांत नवल तें काय ! उदार मनुष्यापाशीं कांहींही मागितलें तरी तो तें नाहीं म्हणत नाहीं. कर्णाला एका ब्राह्मणानें मागितल्यारून आपलीं स्वयंभु कवच कुंडलें सुद्धां त्यानें त्यास दिलीं होतीं. हें सर्व मनांत आणूनच मीं हें अनर्घ्य रत्न तुला मागितलें आहे. त्याला तूं नाहीं म्हणूं नकोस असा भाव.

**भामे भा मे कथंकारं कामे का मे गतिर्भवेत् ॥**

**रा मे रामे परा भक्तिर्यामे यामे भजाम्यतः ॥ ५७ ॥**

[ भामे ] मीं क्रोधाचा अंगिकार केला तर [ मे-भा ] माझी शोभा ती ( कथंकारं ) काय राहिली ! ( कामे ) किंवा कामाचा अंगिकार केला तर ( मे-गतिः ) माझी गति ( का—भवेत् ) काय बरें होईल ? ह्याकरितां काम व क्रोध हे दोन्हीही मला नकोत. ( रामे-परा भक्तिः) रामाच्या ठिकाणीं निस्सीम भक्ति ठेवणें हीच ( मे—रा ) माझी संपत्ति असें समजून ( यामे—यामे ) प्रहरा प्रहराला--एकसारखें--( अह-भजाम्यतः) मी भजन करीत बसेन.

**श्रांतोऽसि चेत् संसृतितीव्रतापतः सीतान्वितं मारुतपोतसेवितम् ॥**

**पलाशसंघातसमृद्धविक्रमं रामं धृताकारमुपेहि सत्वरम् ॥ ५८ ॥**

पहिला अर्थ—तूं जर ( संसृति—तीव्र—तापतः ) संसाराच्या तीव्र तापानें ( श्रांतः—असि चेत् ) शांत झाला असशील तर ( सीत—अन्वितं ) थंड व ( मारुत—पोत—सेवितम् ) झुळझुळ वारा वाहत असलेल्या ( पलाश-संघात=समृद्ध—वि—क्रमं ) अशा पळसांच्या दाट झाडींत नानाप्रकारचे पक्षी विहार करीत आहेत अशा ( धृत—' आ ' कार ) ' आ ' कार धारण केला ज्यानें अशा ( रामं ) रामाकडे म्हणजे ' आ ' अक्षर ज्याला लागलें आहे अशा ' आ—राम ' विश्राम स्थळाकडे ( सत्वरं) लौकर ( उपेहि ) जा. ह्यांत ' धृत-आ—कार ' हा श्लेष फारच बहारीचा आहे.

दुसरा अर्थ—परंतु हा जो उपाय सांगितला तो उन्हानें तापलेल्या मनुष्याकारितां आहे. तो संसारतापाला काय होय ? ह्याकरितां संसारता-

पालाही तोच उपाय लागू पडतो. मात्र अनुपान वेगळें इतकेंच! तें कसें? तें सांगतात. (सीता+अवित्तम्) सीता आहे ज्याच्या सन्निध( मारुत–पोत–सेवितम् ) वायुपुत्र मारुती ज्याची सेवा करीत आहे; ( पलाश-संघात–समृद्ध–विक्रमं ) राक्षस समुदायांचा नाश करून प्रताप गाजविणारा; आणि ( धृत—आकार ) सगुणस्वरूपी असा जो ( रामं ) श्रीरामचंद्र त्याचें ( सत्वरम् ) लौकर ( उप—एहि ) सेवन कर. म्हणजे संसाराचा ताप कितीहि तीव्र असला तरी तो तत्काल दूर होईल.

यातायातैः सुबहुभिः श्रांतोऽसि यदि हे सखे ॥
एकं कुरु घनच्छायं सीतारामपदं भज ॥ ५९ ॥

( हे सखे ) अरे मित्रा ! ( सुबहुभिः) अनेक प्रकारच्या ( यातायातैः) जन्ममरणाचे फेरे फिरून ( यदि ) जर ( श्रांतोसि ) थकला असलास तर (एकं) एक काम (कुरु) कर. तें कोणतें ? तर ( घनच्छायं ) शामवर्ण अशा ( सीता–रामं पद ) सीतारामाच्या चरणकमलाची ( भज ) उपासना कर.

दुसरा अर्थ—( यातायातैः ) यातायातीनें जर श्रांत झाला अनसील तर ( घन—च्छायं ) गर्द झाडी लागून गेली असेल अशा ( सीत–आराम—पदं ) थंडगार विश्रांतिस्थानाकडे जा.

विषयोपहितोऽचलस्थितिः सतमस्कः कनकांगनाप्रियः ॥
भव उग्र इहापि राघवस्मरणाच्छांतिमुपैति निर्भराम् ॥ ६० ॥

पहिला अर्थ—( विष—योप—हितः ) कालकूटासारख्या तीव्र विषाचा अंमलही जो पचवून सोडणारा ; ( अचल+स्थितिः ) कैलासासारख्या अत्युच्च शिखरावर राहणारा; ( स—तमस्कः ) पक्का तामसी; ( कनक—अंगनाप्रियः ) धोत्र्यासारखा अंमली पदार्थ सेवन करणारा, व स्त्रीसाठीं धोतरा घेणारा. ( इह—अपि ) इतका जरी ( भव ) शंकर ( उग्र ) उग्र होता तरी त्याला ( राघवस्य स्मरणात् ) श्रीरामचंद्राच्या स्मरणानें ( निर्भराम ) अखंड ( शांति–उपैति ) शांति प्राप्त झाली तद्वत्–

दुसरा अर्थ—[ विषयोपहितः ] नानाप्रकारच्या विषयांनीं खचलेला;

[ अचल—स्थितिः ] जड स्वरूपाचा [ सतमस्कः ] अज्ञानानें वेढलेला [ कनक-अंगना—प्रियः ] कनक आणि कांता ह्यांच्यावर आसक्ति ठेवणारा; [ इह-अपि]असा जरीं ह्या जगांत [ भव ] संसार हा [उग्रः] भयंकर आहे तरी त्याचा सुद्धां [ राघवस्मरणात् ]रामचंद्राच्या स्मरणानें [ निर्भराम् ] अक्षयी [ शांतिम्—उपैति ] लयास जाईल.

असौ भवभुजंगश्चेद्बाधतेऽति भयंकरः ॥
रामं नरेंद्रं भजत विनतानंदनं द्रुतम् ॥ ६१ ॥

जनहो ! [ असौ ] आपल्याला [ भव—भुजंगश्चेत् ] संसाररूपी सर्प अति भयंकरः [ बाधते ] अतिशय त्रास देत असेल तर, ( विनता—आनंदन ] शरणागताला आनंद देणारा [ पक्षी—विनता-नंदन] म्हणजे गरुड हा येथें श्लेष साधला आहे. गरुड हा सर्पांचा नाश करतो हें प्रसिद्धच आहे.आणि[नरेंद्र] विषावरचें औषध देणारा वैद्य* किंवा नृपश्रेष्ठ असा जो [ रामं ] रामचंद्र त्याला [ द्रुतम् ] लौकर[ भजत ] भजावें.

शुचिसान्निध्ययोगेन त्दृदि रामोपगूहनात् ॥
कर्मसाक्षिसमालोकाद्भवं हेमंतवज्जयेत् ॥ ॥ ६२ ॥

ह्या श्लोकाचे दोन अर्थ आहेत.

पहिला अर्थ—[ शुचि-सान्निध्य-योगेन ] अग्नीची शेकोटी जवळ ठेवून [ हृदि—रामा—उपगूहनात् ] हृदयाशीं स्त्रीचें आलिंगन करून [ कर्मसाक्षि—समालोक्य ] सूर्याचें ऊन्ह घेऊन [ भवं हेमंतवत्—जयेत् ] जशी ( हेमंत ऋतूंतील ) थंडी घालवितात त्याप्रमाणेंच हा संसारही नाहींसा करून टाकावा. तो कसा ? तर—

दुसरा अर्थ—(शुचिसान्निध्य योगेन) शुचि-साधु. त्यांच्या समागमात पवित्राचरणानें राहून( हृदि-राम-उपगुहनात् ) हृदयामध्यें रामाचें चिंतन करून आणि ( कर्मसाक्षि—समालोकात्) आत्मदर्शन घेऊन ( भवं ) हा संसारही ( हेमंतवत्—जयेत्.) थंडीप्रमाणें नाहींसा करून टाकावा.

---

*शंकराचें कालकूट विष रामस्मरणांनें उतरलें म्हणून राम हा विषवैद्य होय.

अंधं तमश्चेदयि बाधते त्वां सरोजनेत्रं जगदेकसूत्रम् ॥
सुधाचरित्रं परमं पवित्रं कुरुष्व मित्रं वसुदेवपुत्रम् ॥ ६३ ॥

( त्वां ) तुला जर ( अंधं-तमः-चेत् ) आंधार पक्षीं अज्ञान हें आंधळें असतांही ( बाधते ) पीडा करित असेल, तर ( सरोज—नेत्रं ) कमलासारखे ज्याचे नेत्र आहेत; (जगत्-एक-सूत्रम्) सर्व जगाचा केवळ एकच चालक; ( सुधा—चरित्रं ) अमृताप्रमाणें ज्याचें चरित्र गोड आहे; ( परमं—पवित्रं ) अत्यंत पवित्र आहे; अशा ( वसुदेवपुत्रम् ) वसुदेवाचा पुत्र जो श्रीकृष्णभगवान् त्याला ( मित्र ) सखा; ( कुरुष्व ) कर. ह्यांत ' मित्र ' शब्दावर श्लेष आहे. मित्र म्हणजे सखा आणि मित्र म्हणजे सूर्य. अर्थात तूं वसुदेव पुत्राला सूर्य कर. म्हणजे अज्ञानरूप अंधकार नष्ट होऊन जाईल. मग त्यापासून पीडा कशी होणार ? हें तात्पर्य.

कृच्छ्रदविषयोपहितो भवो महापन्नगोऽतिभीषयति ॥
तद्भयशमनाय विना जिष्णुपविक्रममहं न कलयेऽन्यम् ॥ ६४॥

पहिला अर्थ—( कृच्छ्रद-विषय-उपहितः) दुःखद विषयांनीं भरलेला ( भवः ) हा संसाररूप ( महापन्नगः ) मोठा सर्प ( अति-भीषयति ) अतिशय भेवडावून सोडतो. (तद्भय-शमनाय) त्याचें भय दूर करावयाला [जिष्णुपविक्रमं—विना] जिष्णूचें पालन करणारा जो श्रीकृष्ण भगवान् त्याच्या पराक्रमाशिवाय (अहं) मला तर ( अन्यम्-न-कलये ) दुसरा कांहीं उपाय दिसत नाहीं.

दुसरा अर्थ——( कृच्छ्रद-विष-योप-हित ) अत्यंत दुःखदायक ( कृच्छ्र द- ) विषाचा अंमल ज्यांत भरलेला आहे असा हा ( भव ) संसाररूपी ( महा+आपद+नग ) ज्याच्यावर चढतांना मोठी आपत्ती होते असा ( महादुर्लंघ्य ) अजस्र दुःखांचा पर्वत ( अति—भीषयति ) अतिशय भेवडावून सोडतो. ( तत्-भयशमनाय ) त्या भयाचा परिहार करावयाला ( जिष्णु—पवि-क्रमम् ) इंद्राच्या वज्राच्या तडाक्या (विना) शिवाय ( अहं ) मला तर ( अन्यम् ) दुसरा कांहीं उपाय ( न-कलये) दिसत नाहीं.

कुजन्मिप्रायेयं मदकरकलिव्याप्तिविषमा ।
कुदारव्यासंगप्रतिहतसुगोत्राऽतिभयदा ॥
द्विजिव्हैराकीर्णा व्यथयति महावंचकवती ।
प्रपंचारण्यानी भज भज सखे तन्नहरिम् ॥ ६५ ॥

ह्यांत अटवी म्हणजे अरण्य आणि संसाररूपी अरण्य ह्या दोहोंचें भयंकर स्वरूप श्लेषरूपानें वर्णन केलें आहे. हे दोन अर्थ असेः—

पहिला अर्थः—अरण्य कसें असतें ? तर ( कु—जन्मि—प्राया—इयं ) तें पृथ्वीपासून निर्माण झालेल्या वृक्षलतांनीं गजबजलेलें; आणखीं कसें ? तर ( मदकर—मदकल—'कालि=कालि '( करि ) व्याप्तिविषमा ) मदोन्मत्त हत्तींच्या संचारानें विषम दुर्गम झालेलें; आणखीं कसें ? तर (कु—दार—व्यासंगः) रानडुकरांनीं आपल्या सुळ्यांनीं ज्याच्यांतील माती उकरल्यामुळें ( प्रतिहत—सु—गोत्रा—अतिभयदा ) चांगली असलेली जमीन अतिशय भेसुर होऊनगेली आहे असें;आणखीकसें ? तर (द्विजिव्हैः—आकीर्णाः )मोठमोठे विषारी सर्प ज्याच्यामध्यें यथेच्छ क्रीडा करीत आहेत असें; आणखीं कसें ? तर ( व्यथयति—महावंचकवती ) ज्यांत मोठमोठाले माजलेले कोल्हे गुरगुरून भेडसावित आहेत. ( सखे ) गड्या ! अशा अरण्यांतून जावयाला जर भीति वाटत असेल (तत् )तर तूं ( नरहरिं ) नरहरि=पुरुषसिंह ( शब्दशः अर्थ ) शूर पुरुषाचा ( भज—भज ) आश्रय कर; त्याला संरक्षणार्थ बरोबर घे.

दुसरा अर्थ—आतां संसाररूपी अरण्य कसें आहे ? तर तेंही हुबेहुब असेंच आहे. पहाः—[ कुजन्मि—प्राया—इयं ] हा प्रपंचही कुत्सित प्राण्यांनींच भरलेला आहे. आणखी कसा ? तर [ मदकर—कालि—व्याप्त—विषया ] मद्य, कलह असल्या दुर्विषयांनीं व्याप्त झालेला; आणखी कसा? तर [ कु—दार—व्यासंग ] दुराचारी स्त्रियांच्या आचरणाच्या योगानें [प्रतिहत—सु—गोत्रा ] चांगलीं चांगलीं कुळेंही भ्रष्ट होऊन तीं [ अति—भयदा ] अत्यंत भयंकर वाटत आहेत. आणखी हा प्रपंच कसा आहे ? तर [ द्विजिव्हैः—आकीर्णाः ] लबाड लोकांनीं भरलेला. आणखी [ महा

वंचकवती] मोठमोठ्या दांडग्या ठगांचा ज्यांत बाजार भरलेला आहे आणि [ व्यथयाति ] ते अतिशय त्रास देतात. ह्याकरितां ह्या [ प्रपंचारण्यानी ] ह्या प्रपंचरूप–अरण्यामध्यें तुला भय वाटत असलें ( तत) तर हे ( सखे) मित्रा ! तूं ( नरहरिं ) नृसिंव्हाची [ भज भज ] उपासना कर.

**भ्रमयति भवपित्तं चेद्व्रजभज नरसूतशेखरं कृष्णम् ।।**

**सद्गोरसेन सहसितमनुत्रुटिकं सर्वथा त्यज स्नेहम् ।। ६६ ।।**

ह्याही श्लोकाचे दोन अर्थ आहेत ते असेः—

**पहिला अर्थ**—[ भ्रमयाति–भवपित्तं–चेत् ] संसाररूपपित्तानें तुझें कपाळ भोंवंडत असेल, घेऱ्या येत असतील, तर तूं काय कर ? पित्त झालें तर काय औषध घेतात ? [ नर ] तर हे मनुष्या ! तूं [ कृष्णम् ] काळ्या रंगाची (सूतशेखरं)सूतक्षेखर नांवाची मात्रा (भज भज) सेवन कर. पण ती घेशील कशी ? तर ( सत्–गोरसेन ) दुधांत किंवा तुपांत उगाळून त्यांत ( सहासितं ) थोडीशी साखर घालून ( अनुत्रुटिकं ) त्यांत थोडीशी वेलदोड्याच्या दाण्यांची पूड घाल. म्हणजे झालें. आतां ह्याला पथ्य काय म्हणून विचारशील ? तर (सर्वथा—त्यज—स्नेहम् ) तेलकट पदार्थ मुळीं तोंडांत सुद्धां घालूं नको.

**दुसरा अर्थ**—वर सांगितलेले उपाय पित्तावरचे झाले. परंतु ह्या संसाररूप पित्ताला कोणते उपचार करावेत ? तर तेच. कसें तें पहाः— ( भ्रमयाति–भव पित्तं–चेत् ) संसाररूप पित्तानें जर भोंवंड येत असेल, मनाला भ्रम पडत असेल, तर काय कर ? ( नर—सूत—शेखरं—कृष्णं) अर्जुनाचा श्रेष्ठ सारथि जो श्रीकृष्ण परमात्मा त्याची (भज भज) भक्ति कर. पण ती कशी ? तर ( सर्वथा–त्यज—स्नेहम् ) घरदारादि विषयांवरील सारी ममता निखालस टाकून दे, आणि ( अनुत्रुटिकं ) घटकोघटकेला ( सत्—गो–रसेन ) साधुसंतांचा उपदेश ( स–हसितं ) मोठ्या आनंदानें ग्रहण करीत जा. ह्मणजे संसाररूप पित्तानें कितीही भ्रम झाला असला तरी तो उतरून तूं शुद्धीवर येशील हा भाव.

पतितानां संसारांधतमसकूपे विनष्टदृष्टीनाम् ॥
महता विहिता महिता सुहिता स्यादच्युतावतारकथा ॥ ६७ ॥

( संसारः-अंधतमस—कूपे ) प्रपंचरूप खोल व अंधारमय विहिरींत ( पतितानां ) पडून ( विनष्ट-दृष्टीनां ) ज्यांच्या नेत्रांना कांहींच दिसत नाहीं, त्यांना ( अच्युत-अवतार-कथा ) पुराणांतरीं वगैरे वर्णन केलेलीं भगवंतांच्या अवताराचीं जीं चरित्रें आहेत, तींच ( महता ) उत्तम ( विहिता ) हितकारक व ( महिता ) महत्त्वाचीं व ( सुहिता ) अत्यंत कल्याणकारक ( स्यात् ) होत.

श्लेष—प्रपंचरूप खोल व अंधारमय विहिरीत पडून ज्यांच्या नेत्रांना कांहीं दिसत नाहीं त्यांना ( अच्युतः ) बळकट अशी ( अवतार ) शिडीचीं (कथा) वार्ता, वर्तमान, बातमीच उत्तम हितकारक, महत्त्वाची व अत्यंत कल्याणकारक होते.

पतितानांसंसारांधतमसकूपे विनष्टदृष्टीनाम् ॥
एकं महदुपदिष्टं कष्टहरं चाक्रिणो हि गुणभजनम् ॥ ६८ ॥

( संसारांधतमसकूपे ) संसाररूप गर्द अंधेऱ्या विहिरीमध्यें ( पतितानां ) पडून ज्यांची ( विनष्टदृष्टीनाम् ) दृष्टि नष्ट झाली असेल, त्यांना ( एकं—महत्–उपदिष्टं ) थोरांनीं एकच उपाय सांगितलेला आहे. तो हा कीं, ( कष्टहरं ) सर्व दुःखांपासून मुक्तकरणारें जे ( चाक्रिणःहि ) चक्र, ते धारण करणारा जो विष्णु त्याच्या ( गुण--भजनम् ) गुणानुवादाचें कीर्तन करावें.

पक्षीं—( चाक्रिणः ) रहाटाच्या ( गुण—भजनम् ) दोराला धरावें.

संसारे वर्तमानस्य नानादुष्कृतकारिणः ॥
यदि ते नरकाद्भीतिः कृष्णमेकं समाश्रय ॥ ६९ ॥

( संसारे ) प्रपंचामध्यें ( वर्तमानस्य ) वावरत असतांना ( नानादुष्कृत–कारिणः ) अनेक प्रकारचीं पातकें घडल्यामुळें ( ते ) तुला ( यदि ) जर ( नरकाद्भीतिः ) नरकाची भीति वाटत असेल तर तूं ( कृष्णं—एकम् ) एका श्रीकृष्णाचा ( सम-आश्रय ) दृढतर आश्रय

धरून रहा. श्लेष—( यदि–ते–नरकाद्भीतिः )—तुला जर नरकासुर नांवाच्या राक्षसाची भीति वाटत असेल तर तूं श्रीकृष्णाचाच घट्ट आश्रय धरून रहा. कारण, नरकासुराचा वध करणारा तोच आहे.

भवसागरं तरीतुं वांछासि चेत् सौम्य कुरु मदीयवचः ॥
यत्नांतरं विहाय प्रत्नं भज तारकेशकुलरत्नम् ॥ ७० ॥

( सौम्य ) हे सभ्य गृहस्था ! ( भवसागरं ) संसारसागरांतून ( तरितुं-वाञ्छासि ) तरून जाण्याची जर तुला इच्छा असेल तर ( मदीय-वचनं-कुरु ) मी सागतों तें कर. ( यत्नांतरं विहाय ) दुसऱ्या तिसऱ्या कोण-त्याही खटपटींत न पडतां ( तारकेश—कुलरत्नम् ) सोमवंशांतील कुलदीपक जो भगवान् श्रीकृष्ण त्याची ( प्रत्नं ) पुराण पुरुषाची ( भजे ) भक्ति करण्याची खटपट कर. श्लेष—( तारकेशकुल-रत्नम् ) उत्तम ( प्रत्नं ) जुन्या निढावलेल्या अनुभवी, कसलेल्या नावाड्याला ( भज ) शोधून काढ.

द्वाविह दृष्टौ शरणीकर्तुं संसृतितरंगिणीतरणे ॥
उडुपकुलपतिः कृष्णः श्रीरामस्तरणिकुलपतिर्नान्यः ॥ ७१ ॥

(संसृति-तरंगिणी-तरणे) संसाररूप नदी तरून जाण्याला ( शरणीकर्तुम् ) चांगले उपाय असे ( द्वौ–इह–दृष्टौ ) दोनच दिसतात. एक ( उडुपकुल-पतिः ) सोमवंशांतील मुगुटमणि (कृष्णः) श्रीकृष्ण; आणि दुसरा ( तरणि-कुलपतिः ) सूर्यवंशांतील मुकुटमणि ( श्रीरामः ) श्रीरामचंद्र ( न-अन्यः ) दुसरा उपाय नाहीं. श्लेष—ह्यांत ' उडुप ' व ' तरणि ' ह्या दोन शब्दांत श्लेष साधले आहेत. ' उडुप ' म्हणजे टोकरा; ओढा नदी वगैरे तरून जाण्यासाठीं चामड्यानें मढविलेली बांबूची टोपली करतात ती. व तरणि ह्मणजे नौका. अर्थात् ( उडुप—कुल—पति ) म्हणजे उत्तम टोकरा चालविरा किंवा [ तरणि-कुल-पति ] उत्कृष्ट नावाडी ह्यांचाच आश्रय करणें उचित होय.

जातो जलप्रसंगाद्विस्मारयति भ्रमोऽयमात्मानम् ॥
शुभमधुनार्द्ररसेन च सुरसंसेव्यं भजस्व चंद्रीशम् ॥ ७२ ॥

[ जातः—जलप्रसंगात् ] शैत्याची बाधा होऊन [ विस्मारयति ] मनुष्याची स्मरणशक्ति नष्ट झाली; [ अयं—आत्मानं—भ्रमः ] आणि ह्या आपल्या देहाचीच शुद्ध नाहींशी झाली, तर [ चंडीशम्—भजस्व ] राजचंडेश्वर नांवाची मात्रा आणवावी आणि ती [ शुभ—मधुना—आर्द्र-रसेन] आल्याच्या रसांतून मध घालून[सुरसं—सेव्यं ] चाटावी ह्मणजे शैत्य बाधा उतरेल. 'जलप्रसंगात्' ह्या पदांतील 'ल' च्या ठिकाणीं 'ड' करून—

दुसरा अर्थ—[ जातः—जडप्रसंगात् ] अविद्येच्या योगानें—अज्ञानानें [ विस्मारयति ] कांहीं कळेनासें झालें, व [ अयं—आत्मानं—भ्रमः ] ह्या आपल्या आत्मस्वरूपाचीच ओळख पटली नाहीं, तर [ अधुना ] तत्काल, [ सुर—संसेव्यं ] सर्व देवही ज्याची उपासना करतात त्या [ चंडी-शम्—भजस्व ] महादेवाची उपासना कर; [ शुभम् ] हेंच कल्याणकारक आहे.

समसितरुचिराज्योपेतमरे नरकेसरिणं संसेवेथाः ॥
अमृताभिमुखः स्याः किं कुर्याद्दुःसहतापभवज्वर एषः ॥ ७३ ॥

ह्या श्लोकांतही वैद्यकीय एक व परमार्थपर एक असे दोन अर्थ साधले आहेत.

पहिला अर्थ—[ एषः ] हा [ दुःसह—ताप—भव—ज्वरः ] संसाररूप ज्वराचा ताप अत्यंत दुःसह झाला असून [ अमृत-अभिमुख-स्याः ] दुधावर वासना जात असेल तर [ किं—कुर्यात् ] काय करावें ? [ रे ] अरे! [सम—सित—रुचिरः—आज्यः—उपेतम् ] ( सम ) सारख्या प्रमाणांत घेतलेली साखर व स्वादिष्ट तूप ह्यांनीं युक्त [ नरकेसरिणं ] नाकेशर नांवाचें औषध [ संसेव्यं ] घे म्हणजे झालें.

दुसरा अर्थ—[ एषः ] हा [ दुःसह—ताप—भव—ज्वरः ] संसारज्वराचा ताप सहन होत नसला व [ अमृत—आभिमुख—स्याः ] मोक्षाची इच्छा झाली तर [ किं कुर्यात् ] काय करावें? [ रे ] अरे [ सम्—असित—रुचिर—राज्या—उपेतं ] उत्कृष्ट श्यामवर्ण कांतीनें युक्त असणारा जो [नर-केसरिणं ] नरसिंह—भगवान् श्रीकृष्ण त्याचेंच [ संसेव्यं ] भजन कर.

व्यथयति बहुदोषभवोपताप एषोऽभ्रकायकृष्णाय ॥
स्पृहय सुखोदर्कायानेकसुरसभावनैः प्रसिद्धाय ॥ ७४ ॥

ह्या श्लोकांतही पूर्वीच्या श्लोकाप्रमाणेंच दोन अर्थ साधले आहेत.

**पहिला अर्थ**—[ एषः ] हा [ बहु-दोष—भव+उपताप—तापः ] नानाप्रकारच्या दोषापासून उत्पन्न झालेला दूषित ताप जर तुला [ व्यथयति ] त्रास देत असेल तर तू [ सुखोदर्काय ] अत्यंत सुख देणारा व [ अनेक-सु-रस—भावनैः ] नानाप्रकारच्या उत्तमोत्तम रसाच्या भावना म्हणजे पुटें दिलेलीं असल्यामुळें [ प्रसिद्धाय ] चांगला सिद्ध ( पक्का तयार ) झालेल, [ कृष्णाय—अभ्रकाय ] कृष्णाभ्रक—काळा अभ्रक घेण्याची [ स्पृहय ] इच्छा कर

**दुसरा अर्थ**—[ एष ] हा [ बहु—दोष—भवः—उपताप ] नानाप्रकारच्या पातकांनीं उत्पन्न झालेला संसाररूप रोग तुला [ व्यथयति ] त्रास देत असेल तर तूं [ सुखोदर्काय ] अत्यंत सुख देणाऱ्या अशा व [ अनेक—सुर—सभा—अवनैः ] देवगणांचें अनेकवेळा संरक्षण करून प्रसिद्ध असलेला जो [ अभ्रकाय ] मेघश्याम [ कृष्णाय ] श्रीकृष्ण त्याचें [ स्पृह्य ] सेवन कर.

संसाररोगो यदि बाधते त्वां गदारिहस्तः करुणार्द्रचित्तः ॥
सौकर्यतो यस्य रसोध्दृतिस्तं याह्योषधीशान्वयरत्नमेकम् ॥ ७५ ॥

ह्या श्लोकाचाही वैद्यशास्त्रपर एक व अध्यात्मपर एक असे दोन अर्थ आहेत.

**पहिला अर्थ**—[ त्वां ] तुला [ यदि ] जर [ संसार—रोगः ] संसार रोगाची बाधा होत असेल तर [ गदा—अरि—हस्तः ] रोगाचा परिहार करणारीं औषधें ज्याच्या हातांत आहेत व [ दयार्द्र—चित्तः ] ज्याचें अंतःकरण कोमल आहे व [ यस्य ] [ ज्याची रसोध्दृतिः ] सर्वांत बिकट अशी रसायनाक्रिया जी पारा मारणें वगैरे ती [ सौकर्यतः ] ज्याला सुसाध्य आहे [ तं ] अशा [ ओषधी—ईश—अन्वय—रत्नम्—एकम् ] औषधोपचार करणाऱ्या पिढीजाद वैद्यरत्नालाच [ याहि ] शरण जा.

**दुसरा अर्थ**—[ त्वां ] तुला [ यदि ] जर [ संसार—रोग ] संसाररूप रोग [ बाधते ] त्रास देत असेल तर तूं [ गदा-अरि-हस्तः ] गदा व

चक्र ज्याच्या हातांत आहे व [ दयार्द्र-चित्तः ] करुणेनें ज्याचें चित्त कळवळतें, व [ यस्य ] ज्यानें [ सौकर्यतः ] वराहाचा अवतार धारण करून [ रसा–उध्दृतिः ] पृथ्वीचा उद्धार केला; [ तं ] त्या [ओषधीश–अन्वय एक–रत्नम् ] सोमवंशांत अद्वितीय रत्नाप्रमाणें शोभणारा जो–श्रीकृष्ण भगवान् त्याला [ याहि ] शरण जा.

सुवर्णमालिनीं कृष्णामधुना भज चेद्भवः ॥
जीर्णज्वरो बाधते त्वां पिंडिकोद्वेष्टनादिभिः ॥ ७६ ॥

पहिला अर्थ—[ त्वां ] तुला जर [ पिंडिका–उद्वेष्टनादिभिः ] पिंढऱ्या फुगून गांठी वगैरे आल्या असतील व [ भवः–जीर्णज्वरः–बाधते ] जीर्णज्वर येऊन त्यापासून त्रास [स्यात् ] होत असेल तर तूं [ कृष्णा ] पिंपळी व [ मधुना ] मध ह्यांतून [ सुवर्णमालिनीं ] सुवर्णमालिनी वसंत नांवाची मात्रा [ भज ] घे.

दुसरा अर्थ—[ त्वां ] तुला जर [ पिंडिका–उद्वेष्टन–आदिभिः ] अन्नवस्त्राची ददात पडत असेल व [ भवः–जीर्णज्वरः–बाधते ] संसाररूपी जीर्णज्वरापासून त्रास होत असेल तर तूं [ अधुना ] आतां [ सुवर्ण–मालिनीं ] उत्तम वर्णांनीं तेजःपुंज देवता जी [ कृष्णा ] 'कृष्णा' [ म्हणजे कदाचित् ' देवी ' ही होईल ] तिची [भज ] आराधना कर.

उन्मत्तेऽतिविशृंखलं विहरति ब्रह्मांडभांडोदरे ।
नृणां धैर्यविलोपके कलियुगे स्वच्छंदसंचारिणि ॥
विध्वस्ता हि महागमा द्विजकुलं सुन्याकुलं संकुलं ।
प्रायेणैव रजस्तमोऽप्युपगतं पंथा हतो नैगमः ॥ ७७ ॥

ह्या श्लोकांत [ रलयोरभेदः ] ह्या नेहेमीच्या नियमास अनुसरून ' कलियुगे ' ह्याच्या ऐवजीं ' करियुगे ] म्हणजे दोन हत्ती असा श्लेष धरून सांप्रत कलीनें मदोन्मत्त हत्तीप्रमाणें कसा धुमाकूळ मांडला आहे त्याचें वर्णन केलें आहे.

पहिला अर्थ—[ कलियुगे ] ह्या कलियुगामध्यें ज्यांत [ नृणां ] लोक [ उन्मत्तः ] मदांध होऊन [ ब्रह्मांड–भांड–उदरे ] जगामध्यें

[अति-विशृंखलं] अत्यंत उच्छृंखळपणानें [ विहरति ] वागतात. [ धैर्य-विलोपके ] त्यांच्या बुद्धीला शाश्वतपणा असा मुळींच नाहीं. [ स्वच्छंद-संचारिणो ] ते पाहिजे तसें मनःपूत वर्तन करतात. त्यांना आळा असा कोणाचाच नाहीं. [ विध्वस्ताः-हि-महागमाः ] सर्वश्रेष्ठ जे वेद व शास्त्रें तीं उध्वस्त झालीं आहेत. आणि [ संकुलं-द्विजकुलं ] कुलवान् ब्राह्मणवर्ण तर [ सुव्याकुलं ] अगदीं जर्जर होऊन गेला आहे. [ रजः-तमः-अपि ] रजोगुण व तमोगुण ह्यांची जोडीतर [ प्रायेण-एव ] बहुतेक जिकडे तिकडे [ उपगतं ] फैलावलेलीच दिसते. आणि [ पंथाः-हतः-नैगमः ] वेद मार्गतर सारे नष्टच होऊन गेले आहेत !

**दुसरा अर्थ**—[ ब्रह्मांडभांडोदरे ] ह्या जगामध्यें [ करि-युगे ] द्वैतरूप दोन हत्ती घुसून ते [ उन्मत्तः ] मदोन्मत्त होऊन [ अति-विशृंखलं ] बेफाम होत्साते [ विहरति ] जिकडे तिकडे धुमाकूळ घालीत सुटले असतां [ नृणां ] रानांत राहणाऱ्या सर्व मनुष्यांचें [ धैर्य-विलोपकी ] धैर्य खचून जाऊन त्यांची पांचावर धारण बसली आहे. कारण[स्वच्छंद-संचारिणी]ते काय करतील आणि काय नाहीं ह्याचा नेम नाहीं. [ विध्यस्ताः-हि-महा-अगमाः ] त्यांनीं मोठमोठाले वृक्षहि कडाकड मोडून पाडले. त्यामुळें [ संकुलं-द्विजकुलं ] चांगल्या चांगल्या पक्ष्यांच्या सुद्धां झुंडीच्या झुंडी [ सुव्याकुलं ] घाबरून जाऊन सैरावैरा धांवत आहेत. आणि त्यांनीं [ प्रायेणैव-रजः-तमः ] सोंडेनें धूळ उडवून [ उपगतः ] दाही दिशा धुंद करून सोडल्या आहेत. व अंधारही पडत चालला आहे ह्या कारणानें [ पंथा-हतो-नैगमः ] नैगमः=वाणी लोकांचा, व्यापारी लोकांचा मार्ग सुद्धां दिसत नाहीं, असें झालें आहे. अशा प्रसंगीं काय करावें आणि कोठें जावें हेंच समजत नाहीं.

दूरेणापगतो वृषो बहुमदामोदः पुनः पुष्कलं।
संक्रांतो मधुपा भ्रमंति निभृतं हृष्टाश्च पुष्टत्विषः॥
रूढाश्चंचलदृष्टयोऽधिविटपं नानादरैर्भीरवो।
नूनं को नु हरिं विनाऽस्य जगतः स्याद्रक्षणे दक्षिणः॥ ७८॥

ह्या श्लोकांत श्लेषात्मक शब्द बरेच आहेत. तथापि ‘वृष’ म्हणजे

धर्म किंवा बैल; ‘ विटप ’ म्हणजे वृक्ष किंवा जार–स्त्रीलंपट पुरुष; ‘ मधुप ’ म्हणजे भ्रमर किंवा मद्यपी; आणि ‘ हरि ’ म्हणजे भगवान् किंवा सिंह. हे शब्द मुख्य होत.

आतां ‘ वृष ’ हा धर्मार्थी शब्द धरून ह्या मदोन्मत्त कलीनें प्रस्तुत जगद्रूप अरण्याची धूळधाण करून सर्वांना कसें त्राहि त्राहि करून सोडलें आहे तें कवि सांगतात.

**पहिला अर्थ**—धर्मानें कोठें तोंड चुकवून घेतलें त्याचा पत्ता नाहीं; दारूबाज लोक गर्वानें ताठून जाऊन खुशाल भटकत आहेत; चंचलवृत्तीच्या स्त्रिया विषयी जनाकडे वारंवार नेत्रकटाक्ष फेकीत आहेत; अशा प्रसंगीं श्रीहरीशिवाय ह्या जगाचें संरक्षण करण्याला कोण समर्थ आहे ?

**दुसरा अर्थ**—‘ र ’ च्या ठिकाणीं ‘ ल ’ धरण्याची संस्कृत भाषेंत वहिवाट असल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे व ती ह्या काव्यांत तर ठिकठिकाणीं आढळतें. त्याप्रमाणें ‘ कालि ’ च्या ठिकाणीं ‘ करि ’ म्हणजे हत्ती–असा अर्थ धरून मदोन्मत्त हत्ती ही एखाद्या अरण्यांत शिरला असतां तो त्याची कशी नासाडी करतो तें ह्यांत दर्शविलें आहे. किंवा कालिरूप हत्तीनें ह्या जगांत सांप्रत कसा धुमाकूळ मांडला आहे त्याचें कवि वर्णन करतात. ‘ कलि ’ हा शब्द सुद्धां ह्या श्लोकांत प्रत्यक्ष घातलेला नाहीं. तरी सर्व लक्षणावरून तो अध्याहृत घेणें इष्टच आहे.

**तिसरा अर्थ**—रानांतील बैल कोठें पळाले त्यांचा पत्ता नाहीं; मदोदक प्राशन करून माजलेले भ्रमर जिकडे तिकडे मुकाट्यानें घिरट्या घालीत आहेत; नानाप्रकारच्या भीतीनें लोक कावरेबावरे होऊन झाडांच्या फांद्यावर चढून बसले आहेत; अशा प्रसंगीं ह्या अरण्यांतील स्थावरजंगमात्मक जीवांचें सिंहाशिवाय दुसरें कोण संरक्षण करणार ? अर्थात् सिंह प्रगट होईल तरच ह्या मदोन्मत्त हत्तीची लीला बंद होईल. दुसरा मार्ग नाहीं.

कलिमलिनमतेर्नरस्य नैव स्वपदप्राप्तिपरोऽपरोऽस्त्युपाय: ॥
हरिगुणपरिशीलनात्तदेत्तन्निषधेंद्रो निपुणं विचारणीय: ॥ ७९ ॥

ह्या श्लोकांतही ‘ नर ’च्या ठिकाणीं ‘ नल ’ असा शब्द करून ‘ स्व–पद–प्राप्ति–’ म्हणजे आपल्या राज्याचा लाभ हा एक अर्थ, व

आत्मस्वरूपप्राप्ति हा दुसरा अर्थ आणि 'हरि' म्हणजे भगवान् व हरि म्हणजे अश्व हा एक अर्थ धरून ह्या श्लोकांतही द्व्यर्थ साधला आहे.

**पहिला अर्थ**—ह्या कलीच्या संसर्गानें ज्या पुरुषाची बुद्धि भ्रष्ट झाली असेल त्या पुरुषाला पुन्हा नीट शुद्धीवर येण्याला, श्रीहरीच्या गुणानुवादाचा अभ्यास करणें हा एकच मार्ग आहे, दुसरा मार्ग नाहीं. नळराजाच्या चरित्रावरून ह्या गोष्टीचा नीट विचार करावा.

**दुसरा अर्थ**—कलीनें नळराजाच्या बुद्धीला भ्रंश केला व त्यामुळें त्याचें राज्यही गेलें. तें पुन्हा मिळण्यासाठीं त्याला अश्वविद्येचा अभ्यास करावा लागला. ही गोष्ट सुज्ञांनीं विचार करण्यासारखी आहे.

**कलिप्रदुष्टोऽक्षवशंगतश्चेद्भ्रष्टात्मसाम्राज्यपदो नरः स्यात् ॥**
**स्वकं पदं प्रापयितुं पुनस्तं मन्येऽनवद्या हरिहृद्यविद्या ॥ ८० ॥**

ह्या श्लोकांतही 'नर' च्या ठिकाणीं 'नल' करून व अक्ष ह्मणजे इंद्रियें, द्यूत किंवा फांसे आणि 'हरि' ह्मणजे भगवान् व अश्व ह्या शब्दांचे श्लेष साधून दोन अर्थ केले आहेत ते असेः—

**पहिला अर्थ**—कलीच्या असह्य तापामुळें मनुष्य जर इंद्रियांच्या आधीन होऊन आत्मस्वरूपापासून च्युत झाला, आपली ओळख विसरला, तर ती ओळख पुन्हा पटण्यासाठीं अत्यंत उत्कृष्ट व श्रीहरीला अत्यंत प्रिय जी आत्मविद्या तिचा अभ्यास करणेंच उक्त आहे.

**दुसरा अर्थ**—कलीच्या दुष्ट प्रादुर्भावामुळें नळ राजानें जेव्हां द्यूत खेळण्याच्या नादांत पडून आपलें राज्य नाहींसें केलें तेव्हां तें त्याला पुन्हा मिळविण्याकरितां अश्वाचे मनोगत जाणणाऱ्या अप्रतिम विद्येचाच अभ्यास करावा लागला. [ नलराजानें अश्वविद्या संपादन करून व ऋतुपर्ण राजाचें सारथ्य स्वीकारून नंतर आपलें पहिलें राज्यपद मिळविलें ही कथा महाभारतामध्यें सुप्रसिद्धच आहे. ]

**द्विजेंद्रत्रासाढ्यः किल बहलदोषोपचयकृत् ।**
**स्फुरज्जाड्योल्लासो गुरुसुदिनचर्याक्षयकरः ॥**
**कलिः शीतर्तुश्च व्यथयति भृशं चेत्स्वनयने ।**
**निमील्य स्वच्छंदं हृदयधृतरामः स्वपिहि रे ॥ ८१ ॥**

ह्या श्लोकांत कलीची दुःसह पीडा व हिंवाळ्यांतील थंडीचा कडाका ह्यावर एक उपाय सांगितला आहे, व ‘ राम ’ ह्या शब्दावर विशेषेंकरून श्लेष साधला आहे. राम ह्मणजे श्रीरामचंद्र, व ‘ रामा ’ ह्मणजे स्त्री हा द्व्यर्थ होय. ह्याला अनुसरून—

**पहिला अर्थ**—अरे ! श्रीमान् लोकांना याचकांनीं अगदीं भंडावून सोडलें आहे; ज्याच्यामध्यें अनेक प्रकारचे दोष भरले आहेत; बुद्धिमंद होऊन आळसानें आपला पगडा बसविला आहे; आणि ज्याच्यामध्यें पुण्य कर्म असें कांहींच घडेनासें झालें आहे. अशा ह्या कलिरूपी थंडीच्या कडाक्यानें जर हुडहुडी भरली असेल तर आपले नेत्र झांकून मनामध्यें खुशाल श्रीरामाचें चिंतन करीत रहा म्हणजे झालें.

**दुसरा अर्थ**—अरे ! थंडीच्या कडाक्यालाही हाच रामबाण उपाय आहे. कसा तें पहा. चंद्राचा गारवा जर दुःसह झाला, अंधारी रात्र जर कंटाळवाणी झाली, अंगांत जडपणा आला, दिवसाचीं मोठमोठालीं कामें संपलीं, आणि रात्रीं थंडीनें अंगांत हुडहुडी भरली तर डोळे मिटावेत आणि स्त्रीला जवळ घेऊन खुशाल निजावें. [हिंवाळ्यामध्ये दिवस लहान होतात व रात्री मोठ्या होतात ह्या गोष्टीवर ह्यांत रोख असलेला ध्यानांत येईलच.]

**उर्यत्र सिद्धः सततं गुणोदयो सिद्धो रलोपः स्वरगौरवप्रदः ॥**
**तत्रैव नूनं रघुनाथमंदिरे मनोरथः सिद्धिमियादसंशयम् ॥ ८२ ॥**

ह्या श्लोकांत एक अर्थ श्रीरामवर्णनपर असून दुसऱ्यांत पाणिनीच्या व्याकरणसूत्राधारें फारच उत्कृष्ट श्लेष साधला आहे.

**पहिला अर्थ**—[ ‘ उः ’ म्हणजे शिव. त्याचा अवतार अर्थात्, हनुमान् ] हनुमान ज्या [ राममंदिरा] मध्यें सेवेला सदासर्वदा तत्पर असे, ज्या ठिकाणीं नेहमीं सद्‌गुणांचा उत्कर्ष होत असे, ज्या ठिकाणीं [असिद्धो र लोपः ’] [ र=अग्नि ] स्वर्गांत मानहानि करणारा असा अग्नीचा लोप कधींही झाला नाहीं. अर्थात यज्ञादि कर्में सदा चालू असत, अशा रघुनाथ मंदिरांतच आपल्या मनोरथांची सिद्धि होईल. [ श्रीरामाची भक्ति केल्यानेंच सर्व मनोरथ पूर्ण होतील हा भाव. ]

**दुसरा अर्थ**—[ हें वरील विधान किती खरें आहे हें मनोरथ हा शब्द व्याकरण रित्याही पण सिद्ध केला असतां चट्कन कळून येईल. ] मनः+रथः=मनर+रथः=मन+उ+रथः=मनोरथः मनस्+रथः । ह्यांत ' स ' च्या पुढें ' र ' आला म्हणून ' ससनु षोरुः ' ह्या सूत्रानें ' स् ' चा ' र ' झाला.

[ मनर्+रथः ] ह्या ठिकाणीं दोन सूत्रें लागू पडण्यासारखीं आहेत. [ असिद्धो र लोपः ] एक ' रोरि ' म्हणजे ' र ' च्या पुढें र् आला असतां र चा लोप होतो. व ' र लोपे पूर्वस्य दीर्घोऽणः ' पूर्वीचा ऱ्हस्व स्वर दीर्घ होतो. [ स्वर गौरवपदः ] तेव्हां ' मना रथ ' असा संधि होईल. पण मनोरथ हा शब्द होत नाहीं. अर्थात् ' र लोप ' म्हणजे र चा लोप होण्यासंबंधीचा नियम येथें लागू पडत नाहीं. अर्थात् तो ' असिद्ध ' होय.

दुसरें सूत्र ' हशि च ' म्हणजे विसर्गापूर्वी ' अ ' व पुढें ' र ' सारखें मृदु व्यंजन आलें असतां ' र ' चा ' उ ' होतो. ह्या दोन नियमांपैकीं ' पूर्वत्रा सिद्धम् ' ह्या सूत्रानें हा दुसरा नियमच लागू पडतो. [ उः यत्र सिद्धः ] अर्थात् ' र ' चा ' उ ' होतो. हें सूत्र येथें सिद्ध आहे.

तेव्हां मनर+रथः=मन+उ+ रथः

येथें ' इको गुणः ' ह्या सूत्रानें ' न+उ ' ह्यांचा संधि ' नो ' होऊन अर्थात् ' उ ' चा गुण झाला. ' सततं गुणोदयः '

ह्याप्रमाणें ' मनोरथ ' ह्या शब्दाची रूपसिद्धि पाहिली असतांही रघुनाथ मंदिरांत ज्या तीन गोष्टी असतात म्हणून सांगितल्या आहेत, त्यांनींच होते.

> कस्माद्दुर्गतिविव्हलो भवसि रे श्रीरामचंद्रप्रभुः ।
> सर्वोदारगुरुस्तदीयजनतासंगेन संगम्यताम् ॥
> भूत्वा प्रह्वतनुः स्तवैरभिनवैः स्तुत्वा निबद्धांजलि-
> र्भक्त्याचारफलं निवेदय ततः पूर्णः स्वलाभो भवेत् ॥ ८३ ॥

अरे ! तूं आपली दुर्दशा झाली, विपत्ति प्राप्त झाली—म्हणून कशाला

तळमळतोस ? सर्व उदारांचा राजा जो राजाधिराज श्रीरामचंद्र प्रभु, त्याचे जे भक्त आहेत, त्यांच्याच अनुषंगानें वाग. त्यांच्यापुढें शरीर-वांकिव; नानाप्रकारचे स्तुतिपाठ गा; हात जोड आणि मोठ्या भक्ति भावानें—पूजादि विधीचा नजरनजराणा अर्पण कर. [ अर्थात् आपल्या कर्मांचीं फलें त्यांच्या चरणीं वहा.] म्हणजे पाहिजे तें प्राप्त होईल. [स्व+लाभ] अर्थात् परमात्मज्ञानाचा तुला लाभ होईल, हा ध्वनितार्थ. [ कोणत्याही राजाची भेट घेणें झाली तरी त्याच्या पदरच्या अधिकाऱ्याचे आधीं आर्जव करावे लागतात, व त्यांच्याच द्वारें आपला कार्यभाग होतो हा जगांतही अनुभव आहेच. ]

अजरामरता यस्य पुंसो वृत्तिर्निरंतरम् ॥
अजराऽमरता तस्यावश्यं पाणितले स्थिता ॥ ८४ ॥

( अज—राम—रता ) जन्मरहित अशा श्रीरामचंद्रामध्येंच ज्या पुरुषाची वृत्ति निरंतर रंगून गेलेली असेल, त्याच्या ( अजरा—अमरता ) अजरत्व आणि अमरत्व हें हातांतच असतें.

मुक्तिर्द्रव्यनिबंधनाऽस्य जगतो बोधैकलभ्या पुन-
र्मुक्तिस्तद्द्वयासिद्धयेऽत्र शरणं को नाम लोकत्रये ॥
एवं वेदपुराणशास्त्रनिचयानालोड्य संपश्यतां ।
दृष्टिं गच्छाति राम एव भगवानान्यो वदान्यः क्वचित् ॥ ८५ ॥

ह्या जगांत द्रव्यावर अवलंबून असलेले भोग, व केवळ एका ज्ञानानेंच प्राप्त होणारी मुक्ति हीं दोन्हीही प्राप्त होण्याचें त्रिभुवनामध्यें जें स्थान त्याचें नांव काय ? ह्याबद्दल वेद, पुराणें व शास्त्रें ह्यांचा सर्व संग्रह धुंडाळला तर दृष्टीला भगवान् श्रीरामचंद्र हें एकच नाम दिसून येईल. त्याच्या सारखा दाता दुसरा क्वचित्च आढळेल.

श्लेष—फार तर काय ? पण भुक्ति आणि मुक्ति मिळविण्याचीं मुख्य साधनें जीं द्रव्य आणि ज्ञान तीं दोनीही ' राम ' ह्या एका शब्दांतच आहेत. ' रा' म्ह० द्रव्य; आणि ' म ' म्ह० बोध किंवा ज्ञान.

सूर्यश्चंडकरः स्वयं हि जगतां संपादको नंदन-
स्तस्यैको जगदंतकस्तदनुजो मंदो जगत्पीडकः ॥

एवं सत्यपि मित्रतामुपगतः सर्वत्र यद्भास्करः ।
सोऽयं तस्य कुलेऽवतारमहिमा श्रीरामचंद्रप्रभोः ॥ ८६ ॥

सूर्याचे किरण पाहिले तर मूळचेच जळजळीत. तेव्हां तो साऱ्या जगाची लाहीलाही करून सोडतो ह्यांत नवल नाहीं. बरें, त्याची संतती पहावी तर तीही तशीच. एक मुलगा कोण? तर यम. तो जगाचा नाश करणारा. त्याचा धाकटा भाऊ शनि. तो तर बोलून चालून जड; आणि साऱ्या जगाला पुरें पुरें करून सोडणारा. हें सारें प्रत्यक्ष दिसत असूनही त्याच सूर्याला सर्व ठिकाणीं ' मित्र ' असेंच म्हणतात! हें किती आश्चर्य आहे? हा कशाचा महिमा? तर त्याच्या कुलांत राजाधिराज श्रीरामचंद्राचा अवतार झाला, त्याचें हें फल होय. तेंच त्याला मिळत आहे.

सूर्यः स्थावरजंगमात्मजगतामात्मेत्यृषिः संजगौ ।
मंत्राणां च स एव दैवतमिति प्राह प्रसिद्धं स्मृतिः ॥
ध्यायत्यर्चति यन्नमस्यति यजत्येनं द्विजानां गणः ।
सोऽयं तस्य कुलेऽवतारमहिमा श्रीरामचंद्रप्रभोः ॥ ८७ ॥

" सूर्य हा ह्या सर्व स्थावरजंगमात्मक जगाचा केवळ प्राण आहे. " असें मोठमोठाले ऋषि सूर्याचें स्तुतिस्तोत्र गातात; सर्व मंत्राचें दैवत काय तें एक सूर्यच, असें स्मृतींत म्हणत असल्याचें सर्वत्र प्रसिद्धच आहे. ब्राह्मणादि तिन्ही वर्ण तर सूर्याचें नित्य ध्यान करतात; पूजा करतात; नमस्कार करतात; व अर्घ्यादि अनेक उपचार अर्पण करतात; इतकें त्याचें माहात्म्य कां? तर त्याच्या कुलांत म्हणजे–सूर्यवंशांत–श्रीरामचंद्राचा अवतार झाला होता म्हणून.

भास्वानेष जडस्वरूपमपि मां तेजोमयं यो व्यधात् ।
तत्तस्मै प्रतिदेयमेवमनिशं युक्तोऽप्यशक्तः स्वयम् ॥
लभ्यो भिक्षुकशेखरः समभवद्रामस्य पृष्ठं ततो–
ब्रह्मण्यः स चकार भास्करकुलं सर्वप्रकाशोज्ज्वलम् ॥ ८८ ॥

चंद्र हा नेहमीं मनांत झुरत असतो कीं काय हो करावें? मी स्वतः ' जड ' स्वरूप पडलों. पक्षीं ' जड ' ह्यांतील ' ड ' व ' ल ' एकरूपं

आहेत असें मानलें तर मी ' जलस्वरूप ' आहें. चंद्र हा जलस्वरूपी असल्याचें प्रसिद्ध आहे. मला तेज मिळतें तें सूर्यापासून मिळतें. तो त्याचा उपकार आपल्या हातून फिटत नाहीं, काय करावें ? म्हणून चंद्र हा नेहेमीं मनामध्यें खंत करीत असतो, तें उक्तच आहे. कारण तो स्वतः निस्तेज असल्यामुळें त्याच्या उपकाराची फेड करण्याला तो समर्थ नाहीं. तो मूळचाच जड अर्थात् मंदबुद्धि असूनही द्विज–पक्षीं ब्राह्मण–चंद्र; हा [ भिक्षुकः शेखर ] भिक्षुक जो शंकर त्याच्या मस्तकावर बसला, परंतु दुसऱ्याच्या उपकाराची फेड करण्याचें साधन भिक्षुकापाशीं काय मिळणार ? म्हणून तो रामाच्या पाठीशीं पडला. ' श्रीराम ' ह्याच्या पुढें ' चंद्र ' हा शब्द लागतो ह्यावर हा श्लेष आहे हें सांगणें नकोच. त्यामुळें ' श्रीरामचंद्र ' असें नाम झालें. व रामास त्याची दया येऊन रामानें त्याचें म्हणजे चंद्रानें सूर्याचें असलेले ऋण फेडलें. अर्थात् सूर्याच्या वंशांत अवतार धारण करून त्याचें सारें कुलच सुप्रकाशित करून सोडलें.

वृत्तिं पुनः कामपि कल्पयेथाः श्रीमानुदारस्त्वमतः श्रितोऽसि ॥
मयार्जितं वृत्तिशतं हरंतं भवंतमेतं किमिव ब्रवीमि ॥ ८९ ॥

ह्या श्लोकांत ' वृत्ति ' ह्या शब्दांत श्लेष साधला आहे. ' वृत्ति ' म्हणजे उपजीविकेचें साधन वर्षासन वगैरे, हा एक अर्थ, आणि ' वृत्ति' म्हणजे मनोवृत्ति–काम, क्रोध लोभ इत्यादि मनोविकार हा दुसरा अर्थ. हें मनांत आणून कवि म्हणतातः—

" देवा ! तूं मोठा श्रीमान् आहेस; उदार आहेस; ह्याकरितां तुझ्या-पासून कोणती तरी ' वृत्ति ' संपादन करावी, असा मनांत हेतु धरून मी तुझा आश्रय केला. तुला शरण आलों. पण तूं तर मीं संपादन केलेल्या पूर्वीच्या माझ्या ज्या शेकडों वृत्ति होत्या, त्याच लुटून घेतल्यास ! [ अर्थात् माझ्या कामादि शेकडो मनोवृत्ति नाहींशा करून मला 'निवृत्ति' वृत्तिशून्य–निर्विकार केलेंस ! ] अशा तुला म्हणावें तरी काय ? "

संसारांत राहिल्यानें नानाप्रकारच्या मनोवृत्ति आपणामध्यें उचंबळलेल्या असतात. परंतु देवापाशीं आपलें मन लीन झालें म्हणजे सर्ववृत्ति मावळ-

तात, व मन निर्विकार होतें. ही गोष्ट सर्वविश्रुतच आहे. तिच्यावर ह्या ‘ वृत्ति ’ शब्दावरील श्लेषाचा कटाक्ष आहे. वृत्ति म्हणजे मनोविकार हा एक अर्थ, आणि वृत्ति म्हणजे उपजीविकेचें साधन हा दुसरा अर्थ. इनाम, वार्षिक उत्पन्न, जोशीवृत्ति, कुळकर्णी वृत्ति इत्यादि वृत्ति लोकांमध्यें प्रसिद्धच आहेत.

विस्मयं वितनोत्येतद्विषमाक्षविचेष्टितम् ॥
अप्यंधकारिणा येन नृणां चक्षुः प्रकाश्यते ॥ ९० ॥

‘ विषमाक्ष ’ म्हणजे शंकर. सम नव्हेत ते विषम; ‘ तीन ’ ही संख्या विषम आहे. असे आहेत अक्ष म्हणजे डोळे ज्याला तो. अर्थात् तीन नेत्र आहेत ज्याला असा शंकर. लोकांना अंध दिसणारा असा असतांही तो मनुष्याच्या नेत्रांना दिव्यज्ञानाचा प्रकाश देतो, म्हणजे आत्मज्ञानाचा प्रकाश पाडतो, हें मोठें विचित्रच आहे! पण विचित्र तरी कशाचें ? तो ‘अंधकारिणा’ अंधक—अरिणा—म्हणजे त्यानें अंधक नांवाच्या राक्षसालाच प्रत्यक्ष मारलेलें आहे, तेव्हां तो अंधकाचा अर्थात् अज्ञानाचाही शत्रुच होय. तेव्हां त्यांत आश्चर्य करण्यासारखें कांहीं नाहीं हा भावार्थ. ह्यांत ‘ अंधकारिणा ’ येवढ्या शब्दावरच काय तो श्लेष आहे.

नीलांगो मकराभकुंडलरुचः खर्वश्च यः कच्छपो ।
दंताः कुंदविलासिनः करयुगे यस्याब्जशंखौ पुनः ॥
आस्ते यस्य विशालवक्षसि महापद्माधिवासोऽनिशं ।
लोका आशु मुकुंदमाश्रयत तं चेत्पूर्णवित्तेच्छवः ॥ ९१ ॥

अहो लोक हो! तुम्हांला जर यथास्थित धनसंपन्न होणें असेल तर, तुह्मी लौकर जाऊन मुकुंदाचा आश्रय करा. म्हणजे तुम्हांला पाहिजे तितकें द्रव्य मिळेल. कारण, त्याच्याजवळ नेहेमीं नवानिधि भरलेलेच आहेत. नवानिधि कोणतें ? तर १ महापद्म. २ पद्म. ३ शंख. ४ मकर. ५ कच्छप. ६ अब्ज. ७ कुंद. ८ नील. आणि ९ खर्व. हीं त्यांचीं नांवें होत. हे सर्व निधि श्रीहरीपाशीं—त्याच्या स्वरूपांतच—आहेत. कसें तें पहाः—

त्याची अंगकांति ' नील ' आहे; मकराकृति कुंडलें ज्यानें धारण केलीं आहेत; जो खर्व म्हणजे स्वतःच वामन मूर्ति आहे. आणि ज्यानें कच्छाचा अवतार धारण केला आहे; कुंदाप्रमाणें ज्याची दंतप्रभा आहे; आणि कमल व शंख ज्याच्या हातांत अल्हेत. आणि महापद्मा म्हणजे लक्ष्मी ही तर रात्रंदिवस ज्याच्या वक्षस्थळावर वास करीत आहे. मग अशा नवनिधिसंपन्न प्रभूला सोडून दुसऱ्या कोणाचा आश्रय करावयाचा ?

**यो वै धृतः श्रीहरिणा निजे करे स्पर्शः स एवेति विनिश्चयो मम ॥**
**स्वस्पर्शमात्रेण हि लोहलं ध्रुवं चकार शंखोऽपि सुवर्णसंभृतम् ॥ ९२ ॥**

कोणतीही वस्तु असो, जिला श्रीकृष्ण आपल्या हातांनीं स्पर्श करतील, ती वस्तु स्पर्शमाणि—म्हणजे परिसच होते असें मला वाटतें. कशावरून म्हणाल ? तर ध्रुव हा ' लोहल ' म्हणजे बोबडें बोलणारा केवळ बालक होता तरी श्रीहरीच्या हातांतील शंखानेंसुद्धां त्याला [सु-वर्णसंभृतम्] म्हणजे मोठा वक्ता किंवा महाज्ञानी करून सोडला. ह्यांत ' लोहलं ' व ' सुवर्णसंभृतम् ' ह्या दोन शब्दांत श्लेष साधला आहे. ' लोहलं' म्हणजे लोहमय हा एक अर्थ व दुसरा अर्थ—[सु—वर्ण—भाक्] उत्तम अक्षर व शब्दयुक्त वाणी, असा ह्यांत द्व्यर्थ उत्पन्न होतो. 'स्पर्श' म्हणजे हात लावणें आणि स्पर्शमणि, म्हणजे परिस, असे ह्यांत दोन दोन अर्थ साधले आहेत.

ध्रुवाला सापत्न मातेनें लत्ताप्रहार केल्यामुळें तो अनुतापानें ईश्वराकडे जाण्यासाठीं अरण्यांत एकटाच निघाला. तेव्हां त्याचें वय अगदीं लहान, केवळ पांच वर्षांचें होतें. त्याला धड बोलावयाससुद्धां येत नसे. तरी श्रीनारदमुनींनीं त्याला उपदेश दिला, तेव्हां त्यास भगवंतांनीं दर्शन दिलें व त्याच्या गालाला वेदरूप शंख लावून त्याला आत्मज्ञानी करून सोडलें. अशी श्रीमद्भागवतांत कथा आहे. तीस अनुसरून ह्या श्लोकाची रचना केलेली आहे.

**अहो धनार्थं प्रधनं विधाय सुखेन वीरा निधनं भजंते ॥**
**तत्तादृगप्यत्र धनं विहाय धीराः सुखं श्रीपतिमाश्रयन्ते ॥ ९३ ॥**

अहो ! ह्या द्रव्याकरितां मोठमोठाले वीर सुद्धां युद्ध उपस्थित करून सुखेनैव मरण सुद्धां पतकरतात. पण जे धीर पुरुष म्हणजे धैर्यशाली पुरुष

असतात ते त्याच द्रव्यावर लाथ मारून मोठ्या आनंदानें लक्ष्मीपतीचाच आश्रय करून राहतात. हें आश्चर्य नव्हे काय ?

यं सद्योऽनुजिघृक्षुरस्य हरति द्रव्यं तदेतत्प्रभोः ।
किं श्लाघ्यं ननु मादृकं तादिति चेत्स्याद्दुर्बलोऽनुग्रहः ॥
मैवं युक्ततमैव तस्य तदसद्वित्तापहारक्रिया ॥
सद्वित्तार्पणमेष वत्सलतया कर्ता यतः श्रीपतिः ॥ ९४ ॥

'माझ्यावर लौकर कृपा करा' असें जो कोणी म्हणेल, त्याच्यापाशीं असेल नसेल तें सर्व द्रव्य हिरावून घेऊन मग त्यावर कृपा करावयाची ही प्रभूची कृति चांगली काय ? चांगली तर नव्हेच, पण उलट चुकी-चीच होईल. आणि तसें असेल तर, त्या प्रभूच्या अनुग्रहांत म्हणजे कृपा करण्यांत कांहीं अर्थच नाहीं. पण असें म्हणूं नका, तर तो करतो तें अगदीं यथायोग्यच करतो. कारण, त्याच्यापाशीं—भक्तापाशीं—जें द्रव्य असते ते—असत्—म्हणजे अशाश्वत असेंच असतें. तें तो काढून घेतो हेंच त्याचें करणें उत्तम होय. आणि लक्ष्मीपति त्याला—सत्तत्त्व—म्हणजे आत्मस्वरूपी धन किंवा ब्रह्मस्वरूपी द्रव्य अर्थात् अक्षयीचें द्रव्य देतो. यांत त्याचा निष्ठुरपणा नसून उलट दयाळूपणाच समजला पाहिजे.

नापुत्रस्य गतिर्मतेति ससुतः स्यादित्थमुक्तश्रुतेः ॥
को नामात्र जनो न सस्यमिति तद्ब्रूयात्परं वच्म्यहम् ॥
यो गोविंदपरः ससद्गतिधरः सोऽयं सुताढ्यश्च य-
ल्लोके तद्गतिभाक् सनंदन इति ब्रह्मात्मजो गीयते ॥ ९५ ॥

पुत्राशिवाय सद्गति मिळत नाहीं, ह्याकरितां आपल्याला पुत्र असावा असें जें वेदांत म्हटलें आहे तें अगदीं यथार्थ आहे. तें खोटें असें कोणता मनुष्य म्हणेल ? पण मी आणखी सांगतों कीं, जगामध्यें सुद्धां जो श्रीह-रीची भक्ति करणारा असतो; सत्संगति धरणारा असतो; व पुत्रवान् असतो; त्यालाच सद्गति मिळते. कशावरून म्हणाल तर ती ब्रह्मदेवाच्या मुलालाही मिळाली. म्हणून त्याचेंहि **'सनंदन'** असें वर्णन करतात. **स-नंदन** म्हणजे पुत्रवान् हें सांगणें नकोच. हेंच त्यांचे प्रत्यक्ष उदाहरण आहे.

तेजोनिधिर्यद्यपि कर्मसाक्षी तथापि सूर्यान्वयकांतयोगम् ॥
विना कथंस्वित्प्रभवेद्वदस्व सत्पाकतासिद्धिममुष्य कर्तुम् ॥९६॥

ह्या श्लोकांत परब्रह्म हें श्रेष्ठ असलें तरी सगुणब्रह्म जो श्रीरामचंद्र, त्याच्या आश्रयाशिवाय मनःशुद्धि होत नाहीं हें फार मार्मिक दृष्टांतानें दर्शविलें आहे. ह्यांत ' तेजोनिधि ' ' कर्मसाक्षी ' ' सूर्यान्वयकांत ' व ' सत्पाकता ' हीं पदें श्लेषात्मक आहेत. त्यामुळें ह्या श्लोकाचेही दोन अर्थ होतात ते असे:—

**पहिला अर्थ**—परब्रम्ह हें मूळचें ' तेजोमय ' म्हणजे स्वयंप्रकाशच आहे. तरी तें कोणतेंही कर्म करीत नाहीं. कर्मांला साक्षीभूतमात्र असतें. तेव्हां ' सूर्यान्वयकांत ' म्हणजे सूर्यवंशांत अवतार घेतलेला जो राजाधिराज श्रीरामचंद्र, त्याच्याशीं ऐक्य झाल्याशिवाय ह्या जगामध्यें 'सत्पाकता सिद्धि' म्हणजे उत्तम पवित्रता कशी प्राप्त होईल? सांग बरें. ह्याला उदाहरणः—

**दुसरा अर्थ**—सूर्य स्वतः जरी ' तेजोनिधि ' म्हणजे स्वयंप्रकाशित आहे, सर्व कर्मांचा साक्षीभूत आहे, तरी तो स्वतः कोणतेंच कार्य करीत नाहीं. ह्याकरितां [ सत्पाकता सिद्धि ] ज्याला चांगला स्वयंपाक करावयाचा असेल त्यानें सूर्यकांत जवळ घेतला पाहिजे व त्याच्या साह्यानें विस्तव तयार केला पाहिजे. तरच स्वयंपाक करतां येईल. नाहीं तर तो कसा होणार ? सांग. तद्वत् परब्रह्म जरी स्वयंप्रकाश असलें तरी तें कर्मसाक्षी असल्यामुळें सूर्यवंशांत उत्पन्न झालेल्या प्रसिद्ध श्रीरामचंद्र प्रभूच्या सान्निध्याशिवाय मनाची खरी शुद्धि व्हावयाची नाहीं.

यद्यप्यपकारधियं कुरुते परमेश्वरे तथाप्येषः ॥
सत्वं नैव विमुंचति केवललयभुक् साहि श्रीशः ॥ ९७ ॥

परमेश्वराला आपण कांहीं तरी अपाय करावा, त्याचें कांहीं तरी वाईट करावें, असें जरी कोणीं मनांत आणलें, तरी तो आपला स्वभाव व थोरपणा कधींही सोडीत नाहीं. कारण, लक्ष्मीपति जो भगवान् त्याला आपलें अखंड चिंतन केलेलें आवडतें. मग तें तुह्मी सख्यभक्तीनें करा कीं विरोधभक्तीनें करा, कसेंही केलें तरी, चिंता नाहीं. विरोधभक्ति

केली तरी सुद्धां त्याच्या स्वभावांत बदल होत नाहीं. त्याच्या मनांतील दया नष्ट होत नाहीं.

ह्यांत ' अपकार ' ह्या शब्दावर मोठा चमत्कारिक श्लेष साधला आहे. त्याला अनुसरूनः—

**दुसरा अर्थ**—परमेश्वराला ' अपकार ' केला—अ—पकार—' प ' हें अक्षर परमेश्वरांतून काढण्याचा विचार केला, तरी तो आपला स्वभाव सोडित नाहीं. अर्थात् प—रमेश्वर—ह्या अक्षरांतून ' प ' हें एक अक्षर काढलें तरी ' रमेश्वर ' म्हणजे लक्ष्मीपति हेंच त्याचें नांव पुन्हा शिलक राहतें. म्हणजे त्याचा थोरपणा कधींही कमी होत नाहीं. कोणीं आपल्याला अपकार केला तरी मूळ स्वभावांत यत्किंचित्‌ही बदल न होणें हेंच थोरपणाचें लक्षण होय. तें परमेश्वरापाशीं आहे ह्यांत नवल तें काय ? कारण तो तर थोरांतला थोर आहे आणि तो त्याचा गुण प्रत्यक्ष अक्षरांवरून सुद्धां दिसून येत आहे.

**मानरहितः स्वकार्ये पटुश्चतुर्दशजगत्प्रथितगोत्रः ॥**
**मकरालयांतवासी प्रियभक्तश्चित्तपावनो भगवान् ॥ ९८ ॥**

पुढील दोन श्लोकांत चित्पावन ब्राह्मणांच्या गुणांचें व परमेश्वराच्या गुणांचें साम्य फारच कौशल्यानें वर्णन केलें असून त्यांतील श्लेष फार-मार्मिकतेनें साधले आहेत.

**पहिला अर्थ**—भगवान् कसा आहे ? तर ' मान—रहितः ' मान म्हणजे प्रमाण ज्याला नाहीं असा. अप्रमेय. आणखी कसा? तर (स्वकार्ये) आपल्या भक्ताचें कार्य—मनोरथ—पूर्ण करण्याविषयीं ( पटुः ) दक्ष असा; आणखी कसा ? तर ( चतुर्दश—जगत्—प्रथित—गोत्रः ) ज्याचें गोत्र म्हणजे नांव चतुर्दशभुवनांमध्यें गाजून राहिलें आहे असा; आणखी कसा? तर ( मकरालयांतवासी ) मकर म्हणजे मत्स्य ह्यांचें स्थान जो समुद्र—त्यांत म्हणजे क्षीरसागरांत राहणारा असा. आणखी कसा ? तर ( प्रिय-भक्तः ) आपल्या भक्तांना अत्यंत प्रिय किंवा भक्त ज्याला अत्यंत प्रिय वाटतात असा. आणखी कसा ? तर ( चित्त—पावनः ) चित्ताला पावन —पुनीत—करणारा असा.

चित्पावन ब्राह्मणही ह्याच लक्षणांनीं युक्त आहेत. ते कसे ? तरः—

**दुसरा अर्थ**—चित्पावन ब्राह्मण कसे असतात ? तर (मान–रहितः) त्यांनाही मान किंवा अपमान ह्यांची कार्य साधावयाचें असतां क्षिति नसते. कोणीं एक थप्पड दिली तर दुसरा गाल पुढें करतील. आणखी कसे ? तर ( स्व–कार्ये–पटुः ) अपमतलब साधण्यांत मोठे पटाईत. आणखी कसे ? तर ( चतुर्दश–जगत्–प्रथित–गोत्रः) ज्यांचीं चौदा गोत्रें म्हणजे आडनांवें जगांत प्रसिद्ध–सर्वतोमुखीं आहेत. आणखी कसे ? तर [ मकरालयांतवासी ] कोंकणांत समुद्रकाठीं राहणारे असे; आणखी कसे ? तर ( प्रिय–भक्तः ) भात ज्यांना मनापासून प्रिय आहे असे.

**यः पुष्पवद्दृग्भृतपांडुबालो बल्यंचितांगो नवनीरदश्रीः ॥**
**हरिः पुराणोऽयमिह श्रुतिश्च भक्तप्रियस्तत्कथिकाप्रियोऽपि ॥९९॥**

**पहिला अर्थ**—परमेश्वर कसा आहे ? तर [ यः–पुष्पवत्–दृक् ] चंद्र सूर्य हेच आहेत नेत्र ज्याचे असा. आणखीं कसा ? तर [ भृतपांडु–बालः ] पंडूचे पुत्र जे पांडव त्यांचें रक्षण करणारा. आणखी कसा ? तर [ बलि–अंचित–अंगः ] बलीनें ज्याची पूजा केली आहे असा; आणखी कसा ? तर [ नव–नीरद–श्रीः ] उत्तम मेघवर्णाप्रमाणें आहे अंगकांति ज्याची असा. आणखी कसा ? तर [ पुराणः ] म्हणजे अनादि असल्याची वेदामध्येंसुद्धां ख्याती आहे असा. आणखीं कसा ? तर ( भक्तः प्रियःतत् ) ज्याला आपले भक्त मनापासून आवडतात आणि तसेच ( कथिका–प्रियः ) अनेक गुणानुवाद ज्याला ऐकावेसे वाटतात असा.

**दुसरा अर्थ**—आतां चित्पावन ब्राह्मणही ह्याच लक्षणांनीं युक्त आहेत. ते कसे ? तर (यः–पुष्पवत्–दृक्) फूल पडल्याप्रमाणें घारे आहेत डोळे ज्यांचे असे; आणखी कसे ? तर ( भृत–पांडुबालाः ) पांढरे म्हणजे भोरे आहेत केंस ज्यांचे असे; आणखी कसे ? तर ( बल्यंचित–अंगः ) अंगावर वळ्या वळ्या पडलेले असे; आणखी कसे ? तर (नवनीरद–श्रीः ) नवीन उगवलेल्या दांताप्रमाणें पांढरी शुभ्र आहे अंगकांती ज्यांची असे. ( गोरे ). आणखी कसे ? तर ( भक्तप्रियःतत्

कथिकाप्रियः ) भात आणि कढी हीं ज्यांना मनापासून आवडतात असे.

हर्येप्रियः सर्वजनाप्रियः स्याद्धरिप्रियः सर्वजनप्रियः स्यात् ॥
इति स्म जाने हयमारमेकं पश्यन् पदार्थं चणकं द्वितीयम्॥१००॥

हरीला म्हणजे भगवंताला जी वस्तु आवडते, ती सर्वांनाच आवडते; आणि हरीला जी वस्तु आवडत नाहीं, ती कोणालाच आवडत नाहीं. ह्याचें प्रत्यंतर पहाणें असल्यास दोन पदार्थ प्रत्यक्षच दृष्टीस पडतात. ते कोणते ? तर एक ' हय-मार ' म्हणजे नेरीचें किंवा रुईचें मूळ, आणि दुसरे हरभरे ! आतां ह्या शब्दांतील श्लेषांत कशी मौज आहे ती पहा. ' हय–मार ' हय म्हणजे घोडा–हरि. त्याचा मार म्हणजे शत्रु–अप्रिय. अर्थात् तें विषारी असल्यामुळें व हरीला ( पक्षीं घोड्याला ) तें अप्रिय असल्यामुळें सर्व जगालाही तें आवडत नाहीं. आणि हरभरे हे हरीला ( पक्षीं घोड्याला ) प्रिय असल्यामुळें सर्व जनांनाही आवडतात. ह्यांत 'हय' म्हणजे घोडा; ह्या शब्दावरून ( हय–मार ) ह्या दोन शब्दांत श्लेष साधला आहे.

सद्वंशजातःसगुणस्तु नम्रो यश्चापि शक्तौ बहुमार्गणेभ्यः ॥
ददाति लक्षं तमहं न मुंचे कोदंडमित्थं कथयन् बिभर्ति ॥ १०१॥

श्रीरामचंद्रांनीं ' कोदंड ' नांवाचें धनुष्य हातांत कां धारण केलें आहे त्याचें कारण सांगतातः—

**पहिला अर्थ**—( सद्वंशजातः ) उत्तम कुलांत जन्मास आलेला; (सगुणः) सद्गुणांनीं युक्त; ( नम्रः ) विनयसंपन्न; ( शक्तौ ) असा असून समर्थ–श्रीमान्–असेल तर ( बहुमार्गणेभ्यः ) हजारों याचकांना ( ददाति लक्षं ) लक्षावधि रुपये दान धर्म करतो. ( तं–अहं–न–मुंचे ) अशा मनुष्याला मी ( राम ) कधींही दूर करीत नाहीं. हें दर्शविण्याकरितांच मी हें कोदंड धारण करतों. ( असें श्रीराम ध्वनित करतात. )

**दुसरा अर्थ**—( सत्–वंश–जातः ) उत्तम बांबूचें तयार केलेलें ( सगुणः ) त्याला उत्कृष्ट [गुण] म्हणजे दोरी लावलेलें (नम्रः) वांकलेलें; ( शक्तौ ) चांगलें भक्कम; ( ददाति–लक्षं ) निशाणावर संधान लावून

( वहु मार्गणेभ्यः ) लक्षावधि बाण सोडणारें असें कोदंड नांवाचें धनुष्य मी कधींही सोडणार नाहीं.

**जलजं जलस्थमपि जलसंबंधविहीनमधिगतामोदम् ॥**
**भ्रमरहितं वस्तु करे कलय इति निदर्शयन्बिभर्त्यब्जम् ॥ १०२ ॥**

आतां विष्णु आपल्या हातांत कमल घेऊन काय सुचवितात तें कवि सांगतातः—

**पहिला अर्थ**—( जलजं ) जलापासूनच उत्पन्न होऊन ( जलस्थम्-अपि ) जलांतच राहून ( जलसंबंधविहीनं ) जलाशीं संसर्ग न ठेवतां ( अधिगत—आमोदम् ) निरंतर सुगंधयुक्तच असतें. आणि ( भ्रमर-हितम् ) भ्रमराचें कल्याण करतें. हें दाखविण्याकरितांच भगवंतांनीं आपल्या हातांत कमल ही वस्तु धारण केली आहे.

**दुसरा अर्थ**—ह्यांत संस्कृताच्या रितीप्रमाणें 'ल' अक्षराच्या ठिकाणीं 'ड' अक्षर धरलें म्हणजे दुसरा अर्थ असा निघतो:—

( जडजं ) जड म्हणजे माया ही ज्याच्यापासून उत्पन्न झाली आहे असें; ( जडस्थम्—अपि ) मायेंतच राहिलेलें असूनही ( जड—संबंध-विहीनम् ) तिच्याशीं ज्याचा कोणत्याही प्रकारचा संबंध नाहीं असें असू-नही ( अधिगत—आमोदम् ) आनंदमय; आणखी कसें ? तर ( भ्रम—रहितं ) ज्याच्यामध्यें भ्रम म्हणजे अज्ञान असें मुळींच नाहीं. सारें सत्त्व-रूपच अशी जी वस्तु म्हणजे परब्रह्म ती ( करे—कलय ) माझ्या हातांत आहे. हें दर्शविण्याकारितांच भगवान् हातामध्यें कमल धारण करीत असतात.

**चरंति रथवत् क्षितौ ननु हरीच्छया ये जना**
**निधाय निखिलं चिरं तदुपरि स्वभारं परम् ॥**
**करेण कलयामि तच्चरणमेतमर्थं जनान्**
**प्रदर्शयितुमच्युतः कलयतीव चक्रं करे ॥ १०३ ॥**

जामिनीवर जसा रथ चालतो, त्याप्रमाणें ( चक्राचा एक बिंदु पुरता लागला न लागला असा ) जे लोक केवळ ईश्वरी इच्छेला अनुसरूनच जगावर वावरत असतात, आणि आपला सारा भार रथाचा सर्व भार

जसा हरीवर म्हणजे घोड्यावर टाकलेला असतो त्याप्रमाणें ते आपला सर्व भार हरीवर म्हणजे परमेश्वरावरच टाकतात, त्या लोकांचे पायसुद्धां मी हातांत धरतों. हें लोकांना समजावें म्हणूनच ज्यांचा निश्चय कधीं ढळावयाचा नाहीं असे अच्युत म्हणजे श्रीकृष्ण ते आपल्या हातांत चक्र धरून दाखवितात. ( चक्र हेंच रथाचें चरण हें सांगावयास नकोच. )

विष्णुपदं बहुतारकमित्युच्चैर्यद्वदंति सर्वजनाः ॥
तदिदं न मृषामन्ये परं त्वपेक्षा स्थिता प्रदोषस्य ॥ १०४ ॥

ह्या श्लोकांत ' विष्णुपदं ' ' बहुतारकं ' आणि ' प्रदोष ' ह्या तीन पदांत श्लेष साधला आहे. त्यामुळें त्याचे दोन अर्थ होतात ते असेः—

पहिला अर्थ—( विष्णुपदे ) म्हणजे आकाशामध्यें ( बहुतारकं ) अनंत नक्षत्रें भरलेलीं आहेत. असें सर्व लोक कंठरवानें सांगत असतात. तें त्यांचें म्हणणें खोटें आहे असेंही म्हणतां येत नाहीं. पण इतकेंच कीं, त्याचा अनुभव ( प्रदोष ) चांगली रात्र ( दोषा ) किंवा गर्द काळोख पडला पाहिजे. तरच त्यांतील तारका दृष्टीस पडतील. नाहींतर कशा दिसणार ? त्याप्रमाणेंचः—

दुसरा अर्थ—( विष्णुपदे ) विष्णूचें म्हणजे भगवंताचे चरण ( बहुतारकं ) पुष्कळ जनांचा उद्धार करणारे आहेत असें सर्व लोक खात्रीनें सांगत असतात. तेंही कांहीं खोटें म्हणतां येत नाहीं. पण ' प्रदोष ' म्हणजे महान् पातक घडलें तरच भगवंताचे चरण त्याचा उद्धार करतील. मनुष्य मुळीं पातकीच नसेल, पुण्यवानच असेल, तर तेथें विष्णूचे चरण तरी काय करतील ? असा भाव.

बहुतारकता विष्णुपदेऽस्त्येव न संशयः ॥
किंत्वंजसा सा बहुलदोषोद्रेके हि दृश्यते ॥ १०५ ॥

' विष्णुपद ' म्हणजे भगवंताचे चरण हा एक अर्थ, आणि आकाश हा दुसरा अर्थ; ' तारकता ' म्हणजे तारण्याचा, उद्धार करण्याचा धर्म हा एक अर्थ, ' आणि नक्षत्रयुक्तपणा, हा दुसरा अर्थ, ' बहुलदोषोद्रेके ' म्हणजे अतिशय पातक झालें असेल तर हा एक अर्थ, आणि

अतिशय रात्र किंवा अंधार पडेल तर हा दुसरा अर्थ. इतके शब्द श्लेषांत्मक आहेत. त्याला अनुसरून:—

**पहिला अर्थ**—भगवंताच्या चरणांमध्यें जनांचा उद्धार करण्याचा गुण आहे तो अतिशयच आहे ह्यांत तर संशयच नाहीं. कारण, पापाचा अतिरेक झाला म्हणजे तो त्याचा गुण स्पष्टपणें दृष्टोत्पत्तीस येतो.

**दुसरा अर्थ**—आकाशामध्यें अनंत तारका अस्तित्वांत आहेत ह्यांतही संशय नाहीं. कारण, अगदीं मध्यरात्र होऊन गर्द काळोख पडला कीं त्या स्पष्टपणें दिसूं लागतात.

> दोषाकरो भवतु विष्णुपदानुगामी
> सद्वृत्ततां स कलयेत्किल पंचदश्या ॥
> पाश्चात्यषोडशकलाक्षयतो विदेह–
> भावं व्रजेदिह निदर्शनमेष चंद्रः ॥ १०६ ॥

**पहिला अर्थ**—( पंचदश्यां ) पंचदशी नांवाचा जो वेदांतपर ग्रंथ आहे, त्यांत सांगितलें आहे कीं, ( दोषाकरो–भवतु ) कितीही पातकी असला आणि ( विष्णु–पद–अनुगामी ) त्यानें जर भगवंताच्या चरणाची भक्ति केली तर तो हीं–( सत्–वृत्ततां–कलयेत् ) सदाचारसंपन्न होतो. आणि ( पश्चात् ) मग त्याच्या षोडश कलांचा म्हणजे दशेंद्रियें, पंचप्राण व मन ह्या सोळा वृत्तींचा लय होऊन तो विदेह स्थितीला पोंचतो. ही गोष्ट त्या चंद्राकडे पाहिलें असतांही खरी अशी वाटते. कसे तें पहा:–

**दुसरा अर्थ**—हा चंद्र कसा आहे? तर (दोषाकरः) दोषा म्हणजे रात्र तिचा कर्ता; आणखी कसा ? तर ( दोषांचा–आकार ) पातकांची खाण. ( त्याला गुरुपत्न्यादिगमनाचीं पातकें घडल्याचें पुराणांतरीं प्रसिद्धच आहे. ) शिवाय तो कलंकयुक्त आहे तरी सुद्धां ( पंचदश्यां ) पौर्णिमेच्या दिवशीं (विष्णु पदानुगामी) आकाशांतून जाऊं लागला म्हणजे तो (किल) खरोखर ( सत्–वृत्तं ) वाटोळा गरगरीत होऊन परिपूर्ण कांतिही त्याला प्राप्त होते. आणि ( पाश्चात्य ) मग पुढें त्याच्या षोडश कलांचा व्हास होऊन तो ( विदेहभावः ) विदेह स्थितीला जातो, म्हणजे (अमावास्येला)

नष्ट होतो. ह्यावरूनच वर सांगितलेला पंचदर्शीतील सिद्धांत खरा असल्याचें सिद्ध होतें.

भवचरणे चेतश्चेत् क्रियेत जायेत तर्हि भवतरणम् ॥
कामरणमकाकारं यर्हि भजेत्तर्हि रे भजेन्मरणम् ॥ १०७ ॥

'भव' म्हणजे शंकर ह्यांच्या चरणीं जर चित्त ठेवलें, तर भव म्हणजे संसार हा तरून जातां येतो. पण तसें न करतां (अकाकारं) दुःखमय किंवा पातकमय अशा (काम रणं) विषयांतच झस्या खात राहिलें तर हे मनुष्या! मरणमात्र प्राप्त होईल! दुसरें कांहीं नाहीं. हें कशावरून म्हणशील तर—(श्लेष) (कामरणं) ह्या शब्दांतील अ, काकारं—'का' कार म्हणजे 'का' हें अक्षर वर्ज्य केलें—काढून टाकलें—तर 'मरण' हाच शब्द शिल्लक राहतो. शब्दांतसुद्धां मरण चुकत नाहीं, तर मग तें प्रत्यक्ष येईल ह्यांत नवल तें काय? तसेंच 'भवचरण' ह्या शब्दांत ('चे') 'च' च्या ठिकाणीं '(तःचेत्)' 'त' घातला तर 'भवतरण' असा शब्द होतो. हेंही उघड आहे.

स्याल्लिंगभंगो बहुवाररामासंगेन कामाभिहतस्य पुंसः ॥
लिंगस्य भंगे हि विदेहभावो भवेदिति स्पष्टतरं ब्रवीमि ॥१०८॥

पहिला अर्थ—(कामाभिहतस्य) निष्काम झालेल्या पुरुषानें (बहुवार–राम–आसंगेन) श्रीरामचंद्राची दृढतर भक्ति केली तर (लिंगभंगः स्यात्) लिंगदेहच नष्ट होऊन जातो. आणि लिंगदेह नष्ट झाला म्हणजे तो विदेह भावाला म्हणजे निर्विकार वृत्तिला पोंचतो, हें मी खात्रीनें सांगून ठेवतों.

दुसरा अर्थ—(कामाभिहतस्य पुंसः) कामासक्त पुरुष किंवा स्त्रीलंपट पुरुष जर (बहुवार–रामा–संगेन) रात्रंदिवस स्त्रीचाच उपभोग घेत बसेल, तर (लिंगभंगःस्यात्) त्याचें इंद्रिय नष्ट होऊन जाईल आणि मग तो विदेह भावाला पोंचेल म्हणजे मरणास पात्र होईल. ही गोष्ट मी अगदीं स्पष्टच सांगून ठेवतों.

सुखस्य लिंगं वदनोज्ज्वलत्वं तत्सर्वदा सौम्य समीहसे चेत् ॥
निःसंगमंगीकुरु शर्वदास्याज्ज्वलत्वमेकं किल निर्व्यलीकम् ॥१०९॥

उजळ तोंड हें एक सुखाचें लक्षण आहे. तर हे भल्या गृहस्था ! तुला जर सदासर्वदा तसेंच ( सुखी ) असावें असें वाटत असेल तर, तूं सर्व-संगपरित्याग करून खरोखर ( शर्व–दास्य–उज्वलत्वम्) निष्कपट भावानें एका श्रीशंकराचें दास्य पतकर म्हणजे तुझें तोंड नेहमीं उजळच राहील. कशावरून तर त्या शब्दांतच पहा ( शर्वदास्य उज्ज्वलत्वम् ) असें आहे त्यांतच (शर्वद–आस्य–उज्ज्वल-त्वम् ) अशीं पदें निघतात. शर्वद म्हणजे कल्याणकारक असें आस्य म्हणजे तोंड, त्याचा उज्ज्वलत्वम् म्हणजे उजळपणा. हा अर्थ स्पष्टच दृष्टीस पडतो.

**तत्र श्रवणं ॥ भो भक्तिमार्गनिरताः श्रवणं कुरुतानिशम् ॥**
**भजनस्य हि संपूर्तिः श्रवणेन विना कुतः ॥ ११० ॥**

श्रवणभक्ति—भक्तिमार्ग निपुण लोकहो ! तुह्मी रात्रंदिवस श्रीहरीचे गुणानुवाद श्रवण करीत जा. [ भजनस्य हि संपूर्तिः श्रवणेन विना कुतः ] श्रवणाशिवाय भक्तीची संपूर्णता होणार कशी ? भक्ति नवविधा म्हणजे नऊ प्रकारची आहे. १ श्रवण, २ कीर्तन, ३ दास्य, ४ वंदन, ५ पाद-सेवन, ६ स्मरण, ७ अर्चन, ८ सख्य, आणि आत्मनिवेदन, ही नव-विधा भक्ति साध्य होईल, तेव्हांच भक्तीची परिपूर्णता होणार हें उघड आहे. मग श्रवणभक्ति केली नाहीं, तर बाकीच्या आठ भक्तींनींच भक्तीची परिपूर्णता होणार नाहीं. हें उघडच आहे.

दुसरा अर्थ—(श्लेष) (भ–जनस्य–हि–संपूर्तिः श्रवणेन विना कुतः) भ–जन म्हणजे नक्षत्रसमुदाय, त्याची परिपूर्णता तरी ‘ श्रवण ’ नक्षत्रा-शिवाय कशी होईल ? एकंदर नक्षत्रें २७ आहेत, त्यांत ‘ श्रवण ’ धरलें नाहीं तर तीं २६ च होतील. अर्थात् श्रवण नक्षत्राची गणना केल्या-शिवाय जशी नक्षत्रांची परिपूर्णता व्हावयाची नाहीं, त्याप्रमाणेंच श्रवण-भक्ती केल्याशिवाय भक्तियोगाचीही परिपूर्णता व्हावयाची नाहीं.

**स्पृह्यते यदि माधवलब्धये भवतु तच्छ्रवणप्रवणो जनः ॥**
**श्रवणधिष्ण्यगतो भगवानिति प्रथयति श्रुतिरेव सनातनी ॥१११॥**

श्रीहरीचा लाभ व्हावा अशी जर इच्छा असेल तर लोकांनीं त्याचे गुणानुवाद श्रवण करण्यांतच परिपूर्णता संपादन केली पाहिजे. कारण

सनातन श्रुतीमध्यें सुद्धां—श्रवणधिष्ण्यगतो भगवान्—श्रवणभक्तीनेंच त्याचें पद प्राप्त होतें असें म्हटलें आहे.

**दुसरा अर्थ किंवा श्लेष**—श्रवणधिष्ण्यगतोभगवान्—श्रवण नक्षत्राची देवताच भगवान् आहे. प्रत्येक नक्षत्राची निरनिराळी देवता असल्याचें पुराणांतरीं वर्णन आहे. त्यांत श्रवण नक्षत्राची देवता भगवान् विष्णु असल्याचें सांगितलें आहे.

**श्रवणानुसरणमेव श्रीरामं स्पृहयतां सतामेकम् ॥**
**श्रवणाभावं रचयन् रामविरहमन्वभूद्दशरथोऽपि ॥ ११२ ॥**

महानुभाव श्रीरामाची इच्छा करणें तर ती एका श्रवणभक्तीच्याच द्वारें केली पाहिजे. कारण [ श्रवण—अभावो ] श्रवण नांवाचा ब्राह्मणाचा मुलगा नष्ट केल्यामुळें अर्थात श्रवणाभावामुळें दशरथाला सुद्धां रामाचा वियोग सहन करावा लागला.

रात्रीच्या वेळीं आपल्या अंध माता—पित्याकरितां त्यांचा पुत्र श्रवण एका सरोवरांत पाणी भरीत असतां त्या शब्दावरून शब्दवेध विद्येंत प्रवीण असलेल्या दशरथराजानें तो मृग असावा अशा भावनेनें त्यावर बाण सोडून त्याचा प्राण घेतला. त्यावरून त्याच्या अंध मातापितरांनीं दशरथाला 'तूं असाच पुत्रशोक होऊन मरण पावशील' असा शाप दिला. ही कथा रामायणामध्यें प्रसिद्धच आहे. त्या कथेवर दृष्टि ठेऊन 'श्रवण' हा श्लेष येथें साधला आहे.

**यो नवीनोपनीतानां विना श्रवणकर्मणा ॥**
**श्रुतिग्रहः सविफलः शिष्टैश्चापि विगर्हितः ॥ ११३ ॥**

**पहिला अर्थ**—नवीन व्रतबंध झालेला असला म्हणजे त्या ब्रह्मचाऱ्यानें श्रावणी केल्याशिवाय वेदाचें ग्रहण केल्यास तें व्यर्थ होतें. आणि शिवाय सभ्यलोक त्याला नांवें ठेवतात.

**दुसरा अर्थ**—हरीच्या गुणश्रवणाखेरीज ( न—वी—इन—उपनीतानां ) गरुडावर आरुढ होणारा जो विष्णु त्याच्या सन्निध कधींच न जाणारे असे जे संसारी लोक ( श्रुतिग्रहः ) त्यांनीं कितीही वेदपठण केलेलें असलें तरी

त्यांचा मोठमोठाले लोकही तिरस्कारच करतील व पठणही व्यर्थ होईल.

**श्रवो मुकुंदस्य सखे दिगंतारूढं तथापि त्वममि श्रवो मे ॥**
**सख्यं तवानेन भवेत्तु मुख्यं गुणेन नाम्ना पयसोरिवेह ॥ ११४ ॥**

नांवानें आणि गुणानें जे कोणी एकरूप असतात, त्यांची मैत्री तेव्हांच जुळते. त्याप्रमाणें हे माझे कर्ण हो ! तुम्हांलाही ' श्रव ' असें म्हणतात व भगवंताच्या कीर्तीला व गुणानुवादांनाही ' श्रव ' असेंच म्हणतात. तेव्हां तुम्हां उभयतांचें नामांत तर सादृश्य आहे. आतां गुणाकडून पाहिलें तर त्यांतही पण साम्यच दिसून येतें. कसें तें पहा. भगवंतांची कीर्ति कशी आहे ? तर ( दिक्–अंत–आरूढं ) दशादिशांच्याही पलीकडे गेलेली अशी. आणि कर्णहो! तुम्हीही तसेच. (दिक्–अंत–आरूढं) आहांत दिक् म्हणजे आकाश हें तुमच्यामध्यें राहतें ! कारण तुम्ही पोकळच आहांत. तुमची देवता ' आकाश. ' कारण तुम्ही शब्द ऐकतां व 'शब्द' हा आकाशाचा गुण आहे. तेव्हां पाण्याच्या आणि दुधाच्या गुणांप्रमाणें पयस्–ह्या नामावरून आणि गुणावरूनही तुम्हां उभयतांचें सख्य होण्यासारखें आहे. 'पयस्' ह्याचा अर्थ ' पाणी ' किंवा ' ' दूध ' ह्यांपैकीं कोणताही होतो. हें प्रसिद्धच आहे.

**धत्से यत्किल कुंडलं वचसि यच्चांगेषु नेत्रांकतो ।**
**यच्चैकांततया खलान्समुदितान्संसेवसे कौरवान् ॥**
**तत्कर्ण प्रतिभासि कर्ण इव मे नाम्ना गुणैः सर्वथा ।**
**तद्राधाप्रियसाधको भव नरस्तोत्रप्रबधांस्त्यज ॥ ११५ ॥**

पुन्हा कर्णाचीच प्रार्थना करतात. हे कर्णा ! तूं कसा आहेस ? तर अंगदेशचा राजा कर्ण जसा होता तसाच तूं आहेस. त्याचे गुण व तुझे गुण सारखेच आहेत. कसें तें ऐक.

**पहिला अर्थ**—तूं कसा आहेस ? ( धत्से—यत्किल—कुंडलं—वपुषि ) आपल्या आंगावर कुंडलें धारण करतोस; आणखीं कसा ? तर ( यत्–च अंगेषु–नेत्रांकताम् )सर्व अवयवांमध्यें श्रेष्ठ जे नयन त्यांच्या अगदीं सन्निध तुझें वास्तव्य. आणखी तूं कसा आहेस ? तर ( यत्–च–एकांततया–ख–लान् ) विशेषें करून अंतर्भागीं आकाश म्हणजे पोकळी आहे असा.

आणखी कसा ? तर (समुदितान्–कौ–रवान्–संसेवते) कौ म्हणजे पृथ्वीवर उत्पन्न झालेल्या शब्दांचें ग्रहण करणारा असा तूंही असल्यामुळें तूंही नांवानें व गुणानेंही खरोखर अंगदेशच्या कर्णासारखाच हुबेहुब आहेस असें मला वाटतें.

आतां अंगदेशाचा राजा कर्ण कसा आहे ? तर तुझ्याचसारखा. कसा तें पहा. ( धत्से–यत्किल–कुंडलं–वपुषि ) उपजतांच ज्याच्या अंगावर कवच व कुंडलें स्वयंसिद्धच आहेत. ( यत्–च–अंगेषु नेत्रांकताम् ) अंगदेशामध्यें सेनापतींचें निशाण धारण करणारा. आणखी कसा ? तर ( यत्–च–एकांततया–खलान्–समुदितान् ) दुष्टांना निरंतर संतोष देणारा; कारण ( कौरवान्–संसेवते ) कौरवांचा आज्ञांकित होऊन राहिलेला ( सेवा करणारा ) असा. अर्थात् तो कर्ण व तूं माझा कर्ण (कान) नांवानें व गुणांनीं तर अगदीं एकरूपच आहांत. आतां त्याच्यांतील दोन गुण तुझ्यामध्यें कमी आहेत. तेवढे तूं संपादन कर म्हणजे तूंही कर्णाच्या बरोबर जोडीला बसशील. ते गुण कोणते ? तर तो कर्ण–त्याची पालनकर्त्री माता जी राधा म्हणजे कोळीण–ती त्याला प्रिय होती म्हणून तो [ राधा–प्रिय–साधकः ] तिला आवडेल तेंच करीत असे असा होता. आणखी कसा ? तर ( नर स्तोत्र प्रबंध ) नर म्हणजे अर्जुन ह्याचें–स्तोत्रप्रबंध–स्तुति तो कधींहीं करीत नसे. त्याप्रमाणें तूंही–राधाप्रिय–जो श्रीकृष्ण त्याचा ‘ साधक ’ म्हणजे भक्त हो, आणि नर म्हणजे प्राकृत लोक ह्यांची स्तुति ऐकण्याचें ‘ त्यज ’ सोडून दे. येवढें केलेंस म्हणजे तूंही त्याच्याच बरोबरीचा होशील.

**या किन्नरोपज्ञमनेकरागा समूर्च्छना या स्वरभावयुक्ता ॥**
**तां गीतिकां कर्ण विहाय दूरं शृणु त्वमेताः (?) पुरुषोत्तमस्य ॥११६॥**

हे कर्णा ! तुझा आणखी एक माझी प्रार्थना आहे. ती ही कीं तूं ही ( या ) जी ( किन्नर–उपज्ञं–अनेक–रागाः ) देवांचे गायक जे किन्नर त्यांनीं शोधून काढिलेली ( अनेक रागा ) भैरव, पूर्वी, देश आदि करून रागात्मक ( स मूर्च्छाना ) एकवीस मूर्छनांनीं युक्त,

( स्वर-भाव-युक्त ) उच्च नीच स्वरांच्या भावानेनें युक्त (तां—गीतिकां) गीतें आहेत तीं लांब झुगारून दे आणि तूं ( त्वं—एताः—पुरुषोत्तमस्य ) श्रीकृष्ण भगवंताची जी श्रीमद्भगवद्गीता आहे. ती ( शृणु ) श्रवण कर. आतां ही भगद्गीता कशी आहे ? तर तीही त्याच गुणांनीं युक्त असून तिचा प्रभाव कसा आहे तेंही ऐक. ही त्या गीतांसारखी नाहीं. तर कशी आहे ?

**गीतापर दुसरा अर्थ**—( किन्नर—उपज्ञं—अनेक—रागा ) इतर गायनांतील चिजा कशा आहेत ? तर हलक्या लोकांनीं रचलेल्या आणि भगद्गीताही साक्षात् ( पुरुषोत्तमस्य ) पुरुषोत्तमानें रचलेली आहे. या गीती अनेक रागांनीं युक्त आहेत. अर्थात मायामय आहेत. आणि ही भवद्गीता विरागानें म्हणजे वैराग्यानें युक्त अशी आहे. त्या गीतिका ( मूर्च्छना ) मोह घालणाऱ्या आहेत. आणि ही गीता मोह नष्ट करणारी आहे. म्हणूनच ' नष्टो मोहः स्मृतिर्लब्ध्वा ' असें अर्जुन म्हणाला, त्या गीतिका ( स्वरभाव—युक्ता ) तालसुरांत बसविलेल्या आहेत; ( स्वः-अभाव—युक्ता ) स्वर्गाच्या अभावानें युक्त अर्थात् स्वर्गप्राप्तिकर नाहींत. आणि भगवद्गीता कशी आहे ? तर ( स्वर्भाव-युक्ता ) ' स्वर्ग प्राप्त करून देणारी आहे. इतकेंच नव्हे तर आत्मज्ञान देणारी आहे. ह्याकरितां कर्णा! तुंही तीं शृंगारादि रागात्मक गीतें सोडून देऊन श्रीमद्भगवद्गीताच श्रवण करीत जा.

**युक्तं विरक्तः खलु विश्वदेवश्रितोत्तरागर्भभवः परीक्षित् ॥**
**ददर्श विष्णोःश्रवणं तदादौ प्रत्यग्दृशिस्थो भजनस्य मध्ये ॥११७॥**

**पहिला अर्थ**—( विश्वदेवः—श्रित— ) विश्वाचा देव जो श्रीहरि त्याच्या कृपेनें ( उत्तरा—गर्भसंभवः ) उत्तरेच्या गर्भांत वाढलेला जो ( परीक्षित् ) परीक्षिती राजा ( विरामः—खलु ) तो खराखुरा विरक्त झाला, हें ( युक्तः ) ठीकच आहे. कारण, ( तत्—आदौ ) त्याला आधींच—गर्भांमध्यें ( प्रत्यक्—दृक्— ) परमार्थ ज्ञान ( ददर्श ) झालें होतें. तें काय तर ( भजनस्य मध्यः ) भजनामध्यें—भक्तीमध्यें—( विष्णोः श्रवणं )

विष्णूचें गुणानुवाद श्रवण करणें हेंच खरें मोक्षप्रद आहे. तेव्हां तो विरक्त झाला ह्यांत आश्चर्य तें काय ?

दुसरा अर्थ—आतां एखादा चाणाक्ष व लक्ष्यपूर्वक पाहणारा मनुष्य जर (विश्वेदेवश्रितः) विश्वदेवाची आश्रय केलेली जी उत्तराषाढा—प्रत्येक नक्षत्राची एक एक देवता आहे; त्यांत उत्तराषाढा नक्षत्राची देवता विश्व-देव आहे. तेव्हां—तिच्या त्या नक्षत्रपुंजांत ( प्रत्यक्—दृक्— ) बसून समोर पश्चिमेकडे तोंड करून पाहूं लागेल तर त्याला ( भ—जनस्य—मध्ये ) सर्व नक्षत्रांमध्यें ( तदादौ ) प्रथम दर्शनीं—समोरच— ( विष्णोः श्रवणं) विष्णु-देवता ज्याची आहे असें श्रवण नक्षत्रच ( ददर्श ) दृष्टीस पडेल.

अथ कीर्तनं ॥ स्त्रीचिंतापि मनोभवं वितनुते तत्सन्निधिःकिंपुन-
स्तस्मिन् सत्यपि नित्यदा नुजप ( भज ) ति श्रीरामरामेति यः ॥
साधोस्तस्य महेश्वरस्य न पुरः स्थातुं समर्थः स्मरो ।
नूनं दर्शयितुं जनानिति भवोऽभूदर्धनारीनटः ॥ ११८ ॥

कीर्तन—स्त्रीचें नुसतें चिंतन केलें तरी सुद्धां मदनाचा प्रादुर्भाव होतो. मग तिला जवळ घेतल्यावर त्याचा प्रभाव काय सांगावा ? ही गोष्ट जरी खरी आहे, तरीसुद्धां महान् साधु जे शंकर ते रात्रंदिवस 'हे रामा! हे रामा,' असा रामनामाचा जप करीत असल्यामुळें [ येथें राम म्हणजे श्रीरामचंद्र व रामा म्हणजे स्त्री हा श्लेष ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. ] त्यांच्यापुढें मदनाची उभें राहण्याचीसुद्धां छाती नाहीं. हें लोकांना स्पष्ट दाखवून द्यावें म्हणून शंकरांनीं स्वतःच अर्धनारी नटेश्वराचें रूप धारण केलें आहे.

सत्त्वप्रधानानि जगाद यास्को नामानि गीतासु तु वासुदेवः ॥
सत्वं सुखे संजयतीत्यवोचन्नामैव तस्मान्महते सुखाय ॥ ११९ ॥

निरुक्त करणाऱ्या यास्काचार्यांनीं ' सत्वप्रधानानि नामानिं' असें म्हटलें आहे; म्हणजे ' नाम ' हें पदार्थमात्राचें नांव ! परंतु येथें 'सत्त्व' शब्दावर श्लेष साधून पंतांनीं ह्याचा अर्थ ' नाम ' अर्थात् परमेश्वराचें नामस्मरण हें सत्त्वगुणप्रधान आहे. ( सात्त्विक वृत्तीचें परिपोषक आहे. ) असा अर्थ आहे. आणि भगवंतांनीं गीतेंत म्हटलें आहे कीं 'सत्त्व गुणाच्या योगें

करूनच सुख उत्पन्न होतें. ' ह्यावरून नाम हेंच काय तें सर्व सुखाचें आदिस्थान असल्याचें आढळून येतें.

**भो मानवा नाम वदध्वमुच्चैस्ततो भवेज्ज्ञानमतीव शुद्धम् ॥**
**सुप्रत्ययोऽस्मादविशेषतः स्यादिति प्रतिज्ञां कुरुते ह्यनंतः ॥१२०॥**

अहो लोकहो ! ह्या देवाच्या नांवाची मोठमोठ्यानें गर्जना करा म्हणजे तुमचें ज्ञान अत्यंत पवित्र होईल. आणि त्याचा ( सु–प्रत्ययः– ) प्रत्यक्ष अनुभव ( अस्मात्–अविशेषतः ) सर्वांना सारखाच येईल. केवळ ब्राह्मणांनाच येईल असें नाहीं, तर स्त्रीशूद्रादिकांना सुद्धां येईल. असें भगवद्गीतेमध्यें भगवंतांनींच प्रतिज्ञेनें सांगितलें आहे. तेव्हां त्यांत संशय तो कसला ?

**दुसरा अर्थ**—( सु–प्रत्ययः–अस्मात्–अविशेषतः ) ' सुप् ' हा प्रत्यय संस्कृतांतील कोणत्याही नामाला सारखाच लागतो. असा त्रिकालाबाधित नियम, ' अनंतः ' अनंत म्हणजे शेष, त्याचे अवतार जे पतंजलि ऋषि त्यांनींच आपल्या सूत्रांत करून ठेवला आहे. ( ' सु ' म्हणजे चांगलें. तें कोठेंही गेलें तरी चांगलेंच. त्यांत केव्हांच फरक होत नाहीं.)

**मंथानं स्वधिय विधायं भगवानाम्नायरत्नाकरं ।**
**निर्मथ्यासकृदुज्जहार गिरिशो रामेति रत्नोत्तमम् ॥**
**तद्यस्याधिगलं विराजति महाभागाय दिव्यात्मने ।**
**तस्मै धन्यतमाय न स्पृहयतां किं मुक्तिपण्यांगना ॥ १२१ ॥**

भगवान् श्रीशंकरांनीं आपल्या बुद्धीची रवी करून वेदरूप समुद्र मंथन केला आणि त्यांतून रामनाम हें अमूल्य रत्न वर काढून तें आपल्या कंठांत धारण केलें. तें दिव्यरत्न ज्या महात्म्याच्या कंठांत चमकत राहील त्याला पाहून मुक्तिरूप वारांगनेला मोह पडणार नाहीं काय ? अवश्य पडेल असा भाव. ' धन्यतमाय ' ह्यांत श्लेष साधला आहे. अत्यंत वर्णनीय हा एक अर्थ आणि अत्यंत श्रीमान् हा दुसरा अर्थ.

**श्रीरामनाम्नः कथनेन मर्त्यो दुष्टोऽपि भिन्नात्मकयां विहाय ॥**
**ऐक्यं समेतीति वितर्कयेऽहं यन्ना कुजन्माऽजनि नाकुजन्मा॥१२**

रामनामाच्या उच्चारानें दुष्ट मनुष्य असला तरी सुद्धां तो द्वैतभाव सोडून अद्वैत स्वरूपाला पोंचतो. असा माझा तर्क आहे. कारण ( ना-कु-जन्मा ) नीच जातींत जन्मास आलेला पुरुष जो वाल्ह्या कोळी-तो सुद्धां रामनाम घेतल्याबरोबर ( नाकुजन्मा ) नाकु म्हणजे वारूळ त्यापासून जन्मलेला जो 'वाल्मिक' तो ऋषि झाला. ही गोष्ट प्रसिद्धच आहे. ह्यांत ' ना-कुजन्मा ' असे दोन शब्द होते ते जाऊन ' नाकुजन्मा ' असा त्याचा एकच शब्द झाला. त्याप्रमाणेंच रामनामानेंही द्वैतभाव जाऊन सर्व अद्वैत स्वरूपच दिसूं लागतें.

वहिष्कृतः स विज्ञेयो यो हि गोत्रपराङ्मुखः ॥
धर्मोऽप्यस्य न संसिध्येत्कैवल्यं तु कुतस्तराम् ॥ १२३ ॥

ह्या श्लोकात ' गोत्र ' म्हणजे जात आणि गोत्र म्हणजे नाम येवढाच काय तो श्लेष आहे.

पहिला अर्थ—जो गोत्रपराङ्मुख झाला म्हणजे रामनाम घ्यावयाचें ज्यानें सोडलें, तो बहिष्कृतच झाला असें समजावें. त्याचा धर्म सुद्धां सिद्धीस जात नाहीं, मग मोक्षाची गोष्ट कशाला ?

दुसरा अर्थ—जातच ज्याची सुटली, तो जातीबहिष्कृत झाला असेंच समजतात. त्याचीं धर्मकृत्यें सुद्धां यथासांग होत नाहींत, मग मोक्षाचें नांव कशाला ? अर्थात् परमेश्वराचें नांव घेतलें नाही, तर इहलोक व परलोक ह्या दोहोंसही मुकावें लागतें.

बहुदोषभवोपतापशांतिं तनुतेऽतविकृतिं परामकुर्वत् ॥
कलयेऽहमये जगत्त्रयेऽस्मिन्परमं नामरसायनं तदेकम् ॥ १२४ ॥

अहो ! मला वाटतें संसारजन्य अनेक पातकांपासून होणाऱ्या तापाला शांत करणारें व हृदयाचा वांकडेपणा नष्ट करणारें असें हें नामरूप रसायन त्रिभुवनामध्यें एकच आहे.

श्लेष-अथवा दुसरा अर्थ-( नाम-रसायनं=न-आम-रसायनम्-एकम् )त्रिभुवनामध्यें रोगावरचें औषध कांहीं एकच आहे असें नाहीं. तीं अनेक आहेत. परंतु त्यांच्यापासून अनेक दोषांपासून उत्पन्न झालेला रोग

बरा होईल किंवा नाहीं हा तर संशयच आणि शिवाय (पराम्—अंतर्विकृतिं—अकुर्वंत) आंत दुसरा रोग मात्र खास उत्पन्न व्हावयाचा! तेव्हां नामरसायनासारखें औषध त्रैलोक्यांत दुसरें कोणतें बरें आहे?

यो घातुकोऽप्यघोऽपि स्यात्कृष्णकंठो यदृच्छया ॥
निर्भिद्य मूर्धसीमानं स तत्सायुज्यमाप्नुयात् ॥१२५॥

**पहिला अर्थ**—(यः) एखादा मनुष्य (घातुकः अपि—अघः—अपि) दुष्ट असून पातकी असूनही (यदृच्छया) सहजासहजीं (कृष्ण-कंठ—स्यात्) त्याच्या मुखाला कृष्णाचें नांव आलें तरी सुद्धां (मूर्धसीमानं) मस्तकांतील ब्रह्मरंध्र (निर्भिद्य) भेद करून (सः) तो (तत्—सायुज्यं-आप्नुयात्) त्या सायुज्यमुक्तीला पोंचतो.

**दुसरा अर्थ**—(अघोपि) कृष्णावतारांत अघासुर नांवाचा दुष्ट राक्षस होता. तो कृष्णासहवर्तमान सर्व गोपाळांचा नाश करण्याकरितां सिद्ध झाला होता. तथापि (यदृच्छया) सहजासहजीं श्रीकृष्ण त्याच्या घशामध्यें शिरले. तेव्हां त्याच्या मस्तकांतील टाळूचा भेद होऊन तोही सायुज्यमुक्तीला गेला.

अंग श्रीराममातः स्रवदमृतरसो नामनामा स्तनोऽयम् ।
हृद्यस्तेऽस्यानवद्यः क्रम इह परमं विस्मयं नस्तनोति ॥
बालानेवाद्विजान् यो जनयति न सुखं केवलं सेवमानान् ।
यत्प्रौढान्सद्विजानप्यतितरलयते सद्रसेनातितृप्तान् ॥ १२६ ॥

हे श्रीरामरूप जननी! तुझ्या ह्या नामरूपस्तनांतून एकसारखा अमृतरस पाझरत आहे. त्याचें हें हृदयंगम व निर्दोष सामर्थ्य पाहून आम्ही तर आश्चर्यचकित झालों आहोंत. कां म्हणाल तर, तो सेवन केला असतां केवळ मुलांना, अज्ञ जनांना, (अद्विज) हीन जातींनांच आनंद होतो असें नाहीं, तर प्रगल्भ, बुद्धिवंत, व विद्वान् अशा ब्राह्मणांनासुद्धां तो मधुर रस प्राशन करून अगदीं किती पिऊं आणि किती न पिऊं असें होऊन जातें. आणि त्यामुळें त्यांना जें समाधान होतें तें तर कांहीं अप्रतिमच असतें.

श्रीरामनाममाधुर्यस्वादसंभृतचेतसाम् ॥
मृद्वीकारसरूपं तु भाति तुच्छतमं भुवि ॥ १२७ ॥

श्रीरामनामाच्या मधुर रुचीनें ज्यांचें अंतःकरण भरून जातें, त्यांना ( मृद्वीका–रस–रूपं–तु ) द्राक्षांचा रस जगामध्यें केवळ तुच्छ वाटतो. श्लेष–तो किती ? तर [मृत्–विकार–सरूपं–तु ]–केवळ मातीसारखा !

श्रीरामनाममाधुर्यस्वादसंभृतचेतसः ॥
शर्करां वा सुधां वापि परार्थत्वेन मन्वते ॥ १२८ ॥

श्रीरामनामाच्या मधुर स्वादानें ज्याचें चित्त तन्मय होऊन गेलेले असतें, त्याला [शर्करा] साखर आणि [सुधा] अमृत हीं सरळ अर्थाप्रमाणें लागत नाहींत. तर [परार्थऽत्वेन–मन्वते] उलट अर्थानें जाणवतात. श्लेष–शर्करा ह्याचा दुसरा अर्थ गोटे किंवा दगड; व ' सुधा ' ह्याचा दुसरा अर्थ चुना असा आहे. अर्थात् शर्कराही दगडासारखी किंवा वाळूसारखी च सुधा म्हणजे अमृत हें चुन्यासारखें लागतें.

मन्ये वेदरसालजं फलमिदं रामेति नामेशितु-
र्व्यूढं गूढरसं तु तत्प्रथमतस्तत्रानुतापे सति ॥
रागोऽस्मिञ्छनकैरुदेत्यथ महामोदोद्गमानुद्गिर-
श्चोक्षे चोषितमात्र एव सहसा स्रोतत्यतः सद्रसः ॥ १२९ ॥

परमात्मा श्रीरामचंद्र ह्याचें नाम हें एक वेदरूप आम्रतरूचें फलच आहे. हें फार मोठें आहे. परंतु त्याचा रस मात्र लागलाच हाताला येण्यासारखा नाहीं. कारण तो फार खोल आहे. ह्याकरितां आंब्याला जशी प्रथम अढी घालतात, त्याप्रमाणें त्याला अनुतापरूपी ऊब प्रथम मिळाली म्हणजे त्यावर हळूहळू–(राग) तांबड्या रंगाची छटा–पक्षीं त्याविषयींची आवड उत्पन्न होऊं लागून त्यांतून ( महा–आमोद–उद्गमानुद्गिरन्–चोक्षे ) पक्क झाल्यावर सुवासाचा घमघमाट सुटूं लागतो. पक्षीं [–महा–मोदः–] अत्यंत आनंद वाटूं लागतो. आणि चोखूं लागलें असतां त्यांतून चांगला केवळ अमृतासारखा रसच रस गळूं लागतो. पक्षीं:—सद्रस म्हणजे ब्रह्मरस गळूं लागतो.

न द्विषंति ग्रहाश्चंद्रमेष दोषाकरोऽपि सन् ॥
माहात्म्यमेतच्छ्रीरामनामसंसर्गसंभवम् ॥ १३० ॥

चंद्र हा ( दोषा–कर ) रात्र उत्पन्न करणारा आहे. पक्षीं–दोषाचा आकर म्हणजे ठेवा आहे. कारण तो कलंकयुक्त आहे. गुरुपत्नी गमन वगैरे अनेक दोष त्याच्या हातून घडलेले आहेत. तथापि ह्या चंद्राचा कोणताही ग्रह द्वेष म्हणून करीत नाहीं. चंद्राशीं कोणत्याच ग्रहाचें शत्रुत्व नाहीं, असें ज्योतिषशास्त्रांत मानतात. ह्याचें कारण काय ? तर तें श्रीरामाच्या सान्निध्याचें माहात्म्य होय. कारण ' श्रीराम ' ह्या नांवापुढें ' चंद्र ' असें लावतात. त्यामुळें श्रीरामाच्या नांवाचा चंद्रालाही संसर्ग घडता. हें नाममाहात्म्याचें केवढें बरें फळ ?

चंद्रो वै परदारधर्षणरतो नक्षत्रमार्गस्थितो ।
नित्यं क्षीणतनुः कलंककलुषो दोषाकरोंऽतर्जडः ॥
ईदृक् सन्नपि यच्च राजपदवीमारूढवान्सांप्रतम् ।
सोऽयं रामपदप्रसंगमहिमा लोके समुज्जृंभते ॥ १३१ ॥

चंद्राचे दोष किती म्हणून सांगावेत ? हा सदाचरणीही नव्हे, पराक्रमीही नव्हे, कीर्तिमान् म्हणावा तर तसाही नाहीं, पुण्यवान्‌ही नाहीं, बुद्धिवान्‌ही नाहीं. कसा तें पहा. तो बलात्कारानें परस्त्रीशीं तर रममाण झालाच; शिवाय [ नक्षत्रमार्गस्थितः ] नक्षत्रांच्या मार्गामध्यें राहणारा पक्षीं–[न–क्षत्रमार्गे–स्थितः]–क्षात्र मार्गानें जाणारा नव्हे. (अर्थात् शूरही नव्हे ) क्षत्रियांच्या गुणांस अनुसरणारा नव्हे असा. आणखी कसा ? तर ( नित्यं–क्षीणतनुः ) देहाला नेहमीं क्षय लागलेला ( कृष्णपक्षांत कला कमी होतात म्हणून ) [ कलंक कलुषः ] कलंकानें दूषित झालेला. आणखी कसा ? तर ( दोषा–करः ) रात्र उत्पन्न करणारा–पक्षीं–दोषांचा आकर म्हणजे ठेवा. महान् पातकी; आणखीं कसा ? तर ( अंतर्जडः ) अंतर्भागीं जड म्हणजे मंद, ज्याला प्रकाश नाहीं असा; निस्तेज. पक्षीं– ' ड ' च्या ठिकाणीं ' ल ' करून ( अंतर्जलः ) ज्याच्या अंगांत पाणी भरलेलें आहे असा. ( आपल्या ज्योतिष ग्रंथांत चंद्र जलमय म्हणून प्रसिद्धच आहे. ) म्हणजे स्थूल–असें आहे तरी सुद्धां तो आजकाल राजाच्या पदवीला पोंचतो. अन्नधान्याचा राजा कोण ? तर चंद्र. असें पंचांगांत

फल वर्तवितात. हें येवढें माहात्म्य त्याला कशानें प्राप्त झालें? तर श्रीरामचंद्राच्या पदाच्या—चरणाच्या—पक्षीं—शब्दाच्या अनुषंगानें राहिल्यामुळें या जगांत त्याचें माहात्म्य येवढें पसरलें आहे.

**जातः सन् कुटिलत्वमेव भजते संसेवते वारुणीं ।**
**शुभ्रांघ्रिर्गुरुदारधर्षणकरो ब्रह्मघ्नसंसर्गभाक् ॥**
**ईदृक् सन्नपि यद्द्विजेंद्रपदवीमारूढवान्सांप्रतं ।**
**सोऽयं रामपदप्रसंगमहिमा लोके समुज्जृंभते ॥ १३२ ॥**

आणखी ह्या चंद्राचे दुर्गुण किती म्हणून सांगावेत? ( **जातः—सन्—कुटिलत्वम्—एव—भजते** ) हा जन्मापासून वांकडा; चंद्रांची कोर वांकडी असते हें प्रसिद्धच आहे. ह्याचा देह तर वांकडा आहेच आहे; पक्षीं कुटिल—म्हणजे कपटी. येवढ्यानें तरी भागलें, तर तेंही नाहीं. [**संसेवते—वारुणीं** ] ( दिसूं लागल्याबरोबर—अर्थात् शुक्लपक्षांत ) पश्चिमेकडे वास-करणारा—पक्षीं—मद्यप्राशन करणारा. [ **शुभ्र—आंघ्रि** ] शुभ्र किरणांचा; पक्षीं ' अंघ्रि ' म्हणजे पाय; अर्थात् पांढऱ्या पायाचा; आणखी कसा? तर [ **गुरु—दार—धर्षणकरः** ] गुरुपत्नीशीं रममाण होणारा. (' रोहिणी 'नांवाचें नक्षत्र ही मूळची गुरूची बायको होती, परंतु चंद्रानें बलात्कारानें ती बळकाविली अशी कथा पुराणांतून प्रसिद्धच आहे. ) आणखी कसा! तर [ **ब्रह्मघ्न संसर्गभाक्** ] ब्रह्महत्त्या करणारा जो शंकर, त्याच्याशीं परिचय ठेवणारा. ( चंद्र हा नेहेमीं शंकराच्या मस्तकावर असल्याचें प्रसिद्धच आहे. ब्रह्मदेवाला प्रथमतः पांच तोंडें होतीं. त्यांतील एक तोंड शंकरानीं छेदन केलं असें पुराणांतरीं वर्णन आहे. म्हणून तो ब्रह्मघ्न होय.) इतका चंद्र दुर्गुणी असतांही आजकाल त्याला ' द्विजेंद्र ' म्हणजे ब्राह्मण-श्रेष्ठ असें म्हणतात. हें कशाचें माहात्म्य ? तर श्रीरामचंद्र ह्या पदाशीं त्याचें सान्निध्य असल्याचा हा प्रभावच जगामध्यें असल्याचें दिसून येतें.

**जातः सन्कुटिलत्वमेव भजते संसेवते वारुणीं ।**
**शुभ्रांघ्रिर्गुरुदारधर्षणकरो ब्रह्मघ्नसंसर्गभाक् ॥**
**युक्तं तत्क्षयजर्जरो हिमवपुर्यत्त्वेष जैवातृकः ।**
**सोऽयं रामपदप्रसंगमहिमा लोके समुज्जृंभते ॥ १३३ ॥**

अशा प्रकारें चंद्र हा वांकडा आहे; पक्षीं कपटी आहे; पश्चिमेस राहणारा, पक्षीं मद्य सेवन करणारा असा आहे. शुभ्र किरणांचा—पक्षीं पांढऱ्या पायांचा आहे, गुरुपत्नीवर बलात्कार करणारा असून ब्रह्महत्त्या करणाराशीं परिचय ठेवणारा आहे. तेव्हां तो सदासर्वदा क्षय रोगानें जर्जर असतो हें यथायोग्यच आहे. आणखी कसा? तर ( हिमवपुः ) अंगांत मुळीच उबारा नाहीं, केवळ थंडगार पडलेला. क्षय होऊन त्याचे हातपाय गार झाले आहेत; अर्थात्—आसन्नमरण—झालेला. असें असतां तो ( जैवातृकः ) दीर्घायुषी झाला कसा म्हणजे अनेक वर्षें अद्याप अस्तित्वांत राहिला कसा? तर त्याचें कारण येवढेंच कीं, श्रीरामाच्या पदाचें—पक्षीं शब्दाचें सान्निध्य घडलें म्हणूनच जगांत त्याचें महात्म्य वाढलेलें आहे.

विश्वस्यास्य पृथक् पृथग्ग्रह इह स्यान्निग्रहानुग्रहे-
ष्वकैकोऽपि समग्रकर्माणि पुनः सर्वानुकूल्ये सति ॥
प्रायेणैव (घ) महाजनः स्पृहयते चंद्रानुकूल्याय यत् ।
सोऽयं रामपद्प्रसंगमहिमा लोके समुज्जृंभते ॥ १३४ ॥

ह्या जगाचें शुभ किंवा अशुभ करणारे निरनिराळे ग्रह आहेत. आणि त्यांतील प्रत्येकाच्या अंगीं निग्रहानुग्रह करण्याचें सर्व सामर्थ्य आहे. पण सर्वही ग्रह सर्वतोपरी अनुकूल असले तरी, शहाणे लोक चंद्राची अनुकूलता आहे किंवा नाहीं हें पहातातच. येवढा चंद्राला मान देण्याचें कारण काय, तर श्रीरामचंद्राच्या चरणाच्या सहवासाचें फल असल्याचें जगांत प्रसिद्धच आहे.

चंद्रोऽयं क्षयजर्जरः किल तथाप्यादित्यभौमादयः ।
प्राणिभ्यः सदसत्फलं स्वगतिभिर्दातुं समर्थाग्रहाः ॥
सर्वाधारतया श्रयंति यदमी नूनं तदीयं बलं ।
सोऽयं रामपद्प्रसंगमहिमा लोके समुज्जृंभते ॥ १३५ ॥

चंद्र हा पाहूं गेलें तर नेहमीं क्षय लागून झिजत चाललेलाच दृष्टीस पडतो. आणि रवि, मंगल आदि करून इतर ग्रह प्राणिमात्रांना आपआपल्या गतीप्रमाणें शुभ किंवा अशुभ देण्याला एक एकटा सुद्धां समर्थ

आहे. तथापि त्या सर्वांच्या बळाला चंद्राचें बळ हें आधारभूत आहे. ऐवढें चंद्राचें माहात्म्य कां ? तर श्रीरामचरणाचा–पक्षीं शब्दाचा त्यानें आश्रय केला आहे म्हणून. श्रीराम ह्या शब्दापुढें ' चंद्र ' लावूं लागले म्हणूनच त्याची योग्यता वाढली.

द्राक्षादीनि फलानि संति मधुराण्येवोति नैवान्यथा ।
किंत्वेको भृशमाम्र एव भवति प्रेयान्नृणां सर्वतः ॥
आत्तस्य त्वमुना कथंचिदपि यद्रामेति सर्वात्मनो ।
नाम्नो वर्णचतुष्टयस्य महिमा सोऽयं समुज्जृंभते ॥ १३६ ॥

द्राक्षें आदिकरून फळें जगांत ' मधुर ' आहेत हेंही कांहीं खोटें नाहीं. पण, एकटा ' आम्र ' च लोकांस इतका प्रिय कां आहे ? ह्याचें कारण काय ? तर रामनामाचा आश्रय. द्राक्षानें ' राम ' शब्दांतील केवळ ' रा ' हें एकच अक्षर स्वीकारलें तों त्याच्या आंगीं मधुरता आली. ' राम ' हीं अक्षरें उलट केलीं तर ' मधुर ' ह्या शब्दामध्येंही रकार एक व मकार एक अशीं दोन अक्षरें येतातच. ' आम्र ' ह्या शब्दांतही तसेंच. आम्र हा बोलूनचालून जड. त्याला रामनाम हीं अक्षरें येणार कशीं ? म्हणून त्यानें आ–म्–र् अशीं राम शब्दांतील स्वर व व्यंजनें एकत्र करून तीं वेडींवांकडीं धारण केलीं आहेत. म्हणून तो सर्वांना प्राणापेक्षांही प्रिय वाटतो. असा ह्या ' श्रीराम ' ह्यांतील र्–आ–म्–ह्या शब्दांतील चार अक्षरांचा महिमा आहे. वाल्मीक ऋषींनींसुद्धां प्रथम राम म्हणावयास येईना म्हणून 'मरा, मरा' अक्षरांचाच जप केल्यामुळें त्यांचा उद्धार झाला. त्याप्रमाणेंच आम्र ह्या शब्दांतही त्यानें त्यांतील उलटसुलट वर्ण धारण केले तर त्याची तरी जगामध्यें बोलबलाय कां न व्हावी ? आत्तस्य... समुज्जृंभते=' राम ' ह्यांतील [ र्+आ+म्+अ ] हे चार वर्ण आपल्या अंगीं ' आम्र ' [ आ+म्+र्+अ ] सर्व च्या सर्व [ सर्वात्मना ] घेतल्यानेंच त्या आंब्याच्या अंगीं एवढी गोडी आली. [ ' सर्वात्मना ' ' आत्तस्य ' ] ह्यांत ' मनापासून नामग्रहण केल्यानें त्याला गोडी आली आहे' असा श्लेष सुचविला आहे. आत्त=घेतलेलें. कथंचित्=' कसें बसें. ' कारण ' राम ' हीं अक्षरें जशींच्या तशींच आम्रांला घेतां आलीं नाहींत.

चापः पुष्पमयो, मधुव्रतमयी मौर्वी, मिता मार्गणाः ।
हीनांगः स्वयमप्यसौ जयति यन्मारो जगत्सर्वशः ॥
आत्तस्य त्वमुना कथंचिदपि यद्रामेति सर्वात्मनो ।
नाम्नो वर्णचतुष्टयस्य महिमा सोऽयं समुज्जृंभते ॥ १३७ ॥

[ मदनाचें ] धनुष्य पहावयास गेलें तर फुलाचें; आणि त्याला मौर्वी म्हणजे दोरी कशाची ? तर भृंगांची. बाण तर केवळ मोजके पाचच. बरें स्वतः तरी धष्टपुष्ट म्हणावा, तर ज्याला मुळीं देहच नाहीं. असें असतांही [मार] मदन हा जगाचा पराभव करून सोडतो. तो कशाच्या जोरावर? तर राम ह्या नामांतील 'र्–आ–म्–अ' हे चार वर्ण त्याच्यांत आहेत म्हणून. त्यांचाच हा प्रभाव असल्याचें सर्व जगाला दिसून येतें.

अत्यंतं चपला रमा प्रकृतितोऽन्यद्या जलध्यात्मभू-
रेवं सत्यपि यद्धरेर्भगवतो द्वेधापि हृद्याऽभवत् ॥
आत्तस्य त्वमुया कथंचिदपि यद्रामेति सर्वात्मनो ॥
नाम्नो वर्णचतुष्टयस्य महिमा सोऽयं समुज्जृंभते ॥ १३८ ॥

[ रमा ] म्हणजे लक्ष्मी. ही स्वभावानें अत्यंत चपल. इतकेंच नव्हे तर [ जलधि ] म्हणजे समुद्राची कन्या. [ श्लेष ] [ जलधि ] ह्यांत [ल] च्या ठिकाणीं [ ड ] घेतला म्हणजे [ जडधि ] ची मंदबुद्धीची–मूर्खाची कन्या. असें असूनही भगवान् श्री विष्णूला ती दोहोंप्रकारांनीं म्हणजे अंतर्बाह्यही [ हृद्य ] म्हणजे प्रिय झाली आहे. [ हृद्य ] ह्या शब्दांत श्लेष आहे. त्याचा एक अर्थ, तिला त्यांनीं हृदयावर म्हणजे वक्षःस्थळावर स्थान दिलें, व दुसरा अर्थ ती हृदयांत म्हणजे अंतःकरणांतही ठेवली. ह्याचें कारण येवढेंच कीं, [ राम ] हीं अक्षरें कोणी कशींही सेवन करो. तीं उलटीं असोत कीं सुलटीं असोत; रामनामाचें माहात्म्यच असें आहे कीं, त्यांतील वर्ण कोणी कसेही धारण करो, तीं चार अक्षरें सर्व जगामध्यें भरभराटीलाच कारणीभूत होतात. [ रमा ] हीं अक्षरें [ राम ] हा शब्द उलट फिरविल्यानेंच होतात ही गोष्ट लक्षांत येईलच. रमा=र+अ+म्+आ राम=र्+आ+म्+अ. म्हणजे रमा ह्या शब्दांत [ राम ] ह्यांतील

[ अ ] आणि [ आ ] ह्यांची अदलाबदल झाली आहे येवढेंच, बाकी अक्षरें तींच.

पापा ये तु निरक्षराः परदृढासक्त्यैव रामेत्यदः ।
संसर्गाद्दधति स्थितिं सुनियतं लेखेषु सर्वोपरि ॥
रेफात्मन्युत नापवर्गभवने वर्णे जघन्ये फलम् ।
यस्मात्दृश्यत एतदत्र निखिलं रामेति संसर्गजम् ॥ १३९ ॥

फारतर काय? पण पातकी असो; अक्षर शत्रु असो; तरी भक्तीच्या [किंवा परब्रह्माच्या] दृढ आसक्तीनें व रामनामाच्या संसर्गानें त्याला निश्चयेंकरून देवांमध्यें स्थान प्राप्त होतें. इतकेंच नव्हे तर [रेफात्मनि] कुत्सितबुद्धीचा मनुष्य असला किंवा [ न-अपवर्ग-भवने ] अपवर्ग म्हणजे मोक्ष, मोक्ष मार्गांतील नसला, [ वर्णे-जघन्ये ] जातीनें हलका असला, तरीसुद्धां [ यस्मात् तत्-फलं-दृश्यते ] तेंच फल दृष्टीस पडतें. [ श्लेष ] [ रेफात्मन्युत ] र वर्ग, रकार किंवा रेफ आणि [ अ-पवर्ग-भवने ] पवर्गामध्यें नाहीं असा नव्हे. अर्थात् पवर्गांतला वर्ण-अक्षर-जघन्य-शेवटचें म्हणजे ' म ' ह्यांनाही तेंच फल दिसतें. म्हणजे ह्या दोन्हीही अक्षरांना [ लेखेषु ] [ देवामध्यें हा एक अर्थ, वर आलाच आहे. ] दुसरा अर्थ लेखामध्यें म्हणजे लिहितांनाही रेफ काढणें झाला तर त्याला किंवा ' म् ' ह्या अनुस्वारालाही मस्तकावरच स्थान मिळतें. हें प्रत्येकाच्या अनुभवांतलेंच आहे. परंतु ह्या र किंवा म् च्यापुढें अक्षर किंवा स्वर येतां उपयोगी नाहीं. [ ते ' निरक्षराः ' असले पाहिजेत ] उदाहरणः—सर + ग =सर्ग; पण तेंच ' निर + अक्षर ' = निरक्षर-' अ ' हा स्वर आहे. म्हणजे रेफ व अनुस्वार जोडून लिहितांना तो अक्षराच्या मस्तकावरच लिहितात. हें जें फल दृष्टीस पडतें तें कशाचें ? तर श्रीरामचंद्राच्या संसर्गाचेंच माहात्म्य होय.

परं पदमिदं जगद्रमयाति स्वसंकीर्तना-
दनंतखरदूषणप्रतिहतिं विधत्तेतराम् ॥
मखानवति सर्वतोऽप्यविदितोपघातादतो ।
निकाममपि रामतो जयति नाम तस्योत्तमम् ॥ १४० ॥

नामाचा पराक्रम रामापेक्षांही अधिक आहे. कसा ? तें कवि सांगतात. रामाचें सेवन केलें असतां—भक्ति केली असतां, जो कोणी भक्ति करील त्याचाच राम उद्धार करतात. किंवा प्रयाणकालीं श्रीरामचंद्रांनीं 'अयोध्येचे मात्र रहिवाशी' आपल्याबरोबर नेले. परंतु नामसंकीर्तनानें साऱ्या त्रिभुवनाला ब्रह्मपदाप्रत पोंचाविलें. रामानें खर आणि दूषण ह्या नांवाचे राक्षस एकएकटे मारले. परंतु हें नाम [ 'र' च्या ठिकाणीं 'ल' करून] अनंत खलांच्या दूषणांचा म्हणजे निंदेचा नाश करतें. रामांनीं विश्वामित्राच्या एका यज्ञाचेंच संरक्षण केलें, आणि रामांना माहित असलेल्या राक्षसांपासूनच संरक्षण केलें. परंतु नामानें माहित असलेल्या किंवा नसलेल्या सर्व संकटांपासून त्रिभुवनांतील अनेक लोकांचें रक्षण केलें आहे. ह्यावरून रामापेक्षां नामाचें सामर्थ्य सर्वथैव अधिक आहे.

सृजति नाम सुशीलवरं जनं रघुपतिस्तु कुशीलवरंजनम् ।
अहमतःकथयामि गणाधिकं रघुपतेरपि नाम तदीयकम् ॥१४१

रामाचें नाम कसें आहे ? तर तें [ जनं ] लोकांना [ सुशील वरं ] सच्छीलामध्यें श्रेष्ठ असें [ सृजति ] करून सोडते. आणि राम काय करतो ? तर [ कुशीलवरं जनं ] कुत्सित लोकांस अग्रगण्य करून सोडतो. असा वरकरणी विपरीत अर्थ दिसतो खरा, परंतु ह्यांत फारच उत्कृष्ट श्लेष साधला आहे. त्याचा खरा अर्थ—[ कुशी—लव—रंजनं ] कुश आणि लहु ह्यांना आनंद देणारा. ह्यावरून मी म्हणतों कीं, श्रीरामापेक्षांही श्रीरामाच्या नामाचा महिमा श्रेष्ठ होय.

महेशो रामाख्यं परममृतं वेदजलधेः ।
समुद्धृत्य प्रेम्णा स्फटिकनिभकंठे निहितवान् ॥
जनः कश्चित्पश्येन्मलिनतरदृष्ट्येति भगवान् ।
धृताशंकः पंकैर्मृगमदभवैः किं स्थगयाति ॥ १४२ ॥

शंकरांनीं वेदरूप महासागरांतून रामनाम नांवाचें श्रेष्ठ अमृत काढलें आणि तें स्फटिकाप्रमाणें पांढरें शुभ्र कंठांत धारण केलें. पण तें लोकांनीं पाहिलें तर कदाचित् त्यावर कोणाची अमंगल दृष्ट पडेल अशी भगवं-

ताच्या मनांत शंका येऊनच जणू काय तो त्याला कस्तूरीच्या चिखलानें झांकून टाकतो असें वाटतें. शंकराचा कंठ निळा असल्याचें प्रसिद्धच आहे. त्यावर ही उत्प्रेक्षा रचली आहे.

मित्रक्षेत्रकलत्रपुत्रसदनद्रव्याणि दिव्यप्रभं ।
कूर्चं भव्यशिखोपवीतमपि यद्ब्राह्मण्यसंपादकम् ॥
हृत्वाप्यस्य तदंबरं बत बलादादिश्य भिक्षाटनम् ।
दंडं चापि पुनः स्मरेदिति महावक्यं श्रुतेर्गोचरम् ॥ १४३

इष्टमित्र; शेतवाडी; घरदार; मुलेंबाळें; उत्तम प्रकारचें द्रव्य किंवा ब्राह्मणाला शोभणाऱ्या मोठमोठ्या दाढीमिशा; व यज्ञोपवीत. इतकेंच नव्हे, तर अगोदरचें चिरगुटपांघरूण सुद्धां हिसकाऊन घेऊन महावाक्य हें देशोदेशीं भीक मागावयाला लावतें. हें तर काय. पण महावाक्याला अनुसरून श्रुतीनें वर दंड ( धारण करण्याची ) देण्याचीही आज्ञा केली आहे. ह्यावरून असें वाटतें कीं, श्रुतीनें रामनाम येत नाहीं म्हणूनच जणों काय हा दंड म्हणजे शिक्षा केली आहे. सगुणभक्तीचें श्रेष्ठत्व स्थापण्याकरितां श्रुतिविहित सन्यास म्हणजे एकतऱ्हेची शिक्षाच आहे असें येथें पंतांनीं रूपक केलें आहे.

रातन्मत्त्वमासि द्वयोर्युतिरिति प्रोक्तं रहस्ये महा-
वाक्यं तत्सुलभं नृणां कथमपि स्याद्भक्तिमुक्तिप्रदम् ॥
यच्चैतत्स्पृहयन्विमुक्तिमपि यल्लोकांबया मारुति-
र्भोगाः संतु तवाखिला इति बलात्सानंदमुक्त्यादृतः ॥१४४ ॥

[ रा ] म्हणजे तत्; आणि [ म ] म्हणजे त्वम् आणि ह्यांची [राम] ह्या शब्दांत झालेली संयोगता [ असि ] ह्यावरून [ राम ] हेंही एक [तत्त्वमसि] महावाक्यच आहे. ह्याकरितां रामनाम घेतल्यानें महावाक्याची पूर्तता होते. असें रहस्योपनिषदांत सांगितलें आहे. आणि तें तर मनुष्यास—सर्व वर्णांस—अगदीं सहजीं घेतां येण्यासारखें असून आणखी तें कसें आहे ? तर भुक्ति आणि मुक्ति म्हणजे भोग देऊन शिवाय मुक्ति देणारें आहे. कारण [ रा ] म्हणजे संपत्ति आणि [ म् ] म्हणजे मुक्ति. ह्या दोहोंचाही त्यांत समावेश होतो. म्हणून—लोकांबया—म्हणजे जगज-

नन्दिनी जी सीता, तिनें मारुतींनीं रामापाशीं फक्त मुक्तीच मागितली होती तरी आपण होऊन त्यास मोठ्या आग्रहानें तुला भुक्ति व मुक्ति दोन्हीही असूंदेत असें म्हणून मोठ्या आनंदानें त्याचा गौरव केला. ह्याचें कारण [ राम ] हें नाम त्याला दिलें म्हणजे त्यांत भुक्ति व मुक्ति ह्या दोन्हीही येतात.

अनंताकारमप्येतदनंताकारमेव हि ।
वैपरीत्यं गतमपि नार्थहानिर्मनागपि ॥ १४५ ॥

ह्या रामनामांतील ( अन्–अंत–अकार–एव ) शेवटचा अकार 'अ' हें अक्षर काढून टाकलें तरी तें अनंताकारच राहते. म्हणजे ' राम ' ह्या शब्दांतील शेवटचा ' अ ' कार काढला म्हणजे ' राम् ' हें अक्षर शिलक राहते. व तें बीजवाचक आहे. तेंही परमेश्वरस्वरूपच आहे. किंवा तें उलटें केलें तरी त्याचें मूळचें स्वरूपच त्याला प्राप्त होतें. 'तो मी आहें.' ह्या वाक्यांत ' तो ' आणि ' मी ' ह्या शब्दांनीं दर्शविलेली व्यक्ति एकच आहे. तेव्हां ' तो मी आहें ' किंवा ' मी तो आहे ' असें म्हटलें काय एकच. त्याचप्रमाणें ' राम ' ह्या शब्दाची उलटापालट केल्यानें त्यांतील शक्ति कमी होत नाहीं. 'सोहमहं स इति यव्यतिहारो विशिष्यते' असें ब्रह्मसूत्रांत म्हटलेलें आहे. आणि त्यामुळेंच वाल्मीकीही ' मरा मरा ' असा उलटा जप करूनच मुक्त झाला. तात्पर्य, रामनाम कसेंही व कोणत्याही रीतीनें ग्रहण करा, तें आपलें फलद्रूप हें व्हावयाचेंच.

अपि ललितसुगुणवेणिः सालंकाराऽपि या सुवर्णाऽपि ।
रघुतिलकविहीना चेद्वाणी रमणीव नैव कल्याणी ॥ १४६ ॥

' रघुकुल तिलक ' जो राम , त्याच्या शिवाय स्त्रीप्रमाणेंच वाणी ही शोभत नाहीं.

**पहिला अर्थ**—कितीही अभिनयसंपन्न, कितीही विलासवती, सद्गुणांनीं युक्त, वेणींत सुंदर सुंदर दोऱ्यांत मोत्यें गुंफलेलीं, अंगावर कितीही दाग-दागिने असले, व ती कितीही गोरीपान असली तरी ' रघुतिलक ' ह्यांतील ' र ' च्या ठिकाणीं ' ल ' करून ' लघुतिलका ' शिवाय लहा-

नशा तरी कुंकुमतिलकाशिवाय स्त्री जशी शोभत नाहीं, 'सुवासीनी' मंगलदायक-होत नाहीं, त्याप्रमाणेंचः-

**दुसरा अर्थ**—सुंदर, कितीही चांगली, अस्खलित, नानाप्रकारच्या शाब्दिक अलंकारांनीं युक्त असली, व तिच्यांतील शब्द कितीही मनमोहक व मधुर असले तरी ती वाणी 'रघुतिलक' जो श्रीरामचंद्र त्याच्या नामाशिवाय शोभत नाहीं, व तिलाही मंगलस्वरूप येत नाहीं.

**भावप्रधानमस्याख्यातं यत्प्रत्ययः परः प्रकृतेः ।**
**तं भज शेषगिरिस्थितमच्युतमिह शाब्दिकं वचःशुद्ध्यै ॥ १४७**

श्रीहरीच्या नामसंकीर्तनाला भक्ति हीच प्रधान आहे. तरी त्याला वाणीही शुद्ध लागते. ह्याकरितां तूं वैय्याकरणप्रवीण जो अच्युत त्याचीच उपासना कर. ह्या भावानें सांगतात.

**पहिला अर्थ**—ज्याच्या नामसंकीर्तनाला भक्ति हीच काय ती मुख्य असते. ( यत्-प्रत्ययः-परः-प्रकृतेः ) परंतु त्याचा अनुभव घेऊन पहाणें हें बुद्धीला अगम्य आहे. ह्याकरितां आधीं [ वचःशुद्धै ] वाणी शुद्ध होण्याकरितां शेषगिरिस्थ असा जो अच्युत त्याची उपासना कर. व्यंकटाचलावरील भगवान् जो श्रीहरि तोच पूर्ण वैय्याकरणी आहे. त्याचें भजन कर म्हणजे झालें. [ श ] [ ष ] [ स ] इत्यादि वर्ण अज्ञ लोकांना उच्चारतांना फार जड जातात. ते त्यांना साधत नाहींत. ह्याकरितां त्यांचेंच भजन केलें असतां, म्हणजे तींच अक्षरें घोकलीं असतां वाणी ही शुद्ध होते असाही भाव सुचविला आहेसें दिसतें.

**दुसरा अर्थ**—व्याकरणामध्येंतरी आख्यात म्हणजे क्रियापद ह्या शब्दानें कांहींतरी मनांतलि भावच प्रदर्शित केला जातो. अर्थात् 'आख्यात' हे शब्द भावप्रधान असतात. त्यांना जो प्रत्यय लागतो तो मूळ शब्दाच्यापुढेंच लागतो. ह्याकारितां तें व्याकरण समजून घेण्यासाठीं तूं 'शेष' शेषाचा अवतार जो पतंजलि [ पतंजलीनें पाणिनीच्या व्याकरणसूत्रावर भाष्य केल्याचें प्रसिद्धच आहे. ] त्याची जी 'गिरिस्थित'-वाणी, त्या वाणीचें वाक्शुद्धीकारितां वाणीच्या ठिकाणीं असणारा जो अच्युत त्याचें आराधन कर म्हणजे झालें.

नो जातः प्रकृतेः परः क्वचिदपि प्राप्नोति यत्प्रत्ययो
लोपं नैव विकल्पते किल यदादेशः प्रवृत्तः क्वचित् ।
वृद्ध्या यस्य गुणो न बाधित इति श्रीरामचंद्रप्रभुः
सद्वैय्याकरणाद्विशिष्यत इति त्वं वाक् तमेवाश्रय ॥ १४८ ॥

जो मायेहून पलीकडे आहे; आणि ज्याचा साक्षात्कार झाला असत किंवा ज्याचें स्वल्पज्ञान झालें असतां तें फिरून कधींही नष्ट होत नाहीं. किंवा ज्याची आज्ञा एकदां सुटली म्हणजे ती कधींही फिरत नाहीं, आणि ज्याची कितीही भरभराट झाली तरी गुण म्हणजे सद्गुण वृद्धि पावतात; त्यांत कधीं व्यत्यय येत नाहीं. भक्ति अधिक केल्यानें ती कधीं बाधक होत नाहीं. वाढते मात्र. तसेंच आत्मज्ञान झालें असतां तें कधीं कमी तर होत नाहींच पण उलट वाढतें. असा हा श्रीरामचंद्र प्रभु मोठा व पटाईत वैय्याकरणी आहे, तर हे वाचे ! तूंही त्याचाच आश्रय कर.

**दुसरा अर्थ**—व्याकरणदृष्ट्या—व्याकरणांत प्रत्यय हा प्रकृति, [ म्हणजे नाम किंवा धातु ] ह्यांच्या **पर** म्हणजे पुढे लागतो हें खरें; पण ह्या प्रत्ययाचा केव्हां केव्हां लोप होतो. [ उदाहरणार्थ प्रथमेचा प्रत्यय ' स् ' ह्या प्रत्ययाचा ' मरुत् ' ह्या नामापुढें लावतांना लोप होतो. मरुत्+स्= मरुत् असें होतें. कारण शब्दाच्या शेवटीं [ त्स् ] अशा तऱ्हेचें जोडाक्षर असल्यास त्यांतील पहिलें अक्षर [ त् ] शिवाय करून बाकीच्यांचा लोप होतो असा नियम आहे. ] पण रामचंद्राच्या बाबतींत प्रत्ययाचा [ ज्ञानाचा ] लोप होत नाहीं.

२ श्रीरामचंद्राच्या ' आदेशाचा ' [ =हुकमाचा विकल्प होत नाहीं.] परंतु व्याकरणांत ' आदेशा ' चा ' विकल्प होतो. उदाहरणार्थ हरे+एहि= हरयेहि. ह्या ठिकाणीं हरे ह्यांतील ए बद्दल ' अय् ' हा आदेश झाला आहे. पण ह्या [ अय् ] ह्या आदेशाचा विकल्पें करून लोप होतो. व हरे+एहि=हर एहि असा संधि होतो. म्हणजे आदेशाचा विकल्प होतो.

३ [ अ—इ—उ—ऋ—ऌ ह्यांबद्दल आ—ए—औ—आर, आल् हे येणें ह्या क्रियेला वृद्धि म्हणतात. आणि इ, उ,ऋ,ऌ, ह्याचें ए, ओ,अर,अल

ई होणें ह्याला गुण म्हणतात.] 'आद्गुणः' ह्याचा अर्थ अ किंवा आच्यापुढें कोणताही विजातीय स्वर आला असतां दोहोंबद्दल गुण होतो. जसें रमा+ईश=रमेश. ह्यांत आ + ई ह्यांऐवजीं 'ए' हा गुणादेश झाला. परंतु ह्या सूत्राच्यापुढें ह्याचें अपवादक (बाध करणारें) असें 'वृद्धिरेचि' असें दुसरें सूत्र आहे. त्याचा अर्थ अ किंवा आच्यापुढें ए, ऐ, ओ, औ, हे आले असतां वृद्धीचा आदेश होतो. जसें न+एव=नैव, गंगा+ओघ=गंगौघ. ह्यांत अ+ए ह्या ऐवजीं हा वृद्ध्यादेश झाला. व वर जो गुणादेश म्हणून सांगितला त्याला हा वृद्ध्यादेश अपवादक म्हणजे बाधक आहे. म्हणून व्याकरणांत गुणादेश हा वृद्ध्यादेशाला बाधक होतो. पण श्रीरामचंद्राचें तसें नाहीं. तर वृद्धि म्हणजे भरभराट असतां त्यांच्या औदार्यादि गुणांचा उत्कर्ष मात्र होतो.

म्हणून श्रीरामचंद्रप्रभु हे सद्वैय्याकरण्याहूनहीं श्रेष्ठ होत. ( वाईट व्याकरणकाराला कोठें प्रत्ययाचा लोप होतो कोठें आदेश हा विकल्प होतो, कोठें गुणादेशाच्या ठिकाणीं वृद्ध्यादेश होतो, इत्यादि गोष्टी कळत नाहींत. म्हणून सद्वैयाकरण्याहूनही राम हा चांगला. कारण वैय्याकरण्याचेंसुद्धां वरच्याप्रमाणें वैगुण्य दिसून येतें हा भावार्थ.)

**त्वदधिपतिरयं सदाश्रयाशः स परं सर्वजनाश्रयप्रदोऽस्ति ।**

**जनयति बहुतापमंतिकस्थः स पुनर्विष्णुरनेकतापहंता ॥१४९॥**

वरच्या श्लोकांत वाणीला श्रीरामचंद्राचाच आश्रय कर म्हणून सांगितलें. परंतु वाणीची देवता अग्नि आहे. तेव्हां ती आपली पहिली देवता सोडून ह्या दुसऱ्या देवतेच्या भजनी कशी लागेल? अशी शंका आल्यावरून वाणीला पुनः म्हणतात. हे वाणी! तुझा पहिला अधिपति जो अग्नि आहे तो सोडून मी दुसऱ्याकडे कशी वळूं? असें तूं म्हणशील तर तसें म्हणूं नको. कारण, तुझा पाहिला अधिपति जो अग्नि तो कसा आहे? तर [ **सत्–आश्रय–आशः** ] त्याला जो चांगला आश्रय देण्यासारखा असेल, त्याचीच इच्छा करणारा. म्हणजे ज्वालाग्राही पदार्थांचीच अपेक्षा करणारा. आणि हा श्रीरामचंद्र कसा आहे? तर '**सर्वजनआश्रयप्रदः**' म्हणजे यच्चयावत् स्त्रीशूद्रादिकांनासुद्धां आश्रय देणारा. आणखीं अग्नि कसा आहे?

तर 'अंतिकस्थः–बहु तापं–जनयति'–जवळ असणाणारांना अतिशय ताप देणारा, आणि हा विष्णु म्हणजे श्रीरामचंद्र कसा आहे? ' तर ' अनेक-ताप–हंता , अनेकांचे अनेक ताप असले तरी ते शमन करणारा. असा. तेव्हां हा तुझ्या पहिल्या अधिपतीहून कितीतरी पट चांगला व सुख-दायक आहे. ह्याकरितां तूं त्याचाच आश्रय कर.

**शोभंते न कलाकलापकुशलाः कांता हि कांतं विना**
**तद्वाणि स्पृहणीयसद्‌गुणगणं श्रीनायकं संश्रय ।**
**नन्वस्ति ज्वलनः पतिर्मे इति दुस्तर्के वृथा मा कृथा**
**यत्स्वप्नेऽप्यविवाहिते न रमणे मुख्यारमन्ते स्त्रियः ॥१५०॥**

हे वाणी ! तूं कशी आहेस ? तर अनेक प्रकारच्या कलेमध्यें प्रवीण आहेस. आणि [ कला कलाप कुशलाः ] नानाप्रकारच्या कलेमध्यें पारं-गत असलेली [ कांता ] म्हणजे स्त्री नवऱ्याशिवाय शोभत नाहीं. ह्याक-रितां तुझ्यापेक्षांही अधिक स्पृहणीय असा जो [ श्रीकांत ] म्हणजे लक्ष्मीपति त्याची तूं सेवा कर. आतां अग्नि हा माझा पहिला नवरा आहे तेव्हां आतां दुसऱ्याकडे कसें जावें ? [ इति दुस्तर्के वृथा माकृथाः]असे व्यर्थ तर्कवितर्क काढीत बसूं नको. कारण कोणत्याही स्त्रीला चार पति हे होतच असतात, असें श्रुतींत सांगितलें आहे. ते असेः—

**" सोमः प्रथमो विविदे गंधर्वो विविद उत्तरः । "**
**" तृतीयो अग्निस्ते पतिस्तुरीयस्ते मनुष्यजः ॥ "**

कोणत्याही स्त्रीला प्रथम सोम हा पति होतो; त्यानंतर गंधर्व होतो; तिसरा अग्नि होतो आणि मग चवथा मनुष्य. असे क्रमानें पति होत अस-तात. ह्याकरितां दुसरा पति करावयास हरकत नाहीं. शिवाय, जी चांगली व कुलवंत मुलगी असते ती विवाहितपतीशींच रममाण होते. अवि-वाहित–ज्याच्याशीं लग्न लागलें नाहीं, त्याच्याशीं स्वप्नांत सुद्धां ती रम-माण होणार नाहीं. तर अग्नि हा अविवाहित पति आहे. आणि श्रीकृष्ण हा विवाहित पति आहे. ह्याकरितां तूं श्रीकृष्णाचेंच दास्यत्व कर. आतां अग्नि हा अविवाहित कसा ? व विष्णु हा विवाहित कसा ? असा प्रश्न

करशील, तर ही गोष्ट [ अविवाहित ] ह्या शब्दावरूनच कळण्यासारखी आहे. [ श्लेष ] अग्नि कसा आहे ? तर [ अवि–वाहित] अवि म्हणजे मेंढा आहे वाहन ज्याचें असा; म्हणून तो अविवाहित आहे. आणि श्रीकृष्ण कसा ? तर [ विवाहित ] वि म्हणजे पक्षी–गरुड. त्यावर बसणारा. म्हणून तो विवाहित होय. हें प्रत्यक्ष प्रमाणच पाहून घे म्हणजे झालें. आतां तर कांहीं शंका नाहीं ना ?

**अंगेषु मुख्या द्विजमध्यसंस्था बाणानुसंधानपराऽसि नित्यम् ।**
**अंधस्थिरप्रेमरसा रसज्ञे नरस्तुतिं तत्यज कर्णवत्त्वम् ॥ १५१ ॥**

हे रसज्ञे! हे सर्व रस जाणणारे जिव्हे! हें सर्व मनांत आणून तूं श्रीकृष्णाच्या भजनीं लाग आणि कर्णाप्रमाणें 'नर स्तुतिं त्यज' कर्णानें ज्याप्रमाणें कधीं नराची म्हणजे अर्जुनाची स्तुति करावयाची नाहीं असा कृतनिश्चय केला होता, त्याप्रमाणें तूंही नरस्तुति म्हणजे क्षुद्र मनुष्यांचा स्तुतिपाठ करायाचा सोडून दे. आतां तूं म्हणशील कीं, कर्ण केवढा उदार व थोर होता ? त्याची योग्यता मला कशी येणार ? त्याचे कांहींतरी गुण माझ्या अंगांत आहेत काय ? तर तसें मात्र नाहीं. त्याचेच सर्व गुण तुझ्या ठायीं आहेत. कसे ते पहा.

पहिला अर्थ—कर्ण कसा होता ? तर [ अंगेषु मुख्यः ] अंगदेशाचा अधिपति; आणखी कसा ? तर [ द्विज–मध्य–संस्थः ] नेहमीं ब्राह्मणांमध्यें दान देण्यासाठीं बसणारा; ज्याच्या सभोंवतीं नेहमीं याचकांचा पाळा पडलेला असे असा; किंवा जो क्षत्रियांमध्यें शोभणारा असा; आणखी कसा ? तर [ नित्य–बाणानु–संधानपरः ] निरंतर शरसंधान करण्याविषयीं निपुण; आणखी कसा ? तर [ अंध–स्थिर–प्रेम–रसा ] अंध जो धृतराष्ट्र त्याच्या पुत्रांवर निरंतर प्रेम करणारा असा; आणि नराची म्हणजे अर्जुनाची कधींहि स्तुति करणारा नव्हे. त्याला कधींच बरें म्हणणारा नव्हे असा.

दुसरा अर्थ—आतां हे जिव्हे ! तूं कशी आहेस ? तर तशीच आहेस. कशी ? तर [ अंगेषु मुख्या ] सर्व अवयवांमध्यें श्रेष्ठ जें मुख त्यामध्यें

राहणारी [ द्विज–मध्य–संस्था ] दांतांच्या मध्यें वास्तव्य करणारी; [ बाणानु–संधानपरा ] शब्द बाहेर टाकण्याविषयीं सदा तत्पर; आणखी कशी? तर [ अंधस्–स्थिर–प्रेम–रसा ] अंधस् म्हणजे अन्न, त्याच्यावर प्रेम ठेवणारी, अशी असल्यामुळें तूंही कर्णासारखीच आहेस. ह्याकरितां कर्ण जसा नराची स्तुति करीत नव्हता त्याप्रमाणें तूंही नराची म्हणजे मनुष्यमात्राची स्तुति करण्याचें सोडून दे म्हणजे झालें.

जिव्हे मुख्य (सर्व) रसज्ञतां त्वयि गतां ज्ञात्वा समंतात्स्थिता
आसन् श्रीरघुनाथसद्गुणकथालाभार्थमेते द्विजाः ।
तद्वार्ताऽपि च न त्वयीति शिथिला रुष्टाः किमेकैकशो
निष्क्रांता इव संभ्रमात्तदधुना रामेत्यपि त्वं वद ॥१५२ ॥

ह्या श्लोकांत [ द्विज ] म्हणजे दांत व द्विज म्हणजे ब्राह्मण ह्याच शब्दावर काय तो श्लेष साधला आहे. जिव्हेला म्हणतात, हे जिव्हे ! तूं सर्व रसांची मोठी जाणती आहेस; भोक्ति आहेस; हें लक्षांत आणून तुझ्याभोंवतीं वसलेले हे द्विज म्हणजे दांत–पक्षीं ब्राह्मण–तूं कांहींतरी श्रीरामाच्या उत्तमोत्तम कथा सांगशील, तुझ्याकडून रामनाम कानावर पडेल, भगवंताचे गुणानुवाद ऐकावयास सांपडतील, म्हणून हे आज पर्यंत तिष्ठत वसलेले होते. पण पाहतात तों रामनामाबद्दल किंवा त्याच्या गुणकथांबद्दल एक अवाक्षरही तुझ्याकडून बाहेर पडेना. म्हणून ते अगदीं कंटाळून जणों काय तुझ्यावर रुसल्यासारखें होऊन एक एक हळू हळू निघूनही चालले. [ अर्थात् एक एक दांत पडत चालला, म्हणजे वृद्धापकाळ प्राप्त झाला ] आतां तरी रामनाम घे. किती अंत पाहशील ? सारेच दांत अथवा ब्राह्मण श्रोते निघून गेल्यावर मग तूं काय करणार ? असा भाव.

युक्तं ( नित्यं ) स्वपंजरचरो हरितत्वसेवी
लोके न च क्वचन गच्छति पक्षपातम् ।
व्यक्ताक्षरं सुमधुरं निगदन् द्विजेंद्रो
राजेंद्रमभ्यरमयत्सुतरां शुकाख्यः ॥ १५३ ॥

ह्या श्लोकांत [ शुक ] म्हणजे शुकाचार्य आणि शुक म्हणजे पोपट हा द्व्यर्थ साधून म्हणतात कीं, प्रसिद्ध शुकानें राजेंद्र असा जो परिक्षिति राजा त्याला भगवद्गुणानुवाद कथन करून त्याचें मन रमाविलें तें यथायोग्यच आहे. कारण पोपटही श्रीमंत लोकांचीं मनें अशींच रंजवितात.

पहिला अर्थ—पोपट कसा असतो ? [ **स्व–पंजर–परो** ] आपल्या पिंजऱ्यामध्येंच वावरणारा, आणखी [ **हरितत्त्व–सेवी** ] हिरवा रंग धारण करणारा; आणि इतर लोकांत त्याला [ **पक्षपातम्** ] आपल्या पंखांनीं उडून जातां येत नाहीं; असा. आणखी कसा? तर मधुर असे शब्द ‘ **निगादितम्** ’ स्पष्ट बोलणारा असा, द्विजेंद्र म्हणजे पक्षिराज.

दुसरा अर्थ—आतां शुकाचार्य कसे होते ? तर तेही तसेच. [ **स्व–पंजर–परो** ] आपल्या देहरूप पिंजऱ्यांत वावरणारे. आणखी कसे ! तर [ **हरितत्त्व–सेवी** ] श्रीहरीच्या स्वरूपांत निमग्न असणारे असे. आणि लोकांत कधींही [**पक्षपात**] न करणारे. निखालस सत्यानें व न्यायानें वागणारे असे. आणखी कसे ! तर उत्तम,गोड वाणीनें हरिकथा [**निगदितम्** ] सांगणारे असे द्विजेंद्र म्हणजे ब्राह्मणश्रेष्ठ होते. तेव्हां त्यांनीं परिक्षिती राजाचें पोपटाप्रमाणेंच रंजन केलें ह्यांत आश्चर्य तें काय? तें यथायोग्यच होतें.

**तालिका हस्तगा चेत्स्यान्नामादेशपुरःसरम् ।**
**सखे भवासि रे ब्रह्मकपाटोद्धाटनक्षमः ॥ १५४ ॥**

ह्या श्लोकांत कीर्तनांत नामघोष करून टाळी वाजविणें किती श्रेयस्कर आहे, त्याचें वर्णन केलें आहे. [ **तालिका** ] म्हणजे टाळी हा एक अर्थ, व किल्ली हा दुसरा अर्थ. हा श्लेष साधून अर्थामध्यें फार चमत्कृती आणिली आहे.

पहिला अर्थ—हे मित्रा ! एखाद्या पेटींत एखादी मौल्यवान् वस्तु असली आणि ती पहावयाची किंवा दाखवावयाची मनांत असलें आणि त्या पेटीच्या मालकानें आपल्याला हाक मारून त्या पेटीची किल्लीच जर हातांत दिली, तर तुला ती पेटी सहज उघडतां येईल.

दुसरा अर्थ—त्याप्रमाणेंच श्रीहरीचें नाम घेऊन जर हातानें तालिका

म्हणजे टाळी वाजविली तर परब्रह्म जींत आहे ती पेटी तुला सहज उघडतां येईल. अर्थात् त्याच्या योगानें ब्रह्माचें सहज दर्शन घडून ब्रह्मस्वरूप आपल्याला होतां येईल. ह्यावरून कीर्तनांत नाम घेणें व टाळी वाजविणें हें केवढें मोठें पुण्य आहे हें लक्षांत येईलच.

संतो यद्रघुनाथसद्‌गुणगणव्याख्याप्रसंगांतरे
पिष्टातैरवधूलयंत्यविरलं भालस्थलं देहिनाम् ।
तन्मन्ये परमेष्ठिसृष्टजननव्युत्थाननिःश्रेणिका-
जाग्रद्‌दुर्लिपिमार्जनस्य सुजनाः कुर्वंत्यहो रूपकम् ॥ १५५ ॥

ह्या श्लोकांत हरिकीर्तनामध्यें बुका लावण्याची जी वहिवाट आहे तिचें कारण कवीनें फारच मौजेचें सांगितलें आहे.

सत्पुरुष श्रीरामचंद्राच्या गुणानुवादाचें कीर्तन चाललें असतां तेथें जमलेल्या मनुष्यांच्या कपाळाला पुष्कळसा बुका लावतात, तो कशाकरितां लावतात ? तर [ परमेष्ठी ] म्हणजे ब्रह्मदेवानें त्याच्या कपाळावर जन्ममरणाची लिहिलेली जी ढळढळीत ओळ, ती जणों काय पुसून टाकण्याचीच नक्कल करतात असें वाटतें. [ अर्थात् दैवीं लिहिलेले जन्ममरणाचे फेरे ह्यापुढें कांहीं राहिले नाहींत हा ध्वनितार्थ होय. ]

निद्राहते प्रेयसि कुंभकर्णे वैधव्यदीक्षा व्यधितेत्यतः किम् ।
श्रोतुं कथां याति यथा पुराणं न ग्राम्यगीतं विबुधैर्विगीतम्॥१५६

निद्राही आपला प्रियकर जो कुंभकर्ण तो मृत्यु पावल्यानंतर वैधव्य प्राप्त झालें म्हणूनच कीं काय, ती कथा व पुराणें ऐकण्याविषयीं त्या त्या ठिकाणीं जाते हें ठीकच आहे. कारण, शहाण्या लोकांनीं निंदास्पद मानलेल्या नाचतमाशाला कधीं न जाणें हेंच उक्त आहे.

[अथ स्मरणम्] अच्युतपदं मनासि कुरु जनयेदच्युतपदं महानंदम् ।
न हृ कोद्रवाः समुप्ताः क्षेत्रे जनयन्ति साधुगोधूमान्॥१५७॥

अच्युताचे पाय मनामध्यें नेहेमीं चिंतन करीत जा. म्हणजे तुलाही [ अच्युत ] म्हणजे कधींही ढळणारें नव्हे अशा अढळपदाचा किंवा ब्रह्म-

पदाचा स्वानंद प्राप्त होईल. कारण, शेतांत हरिक पेरले तर कांहीं बक्षी गहूं पिकावयाचे नाहींत.

चेतश्चंचल संचरिष्यतितरां बद्धस्पृहं सत्फले
प्रायेणैव तिरस्करोषि सुमनस्संघान्खले चाणके।
धत्से प्रेम वलंबसे च विटपांस्तद्वानरोऽसीत्यतः
श्रीरामं करुणार्णवं भज परं गेहानुबंधं त्यज॥ १५८ ॥

७४६

हे चंचलचित्ता ! तुझ्या गुणावरून व तुझ्या चांचल्यावरून पाहिलें तर तूं शुद्ध वानरासारखें आहेस. मग तूं माझें घर, माझें घर करून कशाला बसतेंस ? तूंही वानराप्रमाणें घर वांधण्याचा खटाटोप करितां अरण्यवासच पत्कर म्हणजे झालें. अशा अभिप्रायानें कवि म्हणतातः—

पहिला अर्थ—वानर कसें असतें ? तर चांगलीं चांगलीं फळें खावयाला मिळावींत अशा आशेला गुंतून साऱ्या अरण्यांत तें भटकत असतें. आणि [ प्रायेणैव ] बहुतकरून [ सुमनस्य-संघान् ] उत्तमोत्तम फुलांचे घोसच्या घोस लागले असले तरी, त्यांना झिटकारून द्यावयाचें आणि प्रसिद्ध किंवा वाईट हरभऱ्यावर मोठी भक्ति धरावयाची आणि नेहमीं झाडावर चढून बसावयाचें असा वानराचा स्वभाव आहे.

दुसरा अर्थ—चित्ता ! तुझा स्वभावही हुबेहुब तसाच आहे. कसा ? तूंही आपले सांसारिक हेतूंतील मोठमोठाले बेत सिद्धीस जावेत म्हणून आशेला गुंतून सदासर्वदा फिरत राहतेंस. आणि [ सुमनसः ] जे थोर मनाचे लोक असतात, त्यांचा तूं बहुधा तिरस्कार करतेंस. आणि दुष्ट कुत्सित लोक असतील त्यांच्यावर तुझी मोठी आवड. इतकेंच नव्हे, तर इष्की पुरुषांच्या नादानेंच नेहमीं वागावयाचें. ह्यावरून तूंही शुद्ध वानराप्रमाणेंच आहेस. ह्याकरितां तूं हें घरदार सोडून अरण्यवासी हो आणि करुणेचा सागर जो श्रीरामचंद्र त्याचें भजन कर. म्हणजे सार्थक तरी होईल.

रे रे चित्त लयो ममामृतकरे स्यादित्यतो मा स्म गाः
स्वास्थ्यं यद्भवसिंधुतोषकृदयं रात्रिंचरोऽतर्जडः ।

श्रीरामस्तु भवाब्धिशोषणकरो रात्रिंचरद्वेषणो
नित्यं चापलताधरोऽप्यमृतदस्तत्त्र शीघ्रं विश ॥ १५९ ॥

चित्त हें चंद्रापासूनच झालेलें आहे, व त्याचा लयही चंद्रांतच होतो-

' पंचत्वोत्तरं मनसश्चंद्रमसि लयो भवति '

असें श्रुतींतही सांगितलेलें आहे. त्यावरून कवि म्हणतातः—

हे चित्ता ! तुझा लय, अमृत आहे ' करे ' म्हणजे हातांत किंवा किरणांत ज्याच्या, अशा चंद्रांत होणारच आहे. असें समजून तूं स्वस्थ वसूं नकोस. कारण, चंद्र कसा आहे ? तर ' भवसिंधु तोषण करो–' संसारसमुद्राला संतोष देणारा–चंद्र उगवला म्हणजे समुद्राला भरती येते ही गोष्ट प्रसिद्धच आहे. ह्यावरून तो संसारास वाढविणारा आहे. त्यापासून मुक्त करणारा नव्हे. [ ' भव ' ह्या शब्दांतही श्लेष आहे. भव म्हणजे शंकर. ह्याला संतोष देणारा. अर्थात् त्यांच्या निरंतर सेवेस राहणारा-मस्तकावर बसणारा आहे. ] आणखीं तो चंद्र कसा आहे ? तर 'रात्रिंचरः' म्हणजे रात्रमिध्यें हिंडणारा. अर्थात् राक्षस, भुतें, चोर अशा वर्गांपैकीं. आणखीं कसा ? तर ' अंतर्जलः ' त्याच्या आंत पाणी आहे. अथवा ' अंतर्जडः ' म्हणजे मंद, शुद्ध पाषाण असा आहे. आणि श्रीराम कसा आहे ? तर ' भवाब्धि शोषण करः ' संसारसागराला अटवून टाकणारा; ' रात्रिंचरद्वेषणः ' राक्षसांचा द्वेष करणारा असा; आणखी निरंतर हातामध्यें धनुष्यरूपी वल्ली धारण करणारा; अर्थात् अंतःकरणानें मृदु असा [ श्लेष ] ' चापलता ' पक्षीं चपळपणा अंगीं आहे. जड म्हणजे सुस्त नव्हे असा. दयार्द्र अंतःकरणाचा आणखीं कसा ? तर '-अमृतस् '–म्हणजे अमृत–पक्षीं मोक्ष–देणारा; आणि चंद्र कसा ? तर ' अमृतकर ' म्हणजे ज्याच्या हातांत अमृत आहे असा; पण तो इतका कृपण आहे कीं, दुसऱ्यास तो तें देत नाहीं. तसा श्रीरामचंद्र नाहीं. ह्याकरितां तूं ह्या रामचंद्रामध्येंच उशीर न करतां झटकर प्रवेश कर.

चंचलस्य विलये तव चेतो योग्यतां वहति चापलताभृत् ।
युज्यते कथमयं हिमरश्मिमंडलं जलमयं किल यस्य ॥१६०

हे चित्ता ! तूं स्वतः चंचल आहेस. तेव्हां ' चापलता ' म्हणजे चपळपणा ज्यांत भरला असेल तेंच स्थळ तुला प्रवेश करावयास योग्य आहे. असें स्थळ कोणतें? तर तेंच 'चाप–लता' म्हणजे धनुष्यरूपी वेल ज्याच्या हातांत आहे तो श्रीरामचंद्र, त्यांतच तुला प्रवेश करतां येईल. तुला प्रवेश होण्याला चंद्र मुळींच योग्य नाहीं. कां ? तर त्याचें मंडल म्हणजे बिंब बोलूनचालून हिमरश्मि आहे. शीत किरणमय आहे. तेथें तुझा प्रवेश कसा होईल ? कारण थंडपणा व चापल्य यांचा विरोध आहे. आणि शिवाय तो जलमय आहे. अर्थात् ' जडमय ' म्हणजे जड आहे, सुस्त आहे. पक्षीं घन आहे. तेव्हां त्यांतही तुझा प्रवेश होणें शक्य नाहीं. ह्याकरितां तूं श्रीरामचंद्राशींच एकरूप हो.

मनोऽसि सांतं भज तद्यनंतं क्षयालसं चंद्रमसं जहीहि ।
स हि स्वयं सांत इति प्रशस्तं धत्ते सदाऽनंतपदावलंबम् ॥१६१॥

हे मना ! तूं कसें आहेस ? तर ' सांत ' स+अंत म्हणजे तुला अंत आहे; नाश आहे. अर्थात् तूं विनाशी किंवा मर्यादित आहेस. अथवा दुसरा अर्थ [ श्लेष ] तूं [ स+अंत ] म्हणजे तुझ्या शेवटाला ' स ' हें अक्षर आहे. कारण ' मनः ' ह्यांत मूळचा शब्द ' मनस् ' असा आहे. म्हणून तूं ' सांत ' आहेस. ह्याकरितां तुला अविनाशी होणें असेल तर तूं, ' अनंत ' असा जो भगवान् त्याचीच उपासना कर. म्हणजे तूंही अनंत म्हणजे अविनाशी होशील. पण ह्यावर तूं म्हणशील कीं माझी मूळची देवता चंद्र आहे. तेव्हां त्याची उपासना सोडून मीं ह्या अनंताच्या म्हणजे दुसऱ्या देवाच्या भजनीं कसें लागावें ? पण तो तुझा पहिला देव जो चंद्र, तो स्वतःच किती पंगू आहे पहा. आधीं क्षय लागलेला. चंद्राचा वारंवार क्षय होतो ह्याचा अनुभव सर्वांसच आहे. शिवाय तो आळशी आहे; मंद आहे. तेव्हां तो तुला अविनाशी कसा काय करणार ? आणखीं तो स्वतःच ' सांत ' आहे. म्हणजे

प्रत्येक अमावास्येच्या दिवशीं नष्ट होतो. किंवा ' सांत ' ह्याचा दुसरा अर्थ घेतला तरी तुझ्याप्रमाणेंच त्याच्या अंतींही ' स ' च आहे. कारण, चंद्र ह्यांत मूळ शब्द ' चंद्रमस् ' असाच आहे. तेव्हां तूं आणि तो सारखेच. मग तुला तो अविनाशी कसाकाय करणार ? तो स्वतःच मुळीं अनंताच्या म्हणजे आकाशाच्या मार्गानें जातो. अनंत ह्याचा दुसरा अर्थ भगवान् विष्णु असा आहे. तेव्हां चंद्र हा स्वतःच जर अनंताच्या मार्गाचें अवलंबन करतो, तर मग तूंतरी त्याची कास धरून उपयोग काय ? ह्याकरितां तूं त्याला सोडून दे आणि ह्या अनंताच्या म्हणजे विष्णूच्या भजनीं लाग.

रे रे चित्त त्यज द्वैतं त्वमेकत्वं समाश्रय ।
ततश्चासि चिदेव त्वं नात्र कार्या विचारणा ॥ १६२ ॥

अरे चित्ता ! तुझ्यामध्यें जो हा द्वैतभाव भरलेला आहे, तेवढा तूं सोडून दे. आणि एका अद्वैत भावनेनेंच वाग. तसें केलेंस तर तूं स्वतःच ' चिदेव ' चित्-एव-चित्स्वरूपच आहेस. ह्याबद्दल मुळींच विचार किंवा शंका मानावयास नको. कारण ' चित्त ' ह्या शब्दांतील ' त्त ' चा जो द्विधाभाव आहे तो सोडून दे म्हणजे बाकी काय राहतें ? तर ' चित् ' हें शब्दावरूनच समजतें. मग त्यांत शंका ती कशाची? ' त्त ' ह्या अक्षरांतील द्वित्व गेलें म्हणजे ' त ' च राहतो.

अयि चित्त समुत्थपित्तवद्भृशमुत्क्लेशयते भवो यदि ।
समसितरुचिराज्यसंभृतं भज शश्रिं सुखदं महागदम् ॥१६३॥

हे चित्ता! पित्त उसळल्याप्रमाणें हा संसार तुला जर अतिशय त्रास होत असेल तर तूं काय कर ?

पहिला अर्थः—तूं पित्ताला काय करशील ? ' सम सित रुचिर आज्य संभृतं ' साखरेच्या बरोबरीनें साजूक तूप घालून तावडतोब ' महागदम् ' म्हणजे सुंठ सेवन कर.

दुसरा अर्थ—तोच उपाय संसारावर लागू पडतो. तो कसा ?[ सम्-असित-रुचि-राज्यसंभृतं ] उत्तम राजबिंड्याप्रमाणें आहे कृष्णकांती

ज्याची, असा [ महा—गदम् ] प्रचंड गदा धारण करणारा जो विष्णु त्याचें सेवन कर.

**अथ कथय कथं नु मत्तवन्मां भ्रमयसि पित्तमिवेह वित्तहेतोः ।**
**रघुपतिपदपद्मचिंतया त्वं भव तूर्णं मम चित्त पूर्णवित्तम् ॥१६४॥**

अरे हे माझ्या चित्ता ! तूं मला धुंद करून वित्ताकरितां—केवळ पैसा मिळविण्याकरितां पित्त झाल्याप्रमाणें ह्या जगांत जिकडे तिकडे फिरावयाला कां बरें लावतेंस ? रघुपतीच्या चरणकमलाला जर सेवन केलेंस तर तूं [ पूर्णवित्त ] होशील. [ पूर्णवित्त ] ह्यांत श्लेष आहे. पूर्ण—वित्—म्हणजे परिपूर्ण ज्ञानी—आत्मज्ञानी होशील. त्यांतच सर्व धन आहे. कारण पूर्ण—आणि—वित्त हे शब्द त्यांतच आहेत. हें शब्द रचनेवरून सुद्धां उघड दिसतें. मग तेंच तूं कां बरें करीत नाहींस ?

**पित्रा पितृव्येण च नामशेषतामापादितासीच्छ्रुतिरत्र विष्टपे ।**
**अतः स्वधर्माचरणे धृतव्रतः प्रल्हाद एष स्मृतितत्परोऽभवत् ॥१६५**

आपला पिता हिरण्यकश्यपू व पूर्वज हिरण्याक्ष; ह्या सर्वांनीं ह्या जगावरील साऱ्या श्रुति म्हणजे वेद नामशेष करून टाकले म्हणजे नष्ट केले. ( हिरण्याक्षानें वेद पळवून नेल्याची कथा सर्वविश्रुतच आहे. ) म्हणून प्रल्हादानें स्वधर्माचरणाचें व्रत धारण करून स्मृतितत्पर झाला. म्हणजे नामस्मरणच करूं लागला. हा एक अर्थ. अथवा स्मृति म्हणजे धर्मशास्त्रांत पारंगत झाला. श्रुति नष्ट झाल्यामुळें त्याला स्मृतीवरच भागवावें लागलें. [ हा श्लेष ]

### [ अथ पादसेवनं ]

**आज्ञानुभूतो भविता यतः स्वप्रत्ययः स किम् ।**
**प्रसादः श्रीमतः सिध्येत्पादाधारं विना दृढम् ॥ १६६ ॥**

### [ पादसेवन. ]

पहिला अर्थ—[ श्रीमतः—प्रसादः ] एखाद्या थोर मनुष्याचा, श्रीमंताचा प्रसाद मिळविणें असेल, त्याला प्रसन्न करून घेणें असेल, तर

' दृढ–पाद–आधारंविना–नसिद्धेत् ' त्याचे घट्ट पाय धरल्यावांचून तें काम सिद्धीस जात नाहीं. हा अनुभव शहाण्या लोकांनीं स्वतः कधीं घेतला नाहीं काय ? घेतलेलाच आहे. म्हणून श्रीमंताचे जर जगांत पाय धरावे लागतात, तर श्री म्हणजे लक्ष्मी ज्याची दासी आहे, त्याचे पाय धरावेत हाच त्याला प्रसन्न करण्याचा उपाय होय.

दुसरा अर्थ—' श्रीमतः प्रसादः ' श्रीमंताचा प्रसाद किंवा प्रासाद म्हणजे वाडा बांधावयाचा असेल तर तो ' दृढ–पादाधरं विना ' त्याला भक्कम पाया घातल्याशिवाय तो तरी सिद्धीस कसा जाईल ? हा अनुभवही शहाण्या लोकांनीं स्वतः घेतला नाहीं काय ? आहेच. ह्याकरितां श्रीहरीचे पाय धरणें हेंच त्याला प्रसन्न करून घेण्याचें उत्तम साधन आहे.

तिसरा अर्थः—' अणू ' म्हणून एक स्वार्थी प्रत्यय आहे. तो ' प्रज्ञादिभ्यश्च ' ह्या सूत्रातील शब्दाला लागतो. जसें ' प्रज्ञ ' म्हणजेच ' प्राज्ञ ' अर्थात् ' प्रज्ञ ' किंवा ' प्राज्ञ ' म्हणजे बुद्धिवान् मनुष्य. तसेंच ' प्रसाद ' म्हणजेच ' प्रासाद ' किंवा वाडा. आतां ' प्राज्ञ ' ह्याशब्दानें ह्या ' स्वार्थीप्रत्ययाचा ' अर्थात् ' स्वप्रत्याचा ' अनुभव घेतला आहे. म्हणजे तो प्रत्यय लागून ' प्रज्ञ ' ह्याचें ' प्राज्ञ ' असें रूपांतर झालेली परंतु ' प्रसाद ' ह्याला तो प्रत्यय लागावयाचा आहे. व त्याचें ' प्रासाद ' असेंरूप व्हावयाचें आहे. ( भविता ) मजबूत पाया घालून वाडा उभारल्यानंतर त्याला ' प्रासाद ' असें म्हणतां येईल व मगच ' प्रसाद ह्या शब्दाचें ' प्रासाद ' हें स्वार्थीरूप व्याकरण दृष्ट्या सिद्ध झालें असें म्हणतां येईल.

अपि प्रसंगवशतो यो वैकुंठपदं श्रितः ।
शप्त्वा ब्रवीमि निःशंकं स वैकुंठपदं श्रितः ॥ १६७ ॥

वैकुंठ हें ज्याचें स्थान, असा जो विष्णु त्याच्या पायाची सेवा जरी सहज घडली, तरी मी प्रतिज्ञेवर सांगतों कीं, तो निःसंशय वैकुंठपदाला पोंचतो. ह्यांत वैकुंठपद ह्या एकाच शब्दावर काय तो श्लेष आहे.

न विष्णुपदसेवनं त्यजत मानवाः सर्वथा
नरस्य कृतकृत्यता भवति यद्द्विजाधीश्वरः ॥

सदाचरणतत्परोऽमृतकरोऽप्ययमायां गत-
स्ततः परमधाम्न्यहो विशति कर्मसाक्षिण्यसौ ॥ १६८ ॥

अहो मनुष्यहो ! विष्णुपदाची सेवा करावयाची तुम्ही कधींही टाकूं नका. मग [ अमृत—करः ] मोक्ष ज्याच्या हातांत आहे असा [ द्विजाधीश्वर ] ब्राह्मणश्रेष्ठ असला तरी सुद्धां तो कृतकृत्य होऊन मायेपासून भिन्न स्थितीला म्हणजे विदेहस्थितीला पोंचतो. आणि अहो ! सर्वांचें मूलस्थान व कर्मसाक्षी जें परब्रह्मस्वरूप त्यांत प्रवेश करतो.

दुसरा अर्थ—[ नरस्य ] म्हणजे अर्जुनही कृतकृत्य झाला. कशाच्या योगानें ? मोक्ष ज्यांच्या हातांत आहे अशा ब्राह्मणश्रेष्ठांच्या चरणकमलाची सेवा करून, तो विदेह स्थितीला पोंचला आणि अखेर आपलें अधिष्ठान जें परब्रह्मस्वरूप त्यांत प्रविष्ट झाला.

तिसरा अर्थ—[ अमृतकरः ] म्हणजे ज्याच्या किरणांमध्यें अमृत आहे असा जो [ द्विजाधीश्वर ] म्हणजे चंद्र, तोही सदा [ विष्णुपद ] ( श्लेष ] विष्णूचे चरण हा एक अर्थ व आकाश हा दुसरा अर्थ. सेवन करीत असतो. म्हणजे तोही आकाशांतून जात असल्यामुळें [ अयमायां गत ] अमावास्येच्या ठिकाणीं पोंचला म्हणजे मग कर्मसाक्षी जो सूर्य त्याच्याच श्रेष्ठ स्थानामध्यें पोंचतो.

सर्वोपरि वरीवर्ति सदारामपदाश्रयः ।
गणिकासंगिनोऽप्यस्मिन्नतिमुक्ताः सहस्रशः ॥ १६९ ॥

पहिला अर्थ—रामपदाचा आश्रय केला असतां ते लोक सदासर्वदा सर्वांहून श्रेष्ठच होऊन राहतात. किंवा आनंदांत असतात. वेश्येशीं लंपट झालेलेसुद्धां हजारों लोक जीवन्मुक्त झालेले आहेत.

दुसरा अर्थ—( सत्—आराम—आश्रयः ) उत्तम बागेचा जे लोक आश्रय करतात, तेसुद्धां सदासर्वदा आनंदांतच असतात. कारण, तेथें ( गणिका ) म्हणजे जास्विनीच्या झाडाला लागून हजारों कमलेंही प्रफुल्लित झालीं असल्यानें तेही सुखांतच असतात.

विष्णोः सर्वावयवनिवहात्पादपद्मे विशेषः
कश्चिद्वाचामविषय इति स्पष्टमेते न विद्मः ।
लब्ध्वा वक्षस्यपि पदमियं सर्वदा पद्मसद्मा
त्यक्तच्छद्मा सरसमनसा सेवते येन पद्मा ॥ १७० ॥

विष्णूचा प्रत्येक अवयव श्रेष्ठ आहे ह्यांत तर शंकाच नाहीं. परंतु त्यांतसुद्धां त्याच्या पदकमलांत कांहीं विशेष असलें पाहिजे. तें काय हें सांगणें शब्दांच्या बाहेरचें काम आहे. म्हणून त्यांत काय विशेष आहे हें स्पष्ट समजण्याला मार्ग नाहीं. तथापि कांहींतरी विशेष असलेंच पाहिजे. कारण कमल हेंच जिचें स्थान आहे अशी जी लक्ष्मी तिला खरोखर विष्णूंनीं आपल्या हृदयांत—वक्षःस्थलावर जागा दिली असतांही तें स्थळ बेलाशक सोडून देऊन मोठ्या आवडीनें ती पदकमलाचेंच सेवन करते. ह्यावरून ही गोष्ट अगदीं खरी दिसते.

श्रीप्राणनाथमृदुसुंदरपादपद्म-
संवाहनोत्थसुखनिर्भरकृष्टचेताः ।
श्रीस्तस्य किं क्षणवियोगजदाहभीता
हस्ते बिभार्ति किल तत्प्रतिमासरोजम् ॥ १७१ ॥

प्राणापेक्षांही प्रिय पति जो विष्णु त्याचें चरणसंवाहन करीत असतांना उत्पन्न झालेलें सुख लक्ष्मीच्या अंतःकरणांत भरून राहिलें आहे. तें जणों काय यत्किंचित्‌ही कमी होऊं नये, त्याचा क्षणमात्र वियोग होऊं नये, म्हणून लक्ष्मी ही त्या पदकमलाची जणों प्रतिमा म्हणून निरंतर हातामध्यें कमलच धारण करते. प्रिय मनुष्याचा क्षणभर वियोग झाला तरी त्याच्या प्रतिमेनें मनुष्याचें थोडेंतरी समाधान होतें, ही गोष्ट सर्वांच्या अनुभवांतीलच आहे. म्हणून सर्वांनीं विष्णूच्या चरण कमलांची सेवा करावी हा भाव.

वत्से विष्णुपदे सुखं समधिकं यद्वागगम्यं परो
लाभः किंच जगत्त्रयीमहितता तस्मात्तदेवाश्रय ।
अंतःक्षीरनिधेर्मुहुर्मुहुरिति श्रीविष्णुपद्मा रमा
कारुण्यात्किल शिक्षितेव चरणं नास्य क्षणं मुंचति ॥ १७२ ॥

विष्णुपदापासून भागीरथी उत्पन्न झाल्याचें प्रसिद्धच आहे. व लक्ष्मी विष्णूची पत्नी. तेव्हां गंगा ही तिचीसुद्धां कन्याच झाली, व समुद्र हा तिचा पति होय. म्हणून लक्ष्मी ही आपल्या कन्येला म्हणजे भागीरथीला म्हणतेः—

मुली ! मी तुला स्वानुभवावरून सांगतें कीं, विष्णुपदामध्यें जें सुख आहे तें कांहीं अप्रतिम आहे. हें तर खरेंच, पण तेथें राहिल्यानें त्याहूनही एक विशेष लाभ होतो. तो कोणता म्हणशील तर ( जगत्त्रयीमहीतता ) त्रैलोक्यामध्यें पूज्यत्व प्राप्त होतें. म्हणून तूं त्याचा आश्रय कर. असें क्षीरसागरामध्यें विष्णूच्या पदसान्निध्याला राहणारी जी लक्ष्मी तिनें वारंवार सांगितल्यामुळेंच गंगा ही तें पद एक क्षणभरही सोडीत नाहीं.

विरक्ता मुक्ता अप्यनिशमनुरक्ताः पदमिदं
भजंते तत्कोऽस्मिन्मधुरिमगुणो नास्मि कलये ।
स संप्रत्यास्वाद्यो यदि तदुपहासोऽत्र तदजः
शिशुः सन्नंगुष्ठं रसयति जलेऽतर्वटदले ॥ १७३ ॥

मोठमोठे विरक्त, महान् महान् जीवन्मुक्त असे लोकसुद्धां ज्या अर्थी रात्रंदिवस ह्या माझ्या पायाला मिठी मारून बसतात, त्याअर्थी ह्यांत अशी काय गोडी आहे हें कांहीं मला समजत नाहीं. ह्याकारितां आपण ते चाखूनतरी पहावेत असें एकदां अकस्मात् विष्णूच्या मनांत आलें. परंतु अशा तरुण वयांत, व पोक्तपणांतच जर आपण आपले पाय चोखूं लागलों तर लोक आपल्याला हांसतील. हें मनांत आल्यामुळेंच जणों-काय परमेश्वरांनीं जलप्रलयाच्या उदकामध्यें लहान अर्भकाचें स्वरूप धारण करून वटाच्या पानावर आपलाच आंगठा चोखूं लागले ! (वटस्य पत्रस्य पुटे शयानं ) हा श्लोक बहुतेकांच्या पाठांतला आहेच.

लब्ध्वा वक्षस्यपि पदमियं तीर्थपादस्य विष्णो-
र्वारंवारं चरणकमलं सेवते स्नेहसांद्रा ।
कन्या धन्या सकलसरितां पत्युरत्युत्तमांगी
युक्तं स्त्रीणां भवति बहुशो मातृगेहं सुखाय ॥ १७४ ॥

सर्व नद्यांचा पति जो समुद्र त्याची उत्तम व सुंदर कन्या जी लक्ष्मी, ती, ज्याच्या पदकमलांतून भागीरथीसारखें पवित्र तीर्थ निघालें आहे अशा विष्णूच्या हृदयाचें स्थान मिळालें आहे तरीसुद्धां वारंवार प्रेमानें त्याच्या चरणाचीच सेवा करते. ह्याचें कारण काय ? तर अहो ! तें बरोबरच आहे. कारण, समुद्र हा नद्यांचा पति, तेव्हां विष्णूच्या चरणकमलापासून निघालेली गंगा तीही समुद्राची पत्नी होय. आणि लक्ष्मी ही समुद्राची कन्या असल्याचें प्रसिद्धच आहे. तेव्हां गंगाही लक्ष्मीची माता झाली. आणि विष्णूच्या पदकमलामध्यें गंगेचें स्थान. तें लक्ष्मीचें मातृगृह म्हणजे माहेर; आणि बायकांना माहेरीं राहण्यांतच नेहेमीं आनंद वाटत असतो.

नेत्रारुण्यं यदेतद्भवति ननु रुषो लिंगमाक्षिप्रसादः
स्नेहैः पादोपचारादिति सुरभिषजोऽधीतमंतःसमुद्रम् ।
मच्छीलाय प्रकुप्येन्न स खलु भगवान्सुस्थिरात्मेति मुग्धा
स्निग्धा दुग्धाब्धिकन्या चरणसरसिजं सेवते सत्यनन्या ॥१७५॥

समुद्रमंथनाच्या वेळीं समुद्रांतून जीं चौदा रत्नें निघालीं त्यांपैकीं धन्वंतरी व लक्ष्मी हीं दोन रत्नें होत. अर्थात् त्या दोघांचें बहीणभावंडाचें नातें. तीं दोघेंही समुद्रांत असतांना एखादा भाऊ, बहिणीला शिकवितो त्याप्रमाणें ह्या भावानेंही आपल्या बहिणीला आपल्या अंगीं असलेले कांहीं गुण शिकविले होते. स्वतः धन्वंतरी म्हणजे वैद्यराज असल्यानें त्यानें तिलाही कांहीं थोड्या औषधांची माहिती करून दिली होती. त्यांपैकीं एका रोगावरचें औषध तिला माहीत होतें. तें कोणतें ? तर नेत्र लाल झालेले दिसले म्हणजे तें राग आल्याचें लक्षण असें समजावें. आणि तो रोग बरा होण्याला पायास तूप चोळणें हाच त्यावर उपाय आहे. कारण त्यानेंच डोळ्यांना गारवा येतो, आणि त्याचा राग कमी होतो. भगवान् कसे आहेत ? तर [ सु–स्थिर–आत्मा ] अत्यंत थंड व शांत स्वभावाचे. आणि लक्ष्मी ही पडली चंचल. तेव्हां गंभीर स्वभावाच्या मनुष्याला असा चंचळ स्वभाव न आवडणें साहजिक आहे. त्यावरून

लक्ष्मीला वाटलें कीं, आपला हा असा उनाड स्वभाव पाहून भगवान् रागावले आहेत. कारण, भगवंताचे नेत्र रातोत्पलासारखे होते. ती लाली मोडली जावी म्हणूनच ती क्षीरसागराची प्रेमळ कन्या भगवंताच्या पायाला तूप चोळीत बसते. ह्यांत [ स्निग्धा ] शब्द श्लेषात्मक आहे. [ स्निग्धा ] म्हणजे प्रेमानें युक्त हा एक अर्थ, आणि स्निग्ध म्हणजे तेल किंवा तूप इत्यादि पायांस मोवारी आणणारा पदार्थ, हा दुसरा अर्थ. अथवा जिचे हात व सारें शरीरच कमलाप्रमाणें मृदु आहे, अशा हातांनीं. असाही ध्वनितार्थ निघतो. [ मुग्धा ] शब्दही तसाच श्लेषात्मक आहे. मुग्धा म्हणजे संशयित—मनांत शंका आलेली असा अर्थ. अथवा जिचें तारुण्य नुकतेंच उदयास येत आहे अशी लक्ष्मी. असाही अर्थ निघेल.

रामश्चिन्मयविग्रहोऽस्य जगति प्राप्तुं पदप्रख्यतां
भूत्वैवामृतवृत्ति संततमधोवक्त्रं सदप्यात्मनः ।
आकल्पं नलिनं तपो यदि गुणाधानाय तीव्रं तपे-
ल्लोके यन्नलिनं तदेव नलिनं को वा विशेषो भवेत् ॥ १७६ ॥

[ नलिन ] म्हणजे नील कमल. ह्यानें विचार केला कीं, लोक रामचंद्राच्या पदाला माझी उपमा देतात, म्हणजे मी त्याच्यासारखें आहें असें म्हणतात. परंतु रामाचा विग्रह म्हणजे देह कसा आहे ? तर तो ह्या जगामध्यें केवळ चित्स्वरूप आहे. तेंच स्वरूप आपणही कां प्राप्त करून घेऊं नये ? म्हणून तें त्या खटपटीला लागलें. त्याकरितां त्यानें काय केलें? तर खालीं मान घालून [ अमृतवृत्ति ] म्हणजे अयाचित वृत्ति पतकरली. येथें [ अमृतवृत्ति ] ह्या शब्दांत श्लेष आहे. [ अमृत ] म्हणजे पाणी, ह्यांत वास्तव्य केलें ( तपश्चर्या करणें झाली तर ती पाण्यांत उभें राहून करतात. ही गोष्ट श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या चरित्रावरूनही ध्यानांत येण्यासारखी आहे. ) आपल्या अंगींही रामाचेच गुण यावेत म्हणून हें नलिकमल युगानूयुगें खडतर तपश्चर्या करीत आहे. तरी काय ? तें बिचारें नीलकमल तें नीलकमलच—अद्याप राहिलें आहे. तें नेहेमी ‘ अधोमुख ’ असते. म्हणजे त्याला लाजेनें खालीं मान घालावी लागली.

श्रीरामपदाची सर आली नाहीं ती नाहींच. त्याला रामचंद्राची सर थोडीच येणार? त्याप्रमाणें एखाद्याचें भगवंताशीं विशेष साम्य आहे असें जरी लोकांनीं म्हटलें, व त्यानें कितीही तपश्चर्या केली तरी भगवत्कृपेवांचून चित्स्वरूपाची प्राप्ती होणार नाहीं.

> तोये तामरसं तपः प्रभुपदं स्यामित्यताप्सीदधो-
> वक्त्रीभूय ततस्तु तत्र समभूत्सश्रीकता केवलम् ।
> नैवांघ्रित्वमथो हताशमपि तच्चाद्यापि चंद्रोदये
> सद्यः संभृतरामचंद्रचरणं पश्याधिना ताम्यति ॥ १७७ ॥

आपण प्रभुपदासारखें आहों, तर मग प्रत्यक्ष रामचंद्रांचें चरणकमल-तरी कां होऊं नये? व्हावें. म्हणून ( तामरस ) म्हणजे लांबडे कमल ह्यानें पाण्यांत राहून खालीं तोंड करून तपश्चर्या आरंभिली. तेव्हां त्याच्या तपाचें फलही त्याला मिळालें. तें कोणतें? तर तें ( सश्रीकता ) झालें. म्हणजे श्रीनें युक्त झालें. श्री म्हणजे शोभा. त्या शोभेनें युक्त झालें. म्हणजे त्याला सौंदर्यमात्र प्राप्त झालें. किंवा तें लक्ष्मीसंपन्न झालें. अर्थात् लक्ष्मी त्यांत राहूं लागली, इतकेंच. परंतु रामचरणाचें स्वरूप मात्र त्याला प्राप्त झालें नाहीं. त्यामुळें त्याचा अतिशयच हिरमोड झाला. इतकी घोर तपश्चर्या केली तरी आपल्याला रामचरण होतां आलें नाहीं म्हणून त्याला अत्यंत दुःख झालें, त्यामुळेंच अद्यापही चंद्रोदय झाला कीं ( अ-संभृत रामचंद्रचरणः ) राम म्हणजे आल्हादकारक असतां चंद्राचे चरण म्हणजे किरण त्यावर पडले असतांही इतरांप्रमाणें त्यास आनंद न होतां उलट त्याच्या आंगाची लाहीच होते. सूर्योदय होतांच हें कमल विकास पावतें, व चंद्रोदय झाला म्हणजे सुकून मुकुलित होतें; मिटतें. ही गोष्ट सर्व-विश्रुतच आहे. रामचंद्राचे चरण पाहिले म्हणजे आपण ते झालों नाहीं म्हणून तें कमल मनांत झुरतें असा अर्थही ध्वनित केला आहे.

> नलिनं मुख्यमावासं यद्यप्यस्ति तथाप्यहम् ।
> श्रीरामचरणौपम्ये मन्ये मालिनमेव तत् ॥ १७८ ॥

( नलिन ) म्हणजे नीलकमल. ह्यामध्यें नेहमीं जरी (मुख+मा+वासं)

लक्ष्मीचें वास्तव्य आहे तरी सुद्धां मी त्याची उपमा रामचंद्राच्या चरणाला देऊं लागतों तेव्हां तें त्यांच्यापुढें ( मलिन ) म्हणजे फिकेंच दिसतें.

( श्लेष. ) ( **नलिनं मुख्यमावासं** ) असे मुळांत शब्द आहेत. त्याचीं पदें ( **मुख्य–म–आवासं** ) अशीं तोडलीं तर त्याचा अर्थ असा होतो कीं, प्रथमच्याच अक्षराच्या ठिकाणीं म्हणजे ( **नलिन** ) ह्या शब्दांतील ( **न** ) च्या ठिकाणीं–त्याच्याऐवजीं–( **म आवासः** ) ( म ) हें अक्षर राहील तर तें ही ( **मलिन** ) झाल्याचें स्पष्ट दिसेल !

**श्रीरामस्य नखेंदुनाऽस्मि विजितः खेंदुः पुनः सन्निति**
**क्षीणात्माथ निरेति तत्कुलगुरुं वक्तुं जडध्यात्मजः ।**
**रामश्चंद्र इवेति तद्विषयितां नीतोऽसि शिष्टैः सखे**
**तत्किं ग्लायसि याहि सांत्वित इति प्रायः शनैर्वर्धते ॥१७९॥**

' **खेंदुः** '—ख+इंदुः–म्हणजे आकाशांतील चंद्र हा आपण श्रीरामाच्या ( **नख–इंदु** ) नखरूप चंद्रकांतीपुढें फिकें पडलों; आपला पराभव झाला, हें पाहून तो मनांत झुरूं लागला. कारण मी 'खेंदु'–ख–इंदु-आकाशस्थ चंद्र, आणि तो [ नखेंदु ] न–ख–इंदु–आकाशांतील चंद्र नव्हे, असें असतांही त्यानें माझा पराभव केला. तेव्हां आतां ह्याला काय उपाय करावा म्हणून योजूं लागला. परंतु चंद्र हा पुत्र कोणाचा ? तर ( **जलधि-आत्मजः**) समुद्राचा पुत्र. अर्थात् ( ल ) च्या ठिकाणीं ( ड ) घातला म्हणजे ( **जडधि–आत्मजः** ) मूर्खांचा पुत्र. तेव्हां :( **यथाबीजं तथांकुरः** ) ह्या न्यायानें त्याला चांगली युक्ति सुचणार कोठून ? म्हणून तो मुलांमुलांचें भांडण झालें म्हणजे तीं जशीं एकमेकांच्या बापाकडे किंवा आजाकडे चहाडी सांगावयास पळत सुटतात, त्याप्रमाणें त्यानें विचार केला कीं, सूर्य हा रामचंद्राचा पूर्वज आहे; वडील आहे; तेव्हां त्याच्याकडेच जाऊन सांगावें. म्हणून तो आमावास्येच्या दिवशीं त्याच्या घरीं गेला. व त्यानें आपल्याला काय दुःख होत होतें तें व रामानें आपला अपमान कसा केला हें सर्व त्यानें सांगितलें. तेव्हां तो म्हणाला [ बा, चंद्रा ! मोठमोठ्या शहाण्या लोकांनीं राम हा चंद्र आहे असें ठरवून त्याला तुझीच उपमा देऊन ठेवली आहे. आणि उपमेयापेक्षां उपमाना-

मध्येंच गुण अधिक असतात, ही गोष्ट सुप्रसिद्धच आहे. मग त्यांत दुःख तें कशाचें करतोस? आणि त्यांत तुला वाईट तें काय वाटतें?] ह्याप्रमाणें सूर्यानें सांत्वन केलें तेव्हां चंद्राला जरा बरें वाटून तो पुन्हा आंग धरूं लागला. शुक्लपक्षामध्यें चंद्र वृद्धिंगत होतो हा अनुभव आहेच.

[अथार्चनं] गोंऽतस्थितोऽमृतरसस्तुष्ट्यै पुष्ट्यै च नो गवाम् ।
सभाजनगतो नित्यं सेवितस्तुष्टिपुष्टिकृत् ॥ १८० ॥

[अर्चन]

पहिला अर्थ-(गो) म्हणजे गाय. हिची कास दूध भरून कितीही तटाटली असली तरी (अंतास्थितोऽमृतरसस्तुष्ट्यै पुष्ट्यैचन) त्यांत असलेल्या दुधाचा तिला काय उपयोग? त्याच्यापासून तिला संतोषही नाहीं आणि पौष्टिकताही नाहीं. तोच रस (स भाजनगतः) भांड्यांत काढून नित्यनियमानें सेवन करील त्याला तो पितांना आनंद वाटतो आणि त्याच्यापासून शरिरालाही पुष्टी मिळते.

दुसरा अर्थ-(गो) म्हणजे वाणी. तिचा रस म्हणजे माधुर्य आंतल्या आंतच दाबून ठेवलें, तर त्याच्यापासून पुष्टीही नाहीं आणि तुष्टिही नाहीं. पण तेंच जर (सभाजन-गतः) सभेंतील लोकांपुढें प्रगट झालें, व त्याचें लोकांनीं सेवन केलें, तर त्यापासून आनंदही होतो व मनही प्रगल्भ होतें.

तिसरा अर्थ—(अमृतरस) म्हणजे ब्रह्मरस किंवा मोक्षरस, हा केवळ (गो) म्हणजे इंद्रियांतच भरलेला असला तर त्यापासून त्यांना आनंदही नाहीं व वाढही नाहीं. पण पूज्यभावनेनेंच प्रतिमापूजा वगैरे मांडून व सभा भरवून कीर्तनरूपानें तेथें प्रगट होईल तर त्यापासून सर्व जनांना आनंद होईल व त्यांच्या मनावरही फार संस्कार होतील.

नैरंतर्येण यस्मिन्नतिसुलभतया जायते स्वस्य लाभः
श्रीरामाराधनं तत्सुरवरमहितं हंत संत्यज्य लोकैः ।
सेव्यंते ते नरा अप्यतिकठिनतराराधना अप्यधन्य
हा हा हा कोऽयमेषां कलितिमिरकृतो नष्टचाक्षुष्कभावः॥१८१

मोठमोठ्या देवांनींसुद्धां ज्याची महती वर्णन केलेली आहे अशा श्रीरामाची आराधना व भक्ति केली असतां केव्हांही ( स्वस्यलाभः ) धनाचा लाभ होतो व आत्मज्ञानाचाही लाभ होतो. ( ' स्व स्य ' हा शब्द श्लेषात्मक आहे ) इतकें अत्यंत सुलभ साधन असूनही अरेरे ! हे सारे लोक तें सोडून देऊन यःकश्चित् द्रव्यलाभाकरितां अत्यंत निष्ठुर-अधन्य-अशा मनुष्यांच्याच भजनीं लागतात तेव्हां ते केवळ अभागी होत. त्यांना धिक्कार असो. ( श्लेष ) ( अधन्या ) ज्यांच्याजवळ धन नाहीं अशां जवळ-दारिद्र्याजवळ-याचना करितात. हाय हाय!! ह्या कलियुगांतील अज्ञानानें नेत्रांची दृष्टि किती बरें नष्ट केली ही !

नारायणे नेच्छति यो निरंतरं नरः सहावस्थितिमेष यत्नतः ।
पुरा श्रयेद्दक्षविनीर्मितां सतां मूर्तिं मतां तां वरधर्मसंस्कृताम् ॥१८२

पहिला अर्थ–' यः–नरः—निरंतरं–नारायणेन–सह–अवस्थितिः इच्छति ' ज्या पुरुषांच्या मनांत निरंतर भगवंताशीं निकट सान्निध्य असावें असें असेल त्यांनीं हरप्रयत्नें करून असें करावें कीं, [पुरा] आधीं [दक्ष] अत्यंत चतुर शिल्प्यानें [ विनिर्मिता ] तयार केलेली [ सतां–मतां ] जिला पाहून सज्जनही मान डोलवितात, आणि [धर्मसंस्कृतम्] यथाविधि जिची स्थापना केली आहे अशा ' मूर्ती ' चा आश्रय करून ध्यान करावें.

**दुसरा अर्थ**—ज्याला परमेश्वराशीं निकट सान्निध्य असावें अशी इच्छा असेल त्यानें [ दक्ष विनिर्मिता ] दक्षप्रजापतीनें उत्पन्न केलेली [ सतां–मतां ] मोठमोठ्या लोकांस मान्य झालेली [ वरधर्मसंस्कृता ] पतिधर्मपरायण अशी जी [ मूर्ति ] नांवाची कन्या तिचा आश्रय करावा, तिला शरण जावें. कारण, तिच्यापासूनच नरनारायण नांवाचें जुळें झाल्याची भागवतांत कथा आहे. ह्यास्तव तिला शरण गेलें असतां आपला तरणोपाय होईल.

स्रग्गंधसुंदरीगीतं नैव श्रीफलमिष्यते ।
तदेव श्रीफलं येन पूज्यते गिरिजापतिः ॥ १८३ ॥

पहिला अर्थ-- [ स्रक्–गंध–सुंदरी गीतं ] स्रक् ह्मणजे माला–

हार, तुरे, गजरे ह्यांचा घमघमाट सुटलेला आहे; अशा लावण्यसंपन्न स्त्रीच्या मुखांतील पदें, टुमऱ्या, ख्याल इत्यादि श्रवण करणें हाच कांहीं [श्रीफल] संपत्तीचा खरा उपयोग नव्हे. तर ज्याच्या योगानें गिरिजापतीची ह्मणजे शंकराची पूजा होते, तेंच खरें 'श्रीफल' ह्मणावें. तोच संपत्तीचा खरा विनियोग होय.

दुसरा अर्थ— [श्रीफल] (ह्यावर श्लेष) श्रीफल ह्मणजे बिल्व. शंकर ज्याच्या योगानें पूजिला जातो, ह्मणजे ज्या बिल्वाचीं पत्रें श्रीशंकराच्या मस्तकावर पडतात तोच खरा बेल होय. इतरत्र बेल असले काय आणि नसले काय सारखेंच ! तद्वत् ज्याच्या योगानें परमेश्वराच्या सार्थकीं लागतो, तोच खरा संपत्तीचा उपयोग होय. वेश्यांचें नृत्यगायन श्रवण करणें हा कांहीं संपत्तीचा खरा विनियोग नव्हे.

> कुंदात्सौगंधिकाद्वा न वहति तुलसी गंधमेषा तथापि
> प्रेष्टा दृष्टा मुकुंदं प्रति काति यदहो पत्रमात्रेण यस्याः ।
> सोऽमुष्मै स्वात्मभावं प्रदिशाति यमिनां दुर्लभं यत्सदोद्य-
> त्तृष्णं कृष्णप्रियार्थं त्यजति न सुरसाऽद्यापि वृंदावनं या ।।१८४

तुळशीचा सुवास पाहूं गेलें तर कांहीं कुंदांच्या फुलांपेक्षां अधिक मधुर आहे असें नाहीं. असें असतांही ती तुळस ह्या मुकुंदाला ह्मणजे श्रीकृष्णाला कितीहो प्रिय आहे ! जिचें एक पत्र त्याला अर्पण केलें असतां मोठमोठ्या योग्यांनाही दुर्लभ असलेलें वैभव व अधिकाधिक उत्कृष्ट होणारें जें आत्मज्ञान तेंही तो देतो. येवढें तुळशीचें माहात्म्य कां ? तर श्रीकृष्णावर तिची इतकी भक्ति कीं, त्या तुळशीनें ज्या वृंदावनामध्यें श्रीहरिसहवर्तमान शृंगाररसाचे विलास केले, अशी जी [सुरसा] ह्मणजे विलासवती–पक्षीं उत्तम आहे रस जिच्यामध्यें अशी–सजीव तुळस, तेथील गोपी गेल्या; कृष्ण गेला; तथापि ती तेथून हालत नाहीं. तिचें ठाणें अद्याप तेथेंच आहे. इतकें श्रीकृष्णावर तिचें प्रेम होतें. 'सुरसा' ह्यांतहीं एक श्लेष आहे. सुरस ह्मणजे उत्तम रस असलेली–सजीव–अद्याप ती सजीव राहिली आहे. प्रत्येक वृंदावनामध्यें सजीव तुळस असते

ही गोष्ट रोजच्या पहाण्यांतीलच आहे. व मथुरावृंदावन हें श्रीकृष्ण-लीलेचें गांव ही प्राचीन कालापासून प्रसिद्धच आहे. शिवाय [ कुंद ] आणि [ मुकुंद ] हे मुग्धप्रास असल्याचेंही चाणाक्ष वाचकांस आढळून येईल.

तुलसी रामचंद्रस्य प्रेयसीति किमु ब्रुवे ॥
यदस्याः पश्य दासोऽपि प्राणप्रियतमोऽभवत् ॥ १८५ ॥युग्मं॥

तुळस ही श्रीरामचंद्राला सुद्धां प्रियच होती. हें काय सांगावयास पाहिजे ? कारण, असें पहा कीं, तुळशीचा दाससुद्धां जर प्राणापेक्षां प्रिय होता, तर मग तुळस प्रिय असेल ह्यांत आश्चर्य तें काय ? (श्लेष) **तुलसीदास** ह्या नांवाचे साधु, ज्यानीं हिंदुस्थानी भाषेंत तुळशीरामायण केलेलें प्रसिद्ध आहे, ते रामभक्त असल्याचें सर्व विश्रुतच आहे.

यस्त्वमार्गमपोह्यास्ते स भातु धृतशेखरः ॥
पश्यापामार्गपत्रं हि हरिर्मूर्ध्नाऽभिनंदति ॥ १८६ ॥

ह्या श्लोकांत [ अपामार्ग ] ह्या शब्दांत श्लेष साधला आहे. अप—अ-मार्ग—वाईट मार्ग—ज्यानें सोडला तो, हा एक अर्थ. आणि अपामार्ग ह्मणजे आघाडा हा दुसरा अर्थ. ह्यावरून कवि ह्मणतात.:—

असन्मार्ग ज्यानें सोडून दिला; दुर्मार्गानें जावयाचें ज्यानें टाकलें; त्या मनुष्यानें शिरावर सुरा धारण करावा ह्मणजे त्यानें आपलें श्रेष्ठपण खुशाल मिरवावें. कशावरून ह्मणाल? तर प्रत्यक्ष अपामार्ग ह्मणजे आघाडा; त्याचें पान ( पर्शी लेख) सुद्धां श्रीहरी आपल्या मस्तकावर धारण करतो. हें प्रत्यक्षच उदाहरण पहा ह्मणजे झालें.

रामाग्रतो विरचयन्सह गीतनृत्यं
नित्यं नयेदुपनतं पुरुषः प्रदोषम् ।
संशिक्षयन्निति जनान्भगवान्महेशः
शक्रादिभिः किमिव नृत्यति भृत्यवर्गैः ॥ १८७ ॥

आपल्या इष्टमित्रांसह श्रीरामचंद्रापुढें आनंदानें जो पुरुष नृत्यगायन

करतो, तो आपल्या हातांतून घडलेल्या महत्पातकापासूनही मुक्त होतो. हें सर्व लोकांस दाखविण्याकरितांच जणों काय भगवान् श्रीशंकर इंद्रादिदेव व आपले सेवकगण ह्यासहवर्तमान **रामा** पुढें ( रामा ह्या शब्दांत श्लेष आहे.) ह्मणजे स्वस्त्रीपुढें—गौरीपुढें—नेहमीं नृत्यगायन करित असतो.

दानोदकार्द्रः सततं दधद्धरिमहादरम् ।
करः कटकशोभाढ्यः स वै नागास्थितो मतः ॥ १८८ ॥

दानोदकाच्या योगानें रात्रंदिवस ओला झालेला, श्रीहरीची भक्ति करण्यांत गुंगलेला, व कडीं घातल्यांमुळें ज्याची शोभा अधिकच वाढली आहे, असा हात कधीं अपराधी होणार नाहीं. (न—आगास्थितः)

**दुसरा अर्थ**—मदोदकानें भिजून चिंब झालेली, सिंहाची धास्ती बाळगणारी, दातांतील कड्यांनीं जिला शोभा आलेली आहे, गंडस्थळानें भूषणीभूत अशी सोंड फक्त हत्तीलाच असते. ( नाग—स्थितः)

भगवति परमेश्वरे निवेशो भवतु ममेति यदीहसे तदाशु ।
रचय मनस एव सुष्ठुभावं सुमनस ईशतनौ हि निर्विशंति ॥१८९॥

आपण भगवान् परमेश्वरामध्येंच जाऊन एकरूप व्हावें अशीच जर तुझी इच्छा असेल तर एक काम कर. तेंहें कीं तूं मनाचा चांगुलपणा धर. कारण, मन ज्यांचें पवित्र असतें ते [ सुमनस ] ह्मणजे साधु हे नेहमीं ईश्वरस्वरूपांतच मिळतात. ह्यांत 'सुमनस' ह्या शब्दांत श्लेष आहे. सुमन ह्मणजे फुलें हीं चांगलीं असलीं ह्मणजे तीं देवाच्या मस्तकावरच पडावयाचीं असा अर्थ.

धन्यानहं तु कथयामि कुजन्मिपादा-
न्क्षेत्रं गता ( च ) न्घनरसाप्लुतिमादधाना (नाः) न् ।
पाश्चात्यया ससुमनस्कतया सशोभा
ये स्वात्मनः सफलयंति हरीभवंतः ॥ १९० ॥

**पहिला अर्थ**—ज्यांचीं मुळें जमिनींत खोल खोल जाऊन तीं पाण्यांत डबडबलेलीं असतात, आणि मागाहून त्यानां फुलें गजबजून जे

मनोहर दिसूं लागतात आणि जे आपल्या हिरव्यागार पालवीनें टवटवून फलद्रूप होतात, त्या वृक्षानांच ( कुजन्मि=जमिनीवर उत्पन्न झालेले ) मी ' धन्य धन्य ' असें ह्मणेन.

**दुसरा अर्थ**—किंवा जे कोणी इहलोकीं जन्मास येऊन पवित्र ठिकाणीं तीर्थादि यात्रेला जातात आणि तेथील खोल पवित्रोदकांमध्यें वारंवार बुड्या मारतात आणि तदनंतर पवित्र अंतःकरणानें श्रीहरीशीं एकरूप होतात अशांचे पायच धन्य असें मी ह्मणेन. (कु÷जन्मि=पृथ्वीवर जन्मलेली माणसें )

**सत्तारकं नादि नांतं यस्यांतर्वर्तते स्थितिः ।**
**अतो नयन ते सख्यं भवेन्मुख्यं मुरारिणा ॥ १९१ ॥**

अहो नयनहो ! सर्व अवयवांपेक्षां परमेश्वराशीं तुमचें फार लौकर सख्य होईल. कां ह्मणाल तर [ **समानशीलव्यसनेषु सख्यं** ] ह्या वाक्याप्रमाणें ज्यांचे स्वभाव व गुण सारखे सारखे असतात, त्यांची मैत्री क्षणांत जडते असा जगांतील अनुभव आहे. आणि तुमचे व परमेश्वराचे गुण सारखे आहेत. तेव्हां नयनांनीं विचारलें कीं, परमेश्वराचे व आमचे गुण सारखे कसे ? त्यावर कवि ह्मणतात कसे तें ऐका.

**पहिला अर्थ**--परमेश्वर कसा आहे आहे ? तर [ **सत्तारकं** ] सत् ह्मणजे साधु ह्यानां तारणारा. आणखी कसा ? तर [ **नादि नांतं** ] न आदि न अंत–त्याला आदि व अंत नाहीं असा. आणखी कसा ? तर [ **यस्य स्थिति अंतर्वतते** ] प्रत्येक प्राणीमात्राच्या हृदयांत ज्याची वस्ती आहे असा.

ह्यावर नयन ह्मणाले 'हे गुण परमेश्वराकडे लागतात हें ठीकच आहे. पण ते आम्हां नयनांकडे कसे काय लागतात'? तर कवि ह्मणतात तें ही सांगतों ऐका.

**दुसरा अर्थ**—नयनहो ! तुह्मी कसे आहांत ? तर [ **सत्–तारकं** ] सत् ह्मणजे उत्तम आहे 'तारका' म्हणजे बाहुली ज्या तुमच्यामध्यें असे. लेन्साप्रमाणें सगुण स्वरूपाचें प्रतिबिंब आकर्षण करून घेण्याचें तुमच्या आंगांत सामर्थ्य आहे. आणखी कसे ? तर [ **न आदि**

न अंतं ] ' न ' हें अक्षर तुमच्या आरंभी व अंतीं आहे असे. आणखी कसे ? तर [ यस्य स्थितिः अंतर्वर्तते ] ' य ' ह्या अक्षराचें स्थान तुमच्यामध्यें आहे. [ न–य–न ] अशीं अक्षरें काढलीं ह्मणजे ' य. ' हें अक्षर दोन ' न ' च्या मध्यें असल्याचें स्पष्ट दिसतें.

अशा प्रकारें परमेश्वराचेच गुणधर्म तुह्माला लागतात. ह्या करितां नयनांनीं एकसारखी मूर्तींच पहात रहावें.

**पृथुरुच्चपदे सहसा कथमारोक्ष्याम्यहं विनापचितिम् ।**
**इति मधुवनसेवनतो व्यधादुदारः सदात्मनोऽपचितिम् ॥१९२॥**

[ श्रीमद्भागवतामध्यें पृथुराजाची एक कथा सांगितलेली आहे. ती अशी कीं, पृथु ह्या नांवाचा वृंदावनांत एक राजा होता. तो तेथील श्रीकृष्णाच्या देवालयांत जाऊन नित्य सेवा करित असे. ह्मणजे तेथील सडा संमार्जन करणें, फुलेंतुळशी आणणें, गंध उगाळून देणें, वगैरे देवाचीं कामें करून त्यानें आपला देह कृश करून घेतला होता. महाराष्ट्राचे प्रभु श्रीमच्छत्रपति शिवाजीमहाराज ह्यांनींही सज्जनगडावर देवालयांतील सडासंमार्जन करण्याचें काम स्वहस्तें पतकरलें होतें, ही गोष्ट मठांतील व्यवस्थापत्रकावरूनही कळून येतें. शिवाय ' पृथु ' ह्या शब्दाचा अर्थ ' स्थूल ' ' दोंदील ' असा आहे. त्या शब्दाला व पृथुराजाच्या कथेला अनुलक्षून व त्यांत वैद्यशास्त्रज्ञानाची ही भर घालून ह्या श्लोकाची रचना केली आहे. ]

**पहिला अर्थ**—मला तर उच्च पदावर–मोक्षापर्यंत–चढून जावयाचें आहे. परंतु [ **विना–पचितिम्** ] माझें शरीर हलकें झाल्याशिवाय मला एकदम वर कसे चढतां येईल ? यावयाचें नाहीं. हाच विचार मनांत आणून उदार अशा पृथु (लठ्ठ) राजानें [**मधुवन**] ह्मणजे वृंदावन येथें रात्रं दिवस तपश्चर्या करून आपलें शरीर झिजवून घेतलें.

**दुसरा अर्थ**—जो मूळचाच ' पृथु ' ह्मणजे स्थूल देहाचा मनुष्य आहे–दोंदील आहे; त्याला जर उच्च ठिकाणीं चढावयाचें असेल तर तें कसें चढतां येईल ? यावयाचें नाहीं. ह्याकरितां त्यानें आपलें शरीर कृश करण्याकरितां औषधोपचार केला पाहिजे. तो कोणता ह्मणाल तर [**मधु**]

ह्मणजे मध आणि [ वन ] ह्मणजे थंड पाणी ह्याचें मिश्रण सेवन केलें असतां, त्याचा मेद झडून जाईल.

शिशिरांबु पिबेन्मधु प्रयुक्तं
गणनाथोऽपि भवेत किलास्थिशेषः ॥

" थंड पाण्यांत मध घालून तें सेवन केलें असतां प्रत्यक्ष गणपतीचें सुद्धां अस्थिचर्म राहील, मग मनुष्याची कथा काय ? " असें वैद्यशास्त्रांत सांगितलें आहे.

[ अथ वंदनं ] सर्वांगेषु वरांगता तव कृता नैतावता सार्थता
गुह्यं देशमपीह शब्दनिपुणाः स्त्रीणां वरांगं जगुः ।
तस्माच्छ्रीरघुनंदनस्य चरणं ब्रह्मादिवंद्यं मुहु-
र्नत्वा याहि वरांगतां मम सखे मूर्धन्सतां संमताम् ॥१९३॥

[ वंदन. ]

हे मस्तका ! सर्व अवयवांमध्यें तुला [ वरांगता ] ह्मणजे श्रेष्ठत्व दिलें आहे. पण तेवढ्यानेंच तूं श्रेष्ठ झालेंस असें समजूं नकोस. कारण, अमरकोशकारादि भाषाकोविद हे स्त्रियांच्या गुह्य प्रदेशाला सुद्धां [ वरांग ] ह्मणजे श्रेष्ठ अवयव असेंच म्हणतात. तेव्हां ह्मणण्यावर काय आहे ? ह्या करितां तुला आपला श्रेष्ठपणा खरा करून दाखवावयाचा असेल तर, ब्रह्मादि देवांनाही वंद्य असे जे श्रीरामचंद्राचे चरण त्यांना पुनः पुन्हां वंदन कर, आणि हे माझ्या मित्रा ! सज्जनांना संमत अशी [ वरांगता ] म्हणजे अवयवांतील श्रेष्ठपणा प्राप्त करून घे.

भूषणोत्तमकिरीटकलाभादुद्धतत्वमिह मा वह मूर्धन् ।
यन्मुकुंदपदपंकजयुग्मं सर्वदैव नमति स्म किरीटी ॥१९४॥

हें मस्तका ! मला शिरपेंच, तुरा, इत्यादि दागदागिने व किरीट कुंडलें घालावयास मिळतात म्हणून तूं त्याबद्दल अभिमान बाळगूं नकोस. तर श्रीकृष्णाचे पदरूपी दोन चरणकमल [ किरीटी ] म्हणजे किरीट धारण

करणारा प्रत्यक्ष अर्जुनही [ नमति ] निरंतर वंद्य करतो. ह्याकरितां त्या श्रीहरीच्या चरणाला वंदन करण्याचा अभिमान बाळग.

अक्रूरोऽहमपि प्रसंगवशतो भाता मम क्रूरता
श्रीमद्गोकुलवासिनां भगवतः प्राणप्रियप्राणिनाम् ।
हेतोस्तस्य हरिर्ममोपरि पुनारुष्टस्तु न स्यादिति
प्राप्ताशंकतया क्षमापनकृते श्रीशं ववंदे मुहुः॥ १९५ ॥

अक्रूर हा निरंतर श्रीकृष्णाला वंदन कां करतो, ह्याबद्दल कवि उत्प्रेक्षा करतातः—

अक्रूरानें आपल्या मनांत असा विचार आणला कीं, माझें नांव जरी [ अ–क्रूर ] म्हणजे क्रूर नव्हे, निष्ठूर नव्हे, असें आहे तरी, प्रसंगवशांत् माझ्या हातूनही क्रूरकर्म झालें आहे. तें कोणतें म्हणाल तर स्वर्गाप्रमाणें नांदत असलेलें जें गोकुळ, त्यांतील रहिवाशांना प्राणाहूनही प्रिय वाटणारा जो भगवान् श्रीकृष्ण, त्याला मी मथुरेस नेण्याकरितां काढून आणलें. ह्या साठीं त्यावेळीं मी मोठा क्रूर आहे असेच लोकांस वाटलें. त्यामुळें श्रीकृष्ण माझ्यावर रुसला आहे कीं काय, व रुसला असेल तर त्यानें पुन्हा तरि मजवर तसें रुष्ट होऊं नये, व झालेल्या अपराधाची क्षमा करावी येवढ्याच करितांच जणों काय, अक्रूर हा श्रीकृष्णाला घडिघडिला वंदन करतो.

॥ अथ दास्यं ॥

ज्ञानेन मुक्तिः किल तत्तु सत्वतस्तात्सिद्धये भ्राम्यासि रे वृथा कुतः।
त्वं नित्यदासत्वमुपाश्रय प्रभोस्तस्मिंस्तु सत्वं किमु नास्ति नित्यदा
॥ १९६ ॥

[ दास्य. ]

अरे ! ज्ञानापासून मुक्ति मिळते, आणि तें ज्ञान अंगामध्यें सत्त्वगुण असेल तरच प्राप्त होतें. पण तो सत्त्वगुण मिळण्याकरितां उगाच कोठें कोठें म्हणून धावाधाव करतोस ? तूं एक प्रभूचें [नित्य–दासत्त्व] अखंड सेवा ह्याचा आश्रय कर म्हणजे त्यांत नित्यत्त्व देणारें सत्त्व मिळणार नाहीं काय ? मिळेलच.

[ श्लेष ] [ नित्य-दासत्व ] ह्मणजे निरंतर सेवकपणा पतकरला म्हणजे त्यांतच [ नित्यदा-सत्त्व ] शाश्वत स्वरूपी सत्वगुण आहे हे शब्दरचनेवरूनच सिद्ध होते. मग प्रत्यक्ष प्रभूची सेवा कल्यानें तें मिळेल किंवा नाहीं ह्याबद्दल शका कशाची ?

ज्ञानादेव तु मुक्तिरेवमवदन्वेदांतिनस्तत्पुनः
श्रद्धावाँल्लभते न चान्य इति हि श्रीवासुदेवो जगौ ।
सा सत्वोदय एव तच्च ललना अप्याहुरेतत्कृते
नैवान्यत्कुरु हे सखे भव सदासत्वोदयः श्रीपतौ ॥१९७॥

'ज्ञानानेंच मुक्ति मिळते' असें वेदांती लोक म्हणतात. आणि [ श्रद्धावा ल्लभते ज्ञानं ] श्रद्धावंताला ह्मणजे ईश्वरावर भाक्ति ठेवणारालाही ज्ञानावांचून दुसरें कांहीं मिळत नाहीं, असें भगवान् श्रीकृष्णानीं श्रीमद्भगवद्गीतेंत सांगितलें आहे, आणि ती श्रद्धा [सत्त्वोदयः] सत्त्वगुणापासूनच उत्पन्न होते. अथवा ती श्रद्धारूप स्त्री सत्वोदमरूपच आहे असें सर्व लोक म्हणतात. [ श्लेष–सत्व ह्मणजे गर्भ, आणि श्रद्धा ह्मणजे डोहळे. डोहळे लागले ह्मणजे स्त्रीच्या उदरीं गर्भ आहे म्हणून समजावें. अर्थात ती श्रद्धा सत्वोदय युक्त आहे ह्मणजे गरोदर आहे. सत्त्वाचा किंवा ज्ञानाचा गर्भ तिच्या उदरीं आहेच. कशावरून ? तर श्रद्धा ही मूर्तिमंत डोहळेच आहेत. तेव्हां त्याबद्दल शंकाच नाहीं. ] ह्याकरितां हे मित्रा ! तूंही दुसरा तिसरा विचार मनांत न आणतां श्रीपति ह्मणजे लक्ष्मीपति जो विष्णु त्याच्या ठिकाणीं [ स-दासत्व-उदय ] हो अर्थात् दास्यत्त्व पतकर. [ श्लेष ] ह्मणजे त्यांतच [ सदा-सत्व-उदय] होईल.

सोऽहं सोऽहमिति स्थितिं स्पृहयसे चेत्तर्हि सर्वात्मना
भ्रातः श्रीखगगामिनो भगवतो दासोऽहमित्थ स्मर ।
अभ्यासाद्दृशमादृताद्विगतदाकारो भवार्थादथ
स्यात्ते किं न मनोरथः सुफलितोऽतोऽन्यद्वृथा मा कृथाः ॥१९८॥

हे बंधो! 'सोहं' 'सोहं' –सः–अहं; सः–अहं. परब्रह्म तें मीच; परब्रह्म

तें मीच; ( हें महावाक्यांतील एक सूत्र आहे ) अशात-हेची मुक्तस्थिति पाहिजे असेल तर [ सर्वात्मना ] मनापासून [ श्रीखगगामिनः ] गरुड वाहन असा जो भगवान् श्रीकृष्ण त्याचा [ दासोहं ] मी दास आहे हें स्मरण ठेव. [ अभ्यासात् भृशं ] आणि तोच अभ्यास तूं निष्ठापूर्वक करून [ विगतदाकारो-भव ] 'वि' ह्मणजे पक्षी-गरुड; त्यावरून गमन करणारा असा जो विष्णु तत्स्वरूप हो. मग ते तुझे मनोरथ ह्मणजे 'सोहं सोहं' ह्या वाक्याचा जपही त्यांत येणार नाहीं काय? अवश्य येईल. ह्याकरितां तू दुसरें तिसरें कांहीं न करितां [दासोहं] हें पुनः पुनः ह्मण ह्मणजे झालें.

श्लेष—आतां ह्यावर तूं ह्मणशील कीं,' दासोहं''दासोंह' ह्मटल्यानें 'सोहं सोहं' हा जो महावाक्याचा सिद्धांत तो कसा सिद्ध होणार? तर बाबारे! तो त्यांतच आहे. कसा तें पहा. 'दासोहं' हें पद घेतलें आणि [विगत-दा-कारो] ह्यांतील 'दाकार' ह्मणजे 'दा' हें अक्षर 'विगत' ह्मणजे काढून टाकलें तर बाकी 'सोहं' हेंच वाक्य शिल्लक राहतें. हा प्रत्यक्ष अनुभव पहा.

**स्वानंदभाक् श्रीरघुनंदनस्य दास्यान्नरः स्याद्विषयाकुलोऽपि ।**
**यदंजनानंदपदं हनूमान्निरंजनानंदपदं बभूव ॥ १९९ ॥**

विषयलंपट पुरुष असला तरी तो जर [श्रीरघुनंदनस्यदास्यात् ] श्री रामचंद्राची सेवा करील तर तोसुद्धां [स्वानंद—भाक्] ब्रह्मानंदाला पात्र होईल. हें कशावरून ह्मणाल तर [ अंजनानंदपदं ह्याशब्दांत श्लेष आहे.] [अंजन—आनंद—पदं] अंजन ह्मणजे विषय अर्थात् विषयानंदाचें पद ह्मणजे विषयानुरक्त असतांही अथवा दुसरा अर्थ [ अंजना—आनंद—पद] अंजनी ह्या नांवाची जी वानरी [ मारुतीची माता ] तिच्या आनंदाचें स्थान जो हनुमान ह्मणजे मारुति तो श्रीरामाचें दास्य केल्यानेंच [ निरंजन—आनंद—पदं ] ह्मणजे कलंक रहित—निष्कलंक—असें जें परब्रह्म त्याच्या आनंदाच्या स्थानाला ह्मणजे ब्रह्मानंदाला पात्र झाला. ह्यावरून ही गोष्ट सिद्ध होते.

**कुतः श्रियै त्वं यतसे निकाम श्रीरामदासो भव मानव त्वम् ।**
**श्रीरामदासस्य पराङ्मुखस्य सदानपायिन्युपातिष्ठते श्रीः ॥२००॥**

हे मनुष्या! तूं द्रव्यार्जनाकरितां कोठें कोठें ह्मणून धडपड करतोस ? तूं एका श्रीरामाचा दास हो ह्मणजे झालें. श्रीरामाचा दास झालें कीं, [तस्य–पराङ्–मुखस्य ] त्यानें तोंड फिरविलें तरी सदासर्वदा श्री–लक्ष्मी संपत्ति--उभीच असते. ह्याला प्रमाण काय ? असें ह्मणशील तर ह्यांतील शब्द हे सुद्धां त्याचें प्रत्यक्ष प्रमाण आहे. कसें तें पहा.

श्लेष–[ श्रीरामदास ] हा शब्द [पराङ्-मुख] ह्मणजे उलट केल्यास–वाचल्यास–तोच अर्थ निघतो:–

श्रीरामदास–हीं अक्षरें उलटी लिहिलीं ह्मणजे:–
[ स–दा–म–रा–श्री ]–सदाऽअमराश्री–निरंतर –अक्षय संपत्ति–लक्ष्मी–असाच अर्थ निघतो.

ह्या प्रमाणें रामदास [ रामदास ] अक्षरांच्यामागें सुद्धां जर संपत्ति धावत येते, तर प्रत्यक्ष रामदास बनल्यावर ती कशी न येईल? येईलच येईल. [किंवा श्रीरामदास ह्या नांवाचे जे साधु होऊन गेले, त्यांचे उदाहरण पहा. तेही श्री शिवाजी छत्रपति महाराज ह्यांचे गुरु होते. आणि त्यांनीं त्यांस राज्यदान दिलें होतें पण त्याचा त्यांनीं स्वीकार केला नाहीं. ही गोष्ट इतिहास प्रसिद्धच आहे. हें तर लक्ष्मी मागें लागल्याचें प्रत्यक्ष उदाहरण आहे.]

**निष्कारणं सेवनमीहमानो जनस्तनोत्यस्य मनोविनोदम् ।**
**तथा धनोपाधि न हीति युक्तं वित्तापहार्यव्यय एष हीशः॥२०१॥**

जो मनुष्य परमेश्वराची निर्हेतुक सेवा करण्याची इच्छा करतो, तो परमेश्वराला ही प्रिय होतो. ह्मणूनच तो त्याच्या मागें द्रव्याची उपाधी नसावी, अडचण न रहावी ह्मणून त्याच्याजवळ असलेलें सर्व द्रव्य [ वित्त–अपहारी ] लुटून घेऊन त्याला निष्कांचन करून ठेवतो. [ तुकारामा सारखे महान् साधु बहुधा दारिद्र्यावस्थेंतच असतात. ] असा हा परमेश्वर ' अव्यय ' ह्मणजे पराकाष्ठेचा चिक्कू आहे. ( व्यर्थ–खर्च )

श्लेष–[ वित्त–अपहारक ] द्रव्य हरण करून घेणारा हा एक अर्थ, आणि दुसरा अर्थ [ वित्–तापहारक ] ह्मणजे ज्ञात्यांचा ताप दूर करणारा. हें त्याचें व्रतच असल्यामुळें, तो त्याच्यामागें असलेला धनाचा

-व्याप दूर करतो—अर्थात् तो त्याचा चिक्कूपणा नसून दयाळूपणाच समजला पाहिजे.

श्रीरामं न विना गती रविकुले, तत्पक्षपातो ध्रुवं
दृष्टो वालिसुकंठयोः स कलहे, संजातमात्रस्त्वहम्-।
तस्यार्कस्य वहेलनं विहितवांस्तं स्वापराधं प्रभु-
र्दास्येनैव सहेत नान्यत इति श्रीरामदासोऽभवत् ॥२०२॥

मारुतींनीं श्रीरामचंद्राचें दास्य कां पतकरलें? तर त्यांनीं असा विचार केला कीं:—

रविकुलांतील कोणीही पुरुष असो, त्याला श्रीरामचंद्रावाचून गति मिळावयाची नाहीं. ही गोष्ट वाली आणि [ सुकंठ ] ह्मणजे सुग्रीव ह्यांच्या युद्धामध्यें जो पक्षपात दिसून आला त्यावरून स्पष्ट दिसून येते. वाली हा सूर्याचा पुत्र होता ह्मणून त्याला श्रीरामचंद्रानीं तत्काल सद्गति ह्मणजे मोक्ष दिला. परंतु सुग्रीव येवढा मित्र असूनही त्यास कांहीं विशेष दिलें नाहीं. आणि मी तर उपजल्याबरोबरच त्या सूर्याची अवहेलना केली होती. ह्मणजे तें एक खावयाचें फळ आहे असें समजून त्यास भक्षण करण्यासाठीं धावलों होतों. ही गोष्ट माझ्याकडून फार अनुचित घडली. त्या अपराधाची, श्रीरामचंद्राचें दास्य पतकरल्याशिवाय क्षमा होण्याला दुसरा मार्ग नाहीं, हें मनांत आणूनच त्यांनीं श्रीरामचंद्राचें दास्य पतकरलें.

अस्त्येषा परिपाटिका सुमनसां यः स्यात्पितुः पोषक-
स्तत्पुत्रोऽपि करोतु निष्कपटतस्तस्यैव दास्यं विभोः ।
वायोर्नंदन एष आशुगभृतं पश्यन् जगन्मंडले
त्वेकं श्रीरघुनायकं सुचरितस्तत्तस्य दासोऽभवत् ॥२०३॥

सत्पुरुषांची ही एक चालच असते कीं, ज्यानें आपल्यावाडवडिलांच पालनपोषण केलें असेल त्या धन्याची त्याच्या पुत्रानेंही निष्कपट भावानें सेवा करावयाची. ह्या पूर्वापार चालीला अनुसरून वायूचा पुत्र जो मारुति त्यानें श्रीरामचंद्राकडे पाहिलें तों ते कसे आहेत ? तर ‘ आशुगभृतं ’ [ श्लेष ] [ आशुग ] ह्मणजे बाण आणि आशुग ह्मणजे वायु. हे बाण

धारण करणारे—पक्षीं वायूचें पालनपोषण करणारे—असे जगावर एक श्रीरामचंद्रच आहेत, असें त्याच्या दृष्टीस पडले. आणि त्यांचें चरित्रही मोठें वर्णनीय आहे असें पाहून त्यानेंही आपल्या पित्याच्या धन्याचें दास्यत्व पतकरलें. अर्थात् श्रीरामाचे दास होऊन राहिले.

दासश्चेत्परमेश्वरस्य भविता तर्ह्येव धीमानसौ
दासो यो हि स एव धीवर इति स्पष्टं जगुः शाब्दिकाः।
पश्याम्यप्यमृतस्थितिं पुनरसावेवेह धत्तेतरा-
मेव स्वात्मनि चिंतयन् पवनजः श्रीरामदासोऽभवत् ॥२०४॥

परमेश्वराचा दास झाला, तरच तो बुद्धिमान् असें ह्मणतां येईल. कारण, [ शाब्दिकाः ] अमरादि कोशकार [ दास एव धीवरः ] जो दास तोच धीवर-रामाच्या अंगीं धीवर देण्याची शक्ति आहे हा भाव. असें स्पष्टपणें सांगतात. आणि मी स्वतः पाहिलें तरी [ अमृतस्थितिम् ] ब्रह्म ही भावना फक्त एक श्रीरामचंद्रच धारण करतो. ह्मणून तो 'धी-वर' ह्मणजे बुद्धिमान् होय. पक्षीं [धीवर] ह्मणजे कोळी, हाही [अमृतस्थितिं]ह्मणजे पाण्यांतच राहणारा आहे. ह्यावरून खरें धीवरत्व एका रामाच्याच अंगी आहे. असा आपल्याच ठिकाणीं विचार करून ह्मणजे श्रीरामचंद्र हाच काय तो बुद्धिमत्तेनें श्रेष्ठ आहे असें समजून [पवनजः ] ह्मणजे मारुति हा श्रीरामाचा दास झाला.

न स्वस्मिन्विपरीतभाव उदयेद्योऽनर्थकारी कदा-
प्येवं श्रीरघुनंदनं परमया भक्त्या भजेयं सदा।
इत्येवं सुकृता कृती दृढमतिः सर्वात्मना यः सदा
दासः सन्रघुनंदनस्य हनुमान्वन्योऽपि धन्योऽभवत् ॥ २०५॥

न जाणो कदाचित् आपल्या मनामध्यें विपरीत भाव उत्पन्न झाला तर तो अनर्थकारक होतो. ह्या करितां मी श्रीरामचंद्राची निरंतर एकनिष्ठच भक्ति करीन. ह्या प्रमाणें पुण्यवंत, बुद्धिवंत, व दृढनिश्चयी असा जो हनुमान ह्मणजे मारुति तो ' सर्वात्मना ' मनःपूर्वक श्रीरामचंद्राचा [ सदा—दास ] च बनून राहिला.

श्लेष–' सदा–दास ' निरंतर दास झाला, म्हणजे त्याच्या मनांत विपरीभाव येण्याचें व अनर्थकारक अर्थ उत्पन्न करण्याचें कारणच उरलें नाहीं. हें शब्दावरूनच समजतें. पहाः—

[ सदा–दास ] हा शब्द विपरीत म्हणजे उलट केला तरी तो बदलत नाहीं. म्हणजे ' सदा दास ' असाच कायम रहातो. आणि त्याचा अर्थही पण बदलत नाहीं, व अर्थाचा अनर्थही होत नाहीं. तेच भक्तीचे दुसरेही प्रकार आहेत. पण ते विपरीत झालें, उलटले, कीं ते अनर्थकारी होतात. उदाहरणार्थ, [ यजन ] भक्ति घेतली तर [ यजन ] हा शब्द उलट केल्यास [ न–जय ] ह्यांत जय मिळावयाचा नाहीं, सिद्धि यावयाची नाहीं, असा विपरीत व अनर्थकारक अर्थ उत्पन्न होतो. तसें [ सदा दास ] झाल्यानें होत नाहीं. म्हणून तीच खरी एकनिष्ठ भक्ति होय.

[ अथ सख्यं ] क्षमा दया सत्यमुदारभावो संगो विरागः समता प्रबोधः ।
एते गुणा यस्य हरेः सखाऽसौ शीले समाने हि वदंति सख्यम् ॥ २०६ ॥

[ सख्य. ]

क्षमा, दया, सत्य, औदार्य, निरासक्ति, वैराग्य, समबुद्धि, व ज्ञान हे गुण ज्याच्या अंगीं असतील तोच श्रीहरीचा सखा होईल. कारण, हेच परमेश्वराचे गुण आहेत, आणि [ समानेशीलेसख्यं ] हें वाक्य सर्वविश्रुतच आहे. तेव्हां ज्याचा स्वभाव व गुण समसमान असतात त्याचें सख्य हें जुळावयाचेंच.

मैत्री चेद्विहिता समं भगवता स्वात्मप्रियावाप्तये
स्यादेवेत्यनुभूतमस्ति सकलं पूर्वेऽवतारे विभोः ।
शक्रांशः स इति स्म बुद्धिनिपुणो मध्यः पृथायाः सुतः
सख्यं मुख्यतयाऽकरोदिव हरेः सर्वासु तद्भक्तिषु ॥२०७॥

आपली प्रियवस्तु–आत्मानुभव–प्राप्त व्हावयाला परमेश्वराशीं सख्य करणें हेंच उचित आहे. ही गोष्ट पूर्वींच्या सर्व अवतारांतील अनुभवा-

वरून माझ्या प्रत्ययास आलेली आहे. मी इंद्राचा अंश असल्यामुळें, पूर्वीच्या अवतारामध्यें वालीच्या रूपानें श्रीरामचंद्राशीं विरोधभक्ति केली होती. त्यामुळें माझा नाश झाला. हीही गोष्ट मला स्मरतें. हें मनांत आणून कुंतीचा मधला मुलगा जो बुद्धिमान् अर्जुन त्यानें मुख्यत्वेंकरून सर्व भक्तीच्या निरनिराळ्या प्रकारांतील श्रीहरीची सख्यरूपानेंच भक्ति केली.

[ अथात्मनिवेदनं ] श्रियस्ताः शतं या विरागादिनिष्ठा
अधिष्ठाय भाव्यं मयेतीहसे चेत् ।
अहं श्रीश तेऽस्मीति नारायणाग्रे
सदा ब्रूहि कामं स्वमापूरयस्व ॥ २०८ ॥

[ आत्मनिवेदन. ]

[ विरागादि ] वैराग्य ज्ञान आदिकरून ज्या [ शतं ] म्हणजे शेकडो 'निष्ठा' आहेत [ तां ] त्या [ अधिष्ठाय ] माझ्या ठिकाणीं स्थिर होऊन [ श्रियः ] मी भूषणभूत व्हावें, असें [ ईहसेचेत् ] जर तूं इच्छित असशील तर, नारायणाच्या समोर रात्रंदिवस [अहं श्रीश ते–अस्मि–इति–ब्रूहि] 'हे लक्ष्मीपते ! मी तुझा आहे' असें म्हणत रहा, आणि आपला मनोरथ पूर्ण करून घे.

**श्लेष**–पण मी तसें म्हणत बसल्यानें ह्या शेकडो निष्ठेचें भूषण मला कसें प्राप्त होईल ? असें म्हणशील तर बाबा ! त्यांतच तुझे मनोरथ पूर्ण होतात. कसे ? तें शब्दांतच पहा. [ अहं–श्री–शते–अस्मि–इति ] ह्यांत मी त्या शेकडो वैभवानीं युक्त असाच अर्थ निघतो.

धृता याऽल्पात्मत्वादहह विपुलाशा भगवता
गताशंकं योऽहं सपदि सफलां तां व्यरचयम् ।
महाभूतस्यास्य त्रिभुवनगुरोः किं बलिरयं
निहन्यां तन्वाशामिति स सहसाऽत्मानमददात् ॥ २०९ ॥

बलिराजानें 'आत्मार्पण' केलें, म्हणजे आपला देह परमेश्वराला अर्पण केला, त्याचें कारण सांगतातः—

अहाहा! परमेश्वर वामन अवतार धारण करून म्हणजे लहानसें रूप धरून व मोठी आशा–म्हणजे पृथ्वीची आशा बाळगून माझ्याकडे आला. तेव्हां मनामध्यें कोणतीहि शंका न धरतां त्याची ती आशा मी तत्काल सफल केली. आणि आतां मी त्या महाभूत अशा त्रिभुवनपतीपाशीं लहानशी आशा-ती कोणती? तर हा माझा पंचभूतात्मक साडेतीन हात देह परमेश्वराला अर्पण करावा ही धरून गेलों तर तो ती विफल करील काय? कधीं करणार नाहीं. हें मनांत आणूनच बळीनें परमेश्वराला आत्मार्पण केलें.

**नाचर स्वहितजातघातकं पातकं तु निरये निपातकम् ।**
**शंभवे स्पृहय मानसानिशं शं भवेऽपि भवतो भवेद्धृशम् ॥२१०॥**

हे मना! आपल्या हिताचा घात करणारीं व नरकांत पाडणारीं पातक तूं कधीं आचरण करूं नकोस. तूं जर निरंतर शंभूचीच इच्छा करशील तर [ **भवेऽपि** ] संसारांत सुद्धां [ **शं भवेत्** ] कल्याणच होईल.

**आशाविरहितो यस्तु नाशस्तस्य न विद्यते ।**
**यतो न संति यस्याशा अनाशः सोऽभिधीयते ॥ २११ ॥**

आशा सोडून दिली ह्मणजे त्या मनुष्याचा नाश होणें कधींच शक्य नाहीं. कारण, ज्याला आशा नसते त्याला [ **अनाश** ] 'अन्-आश' असेंच म्हणतात. मग मूर्तीमंत [ **अनाश; अ–नाश** ] बनल्यावर त्याचा नाश कसा होणार?

**आशाविरहितो यस्तु स मुक्त इति तर्क्यते ।**
**आशा अपगता यस्य सोऽपाशः सद्भिरीर्यते ॥ २१२ ॥**

ज्या मनुष्याला आशाच नसते त्याला मुक्त असें म्हणतात. कारण, ज्याच्या आशेचा पाश तुटला त्याला [ **अपाश**=अप+आशा ह्मणजे गेलेली आहे आशा ज्याची ] असेंच सुज्ञ लोक म्हणतात. अर्थात् (अ+पाश) ज्याचे सर्व पाश नष्ट झाले, तोच मुक्त.

**याचनायां प्रवृत्तस्य का का नाम न दुर्दशा ।**
**चेतश्चेत्क्रियते यस्यां यातनैवोपतिष्ठते ॥ २१३ ॥**

'याचना' करण्यालाच जो उद्युक्त होतो, त्याची कोणकोणती म्हणून दुर्दशा होत नाहीं? [ चेतश्चेत् क्रियते तस्यां ] तिचेंच जर चिंतन केलें, तर ती याचना नव्हे, तर यातनाच असते.

श्लेष—शब्दावरूनसुद्धां ही गोष्ट स्पष्ट कळते. [ चेतश्चेत्=चेतः+चेत्,] 'याचना' ह्या शब्दांत 'च' ह्या अक्षराच्या ठिकाणीं [त] अक्षर घातलें तर [ यातना ] हेंच रूप होतें.

**आशा हि परमं दुःखं नैराश्यं परमं सुखम् ।**
**यदाशासहितस्तांतो निराशः शांत उच्यते ॥ २१४ ॥**

आशा ही अतिशय दुःखाला कारण आहे, आणि निराशाही अतिशय सुखाला कारणभूत आहे. जो [ आशा सहित ] असतो त्याला [ तांत ] ह्मणजे जिगजिगलेला व [ निराश ] असतो त्याला नेहमीं शांत असेंच ह्मणतात.

श्लेष--ह्यांत [ तांत ] म्हणजे जिगजिगलेला हा एक अर्थ आणि 'आशासहित' असतो तो [ त—अंत ] म्हणजे त्याच्या शेवटचें अक्षर 'त' असतें. ह्मणून तोही 'तांत' च होय. तसेंच जो 'निराश' असतो तो शांत [ श+अंत ] त्याच्या अंतींचें म्हणजे शेवटचें अक्षर [ श ] असल्यामुळें तोही [ शांत ] च होय. हें शब्दरचनेवरूनच स्पष्ट कळतें.

**स्त्री सतीयं ममस्त्रीति प्रतिभाति विनिश्चितम् ।**
**भवंति मूर्छिताः शूरा अपि यद्गवलाक्षिताः ॥ २१५ ॥**

ह्या श्लोकांत [ अस्त्री ] ह्या शब्दावर श्लेष आहे.

ही जरी स्त्री आहे, तरी ती खरोखर [ अस्त्री ] आहे असें वाटते. [ अ+स्त्री ] स्त्री नव्हे अशी. पक्षीं--पुरुषच आहे. आणि तो देखील असा तसा नव्हे तर [ अस्त्री ] म्हणजे अस्त्र धारण करणारा असा. हें कशावरून म्हणाल तर, [ गवलाक्षिताः ] जिच्या नेत्रकटाक्षरूपी बाणानें, पक्षीं-पंचबाणांच्या माऱ्यानें-मोठमोठे शूर लोकही मूर्छित होऊन पडतात. ह्या वरून स्त्री ही स्त्री नसून [ अस्त्री ] आहे हेंच खरें.

**यदधरतुलाप्रसंगात्सद्यः प्रज्ञां हरत्यहो तुंडी।**
**तस्याः साक्षात्संगः किं किं न हरेदिदं न जानीमः ॥२१६॥**

अहो! ह्या तोंडल्याची स्त्रीच्या ओठाला नुसती उपमा देतात, पण तेवढ्यानेंच तें मनुष्यांची बुद्धि नष्ट करून सोडतें. मग त्याच्याशीं प्रत्यक्षच प्रसंग पडला तर आणखी काय काय नष्ट करील कोण जाणे?

तोंडलें खाल्लें असतां जीभ जड येते, व बुद्धि मंद होते असें लोकांत ही म्हणतात. वः—

**सद्यः प्रज्ञाहरी तुंडी सद्यः प्रज्ञाकरी वचा.**

" तोंडल्यानें तत्काळ बुद्धि नष्ट होते व वेखंड ( का अक्कलखार? ) खाल्ल्यानें तत्काल बुद्धि तीव्र होते," असें वैद्यशास्त्रांतही म्हटलें आहे.

**यच्चेहैव जघन्यकर्मवशतोऽधःपातमेति स्वयं**
**सद्यः संगभृतां तनोति महतां पुंसां च्युतिं तेजसाम् ।**
**इत्थं नित्यममंगलं समुदितानंगं कुरंगीदृशा-**
**मंगं तत्र तु संगमः सुमनसां मा भूत्प्रसंगादपि ॥ २१७ ॥**

ह्या श्लोकांत श्लेष फारसा कोठें नाहीं, तरी ' अंग' हा अनुप्रास फार हृदयंगम साधला आहे ह्यांत शंका नाहीं.

ज्याचें सुख घेतलें असतां मनुष्य तत्काल अधःपाताला जातो, जिचा संग घडण्या पूर्वींच—पाहिल्या बरोबर—वीर्यपात होतो, आणि जें मनांत कामाचा अतिरेक उत्पन्न करतें, त्या स्त्रीच्या शरिराची संगती सज्जनांना चुकून सुद्धां कधीं घडूंनये.

**मुखेन रम्या याः कांता नित्यं रेफांतराश्च याः ।**
**नरका इति ता मन्ये तासु सज्जेत कः पुमान् ॥२१८॥**

**पहिला अर्थ**—( **मुखेन रम्या** ) तोंड मोठें मनमोहक; परंतु ( **रेफांतरश्च** ) अंतःकरणांत नेहेमीं कुत्सित वासना भरलेली; अशी जी ( **कांता** ) म्हणजे स्त्री असेल ती मूर्तिमंत ( **नरक** ) च होय. तिच्यावर कोणता पुरुष आसक्त होईल?

**दुसरा अर्थ**–[ **मुखे न रम्या** ] जिच्या तोंडामध्यें नेहेमीं नकारच शोभतो. प्रत्येक गोष्टीला ' नाहीं असें स्पष्ट ह्मणणारी, आणि [ **रेफांतरश्च** ] आणि मनांत कुढाभाव ठेवणारी, अशी जी ' कांता ' असेल ती शब्दावरून सुद्धां ' नरक ' रूपच आहे. कारण, ' मुखे' ह्मणजे तोंडाशीं–आधीं पहिलें अक्षर ' न' आणि ' मध्यें रेफांतर' रेफ ह्मणजे रकार–' र' हे अक्षर- आणि ' कांता' [क–अंता] शेवटीं जिच्या 'क' आहे अशी. तेव्हां ती प्रत्यक्ष ' नरक' रूपच नव्हे काय? अशा स्त्रीयेशीं कोणता शहाणा नर ह्मणजे पुरुष आसक्त होईल? कोणीच व्हावयाचा नाहीं असा भाव.

**हा हंत संहारमुरोजमंडलं स्त्रियाः क्रमं लोचनयोश्च रौरवम् ।**
**पश्यन्बतास्यां रमतेतरां जनो मनोभवो हंत दुरंतविक्रमः॥२१९॥**

**पहिला अर्थ**—हाय हाय ! ह्या स्त्रिया कशा आहेत ? तर [ **सम्–हारम्–उरोज–मंडलं** ] स्तन प्रदेशावर उत्तमोत्तम हार घालणाऱ्या; आणखी कशा ? तर [ **लोचनयोश्च रौरवम्** ] रुरु नांवाच्या हरिणी-प्रमाणें मनमोहक आहेत नेत्रकटाक्ष ज्यांचे; अशा.

**दुसरा अर्थ**—अरेरे ! ह्या स्त्रिया कशा आहेत ह्मणाल तर [ **संहारं-उरोज -मंडलं** ] ह्यांचें स्तनमंडळ शुद्ध ' संहार ' म्हणजे मूर्तिमंत मृत्यूच होय. आणि [ **लोचनयोश्चरौरवम्** ]त्यांचे नेत्रकटाक्ष म्हणजे प्रत्यक्ष नरकच होय. हे डोळ्यापुढें दिसत असूनही लोक त्यांच्यावर लोलुप होतात, तेव्हां त्या मदनाचा प्रभाव निखालस अघटितच म्हटला पाहिजे. दुसरें काय ?

**एकांतेऽकगता स्वविभ्रमभरं संदर्शयंती मुहुः**
**सीत्कारं नखलेखने विदधती व्यक्तानुरक्ता सती ।**
**आनंदं जनयेत्क्षणं मधुरतावेशेन पामेव रे**
**रामेयं पुनरंततः किमपि यत्कुर्वीत तच्चिंतय ॥ २२० ॥**

ह्या श्लोकांत ' पामा' ह्मणजे खरूज व ' रामा ' म्हणजे स्त्री ह्यांचें सादृश्य वर्णून त्यांचें क्षणिक सुख व मागून होणारें दुःख दाखविलें आहे.

**पहिला अर्थ**–स्त्री कशी असते? तर '**एकांतेऽकगताः**' एकांता मध्यें मांडीवर बसणारी;[ **स्वविभ्रमभरं** ]नानाप्रकारचे मोह उत्पन्नकरणारे विलास [ **मुहुः** ] पुनः पुन्हा [ **सदंर्शयति** ] दाखविणारी; आणखी कशी ? [ **नखलेखनेषु** ] आपण श्रृंगार चेष्टा केल्या असता [ **सीत्कारं** ] नको नको,छे, छे ह्मणून [**व्यक्तानुरक्ता विदधाति**] आपलें प्रेम व्यक्तकरणारी 'अरे' त्या [ **मधुरावेशेन** ] त्या गोडीच्या भरांत [**क्षणं आनंदं जनयेत्** ] क्षण मात्र आनंद वाटतो खरा, पण ही [**रामा**] ह्मणजे स्त्री [**पामेव**] ह्मणजे खरजे प्रमाणेंच आहे. कारण तेवढा आनद संपला कीं पुढें काय होईल ह्याचा कांहीं विचार कर.

**दुसरा अर्थ**–[ **पामा** ] ह्मणजे खरूज. ही कशी आहे? तर [ **एकांतेऽकगता**] गुह्य प्रदेशांत व सांध्या सांध्यांत उत्पन्न होणारी; [**स्वविभ्रमभरम्**] अधिक कंडू उत्पन्न करणारी; [ **नखले खने** ] खाजावाययास लागलें ह्मणजे [ **सीत्कार** ] ह्मणजे 'हा' 'हा' असें करावेसें वाटतें. [**व्यक्तानुरक्ता**] रक्त निघालेंल दिसलें तरी पुन्हा पुन्हा खाजवावेसेंच वाटतें. त्यागोडीमध्यें खाजविण्याच्या आवेशांत आलें ह्मणजे क्षणभर आनंद वाटतो खरा, परंतु मागाहून काय होतें त्याचा विचार करा. ह्मणजे सारखी भग भग मात्र मागें लागते, असें अनुभवास येईल.

**नूनमुन्नतपयोधरो भवेत्कारणं घनरसस्य भूयसः ।**
**तेन पूर्णतमता जलाशये तत्र विप्लुततया निमज्जनम् ॥२२१॥**

**पहिला अर्थ**– [ **उन्नत पयोधरः** ] स्त्रियांचे उच्चस्तन हेच [**घनरसस्य कारणं भवेत्** ] विषय वासनेला कारणीभूत होतात. आणि [**जलाशये** ] जड–' आशये' मूर्ख लोकांच्या हृदयांत 'पूर्णतमता' त्याचा अतिरेक झाला ह्मणजे [ **विप्लुततया निमज्जनम्** ] त्यांतच ते बुडून जातात.

**दुसरा अर्थ**– [ **उन्नत पयोधरः** ] भरून आलेले मेघ हेच [ **घनरसस्य कारणं भवेत्** ] पर्जन्याच्या अतिवृष्टीला कारणीभूत होतात. आणि त्या वृष्टीनें सारे जलाशय ( नद्या सरोवरें ) तुडुंब भरले ह्मणजे सारेंच बुडण्याची पाळी येते.

**यो रामभजने सक्तः स रामां दूरतस्त्यजेत् ।**
**रामाभक्तिर्यतो वक्ति भक्त्यभावं रघूत्तमे ॥ २२२ ॥**

श्रीरामचंद्राच्या भजनामध्यें जो रंगलेला असतो, त्यानें स्त्रीला दूर सोडून द्यावें. पण जो [ **रामाभक्ति** ] करतो, ह्मणजे स्त्रियेचा दास बनून राहतो तो [ **राम–अभक्ति** ] रामाच्या भक्तीचा अभाव असलेला स्पष्टच सांगतो. हें शब्दावरूनच उघड होतें.

**उद्वाहः प्रथमार्तवोत्सवविधिर्गर्भाहितिः पुंसवः**
**सीमंतोन्नयनं प्रसूतिरसकृज्जातक्रियाश्चाखिलाः ।**
**आकल्पा मणिमौक्तिकादिखचिता वासांसि सूक्ष्मोत्तमा-**
**न्येवं वै पुरुषार्थहानिकरणे सृष्टाः स्त्रियो वेधसा ॥ २२३ ॥**

[ स्त्रिया ह्या ब्रह्मदेवानें केवळ पुरुषार्थाची हानि करण्यासाठींच निर्माण केल्या आहेत असें ह्यांत सांगितलें आहे. ह्यांत ' पुरुषार्थहानि' ह्मणजे जिच्या योगानें पुरुषाकडून एखादें महत्त्वाचें किंवा शूरत्वाचें काम होत नाहीं हा एक अर्थ, आणि पुरुषाच्या अर्थाची म्हणजे द्रव्याची हानि होते, हा दुसरा अर्थ. येवढाच काय तो श्लेष आहे. ]

स्त्री करावयाची म्हटलें कीं आधीं लग्नाचा समारंभ म्हणजे खर्चाचें तोंड. नंतर ऋतुप्राप्ती झाली म्हणजे मखर वगैरे करण्याचा थाट, पुढें गरोदरपण आलें म्हणजे डोहळेजेवण, वनभोजन, बाळंतीण झाली म्हणजे पुंसवनाचा विधि. बाळंतपणांतील औषध पाणी; शेकशेगडी; शिवाय त्या संबंधानें अनेकवार होणाऱ्या जातक क्रिया; जन्मपत्रिका, शांति, पुण्याहवाचन वगैरे. ह्या शिवाय बारिक बारिक तलमदार कापडांच्या उंची उंची लुगडी चोळया, जडावाच्या, सोन्यारुप्याच्या व मोत्यांच्या दागिन्यांना तर सीमाच नाहीं. हा स्त्रियांचा पुरुषाच्या मागें इतका लकडा लागतो की, पुरुष जरी लाखोपति असला तरी सुद्धां भिकेला लागतो. आणि त्याच्या हातून पुरुषार्थाचें काम असें कांहींच होत नाहीं.

**लोके प्रथमताभाजः कांता रसहितांतराः ।**
**तारका इति ता मन्ये दुस्तरे भवसागरे ॥ २२४ ॥**

**पहिला अर्थ**—[ **लोके** ] लोकांमध्यें [ **प्रथमताभाजः** ] सुशीलतेमध्यें पाहिलें पद मिळविलें आहे जिनें; आणि [ **रसहित–अंतराः** ] पतीचें हित करण्याविषयीं गोडीनें जिचें अंतःकरण भरलेलें आहे; अशी [**कांता**] म्हणजे स्त्री ह्या [ **दुस्तरे भवसागरे** ] बिकट किंवा अपरंपार भरलेल्या संसार सागरामध्यें [ **तारका** ] म्हणजे तारणारी नौकाच होते.

**दुसरा अर्थ**—[**प्रथम–ता–भाजः**] प्रथमतः म्हणजे पहिलेंच जिच्या मध्यें [**ता**] हें अक्षर आहे अशी; आणखी [**कांता का अंता**] 'का' हे अक्षर आहें शेवटीं जिच्या अशी; आणखी कशी ? तर [ **र–सहित–अंतरा** ] [ **र** ] हें अक्षर आहे जिच्यामध्यें, अशी स्त्री [ **तारका** ] म्हणजे नौका होईल ह्यांत नवल तें काय ?

**परमैव या स्वभावादपकारं प्रापिता यदपि ।**
**सा किं स्वावस्थित्या दैन्यापादनकरी भवेत्पुंसः ॥ २२५ ॥**

**पहिला अर्थ**—[ **स्वभावात्–परमा–एव** ]स्वभावानेंच उदार अशी स्त्री [ **अपकारं–प्रापिता–अपि** ] नवऱ्यानें कांहीं दुःख दिलें तरी, [ **स्वावास्थित्या** ] आपल्या उदार स्वभावामुळें [ **पुंसः** ] पुरुषाला–आपल्या पतीला [ **दैन्य–अपादान–करी–किं** ] दैन्य उत्पन्न करील काय ? कधींही करणार नाहीं.

**दुसरा अर्थ**—[ **स्वभावात्** ] जी मूळचीच [ **परमा–एव** ] श्रेष्ठ आहे, थोर आहे, ती स्त्री [ **अ–पकार** ] केला तरी, म्हणजे पकाररहित केली, अर्थात् तिच्या नांवांतील अक्षरांतून [ **प** ] हें अक्षर काढून टाकलें तरी ती पुरुषाला दारिद्र्यांत ठेवील काय ? कधींही ठेवणार नाहीं. 'परमा' ह्या शब्दांतील 'प' अक्षर काढलें तर 'रमा' म्हणजे लक्ष्मी हीच शिल्लक राहते. मग ती लक्ष्मी पुरुषाला दैन्य कसें देईल ? देणार नाहीं हे शब्दरचनेवरूनच कळतें.

**पुत्रदारादिसंबंधोऽमृतश्च्युदिव भासते ।**
**तत्प्रसंगः पुनः पुंसां सेहुंड इव तापदः ॥ २२६ ॥**

बायकामुलांचा संबंध द्रिसण्यांत असा कांहीं गोड दिसतो कीं, जणों

काय अमृताची किंवा दुधाची धारच ! परंतु त्यांच्याशीं चांगलें संघट्टन झालें कीं तो [सेहुंड] म्हणजे शेरासारखा त्रासदायक वाटतो. शेराचा रस दुधासारखाच दिसतो परंतु आंगाला लागला कीं, त्यानें ' हाय हाय ' करावयाला लावलेंच !

मोदिष्यसे मनश्चेत्स्यात्सदामोदरसद्रवम् ।
रोदिष्यासि त्वं त्द्दयदारकार्तस्वरो ध्रुवम् ॥ २२७ ॥

हे मना ! तूं जर [ स–दामोदर–सत्–रवम् ] दामोदर असा जो श्रीकृष्ण भगवान त्याच्या शब्दानें–नामानें–सहित होशील तर तूं मुक्त होऊन [ श्लेष ] [ सदा–मोद–रसद्रवम् ] सदासर्वदा आनंदांतच राहशील. आणि तूं जर [ हृदय–दार–कार्तस्वरः ] हृदयामध्यें कनक आणि कांता ह्यांचेंच ध्यान करीत बसशील तर नेहेमीं [ श्लेष ] [ हृदय दारक–आर्तस्वरः ] तुला हृदयभेदी आर्तस्वरानें रडतच बसावें लागेल !

स्यात्पुंसां तु यथा यथाऽधिकतरो योषित्कुमारादिषू-
ल्लेखस्तत्र तथा तथा नवनवा प्रादुर्भवेन्माधुरी ।
तत्पश्चादनुरक्तता तु यदहो संतापयुग्जीवनम्
प्रेष्ठं तत्र निदर्शनार्थमवमां पामां समालोकये ॥ २२८ ॥

अहो ! पुरुषाचा बायकांमुलांकडे जसजसा अधिकाधिक ओढा लागत जातो, तसतशी त्यांत नवी नवी गोडीच उत्पन्न होत जाते. परंतु शेवटीं तें प्रेमच मनाच्या संतापाला कारणभूत होतें. ह्याचें प्रत्यक्ष उदाहरण पहावयाचें असल्यास खरजेकडे पहावें म्हणजे झालें.

कारण खरजेचा प्रकार असाच असतो. [ उल्लेख ] म्हणजे परिचय हा एक अर्थ, आणि खाजवणें हा दुसरा अर्थ. [ अनुरक्त ] म्हणजे आसक्ति हा एक अर्थ आणि लाल होणें हा दुसरा अर्थ. हे शब्द लक्ष्यांत ठेवले म्हणजे खरजेकडे अर्थ लागतो तो असाः—

खरजेला जसें जसें अधिकाधिक खाजवावें तसतशी त्यांत अधिकाधिकच गोडी उत्पन्न होऊन पुन्हा पुन्हा खाजवावेंसेंच वाटतें. परंतु अखे

ती जागा लाल होऊन शेवटीं अतिशय त्रास होतो. हा अनुभव सर्वांस आहेच.

पुरुषझषः संसाराकूपारप्रसृतकामिनीजाले ।
पतितोऽपि बलान्निरियाद्बालिशवेधः परं विनाशाय ॥ २२९ ॥

[ संसार-अकूपारे ] संसाररूप महासागरांत [ प्रसृत-कामिनी जाले ] पसरलेल्या स्त्रीरूपी जाळ्यामध्यें [ पुरुष-झषः ] पुरुषरूपी मत्स्य [ पतितोऽपि ] सांपडला तरी सुद्धां मायापाशाचा गुंता तोडून [ बलान्निरयात् ] जोरानें बाहेर पडतो. [ परं ] परंतु [ बालिशवेधः ] मुलाबाळांचा पाश ज्याला तुटत नाहीं तो [ विनाशाय ] मरण पावतो.

श्लेष— [ बालिश वेधः ] 'ल' च्या ठिकाणीं 'ड' केला म्हणजे-[बाडिश-वेधः] बाडिश म्हणजे गळ. मुलाबाळांसंबंधीं गळ ज्याला टोंचेल तो मरण पावतो. अर्थात् मायापाश ज्याला तुटत नाहीं त्याचा नाश होतो.

वित्तं चित्तभ्रमकरं जिज्ञासो मा स्म संग्रहीः ।
वित्तस्य तस्य तु त्यागे नूनं विदुपलभ्यते ॥ २३० ॥

ज्ञानेच्छु गृहस्था ! [ वित्त ] म्हणजे द्रव्य हेंच चित्ताला भ्रमांत पाडणारें आहे. ह्या करितां त्याचा तूं संग्रह करूं नकोस. [ वित्तस्य तस्यतु त्यागे ] त्याच धनाचा त्याग केलास तर [ वित् उपलभ्यते ) ज्ञानप्राप्ती होईल.

श्लेष-[ वित्तस्य तस्य तु त्यागे ] वित्त ह्या शब्दांतील ( त ) टाकुन दिलास,--'त' हें अक्षर सोडलेस- तर 'वित्' म्हणजे ज्ञानच शिल्लक राहतें.

कोऽयं हंत महामोहग्रहग्रस्तोऽखिलो जनः ।
अर्थस्यार्थे कदर्थः सन् परमार्थं त्यजत्यहो ॥ २३१ ॥

हाय हाय ! हा महामोहरूपी नक्र केवढाहो जबरदस्त आहे ? त्यानें सर्व जनांनां कसें ग्रासून टाकले आहे पहा ! [परमार्थ] द्रव्य मिळविण्याकरितां सर्वांत श्रेष्ठ जें धन (परम-अर्थ) परमार्थ, त्याच्यावरही लोक लाथ मारतात ! तेव्हां हा मोह किती जबरदस्त !

मधुपोऽपि कुजन्मिसंगतोऽपि प्रविजह्याद्यदसौ सुवर्णगंधम् ।
अमुना किमुनामना ( ? ) त्तगंधाः शतधाऽमी सुमनोगणाः क्रियेरन्
॥ २३२ ।

पहिला अर्थ—[मधुपः अपि] मद्यपि असला तरी, किंवा [कुजन्मि संगतोऽपि ]नीच कुलांत जन्मलेल्या लोकांच्या सहवासांत असला तरी सुद्धां जर तो [सुवर्ण गंधम्] सोन्याला हात लावावयाचें सुद्धां [ प्रविजह्यात् ] सोडून देईल तर त्यानें [ शतधा ] शेकडो वेळां सुमनोगणाः ] साधु लोकांना [न आत्तगंधाः] जिंकलें असें होत नाहीं काय ? अवश्य होतें.

दुसरा अर्थ—[ मधुपः अपि ] यःकश्चित् भ्रमर–कीटक असून ही त्यानें [ कुजन्मि--संगतोपि ] वृक्षांच्या परिचयामुळें [ सुवर्णगंधम् ] सोनचाफ्याचा फुलाचा वास घेण्याचें मुळींच टाकलें, तरी तो इतर शेकडों फुलांचा वास घेणार नाहीं कीं काय ? घेईलच. ( भ्रमर ह सोनचाफ्याच्या फुलांचा वास घेत नाहीं असें म्हणतात ह्यास अनुलक्षून ह्या श्लोकाची रचना केलेली आहे. )

अविवादि धनं यत्तु नैव स्यात्ताद्विबाधनम् ।
यन्निकारेण मिलितं तद्धनं निधनं भवेत् ॥ २३३ ॥

पहिला अर्थ—[ यत्तु अविवादि धनं स्यात् ] ज्यांत तंटाबखेडा नाहीं, वादविवाद नाहीं, असें द्रव्य असेल तर तें [ न एव विबाधनम् ] कांहीं पीडा देणार नाहीं. परंतु तेंच द्रव्य जर [ निकारेण मिलितं ] कपटानें मिळविलेलें असलें तर तें [निधनं भवेत् ] मृत्यूस कारण होतें.

दुसरा अर्थ—जें [ अविवा–आदि ] अविव हीं अक्षरें ज्याच्या पूर्वी आहेत [ अविवा धनं ] ( व आणि ब ह्या अक्षरामध्यें भेद नाहीं ह्या नियमाप्रमाणें ) तें धन दुःखास कारणीभूत होत नाहीं, आणि [ निकारेण मिलितं धनं ] म्हणजे [ नि ] अक्षर ज्याच्या मागें लागतें तें धन म्हणजे [ नि-धन ] त्याला शब्दावरून प्रत्यक्ष मृत्यूचेंच स्वरूप येतें. मग अनुभवानें तें प्रत्ययास येईल ह्यांत शंका ती कसली !

**रे नानारामाणां मुख्यमधुनि सौम्य पाद्मकोशेषु ।**
**लंपटतया द्विरेफो भ्रमरवदिह बत नरोऽपि सन्मा भूः ॥२३४॥**

**पहिला अर्थ**—हे भल्या मनुष्या! तूं पुरुषासारखा पुरुष असून अरेरे ! [ **नाना रामाणां** ] अनेक प्रकारच्या स्त्रियांच्या [ **मुख्यमधुनि** ] मुखांतील जें अमृत त्यांत किंवा [ **पाद्मकोशषु** ] द्रव्यभांडारांत [ **भ्रमर इव** ] भ्रमराप्रमाणें लंपट होऊन राहूं नकोस.

ह्या श्लोकांत [ **द्विरेफ** ] म्हणजे भ्रमर आणि [ **नर** ] म्हणजे पुरुष ह्या मुख्य दोन शब्दावर फारच मौजेचा श्लेष साधला आहे. ह्या शिवाय [ **ना ना रामाणां** ] अनेक प्रकारच्या स्त्रियामध्यें व [ **नाना—आरामाणां** ] नानाप्रकारच्या उपवनामध्यें इत्यादि श्लेष ही आहेतच. त्यास अनुसरून—

**दुसरा अर्थ**—भ्रमर कसा आहे ? तर [ **नाना—आरामाणां** ] अनेक प्रकारच्या उपवनामध्यें [ **मुख्य मधुनि** ] अत्यंत मधुर जो मध त्यांत [ **पाद्मकोशः** ] व कमलाच्या मकरंदामध्यें लंपट होऊन राहणारा.

[ **द्विरेफ** ] म्हणजे पुढें दोन मिशा आहेत ज्याला तो भ्रमर. ( श्लेष ) रेफ म्हणजे दोष. दोन दोष ज्यामध्यें आहेत असा मनुष्य—कनक व कांता ह्यांना लुब्ध होणारा. तेव्हां हे नरा ! तूं हे दोन दोष करूं नकोस. शिवाय [ **नर** ] ह्या शब्दांतही फारच उत्कृष्ट श्लेष आहे. तूं ( न—र ) असा असावास. अर्थात् ' र ' म्हणजे दोष मुळींच नाहीं असा तूं खरोखर निष्कलंक पाहिजेस. असें असतां तूं तर ' द्विरेफ ' म्हणजे दुप्पट दोषांनीं युक्त कसा होतोस? वास्तविक तुझ्या जवळ एकही दोष नाहीं असें तुझें मुळचें स्वरूप. असें असतां तूं एकच नव्हे तर दोन दोष करतोस तेव्हां हें किति आश्चर्य ? किंवा तूं मनुष्य असून यःकश्चित् [**भ्रम—र** ] भ्रमाच्या दोषानें युक्त म्हणजे भ्रमिष्ट कसा होतोस? असा भाव.

**स्रष्टा सर्वस्वहान्यै स्वत इव जगतो निर्ममौ (मे) वस्तुनी द्वे**
**शस्त्रीत्येकं तथान्यान्निधनामीति ततः शंकितः को नु चैते ।**

स्वीकुर्वीतेति वर्णं प्रथममथ तयोः कोविदो गोपनार्थं
विच्छिद्यापातरम्यैर्मधुरिमानिवहै रंजयामास भूयः ॥ २३५ ॥

ब्रम्हदेवानें सर्वस्वाची हानि करण्याकरितां म्हणून ह्या जगांत दोनच वस्तु निर्माण केल्या. त्या कोणत्या ? तर एक [ शस्त्री ] म्हणजे तरवार. आणि दुसरी [ निधन ] म्हणजे मृत्यु. पण त्या निर्माण करतांच त्याच्या मनांत एक शंका आली. ती ही कीं, ह्या इतक्या भयंकर वस्तु मी निर्माण केल्या खऱ्या, पण त्यांना हातांत धरणार कोण? जो तो त्यांना पाहून भिऊन लांब लांबच पळेल. तेव्हां त्यांच्या भागांतील थोडा तरी अंश दडवून ठेवावा. म्हणून त्या चतुर कारागिरानें त्यांच्यातील पाहिला वर्ण—रंग—पक्षीं एक अक्षर—छाटून टाकून—अदृश्य करून टाकल्या मुळें त्या वस्तु माधुर्याचा केवळ ठेवाच अशा वाटूं लागल्या.

[ शस्त्री ] व [ निधन ] ह्यांतील पाहिलें अक्षर काढून टाकलें म्हणजे [ स्त्री ] व [ धन ] हे पदार्थ दिसूं लागतात. त्यांचे मूळचे स्वभाव खरोखर शस्त्री म्हणजे तरवार व निधन म्हणजे मृत्यु प्रमाणेंच आहेत. परंतु ब्रम्हदेवानें लोकांस आवडण्याकारितां त्यांच्यांतील एक एक अक्षर कमी केलें आहे. अशी येथें उत्प्रेक्षा साधली आहे.

तत्राशेषा विदग्धा अपि बत विविधापातमाधुर्यमुग्धाः
स्निग्धाः संतो रमंते कलयति कुशलः कोऽपि नैतत्स्वभावम् ।
विच्छिन्नं वर्णयुग्मं तदिह शनिरभूद्दृष्टिमार्गे गतोऽसौ
कीदृक्षोऽस्तीति पूर्णं विमृश मम सखेऽद्यापि बुध्यस्वतूर्णम् ॥ २३६ ॥
युग्मम् ।

ह्या उरलेल्या दोन पदार्थामध्यें म्हणजे स्त्री आणि धन ह्यांच्यामध्यें-कांहीं विलक्षण माधुर्य असल्यामुळें मोठमोठे विद्वान् ही त्यावर लंपट होऊन जातात. फार तर काय ? पण मोठमोठे साधु व चाणाक्षलोकांना सुद्धां त्यांचा खरा स्वभाव कळत नाहीं. तो त्यांचा स्वभाव कसा आहे तें पहावयाचें असल्यास, त्यांच्यांतून काढलेलीं दोन अक्षरें जीं

[ श–नि ] त्या शनीकडे दृष्टी फेकावी म्हणजे त्याच्या स्वरूपावरून ह्या वरच्या दोन वस्तूंची ओळख पटेल. तो शनि कसा असतो, ह्याचा हे गड्या ! तूंच पुरता विचार कर म्हणजे झालें. ह्यानें थोडीशी मनुष्यावर वक्र दृष्टि फेकिली पुरे, कीं त्याच्या सर्वस्वाचा नाश होतो. हा फक्त त्यांच्यांतील एक एका तुकड्याचा प्रभाव! मग सबंध ह्या दोन वस्तु ती हानिकारक होतील ह्याचा लौकर विचार करावा.

**सृष्ट्वा पक्षिमृगादिकानि विविधानीशः पुराण्यात्मनाऽ-**
**तुष्टस्तैरुचितांतरोऽथ पुरुषः सृष्टोऽभवत्तुष्टये ।**
**सोऽयं चेन्निजलिंगहायमहह स्यादीसमेतांतर-**
**स्तुष्ट्यै स्यात्कथमीश्वरस्य परमामोदोद्गमोल्लासिनः ॥२३७॥**

ईश्वरानें प्रथमतः पशु पक्षीं इत्यादि नानाप्रकारचे प्राणी [**उचितांतरः**] आपल्या मनाप्रमाणें निर्माण केले. तरी त्याच्या मनाची व्हावी तशी तृप्ती झाली नाहीं. म्हणून त्यानें 'पुरुष' हा आत्मनिरीक्षण समर्थ असा निराळ्याच प्रकारचा प्राणी निर्माण केला. तेव्हां त्यास आनंद झाला. परंतु हाय हाय! त्यानें ( **निजलिंग हा** ) आपली आत्मपरीक्षण रूप खूण टाकली, आणि तो ( **ई–समेत–अंतरः** ) असा झाला. म्हणजे इच्छेचा दास बनला. तेव्हां ( **परमामोदोद्गमोल्लासिनः**) परमानंद स्वरूप जो परमेश्वर त्याला कसा बरे आनंद होईल ?

**दुसरा अर्थ**—परमेश्वरानें [ **उचित–अंतरः** ] ज्याच्यामध्यें 'उ' कार टेविला आहे असा 'पुरुष' निर्माण केला असतां तो [ **ई–समेत–अंतरः**] असा झाला. म्हणजे त्यानें उकार होता तेथें 'ई' कार करून घेतला. म्हणजे 'पुरुष' ह्या शब्दांत मध्यंतरी 'उ' कार होता तेथें त्यानें 'ई' कार करून घेतला. अर्थात् 'पुरुष' होता तो [ **पुरीष** ] बनला. पुरीष म्हणजे विष्ठा! अर्थात् 'नरक!' रूप झाला हा भावार्थ. तेव्हां त्याचा परमेश्वराला तरी कसा आनंद होईल ? व तो तरी परमानंदाला कसा पात्र होईल ? हा ध्वनितार्थ.

त्यजाक्षवशतां तात या महानर्थकारिणी ।
यया विनष्टसर्वस्वा युधिष्ठिरनलादयः ॥२३८॥

ह्या श्लोकांत [ अक्ष ] म्हणजे इंद्रियें व [ अक्ष ] म्हणजे फासे किंवा द्यूत येवढाच काय तो श्लेष आहे.

हे ( तात ! ) बाबा ! [ अक्षवशतां ] इंद्रियाधीनपणा हा मोठा अनर्थकारक आहे. ह्या कारितां तो सोडून दे. पक्षीं—[ अक्षवशतां ] द्यूत खेळण्याचा नाद टाकून दे, तो महा अनर्थकारक आहे. त्याच्या योगानें धर्मराजासारख्या व नलराजासारख्या महात्म्यांच्याही सर्वस्वाचा नाश झाला आहे.

जगत्यामत्र जनता मता का मरणोन्मुखी ।
प्रश्नवागियमेवैतदुत्तराय प्रजायते ॥ २३९॥

ह्या श्लोकांत एक प्रश्न असून त्याचें उत्तरही श्लेषार्थानें त्यांतच गोवलेलें आहे. तें असें:—

[ जगत्यां अत्र ] ह्या जगामध्यें [ मरणोन्मुखी ] मरणोन्मुख असे [ जनता का? ] लोक कोणते? असा जर प्रश्न केला तर प्रश्नरूप वाक्यांतच त्याचें उतर निघतें. तें कोणतें? तर [ काम—रणोन्मुखी ] विषय वासनेच्या झगड्याला उन्मुख असतात ते.

वृथैव रे कामरतोऽसि शत्रुं दुरासदं तं भगवानवादीत् ।
जनो महाराष्ट्रगतोऽपि न त्वां किमाक्षिपत्येष कृपार्द्रचित्तः॥२४०॥

भगवंतांनीं म्हटलें आहे कीं अरे! [ दुरासदं शत्रुं ] काम हा शत्रु जिंकावयाला अत्यंत कठीण असा जो [काम—रतः—आसि] काम, त्यामध्यें [वृथैव] व्यर्थ रममाण कां होतोस ? महाराष्ट्रांत राहणारे लोक सुद्धां तुझी कळकळ येऊन ते तुला तसेंच म्हणून—म्हणजे [कां मरतोसि?] उगीच कां मरतोस? असें म्हणून तुझा धिःकार करणार नाहींत काय? अवश्य करतील.

रागो न्यक्क्रियतामये द्विजनिना दोषास्थितेर्ज्ञापकः
पश्यास्य क्षणिकप्रसंगवशतः सन्मार्गवर्त्यप्यसौ ।
आदित्यो मधुपौघचुंबितमहापद्मिन्यभीष्टाय य-
त्कोशेषु स्वयमर्पयन् श्रियमयं न प्रेक्ष्यतां गाहते ॥२४१॥

पहिला अर्थ—अहो! ब्राम्हणांनीं काय करावें? तर [रागोन्यक्रियताम्] कामाचा तिरस्कार करावा. त्याचा पगडा बसला कीं, मनाची स्थिति बि

घडलीच म्हणून समजावें. पहा! ह्या कामाचा एक क्षणभर जर संसर्ग घडला तर सन्मार्गवर्ति असलेला [ आदित्य ] तिन्ही वेदांचा आत्मा—केवळ प्रतिसूर्य—असा ब्राह्मण मद्यपि बनून वेश्यांचें चुंबन घेण्यास सुद्धां प्रवृत्त होतो. आणि [ अभीष्टाय ] तिला वश करण्याकरितां तिच्या भांडारामध्यें आपणहून आपलें द्रव्य कोणी न पाहील अशा रितीनें टाकून देऊन बुडतो !

दुसरा अर्थ [द्विजनिनाद] भ्रमरांचा गुंजारव;अहाहा! हीं [उषःस्थितिः] सकाळ झाल्याचीं [ज्ञापक] सूचक चिन्हें आहेत. पहा ! [क्षणिक प्रसंगवशतः] हा क्षणमात्र जो क्षितिजावर तांबडा रंग दिसतो तो [सन्मार्गवर्तीः] आकाशामध्यें असणारा असा [ आदित्यः ] आदित्य, तो [ मधुप—ओघ —चुंबित ] भ्रमरांचे समुदाय ज्यांतील रस चाखित आहेत अशा [ महा पद्मिनी] मोठ्या कमलिनी, त्यांचें [ अभिलषित ] हित करण्याकरतां [यत् कोशेषु ] त्यांच्या कोशामध्यें आपण होऊन [ गाहते ] किरणरूपानें बुडून त्यांना [ स्वयंश्रियम् अर्पयन् ] आपण होऊन शोभा देतो. परंतु आतां त्या आदित्याला [ न प्रेक्ष्यताम् ] पाहूं नये. म्हणजे उगवणाऱ्या सूर्याला पाहूं नये, त्याच्या आधीं उठावें असा भाव.

[नेक्षेतदुद्यतं आदित्यं] उगवत्या सूर्याला पाहूं नये. अशी श्रुति आहे.

**कामः क्रोधश्च लोभस्त्रयमपि परमं कष्टमाहुस्तथापि**
**द्वावाद्यौ तत्र सौम्यौ कथमपि हि परं त्वंतजोऽत्यंतचंडः ।**
**यत्स्यातां पंगुलौ द्वौ रतिरसविरतावादिमोऽन्यो विरोधि-**
**ध्वंसे त्वेतस्य लाभादुपरि पदचतुष्कप्रतिष्ठा हि दृष्टा ॥२४२॥**

काम, क्रोध आणि लोभ हे तिन्ही मोठे कष्टप्रद आहेत असे जरी सर्व लोक ह्मणतात, तरी पाहिले दोन बरेच सौम्य आहेत. परंतु शेवटचा जो आहे तो फारच जबरदस्त आहे. कारण, त्या दोघांना त्यांच्या त्यांच्या इच्छित वस्तु मिळाल्या कीं ते लागलीच लंगडे पडतात. स्त्रीसंग मिळाला कीं शेवटीं वैराग्य उत्पन्न होऊन काम लंगडा पडतो. व हेतुच्या आड आलेली अडचण दूर होऊन त्याच्या मनासारखी

गोष्ट झाली कीं क्रोधही लंगडा पडतो. म्हणजे हे दोघेही त्यांचा त्यांचा लाभ झाला म्हणजे शिथिल होतात. परंतु तिसरा जो लोभ, त्याची गोष्ट अगदींच निराळी आहे. त्याला लाभ झाला कीं, तो वाढतच जातो. म्हणजे दोघांच्याहीवर ह्या तिसऱ्याची मात्रा आहे असें म्हटलें पाहिजे. बाकींचें त्यांचा लाभ झाला कीं ते शांत होतात, परंतु हा लाभानें वाढतो, कारण, तो बोलून चालून 'लोभ' पडला. तेव्हां 'लाभा' च्याहविर त्याची एक मात्रा आहेच. (ला वर मात्रा दिली म्हणजे लोभ होतो.) आणखी हा लोभ किती वाढतो? तर एकपट दुप्पट नव्हे, तर चौपट! कसा! तर दोहोंना 'लाभ' झाला तर ते संतुष्ट होतात, परंतु हा पडला 'लोभ' ला, ली, लु, ले, आणि मग त्याच्यापुढे 'लो' यावयाचा. तेव्हां तो त्या दोघांच्याही चार पायऱ्या वरच असल्याचें दिसतें.

**देहदारकदारादौ यावन्मोहाकुलः पुमान्।**
**तावन्न वित्तविषयतर्कसंपर्कवर्जितः ॥ २४३ ॥**

घर, दार, मुलें, बाळें ह्यांच्यामध्येंच पुरुष जोंपर्यंत [मोहाकुल] होऊन राहिलेला असतो, तोंपर्यंत द्रव्य मिळविण्याविषयींचे तर्क वितर्क चालूच असतात, ते सुटत नाहींत.

श्लेष—[मा- ऊहा-कुलः] 'मा' म्हणजे लक्ष्मी-द्रव्य-त्या विषयीं [ऊहा] म्हणजे तर्क ह्यानें [आकुलः] बेजारच असतो. असा त्या शब्दांतच मुळीं अर्थ आहे.

**नरकोपस्थितिं नाम नान्यां मन्यामहे वहम्।**
**या चैषा दृश्यतेऽमुष्मिन्नरे कोपस्य रे स्थितिः ॥ २४४ ॥**

नरकांत जाऊन पडणें म्हणजे कांहीं निराळी स्थिति आहे असं आ-ह्मांस वाटत नाहीं. अरे! ती स्थिति प्रत्यक्ष पहाणें असेल तर, रागा-वलेला मनुष्य पहावा म्हणजे झालें. त्याच्यांत ती स्पष्ट दिसत असते. कारण, नरक-उपस्थिति, म्हणजे नरकांत राहणें व नर-कोपस्थिति, म्हणजे रागावलेल्या माणसाची स्थिति असे नरकोपस्थिति ह्या शब्दाचे दोन विग्रह होऊं शकतात्.

**बिंदुमात्रेण यो हि स्यादंतरे समदः पुमान् ।**
**स मंद एवेत्येतस्मिन्न कस्याप्यस्ति संशयः ॥ २४५ ॥**

जो पुरुष [ **बिंदुमात्रेण** ] यःकाश्चित् कारणावरून [ **समद** ] गर्वानें फुगून जातो, तो मंद बुद्धीचाच ह्मटला पाहिजे. ह्यांत कोणालाच संशय वाटणार नाहीं. कारण [ **मद** ] ह्या अक्षरावर बिंदु दिला कीं तो मंद होतोच. समद हा शब्द स ( तो ) मंद असा होतो.

**मत्सरः समुपादेयो यागेऽभ्युदयकारणात् ।**
**पणनात्तु पुनर्मृत्युहेतुर्ब्राह्मण्यहानिकृत् ॥ २४६ ॥**

ह्या श्लोकांत ' मत्सर' ह्या शब्दांत श्लेष साधला आहे. मत्सर म्हणजे षड्रिपुपैकीं एक विकार असल्याचें सर्वविश्रुतच आहे. दुसरा अर्थ—मद उत्पन्न करणारें द्रव्य म्हणजे—सोम—किंवा मद्य. हे अर्थ लक्षांत घेऊन त्याचा अर्थ असा होतोः—

**पहिला अर्थ**—[**यागे**] म्हणजे यज्ञामध्यें [ **अभ्युदयकरणात्** ] उदय होणारा असल्यामुळें [**मत्सर**] ह्मणजे मद्य किंवा सोमरस—सोम ह्यानांवाच्या वनस्पतीचा रस सेवन करावयास हरकत नाहीं. पण तोच सोमरस [**पणनात्तु**] म्हणजे दुकानांत विकला किंवा मद्यसेवन केलें तर मात्र मृत्यूला कारण होतें, आणि ब्राह्मणत्वाची हानि होते. कारण [**सोमविक्रेता हंतव्यो बहिष्कार्योवा**] सोमवल्ली विकणाराला मारून टाकावा किंवा जातिबहिष्कृत करावा असें श्रौतसूत्रांत सांगितलेलें प्रसिद्धच आहे.

**दुसरा अर्थ**—मत्सर हा [**अभ्युदय-कारणात्** ] ह्मणजे सत्कार्यामध्यें नेहेमीं करीत गेल्यास हरकत नाहीं. पण तो व्यवहांत करतां कामा नये. तसा केल्यास हानिकारकच होतो. ह्या कारितां षड्रिपूंना जिंकणें हेंच इष्ट आहे.

**अनकधातुश्रेष्ठ यत्कल्याणं संगृहाण रे ।**
**कल्याणसंग्रहे तात नैव दुर्गतिभाङ्‌ नरः ॥ २४७ ॥**

**पहिला अर्थ**—[ **अनेकधा तु श्रेष्ठं** ] अनेक रितीनें श्रेष्ट व कल्याणकारक कर्म असेल तें नीट रितीनें करीत जा. असें कर्म केल्यानें [ **दुर्गतिभाक् न भवति** ] कधींही दुर्गति प्राप्त होत नाहीं.

दुसरा अर्थ—[ अनेक धातु श्रेष्ठं ] सर्व धातूमध्यें श्रेष्ठ असें जें [ कल्याण ] ह्मणजे सुवर्ण त्याचा संग्रह कर. कारण, द्रव्यसंचय केल्यानें कधीं द्रारिद्र्य येत नाहीं.

यस्तु नित्यं शमापन्नः सर्वत्रोत्सृज्य लोलताम् ।
स नैव सुखमापन्न इति कः पंडितो वदेत् ॥ २४८ ॥

जो नित्य [ शमापन्नः ] शांततेचा स्वीकार करून राहतो, शांत असतो, [ सर्वत्र लोलताम्–उत्सृज्य ] हिकडची तिकडची धावाधाव टाकून देतो, (सः) तो [सुखम्–आपन्नः] सुखी नाहीं असें कोणता सुज्ञ ह्मणेल? कोणताच ह्मणणार नाहीं असा भाव.

श्लेष–[ शमापन्नः ] म्हणजे शांत ( शम–आपन्न ) हा एक अर्थ, आणि दुसरा अर्थ ' शम्=आपन्न ' सुखी निघतो. तेव्हां तो खोटा असें कोणता पंडित ह्मणेल ?

शमस्य साधनं तात कर्तुं यदि न शक्यते ।
शमो भविष्यति शनैः शमलं त्वमलं कुरु ॥ २४९ ॥

बाबा! तुला शमाचें साधन जरी करतां येत नसलें, तरी शम सुद्धां तुला हळू हळू प्राप्त होईल. ( शमलं--अलं--कुरु ) तूं फक्त पातक करावयाचें बंद कर ह्मणजे झालें.

श्लेष—( शमलं तु–अलं–कुरु ) ह्मणजे ' शमलं' ह्या शब्दांतील 'अलं' लकार काढून टाक ह्मणजे बाकी ( शम ) म्हणजे शांतीच रहाते.

शमी क एवं परिपृच्छ्यमाने प्रश्नोऽयमेवोत्तरतां बिभर्ति ।
परीक्षिता यः परिहेलितोऽपि निर्भर्त्सयामास सुतं शपंतम् ॥२५०॥

( शमी क एव ) अशा प्रकारचा शांत पुरुष आहे तरी कोण? ह्या प्रश्नांतच त्याचें उत्तर दिलेलें आहे. तें कोणतें ? तर ' शमीक ' ऋषी हेंच त्याचें उत्तर होय. कारण, शमीक ऋषीच्या गळ्यांत पारिक्षिती राजानें सर्पाचें कलेवर घातलें होतें, म्हणून त्याच्या पुत्रानें पारीक्षितीला ' तू सर्पदंश होऊन सात दिवसांत मरण पावशील' असा शाप दिला. त्या मुलाचा

त्यानें अगदीं धिःकार केला. ह्या वरून शमीक ऋषि हाच काय तो खरा 'शमी' ह्मणजे शांत होय.

नूनमविद्याविजयाजनितो देहोऽहमिति मदो भूयान् ।
तस्यैक एव सद्भिः प्रतिकूलो दृढतमो दमो दृष्टः ॥ २५१ ॥

अविद्या ह्मणजे अज्ञान. ही एक खरोखर भांग असून तिच्या पासून 'देह हाच मी' असा मनुष्याला 'मद' ह्मणजे कैफ चढतो. त्यावर सुश्लोकांनीं एक प्रातिकूल—उलट--उत्कृष्ट असा उतारा काढून ठेविला आहे. तो कोणता ह्मणाल? तर (दम) 'म--द' हीं अक्षरें उलट लिहिलीं म्हणजे 'द-म' ह्मणजे इंद्रियदमन असेंच होतें.

श्लेष—(म द) ह्याच्या उलट (दम) हाच त्याचा उतारा होय.

यः सर्वदा संश्रितरामपादो दांतं तमेनं सहजं ब्रवीमि ।
यः केवलं स्याद्विनिरुद्धशुक्रः स क्रांत एवेह भवेन्न दांतः ॥२५२॥

ज्यानें सदासर्वदा श्रीरामचंद्राच्या पदाचाच आश्रय केलेला असतो त्याला आपोआपच [दांत] म्हणजे इंद्रिय दमन करणारा असें मी ह्मणतों. परंतु केवळ हटयोगानें शुक्राचा मात्र निरोध करतो तो [क्रांत] म्हणजे दमलेला—क्षीण मात्र होतो. [दांत] म्हणजे इंद्रियदमन करणारा, होत नाहीं.

श्लेष—[संश्रित रामपाद] म्हणजे रामाच्या पदाचा आश्रय केलेला असतो तो ह्या पदाच्या शेवटचें अक्षर [द] असल्यानें तो [दांत] [द—अंत] असतो हें उघडच आहे. आणि दुसरा जो [आनि-रुद्ध-शुक्र] असतो, त्याच्या शेवटीं [क्र] हें अक्षर असल्यानें तो [क्रांत] होय हें उघडच आहे. [क्र] आणि [क्र] ह्यांत संस्कृतामध्यें भेद मानित नाहींत ह्यावरून हीच गोष्ट स्पष्ट दिसून येते.

स्याच्चेदुपरमः सौम्य भवतश्चित्तमंदिरे ।
स साक्षाच्छ्रीनिवासोऽयामिति निश्चिनुमो वयम् ॥ २५३ ॥

हे भल्या मनुष्या ! तुझ्या चित्तरूपी मंदिरांत जर [ उपरम ] प्राप्त झाला म्हणजे तुझ्या अंतःकरणांत शांति उत्पन्न झाली, तर तूं प्रत्यक्ष [ श्रीनिवास ] म्हणजे लक्ष्मीचा पतीच झालास असें मी निश्चयानें समजतों.

श्लेष—[ उपरम ] म्हणजे शांति. हा एक अर्थ; व दुसरा अर्थ [उप] म्हणजे जवळ आहे [ रमा ] म्हणजे लक्ष्मी ज्याच्या तो ' उपरम; ' ह्यावरून ज्याला उपरम म्हणजे शांति प्राप्त होईल तो साक्षात् लक्ष्मीपति जो विष्णु तत्स्वरूपच होईल.

येषां सदासमाधानो दृश्यते ह्यंतराशयः ।
इंदिराधिपतिस्तत्र वसतीति प्रतीयते ॥ २५४ ॥

ज्याच्या अंतःकरणांत [ सदा समाधान ] असलेलें दृष्टीस पडतें, तेथें प्रत्यक्ष लक्ष्मीच्या पतीचा वास आहे असें वाटतें.

श्लेष—[ सदा समाधान ] ह्यांत [स–दास–मा–आधान] अशीं पदें पाडलीं म्हणजे तो [ दास-मा ] दासीसारखी जी लक्ष्मी तिचें [आधान] म्हणजे स्थान त्यानें सहित असा अर्थ निष्पन्न होतो. तेव्हां तो मनुष्य लक्ष्मीपतीचें स्थान कां समजूं नये ?

यस्यां तु दृश्यते श्रद्धा बुद्धिः सा सत्त्वभाविता ।
अदूरादेव बोधाख्यं तनयं जनयिष्यति ॥ २५५ ॥

ज्या बुद्धीमध्यें श्रद्धा असलेली दृष्टीस पडते, ती बुद्धि सत्वगुणानें युक्त झाली म्हणून समजावें. कारण, तिच्यापासून लौकरच [ बोध ] म्हणजे आत्मज्ञान नांवाचा पुत्र उत्पन्न होतो.

श्लेष—[ श्रद्धा ] म्हणजे डोहळे; [सत्त्व] म्हणजे गर्भ; सत्त्वभविता ह्मणजे गरोदर. ह्यावरून दुसरा अर्थ असा. ज्या बुद्धीमध्यें श्रद्धा उत्पन्न झालेली दिसते, म्हणजे तिला डोहळे लागलेले दिसतात, तिच्या ठिकाणीं [सत्त्व] म्हणजे गर्भ आहे असें समजावें. आणि तिलाच पुढें बोध नांवाचा पुत्र होतो. अर्थात् श्रद्धेपासून सत्त्वोत्पत्ति होऊन पुढें आत्मज्ञान उत्पन्न होतें. हा भावार्थ.

**आढ्योऽयमित्थं क्षितिपोऽयमित्थं किं भूयसा श्रीपतिरेष इत्थम् ।**
**अर्हंति वक्तुं विबुधा भवंतं सखे यदि त्वं बहुलक्ष्मोऽसि ॥२५६॥**

हे सखे! मित्रा! [ **त्वं यदि** ] तूं जर ( **बहुल क्षमोसि** ) पुष्कळशी क्षमा धारण करशील, तर तुला लोक हा श्रीमान् आहे; हा मोठा राजा आहे; हें तर काय? पण हा प्रत्यक्ष लक्ष्मीपतीच आहे असें सुद्धां ह्मणतील.

श्लेष—( **बहुल-क्षमोऽसि** ) पुष्कळशी क्षमा धारण करशील हा एक अर्थ, व दुसरा अर्थ ( **बहु-लक्ष-मा-असि** ) म्हणजे लक्षावधि रुपयांची संपत्ति जर तुझ्याजवळ असेल, तरी ही लोक तुला असेंच म्हणून तुझी हांजी हांजी करतील हा भावार्थ.

**यो वर्तते शुचित्वेन स वैश्वानर उच्यते ।**
**यो वर्ततेऽशुचित्वेन स वै श्वा नर उच्यते ॥ २५७ ॥**

जो पुरुष नेहमीं ( **शुचित्त्वेन** ) सदाचरणानें राहतो, त्याला लोक ( **वैश्वानर** ) म्हणजे शुद्ध विस्तव आहे—अग्नि आहे—असें ह्मणतात. त्याला अग्नीची उपमा देतात. परंतु जो ( **अशुचित्त्वेन** ) ह्मणजे अमंगलपणानें वागतो, त्याला लोक ( **वै-श्वा-नर** ) ह्मणजे शुद्ध कुत्रें असेंच समजतात. ह्यांत ( **शुचि** ) म्हणजे पवित्रपणा हा एक अर्थ, व ' जाळ ' हा दुसरा अर्थ साधला आहे.

**नूनं ब्रह्मभवः कृतोपनयनोऽनडाहमारूढवां-**
**स्तस्याप्यस्य महेशितुः शिरसि रे दोषाकरः संगतः ।**
**कार्याकार्यतयोपदिष्टमिह यच्छ्रीवेदराजेन त-**
**न्नोल्लंघेत जनः कथं कथमपि प्राज्ञः समर्थोऽपि सन् ॥२५८॥**

शंकर कसा आहे? तर ( **नूनं** ) म्हणजे खरोखर ( **ब्रह्मभवः** ) ब्रह्मदेवापासून उत्पन्न झालेला अर्थात् ब्राह्मण; पक्षीं प्रत्यक्ष ब्रह्मस्वरूप—असा भव ह्मणजे शंकर, आणखी कसा? तर, ( **कृतोपनयनः** ) उपनयन ह्मणजे मुंज झाली आहे ज्याची असा. पक्षीं—तिसरा नेत्र धारण करणारा असा; असें असतांही तो बैलावर ह्मणजे नंदीवर बसतो! उपनयन झा-

लेल्या ब्राह्मणानें बैलावर बसणें हा मोठा दोष आहे; श्रुतीच्या विरुद्ध आहे; अरे ! ह्मणूनच महेश्वर अशा शंकराच्या मस्तकावर सुद्धां ( दोषा-कर ) ह्मणजे चंद्र ठेवून दिला आहे. तो चंद्र नव्हे, तर शंकर हा दो-षांचा ( आकर ) ह्मणजे ठेवाच असा आहे, ह्मणून ब्रह्मदेवानें त्याच्या कपाळावर शिक्काच मारला आहे असें वाटतें.

ह्याकरितां ह्या लोकीं कार्य व अकार्य ह्मणून जें जें काय सांगितलें आहे, त्याचा विचार करावा. प्रत्यक्ष श्रुतीनें जें जें अकार्य–ह्मणजे करण्यास योग्य नव्हे–असें ह्मटलें आहे, तें लोकांनीं कांहीं झालें तरी उल्लंघन करूं नये. मग तो मोठा बुद्धिमान् असो, कीं समर्थ असो. तात्पर्य, वेदांची आज्ञा मान्य करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे.

**यथा कथंचिद्वर्णस्य ग्रहणाद्वर्णसंग्रहः ।**
**विनाऽर्थलाभाद्वेदानां सामर्थ्यं तु न संभवेत् ॥ २५९॥**

कसे तरी [वर्ण] ह्मणजे अक्षरेंच पाठ केलीं तर जातीचा संग्रह होईल म्ह. ब्राह्मण्य कायम राहील येवढेंच. परंतु वेदांचा अर्थ समजल्याशिवाय खरें सामर्थ्य प्राप्त होणें कधींच शक्य नाहीं.

श्लेष—ह्यांत 'वर्ण' ह्मणजे अक्षरें किंवा वर्ण ह्मणजे जाति. ब्राह्म-णाला अक्षर ओळख असली ह्मणजे त्याला दुर्ब्राह्मण कोणी ह्मणणार नाहीं. हें खरें आहे. पण वेदाचा खरा अर्थ कळल्याशिवाय मर्म मात्र ध्यानांत येणार नाहीं. व तें ब्राह्मणत्व सार्थ होणार नाहीं.

**परमार्थस्य निदानं परमार्थं श्रुतिगतं समुत्सृज्य ।**
**अर्थकृते प्रतिसदनं श्रुतिमातरमहह नर्तयंत्येते ॥२६०॥**

परमार्थाचें कारण कोणतें ? तर श्रुतिमध्यें असलेला ( परम–अर्थ ) गुढार्थ. अरेरे ! तो सोडून देऊन हे सारे लोक पैशाकारितां ह्या श्रुतिरूप मातेला प्रत्येकाच्या घरोघरीं नेऊन त्यांच्यापुढें नाचावितातहो ! अर्थ म्ह. पैसा पाहिजे असेल तर ( परम--अर्थ ) परमार्थांतच तो खरोखरी सांठ-विलेला आहे. ही गोष्ठ लोक विसरतात.

वेदानधीत्य यो व्यर्थः स स एवेति तर्कये ।
तत्रैव यः समर्थः स स एवेति न को वदेत् ॥ २६१ ॥

ह्या श्लोकांत 'व्यर्थ' ह्या शब्दांत श्लेष आहे. व्यर्थ म्हणजे फुकट, निरुपयोगी हा एक अर्थ, व व्यर्थ ह्मणजे ज्ञानाशिवाय हा दुसरा अर्थ, व (वि—अर्थ) म्हणजे पैशाशिवाय हा तिसरा अर्थ. ह्यावरून कवि ह्मणतात—

अर्थज्ञानाशिवाय वेदाध्ययन करणें हें निखालस व्यर्थ होय. अर्थज्ञानाशिवाय जो मनुष्य असेल—पक्षीं जों द्रव्यवान् नसेल—दरिद्री असेल—तो फुकट आहे असा मी तर्क करतो. आणि वेदाध्ययनांत जो समर्थ आहे म्हणजे अर्थवेत्ता आहे, त्याला समर्थ (चांगला द्रव्यवान्) असें कोण ह्मणणार नाहीं? अर्थात् सर्व लोक म्हणतीलच ह्मणतील.

वेदार्थज्ञो हि ना कस्य पृष्ठमारोक्ष्यतीति चेत् ।
पृच्छ्यते, पश्य तत्रासौ प्रश्न एवोत्तरायते ॥२६२॥

(वेदार्थज्ञ) वेदांचा अर्थ जाणणारा (ना) म्हणजे पुरुष (कस्य-पृष्ठम् अरोक्ष्यति) कोणाच्या पाठीवर बसेल ? असा जर प्रश्न केला तर त्याचें उत्तर त्या प्रश्नांतच आहे, तें कोणतें ? तर—

श्लेष—(नाकस्य) हें. (नाक) म्हणजे स्वर्ग; तो स्वर्गाच्या पाठीवर (स्वर्गाच्या अत्युच्चस्थानी) बसेल हें त्याचें उत्तर.

विना शास्त्रं तु यद्वर्त्म विनाशायैव कवलम् ।
अमाधवस्तु यः पंथाः स महातामसः स्मृतः ॥ २६३ ॥

पहिला अर्थ— (विनाशास्त्रंतु यत् वर्त्म) शास्त्रविरहित जो मार्ग तो (विनाशायच केवलम्) शुद्ध नाशाला कारण होतो. आणि (अमाधवः तु यः पंथाः) आणि माधवाशिवाय जो मार्ग असेल तो (महातामसः स्मृतः) अत्यंत अज्ञानाचा असला पाहिजे. कारण, (श्लेष) (वि—नाश—अस्त्रं) त्यामध्यें अस्त्राचाच नाश झालेला असतो. अर्थात् हातांत कांहींच नसतें. तेव्हां असा मार्ग नाशास कारण होईल ह्यांत आश्चर्य तें काय? आणखी (अमा) म्हणजे अमावस्या; अ-

र्थात् गर्द अंधारी रात्र तिचा पति अंधारानें किंवा अज्ञानानें अधिकच व्यापलेला असणार. तो अत्यंत अज्ञानी असावा हेंही उक्तच आहे.

> धिगस्तु काव्यव्यासंगं मूलमासुरसंपदाम् ।
> अतो भागवतं सत्त्वापादकं शीलयामहे ॥ २६४ ॥

**पहिला अर्थ**—( काव्यव्यासंगं ) ह्या काव्य व्यासंगाला (धिक् -अस्तु) धिःकार असो . कारण तो ( **आसुरसंपदां मूलम्** ) आसुरी संपत्तीचें मूळ आहे. ( **अतः** ) ह्या कारितां ( **सत्वापादकं** ) सत्वगुण उत्पन्न करणारें जें ( **भागवत** ) श्रीमद्भागवत [ **शीलयाम्यहं** ]त्याचाच आम्ही व्यासंग करतों.

**दुसरा अर्थ**—( **काव्य व्यासगं** ) काव्य ह्मणजे शुक्राचार्य त्याच्या संगतीला धिःकार असो. कारण (**मूलम् आसुर संपदाम्** ) तो राक्षसाच्या संपत्तीवर निर्वाह करणारा आहे. तो त्यांचाच गुरु.( **अतः**) ह्या करितां आम्ही ( **सत्वापादकं** ) सत्त्वगुण प्राप्त करून देणारा जो ( **भागवत** ) ह्मणजे विष्णु त्याचीच भक्ति करतों.

> काव्येनासुरसंपत्तिर्नाटके प्राकृतक्रमः ।
> न रामताऽलंकारित्वे वरा भागवतस्थितिः ॥२६५॥

[**काव्येन-आसुर-संपत्तिः**] काव्याचा म्हणजे कादंबऱ्या इत्यादिकांचा अभ्यास केला तर आसुरी संपत्ति मात्र उत्पन्न होते. पक्षीं—काव्य ह्मणजे शुक्राचार्य, हे असुरांचे गुरु आहेत. तेव्हां त्यांच्या सहवासानें त्यांचेंच शिष्यत्व येणार म्हणजे आसुरी स्वभावच उत्पन्न होणार. बरें, नाटकें वाचावींत तर त्यांत ( **प्राकृतक्रमः** ) सारा ग्राम्य विषयच भरलेला असतो. त्याच्या योगानें मन बिघडतें. बरें, ( **अलंकारित्वे** ) अलंकार शास्त्राचा अभ्यास करावा तर त्यांतही ( **रामता** ) राम नाहीं. रामाचें वर्णन कोठें यावयाचें नाहीं. पक्षीं—( **अ—लंकारित्व** ) लंकेचा अरि म्हणजे शत्रु जो रामचंद्र तो त्यांत नाहीं. कारण ( **अ—लंकारित्व** ) आहे. ह्याकरितां ( **भागवत-स्थिति वरा** ) भागवताचाच अभ्यास करावा तो बरा. पक्षीं—

भगवंताशीं एकरूप होणें हेंच उत्तम. ( श्लेष ) महाभाग्यवंताची स्थिति ही तीच होय.

**बालकानां यथा माता तथा गीता हितावहा ।**
**अमेध्यहारिणी सद्यः स्वहृद्याऽमृतदायिनी ॥ २६६ ॥**

मुलांना आई जशी सुखाची खाण वाटते, त्याप्रमाणें श्रीमद्भगवद्गीताही सर्व लोकांना सुखावह आहे. कशी ? तर ( **अमेध्य-हारिणी** ) आई ही जशी मुलाचें मूत्रपुरीष काढते, त्याप्रमाणें गीताही ( **अमेध्य** ) म्हणजे लोकांचें दोष काढते, नष्ट करते. आणखी कशी ? तर ( **स्वहृद्या** ) आपल्या हृदयांत असलेलें ( **अमृत** ) देणारी. आईही आपल्या स्तनांतील अमृत म्हणजे दूध देते. त्याप्रमाणें गीताही आपल्या हृदयांतील अमृत म्हणजे मोक्षज्ञान देते. ह्यावरून मुलाला जशी आई हितकारक, त्याप्रमाणेंच लोकांना गीता ही मोठी हितकारक आहे असा भाव.

**ब्रह्मचर्यनिरतास्तपस्विनो दूरमुज्झितगृहा विवेकिनः ।**
**यद्भवंति सुरतार्थिनोऽपि तद्विस्मयाय विपुलाय जायते ॥ २६७ ॥**

ब्रह्मचर्यव्रत पाळणारे, तपस्वी, ज्यांनीं घरदार टाकून दिलें आहे, अशा विचारी लोकांना सुद्धां जर ( **सुरतार्थिनः भवंति** ) स्त्रीसमागमाची इच्छा झाली, तर तें मोठेंच आश्चर्य होय. ह्यांत ( **सुरतार्थिनः** ) ह्या शब्दांत श्लेष आहे त्यावरून अर्थ निघतो तोः—

(**सुरता-अर्थिनः**) देवपणा अंगीं येण्याची इच्छा करतील; (स्वर्गाची ) तर मोठें आश्चर्य होय कारण त्यांच्या मनांत मोक्षज्ञानाची इच्छा व्हावयास पाहिजे.

**संपूर्णप्राणभृत्त्राणविश्राणनपरायणः ।**
**यथार्थं राजतेऽत्यर्थं सकलत्रः किलाश्रमः ॥ २६८ ॥**

ह्या श्लोकांत ( **सकलत्र** ) ह्या शब्दांत श्लेष आहे. सकलत्र म्हणजे ( सकल=त्र ) सर्वांचें संरक्षण करणारा आणि ( स—कलत्र ) म्हणजे स्त्रीसहवर्तमान—सकुटुंब.

सर्व प्राण धारण करणारे प्राणी, ह्यांचें संरक्षण करण्यामध्यें परायण—एकनिष्ठ असा गृहस्थाश्रम यथार्थ शोभतो.

यो नित्यं मार्गणं बिभ्रत्स वै देही वरो मतः ।
यो नित्यं मार्गणं बिभ्रत्स वैदेहीवरो मतः ॥ २६९ ॥

जो निरंतर ( मार्गणं ) ह्मणजे याचकांना आश्रय देतो तो ( देही ) वर ह्मणजे मनुष्यामध्यें श्रेष्ट असें समजावें. आणि जो निरंतर ( मार्गणं ) ह्मणजे बाण धारण करतो तो ( वैदेही-वर ) ह्मणजे विदेह नगरीचा राजा जो जनक त्याची कन्या जी वैदेही—सीता—तिचा वर म्हणजे पति असें समजावें.

विप्राः शांताश्च दांताः सकरुणमनसः सात्विकाः सत्यशीलाः
सप्रज्ञाश्चेति दृष्ट्वा निपुणतरमथाध्याश्रमं श्रीमतैषाम् ।
संन्यासः स्थापितोऽभूत्स यदि विधिवशाल्लभ्यते येन पुंसा
युक्ताचारं विचारं स च रचयति चेद्धीयते किं स्वलाभः ॥२७०॥

ह्या श्लोकांत ' श्रीमत ' म्हणजे लक्ष्मीपति—परमेश्वर—हा एक अर्थ, व श्रीमंत हा दुसरा अर्थ, आणि ' संन्यास ' ह्मणजे चतुर्थाश्रम हा एक अर्थ व द्रव्यनिधि किंवा चांगली ठेव हा दुसरा अर्थ, हे श्लेष साधलेआहेत. त्यावरून दोन अर्थ निष्पन्न होतात ते असे:—

**पहिला अर्थ**—ब्राह्मण हे शांत, दांत, दयाशिल, सात्त्विक, सत्यवक्ते व बुद्धिमान् आहेत. असें पाहून मोठ्या चातुर्यानें ( **श्रीमता** ) ह्मणजे परमेश्वरानें ( **एषां** ) त्यांच्यावर ( **अध्याश्रमं** ) सर्व आश्रमाच्यावर संन्यास ह्मणजे चतुर्थाश्रम ठेवलेला आहे. त्याचा जर दैवयोगानें एखाद्या मनुष्यास लाभ झाला, आणि त्यांत जर तो आचारानें व विचारानें वागला, तर त्याच्या आत्मज्ञानाची कधीं तरी हानि होईल काय ? कधींही होणार नाहीं.

**दुसरा अर्थ**—ब्राह्मण हे शांत, दांत, दयाशील, सात्त्विक, सत्यवक्ते, व बुद्धिमान् आहेत असें पाहून त्यांच्या—आश्रमामध्यें त्यांच्या रहावयाच्या ठिकाणीं—( **संन्यास** ) ह्मणजे द्रव्याचा निधि—मोहरांनीं भरलेला हांडा

नेऊन ठेवला, व तो दैवयोगानें एखाद्याला मिळाला, आणि त्यांतील द्रव्याचा त्यानें नीट रितीनें खर्च केला, तर तो द्रव्याचा सांठा कधीं कमी होईल काय ? कधीं होणार नाहीं. चांगल्या रीतीनें आचरिलेला संन्यास हा द्रव्य निधीसारखा मौल्यवान् आहे.

सूत्रं शिखामप्यविहाय दंभान्नरश्चतुर्थाश्रममाश्रितोऽपि ।
विधाय साहाय्यकमस्य कृष्णः क्षिप्रं सुभद्रावगमं तनोति ॥२७१॥

केवळ ढोंगानें कां होईना ? नरानें म्हणजे पुरुषानें जर शिखा यज्ञोपवीताचा त्याग न करतांच चतुर्थाश्रम धारण केला, तरी सुद्धां त्याला श्रीकृष्ण सहाय होऊन तत्काल (सु–भद्र–अवगमम् तनोति) त्याचें उत्तम कल्याण करतो. मग प्रत्यक्ष खराखुराच संन्यास घेतल्यावर त्याचें तो कल्याण करील ह्यांत आश्चर्य तें काय ? हें कशावरून ह्मणाल तर—

श्लेष—( नर ) ह्मणजे अर्जुन ह्यानें असाच ढोंगानें त्रिदंडी संन्यास घेतला होता. त्याला ( सुभद्रा ) नांवाची आपली बहीण त्यानें दिली नाहीं काय ? ह्यावरून ती गोष्ट सिद्ध होते.

कर्ममार्गे यथा शूद्रा एकगोत्रावलंबिनः ।
मोक्षमार्गेऽपि ते तद्वदेकगोत्रावलंबिनः ॥ २७२ ॥

ह्या श्लोकांत 'गोत्र' ह्मणजे कुलपरंपरेनें चालत आलेलें वंशाचें नांव व 'गोत्र' ह्मणजे भगवन्नाम येवढाच काय तो श्लेष आहे.

शूद्र लोक ज्याप्रमाणें कर्ममार्गामध्यें कोणताही विधि करणें झाला तर जसें एकच गोत्र लावतात, त्याप्रमाणें मोक्षमार्गांत सुद्धां एक भगवन्नाम घेतलें कीं पुरें होतें.

आदौ यत्परिशील्यते दृढतरं तच्चाग्रतो धावती-
त्यर्थो डिंडिमकर्णशृंगनिनदैर्लोकेषु संभावितः ।
तस्माद्वाञ्छसि सत्पदं यदि सखे मद्वाक्यमंगीकुरु
प्रेम्णा संश्रय सत्पदं भवमहाकूपारपारप्रदम् ॥ २७३ ॥

आधींच जें आपण घट्ट धरतों तेंच पुढें पुढें धावत असतें. ह्याच

गोष्टीचा कर्णा, शिंग व तुतारी ह्या आपल्या गर्जनेनें लोकामध्यें पुकारा करीत असतात. कारण स्वारी वगैरे निघाली असतां हीं वाद्यें उंटावर वगैरे घालून सर्वांच्या पुढें जात असतात व तीं घट्ट धरून वाजवितात. करितां मित्रा ! तुला जर ' सत्पदाची ' ह्मणचे ब्रह्मपदाची इच्छा असेल तर मी सांगतों तें ऐक, आणि संसारसमुद्रांतून पार करणारे जे साधूंचे ( सत्पद ) पाय, ते तूं घट्ट धर.

ह्याकरितां तुला (सत्पद) म्हणजे चांगले (जमिनीवरूनही चालावयाला भक्कम पाय पाहिजेत. येथें तर पाण्यातून चालावयाचें आहे व थोडेसें अंतर नव्हे तर समुद्रच्या समुद्र तरावयाचा आहे तेव्हां कांहीं विलक्षण तऱ्हेचे चांगले पाय पाहिजेत ) पाय शीघ्रगतीनें जाणारे पाहिजेत. तेव्हां तुला पाहिजे असलेले ' सत्पद ' ( येथें आतां श्लेषार्थानें ) साधूंचे पाय हेच ( आदौ ) प्रथमतः घट्ट धर म्हणजे जें प्रथमतः घट्ट धरावें तें सर्वांच्यापुढें जातें ह्या नियमाप्रमाणें तूं सत्पद आधीं घट्ट धरिल्यानें तुझे सत्पदच सर्वांच्या पुढें जातील. अर्थात शीघ्रगतीनें जातील व हे नवीन तऱ्हेचे सत्पद मिळाल्यानें तूं संसारसागरांतून पार होशील.

श्लेष—ह्यांत ( सत्पद ) ह्मणजे साधूंचे पाय हा एक अर्थ व चांगले पाय हा दुसरा अर्थ. तुला तर संसारसागरांतून पार होणें आहे, ह्याकरितां चांगले पाय घट्ट धर. ह्मणजे तेच पुढें पुढें धांवतील असें कर्णा इत्यादि वाद्यें सांगत आहेत. ह्याकरितां तूंही तेंच कर.

**दोषोद्रेकभवे प्रभूततमसि व्याप्ते द्विजानां व्रजो**
**मूढो नष्टसुदृक् समीपगमपि स्थाणुं परं स्वाश्रयम्- ।**
**द्रष्टुं न क्षमते, चरंति परितो यच्चात्मघोषाद्विषो**
**हंसस्तत्र यदृच्छया समुदितश्चेत्स्यात्समृद्धं हितम् ॥ २७४॥**

**पहिला अर्थ—** ( **दोषोद्रेकभवे** ) रात्रीच्या भरामुळें ( **प्रभूत तमसि** ) उत्पन्न झालेला गाढ अंधकार ह्यानें दशदिशा व्यापून गेल्या असतां ( **द्विजानां व्रजः** ) पक्ष्यांचा समुदाय मूढ झाला आहे व त्याची दृष्टी अगदीं नष्ट होऊन गेली आहे. त्यामुळें ( **समीपगं** ) जवळ असलेला व

आपलें मोठें आश्रयस्थान असलेला जो ( स्थाणु ) ह्मणजे वृक्ष तोही दिसेनासा झाला आहे. आणि ( आत्मघोष—द्विषः ) कावळ्यांचें शत्रुत्व करणारीं जीं घुबडें तीं भोंवतालीं घिरट्या घालित आहेत. अशा स्थितींत 'हंस' ह्मणजे सूर्य जर सहजगत्या उगवला तर त्यांचें अतोनात कल्याण होईल व ते आनंदांत राहतील.

**दुसरा अर्थ**—[ **दोषोद्रेकभवे** ] दोषानें उत्पन्न झालेल्या [ **प्रभूततमसि** ] गाढ अज्ञानानें [ **द्विजानांव्रजः** ] ब्राह्मणांच्या समुदायाला मोह पडला आहे. ज्ञानदृष्टि नष्ट झाली आहे. जवळ असलेला [**स्थाणु**] शिव[**परमू स्वाश्रयम्** ] मूलस्थान-परमात्मा-दिसेना झाला आहे,[**परितः**]आणि त्याच्या भोंवतीं [**आत्मघोषद्विषः**] आत्मज्ञानाचा द्वेष करणारे लोक पाळा घालून बसलेले आहेत. अशा वेळीं जर एखादा परमहंस प्रगट झाला तर त्यांचें पुष्कळ हित होईल.

**शुचिमानसावगम इह हंससमागमवशाद्द्विजेंद्राणाम् ।**
**तदमृततप्ताः शांताः संतो विहरंति कुवलयेऽथ सुखम् ॥२७५॥**

ह्या श्लोकांत वरच्या प्रमाणेंच 'हंस' म्हणजे हंस नांवाचा पक्षी हा एक अर्थ, व 'हंस' म्हणजे परमहंस योगी हा दुसरा अर्थ; आणि 'द्विज' म्हणजे पक्षी व द्विज म्हणजे ब्राह्मण हे दोन अर्थ, ह्यांचा श्लेष साधून ह्या श्लोकाचेही दोन अर्थ होतात ते असेः—

**पहिला अर्थ**—हंसाच्या समागमाच्या योगानें पक्ष्यांना ह्या लोकीं 'शुचि' म्हणजे पवित्र अशा मानस सरोवराची प्राप्ती होते. त्याच्या पाण्यानें ते तृप्त होऊन शांत होत्साते कमलाच्या ठिकाणीं आनंदानें विहार करतात.

**दुसरा अर्थ**—ब्राह्मणश्रेष्ठानां परमहंसांच्या संगतीनें ह्या लोकामध्यें मनाची पवित्र स्थिति प्राप्त होते. आणि [ **अमृत-तृप्तः** ] मोक्ष ज्ञानानें तृप्त होऊन ते शांत होत्साते सर्व पृथ्वीवर जीवन्मुक्त होऊन खुशाल विहार करतात.

**स्रग्गंधाद्युपभोगेषु विरक्तस्य वने सतः ।**
**नरस्य रामावाप्तिस्तु नूनं हंससमागमात् ॥ २७६ ॥**

पुष्पगंधादि उपभोगाच्या ठिकाणीं विरक्त झालेल्या [ **वने सतः** ] अरण्यवास पत्करलेल्या मनुष्याला हंससमागमानें म्हणजे परमहंसाच्या दर्शनानें रामाची प्राप्ती होते. हें कशावरून ? तरः—

श्लेष—' र ' च्या ठिकाणीं ' ल ' घेतला तर त्यांत भेद नाहीं, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. त्या नियमाप्रमाणें ' नर ' च्या ठिकाणीं ' नल ' धरलें म्हणजे हा अर्थ नलराजाकडेही लागतो, तो असाः—

पुष्पगंधादि उपभोगाला विरक्त होऊन नलराजा वनांत राहात असतां हंसाच्या संगतीनें म्हणजे हंस भेटल्यामुळें त्याला ' रामाची ' म्हणजे त्याची पत्नी जी दमयंति तिची प्राप्ती झाली हें प्रत्यक्ष उदाहरण आहे.

**सृष्टिं वर्णमयीं स लेखकपतिः पश्यन्नदो दृष्ट्वा-**
**नत्रस्थं सदपीदमक्षरमसंवेशेन बाह्ये स्थितम् ।**
**वर्णास्तेन विना भवेयुरहहानर्थाकुलाः केवलं**
**तस्माद्धंसपदं कृपापरवशस्तल्लब्धये निर्ममौ (मे) ॥२७७॥**

**पहिला अर्थ**—( **लेखक-पति** ) म्हणजे सर्व देवामध्यें श्रेष्ठ असा जो विष्णु-ईश्वर त्यानें [**सृष्टिं वर्णमयीं**] चातुर्वण्ययुक्त सृष्टी निर्माण केल्यानंतर तो पाहूं लागला तों त्याला असें दृष्टीस पडलें कीं, तिच्यांतच असलेले (**सत्**) –ब्रह्म हें अक्षर असून नाश न पावणारें. तें तींत न शिरता बाहेर राहिलें आहे. अरेरे ! त्या ब्रह्मज्ञानाशिवाय ह्याचारही वर्णावर अनर्थ येऊन कोसळतील. तसें न व्हावें व चारी पुरुषार्थांचा लाभ व्हावा ह्मणून त्यानें हंसपरमहंस-नांवाचा साधु निर्माण केला.

**दुसरा अर्थ**—( **लेखकपति** ) ह्मणजे लिहिण्यामध्यें चतुर अशा विष्णूनें ( **अक्षरमयी** ) ह्मणजे साक्षर अशी सृष्टि निर्माण केली. आणि तींत पाहूं लागला तों तींत असावयाचें एक अक्षर ( अविनाशी पद ) चुकून राहिल्यामुळें बाहेर लिहावें लागलें. तें जर लिहिलें नाहीं, तर अनर्थ होतील. बाकीच्या अक्षराचा अर्थ न होतां भलताच अर्थ होऊं लागेल. तो होऊं नये ह्मणून हंसपद ( काकपद ) निर्माण करून ठेवलें आहे.

प्रमादाद्विस्मृतं यत्तद्वाह्योऽवस्थितमक्षरम् ।
अनायासेन तल्लब्ध्यै नान्यद्धंसपदं विना ॥ २७८॥

**पहिला अर्थ**—चुकीन विसरलेलें अक्षर बाहेर लिहितात. व तें सहजगत्या सापडावयाला हंस (काक) पदाशिवाय दुसरें साधन नाहीं.

**श्लेष**—अक्षर म्हणजे परब्रह्म. हें अज्ञानानें विसरलेलें आहे. तें ज्ञानाच्या बाहेर आहे, तें सहज सापडावयाला हंसपद म्हणजे साधूचे चरणावांचून दुसरें साधन नाहीं.

सत्यपि व्यापके दिव्ये परमे तग्मितेजसि ।
स्यात्ते पाकस्य संसिद्ध्यै सन्मण्युदितमेव तत ॥ २७९ ॥

सूर्याचा प्रकाश सर्वव्यापी आहे; दिव्य आहे; व अतिशय प्रखर आहे ही गोष्ट खरी; तथापि स्वयंपाक करावयाचा असेल तर त्यामध्यें सूर्यकांत ठेवूनच त्याचें तेज ग्रहण केलें पाहिजे. तरच पाकसिद्धि होईल. प्रत्यक्ष सूर्य पुढें असूनही ती होणार नाहीं.

तद्वत् परमेश्वर हा कितीही सन्निध असला, कितिही दिव्य असला तरी त्याची प्राप्ती करून घेण्याला मध्यें साधु श्रेष्ठ हा पाहिजेच. तरच त्याचें परमात्मस्वरूप प्राप्त होईल, नाहीं तर होणार नाहीं असा भाव.

कौटिल्यं स्वगतं स्वबंधकमिदं युक्तं पुनर्मुक्तये
सांद्रानंदकदंबकारिसुरताविर्भावकर्तुः परः ।
संगः स्यात्पुरुषोत्तमस्य निभृतानंगप्रसंगान्न कि
स्पष्टं दृष्टमिदं कचेषु कुचयोः कामं कुरंगीदृशाम् ॥२८०॥

आपल्या अंगांतील कौटिल्य हेंच आपल्या बंधनास कारण आहे. आणि विष्णूची संगती म्हणजे दृढभक्ति ही मुक्तीला कारण आहे. तो विष्णु कसा ? तर अत्यंत आनंद उत्पन्न करणारी जी '(सुरता)' म्हणजे देवपणा तो आपल्याला प्राप्त करून देणारा. असा जो पुरुषोत्तम ह्याची दृढभक्ति हीच मुक्तीला कारण होते. हें सरळच आहे. कारण, स्त्रियांच्या केसांच्या ठायीं व स्तनाच्या बाबतींत (निभृतं) अत्यंत गूढ असा सुरत प्रसंगीं हें स्पष्ट दिसत नाहीं काय ?

कौटिल्य ह्म. कुटिलपणा; वांकडेपणा; हा अंगीं असणें हेंच बंधनाचें कारण आहे. आणि 'सुरता' ह्मणजे देवत्वाला पोंचाविणारे जे 'पुरुषोत्तम' पक्षीं-उत्तम पुरुष--साधु असतात, त्यांची संगति ही मुक्ततेला कारण होतें. ह्याला उदाहरणच पाहिजे असेल तर, स्त्रियांचे 'कच' म्हणजे केंस आणि 'कुच' म्हणजे स्तन. ह्यांच्या स्थितीकडे लक्ष द्यावें म्हणजे झालें. कारण त्यांच्या अंगींही कुटिलपणा आहे. केस हे कुरळे ह्मणजे वांकडे असतात; आणि स्तनाचा आकारही वर्तुळ ह्मणजे वाकडाच असतो. ह्मणूनच त्या उभयतांसही बांधून ठेवणें भाग पडतें. परंतु 'सुरत प्रसंगीं' 'पुरुषोत्तमा' ची ह्मणजे उत्तम पुरुषाची गांठ पडली ह्मणजे त्या उभयतांचीही मुक्तता होते. हाच मथितार्थ होय.

श्लेष—'पुरुषोत्तम' म्हणजे रतिकुशल पुरुष. ह्याशिवाय ह्यांत 'कौटिल्यं' बंधकं, मुक्त्यै, सुरत, संग, इ. शब्दांवर शृंगारपर श्लेष आहेत. ते सहज ध्यानांत येण्यासारखे आहेत.

स्तोतुं कथं नु कल्पेय संगं सुमनसामहम् ।
मलिनोऽपि गतो येन मधुसूदनतामालिः ॥ २८१ ॥

पहिला अर्थ—(सुमनसां) म्हणजे साधूंच्या संगतीचा महीमा वर्णन करण्याला मी कसा समर्थ होईन? कारण, ज्याच्यायोगें करून (मलिनोऽपि) पातकी असला तरी सुद्धां तो 'मधुसूदन' जो श्रीकृष्ण भगवान् त्याचा (अलि) ह्मणजे सखा होतो.

दुसरा अर्थ—(सुमनसाम्) म्हणजे फुलाच्या वासाचे वर्णन मी करण्याला कसा समर्थ होईन? कारण (मलिन) म्हणजे काळा असलेला (अलि) म्हणजे भ्रमर सुद्धां त्याच्या योगानें (मधु-सूदनतांगतः) मध नाहींसा करण्याला अर्थात लुटून नेण्याला समर्थ होतो.

स्वामोदहेतुसुमनःसमयं श्रितो यः
पश्चात्कृतः सपदि तेन भगप्रसंगः ।
सर्वत्र चात्र किल चैत्रविलासभाजः
श्रीमाधवः सविध एव भवत्यमुष्य ॥ २८२ ॥

**पहिला अर्थ**—[ **सु-आमोदहेतु** ] चांगल्या सुगंधाला कारण अशीं जीं [ **सुमनः** ] पुष्पें, त्यांचा समय जो वसंत ऋतु, त्याचा ज्यानें आश्रय केला आहे. त्याच्यानंतर [ **भगप्रसंग** ] म्हणजे उत्तराफाल्गुनी नक्षत्राची देवता 'भग' अर्थात फाल्गुन मास तो ज्यानें मागें टाकला. ह्मणजे चैत्र महिना लागला आहे. ह्या जगांत चैत्रांतील वसंत ऋतूचे विलास झाल्यावर त्याच्या पुढचा महिना श्रीमाधव ह्मणजे वैशाख हा त्याच्याजवळ असतोच.

**दुसरा अर्थ**—निजानंदाचें कारण जे साधु लोक, त्यांच्या आचाराचा आश्रय ज्यानें केला असतो त्यानें स्त्रीसंगाची अवहेलना केलेलीच असते. [**चैत्र विलास भाजः** ] चित्र विचित्र दिसणारी विलास लीला–सारें जगच जणों काय चित्रांचीं बाहुलीं आहेत अशा बुद्धीनें जो वागतो, त्याला श्रीमाधव समीपच आहे.

**अपत्रपा अपि प्रायः सर्वथाऽपि कुजन्मिनः ।**
**सुमनःसमयस्थाश्चेद्धरीभूय स्फुरंत्यहो ॥२८३॥**

**पहिला अर्थ**—(**अप-त्रपा** ) निर्लज्ज आणि सर्वतोपरी ( **कु-जन्मिनः**) नीच कुलांत उत्पन्न झालेलें असून ते जर (**सुमनः समयस्थाश्चेत्**) साधूंच्या आचारानें वागूं लागले तर ( **हरीभूय स्फुरंति अहो** ) अहो ! ते हरीशीं तादात्म्यता पावून उत्कर्ष पावतात.

**दुसरा अर्थ**-( **अ–पत्र–पा** ) पानें रक्षण करण्याला असमर्थ असे जरी ( **कुजन्म** ) पृथ्वींत जन्म पावलेले वृक्ष असलें तरी ते ( **सुमनः समयस्था**) वसंत समय प्राप्त झाला म्हणजे (**हरीभूय**) हिरवे गार होऊन तरारून जातात.

**यस्तु द्विजेंद्रः कुटिलो मंतव्योऽपूर्ण एव सः ।**
**यस्तु पूर्णत्वमापन्नः स सद्वृत्तो हि दृश्यते ॥२८४॥**

**पहिला अर्थ**—' द्विजेंद्र ' ह्मणजे मोठा श्रेष्ठ ब्राह्मण असून तो जर ' कुटिल ' असला तर अपूर्ण असेंच समजलें पाहिजे. कारण कोणत्याही

पदार्थाला परिपूर्णता प्राप्त झाली कीं ' सद्वृत्त ' म्हणजे त्याचें आचरणच चांगलें दिसूं लागतें. ह्याला उदाहरण—

**दुसरा अर्थ**–( **द्विजेंद्र** ) ह्मणजे चंद्र ( **कुटिल**) ह्मणचे वांकडा असतो तों पर्यंत तो अपूर्णच असतो. परंतु तोच परिपूर्णतेला पोंचला म्हणजे ( **सद्वृत्त** )वाटोळा गरगरीत दिसूं लागतो.

**पुण्यक्रियादौ फलनिःस्पृहत्वं बोधो विशुद्धोऽप्यथ भक्तियोगः ।**
**मोक्षः क्रमेणेति तु यत्र पंच सोऽयं पुमान् स्यादिति मे मनीषा २८५**

आधीं पुण्यकर्म; नंतर फलाचा त्याग; नंतर बोध व सुदृढ भक्तियोग, हीं मोक्षाचीं साधनें आहेत. तीं पुरुषापाशीं असलीं म्हणजे अनुक्रमानेंच त्याला मोक्ष प्राप्त होतो. हीं साधनें व मोक्ष अशा पांच गोष्टी ज्याच्या पाशीं असतात तोच खरा पुरुष होय.

श्लेष—[ **पुमान्** ] ह्या शब्दांत श्लेष आहे. पुमान् म्हणजे पुरुष हा एक अर्थ, व 'प' वर्गानें युक्त हा दुसरा अर्थ.

' **प** ' **फ** ' **ब** ' **भ** ' **म** ' हीं पांच अक्षरें मिळून पवर्ग होतो. ह्याला ' पु ' अशी व्याकरणांत संज्ञा आहे. हींच अक्षरें वरील पांच साधनांच्या अनुक्रमानेंच आदि आहेत. ह्मणून पवर्गानें जो युक्त [पुमान् ] असतो तो खरा पुरुष होय हें उघडच आहे.

**यदृच्छालाभसंतुष्टाः परदारपराङ्मुखाः ।**
**स्वच्छंदचारिणः केचिद्द्विजा विष्णुपदानुगाः ॥ २८६॥**

**पहिला अर्थ**—जें काय मिळेल तेवढ्यांतच संतोष; परस्त्री कडे कसें तें ढुंकून सुद्धां पहावयाचें नाहीं. आणि [ **स्वच्छंद चारिणः** ] आत्मस्वरूपाच्याच धोरणानें चालावयाचें, विष्णुपदाची भक्ति करावयाची, असे ही ब्राम्हण असतात, पण विरळा.

**दुसरा अर्थ**—[ **द्विज** ] ह्मणजे पक्षी व [**विष्णुपद**]ह्मणजे आकाश, असा श्लेष साधून पक्ष्याकडे अर्थ लागतो तो असाः–

जें काय मिळेल तेवढ्यांतच संतुष्ट; परस्त्रीकडे कधीं पहावयाचें नाहींत.

( कारण , चिमण्यावगैरे पक्ष्यांच्या जातींत अंड्यांतून जोडपेंच उत्पन्न होतें व तेंच नर आणि मादी असतें. त्यांतील एक गेलें तर त्यास दुसरी जोडी मिळत नाहीं. कोंबड्यासारख्या पक्ष्यांत हा प्रकार नाही. ) आपल्या मनाप्रमाणें हिंडतात फिरतात व आकाशांतही संचार करतात. परंतु अशा जातीचे पक्षी ही थोडेच आहेत.

योगं यः प्रथयन्हरेरिह पुनर्भोगं महांतं स्वयं
वाञ्छेदेष हि शेष एव स पुनर्याता बताधोगतिम् ।
आकल्पं विपुलाधिभारगहने स्थाता नभोगस्तु यः
सुव्यक्त द्विजनायकः किल शुकः सोऽव्यक्तवाङ् मुक्तिभाक् २८७

पहिला अर्थ—जो हरीशीं योग ( भक्ति ) करीत असतांना ह्या जगांतील पुष्कळशा भोगांची आपल्याकरितां इच्छा करीत असेल तो शेषच ह्मटला पाहिजे. तो अधोगतीला जाईल आणि कल्पांत पर्यंत पुष्कळशा आधिव्याधींचें भाररूपी जड ओझें त्याला वहावें लागेल. पण जो भोगेच्छा विरहित असेल तो उघडच [ सुव्यक्तं ] ब्राह्मण श्रेष्ठ शुक होईल. [ सः अव्यक्त वाक् ] तो मौन धारण करणाराच वासुदेवाचें स्मरण करीत ज्याला मुक्ति लाभली आहे असा होईल.

दुसरा अर्थ—शेषाचा हरीशीं योग म्हणजे सान्निध्य आहे. तरी तो शेष स्वतः ( भोगाची ) म्हणजे नागाच्या शरीराची इच्छा करतो. अर्थात नागशरीर धारण करून असतो ह्मणून तो पृथ्वीचा भार घेऊन आकल्प पृथ्वीच्या खालीं राहतो. आणि जो भोगाची इच्छा न करील तो [उच्चारांत येत नसल्यामुळें अवग्रह सोडला तर] ( व्यक्त वाक् ) स्पष्ट बोलणारा व ( मुक्त वाक् ) म्हणजे मोकळा असा पक्ष्यांचा नायक शुक म्हणजे पोपट होईल.

रोमांचोंऽगेषु कंपो वचनविरचनाऽपाटवं नेत्रचंद्र-
ग्रावद्रावस्तमो द्रागपसरति चचिचंद्रिकांच (?) त्यकस्मात् ।
मन्येऽहं तस्य धन्येशितुरमलतपोयोगमासाद्य सद्यः
शीतोल्लासाधिवासोऽधित्हृदयगगनं रामचंद्रोऽवत्तीर्णः॥२८८॥

**पहिला अर्थ**—भक्तीच्या भरांत ज्याच्या अंगावर रोमांच उभे राहून कंप सुटला आहे; (**वचन-विरचना अपाटवं**) शब्द उमटत नाहीं; नेत्ररूप चंद्र-कांतांतून सारखा अश्रुपात चालूं आहे; ( **तमोद्राक् अपसरति** ) अज्ञान जेथून दूर पळून जात आहे. तसेंच चैतन्यरूप चंद्रिका (**आंचति**) एकदम शोभा देते-हृदयांत प्रकाश पाडते. त्या धन्य लोकांतील श्रेष्ठ महात्म्यांच्या हृदय रूपी गगनामध्यें निर्मल तपाच्या योगानें '**सीतोल्लासादि वासः**' सीतेच्या आनंदाचें स्थान असा जो रामचंद्र तो अवतीर्ण झाला आहे असें वाटतें.

**दुसरा अर्थ**—हिंवाळ्यांतील चंद्र अतिशय निर्मल असा माघ मासाचा योग साधून अर्थात (**अमल तपा**) माघ मासांत थंडी उत्पन्न करण्यासाठीं साधूंच्या हृदयामध्यें राम हा चंद्रच उगवला आहे.

**श्रीरामाविर्भावो यत्र स इह दृश्यते महत्त्वेन ।**
**यदनेकतारकत्वं पुनर्वसुत्वं च सर्वजनासिद्धम् ॥ २८९॥**

[ **यत्र श्रीरामाविर्भावः** ] ज्याच्या हृदयांत श्रीरामाचा साक्षात्कार झालेला आहे, [ **स इह दृश्यते महत्त्वेन**] तो ह्या जगामध्यें महत्त्वयुक्त दिसतो. कारण, हें तर [ **सर्वजनासिद्धम्** ] सर्व जनामध्यें प्रसिद्धच आहे कीं, [ **पुनर्वसुत्त्वं** ] पुनर्वसु नक्षत्र हे [ **अनेक तारकत्त्वं** ] अनेक नक्षत्रें मिळून झालेलें आहे. [ ह्मणजे पुनर्वसु नक्षत्राचे तारे दोन असतात.]

**श्लेष** (**पुनर्वसुत्त्वं**) वसु-धन पुनर्वसु नक्षत्र पुष्कळ धन देणारें असल्यामुळें त्याच्यावर जन्मलेल्याच्या अंगीं ( **अनेक तारकत्त्वं** ) पुष्कळांचें कल्याण करण्याचें सामर्थ्य असतें. आणि ( **श्रीराम–आविर्भावः**) ह्मणजे श्रीराम-चंद्राचा जन्म पुनर्वसु नक्षत्रावरच झालेला आहे. तेव्हां त्यांच्या अंगीं लोकांना तारण्याचें सामर्थ्य आहे हें उघडच आहे. अथवा (पुनर्वसुत्व) पुनः पुन्हा धन देण्याचें सामर्थ्य एका श्रीरामचंद्राच्याच अंगीं आहे असा भाव.

**जातुचिन्नैति विकृतिं कुसंगप्रभवैर्गुणैः ।**
**सर्वत्र तु सदामोदमाधत्ते सुमनोगणः ॥ २९० ॥**

( **सु–मनो–गणः** ) साधुजनांचे समुदाय ( **सदा–मोदम्–आधत्ते** )

सदासर्वदा आनंदितच असतात, ( कुसंग प्रभवैर्गुणैः ) दुर्जनांच्या संगतीनें उत्पन्न झालेल्या गुणांच्या योगानें (जातु चित्–न–एति–विकृतिं ) यांच्यात कधींच विकृति होत नाहीं.

दुसरा अर्थ—( सुमनो–गणः ) फुलांचा समुदाय ( सत्-आमोदं-आधत्ते) सदा सुगंधच धारण करतो. (कु) ह्मणजे पृथ्वी. तिच्यावर (संग प्रभवैर्गुणै ) पडल्यानें त्याला कांहीं विकृति होत नाहीं. सुगंध कमी होत नाहीं, किंवा मातीचा वासही त्यांना लागत नाहीं. ( मृद्गंधं नहि कुसुमानि धारयंति ) हें वाक्य सर्वांच्या वाचण्यांत आहेच.

प्रसिद्धः सुमनस्त्वेन सर्वदामोदसंभृतः ।
स्वत्वं कुसुमवन्नैव शिरश्छेदेऽपि मुंचति ॥ २९१॥

जे खरोखरच ( सुमनस् ) ह्मणजे थोर मनाचे पुरुष असतात—साधु असतात, ते ( सर्वदा मोद संभृतः ) सदा सर्वदा आनंदांतच असतात. शिरच्छेद केला तरीहि ते आपला स्वभाव सोडीत नाहींत. ह्याला दृष्टांत ( कुसुम ) ह्मणजे फूल जें आहे तें तसेंच आहे. कारण, त्याचा शिरच्छेद केला तरी तें आपला स्वभाव सोडित नाहीं. पक्षीं शिरच्छेद केला ह्मणजे पाहिलें अक्षर काढून टाकलें तरी तें आपलें कायमचें कायम. ( कुसुम ) ह्मणजे पुष्प. ह्यांतील शिर ह्मणजे आद्याक्षर (कु) काढून टाकलें तरी (सुम) हे कायमच राहतें. ( सुम ) ह्मणजे ही पुष्पच!

द्विजिव्हपीडिताश्चापि विक्रियां नैव तन्वते ।
परतापोपशमने गुरवोऽगुरवो जनाः ॥ २९२ ॥

( गुरवः ) श्रेष्ठ लोक ( द्विजिव्ह पीडितः अपि ) खलांनीं कितीही पीडा दिली तरी, ( विक्रियां नैव तन्वते ) त्यांना कधीं विकृति ह्मणून होतच नाहीं. इतकेंच नव्हें तर ( परतापोप शमने ) दुसऱ्याचा ताप शमन करण्याविषयीं ( अगुरवो जनाः ) ते जणों काय चंदनच आहेत. ( श्लेष ) ( अगुरवः ) ह्मणजे अभिमानरहित आहेत ह्मणून ते मेहनत करीत नाहींत असें मात्र नव्हे, तर ' गुरु ' ह्मणजे जड असे मात्र नव्हेत,

तर ( **अगुरुः** ) ह्मणजे अत्यंत चपळ असा भाव. ताप दूर करण्याला अंगीं चापल्य पाहिजे.

**दुसरा अर्थ**—(**अगुरुः**) ह्मणजे अगुरु नांवाचा चंदन; (**द्विजिव्हः अपिहितः अपि** ) सर्पांनीं कितीही पीडा केली तरी तो आपल्या अंगचा सुगंध कमी करीत नाहीं.

**लाभेषु नूनमखिलेषु वदंति संतो**
**मुख्यः कुलाभ इति तस्यकृतेऽपि नाशे ।**
**नैव त्यजंति सहजप्रवणाः कुलीनाः**
**शुद्धात्मनः कुसुमवत्परमात्मभावम् ॥ २९३ ॥**

सर्व तऱ्हेच्या लाभामध्यें ( **कु-लाभ** ) ह्मणजे पृथ्वीचा लाभ हाच सर्व लोक मुख्य समजतात. ( **तस्य कृते अपि** ) त्याच्याकरितां, पृथ्वीच्या लाभास्तव देखील कुलीन लोक शुद्धमनाचेच असल्यामुळें ( **सहज प्रवणाः** ) स्वभावतःच ( कु ) ह्मणजे पृथ्वीकडे ओढा असलेला, आपला जरी दुसऱ्या रीतीनें नाश होत असला तरी–' वरं'–श्रेष्ठअसा जो आत्मभाव ह्मणजे कुलीनपणा तो (**कुसुमवत्** ) पुष्पाप्रमाणें सोडीत नाहींत. ह्मणजे सत्त्वापासून ढळत नाहींत. सत्त्वाप्रीत्यर्थ पृथ्वीचें सर्व राज्य गेलें तरी त्याची त्यांना क्षिति नसते.

ह्यांत दोन श्लेष आहेत. ( **कुसुमवत्** ) ह्यांतील ' कु ' हें अक्षर सोडलें तरी ' सुमवत् ' ह्मणजे फुलाप्रमाणें असाच अर्थ राहतो. अर्थात् पुष्प हें आपला आत्मभाव सोडीत नाहीं त्याप्रमाणेंच ( **कुलीन** ) आहेत तेही आत्मभाव सोडीत नाहींत, कसें म्हणाल तर ( **कुलीन** ) ह्या शब्दांतील ( कु ) अक्षर काढून टाकलें तरी सुद्धां ( **लीन** ) ह्मणजे नम्र हाच त्यांचा आत्मभाव शिल्लक राहतो. ' कुसुम ' व ' कुलीन ' ह्या दोन्ही शब्दांत आद्य ( मुख्य ह्म. तोंडाशीं असलेलें अर्थात आद्य ) अक्षर ' कु ' लाभ मुख्य वाटत असूनही पृथ्वीचें ( कुचें ) राज्य गेलें तरी ते आत्मभाव सोडीत नाहींत.

उपसर्गप्रकारोऽपि निर्मितः संमुखे यदि।
नैव स्वभाववैकल्यं वराणां जायते क्वचित् ॥ २९४ ॥

**पहिला अर्थ**—श्रेष्ठ मनुष्यांच्या समोर जरी [**उपसर्ग प्रकार**] ह्मणजे उपमर्द केला तरी, त्यांच्या स्वभावांत विकल्प येत नाहीं. ह्मणजे ते आपला [ **वरं** ] ह्मणजे उत्तम स्वभाव सोडीत नाहींत.

**दुसरा अर्थ**—(**प्र--कारः**) ( **प्र** ) हाच उपसर्ग आणून त्यांच्यापुढें ठेवला अर्थात '**वर**' शब्दाच्या तोंडाशीं ह्म. 'वर' ह्या अक्षराजवळ 'प्र' हा उपसर्ग बसविला तर ते ( **प्र-वर** ) ह्मणजे अधिकच श्रेष्ठ होतात. त्यांचें श्रेष्ठत्व त्यामुळें कमी तर होत नाहीच पण उलट अधिकच वाढतें.

गतोऽपि द्विजराजो यः क्षयं वा वृद्धिमेव वा ।
नैव विष्णुपदं जह्यात्स चामृतकरः स्मृतः ॥ २९५ ॥

**पहिला अर्थ**--[ **द्विजराज**] चांगला सत्पात्र ब्राह्मण असतो तो [**क्षय**] ह्मणजे दारिद्र्यांत असो कीं (**वृद्धि**) श्रीमंतींत असो, ( **विष्णुपद**) ह्मणजे परमेश्वर त्याच्या भक्तीचा कधीं त्याग करीत नाहीं. ह्मणून त्याला (**अमृत करः** ) ह्मणजे मोक्ष हातांत आहे ज्याच्या असा विप्र असें ह्मणतात.

**दुसरा अर्थ**--( **द्विजराज** ) ह्मणजे चंद्र हा ( **क्षय** ) कृष्ण पक्षांत असो, कीं [ **वृद्धि** ] शुक्लपक्षांत असो. तो कधीं [ **विष्णुपद** ] ह्मणजे आकाश सोडीत नाहीं. ह्मणूनच त्याला [ **अमृतकर** ] ह्मणजे अमृतमय किरणांचा असें ह्मणतात .

हृदयप्रणिहितकृष्णो नित्यं यो विष्णुपदभजनधुर्यः ।
क्षपयन्स्ववपुर्विबुधान् पुष्णात्येनं द्विजेंद्र इति मन्ये ॥२९६॥

**पहिला अर्थ**—( **हृदयप्रणिहितकृष्णः** )ज्याच्या हृदयामध्यें श्रीकृष्णच भरलेला आहे; जो कृष्णभक्ति परायण आहे; आणि जो नित्य (**विष्णुपद भजनधुर्यः** ) विष्णूच्या चरणाचें भजन करण्यामध्यें प्रमुख असून ( **क्षपयन् स्ववपुः**) आपला देह झिजवून ( **विबुधान्** ) ज्ञानी लोकांना

( पुष्णाति ) संतोष देतो. त्यालाच मी (द्विजेंद्र) ह्मणजे ब्राह्मण श्रेष्ठ असें ( मन्ये ) मानीन.

दुसरा अर्थ—( हृदय-प्रणिहित-कृष्णः ) ज्याच्या बिंबामध्यें काळा डाग आहे; आणि जो नित्य ( विष्णुपद-भजन-धुर्यः ) आकाशांत राहणाऱ्या खस्थ ज्योतींमध्यें श्रेष्ठ ( क्षपयन् स्ववपुः ) आपल्या देहाच्या कलेचा लय करून तो (विबुधान्) ह्मणजें देवांना पोसतो. त्यालाच मी ( द्विजेंद्र ) ह्मणजे चंद्र असें ह्मणेन.

देव चंद्रापासून स्रवणारें अमृत पितात ह्मणून चंद्राला क्षय लागतो असा पौराणिक कथेचा भाग आहे.

> शूरः स एव यो वै विष्णुपदस्थः प्रचंडकरपालः ।
> नक्षत्रलोपकृद्यः सद्यो द्विजसंघदैन्यभंगकरः ॥ २९७ ॥

पहिला अर्थ—तोच शूर कीं जो (विष्णुपदस्थ) विष्णुपदाची भक्ति करतो. ( प्रचंड-कर-पालः ) मोठी भयंकर तरवार हातांत घेतो; (न-क्षत्र लोप-कृद्यः ) क्षात्रधर्माचा जो लोप करित नाहीं; आणि जो ब्राह्मण समुदायांचें दैन्य तत्काल नष्ट करून टाकतो.

दुसरा अर्थ—[ विष्णुपदस्थः ] आकाशामध्यें राहून ( प्रचंडकर पालः ) उष्ण किरण धारण करणारा; ( नक्षत्र-लोप कृद्यः ) नक्षत्रांचा लोप करून टाकणारा; पक्ष्यांचें दैन्य एकदम दूर करणारा असेल तोच सूर्य होय. 'स' व 'श' ह्यांत भेद नाहीं ह्मणून 'शूर'-'सूर'-'सूर्य' ).

ज्याची ब्रह्मसूत्रें ( अथातो ब्रह्मजिज्ञासा इत्यादि ) पाठ केलीं असतां तात्काळ ब्रह्मज्ञान प्राप्त होतें; असा वेदांचे विभाग करणारा व पुराणें रचणारा जो वेदव्यास त्याला माझा नमस्कार असो.

श्लेषः—यज्ञोपवीत गळ्यांत घातल्यानें ज्यांचें ब्राह्मणत्व सिद्ध होत आहे. वेदांचा उपदेश करणारा व पुराणें सांगणारा असा जो व्यासरूपी ब्राह्मण त्यालाही माझा नमस्कार असो.

> कृतपर्यस्तिकाबंधो जलामृताविवेचने ।
> यः शुचिः स्वात्मना नित्यं स द्विजो हंस उच्यते ॥२९८॥

पहिला अर्थ—( जलामृत विवेचने ) जड ह्मणजे माया आणि अमृत ह्मणजे मोक्ष (कृतपर्यस्तिकाबंधः) ह्यांचा भेद करण्याच्या कामीं सदा कंबर बांधून तयार; आणि (यः) जो ( शुचिः स्वात्मना नित्यं ) आत्मज्ञानाच्या योगानें सदासर्वदा शुद्ध; त्या ब्राह्मणाला ' हंस ' असें ह्मणतात.

दुसरा अर्थ—जो ( जल—अमृत विवेचने ) दूध आणि पाणी ह्यांची निवडानिवड करण्या विषयीं कंबर बांधून तयार असतो; ( शुचिः स्वात्मना ) आणि पांढऱ्या रंगाचा असतो. तेव्हां त्या पक्ष्याला ' हंस ' असें म्हणतात. हें उघडच आहे.

यद्भिन्नकठिनविषयजरसं रसज्ञा रसाकुला दधते ।
विशदस्वभावसुभगास्त एव मुख्या द्विजा विराजंते ॥२९९॥

पहिला अर्थ—(यद्भिन्न-कठिन विषयजरसं ) भिन्न भिन्न जे कठिण विषय त्यांच्या पासून झालेला ज्ञानरस, (रसज्ञः) रसिक लोक अर्थात द्विज (रसाकुला दधते) चाखतात-त्यांत निमग्न असतात.(विशदस्वभावसुभगाः) चांगला स्वभाव असल्यामुळें जे महाभाग्यवान् असे ( द्विजाः ) श्रेष्ठ ब्राह्मण शोभतात.

दुसरा अर्थ—भिन्न भिन्न फोडलेल्या पदार्थांपासून निघणारा रस ( रसज्ञा ) म्हणजे जिव्हा ( रसाकुला ) रसाची नेहेमीं इच्छा करणारी तो रस चाखते. ( विशद–स्वभाव–सुभगाः ) ( मुख्याः ) मुखामध्यें पांढरेपणामुळें स्वभावतःच मनोहर असे दांत शोभतात.

निजमहिममदं न मनाग्ज्ञानघना आत्मना जना दधते ।
यस्माच्छुकोऽपि हंसो हंसः सन्नप्यहंस इति मनुते ॥३००॥

( ज्ञानघनाः ) ज्ञानानें परिपूर्ण असे जे लोक आहेत ते ( आत्मना ) म्हणजे मनांने ( निजमहिममदम् ) ते आपल्या थोरपणाचा मनामध्यें यत्किंचित् ही अभिमान ( न मनाक् ) बाळगीत नाहींत. उदाहरण. ( शुकोपिहंसः ) शुकाचार्य हे खरोखर हंस होते, तरी ते आपल्याला ( अहंस ) मी हंस नव्हे, असेंच मानित होते. ( 'सोहं सोहं'=अहं–सः '=अ हंसः') मी हंस नव्हे.

श्लेष—शुक म्हणजे पोपट आणि हंस म्हणजे हंस नांवाचा पक्षी.

या साध्वसंगता युक्तं जनता साध्वसं गता ।
या साधुसंगता चित्रं जनता साऽध्वसंगता ॥ २०१ ॥

[ या जनता ] जो लोकांचा समुदाय साधूशीं समागम पावत नाहीं, त्याला [ साधु–असंगता ] [ साध्वसं गता ] संकट प्राप्त झालें तर तें [ युक्त ] योग्यच आहे. परंतु जे साधूशीं समागम करतात ते ( सा —अध्वसंगता ) सन्मार्गाला लागतात हें मात्र विलक्षण आहे. कारण ( सा+अध्वसंगता=साध्वसंगता=साधु+असंगता ) संधीच्या नियमां-प्रमाणें ' साध्वसंगता' ह्यांचा पदच्छेद साधु–असंगता असाही होतो. व 'साध्वसंगता' ह्याचा अर्थ ' साधूंशीं ' संगति नसलेले असा होतो. परंतु ' साधुसंगत ' असे लोक 'साध्वसंगत ' असें होणें हें विलक्षण नव्हे का ? असा भाव. हा महिमा कशाचा ? तर साधुसंगतीचा. ह्यावरून साधु संगतीचे प्रकार कसे घडतात तें पहा.

उत्तममूर्धन्येऽस्मिन् जगतीतलभूषणायिते पुरुषे ।
उपकारित्वं मुख्यं मन्ये किल तदनुपयुक्तत्वम् ॥ २०२ ॥

[उत्तम मूर्धन्ये अस्मिन् ] उत्तमामध्यें मूर्धन्य म्हणजे सर्व प्राण्यामध्यें शिरोमणी-श्रेष्ठ असलेला; जगतीतलावर भूषणभूत असा जो पुरुषदेह त्याला सर्वांत श्रेष्ठ असें ( उपकारित्व ) उपकारकरणें हेंच मुख्य कर्तव्य सांगितलें आहे. तें त्याला अनुरूप व युक्तच आहे. तें कसें ? तरः—

श्लेष—' पुरुष ' ह्या शब्दांतलि उत्तम ह्मणजे शेवटचें अक्षर जें तें मूर्धन्य आहे. ( ऋटुरषाणां मूर्धा ) मुख्य–अक्षर ( उ 'युक्त' प ) पहिलें ' पु ' आहे. त्याच्याच मागून ( रु ) उपयुक्त-जोडलेलें-आहे.

संप्रार्थितो भव्यजनो न कालतः
स्यात्पूर्वभावस्थितिरस्य यद्यपि ।
भ्राम्यन्स्वयं स्पर्शनमल्पशोऽर्पयं.
स्तोषं स जोषं तनुयाद्विशेषतः ॥२०३ ॥

**पहिला अर्थ**—( **भव्य जनः** ) उदार पुरुष हा ( **कालतः** ) कालाच्या फेऱ्यामुळें (**नस्यात् पूर्वभावास्थितिःअस्ययद्यपि**) त्याची पूर्वींची भरभराटीची स्थिति कदाचित् राहिली नसली तरी सुद्धां अशा पुरुषापाशीं कोणी धनाकरितां याचना केली असतां (**भ्राम्यन्वयं**) स्वतः चार घरें हिंडून ( द्रव्यसंपादन करून ) ( **स्पर्शनमल्पशः** ) त्यानें थोडेसें दान दिलें तरी याचकाला ( **जोषं तनुयात्** ) फारच मोठा संतोष होईल. कारण त्याची थोरवी विशेष आहे.

**दुसरा अर्थ**--(**भ व्यजनः**) पहिल्या प्रथम असलेलें अक्षर 'भ' ह्याची अवस्थिती नसेल तर म्हणजे तें काढून टाकलें तर राहिलेला शब्द 'व्यजन' म्हणजे पंखा होईल. (**कालतः**) त्याची योग्य वेळीं प्रार्थना केली असतां व तो स्वतः फिरविला तर ( **स्पर्श** ) वाऱ्याची झुळुक अधिकच आनंदकारक वाटेल.

नून भवेद्विगलितं वहुलोहजातं
व्यक्तिं गते किल यदंतरनंतदेवे ।
यस्माच्च्युतानि सहसा वसुदेवकारा-
गारे स्वयं निगडतालकशृंखलानि ॥३०४ ॥

( **अंतः** ) ज्याच्या अंतःकरणांत अनंत असा हा देव व्यास झालेला आहे, त्याचे ( **बहुलोह जातं** ) बहुल म्हणजे पुष्कळ ( **ऊहाः**) म्हणजे तर्क नाहींसे होऊन जातात. सर्व शंकाचें निरसन होतें. ते तर्क कसे जातात? तर वसुदेवाच्या कारागृहांतील (**निगडि तालव्य शृंखलानि**) लोखंडाच्या कुलपाच्या साखळ्या जशा तटकर तुटून पडल्या त्या प्रमाणेंच सर्व तर्क वितर्क ही नष्ट होऊन जातात.

वासुदेव जन्मास आल्या बरोबर वसुदेवाच्या ( बहु+लोह+जात ह्म. लोखंडाच्या पुष्कळ शृंखळा ) शृंखळा तुटून पडल्या, तसें ( **बहुल–ऊह-जातं** ) तर्कही तुटून जातील.

जानद्भिः परमं ज्योतिः सँल्लग्नाधिपगैरपि ।
किं नाद्रियेत सद्योगकरणं चोत्तमा तिथिः ॥ ३०५ ॥

पहिला अर्थ--[परमज्योतिः संलग्न-धिषणै अपि ] ब्रह्मज्ञान ज्यांना झालेलें आहे, ज्याची ( धिषणा ) म्हणजे बुद्धि, ब्रह्माशीं संलग्न आहे; त्याच्याकडून ( सद्योग-करणं ) साधूची संगति करणें आणि ( उत्तम-अतिथिः ) उत्तम अतिथींची पूजा करणें ह्या दोन गोष्टी तो आदरानें होणार नाहींत काय? अवश्य होतील.

दुसरा अर्थ—( परम ज्योतिः ) सूर्य ( संलग्न धिषणैः अपि ) नक्षत्र, ग्रह, लग्न, इत्यादिकांचें ज्योतिष वगैरे जे जाणतात ( सत् योग करणं ) ते उत्तम योग, करण, आणि उत्तम तिथि यांचा आदर करणार नाहींत काय? मुहूर्त वगैरे पाहणार नाहींत काय? अवश्य पहातील.

जानंति ये परं ज्योतिस्ते तु धन्यतरा नराः ।
येषां लीलावतीमध्यें पश्य व्यासोऽप्यवस्थितः ॥ ३०६ ॥

पहिला अर्थ—( जानंति ये परं ज्योतिः ) जे परमात्म ज्ञानाला ओळखतात ( ते तु धन्य तरा नराः ) ते पुरुष अत्यंत धन्य होत. कारण ( येषां लीलावतीमध्ये ) त्यांच्या स्त्रियामध्यें सुद्धां 'पश्य' पहा! (व्यासः अपि व्यवस्थितः) प्रत्यक्ष व्यास निवास करतात. कशावरून? तर

दुसरा अर्थ—जे लोक भास्कराचार्यांनीं केलेला ( सिद्धांत शिरोमणी ) नामक ज्योतिषग्रंथ जाणतात ते पुरुषही परम धन्य होत. त्यांच्या [ लीलावती ] ग्रंथामध्यें सुद्धां व्यासाचें ह्म. वर्तुळाच्या महत्तम रुंदीचें विवेचन आहे.

[ भास्कराचार्यांना 'लिलावती' नांवाची एक बालविधवा कन्या असून ती नेहमीं पित्याच्याच सान्निध्याला असे. तिला आचार्यांनीं गणित हा विषय सहज समजून सांगितला. व त्या ग्रंथाला त्या प्रिय कन्येचेंच 'लीलावती' हें नांव दिलें. हा ग्रंथ सर्वत्र प्रसिद्ध असून त्यांतील संबोधनें सर्व कन्येलाच अनुलक्षून दिलेलीं आढळतात. ]

जातस्वात्मपरीपाको नन्वपामार्गशेखरः ।
रंजनायेह जायेत नाप्रत्यक्प्रवणात्मनाम् ॥ ३०७ ॥

**पहिला अर्थ**—( **जात स्वात्मपरीपाकः** ) ज्याच्यामध्यें आत्मज्ञानाचा पूर्ण परिपाक झालेला आहे, तें ज्याच्या हृदयांत पूर्णपणें ठसलेलें आहे, (**अपामार्गशेखरः**) मोक्षमार्ग जाणणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ, असा एखादा महात्मा असला तर तो ( **न अप्रत्यक् प्रवणात्मनाम्** ) विषयाकडे ज्याची प्रवृत्ति आहे अशा मनुष्यांना आवडत नाहीं.

**दुसरा अर्थ**—[ **जात स्वात्मपरीपाकः** ] चांगल्या तऱ्हेनें पोसलेला ( **अपामार्गशेखरः** ) असा आघाड्याचा तुरा [ **अप्रत्यक्** ] कुसळांच्या उलट्या बाजूनें अंगास खाजविणारांचें कधीं रंजन व्हावयाचें नाहीं उलट आगच होईल.

**सन्नाथमंडलस्था भजंत इह जंतवोऽमृतं संतः ।**
**यद्विषयमाननंस्था दुरंतमृत्युं तदप्युचितमेतत् ॥ ३०८ ॥**

(**सन्नाथ मंडलस्था**) साधुश्रेष्ठांच्या मंडलामध्यें बसलें असतां (**जंतवः** प्राणी (**अमृतं भजंतः**) ह्या लोकीं मोक्षाला जातात; तेच ( **यद्विषय माननस्था** ) जर विषयाचा सत्कार करूं लागले तर ( **दुरंत मृत्युं** ) अत्यंत भयंकर मृत्यूचेंच भजन करतात, असें होईल. तें उचितच आहे. कारण, शब्दावरूनच ( विषयमानन=विष-यम-आनन) विषयाच्या आणि यमाच्या जबड्यांत पडल्यावर मृत्यू यावा हें उक्तच आहे.

**निलयः कष्टाय स इव, वनिता स्वहिताय जायते सेव ।**
**यं प्रति किल स्वलौल्यं तदिव स हि जनो विराजते विरलः ॥ ३०९**

[ **निलय** ] म्हणजे घर, हें ज्याला ( **कष्टायसइव** ) कष्टमय वाटतों; ( **वनिता** ) म्हणजे स्त्री, ही वनांत राहण्या सारखी—अरण्यवासा सारखी वनवासाप्रमाणें अत्यंत अहितकर अशी वाटते, [ **स्वलौल्यं** ] आणि ज्याची आत्मज्ञानलालसा धनतृष्णे इतकी तीव्र असते, असा मनुष्य विरळाच दृष्टीस पडतो. ह्यांतील प्रत्येक शब्दांत द्व्यर्थ साधला आहे. निलय=निरय-नरक.

**बहुतराहिते रसातल उत्तिष्ठते हि सुमनसस्तपासि ।**
**कांतारैजनवेगं विषह्य सद्रसफलास्तु विरलाः स्युः ॥ ३१० ॥**

पहिला अर्थ—[ बहुतर-हितरसातल] हें जग कर्मभूमी असल्यामुळें कर्माला अत्यंत हितकर अशा पृथ्वीवर तपाचरण करण्याकरितां अनेक साधु उत्पन्न होतात. परंतु स्त्रीद्रव्यादि इतर बंधुवर्ग ह्यांच्या संबंधाच्या आसक्तीच्या आवेगाचा प्रतिकार करून आत्मज्ञान हें फळ ज्यांनीं हस्तगत केलें आहे असे लोक फार विरळा.

दुसरा अर्थ—[ बहु-त-राहितं ] 'त' रहित असें [ रसातल ] म्हणज [ रसाल ] आम्रवृक्षावर [ तपासि ] म्हणजे माघमासामध्यें [ सुमनसः ] म्हणजे मोहोर पुष्कळ येतो पण [ कांतारैजनवेगं ] कांतर-एजन-वेगं वाऱ्याच्या कंपनाचा वेग सर्व सहन करून रुचकर फळें उत्पन्न करणारे आंबें विरळाच असतात.

पंकोद्भूती रजोभिः कलुषितहृदयः कंटकाबद्धसंग-
श्चेत्सूर्यात्तप्रसादो भ्रमरहित इह स्यात्सदामोदपूर्णः ।
तं धत्ते वासुदेवो निजकरकमले पद्मवत्सादरं तत-
किं वाच्यं तत्र लक्ष्मीर्निवसति निभृतं नित्यदा निर्व्यलीकम् ।२११

पहिला अर्थ--जो मनुष्य [ पंक ] म्हणजे नीच कुलांत जन्मलेला; [ रजोभिः ] रजोगुणानें ज्याचें हृदय कलुषित झालें आहे; म्हणजे फलावर आसक्ति असलेला; [ कंटकाबद्धसंगः ] दुष्ट लोकाशीं ज्याची मैत्री जडलेली आहे, असा जरी असला तरी [ सूर्यात्त प्रसादः ] सूरि प्रसादः--शहाण्या लोकांकडून त्याला जर प्रसाद प्राप्त झाला असेल; आणि [ भ्रम-रहित ]अज्ञान गेलेलें असेल; सदा आनंदयुक्त असेल; तर त्याला वासुदेव आपल्या करकमलामध्यें कमलाप्रमाणें मोठ्या आदरानें धारण करतो. फार काय सांगावें ? तेथें निश्चयेंकरून [ नित्य-दा ] नेहमीं दान करणारी आणि [ निर्व्यलीकं ] निर्दोष-दुःखरहित अशी लक्ष्मीही वास करते.

दुसरा अर्थ—[ पंकोद्भूती ] चिखलांत उत्पन्न झालेलें, [ रजोभिः ] परागांनीं युक्त [ कंटकाबद्ध संगः ] कांट्यांनीं व्यापलेलें असें कमल असेल

तरी सूर्यापासून जें फुललें आहे; भ्रमरांना हितकर [ सतू-आमोद-पूर्ण ] उत्तम सुगंधानें युक्त अशा तऱ्हेनें हीं विशेषणें कमलाला लागूं पडतात. व कमलांत लक्ष्मी वास करिते हें तर उघडच आहे.

यः प्रीतिमानपि सदैव कलिप्रवृत्तौ
संकीर्तयन्नटति कृष्णयशः पवित्रम् ।
स ब्रह्मभूत इति सुप्रथितस्त्रिलोक्यां
दृष्टा करेऽस्य सततं महती प्रतिष्ठा ॥ ३१२ ॥

पहिला अर्थ-- [ कलिप्रवृत्तौः ]असलें कालियुग लागलें असतांही [ यः ] जो [ प्रीतिमानपि सदैव ] नेहमीं प्रीतियुक्त अंतःकरणानें [ कृष्णयशः पवित्रम् ]श्रीकृष्णाच्या पवित्र कीर्तीचें गायन करीत[अटाति] फिरतो. ( स ब्रह्मभूतस्त्रिलोक्यां ) तो त्रैलोक्यामध्यें ब्रह्मस्वरूपच झाला आहे (इति) अशी (सुप्रथित) त्याची प्रसिद्धी होते, आणि (महाति-प्रतिष्ठा) मोठीथोरली प्रतिष्ठा [अस्यकरे सततं दृष्टवा ] त्याच्या नेहमीं हस्तगत झाल्यासारखी दिसते.

दुसरा अर्थ-(यः) जो [सदैव कलिप्रवृत्तौः) (प्रीतिमान पि) नेहमीं कलहप्रिय असूनही मोठ्या भक्तिभावानें पवित्र श्रीकृष्णाची कीर्ति गायन करतो, व ( महती ) नांवाचा वीणा ज्याच्या हातांत निरंतर दृष्टीस पडतो ( स-ब्रह्मभूत ) तो ब्रह्मस्वरूपाप्रत पोचलेला व त्रैलोक्यांत प्रसिद्ध असलेला असा नारद ऋषी हेंच वरील सिद्धांताचे प्रत्यक्ष उदाहरण होय.

वीणाया अपि भुवनत्रयश्रियोऽपि
मायाया अपि निपुणं गुणान्महत्याः ।
धुन्वानः समभिद्धान आजिहानो
दिव्यात्मा विहरति नारदो जगत्सु ॥ ३१३ ॥

( वीणाया अपि भुवनत्रय श्रियोपि ) तिन्ही लोकामध्यें अत्यंत शोभणारी अशी महाति नामक विणेच्या तारा वाजविणारा व त्याबरोबरच तिन्ही लोकांमध्यें विराजमान होणारी परमेश्वराची जी माया, तिचे गुण

ह्यांचा पाश तोडून टाकणारा एकाग्रतेनें, व निश्चल मनानें त्रिभुवनापर्यंत विहार करणारा असा ज्याचा आत्मा दिव्य आहे, तो नारद संचार करतो.

श्लेष---महती नांवाची वीणा; माया—महत्तत्त्वस्वरूपिमाया.

प्रऱ्हादप्रमुखा हि बालमतयो विष्णोर्गुणग्राहिणो-
ऽभूवन्नारदसंगजं फलमिति प्रस्तौमि यावद्भृशम् ।
तावत्तु स्मृतिमार्गमागतामिदं यत्पर्वतः सर्वतो
गायन्विष्णुगुणान्स ह व्रजति मद्वाचस्ततो मुद्रिताः ।। ३१४ ।।

नारदाच्या बुद्धीचें फल ह्मणून बालमती असलेले प्रऱ्हाद, ध्रुव प्रमुख लोकही विष्णूचे गुणग्राही झाले. असें मी (भृशम्) मोठ्या कंठरवानें वर्णन करणार होतों तोंच पुढील गोष्ट( स्मृतिपथांत) आली—आठवली.कीं, पर्वत नांवाचे ऋषी विष्णूचे गुण गात गात ( सर्वतः ) जिकडे तिकडे जात असतात. हें आठवून माझी वाणी कुंठीतच झाली. कारण पर्वत सुद्धां जर चालूं लागले, तर मग बालमती गुण गाऊं लागले ह्यांत आश्चर्य तें काय ? असा भाव.

हीनजातिरपि यच्छबर्यभूच्छ्रीरमेशकरुणारसास्पदम् ।
इत्यवेक्ष्य बदरीफलं मुनिस्तद्वने वसति बादरायणः ।। ३१५ ।।

हीन जातीची असून सुद्धां शबरी ही बदरी फलांच्या दानानें श्रीरमेश ह्याच्या करुणरसाला पात्र झाली. हा बदरीफलांचा महिमा पाहून बादरायण मुनि ( व्यास ) बदरी वनामध्येंच वास करतो. ह्याचें कारण, बदरी फलाचा महिमाच असावा.

कृष्णं द्वैपायनं वंदे महाभारतमोदिनम् ।
पुराणपुरुषं ब्रह्मविद्यां निदधतं नरे ।। ३१६ ।।

पहिला अर्थ–( महाभारत मोदिनम् ) महाभारत ग्रंथ करून आनंद देणारा [पुराण पुरुष] पुष्कळ कालाचा वृद्ध पुरुष 'नरे' लोकामध्यें (निदधतं) ब्रह्मविद्येचें ज्ञान स्थापन करणारा ( द्वैपायन कृष्ण) अशा कृष्ण द्वैपायनाला —द्वीपांतरामध्यें राहणाऱ्या व्यासाला मी वंदन करतों.

दुसरा अर्थ--( महा-भार-तमो-दिनम् ) महान् भाररूप जें तम म्हणजे अज्ञान, त्याला जणोंकाय दिवसाप्रमाणेंच घालविणारा अनादि पुरुष [ब्रह्मविद्या निद्धतम्] गीता सांगणारा:प्रतिपादन करणारा (द्वीप) म्हणजे हत्ती·गजेंद्र, त्याला मोक्ष देणारा जो श्रीकृष्ण त्याला मी वंदन करतों.

यद्ब्रह्मसूत्राणि विधाय कंठे सपद्ययं ब्राह्मणभावमेति।
वेदोपदेष्टारमिमं पुराणाचार्यं मुहुर्व्यासमहं नमामि ॥ ३९७ ॥

[ यद्ब्रम्हसूत्राणि विधाय कंठे ] गळ्यामध्यें जर यज्ञोपवीत घातलेलें असलें, तर ( सपद्ययं ब्राह्मणभावमेति ) हें ब्राह्मणांचें लक्षण आहे असें तत्काळ ओळखतें. (वेदोपदेष्टारम् ) आणखी तो वेदांचा विभाग करणारा असून [ पुराणाचार्य ] पुराणें सांगणारा आचार्य—अर्थात् वेद व्यास त्यास मी पुनः पुन्हा वंदन करतों.

आशावसाना लोकेषु निजगुह्यप्रकाशकाः।
उपहासास्पदं प्रायो नूनमेकं शुकं विना ॥ ३१८ ॥

पहिला अर्थ-[ लोकेषु ] जगामध्यें [ आशावसाना ] आशेचा त्याग करणें हेंच काय तें आत्मज्ञान प्राप्तीचें साधन आहे. परंतु तें शिकविण्याचा एका शुकाचार्यावांचून बाकी कोणी कितीही आव आणला तरी तें उपहासास्पदच होतें. म्हणजे शुकाचार्यांनीं मात्र आशेचा खरा खरा त्याग केला होता व गूढ अशा आत्मतत्त्वाचा खरा उलगडा केला होता असा भाव.

दुसरा अर्थ—( आशा-अवसाना ) वस्त्रत्याग करणें हें जगामध्यें गुह्य प्रगट करण्यास मात्र कारण होतें. ह्याकरिता तें एक पोपटालाच पक्षीं —तोंडानें वटवट करणारालाच-शोभते. इतरांना हास्यास्पदच होतें.

द्विजेषु शुक एवेह मुनीनां सुमनःस्थितम्।
रसमास्वादमास्वादं सुखं चरति सर्वतः ॥ ३१९ ॥

पहिला अर्थ—ऋषींचीं चांगलीं अंतःकरणें रंजवित असलेला ब्रह्म ज्ञानरसाचा आस्वाद घेत घेत जो आनंदाने सर्वत्र संचार करतो, अशा ब्राह्मणामध्यें शुक म्हणजे शुकाचार्यच काय ते एक होत.

**दुसरा अर्थ**--( **मुनींच्या** ) ह्मणजे अगस्त्यांच्या फुलांतील रस मोठ्या आवडीनें चाखीत चाखीत सर्वत्र हिंडतो असा पक्ष्यांमध्यें एक पोपटच होय.

**द्राक्षानिंबफणिज्जेषु यस्य साधारणी रुचिः ।**
**तादृशः शुक एवेह द्विजेंद्रेषु विलोक्यते ॥ ३२० ॥**

**पहिला अर्थ**---ब्राह्मण श्रेष्ठामध्यें द्राक्षें, लिंबें, व मिरची ह्या तिहींच्या ठिकाणींही ज्याला एकच रुची लागते असा काय तो एक शुक. शुकाचार्यच दृष्टीस पडतो.

**दुसरा अर्थ**---मोठमोठ्या पक्ष्यामध्यें द्राक्षें, लिंबें, व मिरची ह्या तिन्ही ठिकाणीं ज्याला एकसारखीच गोडी लागते असा एक पक्ष्यामध्यें पोपटच दृष्टीस पडतो.

**सदुपासनसंपन्ना कृतस्वारिपरिक्षया ।**
**अबला शबरी नूनं शरधारी परः पुमान् ॥ ३२१ ॥**

**पहिला अर्थ**-[**शबरी अबला**] शबरी ही खरोखर [**अबला**] ह्मणजे स्त्री होती; परंतु ती तशी वाटत नाहीं. तर ती ( **शरधारी** ) धनुष्य बाण धारण करणारा असा [ **परः पुमान्** ] श्रेष्ठ पुरुष रामचंद्र त्याच्या सारखीच होती. कशावरून ? तर पहा.

**दुसरा अर्थ**-राम कसा होता ? तर [ **सदुपासनसंपन्ना** ] उत्तम प्रकाऱ्या बाणांचा अभ्यास केलेला. आणि शबरी कशी होती ? तर [ **सत्-उपासना संपन्ना** ] चांगल्या लोकांची उपासना जिनें संपादन केली आहे अशी. आणखी राम कसे होते ? तर [ **कृत-स्व-अरि-परिक्षया** ]ज्यानें आपल्या शत्रूंच्या सर्वस्वाचा नाश केला आहे असा. आणि शबरी कशी ? तर जिनें आपल्या शत्रूंचा षड्रिपुंचा नाश केला आहे-त्यांना हलकें ठरविलें आहे अशी. तेव्हां तिचेंही रामचंद्राशीं सादृश्यच होतें. ह्या करितां ती जी स्त्रिलिंगी आहे ती पुल्लिंगी केली म्हणजे झालें.

श्लेष-[अ-ब-ला] ह्मणजे ब हें अक्षर घेत नाहीं अशी ती शबरी. अर्थात् शबरींतून ब अक्षर काढलें ह्मणजे [**शरी**] शरधारी राम असाच अर्थ निघतो

शबरी कोलवितरणादपि भवजलधेर्महोर्मिघोरस्य- ।
पारं परं गतवती, येन स लाघवसमाश्रयो जयति ॥ ३२२ ॥

**पहिला अर्थ**—[ **कोलवितरणादपि** ] कोल ह्मणजे बोरें दान देण्याच्या योगानें मोठ मोठाल्या घनघोर उसळलेल्या लाटांच्या भवसागरांतून शबरी ही पूर्णपणें पार तरून गेली. त्या [ **लाघव समाश्रय** ] कौशल्याचा जय जयकार असो. (श्लेष) ' लाघव ' च्या ठिकाणीं 'राघव' करून त्या राघवाच्या भक्तीचाही जयजयकार असो असा भाव.

**दुसरा अर्थ**—[ **कोल** ] ह्मणजे नदी वगैरेंतून तरून जाण्यासाठीं बांबूचा चामड्यानें मढविलेला टोकरा करतात तो. त्याच्या साधनाच्या योगानें मोठ्या जलाशयांतून पार पडून जातां येतें. त्या त्याच्या लाघवाची हलकेपणाचीही धन्य असो.

आत्यंतिकं स्वकुशलं परिलिप्समानाः
सेवंत एव सुजना बहुशोऽपि रामम् ।
सर्वेषु तेषु रघुनाथगृहीतसेवा
सैकैव भाति शबरी परिशुद्धभावा ॥ ३२३ ॥

सज्जन लोक आपलें ( **कुशलं** ) परमकल्याण—मोक्ष मिळविण्याच्या हेतूनें रामाची सेवा हवी तेवढी करोत. पण त्या सर्वांमध्यें रघुनाथानें ज्यांची सेवा घेतली आहे अशी शुद्ध भावानेंयुक्त शबरी ही एकच होय.

**श्लेष**—मूठभर बोरें ह्याला ' **सेवम्** ' असें ह्मणतात. हा सेवा ह्या शब्दाचा दुसरा अर्थ [ **भोजनकुतूहल** ] नामक ग्रंथांत दिलेला आहे. तो असा—

[ मुष्टिप्रमाणं बदरं सेवामित्यभिधीयते ]

ह्यावरून रामचंद्रानीं शबरीची ' सेवा ' ह्मणजे मूठभर बोरें ग्रहण केली, तेव्हां तेंच खरें सेवाग्रहण होय.

महाकपिः श्रीरामांघ्रिसरसीरुहतत्परः ।
विलोपितांतको यस्मात्तस्माद्वाच्यो महाकविः ॥३२४॥

श्रीरामचंद्राच्या चरण कमलाची सेवा करणारा मोठा वानर जो मारुति तो मूळचा महाकपी आहे. परंतु [विलोपित-अंतकः] त्यानें ज्याअर्थी मृत्युला जिंकलेलें आहे ( तो सप्त चिरंजिवांपैकीं एक चिरंजीव असल्याचें प्रसिद्धच आहे. ) त्याअर्थी त्याला महाकवीच ह्मणावें.

श्लेष—हनुमान हा एक कविच आहे. तो कसा ? तर [ वि—लोपित—अंत—कः ] ' वि ' ह्या अक्षरानें शेवटच्या वर्णाचा ' पि ' ह्याचा लोप झाला आहे असा. 'पि' अक्षर गाळून म्हणजे काढून टाकावयाचें. व 'वि' घालावयाचें ह्मणजे कवि असा शब्द होतो. कवि ह्मणजे विद्वान् असा अर्थ.

सत्त्वं सुखे संजयतीति हि स्मृति-
श्चेन्नित्यदा सत्त्वमथानिशं सुखम् ।
इतीव विद्वान्पवनस्य नंदन-
स्तन्नित्यदासत्वमसौ दृढं दधौ ॥ ३२५ ॥

आतां मारुतीला विद्वान् कां ह्मटलें त्याचें कारण सांगतातः—
गीतारूप स्मृति असें ह्मणतें कीं, सत्व हें सुख उत्पन्न करतें. तें सत्वच जर नेहेमीं आपल्यापाशीं असेल तर एक सारखें सुख हें मिळालेंच पाहिंजे. हें जाणून पवनसुत जो विद्वान् मारुति त्यानें [ नित्य-दासत्त्व ] रामाचें नित्य दासत्त्व अखंड-सेवाच पतकरली आहे.

श्लेष—( नित्य—दासत्त्व ) पतकरलें ह्मणजे [ नित्यदा-सत्त्व ] निरंतर सत्त्व हेंच जवळ असतें. आणि सत्वापासून नेहेमीं सुख मिळतें हा ध्वनितार्थ.

बिभीषणो राक्षसवंशदीपकः सभाजनोद्दामदशास्यदूषकः ।
सर्वोत्तमस्नेहभरेण पूरिताश्चिरं ज्वलत्यत्र परं निरंजनः ॥ ३२६॥

## विभीषणाचें वर्णन.

बिभीषण हा राक्षस कुलांतील एक दीपक ह्मणजे दिवाच असून तो सभाजनामध्यें उद्दामपणानें वर्तन करणारा जो रावण, त्याला स्पष्टपणें दूषण देणारा, व सर्वोत्तम जो राम त्याच्याशीं स्नेहातिरेकानें भरलेला व

[पर निरंजनः ]उत्कृष्ट असा निरंजन–विषयवासना रहित [चिरंज्वलति] असा निरंतर कायम जळत राहतो.

**दुसरा अर्थ**–[ **स–भाजनं** ] उत्तम पात्रामध्यें [**उद्दाम दशा**] मोठी ढळढळीत वात घातलेला, [ **आस्य दूषकः** ] त्या वातचिें तोंड काळें करणारा [ **सर्वोत्तम–स्नेह्–भरेण–पूरितः** ] उत्कृष्ट व भरपूर तेल घातलेला ( कारण चांगल्या तेलानें काजळ धरत नाहीं ) असा कधींही काजळ न उत्पन्न होणारा दिवा कायमचाच जळत राहिला आहे. अर्थात् त्याची कीर्ति कायम आहे, अथवा तोही चिरंजीव आहे असा भाव.

**अहो सदारामपदं श्रितस्य कुजन्मनः सद्रससंप्लुतस्य ।**
**समुद्भवेत्सत्सुमनस्कताऽस्य निदर्शनार्थं यवनः कबीरः ॥३२७॥**

**कबीराचें वर्णन.**

**पहिला अर्थ**-अहो ! [ **सदारामपदं श्रितस्य** ] निरंतर ज्यांनीं रामचंद्राच्या पदाचा आश्रय केलेला आहे, ते जरी नीच कुलांत जन्मलेले असून ते जर (**सद्रस संप्लुतस्य** ) ब्रह्मानंदानें भरलेले असतील तर त्या पुरुषांच्या अंगीं ( **सत्सुमनस्कता** ) खरें खरें साधुत्त्व कसें उत्पन्न होतें ह्याचा ‘ **कबीर** ’ हाच एक दाखला आहे.

**दुसरा अर्थ**–[**सत्–आरामपदं श्रितस्य**] निरंतर सुंदर बागेंत असलेल्या ( **कु–जान्मिनः** ) उत्तम रसांनीं भरलेल्या झाडांना फुलांचा बहार येणार नाहीं काय ? हेंच दाखविण्याकरितां कबीर हे यवन झाले आहेत.

**यो ह्यादिमवर्णोत्तररसंगतोऽसौ कुजन्म्यपि कबीरः ।**
**सुमनःसहस्रमध्ये श्रैष्ठ्यं न समाश्रयेत्कथंकारम् ॥ ३२८॥**

**पहिला अर्थ**–[ **कुजन्म्यपि** ] जो नीच कुलांत जन्मला असूनही ( **आदिमवर्ण** ) श्रेष्ठ वर्ण जो ब्राह्मण, त्यांना योग्य असा ब्रह्मज्ञानरूपी उत्तम रस ज्याला प्राप्त झाला आहे, तो हजारों साधूमध्यें श्रेष्ठता कशी पावणार नाहीं? पावलाच पाहिजे.

दुसरा अर्थ—[ आदिमवर्ण ] ह्मणजे पहिलें अक्षर जें क त्याच्या नंतर र अक्षरानें युक्त झाला तर करवीर असें होईल. करवीर ह्मणजे कण्हेरीचें झाड. त्याला तरी हजारों फुलामध्यें श्रेष्ठत्त्व कसें प्राप्त होणार नाहीं? व आणि ब ह्यामध्यें भेद नाहीं.

बकुलात्पुष्पसाहस्रान्नंद्यावर्तं विशिष्यते ।
नंद्यावर्तं सहस्राद्धि करवीरं विशिष्यते ॥ १

असें नृसिंहपुराणांत कण्हेरीचें माहात्म्य वर्णन केलेलें आहे.

नृणां मूर्धस्रक्त्वं [ न्यत्वं ] कलयति कबीरस्य तनयः
कमालेत्येतस्मिन्विषय इह हेतून्समुचितान् ।
उपन्यस्तुं यावत्कृतपरिकरस्तावदचिरात्
समाख्यैवास्येयं मम समवरुद्धे मतिगतिम् ॥ ३२९

## कमालाची स्तुति.

कबीराचा मुलगा कमाल हा सर्व मनुष्यांमध्यें शिरोभूषण जें माला तेंच धारण करतो. ह्या करितां ह्या बाबतींत कांहीं तरी योग्य अशीं कारणें [उपन्यस्तु] पुढें ठेवावींत ह्या हेतूनें [कृत परिकरः] मी तयार झालों. पण इतक्यांत त्याचें ( कमाल ) ह्या ( समाख्या ) नांवानेंच माझी बुद्धि कुंठित केली. कारण, [ क माल ] ह्याचा अर्थ [ के ] म्हणजे मस्तकावर असलेली माला असाच आहे. दुसरा अर्थ–क–माल–रुंढमाला.

[एके दिवशीं अपरात्रीं संतमंडळीचा एक मेळा अकस्मात् कबीराच्या घरीं आला. तो दूरच्या गांवाहून चालून थकला होता आणि सर्वांच्या पोटांत क्षुधा लागलेली होती. आणि त्या दिवशीं कबीराच्या घरांत तर अन्नसामग्री मुळींच नव्हती. ह्मणून त्याचा पुत्र कमाल एका वाण्याच्या दुकानांत शिरून संतमंडळापुरता शिधा घेऊन तो बाहेर पडला. परंतु मोरीवाटें बाहेर निघत असतां आंतील दुकानदार जागा होऊन त्यानें त्याचे पाय घट्ट धरले. बाहेर कबीर उभा होता. त्यास कमाल ह्मणाला माझें मस्तक कापून घ्या. ह्मणजे उद्यां माझी राजदरबारीं विटंबना

व्हावयास नको. त्याप्रमाणें कबीरानें मस्तक कापून घेतलें. दुसऱ्यादिवशीं चोराचें धड ह्मणून त्या दुकानदारानें कमालाचा देह सरकारांत नेऊन टाकला. राजानें त्या धडासच सुळावर देण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणें कमालाचें धड सुळावर दिलें. परंतु संतमंडळी त्या मार्गानें जाऊं लागली, तेव्हां त्या धडानें आपले हात जोडून त्यांस नमस्कार केला ! हा चमत्कार पाहून राजानें सर्व चौकशी केली व पुढें संतांच्या कृपेनें कमालाचें शिर त्याच्या धडावर ठेवतांच तो पूर्ववत् जिवंत झाला. ह्या कथेशी रुंढमाला हा श्लेष किती बरे समर्पक आहे ?·]

आत्मारामसमुद्भूतिस्तुलस्यामोदमंदिरम्
सुमनःकोटितः प्रीत्यै श्रीरामस्य भवेन्न किं ॥ २३० ॥

**पहिला अर्थ**–[**आत्माराम-समुद्भूतिः**] आत्मानंदाचा उत्कर्ष असलेलें किंवा आपल्या बागेंतच झालेलें (**तुलस्यामोदमंदिरम्**) तुळशीच्या सुवासाचें मंदिर-माहेरघर-जें वृंदावन तें (**सुमनः**) कोट्यावधि फुलांपेक्षांही श्रीरामाला अधिक प्रीतिकारक होणार नाहीं काय ?

**दुसरा अर्थ**––कान्यकुब्ज देशांतील आत्माराम हा तुळशीदासाचा पिता. (**तुलस्यामोदमंदिरं**) त्याला आनंद देणारा जो तुलसीदास तो कोटि साधूपेक्षांही श्रीरामाला प्रिय होणार नाहीं काय ?

लोकोऽयं किल मोहितो ममतयाकाः का न नामाचरेत्
प्रेतासंगमहाभुजंगमपरिष्वंगादिघोराक्रियाः ।
तां जह्याद्यदि रामदर्शनसुधालाभस्य सद्भाजनः
स्यादित्यत्र निदर्शनाय तुलसीदासः समुज्जृंभते ॥ २३१ ॥

हा लोक ममतेनें मोहित झाल्यामुळें काय काय करणार नाहीं ! 'प्रेतःसंगः' प्रेताशीं आलिंगन; मोठमोठाले भुजंग हातांत धरणें; इत्यादि महा भयंकर कृत्यें सुद्धां लोक करतात, परंतु ही ममता सोडली असतां रामदर्शनरूपी अमृताचा लाभ होण्यास मनुष्य पात्र होतो ह्याला तुळशीदासाचाच दाखला आहे.

[ तुळशीदासाच्या स्त्रीचें नांव ममता, तिच्यावर त्याचा अत्यंत लोभ असे. एकदां त्याची स्त्री ममता ही माहेरीं असतां एका रात्रीं त्यास चैन पडेना, ह्मणून तो रात्रीच्या रात्रीं उठून तिच्या गांवाकडे निघाला. मार्गांत एक नदी असून तीस पूर आलेला होता. व त्यांतून एक प्रेत वाहात येऊन कडेस लागलें होतें. तीं आपल्या स्त्रीनें आपल्याकारिता होडीच ठेवली आहे असें त्यास वाटून हा त्या प्रेतावर बसून पलकिडे गेला. आणि सासुरवाडीस जाऊन ती माडीवर निजली होती तिच्याकडे चढून जाण्यास मार्ग पाहूं लागला. तों तेथें एक भला मोठा सर्प लोंबत होता. तो आपल्या पत्नीनें आपल्याकरितां दोरच सोडला आहे, असें समजून त्यास धरून तो खिडकीवाटें तिच्या खोलींत शिरला, व ममता निजली होती तीस त्यानें जागृत केलें. ती रात्रीच्या वेळीं अकस्मात् त्याला पाहून अगदीं आश्चर्य चकित झाली. व तुम्ही येथें चढून आला कसें ? ह्मणून तिनें त्यास विचारलें. तेव्हां तुळशीदास ह्मणाले ' तूं दोर सोडला होतास त्याला धरून आलों' तें ऐकून तर ती फारच बुचकळ्यांत पडली. कारण तिनें दोर वगैरे कांहींच सोडलेलें नव्हतें. ह्मणून ती दिवा घेऊन पाहूं लागली, तों भला मोठा भुजंग तेथें लोंबत आहे ! तें सर्व पाहून ती ह्मणाली ' इतकें मजवर प्रेम ठेवून तुम्ही आपला जीव धोक्यांत घालतां, त्यापेक्षां अशीच भक्ति श्रीरामचंद्रावर ठेवाल तर किती बरें उत्तम होईल? त्या तिच्या उपदेशामुळेंच पुढें तुळशीदासांना उपरति होऊन ते श्रीरामचंद्राची भक्ति करूं लागले. अशी ' भक्तिविजय ' वगैरे ग्रंथांतून त्याची कथा वर्णिलेली आहे.)

शिवाय जारण मारण वगैरे प्रयोगाच्या नादीं लागून कित्येक हलके लोक, प्रेतावर बसतात, भुजंग वगैरे हातांत धरतात, ह्यावरही ह्या श्लोकाचा कटाक्ष आहे.

**अकिंचनवरेण्योऽपि समर्थपदवीं गतः**
**दासोऽपि यः किल स्वामी स साधुः कोऽपि राजते ॥ ३३२**

भिकाऱ्यांमध्यें श्रेष्ट होता, तरी सुद्धां [समर्थ] पदवीला पोंचलेला,

आणि दास असून सुद्धां [ स्वामी ] महान् प्रभु पद पावलेला असा जो साधु रामदास त्याची शोभा कांहीं अवर्णनीय आहे.

**यो हि श्रीरामदासः स्यात्परित्यज्य श्रियं स्त्रियम् ।**
**असौ न परलीनः स्यादिति कः सज्जनो वदेत् ॥ ३३३ ॥**

जो कनक आणि कांता सोडून श्रीरामाचा दास बनेल, तो [ **परलीन** ] परब्रह्माशीं लीन होणार नाहीं असें कोणता साधु ह्मणेल ?

**श्लेष**--' परलीन ' परली [ **परळी** ] गांवांत राहणारा नाहीं असें कोणता साधु ह्मणेल ?

**यो रामदासः स्यात्तस्य कल्याणस्थितिरालये ।**
**सभाजयति तं प्रेम्णा दुर्गाधीशः सदा शिवः ॥ ३३४ ॥**

**पहिला अर्थ**--जो रामदास असेल, त्याच्या घरामध्यें निरंतर कल्याणच वास करतें. आणि अशा मनुष्यालाच दुर्गेचा ह्मणजे पार्वतीचा पति जो शिव तो मोठ्या प्रेमानें मान देतो.

**दुसरा अर्थ**----जो रामदास असतो त्याच्या घरांत कल्याण नांवाचा शिष्य असतो. आणि [ **दुर्गाधीश** ] म्हणजे अनेक किल्ल्यांचा-गडांचा-अधिपति असा ( **शिवाजी** ) राजा त्याचा प्रेमानें सन्मान करतो.

**रामदासपदांभोजरजःस्पर्शो विराजते ।**
**यः कुशीलजनास्यास्य कल्याणाय प्रकल्पते ॥ ३३५**

**पहिला अर्थ**--रामदास चरणकमलाचा जो रज, त्याचा स्पर्श धन्य आहे. कारण जो कुशील म्हणजे ज्याचें शील वाईट अशा लोकांनाही तो कल्याणप्रद होतो.

**दुसरा अर्थ**---रामदासाचे चरण हा एक परीसच शोभतो. कां ? तर ' कुशी ' म्हणजे लोखंडाच्या एका कांबी पासून उत्पन्न झालेला किंवा घडीव लोखंडाचे पदार्थ त्यांचें 'कल्याण' म्हणजे सोनें करण्यास तो समर्थ आहे.

**गंगाधरप्रेमरसास्पदं यो यःसूर्यवंशैकमणिप्रवेकः ।**
**खरांतकः शोभनलक्ष्मणाढ्यः स रामदासः किल राम एव॥३३६**

**पहिला अर्थ**---रामदास हा रामच आहे. राम कसा? तर गंगाधर म्हणजे शिव ह्याच्या प्रेमरसाचें म्हणजे भक्तीचें स्थान; जो सूर्यवंशांतील श्रेष्ठ रत्नासारखा अद्वितीय. आणखी कसा? तर '**खरांतकः**' खर नांवाच्या राक्षसाचा नाश करणारा. ( **शोभनं लक्ष्मणाढ्यः** ) सुस्वभावी अशा लक्ष्मण नांवाच्या बंधुसहवर्तमान शोभणारा. असाच रामदासही आहे. तो कसा? तर:--

**दुसरा अर्थ**- गंगाधर नांवाच्या आपल्या श्रेष्ठ बंधूच्या प्रेमरसास-भक्तीस पात्र झालेला. सूर्याजीपंताच्या पोटीं जन्मलेलें अद्वितीय पुत्ररत्न असा. आणखी कसा? तर ( **खरांतकः** ) खलांतकः दुष्टांचा--निंदकांचा नाश करणारा; आणखी कसा? तर ( **शोभन लक्ष्मणाढ्यः** ) मस्तकावर अवाळुनें शोभणारा असा हाही रामदास त्या रामचंद्राच्याच लक्षणांनीं युक्त आहे.

**ध्वस्तमहाशोकवनं दलिताक्षं सद्रुचाफलावासम् ।**
**कल्याणशिवप्रभुपदसोल्लसं रामदासमवलंबे ॥ ३३७ ॥**

ह्या श्लोकांत श्रीरामाचा निरंतर दास होऊन राहिलेला मारुति व श्रीसमर्थ रामदास स्वामी ह्यांचें श्लेषार्थानें साम्य वर्णन केलें आहे तें असेंः

( **रामदास अवलंबे** ) त्या रामाच्या दासांला मी शरण आहे. हे रामदास कोण? तर दोन. एक मारुति आणि दुसरे रामदास स्वामी. ह्या दोघांचींही लक्षणें सारखींच आहेत. कशीं? तर ( **ध्वस्त महाशोक वनं** ) मारुति कसा होता? तर तो रावणाच्या लंकेंतील विशाळ अशोकवनाचा विध्वंस करून टाकणारा असा; आणि रामदासस्वामी कसे? तर ( **ध्वस्त--महा--अशोकवनं** ) सर्व दुःखांचा नाशकरणारे. आणखी मारुति कसा? तर ( **दलिताक्षं** ) रावणाचापुत्र जो अक्ष त्याला ज्यानें मारलें आहे असा; पक्षीं रामदासस्वामी कसे? तर ( **अक्ष** ) म्हणजे इंद्रियें ज्यानीं आपल्या ताब्यांत ठेवलीं आहेत असे. इंद्रियनिग्रही.

आणखी मारुति कसा? तर ( सद्रुचा फलावासम् ) चांगल्या चांगल्या फळांची ज्याला इच्छा आहे असा; पक्षीं रामदासस्वामी कसे? (सत्-द्रुः चाफळ—वासम् ) उत्तम उत्तम वृक्ष लागून गेले आहेत अशा चाफळ गांवांत राहणारे; आणखी मारुति कसा? तर [ कल्याण शिवप्रभु सोल्लासं ] कल्याणाचेंही कल्याण जो श्रीरामचंद्र त्याच्या चरणाच्या ठिकाणीं आनंदानें भक्ति करतो असा; पक्षीं रामदास कसे? तर कल्याण हा शिष्य व शिवाजी महाराज हे ज्यांच्या चरणामध्यें परम उल्हास मानतात असे रामदास ह्यांना मी शरण आहे.

श्रीरामो विपिनप्रयाणसमये श्वःश्रेयसध्वंसको
नास्ति क्रोधसमोऽपरो रिपुरिति प्राह प्रियं भ्रातरम् ।
तद्भूयासमकोपयुक्त इति चेत् श्वःश्रेयसावाप्तये
सर्वस्वं सहसा विहाय तृणवच्छ्रीरामदासो भव ॥ ३३८ ॥

कल्याणस्वामी प्रमाणेंच श्रीरामदासस्वामीपाशीं आका ह्यानांवाची एक शिष्यिण असल्याचें प्रसिद्धच आहे. तिचें वर्णन ह्या श्लोकांत कवीनें [ अकोपयुक्त ] म्हणजे कोप टाकून देऊन व [ अका–उपयुक्त ] म्हणजे अका सन्निध ठेवून अशा दोन अर्थांचा श्लेष साधून केलें आहे. तें असें—

श्रीराम हे वनवासास निघतांना आपला प्रिय बंधु जो लक्ष्मण त्याला म्हणाले कीं, [ श्वश्रेयसः ] आपल्या परम कल्याणाचा नाश करणारा क्रोधासारखा दुसरा शत्रु नाहीं. तेव्हां त्या परम कल्याणाचा लाभ होण्याकरितां एकदम सर्वस्व टाकून देऊन–तृणवत् मानून–कोप रहित व्हावें, अशी इच्छा असेल तर आपल्या सर्वस्वाचा एकदम त्याग करून तूं श्रीरामदास हो.

श्लेष [ अका—उपयुक्त ] म्हणजे अका सहित असा श्रीरामदास स्वामी हो.

श्रीरामः किल भिन्नभिन्नविधया मातेव कौतुहला-
न्याधत्ते स्वजनस्य पूर्णकरुणस्थाने तदेतद्यतः

पूर्वं कानन जातयाऽभिरमितो रुद्रः स्वया लीलया
भूयोऽकाननजातया रमयितुं प्रायः प्रवृत्तः कलौ ॥ ३३९

श्रीराम हे मातेप्रमाणें निरनिराळ्या प्रकारांनीं आनल्या भक्तांचें ( कौतुक ) म्हणजे जिज्ञासा पूर्ण करतात. कोड पुरवितात. तें [ **पूर्णकरुणस्थाने तदेतत्** ] त्यांच्या सदय अंतःकरणाला साजेसेंच आहे. कारण पूर्वीं अरण्यांत केलेल्या लीलेनें रुद्राचें म्हणजे शिवाचें रंजन केलें. आणि आतां कलियुगामध्यें पुन्हा [ **अ–कानना** ] अरण्यांत न झालेल्या अशा लीलेनें रुद्राचें रंजन करण्यास प्रवृत्त झाले आहेत असेंच दिसतें.

श्लेष—श्रीसमर्थ रामदासस्वामींपाशीं ' आका ' म्हणून एक शिष्या होती. तिच्या वडिलाचें नांव रुद्राजीपंत असें होतें. तेव्हां [ **अका–आननें** ] आकांच्या ' आननें ' म्हणजे मुखानें रामाच्या लीलेचें वर्णन करवून पुन्हा एका रुद्राचें रंजन केलें असा भाव.

अकामतात्युत्तमेति कृत्वा चेदिष्यते त्वया ।
श्रीरामदास शरणं व्रज तत्रास्त्यकामता ॥ ३४० ॥

**पहिला अर्थ**—[ **अ–कामता** ] इच्छेचा त्यागच उत्तम आहे; असें जर तुला वाटत असेल, व तो करावा अशी तुझी इच्छा असेल, तर तूं श्रीरादासस्वामींना शरण जा. कारण, त्यांच्या जवळच [ **अ कामता** ] निरिच्छता पहावयास मिळेल.

**दुसरा अर्थ**—( श्लेष )–अका–मता–सर्वांस मान्य झालेली-पूज्य असलेली [ **आका** ] ही रामदासस्वामींची शिष्याच आहे. ती [ **अका–मता** ] तुला तेथें प्रत्यक्षच पहावयास मिळेल. व तेथें [ **अका–मता** ] आकाचा आदर झालेलाही दृष्टीस पडेल.

आपूर्य स्वमुखेन कर्णविवरं वेणुं करांभोरुहे
कृत्वा वादयता पुरा भगवता साधुव्रजस्यार्पितः ।
मोहो मंजुरवेण हंत स पुनर्दासेन तु ध्वंसितो
जानीमस्तदतीव साधु चरितं दासस्य देवादपि ॥ ३४१

ह्या श्लोकांत समर्थांची दुसरी शिष्या जी वेणू तिचें श्लेषालंकारानें मोठें चमत्कारिक वर्णन केलें आहे. तें असें:—

**पहिला अर्थ**—पुर्वीं भगवान् श्रीकृष्णांनीं [ **आपूर्य स्वमुखेन कर्णविवरं वेणुं करांभोरुहे** ] आपल्या तोंडानें ज्या वेणूच्या विवरामध्यें—छिद्रामध्यें वारा भरून तो करकमलांत धरून [ **कृत्वा वादयता पुरा भगवता** ] पूर्वीं भगवतांनीं वाजविला आणि [ **मोह साधुव्रजस्यार्पितः** ] गोपाळाच्या सुंदर समुदायाला मोह उत्पन्न केला. परंतु तोच साधुसमुदायाचा मोह [**दासेन**] म्हणजे रामदासांनीं ती भगवल्लीला वर्णन करून नष्ट केला. ह्यावरून दासाचें चरित्र देवाच्या चरित्राहूनही उत्तम असें आम्हास वाटतें.

**दुसरा अर्थ**—आतां रामदास कसे होते ? तर ज्यांनीं वेणू ह्या नांवाच्या शिष्यिणीला हाताशीं धरून व तिच्या कर्णरंध्रांत स्वमुखानें मंत्रोपदेश करून पूर्वीं भगवंतांनीं केलेल्या सर्व लीला तिच्याकडून वदवून त्या साधुसमुदायास अर्पण केल्या, आणि पुन्हा दासांनीं मोहरूपी भुरळ घालणारा जो मंजुळ ध्वनि तो नष्ट करून टाकला. ह्यावरून दासाचें चरित्र देवापेक्षांही थोर असल्याचें दिसून येतें.

समर्थांजवळ वेणूबाई नांवाची एक विधवा शिष्या असून तिनें केलेलें रामायण अत्यंत सुरस आहे.

**रामाकाशनृपालसंमितशके संवत्सरे दुर्मतौ**
**माघे मासि शनेर्दिनेऽथ चरमे पक्षे नवम्यां तिथौ ।**
**हित्वा दासपदं स सज्जनशिरोभूषामणिः स्वात्मना**
**शिष्टः केवलमर्धघस्रसमये श्रीरामदासो गुरुः ॥ ३४२ ॥**

ह्या श्लोकांत रामदास स्वामींच्या निधन तिथीचें वर्णन आहे. राम म्हणजे ३; आकाश म्हणजे ०; नृपाल म्हणजे १६; ह्या उत्तम शकांत ह्मणजे 'अंकानां वामतो गतिः' ह्या संस्कृतांतील नियमाप्रमाणें शके १६०३ **दुर्मति नाम संवत्सरीं, माघमासांत शनिवारीं दोनप्रहरीं कृष्णपक्षीची**

नवमी ह्या दिवशीं मध्यान्हीं दासपद सोडून सज्जनशिरोभूषण-जणो काय रत्नच असे ते रामदास फक्त आपल्या आत्म्यानें अवशिष्ट राहिले.

श्लेष—[ सज्जन शिरोभूषण ] ' सज्जनगड ' च्या सिंहासनावर भूषणभूत असे.

यस्त्यक्त्वा तृणवच्छ्रियं स्त्रियमपि श्रीरामदासोऽभवत्
सोऽयं षोडशशून्यपूर्वकतया लीनोऽधिरामं भवेत् ।
इत्थं दर्शयितुं शकाब्दगणनासंस्थामुखेनास्थितो
रामाकाशनृपालसंमितशके श्रीरामदासो लयम् ॥ ३४३ ॥

जो कोणी धन आणि दारा तृणाप्रमाणें मानून त्यांस सोडून देऊन श्रीरामदास होईल, तो जिवाच्या सोळा कळा ह्या प्रथम नाहींशा करून नंतर रामामध्यें पूर्णपणें लीन होतो. हे शककर्त्यांच्या संख्येच्या द्वारें दाखविण्याकरतांच रामदास हे १६०३ शकामध्यें समाधिस्थ झाले.

यः पुंसा मनसा नियम्य सहसा स्वार्थाय पुण्यस्तपो-
योगस्त्वास्थित एनमार्यमहितं संत्यज्य सर्वात्मना ।
त्यागो नैव वरस्तनोरिति जनान्संदर्शयन्किं तपो-
योगे तापसशेखरो निजतनुं श्रीरामदासोऽत्यजत् ॥ ३४४ ॥

मनुष्यानें मनाचें नियमन करून आत्मकल्याणाकरितां—स्वमनोरथ सिद्धीकरतां—पुण्यकारक असा तपोयोग आचरला असेल, त्या आर्यांना संमत अशा तपोयोगाला सोडून तनूचा त्याग करणें हेंही चांगलें नाहीं. हें लोकांना सुचविण्या करितांच ' तापस—शेखर ' तपस्व्यामध्यें श्रेष्ठ असे श्रीरामदास ह्यांनीं तपोयोगामध्येंच आपला देह त्याग केला, [ तप ] म्हणजे माघमास चालू असतां देह ठेवला.

आदौ दुर्मतिसंगतिस्त्वसुभृतां प्रायो मनोभ्रंशिका
चेत्तत्रापि भगप्रसंग उदयेत्त्यागस्तनोस्तद्वरः ।
स्थैर्यं न क्षणमात्रमित्युपादिशन्पक्षेंऽतिमे सत्तमो
माघे मासि जगद्गुरुर्निजतनुं श्रीरामदासोऽत्यजत् ॥ ३४५

आर्धीच दुष्टाची संगति ही-प्राण धारण करणाऱ्या-मनुष्याच्या मनाचा भ्रंश करणारी आहे. त्यांतही जर [भग-प्रसंग] म्हणजे विषयवासना असेल तर मग त्यापेक्षां [ त्यागः तनोः तद्वरं ] देहत्याग करावा हेंच उत्तम. एक क्षणभरही जगून राहूं नये. हें दाखविण्याकरितांच साधूमध्यें श्रेष्ठ जगद्गुरु असे श्रीरामदास ह्यांनीं माघ महिन्यामध्येंच आपला देह ठेवला, किंवा कायम केला.

श्लेष—आर्धींच दुर्मतिनाम संवत्सर आणि त्यांत [ भगप्रसंग ] म्हणजे फाल्गुन मास यावयाचा आणि फाल्गुनी नक्षत्राची देवता उत्तराषाढा आहे. असल्या विटंबनेंत राहण्यापेक्षां देहत्याग केलेलाच बरा ह्मणून श्रीरामदासांनीं माघमासांतच देहावसान केलें हा ध्वनितार्थ.

अस्मिन्भवलये विधाय विमलां चंद्रप्रभां कोमलां
कीर्तिं जेतुमितो नरः परपदं यो रामदासो व्रजेत् ।
तत्रैवैष चिरं वसेन्न पुनरागच्छेदिति द्योतयन्
जेतुं मंदादिने जनेशपदवीं श्रीरामदासो ययौ ॥ ३४६ ॥

शनिवारीं गांवास गेले तर तो मनुष्य फिरून येत नाहीं, असें कित्येक ज्योतिषशास्त्राच्या ग्रंथांत म्हटलेलें आहे. ह्यावरून कवींनीं पुढील अनुमान काढलें आहे.

ह्या भूमंडळामध्यें चंद्रप्रभेप्रमाणें कोमल आणि शुद्ध अशी कीर्ति, करून मोक्षपद मिळविण्याकरितां एखादा मनुष्य जेव्हां ह्या जगांतून रामदास होऊन जातो, तेव्हां तेथेंच ( मोक्षपदामध्यें ) कायम राहतो, पुनः परत येत नाहीं. हें दाखविण्याकरितांच [ मंद दिने ] म्हणजे शनिवारींच श्रीरामदासांनीं येथून गमन केलें.

स्नातानां गुरुराजपूर्णकरुणापीयूषधारांबुभिः
श्रीगोविंदपदांबुजस्मृतिसुधास्वादैकतृप्तात्मनाम् ।
संस्था नैव च शुक्लपक्ष उदयेदेवं जनान्सूचयन्
संस्थामाप स कृष्णपक्ष इव नः श्रीरामदासो गुरुः ॥ ३४७ ॥

**पहिला अर्थ**—गुरुराजाच्या पूर्ण करुणारूपी अमृतधारेच्या पाण्यानें पूर्ण स्नात झालेला, ज्याच्यावर गुरुकृपामृताचा वर्षाव झाला आहे असा तसेंच श्री गोविंदाच्या पदकमलस्मरणरूप अमृताच्या स्वादानेंच केवळ ज्याचा आत्मा तृप्त झाला आहे; अशांना शुक्लपक्षामध्यें मरण येऊं नये.

**दुसरा अर्थ**—गुरु म्हणजे बृहस्पति–देवांचा गुरु–एकीकडे देवाची कृपा व एकीकडे गुरुची कृपा ज्यांच्यावर असते, ते शुक्लपक्षामध्यें अर्थात [शुक्राचार्यांच्या पक्षांत] ह्मणजे दैत्यांच्या पक्षांत कधीं असावयाचे नाहींत. हें सुचविण्याकरितांच जणूं काय श्रीरामदास गुरु ह्यानीं कृष्णपक्षांत देहावसान केलें.

पुण्यादौ मधुशुक्लपक्षनवमी श्रीरामजन्मोत्सवै-
र्दासस्याप्यथ तेन ता विजहसुस्ताः कृष्णपक्षस्थिताः ।
ता एनं शरणं गता इव सतां प्राणप्रयाणोत्सवैः
कारुण्यात्तपसि स्थितां व्यरचयत्पुण्यां शरण्याग्रणीः ॥ ३४८ ॥

**पहिला अर्थ**-चैत्राच्या शुक्लपक्षाची नवमी ही प्रथमतः श्रीरामजन्मोत्सवानें आणि नंतर रामदासांच्या जन्मोत्सवानें पुण्यकारक होऊन चुकली, ह्मणून तिला गर्व होऊन कृष्णपक्षांतिल नवम्यांकडे पाहून ती हासूं लागली. तेव्हां सर्व कृष्ण नवम्या रामदासांना शरण गेल्या. आणि त्यांनीं त्यांची प्रार्थना केली कीं आह्मांपैकीं कोणालातरी पावन करावें. ह्मणून [ कारुण्यात्तपसि स्थितां ] त्यांतील जी नवमी अत्यंत तपश्चर्या करीत होती, तिलाच त्यांनीं [ सतां प्राण प्रयाणोत्सवैः] आपल्या देहार्पणानें पावन करून सोडली.

**दुसरा अर्थ**—माघमासांतिल कृष्णपक्ष नवमी शरण जाण्यास योग्य व मनुष्यांत श्रेष्ठ अशा रामदासास शरण गेली, तेव्हां त्यांस दया येऊन त्यांनीं प्राण प्रयाणोत्सवानें तिलाही पुण्यकारक करून ठेवली. [माघ] ह्मणजे तप.

पूर्वाण्होऽवभृथोत्सवेन भवता संभाव्यतामीदृशं
देवौघैरभियाच्यते स्म पितृभिः स्वीयोऽपराण्हास्त्विति ।
तत्रासावुभयानुरोधवशतस्तत्संधि मध्यंदिनं
किं संभावयति स्म मानुषहितः श्रीरामदासो गुरुः ॥ ३४९ ॥

' आपल्या प्रयाणोत्सवानें आपण आमचा पूर्वाण्ह जो आहे, त्याचा आदर करा.' अशी देवगणांनीं याचना केली. तशीच पितृगणांनीं 'अपराण्ह कालाची संभावना करावी' अशी याचना केली. अर्थात् श्रीरामदास, मनुष्यांना हितकर असल्यानें त्या उभयतांनाही थोड थोडा मान देण्याच्या इच्छेनें पूर्वाण्ह व अपराण्ह ह्याचा संधी जो मनुष्यांना हितकर असा जो मध्यान्हकाल त्याचाच त्यांनीं प्रयाणोत्सवानें मान केला.

किं युक्त्या प्रतिपादयामि बहुधा श्रीरामदासः सतां
नाथोऽवातरदेषरामयशसः ख्यात्यै: हनूमानिति ।
आख्यैवास्य यतः समस्तजनताश्रोत्रातिथित्वं गता
चेत्तावत्प्रभवत्यभेदधिषणा श्रीमन्मरुत्सूनुना ॥ ३५० ॥

मी आतां ह्या शब्दयुक्तीनें किती तऱ्हेनें प्रतिपादन करूं ! श्रीरामदास सज्जनामध्यें श्रेष्ठ हे हनुमानच स्वतः रामयशाची ख्याति करण्याकरितां अवतार घेऊन आले होते, असें ह्मणावयास हरकत नाहीं. तर ह्यांच्या संबंधानें जी आख्या आहे, आणि समस्त लोकांच्या कानांनीं आदरलेली आहे [ ऐकलेली आहे] त्यावरून श्रीमत् हनुमानाशीं त्यांची अभेदबुद्धिच दिसते ते उभयतां एकच आहेत-अशी बुद्धि होते-वाटतें.

गद्यं । दुस्तरतरसंसारसागरपरपारदस्य, साक्षान्नारदस्येवशारदशशधरगौरवपुषो, गौरवपुषः सिंहसंहननस्याशेषतमस्तोमनिस्तोदनिपुणैर्द्वादशभिरर्कैरिवोर्ध्वतिलकैरलंकृतस्य, तीव्रतरतपःप्रभावात्स्वं भूय स्वयमयत्नोपनता अणिमाद्यनेकसिद्धीरेताः खलु भगवद्विभूतय इति शिरसा श्लाघं श्लाघं निबध्य निहिता इवातिपिंगटा विशंकटा जटा बिभ्राणस्य, विधातृकरविलिखितमहाभाग्याक्षर पंक्तिवल्या उदयमानेन फलेनेव लघुनार्बुदेन घटमानललाटपट्टस्य, जातमात्र एवैष श्रुत्यंतदर्शीति दर्शयद्भयामाकर्णविशालाभ्यां नयनाभ्यां विराजमानस्य, श्रीमद्रामप्रभुनामधेयसंकीर्तननिगूढरागेणैवोष्ठपुटेन विनटमानस्य, कालिमहिमगलितजीवनीयगुणमात्मानमनवरतनिःसरन्नामपीयूषशीकरैराप्याययितुमिव

मुखमाभितः प्ररूढश्मश्रुमिषेण समाश्रितौषाधिजालस्य, अनेन निगीर्णमिव त्रैगुण्यमिति सूचयता रेखात्रयेण विलसत्कंठस्य, एष साक्षाद्भगवतो रामस्य दास इत्यस्माकं दासस्य भूमंडलविसृत्वरामपि कीर्ति महिम्नापसारयति न कश्चिदिति शंकाकुलतया महता चिंताभरेण शुष्काभिर्मणीभूय कतिपयीभिरुपकंठं लुठंतीभिः कतिपयीभिश्चास्मद्दासकीर्तिः स्वीयकीर्तेः सखी करणीयेति रहस्यवादं कर्तुमिव लाघवसमाश्रयेण श्रुत्यंतं लग्नाभिस्तुलसीभिरुपशोभमानस्य, दीनजनकारुण्यकंदलस्यांकुरायमाणैरिव लोमभिः परिचितवक्षःपीठस्य, पुरा किल त्रेतायामसंमानितया यया साम्राज्यच्युतिरभवदिति द्वापरे मथुराया भगवता वासुदेवेनादावेव कृतपरिग्रहायां यस्यां सद्यः स्वसाम्राज्यासिद्धिरपादीति निपुणतरदर्शनेन स्वसाम्राज्यसिद्ध्य इव कराब्जादत्त ( द्दत ) कुब्जापरिग्रहस्य, एतस्य खल्विंद्रियगणो मुष्टिगत इव वशीभूत इति द्योतयंत्याक्षमालयाभिलक्षितस्य, सकौपिनः सकौपीन इत्यंतर्गर्भिताशयां ' कौपिनवंतः खलु भाग्यवंतः ' इति श्रीमदाचार्यभणितिं स्वस्मिप्रवर्तमानाभ्यां स्वामीसमर्थशद्वाभ्यां समर्थयितुमिव कौपीनं परिदधानस्य, समाश्रितानां मनोरथान्सर्वथा पूरयामि परमन्यत्र ज्ञानादिति तादृक्कौशलीं शिक्षितुमिवोपसदनसंपत्तये तपसा शुक्लीकृतवपुषा पृच्छतो महाराष्ट्रान् श्रीरामदासचरणे किमपि न परिक्षीणमिति चट चट चटेति जल्पतेनोत्तरयतेव हरिचंदनेन पादुकीभूय समुपासितपादयुगुलस्य, सर्वांगीणामरविंदाक्षकृपाकटाक्षपातप्रभामिव शीतार्तिभंजिनीमानीलपाटलां मेखलां उभयपाटीं ( मेखलाऽद्वयपटीं ) वसानस्य, ब्रह्मानंदोद्गारानिव जय रघुवीर जयरघुवीरेति मुहुर्वाक्यान्युदाहरतो, ब्रह्मविद्विरक्तभक्तसार्वभौमस्य, श्रीरामदासस्य गुरोश्चरणसरोजयोः पंताविठ्ठलविरचितानंतप्रणतयः संततसुलसंतु ॥ १ ॥

## गद्य.

तरून जाण्यास अत्यंत कठीण अशा संसाररूपी महासागराच्या पैल

तीरास नेऊन सोडणारे, साक्षात् नारदाप्रमाणें शरत्कालच्या चंद्रासारखी आहे गौर वपु ज्यांची; मोठेपणाला पोषक सिंहासारखा आहे देह ज्यांचा; अज्ञानरूपी गर्द अंधकाराचा निःशेष नाश करण्यामध्यें निपुण अशा, जणों काय बारा सूर्यांसारखेच अशा ऊर्ध्व पंड्र–टिळे मुद्रांनीं अलंकृत झालेले; तीव्रतर तपः—प्रभावापासून एकत्र होऊन आपोआपच प्रयत्नाशिवाय चालून आलेल्या अणिमादि अनेक सिद्धि ह्या जणों काय भगवद्विभूती (प्रसाद ह्मणूनच) शिरावर स्तुत्य रितीनें [ आवडीनें ]–आदर बुद्धीनें बांधून ठेवलेल्या अतिशय पिंगट अशा मोठमोठ्या जटा धारण करणारे; विधात्याच्या हातांनीं महाभाग्यदर्शक अक्षरांच्या वळयारूपी ज्या पंक्ति, त्यांचें जणों काय आलेलें फळच असें लहानसें अवाळू, त्यानें युक्त आहे ललाटपट्ट ज्यांचें, जन्मतःच [श्रुत्यंत दर्शी]-वेदांत पारंगत–असे दाखविणारे (श्रुति–कान) कानापर्यंत विशाल अशा नयनांनीं विराजमान झालेले; श्रीमद्रामचंद्राच्या नामसंकीर्तनासंबंधीं अत्यंत प्रेमभावरूपी (राग) तांबडेपणाच्या योगानें ओष्ठद्वय ज्यांचें शोभायमान झाले आहेत; कालि महात्म्यामुळें जीवनीय गुण–जगण्याची शक्ति, खचलेली आहे. गलित झाल्यामुळें एकसारख्या पाझरणाऱ्या भगवन्नामरूपी अमृत तुषारांनीं पुन्हां तिला उत्तेजित करण्याकरतांच जणों काय तोंडासमोंवतीं वाढलेल्या दाढीच्या रूपानें औषधी जलाचाच ज्यांनीं आश्रय केलेला आहे; ह्या रामदासांनीं तिन्ही गुणांचा जणों काय नाश केला आहे हे सुचविणाऱ्या तीन रेषांनीं ज्यांचा कंठ विलसत आहे; हा तर साक्षात् भगवान् रामाचा दास आहे तेव्हां आमच्या दासाची [ तुळशीदासाची ] सर्व भूमंडळभर पसरलेली कीर्तीसुद्धां आपल्या महात्म्यानें कदाचित् मागें टाकील कीं काय, अशा शंकेनें व्याकुल होऊन मोठ्या चिंताभारानें शुष्क झालेल्या कांहीं तुळशीच्या मण्यामध्ये रूपांतर पावून कंठामध्यें रुळत राहिल्या आहेत. आणि दुसऱ्या कित्येक आमच्या दासाची कीर्ति आपल्या कीर्तीची मैत्रीण करावी, ही गुप्त गोष्ट कानांमध्यें सांगण्याकरतांच जणों काय नम्रभावानें कानापाशीं लागल्या आहेत, अशा तुळशीनीं सुशोभित झालेले; दीन जनाविषयीं दया हाच कोणी एक कांदा, त्या कांद्यापासून अंकुर फुटलेल्या

अशा केंसांनीं ज्यांच्या छातिवर गर्दी झालेली आहे. पूर्वी त्रेता-युगामध्यें ज्या कुब्जेचा अनादर झाल्यामुळें राज्यप्राप्तीपासून श्रीराम भ्रष्ट झाले असें पाहून मथुरेमध्यें भगवान् वासुदेवांनीं प्रथमच तिचा स्वीकार केल्यामुळें झट्दिशीं सामान्य सिद्धि प्राप्त झाली. तेव्हां ही कुब्जा चांगली आहे असा शाहाणपणाचा विचार करून आत्मसाम्राज्याच्या सिद्धि करतां सुद्धां हिचाच परिग्रह चांगला असें मनांत आणून करकमलामध्यें ज्यांनीं कुब्जा [ कुबडी ] धारण केली आहे असे; ज्यांच्या मुठीमध्यें सर्व इंद्रिय-गण असून तो ज्याला वश झालेला आहे; असें दाखविण्या करतां रुद्राक्षां-च्या माळा हेंच काय तें मुख्य लक्षण झालें आहे. जो कौपीनयुक्त असतो तो 'कौ'—पृथ्वीमध्यें 'पनि' पुष्ट असतो. अथात् ' स्वामी ' असतो अशा तऱ्हेचा गर्भित अर्थ जीमध्यें आहे, अशा तऱ्हेची [ **कौपीन वंतः खलु भाग्यवंतः** ] ही शंकराचार्यांची उक्ति आपल्याकडे लावून स्वामी समर्थ शब्दांचे समर्थन करण्या करितां कौपीन धारण करणारे; एका ज्ञानाशि-वाय सर्व कांहीं आश्रित लोकांचें मनोरथ मी पूर्ण करीन अशी कल्पवृ-क्षाची प्रतिज्ञा आहे; परंतु ज्ञानसुद्धां देण्याचें कौशल्य शिकण्याकरितां रामदास हें गुरु कल्पून त्यांच्या पायाशीं बसण्याच्या निमित्तानें अत्यंत पांढरें सफेत केलेलें शरीर आहे ज्यानें, अशा हरिचंदनानें—तों चंदन कसा? तर—श्रीरामदास चरणामध्यें तुझ्या सारख्यानें आश्रय करण्या-सारखें त्यांत काय आहे, अशा तऱ्हेचा प्रश्न विचारणाऱ्या महाराष्ट्र लोकांना श्रीरामदास चरणामध्यें कांहींही कमी नाहीं. तर [ **चट** ] सारें आहे. हें जणों काय [ **चट चट** ] शब्दांनीं उत्तर देत देत हरिचंदनानें पादुका-रूपानें ज्यांच्या चरणयुगुलाची सेवा केली आहे. सर्वांग व्यापणारी, अर-विंदाक्ष असा जो विष्णु त्याच्या कृपाकटाक्षाच्या पाताप्रमाणें प्रभा आहे जीची, आणि [ जानकी दुःखहारिणी ] थंडीचें दुःख निवारण करणारी निळसर अशा रंगाची [ हूरमुजी ] मेखला दोन्ही बाजूला धारण केलेली आहे ज्यांनीं; ब्रह्मानंदाच्या निघणाऱ्या उद्गाराप्रमाणें [ **जय रघुवीर जय रघुवीर** ] ह्या प्रमाणें पुनः पुन्हा शब्द उच्चारणारे; ब्रह्मवेत्ते, विरक्त लोक व भक्त लोक ह्या सर्वांच्या सारे भोगस्थानीं असलेले अशा

श्रीरामदास गुरूंच्या चरणकमलांना **पंत विठ्ठलानीं** केलेले अनंत प्रणाम सदोदित उल्हास पावोत.

**व्हाया सफळ मनुजजनि अवलंबुनि रामदासता राहे ।**
**श्रीरामदास होता बा या जनिं ( नि ) चाफळावगम आहे ३५१**

मनुष्य जन्म सफल होणें हें सर्वस्वी रामाचा दास होण्यावर अवलंबून आहे. बाबा ! एकदा श्रीरामाचे दास बनलें कीं ह्या जन्माचें सार्थक झालेंच समजावें. [**जनिचा-फळावगम आहे**] **जनीचा** ह्मणजे जन्माची [**फळावगम**] म्हणजे—फलप्राती—सार्थक झालेंच असें समजावें, अथवा [**जनिं—चाफळा-वगम आहे**] ह्या जगांतही [ **चाफळावगम** ] म्हणजे [ **चाफळ** ] ह्या गांवाचा लाभ आहे. रामदास ह्यांचें मूळ गांव चाफळ असून तेंच त्यांच्या वंशाकडे चालत असल्याचें सर्वांस माहितच आहे.

[ ही खरोखर शुद्ध प्राकृत म्हणजे मराठी भाषेंतील आर्या आहे. हा सर्व ग्रंथ संस्कृत असून ह्यांत हें एक व दुसरें एक अशीं दोनच पद्यें काय तीं महाराष्ट्र भाषेंतील आहेत. तथापि मौज ही कीं, त्यावर टीका आहे ती संस्कृत !]

**बोधस्य यत्नं सृज राघवस्य दासो भव त्वं यत एष बोधः ।**
**न दासपृष्ठं त्यजतीति गुह्यं प्रबोधयन्भाति स दासबोधः ॥३५२**

[ दासबोध ग्रंथाचें वर्णन. ]

बाबा ! ज्ञानप्राप्ती करून घेण्याचा यत्न सोडून दे. फक्त रामाचा दास हो म्हणजे झालें, तेवढ्यानेंच तुला ज्ञानप्राप्ती होईल. येवढेंच नव्हें, तर बोध किंवा ज्ञान हें त्याची,—त्या दासाची—पाठच सोडावयाचें नाहीं. ही गुह्य गोष्ट सांगण्याकरितांच जणों काय **दासबोधाचा** अवतार झाला आहे. कारण, [ **दास** ] ह्याच्या पाठीमागें [ **बोध** ] हा लागलेलाच आहे. श्रीरामदास स्वामींनीं [ **दासबोध** ] ग्रंथ केलेला आहे हें येथें सांगावयास नकोच.

शूरकुलालंकारे विबुधात्यादृतपदांबुज द्वितयम् ।
निगडीकृतसंस्थानं कविनाथं रंगनाथमवलम्बे ॥ ३५३ ॥

[ रंगनाथस्वामींचें वर्णन. ]

**पहिला अर्थ**—शूर कुलाला व वीराला शोभेसा अलंकारांनीं युक्त, शहाण्या लोकांनीं–साधूंनीं ज्याच्या पदकमलाला अत्यंत मान दिलेला आहे, आणि [ **निगडी कृत संस्थानं** ] निगडी हेंच गांव ज्यांनीं आपलें वसतिस्थान केलें आहे, असा कविवर्य–व ज्ञानी, सर्व लोकांत श्रेष्ठ अशा रंगनाथ स्वामींना मी शरण आहे.

**दुसरा अर्थ**—[ **शूर कुलालंकारं** ] शूर कुलांत म्हणजे यादवकुलास भूषणभूत [ **विबुधा–अति–आदृत–पदांबुजः** ] मोठमोठे देवसुद्धां ज्याच्या पदकमलाला पूज्य मानतात; आणि ( **निगडी कृत संस्थानं** ) संस्थानं म्हणजे मृत्यु, त्याला ज्यानें जखडून टाकलें आहे, अशा ज्ञानसंपन्न श्रीकृष्णाला मी शरण आहे.

यस्य मनोहरनामा हरिः सहायो नरस्य नीलांगः ।
अरिवर्गं विजितवतो द्रुतसद्गतयेऽस्य को नु विवदेत ॥ ३५४॥

**पहिला अर्थ**—ज्याला [ **मनोहर नामा हरिः सहायो नरस्यनीलांगः** ] श्यामवर्णाचा व चित्ताकर्षण करणारा असा हरि म्हणजे श्रीकृष्ण भगवान् सहाय आहे, तो सारा [ **अरिवर्गः** ] शत्रूंचा समुदाय [ **विजितवतो** ] जिंकून [ **द्रुत सद्गत येस्य** ] तो लौकरच सद्गतीला पोंचेल ह्यांत [ **कोनु विवदेत** ] कोणी वाद करील काय ?

**दुसरा अर्थ**—ज्याला [ **मनोहर** ] नांवाचा [**नीलांगः**] काळा घोडा सहाय आहे, तो आपल्या सर्व शत्रूंना जिंकून लौकरच सद्गतीला पोंचेल [आपली मजल लौकरच गांठील] ह्याबद्दल कोणी वाद करील काय? रंगनाथ स्वामींच्या घोड्याचें नांव[ **मनोहर** ] असून वर्ण काळा होता.

गंगा तत्र सरस्वती च यमुना तत्रैव चेत्यादिना
प्रोक्ता श्रीधरकीर्तनस्य मुनिभिर्निः शेषतीर्थात्मता ।

लोकप्रत्ययगामिनी तु विहिता सा ते ( ने ) न धन्यात्मना
नैके यत्कृतकीर्तने गतिमगुर्यद्ब्रह्मरक्षोगणाः ॥ ३५५ ॥

श्रीधराच्या कीर्तनामध्यें सर्व तीर्थें आहेत असें साधुसंतांनीं ह्मटलेलें आहे. गंगा, यमुना व सरस्वती ह्या त्यांतच आहेत, हें त्यांचें ह्मणणें रंगनाथ स्वामी ह्या धन्य पुरुषानें लोकांच्या अनुभवास आणून दिलें. कशावरून ? तर ज्यानें कीर्तन केलें असतां ब्रह्मराक्षसांचें मोठमोठे समुदाय सुद्धां थोडे थोडके नव्हेत, तर पुष्कळच गति घेऊन गेले.

साधोः श्रीरंगनाथस्यायतनं चरणे हरेः ।
इति ज्ञापयितुं गंगा यतः स्रवति नित्यशः ॥ ३५६ ॥

श्रीरंगनाथ स्वामींचें [ **आयतन** ] म्हणजे ठिकाण हें हरिचरणामध्यें आहे, हें कळविण्याकरितां गंगाही नित्यशः तेथून वाहते. हरिचरणामध्यें जो राहतो, व परमेश्वराची जो भक्ति करतो, तेथें मी असते, हें दर्शविण्याकरितांच तेथें गंगा ( ओढा ) वाहत आहे. हरि म्हणजे घोडा, त्याचा पाय रुतला होता. ह्मणून येथेंच आमचें वसतिस्थान असें ह्मणून रंगनाथस्वामींनीं तेथेंच वस्ती केली. हल्लींही त्यांच्या समाधींतून भागीरथी वाहते अशी आख्यायिका आहे, तीही युक्तच आहे. येथें हरिचरण आहे व पाणीही वाहत आहे हें सांगण्याकरतांच गंगा वाहत आहे.

आनंदं यदि संततं स्पृहयसे कुर्यात्त्वमेकं सखे
याहि श्रीरघुनाथपादयुगलीमन्यद्वृथा मा कृथाः ।
यामासाद्य समूर्तिमान्स्वयमयं वर्वत्यहो सर्वदे
त्येवं दर्शयति स्फुटं न हि जनं किं ब्रह्मनालंबनम् ॥ ३५७ ॥

[ आनंदमूर्ति. ]

**पहिला अर्थ**—जर नेहमीं आनंदाची इच्छा करित असलास तर हे मित्रा ! तूं एक काम कर. श्रीरामचंद्राला शरण जा. दुसरें कांहीं करूं नकोस. कारण, त्या चरणयुगुलांचा आश्रय केला असतां तो आनंद मूर्तिमान् एकसारखा सर्वदा असतो, हें [ ब्रह्मनालंबनम् ] इतर प्रमाणावर अव-

लंवून नसलेलें म्हणजे स्वतःप्रमाण असलेलें जें ब्रह्म म्हणजे वेद हे लोकांना दाखवीत नाहींत काय ? वेदही सांगतातच. हा भावार्थ.

दुसरा अर्थ—तुला आनंद पाहिजे असेल तर, श्रीरामचरणाचा आश्रय केलेला मूर्तिमान् देहधारी असाच सांपडतो. ब्रह्मनाळ नांवाचें वन ज्या ठिकाणीं आहे, तेथें श्रीरामाचें देंऊळ असून आनंदमूर्ति स्वामींची समाधीही आहे. तें वन लोकांना स्पष्टपणें हेंच दाखवीत नाहीं काय ?

भाग्याभिधाननगरे सुरदर्शनार्थं
गच्छन्यथा किमपि नर्मपरैस्तुरुष्कैः ।
कष्टोऽधिचूडमाधिदर्शयाति स्म सद्यः
स्वान्वर्थभावमवतात्स हि केशवोऽस्मान् ॥ ३५८ ॥

[ केशवस्वामींचें वर्णन. ]

[ भाग्यनगर ] म्हणजे भागानगर–( दक्षिण हैदराबाद ) नांवाच्या नगरामध्यें देवदर्शनाला जात असतां कांहीं थट्टेखोर दुकानदार यवनांनीं शेंडी धरून ज्याला ओढलें असतां तत्काळ ज्यानें आपला आत्मभाव त्यांना दाखविला, ते केशवस्वामी आमचें रक्षण करोत.

श्लेष—[ स्वाम्यर्थभाव ] [ प्रशस्तः केशा यस्य सकेशवः ] ह्मणजे त्यांची शेंडी लांबतच गेली, व ते पुढें पुढें पळत चालले ! तेव्हां ही गोष्ट त्यांच्या नांवालाही अनुरूपच झाली. शिवाय त्यांनीं [ आत्मानुभव ] ह्या नांवाचा एक ग्रंथही केलेला आहे. तेव्हां त्या ग्रंथाचें नांवही सार्थ करून दाखविलें.

जलाशयं स्वेन पुरा प्रविश्य संहारकृत्पत्तनमेत्य सद्यः ।
चकार शांतस्य गुरोरभीष्टं कृष्णं वितृष्णं तमहं प्रपद्ये ॥ ३५९

[ जयरामस्वामींचे गुरु कृष्णाप्पा यांचें वर्णन. ]

पहिला अर्थ—ज्यानें आपण स्वतः जलाशयामध्यें प्रविष्ट होऊन [ संहारकृत्पत्तन ] शंकराचें शहर जें काशी, तेथें एकदम जाऊन [शांत] नांवाच्या आपल्या गुरूचें अभीष्ट पूर्ण केलें, असा वितृष्ण जो कृष्ण त्याला मी शरण जातो.

महादेवाच्या डोंगरावर [ शांत ] ह्या नांवाचे एक सिद्ध राहत असत. त्यांचा शिष्य **कृष्णाप्पा** व **कृष्णाप्पाचे** शिष्य **जयरामस्वामी**. शांतानें आपल्या अंतकालीं कृष्णाप्पापाशीं अशी गोष्ट काढली कीं, मला काशी-मध्यें लोकांचें देणें झालेलें आहे, ते माझे रोखे मला आणून देशील तर माझा प्राण सुखानें जाईल. कृष्णाप्पानें 'हा मजवर मोठा प्रसादच आहे' असें ह्मणून त्यानें एक पैशाची थैली बरोबर घेतली, आणि तेथीलच एका तळ्यांत बुडी मारली, तों काशींत मणकर्णिका घाटावर बाहेर निघाला, आणि त्यानें शांताच्या सर्व सावकाराचें देणें वारून टाकून त्यांचे जवळ असलेले त्यांचे कर्जरोखे फाडून घेऊन पुन्हा त्याच घाटावर भागिरथींत बुडी दिली आणि महादेवाच्या डोंगरावरील तलावांतून बाहेर पडला. आणि ते आणलेले कर्जरोखे आपल्या गुरूपुढें ठेवले. तेव्हां शांतांनीं फार शांत चित्तानें आपला देह ठेवला. अशी आख्यायिका आहे. तिला अनु-सरून या श्लोकाची रचना केलेली आहे

**दुसरा अर्थ**—श्रीकृष्णांनींही असेंच केलें होतें. म्हणजे [ **जलाशये स्वेन पुरा प्रविश्य**] पूर्वीं आपण समुद्रांत शिरून [ **संहार कृत्यत्तन प्रेत्य सहायः** ] यमपुरीमध्यें जाऊन गुरूच्या इच्छेप्रमाणें त्यांचा मृतपुत्र **संदीपनी** गुरूला आणून देऊन त्यांनाही संतुष्ट केलें होतें, त्या श्रीकृष्णालाही मी शरण आहे.

गद्यम् । अदूरगोपुंजं भांडीरकोपनामान्वयं वटग्रामं समासाद्यकामं सह वयस्यैःक्रीडायां स्वपृष्ठमारुढं मामवरोहणसीमामतीत्याविलं-बितं लंबमानस्य प्रलंबस्य प्राणनिर्वापणेन परिश्रान्तमश्रांतं सखि-भिः समं भूरिशः परिचरतोऽस्य परमेश्वरस्यैतत्सांप्रतमपि ममात्यं-तमसांप्रतामिति स एष इहैव तादृक परिचर्य एवं विचार्य तत्कामो रामः प्रतीक्षमाणोऽभूत् । तावत् कलाववतरंतं तादृग्वटग्रामं समाश्रयंतं प्रलम्बासुरसंपाद्विधमनेन परिश्रमवंतम् भगवन्तं श्रीकृष्णं समालोच्य त्रेतायां दशग्रीवरूपेण द्वापरेऽपि शिशुपाळ

रूपेण च श्रीमच्चरणद्वेषमेवार्जितवन्तं स्वमंडलीस्थं चैनं जयं 'मामात्मपरदेहेषु प्रद्विषंतोऽभ्यसूयकाः । तानहं द्विषतः क्रूरान् संसारेषु नराधमान् ॥ क्षिपाम्यजस्रमशुभानासुरीष्वेव योनिषु' इत्यूचिवान्भगवान्पुनरप्यासुर्यामेव योन्यां न कच्चित्क्षिपतीति शंकमानस्तस्मिन्प्रसा दचिकारायिषया तं जयं पुरस्कृत्यैव निरंतरं यः परिचचार तमा प्तकामं जयरामं दीनानुद्धरंतमनंतं (महांतं) सन्तं प्रति संप्रति पंतविठलकृतानंतनतयः संततमुल्लसन्तु ॥२ ॥

## गद्य.

ज्याचा विस्तार झाला आहे, ह्मणजे ज्याला पारंब्या फुटलेल्या आहेत अशा [ भांडीरक ] नांवाच्या वडाच्या समुदायाकडे जाऊन स्वेच्छेनें सौंगड्याशीं क्रीडा करीत असतां, पाठुंगळीस घेतलेल्या मला, उतरण्याची जी मर्यादा होती तिच्याही पलीकडे शीघ्र नेणाऱ्या प्रलंब नांवाच्या असु· राचे प्राण घेतल्यानें दमलेल्या समवयस्क आपल्या मित्रासह श्रीकृष्णांनीं माझी अनेक प्रकारे परिचर्या केली हें श्रीकृष्णाला उचितच झालें. परंतु मला तें अत्यंत अनुचितच होय. तेव्हां त्या परमेश्वराची आपणही ह्य लोकांत तशीच कांहीं तरी सेवा करावी असा विचार करून बळराम हे वाट पहात असतां कलियुगामध्यें देवतारूपानें [ वडगांवाचा ] आश्रय करून व श्रीकृष्णांनीं अवतार धारण केलेला पाहून आणि तसेंच मोठ्या थोरल्या आसुरी संपत्तीचा ( सात्विकाच्या उलट तामस प्रकृतीचा ) नाश करून दमलेले असे श्रीकृष्ण पाहून आणि त्या जयानें त्रेतायुगामध्यें रावणाच्या रूपानें, द्वापार युगामध्यें [ शिशुपालाच्या ] रूपानें भगवंताशीं द्वेषार्जन मात्र संपादन केलेला असा आपल्या मंडलांतला जो [जय] त्यांत (गीता) त्याला पुन्हा आसुर योनीमध्यें ढकलतील कीं काय, अशी शंका येऊन त्याच्यावर प्रसाद करण्याच्या हेतूनें [ त्या जयाला. ] पुढें करून ज्यानें श्रीकृष्णाची निरंतर परिचर्या केली, त्या आप्तकाम–मनोरथ सिद्ध झाले आहेत अशा–दीनांच्या उद्धार करणाऱ्या अनंत–ज्याच्या माहात्म्याला अंत नाहीं अशा [ जयराम ] नांवाच्या साधुप्रत सांप्रत पंतविठ्ठलांनीं केलेले अनंत प्राणिपात हे एक सारखे उल्हास पावोत.

त्रिलोकीसाम्राज्यं तृणमिव यदग्रे स्फुरति तत्
पदं यत्संबंधात्परमनुभवंत्यत्र विबुधाः
न यत्र स्थेमानं कलयति कदाचिन्मदलवः
स कोऽप्यस्मिंल्लोके गुरुरमृतराजो विजयते ॥ ३६० ॥

[ अमृतराजाचें वर्णन. ]

ज्या परब्रह्माच्या अनुभवापुढें त्रैलोक्याचें साम्राज्यसुद्धां गवताच्या काडीप्रमाणें तुच्छ आहे असा ब्रह्मानुभव ज्याच्या संगतीनें शहाणे लोक अनुभवतात. त्रैलोक्याच्या साम्राज्यामध्यें अमृत हें मादक असल्यामुळें तुच्छ वाटतें आणि अमृतराज हा मादत्त्व विरहित असा श्रेष्ठ असल्यामुळें ज्याच्यामध्यें यत्किंचित्‌ही ' मद ' उभा राहू शकत नाहीं. असा विलक्षण तऱ्हेचा ह्या लोकामध्यें गुरु म्हणजे श्रेष्ठ असा अमृतराज सदा विजयी असो.

यन्नूनं समजीजनत्सुमधुरं सारस्वतो मां रसः
श्लाघंते स्पृहयंति हंत विबुधा मामेव नैनं क्वचित् ।
तत्कुर्यामहमीदृशं मदधिकं सारस्वतं तं रसं
श्लाघंतां स्पृहयंत्वितीह [व] धरणौ तेनामृतेनोषितम् ॥ ३६१ ॥

ह्या श्लोकांत [ सारस्वत ] ह्या शब्दावर श्लेष आहे. सारस्वत ह्मणजे समुद्राचें पाणी हा एक अर्थ, व 'सारस्वत' ह्मणजे वाङ्मय=काव्यग्रंथ हा दुसरा अर्थ. हें मनांत आणून खालचा अर्थ पहावा.

खरोखर पाहिलें असतां अमृत म्हणजे [ सारस्वत ] केवळ समुद्राचें पाणी, ( कारण अमृत हें त्याच्याच पासून उत्पन्न झालेलें आहे. ) त्यानेंच सुमधुर अशा मला अमृताला उत्पन्न केलें आहे. असें असतां शहाणे लोक माझीच इच्छा करितात व माझीच स्तुति करतात, माझा पिता जो समुद्र ह्मणजे सारस्वत, त्याची कोणी स्तुतीही करीत नाहींत व इच्छाही करीत नाहींत, हें कांहीं ठीक नाहीं. तेव्हां आतां मी काय करीन ? तर माझ्यापेक्षांहीं ह्मणजे अमृतापेक्षांही [ सारस्वत रसच ]—काव्यरसच— अधिक महत्त्वाचा होईल, लोकांत त्याची मानमान्यता होईल, व लोक

त्याचीच इच्छा करतील, अशीच जणों काय प्रतिज्ञा करून ह्या भूतलावर अमृतराजरूपानें अमृतच अवतरलें आहे असें वाटतें.

श्लेष—[ **सारस्वत रस** ] म्हणजे वाङ्मयांतील रस–ग्रंथांतील–काव्यांतील गोडी - ही अमृतापेक्षांही अधिक मधुर ह्मणून लोक स्तुतिही करतात व तिची इच्छाही करतात हा भाव.

**शिरःथितामृतकरो ज्ञानानंददयास्पदम् ।**
**समर्पितशिवानंदः सिद्धराजो विराजते ॥ ३६२ ॥**

**[ अमृतराजाचा शिष्य सिद्धराज. ]**

**पहिला अर्थ**—[ **शिरस्थित मृतकरः** ] ज्याच्या मस्तकावर चंद्र [ **ज्ञानानंद दयास्पदम्** ] ज्ञान, आनंद व दया ह्यांचें स्थान; [ **समर्पित शिवानंदः** ] शंकराला व पार्वतीला आनंद देणारा; असा जो सिद्धराज ह्मणजे विनायक त्याचा जयजयकार असो.

**दुसरा अर्थ**—[ **शिरस्थितामृतकरः** ] अमृतराजांनीं ज्याच्या मस्तकावर वरदहस्त ठेवलेला आहे असा; [ **ज्ञानानंद दयास्पदम्** ] **ज्ञानानंद** नांवाच्या आपल्या गुरूकडे ज्यानीं त्यास पाठविलें असतां त्यांचीं ही ज्यानें कृपासंपादन केली असा; आणि [ **समार्पिताशिवानंदः** ] कोल्हापूरचे छत्रपाति (**शिवाजी महाराज**) ह्यांस आनंद देणारा असा जो सिद्धेश्वर महाराज–अमृराजाचा शिष्य त्याचा जयजयकार असो. हे [ आमचे ? ]परात्पर गुरु होत.

**शिवेन शिरसा श्लाघ्यः कलानाथस्तमोऽपहः**
**जगदाल्हादयन्नास्ते रामचंद्र इवापरः ॥ ३६३ ॥**

**[ रामचंद्र पंडित. ]**

**पहिला अर्थ**–[ **शिवेन शिरसाश्लाध्यः**] शिवाजीराजाला जो गुरुपुत्र असल्यामुळें शिरसावंद्य होता; [ **कलानाथः** ] सर्व कला ज्याला अवगत होत्या; आणखी कसा ? तर [ **तमोपहः** ] अज्ञानाचा नाश करणारा; [ **जगदाल्हादयन्नास्ते** ] जगाला आल्हाद देणारा; असा हा रामचंद्र पंडित प्रति रामचंद्रच जगाला दिसत आहे.

दुसरा अर्थ—[ शिवेन शिरसाश्लाघ्यः] शंकरानें मस्तकावर धारण केलेला; [ कलानाथ] असा जो कलानाथ ह्मणजे चंद्र; आणखी कसा ? तर [ तमो पहाः ] अंधकाराचा नाश करणारा [ जगदाल्हायदन्नास्ते:] सर्व जगाला आनंद देणारा असा रामचंद्र पंडित हा दुसरा चंद्रच आहे असें वाटतें.

तिसरा अर्थ—[ शिवेन शिरसा श्लाघ्यः ] शंकरही ज्याची भक्ति करतो; [ कलानाथः ] सर्व कला विशारद; [ तमोपह: ] अज्ञानाचा नाश करणारा; [ जगदाल्हादयन्नास्ते ] सर्व जगाला आल्हाद देणारा, असा हा रामचंद्र पंडित दुसरा रामचंद्रच आहे असें वाटते.

द्विश्रुतित्वं द्विदृक्त्वं च तथैवैकरसज्ञता ।
नृमात्रे सहजं त्वेतद्रामे कृत्रिममप्यदः ॥ ३६४ ॥

दोन कान असणें, दोन डोळे असणें व एक जीभ असणें ह्या तिन्हीही गोष्टी मनुष्यमात्राला साहजिकच आहेत. परंतु ह्या रामचंद्र पंडितामध्यें त्या कृत्रिम आहेत. कशा ? तर ' द्रिश्रुतित्त्वं ' ह्मणजे ऋग्वेद व यजुर्वेद ह्या दोन वेदांचें अध्ययन ह्या दोन श्रुति ( कर्ण ) होत; दोन दृष्टि; एक शास्त्रीय ज्ञान व दुसरें विज्ञान. एक रसज्ञा; म्हणजे ब्रह्मरस ह्याचाच अनुभव आहे ह्मणून.

पुरैव सिद्धेशकृतप्रसादो घनोदयाद्यस्य महाप्रकाशः ।
यज्योत्स्नयांध्यं श्रुतिपद्धतिस्थं नष्टं स रामो विधुरद्वितीयः॥३६५॥

पहिला अर्थ—हा राम म्हणजे एक लोकोत्तर चंद्रच आहे, सामान्य चंद्र कसा ? तर [ पूरैव सिद्धेशकृत प्रसादः ] प्रथम शाप झाल्यानंतर गणपतीच्या कृपाप्रसादानें तो पूर्ववत् प्रकाशित झालेला; आणि [ घनो दया द्यस्य महा प्रकाशः] ढग भरून आले कीं त्याचा प्रकाश नष्ट होऊन गर्द अंधार पडतो असा; [ यज्ज्योत्स्न्यांधं ] चंद्राच्या चांदण्यापासून नेत्रांचा अंधकार मात्र नाहींसा होतो फक्त नेत्रानांच तो भासत असतो.

दुसरा अर्थ–[ पुरैव सिद्धेश कृत प्रसादः] ज्याला सिद्धेश गणेशबुवा

महाराज ह्यांनीं आधींच प्रसाद केलेला आहे; त्यांचा अनुग्रह आहे; आणि [ घन ] ह्मणजे चैतन्य ह्याचें ज्ञान म्हणजे आत्मज्ञान झाल्यामुळें जो अधिकच प्रकाशित होतो. चंद्राच्या चांदण्यानें नेत्रगत तम नाहींसें होतें, पण ह्यानें केलेल्या [ ज्योत्स्ना ] नामक ग्रंथानें [ श्रुतिपद्धते ] वेद पाठ-विषयक जें तम ह्मणजे अज्ञान तें नाहींसें होतें. ह्मणून हा रामचंद्र–लोकोत्तर चंद्र होय.

हेच आमचे ( कोणाचे ? )परमगुरु होत. ह्यांच्या चरणांनीं स्वप्नांत येऊन श्रीरामोपासनेचा बीजमंत्र देऊन आह्मांस कृतार्थ केलें. ( कवीला कां टीकाकाराला ? )

शेषा लक्ष्मण एष वै मदनुजो भूत्वाऽप्यशेषात्मना
निर्व्याजं यदसेवतास्मि कृपणो स्वर्णस्य निर्यातने ।
तत्कार्यं स्वयमेतदयिचरितं श्रीराम इत्यादृतः
कृत्वा राममिमं स्वयं तदनुजो भूत्वाऽनुकूलोऽभवत्॥ ३६६ ॥

शेष हा लक्ष्मणाच्या रूपानें माझा धाकटा भाऊ होऊन प्रत्यक्ष शेष असून सुद्धां [ अशेषात्मना ] अगदीं मनापासून [ निर्व्याजं ] निष्कपट रितीनें त्यानें माझी सेवा केली. [स्वर्णस्य] हें जें त्याचें माझ्यावर ऋण झालें आहे, तें ऋण फेडण्याच्या कामीं मी कृपण आहे; असमर्थ आहे. तेव्हां तो जसा माझ्याशीं वागला, तसेंच आपणही त्याच्याशीं वागावें. असें श्रीरामांनीं मनांत आणून कृष्णावतारांत त्याला राम [ बळराम ] करून आपण स्वतः त्याचे धाकटे भाऊ कृष्ण होऊन त्याला अनुकूल झाले.

ध्यानेनात्मगतं स्त्रीत्वं गतं बाह्यं विरागतः ।
लयेन माधवीभूता राधा तत्र तयोर्भिदा ॥ ३६७ ॥

ध्यानाच्या योगानें आत्मगत असा जो स्त्रीपणा तो नाहींसा झाला. आणि [ बाह्य विरागतः ] वैराग्याच्या योगानें स्त्रीत्वाची बाहेरचीं लज्जा वगैरे चिन्हेंही नष्ट झालीं; त्यामुळें राधा ही [ राधा ] अशी पुल्लिंगीरूप बनली. आणि श्रीकृष्णामध्यें लय पावून माधव स्वरूपच झाली. त्यांच्यात कांहीं भेद उरला नाहीं.

श्लेष—[ राघ ] हा शब्द [ वैशाखे माधवो राधः ] ह्या नियमाप्रमाणें वैशाख मासाला लागतो व तसाच माधव शब्दही त्यालाच लागतो. म्हणून [ राध ] व [ माधव ] हे दोन्ही एकरूपच होत.

वक्तुं वयं न शक्ताः स्मो राधायाः प्रेमगौरवम् ।
यदस्या माधवाद्भेदो न स्त्र्याकारं विनेतरः ॥ ३६८ ॥

राधेच्या निस्सीम प्रेमाच्या श्रेष्ठतेचें वर्णन करावयाला आम्ही असमर्थ आहोंत. कारण तिच्यामध्यें व मांधवामध्यें स्त्रीपणा शिवाय दुसरा कोणताच भेद नाहीं.

सा रंगामायमना राधा स्त्रीशतविधा प्रतीपा चेत्
स्यादेवानर्थकृते केशव इति लालसो बभूवास्याम् ॥ ३६९ ॥

पहिला अर्थ–ही राधा सुरत प्रसंगामध्यें निष्कपट मनाची आणि शेकडो स्त्रिया एका बाजूला आणि ही एका बाजूला अशी होती. हिच्या इतकी सुंदर व लावण्य संपन्न स्त्री दुसरी नाहीं. असें असतांही जर [ प्रतीपा ] म्हणजे प्रतिकूल होईल, उलटेल तर ती महा अनर्थकारक होईल. म्हणूनच केशव म्हणजे श्रीकृष्ण हे तिच्या ठिकाणीं लुब्ध होऊन राहिले.

हा सरळ अर्थ झाला. परंतु ती राधा उलटली, प्रतिकूल झाली, तर अनर्थकारक कशी काय होणार ? तर––

दुसरा अर्थ––[ सारंगामाय मना ]–सुरतरंगामध्यें एकनिष्ट. [ राधा स्त्री शतविधा ] शेंकडो स्त्रियांसही मागें टाकणारी अशी राधा उलटली तर काय होईल ? तर वरचींच अक्षरें उलट करून पहावीत ह्मणजे समजेल. तीं अक्षरें अशीं होतात.

[धावित शस्त्री धारा नामयमागारं सा ] 'धावित' म्हणजे पाजळेल्या 'शस्त्री धारा' तरवारीच्या धारेप्रमाणें प्रत्यक्ष यमलोकच अशी ती होईल. अर्थात् मूर्तिमंत मृत्यूच होईल. त्यापेक्षां आपण तिच्यावर राग करूं नये, तिला दुखवूं नये, तर तिच्यावर लुब्ध असावें हेंच उत्तम. असें श्रीकृष्ण मनांत आणून ते स्वतः कधीं तिच्यावर रागावत नसत. आणि कदाचित् ते रागावलेच–म्हणजे उलटलेच तर ते अनर्थकारकही होत नसत. उलट

हितकरच होत. तें कसें ? तर [केशव] हीं अक्षरें उलट केलीं तर[वशके] म्हणजे वश झालेला असाच अर्थ निष्पन्न होतो. ह्मणून श्रीकृष्ण कधीं राधेवर रागावत नसत, व रागावले तरी त्यापासून अनर्थकारकही कांहीं न होतां उलट हितच होत असे. परंतु राधा उलटली—रागावली, तर महा अनर्थ ओढवेल हे मनांत आणून तिला राग न येऊं देण्याविषयीं ते फार जपत असत हें तात्पर्य.

**श्रीकंठादपि पद्मजादपि महालक्ष्म्या अपि ज्येष्ठतो-**
**ऽपीष्टोऽभून्न हि केवलं भगवतः किंत्वात्मनोऽप्युद्भवः ।**
**तद्धेतुः प्रतिभाति मेऽस्य कृतिनः कालत्रयाबाधिता**
**देवेऽपि व्यभिचारिणी क्वचिदहो यैकांतसत्त्वात्मता ॥ ३७० ॥**

शिवापेक्षां, ब्रह्मदेवापेक्षां, महालक्ष्मीपेक्षांच बळीराजा भगवंतांना प्रिय होता असें नाहीं, तर त्यांच्या स्वतःच्या प्राणापेक्षांही तो त्यांस आवडता होता. ह्याचें कारण, त्या धन्य महात्म्याची कालत्रयींही न ढळणारी सत्व-शीलता हीच कारण आहे, असें मला वाटतें. कारण, सत्वशीलताही केव्हां केव्हां खुद्द देवामध्यें सुद्धां ढळलेली दृष्टीस पडते. पण ह्याची सत्व-शीलता अढळ होती. म्हणूनच ती विष्णूला प्रिय झाली.

**यस्योपसर्गः क्व च नास्ति लोके सदा समाकारतया स्थितो यः ।**
**स उद्धवो माधव एव साक्षादित्थं कथं प्राज्ञजनैर्न वाच्यम् ॥ ३७१ ॥**

**पहिला अर्थ**—ज्याचा ह्या लोकामध्यें यत्किंचित् ही उपद्रव नाहीं. आणि जो नेहेमीं ( **सामाकारता** ) समान बुद्धीनेंच राहतो, तो उद्धव साक्षात् माधवच आहे असें शहाण्यालोकांनीं कसें न म्हणावें ?

**दुसरा अर्थ**—( **उत्** ) हा उपसर्ग जाऊन जर तो (**समाकारतया**) 'मा' ह्या अक्षरानें युक्त होऊन राहिला तर उद्धव हा माधवच होईल ह्यांत कांहीं शंका नाहीं. म्हणजे उद्धव ह्या शब्दांतील ( उत् ) ह्या उपसर्गाच्या ठिकाणीं ( **मा** ) हें अक्षर घातलें तर तो ( **माधव** ) होईल ह्यांत शंका ती कशाची ?

अर्जुनेन विभेद्यंते दुर्भेदा अपि भूभृतः ।
कृपामाहात्म्यमेतद्धि मन्ये भगवतो हरेः ॥ ३७२ ॥

पहिला अर्थ—अर्जुनानें मोठमोठे असे ( भूभृतः ) म्हणजे राजे यांचा पराभव केला. हें केवळ भगवत्कृपेचेंच महात्म्य होय; असें मला वाटतें.

दुसरा अर्थ—( अर्जुन ) म्हणजे ( अर्जुनसादडा ) नांवाचें गवत असतें. त्यानें दुर्भेद्य असे ( भुभूतः ) म्हणजे पर्वत, ह्यांचा चुराडा करून टाकला तर तें सुद्धां भगवत्कृपेचेंच माहात्म्य होय असें म्हणावें लागतें.

देवाधीनमिहानूनं नूनमर्जुन वैभवम् ।
देव एवात एवायं श्रितो वासवसूनुना ॥ ३७३ ॥

पहिला अर्थ—अर्जुनाचें वैभव ह्या जगांत देवाधीनच आहे. म्हणूनच श्रीकृष्ण देवाचा इंद्राच्या पुत्रानें ( अर्थात अर्जुनानें ) आश्रय केला.

दुसरा अर्थ—( अर्जुन ) म्हणजे गवत, व ( देव ) म्हणजे पर्जन्य, गवताचें पीक ह्या जगांत पर्जन्यावर अवलंबून असतें, ह्मणूनच त्यानें पर्जन्याचा आश्रय केला आहे.

समये शरवर्षाणां श्रीदेवस्य प्रसादतः ।
हरितत्त्वस्य लाभोऽभूदर्जुनस्येति सांप्रतम् ॥३७४॥

पहिला अर्थ—( श्रीदेवस्य प्रसादतः ) देव म्हणजे पर्जन्य, त्याच्या प्रसादानें पावसाळ्यांत ( शर=उदक ) पर्जन्याची वृष्टि झाली म्हणजे ( हरितत्त्वस्य लाभोभूत ) जिकडे तिकडे ( गवत झाडें वगैरे उगवल्यानें ) हिरवळाचा लाभ होतो. त्या वेळेस अर्जुन सादडा नांवाच्या गवतालाही हिरव्या रंगाचा लाभ होतो.

दुसरा अर्थ—( श्रीदेवस्य प्रसादतः ) श्रीकृष्णाच्या कृपेनें बाणांचा वर्षाव करण्याच्या वेळीं [ हरित्त्वलाभोभूत ] गीतेच्या द्वारें अर्जुनाला आत्मज्ञानाच्या उपदेशाचा लाभ झाला हें सर्वांस माहितच आहे.

धनंजय म्हणजे अर्जुन आणि धनंजय म्हणजे अग्नि हे अर्थ धरून खालच्या श्लोकाचे येणेंप्रमाणें अर्थ निघतात.

**स्वयं सहजतेजस्वी यद्यप्येष धनंजयः ।**
**तथाप्यसौ स्फुरद्धेतिरहिप्रियसहायतः ॥ ३७५ ॥**

**पहिला अर्थ**—[ **धनंजय** ] म्हणजे समरांत जय मिळविणारा जो अर्जुन, तो [ **सहज तेजस्वी** ] जात्याच तेजस्वी होता. आणखी [**असौ**] –तो–[ **स्फुरत् हेति** ] त्याचीं मूळचीं आयुधें चमकत होतीं, तरी सुद्धां [ **अहि प्रिय सहायताम्** ] शेषाला आवडता जो विष्णु त्याच्या सहायानें त्याच्या शस्त्रांना जणों काय नवीनच तेज चढलें असें वाटतें. कारण, प्रथम तो शस्त्र खालीं टाकून बसला होता.

**दुसरा अर्थ**—[ **धनंजय** ] म्हणजे अग्नि हा [ **सहज तेजस्वी** ] बालिष्ठ व तेजस्वीच आहे. तथापि तो [ **हेति** ] म्हणजे ज्वालारूपी शस्त्र आहे ज्याचें, त्याच्या ज्वालाही वायूच्या सहायानेंच मोठ्या होतात.

**सर्वपार्थप्रियतमा नीलोत्पलदलप्रभा ।**
**भिद्यते कृष्णतः कृष्णा स्त्र्याकारेणैव नान्यथा ॥ ३७६ ॥**

द्रौपदीही कृष्णांशीं एकरूपच आहे. कशी ? तर [**सर्व पार्थ प्रियतमा**] पांचही पांडवांना अत्यंत प्रिय. कृष्णही तसाच. नील कमलाच्या पाकळी प्रमाणें जिचा वर्ण नील होता, व कृष्णाचाही वर्ण तसाच होता, तेव्हां [ **कृष्णः भिद्यते** ] कृष्णापासून द्रौपदी जी भिन्न आहे, ती फक्त स्त्रीपणामुळेंच आहे. दुसऱ्या कोणत्याही बाबतींत नाहीं. कारण नांवांत सुद्धां दौपदीला [ **कृष्णा** ] असेंच ह्मणतात.

**स्वधर्मपरिनिष्ठया य इह तीव्रया सादरं**
**पुमानभियुनक्ति: चेद्धृतनरानुकंपे हरौ ।**
**सुदर्शनकरो हरिर्भवति तं प्रति श्रीपति-**
**र्निदर्शनकृतेऽत्र नः स्मरणमेति देवव्रतः ॥ ३७७ ॥**

ह्या श्लोकांत [ **नर** ] म्हणजे, अर्जुन व मनुष्य हा श्लेष आहे.

एखादा मनुष्य जर मानवावर दया करणारा, किंवा अर्जुनावर ज्यानें दया केली आहे अशा श्रीहरीवर स्वधर्मपर निष्ठेनें—मोठ्या आवडीनें [ अभिप्रयोग ] करील, भक्ति करील, तर तो श्रीहरीही त्याला [दर्शन कर] म्हणजे चांगलें दर्शन देणारा होईल. ह्याच्या प्रत्यंतरासाठीं आह्माला भीष्माचार्यांचें स्मरण होतें. कारण भीष्माचार्य हे स्वधर्मनिष्ठ म्हणजे क्षात्रधर्मात निष्णात असून त्यांनीं अर्जुनास युद्धांत जर्जर केल्यामुळें श्रीकृष्णांना नराची अर्थात् अर्जुनाची कीव आली व अशा श्रीकृष्णावरही बाणांचा मारा केलाच होता ( अभियुनक्ति ) तेव्हां मग श्रीकृष्ण ( सुदर्शन कर ) हातीं सुदर्शन चक्र घेऊन भीष्माचे अगावर धांवून गेले. पुढें भीष्मानीं देवाचे पाय धरले होते ह्मणून त्यानें त्यास दर्शनही दिलें.

अनेकधातुश्रेष्ठस्य गांगेयस्य लयो विना- ।
धनंजयप्रसंगेन दिव्यभावोत्तरः कुतः ॥ ३७८ ॥

**पहिला अर्थ**—( भीष्मपर ) अनेक प्रकारांनीं श्रेष्ठ असलेला जो भीष्म त्याचा [ धनंजय प्रसंगेन ] अर्जुनाशीं गांठ पडल्याशिवाय दिव्य भावानें युक्त [ लय ] म्हणजे अंत कसा होणार ?

**दुसरा अर्थ**—( सुवर्णपर ) सर्व धातूमध्यें श्रेष्ठ असें जें [ गांगेय ] म्हणजे सोने ( गंगातीरचें ) त्याचा [ धनंजय प्रसंगेन ] अग्नींत घातल्याशिवाय प्रथम ( वितळणें ) व मागाहून [ दिव्यभावोत्तरः] शुद्धपणा हीं कशीं होतील ?

यः कृष्णेन महाप्रसादसुमुखीभूतेन तूत्पादितः
कृष्णेनैव सहोषितो भगवता कृष्णेन चांते स्मृतः ।
तत्त्वं कृष्णसखेन यस्य गदितं यः कृष्णकृष्णब्रुवः
सोऽयं कृष्णमयः कथं न विदुरो वाच्यः सतां संसदि॥३७९॥

जो महाप्रसाद देण्याला सन्मुख झालेल्या अशा कृष्ण द्वैपायनापासून ( दासीचें ठायीं ) उत्पन्न झालेला; कृष्णाजवळ रात्रंदिवस राहणारा; आणि मरते शेवटीं कृष्णांनींच ज्याचें स्मरण केलें; व कृष्णाचा सखा जो उद्धव, त्यानें ज्याला ज्ञान सांगितलें होतें. आणि जो रात्रंदिवस ‘ कृष्ण कृष्ण ’

असाच जप करीत असे, त्या कृष्णमय अशा विदुराचें नांव ह्या सज्ज-
नांच्या सभेमध्यें कसें बरें न घ्यावें ?

न भुंक्ते स्वाद्वन्नं विविधमपि मंदस्य भगवा--
नथो भुंक्ते फल्ग्वप्युदितरुचि तज्ज्ञान्युपहृतम् ।
खलप्रत्तं यत्तद्विषमिव परित्यज्य विदुरो--
टजे गत्वाऽभुंक्त स्वयमहह जोन्नालकणिकाः ॥ ३८० ॥

एखादा गर्विष्ठ किंवा मूर्ख मनुष्य असतो, त्यानें जरी निरनिराळ्या तऱ्हेचे मधुर व कितीही अन्न आणलें तरी तें भगवान् खात नाहींत. पण तेंच ज्ञान्यानें आणलेलें [ फल्गु ] म्हणजे निखालस फोल असलें तरी सुद्धां मोठ्या आवडीनें खातात, ह्याला दाखलाच पाहिजे असेल तर श्रीकृष्णांनीं खल जो दुर्योधन त्यानें दिलेली पंचपक्वान्नाची मेजवानी सुद्धां विषाप्रमाणें त्याज्य समजून विदुराच्या झोपडीमध्यें जाऊन जोंधळ्याच्या कण्या सुद्धां खाल्लया ! ( यावनाल ह्म. जोंधळे ) ह्यावरून वरची गोष्ट अगदीं खरी ठरते.

लोकेषु हंहो मम सोदरं तत्पद्मं बभुव श्रिय आसनाय ।
तत्पुंडरीकेण तदीर्ष्यया किं स्थानं रमेशो गमितः किमेषः ॥३८१॥

विष्णूनीं आपल्या हातांत पुंडरीक नांवाचें पांढरें कमल धारण केलें आहे, त्याच्यावर उत्प्रेक्षा. माझा [ सोदर ] म्हणजे भाऊ जें पद्म (तांबडे कमल) तें लक्ष्मीचें आसन होऊन बसलें आहे. हें मनांत आणून ईर्षेनें पुंडरीक नांवाच्या ( पांढऱ्या ) कमलानें जणों काय विष्णूच्या हातांत स्थान पटकावलें आहे. पुंडरीक ही विष्णूच्या हातांत जाऊन बसला, आणि त्यानें ही [रमेश ] तेंच आपलें वसतीस्थान केलें. ' रमेश' म्हणचे लक्ष्मीपति हें सांगणें नकोच, ह्मणजे त्यानें आपल्या भावाच्याही वर ताण केली असा भाव.

भित्तिं कापि वदत्यभित्तिमपरेत्येवं द्विधाऽपि श्रुति-
स्तत्रादर्शी तु भित्यभाव उचितः श्रीशंकरार्याघ्रिभिः ।

**भित्तिः सर्वत इक्षणे पुनरिति श्रीमध्वपादैरिह-**
**द्येसाकाशजता तु हेतुरपुरे सा मध्यगेहोत्थता ॥ ३८२ ॥**

श्रुतीमध्यें कांहीं ठिकाणीं जीव आणि शिव ह्यांची [भित्ति] ह्मणजे भेदभाव वर्णन केलेला आहे. व दुसऱ्या कांहीं ठिकाणीं अभेद भाव सांगितलेला आहे. त्यांत श्रीशंकराचार्योनीं अभेद भाव हाच उचित असें मानलें आणि मध्वाचार्योनीं भेदभाव हाच जिकडे तिकडे दिसतो असें प्रतिपादन केलें. ह्यांतील पाहिल्या गोष्टीचें [आकाशजता] ह्मणजे शंकराचार्य हे आकाशामध्यें उत्पन्न झाल्या कारणानें त्यांना कोठें [भित्ति] ह्मणजे भेदभाव दिसला नाहीं. [श्लेष] [भिति] ह्मणजे भिंत असा दुसरा अर्थ आहे. शंकराचार्यांच्या वडिलांनीं पूर्वी आकाशलिंगाची पूजा केली असतां त्यांतून तेज निघून तें त्यांच्या पत्नीच्या उदरांत शिरून त्यापासून शंकराचार्योचा गर्भ राहिला असें त्यांच्या चरित्रांत वर्णन आहे. तेव्हां शंकराचार्योची उत्पत्ति आकाशापासून झालेली असल्यामुळें त्यांस कोठें [भित्ति] ह्मणजे भिंत—भेदभाव दिसली नाहीं हें उक्तच आहे. परंतु मध्वाचार्योचा जन्म [मध्यगृहांतून] ह्मणजे माजघरांत झाला. तेव्हां त्यांना प्रथमपासूनच [भिति] ह्मणजे भिंती दिसूं लागल्या ह्यांत आश्चर्य तें कसलें? पक्षीं मध्वाचार्यांच्या पित्याचें नांव [मध्यगेहभट्ट] असें होतें, तेव्हां त्यांचा जन्म माजघरांत. अर्थात् मध्यगेहभट्टापासून झाल्यामुळें तसें वाटणें साहजिक आहे.

**नित्यानिमेषचक्षुः सत्पक्षसमाश्रयेण मत्स्येंद्रः ।**
**विहरति वनैकवृत्तिर्विमलयितुं सर्वतो भुवनम् ॥ ३८३ ॥**

ह्या श्लोकांत 'मत्स्येंद्रनाथ' साधु व मत्स्येंद्र ह्मणजे मासा ह्यांचें सादृश्य श्लेषरूपानें फारच चातुर्यानें दाखविलें आहे.

**पहिला अर्थ**—मत्स्येंद्र कसे होते? तर नित्य [निमेष राहित] ह्मणजे ज्ञानचक्षूनें युक्त; आणखी कसे, तर [सत्पक्षसमाश्रयेण] संतांचाच आश्रय करणारे; नित्य आत्मज्ञान चक्षूंनीं युक्त; आणि [वनैक वृत्तिः]

वनामध्येंच एकसारखा वास करणारे. आणि सर्व जगाचा उद्धार करण्याकरितांच ते सर्वत्र विहार करीत.

**दुसरा अर्थ**—आतां ' मत्स्येंद्र ' ह्मणजे मोठा थोरला मासा कसा असतो ? तर [ **नित्य अनिमेष चक्षुः** ] डोळ्यांची कधींही उघडझाप न करणारा, आणखी कसा ? तर [**सत्पक्षसमाश्रयेण** ] मोठमोठे ज्याला पंख आहेत; आणखी ? [ **वनैकवृत्ति** ] निरंतर पाण्यामध्येंच राहणारा; आणि [ **विमलयितुं सर्वतोभुवन्** ] भुवनं ह्मणचे पाणी, सारें पाणी स्वच्छ करण्याकरितांच त्यांत [ **विहरति** ] वावरत असतो.

**लोकोत्तरानुकंपी अनपार्थविभूतिरचितगोरक्षः ।**
**मत्स्येंद्रो न विरक्तं कं कं कुरुते स्वकाक्षपातेन ॥ ३८४ ॥**

**पहिला अर्थ**—ज्याची दया केवळ लोकोत्तर. ज्यानें आपल्या अमोघ भस्माच्या योगानें आपला शिष्य [ **गोरक्ष** ] निर्माण केला. तो [ **स्वकअक्षपातेन** ] आपल्या कृपादृष्टीनें कोण कोणाला विरक्त करणार नाहीं ?

**दुसरा अर्थ**—[ **मत्स्येंद्र** ] म्हणजे मत्स्यदेशाचा राजा विराट हा [ **लोकोत्तरानुकंपी** ] सर्व लोकांपेक्षां [ **उत्तर** ] नांवाच्या आपल्या मुलावर दया करणारा; आणखी कसा ? तर [ **अन–अपार्थ विभुतिं रचित–गोरक्षः** ] त्याच्या सेवेंत अर्जुन होता म्हणूनच त्याच्या गोधनाचें संरक्षण झालें. नाहीं तर झालें नसतें. असा जो मत्स्येंद्र त्यानें कंकभटाला [ **स्वक अक्षपातेन** ] आपल्या फाशाच्या तडाक्यानें [ **विरक्तं न कुरुतें** ] त्याचा हात तांबडा लाल केला नाहीं काय ? विरक्त--बाहेर आलें आहे रक्त ज्यांतून असा.

भुवने विचरत्यनिशं शंखं जित्वैव सवेशो निगमम् ।
गोरक्षाय समददादुपहितशृंगोऽत्र मत्स्येंद्रः ॥ ३८५ ॥

**पहिला अर्थ**—जो मत्स्येंद्र हातांत शिंग घेऊन वाजविण्याकारितां ह्या भुवनामध्यें एकटा एक संचार करतो, ज्यानें वेदांती [**खं**] म्हणजे इंद्रियकर्ममार्ग–भोगमार्ग जिंकून–विषय वासना सोडून वेदशास्त्र मथन करून सुख काढलें आणि तें आपला शिष्य जो गोरख त्याला दिलें.

दुसरा अर्थ—मत्स्यावतारामध्यें मत्स्येंद्र असा जो विष्णु त्याला एक शिंग होतें. तो एक सारखा पाण्यामध्यें संचार करीत फिरून त्यानें शंखासुराला सर्व बाजूंनीं जिंकून वाणीचा रक्षक जो ब्रम्हदेव त्याला वेद अर्पण केले.

अथ नाथपथं तात कथं कथयितुं क्षमे ।
मूर्ता यत्रोपलभ्यंते निवृत्तिज्ञानमुक्तयः ॥ ३८६ ॥

[ नाथपंथ. ]

अरे बाबा ! ह्या नाथपंथाचा महिमा वर्णन करावयाला मी कसा समर्थ होईन ? कारण, ज्यामध्यें मूर्तिमंत निवृत्ति, ज्ञान आणि मुक्ति ह्या तिहींचाही लाभ होतो. त्या नाथपंथाचा महिमा किती म्हणून सांगावा ! निवृत्तिनाथ, ज्ञानदेव व मुक्ताबाई हीं सर्व भावंडें ह्याच पंथांतील होतीं हे ज्ञानेश्वरी वगैरे ग्रंथावरून सर्वत्र प्रसिद्धच आहे.

यदि ज्ञानं च मुक्तिं च लब्धुमिच्छस्ययत्नतः ।
निःसीमप्रेमभरितो निवृत्तिं नित्यमाश्रय ॥ ३८७ ॥

तुला जर ज्ञान व मुक्ति हीं प्रयासाशिवाय मिळाविण्याची इच्छा असेल तर निस्सीम प्रेम भरित होऊन नित्य निवृत्तीचा म्हणजे वैराग्याचा आश्रय कर.

• श्लेष—ज्ञानेश्वर व मुक्ताबाई ह्यांचीं चरित्रें श्रवण करावयाचीं असतील तर निवृत्तिनाथांचें चरित्र पहा: म्हणजे तीं त्यांतच तुला मिळतील असा भाव. किंवा निवृत्तिनाथांचा प्रसाद संपादन केल्यास ज्ञानेश्वर व मुक्ताबाई ह्यांच्या प्रसादाचा लाभ आपोआपच होईल.

यद्विलासवशादात्मवस्तु नैव प्रकाशते ।
अलंदीपो विनाशाय तमसस्तस्य केवलम् ॥ ३८८ ॥

ज्याच्या सहज लीलेनें आत्मज्ञान प्रकाशमान होतें, असा (अलंदीपः) अळंदी गांवाचें पालन करणारा--तेथील राहणारा--जो ज्ञानदेव तो एकटाच त्या अज्ञानांधकाराचा विनाश कर्ता आहे.

श्लेष—[ अलं-दीपः] ढळढळीत दिवा असा तो एकटाच आहे.

सर्वथा सेवकं नामदेवं यः समुपादिशत् ।
ब्रह्मात्मभावं विदितो गुरुः स इह खेचरः ॥ ३८९ ॥

पहिला अर्थ—ज्यानें पांडुरंगाचा भक्त ( किंवा सेवक म्हणजे शूद्र जातीचा ) जो नामदेव त्याला ब्रम्हात्मभावाचा उपदेश केला, असा ह्या जगांत प्रसिद्ध असलेला गुरु ( ज्ञानदेव शिष्य ) खेचरच होय.

दुसरा अर्थ—' खेचर ' म्हणजे आकाशांत संचार करणारा तो गुरु ( बृहस्पति ) असलाच पाहिजे. त्यानें आपल्या सेवकासारख्या असलेल्या इंद्राला उपदेश दिला.

सिषेविरे हृषीकेशम् संतो नाम सहस्रशः
सेवकत्वं परं नामदेव एव व्यवस्थितम् ॥ ३९० ॥

हृषीकेशाची सेवा करणारे साधु हजारो आहेत. परंतु सेवकत्त्व हें एका नामदेवाच्याच ठिकाणीं व्यवस्थित म्हणजे कायम राहिलेलें होतें. खरी परमेश्वराची सेवा अशी त्यानेंच केली. शिवाय जातीचा शिंपी असल्यानेंही त्याच्याकडेच खरें ' सेवकत्त्व ' येतें. कारण सेवक म्हणजे शिंवणारा (सीव्यति=शिवतो.)

यस्य नाम्नः पराख्यातिः सदा सर्वत्र राजते ।
सत्यं ब्रवीमि लोकेऽत्र सदामोदरसंगतः ॥ ३९१ ॥

ज्याच्या नांवाची दिगंत किर्ति सदा सर्वकाल चहूंकडे विराजमान झालेली आहे. नामदेव ह्याचा शब्दशः अर्थ हाच आहे. नाम—नांव; देव म्हणजे चमकणारें किंवा शोभणारें—तो ह्या लोकांत ' दामोदर ' जो विष्णु त्याच्या संगतींत सरूपता पावलेला आहे, असें मी खात्रीनें सांगतों. कशा वरून म्हणाल ? तर त्याच्या नांवाची ख्याति तशीच पसरलेली आहे.

श्लेष—( दामोदर संगतः ) दामा ' शेटी ' नांवाच्या शिंप्याच्या पोटीं जन्मला म्हणून व ( सदा मोदरसं गतः ) निरंतर ब्रम्हानंदामध्यें निमग्न असणारा असा होता म्हणून.

श्रीरमारमणप्रेमा यत्र स्थेमानमास्थितः ।
अतिधन्या सतां मान्या सैव नाम जनी मता ॥ ३९२ ॥

**पहिला अर्थ**—जिच्या ठिकाणीं श्रीरमारमण जो विष्णु त्याच्या संबंधीं प्रेम हें स्थिरिता पावलें होतें, अशी ती अत्यंत धन्य व सर्व लोकमान्य [ जनी ] ती मला पूज्य वाटते. नामजनी तीच नामदेवाची दासी जनी होय.

**दुसरा अर्थ**–( सैव नाम जनी मता. ) [ जनी ] म्हणजे जन्म; तो जन्म मला अत्यंत मान्य आहे. सारखा ( जनी ) मनुष्यजन्मही अत्यंत श्रेष्ठ होय. कारण ज्या जन्मांत विष्णूचे ठिकाणीं बुद्धि स्थिर झाली असेल त्याचेंच नांव खरा जन्म.

लौकिकजनेषु साधुषु दिविषत्स्वपि समनुवर्तते यस्य ।
उत्तमसुमनस्तासौ मालाकृत्सावताव्हयो जयति ॥ ३९३ ॥

[ सावता माळी ]

सावता नांवाचा [ मालिकृत] म्हणजे माळी ह्याचा जयजयकार असो. ज्याची [ सुमनस्कता ] म्हणजे उत्तम फुलें देण्याचा गुण जो आहे तो 'लौकिक जनेषु' सामान्य लोकांच्या ठिकाणीं व सुमनस्कता म्हणजे मनाचा पवित्रपणा ह्या अर्थानें साधूंनाच नव्हे, तर देवांनाही मान्य होता.

नन्वर्पितः परस्मिन्माधवदासस्य सर्व एवार्थः ।
अतिसारे तत्पटकान्कथामिव भगवान् स्वयं न धावयतु ॥३९४

माधवदासाचा सर्व अर्थ [चारी पुरुषार्थ भगवद्भक्तींत आहेत असेंच तो मानी. ] म्हणजे सर्वस्व त्यानें भगवंतालाच अर्पण केलेलें असे. तेव्हां त्याच्या अतिसारामध्यें त्याचीं वस्त्रें भगवान् स्वतः कशीं बरें धुणार नाहींत ?

माधवदास अतिसारानें पडलें असतां, त्यांची कौपीन वगैरे वस्त्रें भगवान् स्वतः धुवून ठेवीत असत. ही गोष्टः—

साधु ह्मणावे ह्मणती नर माधवदास साधु याला जे ॥
अतिसारीं पट ज्याचे न रमाधव दासता धुया लाजे ॥१॥

ह्या आर्येत मोरोपंतांनींही सांगितली आहे.

श्लेष—बहुव्रीही समासामध्यें एक मोठा चमत्कार आहे. तो असा कीं, दोन शब्दापासून तिसऱ्याच पदार्थाचा बोध होतो. तेव्हां येथें माधव आहे ज्याचा दास असा समास करावयाचा. माधवाचा जो दास तो माधवदास असा विग्रह करावयाचा नाहीं. तेव्हां त्या समासाच्या विग्रहाप्रमाणें भगवान् हे माधवाचे दासच बनले होते. तेव्हां त्यांनीं त्याचीं वस्त्रें धुतली ह्यांत कांहीं विशेष नाहीं, तें उक्तच आहे.

**विध्वस्ततमःस्तोमो जयंति द्विजराज एष आत्रेयः ।**
**श्रितसज्जनैकनाथो जनार्दनो यस्य वंशेऽभूत् ॥ ३९५ ॥**

[**विध्वस्त तमस्तोमः**] अज्ञानांधकाराच्या घनपटलाचा ज्यानें पुष्कळ नाश केला आहे. [**यस्यवंशे अभूत्**] ज्याच्या वंशामध्यें गुरुपरंपरेंत एकनाथ नांवाच्या सत्पुरुषानें ज्याचा आश्रय केलेला आहे असा [**जनार्दन**] स्वामी उत्पन्न झाला, असा ब्राम्हणांतील श्रेष्ठ जो अत्रिपुत्र दत्तात्रय त्याचा जयजयकार असो.

**दुसरा अर्थ**—द्विजराज ह्मणजे चंद्र. हा कसा आहे ? तर तोही अत्रि वंशांत उत्पन्न झालेला. गाढ अंधकाराचा नाश करणारा; आणखी [**श्रीतसज्जनैकनाथः**] आश्रयास आलेले जे सज्जन असतील त्यांचें पालन करणारा; असा एकटाच 'जनार्दन' ह्मणजे श्रीकृष्ण हा ज्याच्या वंशांत उत्पन्न झालेला आहे, (श्रीकृष्ण हे सोम वंशांत जन्मल्याचें प्रसिद्धच आहे.) त्या चंद्राचाही जयजयकार असो.

**युक्तायुक्ततया किमप्यगणयन् जागर्त्यहो सर्वथा**
**सत्संकल्पसमर्थनाय भगवान् विन्यस्तपर्यस्तिकः ।**
**यन्नाथस्य जनार्दनो घनरसं यच्छत्विति ध्यातवान्**
**दत्तस्तावदिहोदवीवधमपि स्कंधे दधार स्वयम् ॥ ३९६ ॥**

भगवान् हे युक्तायुक्तेचा विचार सर्व टाकून देऊन सज्जनांचा संकल्प तडीस नेण्याकरितां सदा वीरासन घालून बसलेले असतात—जागतात. उदाहरण, एकनाथाला [ **घनरस** ] म्हणजे आत्मज्ञानरूपी रस द्यावयाचा

असें एकदां वचन दिलें, तें पुरें करण्याकरितां दत्तांनीं येणेंप्रमाणें कष्ट सोसले. 'घनरस' ह्याचे अर्थ दोन; एक ब्रह्मज्ञानरूपी रस व दुसरा पुष्कळसें पाणी. श्रीदत्तानीं जनार्दन रूपानें एकनाथाला पाहिल्या अर्थानें 'घनरस' अर्थात आत्मज्ञान दिलें. पण अद्याप 'घनरस' ह्याच्या दुसऱ्या अर्थाप्रमाणें वचन पूर्ण व्हावयाचें होतें. तें एकनाथांच्या घरीं कावडी भरून पूर्ण केलें. म्हणजे ज्या एकनाथाला जनार्दन हे केवळ दत्तरूपच होते, त्या एकनाथाला आत्मज्ञानरस दिला. परंतु आपलें वचन पुरें करावयाचें म्हणजे [ रस ] पाणी आणून द्यावयाचें तें स्वतः [ घन ] म्हणजे कावड खांद्यावर घेऊन पाणीही त्याच्या घरीं आणून आपलें वचन पुरें केलें.

याच्यं चेद्विदुषा हरेर्भगवतो भक्ताय याच्यं यतो
नित्यं ते ददते दयार्द्रहृदयाः स्वाम्येकनाथो यथा ।
प्रादादुत्तमपूरणं विपुलशो गाऊबनाम्नः शिशोर्जिव्हायै
निवसन्निहाप्यथ परब्रह्मप्रपन्नोऽपि सन् ॥ ३९७ ॥

याचना करावयाची झाली तर विद्वान् मनुष्यानें हरिभक्तांचीच करावी. कारण, ते दयाळू असल्यानें नित्य अशी कांहीं वस्तु म्हणजे परमार्थज्ञान देतात. ज्याप्रमाणें स्वामी एकनाथांनीं [ गाऊबा ] नांवाच्या मुलाला पुष्कळसें पुरण दिलें, आणि रामचरिताचा जो उत्तम भाग उत्तररामचरित तें पूर्ण करावयास सांगितलें. त्याच्या जिव्हेला पूरण दिलें—वाणीला पूर्णत्व दिलें. ह्या लोकांमध्यें जिव्हेला उत्तम पुरण दिलें आणि परलोकीं जात असतांना उत्तररामचरित पुरें करावयास सांगितलें. हेंच ज्ञानरूप पुरण म्हणजे ज्ञानाची परिपूर्ती होय. तीच त्याला दिली.

ह्याबद्दल अशी आख्यायिका आहे कीं, पैठण गांवामध्यें एक गरीब स्त्री राहत असे. तिची अत्यंत गरीबी असल्यामुळें ती कोणाच्या तरी घरीं स्वयंपाकास वगैरे जाऊन उदर निर्वाह करी. तिला एक लहान मुलगा होता, तो फार हट्टी असे. जेथें ती बाई स्वयंपाकास जाई तिच्याबरोबर तो तेथें जात असे. एके दिवशीं ती ज्याच्या घरीं स्वयंपाकास गेली होती तेथें पुरण घातलेलें होतें. व हा मुलगा भूक भूक करूं लागला म्हणून

त्या बाईनें त्याच्या हातावर थोडेसें पुरण घातलें, तें त्याला फार गोड लागलें. तेव्हां पासून तो रोज मला पुरण दे ह्मणून आईपाशीं हट्ट घेऊन बसूं लागला, तेव्हां ती बाई एके दिवशीं त्या आपल्या मुलास बरोबर घेऊन एकनाथ महाराजाकडे आली. आणि त्यांस हात जोडून म्हणाली " महाराज ! हा माझा मुलगा फार हट्टी आहे, कांहीं केल्या ऐकत नाहीं. ह्याला पुरण आवडतें, व तेंच मला दे ह्मणून रोज हट्ट घेऊन बसतो. मी आहे गरीब ह्याला रोज रोज पुरण कोठून देऊं ? आणि हा तर माझा पिच्छा सोडित नाहीं. ह्याकरितां आपल्यापाशीं घेऊन आले. तरी आपण ह्याला आपल्या चरणापाशीं ठेवून घ्यावें. आपल्या घरीं नैवेद्यास रोज पुरण होतें. तें त्यास खावयास मिळेल. " हें ऐकून एकनाथ महाराजानीं "ठीक आहे, असूं द्या. " असें ह्मणून त्या मुलाला आपल्या जवळ ठेवून घेतलें. व त्या मुलाला रोज यथेच्छ पुरण खावयास मिळूं लागलें. तेव्हां तो खासा दुलदुलीत बनला. तो खुशाल तोंडानें सदा सर्वदा कांहीं तरी आनंदानें गुणगुणत बसे, त्यावरून लोक त्यास " गाऊबा " असे ह्मणूं लागले. पुढें नाथांचा अंतकाल समीप आला तेव्हां त्यांनीं सर्व शिष्यांस जवळ हाका मारून विचारलें कीं ' बाबानों ! मी भावार्थरामायण ग्रंथ लिहिलेला आहे. पण तो सुंदर कांडापर्यंतच लिहिलेला आहे. त्याच्यापुढें तो पुरा कोण करतो ? ' सर्व शिष्य ह्मणाले "येवढें आमचें सामर्थ्य नाहीं" तेव्हां नाथानीं गाऊबाकडे पाहून आज्ञा केली कीं " तूं हा उरलेला भाग पुरा कर. " तेव्हां गाऊबा हात जोडून ह्मणाला " महाराज ! हा तर माझ्यावर आपला मोठा अनुग्रह आहे. " असें म्हणून त्यानें तें पुरें केलें. ह्याप्रमाणें त्यांनीं त्यांस ह्या लोकीं पुरण दिलें आणि परलोकासाठीं उत्तम रामचरिताची पूर्णतारूपी पुरण दिलें. तें पुरण म्हणजे आत्मज्ञानाची पूर्तता—शाश्वतस्वरूपी होय हें सांगणें नकोच.

श्रीविश्वंभरलीलायोगो मुक्तेशभूतिमातनुते ।
या हि महाभारतरणसमुद्यमे प्राकृतान्सतृणयति ॥ २९८ ॥

पहिला अर्थ—श्रीविश्वंभराच्या म्हणजे परमेश्वराच्या लीलेच्या योगानें

मुक्तेश्वर हे जीवन्मुक्तांमध्यें श्रेष्ठ अशा प्राण्यांचें वैभव जे इंद्रियदमनादि गुण त्यांचा ते उपभोग घेत होते. ती त्यांची लीला पाहून प्राकृत लोकांत [**महाभारतरण समुद्यमे** ] हा संसाररूप महाभार केव्हां एकदां तरून जाऊं असें होऊन जातें.

**दुसरा अर्थ**–**विश्वंभरभट्ट** आणि **एकनाथाची** कन्या **लीला** ह्यांचा विवाह संबंध हा **मुक्तेश्वराच्या** जन्मास कारण होतो. ज्या मुक्तेश्वराचा जन्म महाभारतांतील युद्धाच्या संबंधाची हकीगत ऐकण्याविषयीं प्राकृत जनामध्यें तृष्णा उत्पन्न करतो.

**भाषंते विबुधाः सुधामधुरिमोद्गारं विधत्ते मुधा**
**स्फारं मुग्धकुमारवागिति पुनः सा नैव किंचिद्व्ययम् ।**
**आपन्नाऽस्ति चिरायु यत्पुनरियं मुक्ताऽथ मुक्ताधिपा-**
**दुक्ता पर्वचतुष्टयी मधुरतां तस्याः किमु ब्रूमहे ॥३९९॥**

शहाणे लोक म्हणतात लहान मुलाची वाणी हीं अमृताच्या माधुर्याची अगदीं रेल चेल करून सोडतात. ते अशीं माधुर्ययुक्त कुमारवाणी; आणखी कशी? तर बराच काल सांठविलेली. तीं जर मागाहून [**मुक्ताधिप**] मुक्तेश्वर–मोत्यांचा अधिप –ह्याच्या पासून मुक्त केली ( पक्षीं–मोत्यांनीं गुंफलीं ) तर तिची गोडी काय विचारावी ? आणखी त्याच वाणीनें जर चार पर्वें केलीं, [ पक्षीं चार पदर गुंफले ] तर मग त्याचें माधुर्य काय सांगावें ? (मुक्तेश्वरांनीं केलेलीं महाभारताचीं चारच पर्वें प्रसिद्धच आहेत) मुक्तेश्वर लहानपणीं मुका असून त्याला एकनाथ महाराजांनीं वाणी दिली. अशी प्रसिद्धी आहे. ह्यावरच इतकें दिवस वाणीचें माधुर्य सांठविलें होतें अशी उत्प्रेक्षा केली आहे.

**या नाथेन समर्पिता भगवते पीयूषबुद्ध्या सिता**
**या चास्वाद्य मुखामृतेन हरिणा संभाव्य दत्ता पुनः ।**
**न्यस्ता साऽमृतपाणिनास्य रुदतो वक्त्रेंऽग वत्सेदृशं**
**ब्रूहीति प्रभुणैव तस्य बत वाक् स्वाद्वीति किं ब्रूमहे ॥४००॥**

जी खडीसाखर अमृत भावनेनें भगवंतांनीं एकनाथांस अर्पण केली होती व जी भगवंतांनीं आदर बुद्धीनें आपल्या मुखामृतानें आस्वाद घेऊन परत दिली आणि रडत असलेल्या मुक्तेश्वराच्या तोंडांत आपल्या अमृतमय करानें ठेविली आणि 'हे मुला ! ह्या खडी साखरे सारखें गोड बोल' असें म्हणून सांगितलें, त्याची वाणी मधुर हें काय सांगितलें पाहिजे ?

मुक्तस्थितेः पर्वचतुष्कमार्या वदंति सर्वत्र सलोकतादि ।
तामन्यथाऽसौ कथभंग कुर्याद्धुर्या न संतःसदातिक्रमस्य ॥४०१

मुक्तस्थितीला चार पायऱ्या आहेत असे श्रेष्ठ लोक म्हणतात. [ सलोकता, समीपता, सरूपता आणि सायुज्यता.] ती सज्जनांची उक्ति अन्यथा कशी करावी ? कारण, साधु लोक चागल्याचा आतिक्रम करण्यामध्यें कधींच पुढारी होत नाहींत. म्हणूनच मुक्तेश्वरांनीं चार पर्वें केलीं कीं काय कोण जाणें ?

पूर्वं सर्वमयाचमेव हरिणा सख्या सुवर्णेन म-
य्यत्याढ्येऽथ कृते मुवर्णमददां जातं किमेतावता ।
चेद्दास्येऽहमसौ सुवर्णरहितोऽप्यथ्यर्थितं तत्पुन-
र्दानं स्यादिति किं तथावतरता धान्यं सुदाम्नार्पितम् ॥४०२॥

पूर्वी सुदाम्याच्या अवतारांत मी सर्व कांहीं हरीपाशीं मागीतलेंच आहे त्यावेळीं माझा मित्र जो हरि, त्यानें मला सुवर्णाची रेलचेल करून दिली. तेव्हां मी जर आतां सुवर्णच देऊं लागलों तर विशेष तें काय ? मी सुवर्ण रहित असतांनाहीं जर याचकांनीं याचना केली असतां मी कांहीं तरी त्याचें दिलें, तरच तें खरें दान होईल. अशा हेतूनेंच कीं काय हा नवीन दामाजीचा अवतार घेऊन त्यानें याचकास धान्यच अर्पण केलें ! 'सुदामा' ह्याशब्दांतील 'सु' हा वर्ण अथवा अक्षर काढिलें तर दामा अथवा 'दामाजीपंत' असें शिल्लक राहतें. व सुदामा व दामाजीपंत हे दोघेही ईश्वर भक्त होते. ह्या गोष्टीस अनुलक्षून वरची उत्प्रेक्षा आहे. 'दामाजी' हा सुदाम्याचा अवतार कल्पून पूर्वीं त्याजजवळ 'सुवर्ण' म्हणजे सोनें किंवा सुदामा ह्यांतील 'सु' हा वर्ण होता. पण सुवर्ण विरहित झाला म्हणजे दामा असा झाला.

अभंगकीर्तिग्रामेण तुकारामेण साधुना ।
अजो दशरथो नित्यं परमानंदसंभृतः ॥ ४०३ ॥

पहिला अर्थ—( रामपर ) ज्याची अखंड कीर्ति दिगंत पोंचलेली आहे, अशा रामरूपी चांगल्या ( तुका ) अपत्याच्या योगानें ( अज ) म्हणजे रामचंद्राचे एक पूर्वज आणि दशरथ हे नित्य परम आनंदित होतात.

दुसरा अर्थ— ( तुकारामपर ) साधु तुकारामाच्या अभंग करणीनें मोठ्या कीर्तिच्या योगानें कधींही जन्म नसतां दहा अवतार घेणारा जो परमात्मा त्याला निरंतर परमानंद होतो.

शृण्वन्वचांसि स जघन्यतुकोदितान्य-
व्यक्तान्यपि प्रभु ( म ) दमेति पिता प्रकामम् ।
तैः शास्त्रगर्भभरितैः किमभंगरूपै-
र्युक्तं द्रवीभवति विश्वगुरुस्तदेषः ॥ ४०४ ॥

बापाला सर्वांत लहान मुलानें काढलेले अस्पष्ट, भंग पावलेलें (तुटक) असें बोबडे शब्द ऐकून कितीतरी आनंद होतो. आणि तेच शब्द ( शास्त्रगर्भभरितैः ) जर शास्त्रसिद्धांतांनीं भरलेले, अभंगरूपानें असलेले आणि तेही ( जघन्य तुका ) शेवटच्या अपत्या कडून ( पक्षीं शुद्राकडून ) बोलले जातील तर विश्वगुरूला संतोष होणें हें उक्तच आहे. मानवी बापाला जर येवढा संतोष होतो—तर विश्वगुरूला—सर्व जगाच्या पित्याला तो केवढा बरें व्हावा ?

रक्षार्थान्यजनार्पितैर्ननु धनैर्नित्यं द्विजानां यदि
स्यात्संतर्पणमेष वित्तपतिना गण्यो व्ययो न क्वचित् ।
तद्योगेन हरेः प्रसाद उदितः प्राज्ञप्रक्लृप्तो यत-
श्चात्मप्रत्यय उद्भवेदिह तुकारामं स्मरामो वयम् ॥४०५॥

पहिला अर्थ—रक्षणा करितां अन्य लोकांनीं दिलेल्या धनानें जर ( द्विज ) म्हणजे ब्राह्मण तर्पण होईल तर तें धन ( वित्तपतिना ) धन-

वानानें खर्च झालें असें समजूं नये. कारण त्याच्या योगानें ( हरेः प्रसाद उदितः ) हरीचा प्रसाद होतो. विद्वान् लोकांमध्यें, साधुलोकांमध्यें प्रसिद्ध असलेला प्रसाद त्याला मिळून आत्मसाक्षात्कारही घडतो. ह्या बाबतींत आम्हाला तुकारामाचें स्मरण होतें. ते कां? तर—

**दुसरा अर्थ**—दुसऱ्या शेतकऱ्यानें आपलें शेत राखण्यासाठीं दिलें असतां, तें ( **द्विजांना** ) म्हणजे पक्ष्यांना खुशाल खाऊं दिलें. परंतु ( **वित्तपतिना** ) त्या शेतकऱ्यानें अखेर जेव्हां धान्य मोजून घेतलें, तेव्हां त्यांत मुळींच कसी भरलें नाहीं. उलटें अदमासापेक्षां अधिकच दाणे झाले. ते त्या शेतकऱ्यानें तुकारामाला दिले असतां ते त्यानें घेतले नाहींत. ह्मणून त्याचें ( हरेःउदितः ) श्रीहरीचें देवालय बांधल्याचें मोठमोठ्या लोकांना माहितच आहे. अशा तुकारामाचें येथें स्मरण झाल्या वांचून राहत नाहीं. ( प्रसाद म्हणजेच प्रासाद अर्थात हरिमंदिर किंवा देउळ. )

**गोरससेवी साधुव्रजतोषकरो यशोदयायुक्तः ।**
**आनंदसुतो हरिणा सम इत्याकारतः परं भेदः ॥ ४०६ ॥**

**पहिला अर्थ**—आनंदतनय कसा होता? तर ( **गोरस सेवी** ) वाणीच्या रसाचें सेवन करणारा; आणि ( **साधुसंतोष कारी** ) साधुंस संतोष देणारा; यश आणि दया ह्यांनीं युक्त असा होता. तेव्हां तो हरीशीं सदृशच होता असें म्हणतां येईल. आकार मात्र वेगळा.

**दुसरा अर्थ**—आतां श्रीकृष्ण परमात्मा कसा होता? तर ( **गोरस सेवी** ) दहीं दूध खाणारा; ( **साधुव्रजतोषकरः** ) चांगल्या गोपाळांना संतोष देणारा; आणखी कसा? तर ( **यशोदयायुक्तः** ) यशवदेनें युक्त असा; आणि ( **आकारतः परंभेदः** ) त्यांत 'आ'कार नाहीं येवढा काय तो भेद—( **आनंद सुत** ) ह्यांतील '**आ**'**कार**—आ अक्षर काढून टाकलें म्हणजे ( **नंदसुत** ) श्रीकृष्ण हे नंदाचे पुत्र होत. हा आनंदाचा पुत्र होता ह्मणून 'आ'कारामध्येंच काय तो भेद, बाकी दोघे सारखेच आहेत.

अरणिसमुद्भूतो यो गोरससेवी परिस्फुरत्कांतिः।
आनंदसुतोऽग्निसमो भेदस्तु परं नरानरत्वेन ॥ ४०७ ॥

आनंदसुत हा अग्नि सारखाच आहे. इतकेंच कीं आनंदसुत हा (नर) म्हणजे मनुष्य होता, आणि अग्नि हा ( अ—नर ) म्हणजे मनुष्य नव्हे व [ र ] च्या ठिकाणी [ ल ] केला म्हणजे [ अनल ] म्हणजे अग्निच झाला.

आनंदतनय कसा? तर [ अरणि समुद्भूतो ] अरणी नांवाच्या गांवांत जन्मलेला-पक्षीं-अग्नि कसा? तर [ अरणीं ] ह्मणून जें यज्ञांत लांकडाचें यंत्र असतें त्याच्या पासून उत्पन्न होणारा असा; आणखी आनंदतनय कसा? तर [ गोरस सेवी ] वाणीचा रस ग्रहण करणारा-पक्षीं-अग्नि हा [गोरस ह्म०] घृतसेवन करणारा; आनंदतनय कसा? तर [ परिस्फुर त्कांतिः ] काव्य तेजानें तेजपुंज; पक्षीं अग्नि हा स्वतःच दैदिप्यमान् असा. तेव्हां अग्नि आणि आनंदतनय हे दोन्ही समसमानच आहेत.

प्रकटितचारुहरिगुणं मंजुमधुरवचसमरणिसंभूतम् ।
तं कृष्णलेखकंठं शुकमहमानंदनंदनं वंदे ॥ ४०८ ॥

**पहिला अर्थ**—आनंदतनय कसा आहे? तर [ मंजु मधुरवचसम् ] मधुर व मंजुळ वाणीनें ( प्रकटित चारु हरि गुणं ) श्रीहरीचे उत्तमोत्तम गुणानुवाद वर्णन करणारा; आणखी कसा? तर ( अरणि संभूतम् ) अरणी गांवामध्यें जन्म घेतलेला; आणखी कसा ? तर ( तं कृष्णलेख कंठं ) ज्याच्या मुखामध्यें अहर्निश श्रीकृष्णदेवच वास्तव्य करीत आहे; असा जो शुकाचार्यासारखा महात्मा आनंदतनय त्याला मी वंदन करतों.

**दुसरा अर्थ**—आतां शुक-पक्षीं-पोपट कसा आहे ? तर तसाच, [मंजु मधुरवचसम् ] मंजुळ व गोड बोलणारा;[प्रकटित्त चारु हरिगुणं] हिरवागार मजेचा रंग दाखविणारा असा; आणखी कसा ? तर [ अरणि संभूतम् ] अरणी ज्या लांकडाच्या करतात, त्या पिंपळाच्या ढोलींत जन्मास येणारा; ‘ पिंपळाच्या ढोलींत जन्मास आलेला पोपट चांगला

बोलतो ' अशी आख्यायिका आहे. तदनुसार हें लिहिलें आहे. असा; [ तं कृष्ण लेख कंठं ] आणि काळी रेषा म्हणजे कृष्णमणी आहे ज्याच्या गळ्याला; असा जो शुकरूपी आनंदतनय महात्मा त्याला मी वंदन करतों. व्यासपुत्र शुक ह्यालाही हेंच वर्णन लागू पडतें. कारण ते अरणीपासून जन्मास आले अशी कथा आहे, व बाकीचा अर्थ वर दिलेल्या प्रमाणेंच आहे.

**तंत्रीज्ञानसुनिपुणः सुश्रुतचरकांतानीष्ठितप्रज्ञः ।**
**नवरसनिबंधचतुरो वैद्य इवानंदनंदनो जयति ॥४०९॥**

वैद्याप्रमाणें असणाऱ्या आनंदतनयाचा जयजयकार असो. वैद्य कसा असतो ? तर—

**पहिला अर्थ**— [ **तंत्रीज्ञान सुनिपुणाः**] नाडी ज्ञानामध्यें निष्णात; [ **सुश्रुत चरकांत निष्ठित प्रज्ञः** ] सुश्रुत व चरक इत्यादि वैद्यकीय ग्रंथांत शेवटपर्यंत ज्याची बुद्धि स्थीर झालेली ( ह्म. ते ग्रंथ ज्याला नीट समजले आहेत असा ) असते असा; आणखी कसा ? तर [ **नवरस निबंध चतुरः** ] नानाप्रकारचीं रसायनें करण्यामध्यें कुशल; असा वैद्य.

**दुसरा अर्थ**—आतां आनंदतनय कसा ? तर [**तंत्री ज्ञान सुनिपुण**] वीण्यादि तंतु वाद्यामध्यें व गायनामध्यें निपुण असा; [ **सुश्रुत-चर-कांत-निष्ठित-प्रज्ञः** ] उत्तम शास्त्रांत संचार करणारी, रमणीय व भगवंताचे ठिकाणीं स्थित झाली आहे बुद्धि ज्याची, असा; [ **नवरस निबंध चतुरः** ] शृंगारादि नवरसात्मक काव्य रचनेमध्यें चतुर, अशा वैद्याप्रमाणेंच असणाऱ्या आनंदतनयाचा जयजयकार असो.

यः काव्यं किल सर्वदानवमहामोदप्रदं तं रसा-
त्त्वत्या शास्त्रविशारदो विरसयांचक्रे पुरा वामनः ।
सोऽयं जातमहाप्रसादविततिर्भूयो रसाऽधानतः
काव्यं भव्यतमं द्विजेंद्रतिलकः प्रोल्लासयामास किम् ॥४१०॥

पूर्वींच्या युगामध्यें वामनावतारांत काव्य म्हणजे शुक्राचार्य, जे सर्व

दानवांना आनंददायक असत, त्यांचा, [ रसादत्या ] रसा म्हणजे भूमी पाहिजे होती ह्मणुन शास्त्रविशारद अशा वामनानें फार विरस केला. परंतु ह्या कलियुगामध्यें त्याचें मन प्रसन्न झाल्यामुळें त्याची ( पूर्व युगांत झालेल्या मानहानीची ) भरपाई करण्याकरिता [ रसाधानं ] पुन्हां आतां रस उत्पन्न करण्याकरितां भव्य अशा तऱ्हेनें काव्यामध्य [ द्विजेंद्र-तिलक ] त्या ब्राह्मण श्रेष्ठानें म्हणजे वामन पंडितानें नवा नवा रस भरून टाकला कीं काय असें वाटतें. ( वामन पंडितांच्या काव्यपटुत्वावर ही उत्प्रेक्षा आहे. शेवटच्या ओळीचा एक अर्थ " भव्यतम काव्य निर्माण केलें कीं काय. " व दुसरा अत्यंत भव्य अशा ( काव्य ) शुक्राचार्यांना ( प्रोल्लासयामास ) उत्पन्न केलें कीं काय ? "

स्वबोधयुक्तिकौशल्यं वामनस्य महाद्भुतम् ।
गिरेरपि समुद्भूता येन चिद्घनता द्रुतम् ॥ ४११ ॥

वामन कवीचें आत्मज्ञान देण्याचें कौशल्य–म्हणजे बोध करण्याचें चातुर्य–कांहीं विलक्षण आहे. कारण, जो [ गिरि ] पासून म्हणजे पर्वता-पासून सुद्धां [ चिद्‌घनता ] चैतन्यज्ञान शीघ्र उत्पन्न करतो.

श्लेष—[ गिरि ] हें वामन पंडितांच्या पत्नीचें नाव होतें. तिला त्यांनीं बोध करून आत्मज्ञान दिलें हेंही प्रसिद्धच आहे.

वामनस्य गिरीशस्य चैकमत्यं तु सर्वथा ।
इत्याह वामनो भूत्वा स्वयमेव निदर्शनम् ॥ ४१२ ॥

वामन पंडितांचें विष्णु ( अर्थात वामन ) आणि [ गिरीश ] म्हणजे शंकर ह्यांचें सर्वतोपरी ऐक्यच आहे. ही गोष्ट शंकरांनीं स्वतःच वामन ( अर्थात वामन पंडित ) स्वरूप घेऊन लोकांस स्पष्ट सांगितली. कशावरून ? तरः—

श्लेष—वामनपंडितांच्या पत्नीचें नांव गिरि बाई होतें. तेव्हां गिरीचा जो ईश म्हणजे भ्रतार तो वामनपंडित झाला. अर्थात् [गिरीश] म्हणजे पार्वतीचा पति शंकर तो तोच होय. तेव्हां त्यांच्यांत भेद ता कोणता?

इह मुख्यकलोपेतो कोऽभवत्कविनायकः ।
इति मीमांस्यमाने तु मयूरेशः स्मरत्यलम् ॥ ४१३ ॥

पहिला अर्थ—ह्या लोकांत ( मुख्य+कला+ उपेत ) श्रेष्ठ कलेनें व काव्यचातुर्यानें युक्त असा कवि कोण झाला आहे ? ह्याचा विचार केला तर [ मयुरेश ] म्हणजे मोरोपंत कवि ह्याचीच आठवण होते.

दुसरा अर्थ—( मुख्य-क-लोप-इतिः ) मुख्य म्हणजे आद्य अक्षराच्या लोपानें झालेला असा [ कवि नायक ] म्हणजे महाज्ञानी कोण ? ह्याचा विचार केला तर [ मयुरेश ] म्हणजे [ गणपति ] असेंच वाटतें. कारण, शब्दावरूनही तोच अर्थ निघतो. [कविनायक] ह्यांतील [ क ] अक्षराचा लोप केला म्हणजे [ विनायक ] च राहतो.

आर्यार्पितमहानंदः सर्वलोककृतादरः ।
विराजते मयूरेशः कलाधरशिरोमणिः ॥ ४१४ ॥

पहिला अर्थ—आर्यांच्या योगानें महा आनंद देणारा, सर्व लोकांनीं ज्याचा आदर केला आहे असा [ कलाधर शिरोमणी ] कलाधरामध्यें म्हणजे कवीमध्यें श्रेष्ठ असा ' मयुरेश ' अर्थात मोरोपंतच शोभतो.

दुसरा अर्थ—[आर्यार्पित महानंदः] आर्या जी पार्वती तिला अत्यंत आनंद देणारा; सर्व लोकाच्या आदरास पात्र; ज्याच्या पूजनावांचून कोणत्याच मंगलकार्याला प्रारंभ होत नाहीं. आणि [ कलाधर शिरोमाणिः ] चंद्र आहे ज्याच्या मस्तकावर असा एक [मयुरेश] म्हणजे गजाननच शोभतो

अतिचित्रकलापाढ्यः सदारामपरास्थितिः ।
कारिकाजनितानंदो मयूरेशो विराजते ॥ ४१५ ॥

पहिला अर्थ–[ अतिचित्र कलापाढ्यः ] अतिविचित्र असें कलाप म्हणजे काव्य रचलें आहे असा; [ सदाराम परिस्थितिः ] निरंतर श्रीरामाच्या भक्तीनें युक्त; [ कारिका जनिता नंदः ] सूत्रबद्ध कारिका करून जो आनंद देणारा असा [ मयुरेश ] म्हणजे मोरोपंत कवि अत्यंत शोभतो.

दुसरा अर्थ—( अतिचित्रकलापाढ्यः ) आश्विन महिन्यांत अमावास्या चित्रा नक्षत्रीं होते. त्याच्यापुढें एक दोन नक्षत्रेंपर्यंत ( ह्य. कार्तिक शुद्ध २ च्या सुमारास, चंद्राची कोरच दिसणार हें उघड आहे.] चित्रा नक्षत्राच्यापुढें अवशिष्ट राहिलेला ( कलाप ) म्हणजे चंद्राची कोर, तिनें युक्त असा; ( सदाराम परिस्थितिः ) रामाची भक्ति करणारा जो सदाशिव त्याच्या सांनिध राहणारा, आणि ( कारिका जनितानंदः ) कालिका म्हणजे पार्वती तिला आनंद देणारा; असा ( मयुरेश ) म्हणजे गजानन हाही तसाच शोभतो.

तिसरा अर्थ—( अतिचित्रकलापाढ्यः ) अत्यंत चित्रविचित्र पिसाऱ्यांनीं युक्त; ( सदा–आराम–परिस्थितिः ) निरंतर रानावनांत राहणारा; ( कारिका जानेता नंदः ) मेघपंक्ति दिसूं लागल्या ह्मणजे आनंदयुक्त होणारा असा ( मयूरेश ) ह्मणजे मयूर पक्षीही मोठा सुंदर दिसतो.

श्रीकालिदासकविकीर्तिकलापमुच्चैः
कल्पामहे कथयितुं कथमल्पजल्पाः ।
काल्या यदी गुरुरिति प्रथितापि लोके
दासेन येन लघुतां गमिता बभूव ॥४१६॥

( अल्पजल्पाः ) बोलण्यांत वाकबगार नव्हेत, कवनामध्यें निपुण नव्हेत, अशा आम्हांसारख्या अकुशल लोकांनीं श्रीकालिदासाच्या ( कीर्तिकलाप–कीर्तीचाघोष ) हा ' उच्चैः ' जितक्या गौरवानें करावयास पाहिजे तितका विस्तृत करावयाला आम्ही कसे बरे समर्थ होऊं! कारण, कालीची (इ–श्री–वैभव) हें लोकामध्यें येवढें प्रसिद्ध असतां ही, एका तिच्या केवळ दासानें लघुत्वाला पोंचविलें–तिचें वैभवसुद्धां आपल्यापुढें किती ठेंगणें आहे तें दाखविलें.

श्लेष—( काली ) ह्यांतील ( ली ) हें अक्षर नेहेमीं दीर्घ असें पाहिजे. ती ' ली ' कालिदास ह्या शब्दामध्यें ऱ्हस्व झाली. अर्थात् कालीची ( इ ) ह्मणजे लक्ष्मी किंवा वैभव तें सुद्धां आपल्या वैभवापुढें कमी केलें असा भाव.

कालीच्या लीला जो ऱ्हस्व करी असुनि दास निजलीला।
कवितेला जागवुनि प्रकटुनि कवि कालिदास निजलीला ॥४१७॥

कालिदास हा खरोखर सेवक असूनही त्यानें आपल्या लीलेनें ह्मणजे कृतीनें कालीच्याही लीला ऱ्हस्व करून टाकल्या–फिक्यापाडल्या–कारण कालिदास कवीनें आपण प्रगट होऊन ह्मणजे जन्मास येऊन निजलेल्या कवितेला उठवून त्यानें जागें केलें.

श्रीकालिदासकविवर्यसरस्वतीयं
किं वर्णयाम्यतितरां रसवाहिनीति ।
यत्कालिका भगवती शुचिभावयोगा-
द्यस्यामहो मुहुरनुग्रहमादधाति ॥ ४१८ ॥

पहिला अर्थ—श्रीकालिदास कवि श्रेष्ठाची वाणी ही एक रसवाहीनी ह्मणजे नदीच आहे. ह्यापेक्षां तिचें आधिक वर्णन मी काय करूं ? कारण, तिच्यामध्यें भगवती जी काली देवी ती [ शुचिभावे ] शुद्ध भावनेनें वारं वार अनुग्रह करीत असते. तेव्हां तिला रसवाहिनी ह्मणूं नये तर काय ह्मणावें ?

दुसरा अर्थ—[ कालिका ] ह्मणजे मेघपंक्ति आणि [ शुचि ] ह्मणजे आषाढ [ तद्योगेन ] ह्मणजे आषाढ लागून मेघपंक्ति भरून आल्या ह्मणजे त्या मनमुराद वृष्टि करतात, तेव्हां नदी तुफान होते हें काय सांगितलें पाहिजे ? ( शब्दशः अर्थः—मेघपंक्ति आषाढांत नदीवर पुनः पुनः अनुग्रह करतील हें उघड आहे. )

उच्चावचपदार्थानां दर्शिका रसहारिणी ।
भारती भाति भव्यस्य भारवेर्भा रवेरिव ॥४१९॥

पहिला अर्थ—भारवीची कविता ही रस आकर्षण करणारी ह्मणजे रसांनें युक्त अशी असून उंच व नीच असलेले सर्व पदार्थ नीट दाखविणारी अर्थात् नानाविध पदार्थांची दर्शक-शब्दार्थांचें यथार्थ दर्शन करून देणारी-शब्दचमत्कार करून दाखविणारी अशी असल्यामुळें ती [ भा रवि ] सूर्याच्या कांतिप्रमाणेंच वाटते.

दुसरा अर्थ--सूर्याची कांति कशी? तर तीही उंच सखल पदार्थ दाखविते व रसाला ह्मणजे पाण्याला आकर्षण करून घेते--ह्मणजे शोषून घेते. त्याप्रमाणें भारवीचीही कविता आहे.

युक्तं तु नैमिषारण्ये शौनकाद्यैर्महर्षिभिः ।
वृतः पारयितुं सूतो हरिबद्धं मनोरथम् ॥ ४२० ॥

शौनकादि महर्षीसहवर्तमान सर्वांनीं अरण्यामध्यें [ हरिबद्ध मनोरथः ] हरिभक्ति करण्यासंबंधी जो मनोरथ तो सिद्धकरण्याला [ सूतो वृत्तः ] सूतालाच निवडून काढलें तें ठीकच आहे. कारण,

श्लेष--[ हरिबद्धमनोरथः ] मनोवेगानें जाणारा रथ आणि तो कसा? तर [ हरिबद्ध ] ह्मणजे घोडे जोडलेला. तेव्हां त्याला साह्यकर्ता [ सूत ] ह्मणजे सारथीच पाहिजे. त्याप्रमाणें मिळाला. तेव्हां तो रथ अधिक लौकर पल्ला गांठील ह्यांत शंका ती कशाची!

जायस्तमैस्तु शौनकमुख्यैर्मुनिभिर्वृतोऽभवत्सूतः ।
युक्तं पुराणवृत्तिर्बहुदोषभवोपतापशमनाय ॥ ४२१ ॥

• वृद्ध वृद्ध अशा शौनकादिक मुनींनीं पुष्कळ दोषांपासून उत्पन्न झालेला ताप शमन करण्याकरितां, पुराण सांगण्याचीच ज्याची वृत्ति आहे, अशा सूताला निवडून काढलें, हें यथायोग्यच होतें. कारण, [ सूत ] ह्याचा अर्थ पाऱ्याचें रसायन. आणि [ पुराणवृत्तिः ] तेंहीं अत्यंत जुनें रसायन असतें तें तीव्र असतें, व त्यानें गुण लौकर येतो. तेव्हां अशाची रोगशमन करण्याकरितां योजना केली, हें यथार्थच झालें.

पारं भवांबुधेर्गतुं शौनकाद्यैर्महर्षिभिः ।
सूतो वृतोऽभवद्यस्मात्सूतः पारद इष्यते ॥ ४२२ ॥

शौनकादिक ऋषींनीं संसारसागरांतून पार जाण्याकरितां सूताची निवड केली; त्यामुळेंच सूत ह्या शब्दाचा अर्थ [ पारद ] अर्थात् पारा असा होऊं लागला. तें कां? तर [ पार--द ] ( भवसागराचा ) परतीर गांठून देणारा ह्मणून.

बध्वाक्षिप्त इति ह्येष निमज्जतु भवांबुधौ ।
तच्चित्रं यत्पुनर्दैवाल्लब्धपोतोऽपि मज्जति ॥ ४२३ ॥

[ दुष्टाचें चरित निवेदन. ]

पहिला अर्थ—एखाद्याला हात बांधून जर भवसागरांत टाकून दिलें, आणि तो बुडून गेला, तर त्यांत कांहीं नवल नाहीं. पण प्रारब्धानें पोत ह्मणजे होडी मिळून सुद्धां लोक बुडतात हें मात्र आश्चर्य आहे!

दुसरा अर्थ--[ बध्वा-आक्षित्वा ] बध्वा ह्या ऐवजीं 'वध्वा' असें पद घेतलें आहे. कारण 'व' 'ब' ह्यांत भेद नाहीं. नवीन भार्या केलेली आहे, अशास्त्रीनें युक्त असला तर तिला टाकून त्याला जातां येत नाहीं. कारण, तो बायकोशीं बांधलेला असतो. तेव्हां नव्या स्त्रीनें आक्षेप घेतलेला असा मनुष्य बुडाला तर बुडो, परंतु [ लब्ध पोतः ] ह्मणजे मुलगा झाल्यानंतर सुद्धां तो जास्तच बुडतो, हें मात्र अत्यंत आश्चर्य आहे खरें. 'पोत' ह्मणजे नौका असा दुसरा अर्थ आहे. पुत्ररूपी नौका मिळाली तरी त्याची संसारावरची आसक्ति जांस्त होऊन तो भवसागरांत अधिकच बुडतो हें आश्चर्य आहे. असा भाव.

यत्तु भगवदपराधस्थितिमत्सदहो जघन्यकर्मरतम् ।
तत्र निलयममत्वं युक्तं चित्रं तदन्यत्र ॥ ४२४ ॥

पहिला अर्थ---भगवंताचा अपराध केला आहे, अशा स्थितीनें युक्त, आणि हातानें नीच कर्में केलेलीं असलीं ह्मणजे [ निरय ] नांवाच्या नरकामध्यें मग्न होणें हेंच यथायोग्य आहे.

दुसरा अर्थ--[ यत्तु भगवतः ] × × × × [ अपराधस्थितिमत् ] पुरुषाच्या खालीं राहून [ जघन्यकर्मरतम् ] + + अशा स्त्रीला [निलय] ह्मणजे घरांत राहाणेंच उक्त आहे. परंतु पुरुषानें त्यांत बुडून जाणें हें विचित्र होय.

परदाररतिः फलाभिसंधिर्बहुदंभो भगकामना ममत्वम् ।
चरितं मुहुरीदृगस्मदीयं कथमपवर्गरसस्य भाजनं स्मः ॥ ४२५

[ परदाररतिः ] परस्त्रीचा संग [ फलाभिसंधि ] फळावर दृष्टी;

[ बहुदंभ ] ढोंगाची रेलचेल; आणि [ भगकामना ] ह्मणजे विषयेच्छा इत्यादिकांनीं युक्त असें आमचें चरित असतें. मग आम्ही मोक्षाला पात्र कसे होणार ?

श्लेष—वरील सर्व गुण [ प ] वर्गांतील आहेत. तेव्हां पवर्गांतील मनुष्य [ अपवर्गाला ] ह्मणजे मोक्षाला पात्र कसा व्हावा ? होणार नाहीं हें उघडच आहे.

कांतं रघुकुलतिलकं सर्वजगत्पालकं विहाय जनः ।
अनुसरति नरं कांतं नानाकष्टाश्रयं शिव शिवायं ॥ ४२६ ॥

लोक हे अत्यंत तेजस्वी, दयायुक्त असा सर्व जगाचा पालक जो श्रीरामचंद्र त्याला सोडून [ क ] ज्याच्या अंतीं आहे अशा नराचा, जिवाची आटापीट करून ( त्याला आपला स्वामी ) आश्रय करतात. शिव शिव ! ह्याला काय म्हणावें ?

श्लेष—रघुकुलतिलक हा जगत्पालक असून कांत आहे म्हणजे ह्या प्रत्येक शब्दाच्या शेवटीं ( अंतीं ) 'क' आहे. अशा ह्या खरोखरीच 'कांत' असलेल्या श्रीरामाला सोडून जो 'नर' कांत (अर्थात् स्वामी) केला असतां पक्षीं—'क' हें अक्षर पुढें जोडलें असतां नरक ( असा वाईट शब्द ) बनतो त्या 'नरा'ची सेवा करितात !

कोऽयं हंत महामोहग्रस्तचित्तोऽखिलो जनः ।
अर्थस्यार्थे कदर्थः सन्परमार्थं त्यजत्यहो ॥ ४२७ ॥

अरेरे ! हे सर्व लोक मदमोहानें किती हो ग्रस्त झाले आहेत ! कारण अर्थाकरितां म्हणजे पैशासाठीं [ कदर्थः सन् ] स्वतः याचक बनून परमार्थाला सोडून देतात. अर्थाकरितां स्वतःची किंमत कमी करून घेऊन तिरस्कृत होऊन परमार्थ सोडून देतात. तेव्हां त्यांचा मूढपणा काय विचारावा ? पक्षीं—ह्यांना मिळवायाचा असतो अर्थ ( पैसा ) परंतु परमार्थ ह्म. खरा अर्थ (मोक्ष हीच खरी संपत्ति आहे ती) सोडून ते कदर्थ (वाईट अर्थानें युक्त ) होतात.

दानं तपो मख इति त्रितयं पवित्रं नेतुं क्रमादमृतधाम गतिं क्षमंसत् ।
तत्कामदोषकलुषं पुरुषा विधाय प्रायः सुरालयगतिं स्पृहयंति हंत ४२८

यज्ञ, ज्ञान आणि तप हीं तिन्हीही पवित्र असून तीं क्रमानेंच [ अमृतधामाला ] म्हणजे मोक्षाला नेणारीं आहेत. असें असतां हाय हाय ! मनुष्य हें बहुतकरून [ कामदोषानें कलुषित होऊन ] म्हणजे फलेच्छा धरून किंवा सकाम कर्म करून [ सुरालयगती ] चीच म्हणजे स्वर्गाचीच इच्छा करतात!

श्लेष—[ सुरा–आलय–गति ] सुरा म्हणजे दारू. तिचें आलय म्हणजे पिंठा, त्यांत झिंगण्याचीच इच्छा करतात ह्मणावयाचें !

दानं तपो मख इति त्रितयं पवित्रं स्वानुष्ठितं परमहंसगतिं ददाति ।
तत्कामदोषकलुषं पुरुषा विधाय प्राणेन कौशिकगतिं वत कामयंते ४२९

यज्ञ, दान आणि तप ह्या तीन पवित्र कर्मांचें चांगल्या रितीनें अनुष्ठान केलें असतां, परमहंसाची गति प्राप्त होते. परंतु पुरुष हे कामदोषानें तीं कलुषित करून ह्मणजे फलेच्छा धरून 'कौशिकगति' ह्मणजे इंद्राच्या गतीची-स्वर्गाची-इच्छा करतात !

श्लेष—[ कौशिक ] ह्मणजे घुबड. घुबडाच्या गतीचीच इच्छा करतात, ह्मणजे अज्ञानांधकारांतच कुचमत राहतात हें तात्पर्य.

दिव्यागमोदितमहो हारितत्त्वमत्र यो नाभिनंदाति जनः कृपणस्तमेनम् ।
वक्तुं त्रपे पशुमपीति तृणोदिते तद्यत्पश्यपश्य पशवः कियदाद्रियंते४३०

जो मनुष्य कृपणपणामुळें, ह्मणजे मनाच्या संकुचितपणामुळें दिव्य अशा वेदांनीं सांगितलेलें, किंवा चांगल्या शास्त्रांत सांगितलेलें [हारितत्त्व] ह्मणजे हरीची भक्ति, हिचें अभिनंदन करीत नाहीं, स्वीकार करीत नाहीं त्याला [ पशु ] असें ह्मणावयाला सुद्धां लाज वाटते. कारण पशु हे तृणापासून केवळ तुच्छ पदार्थापासून उत्पन्न होणारें [ हारितत्त्व ] ह्मणजे हिरवळ, त्याचा केवढा बरें आदर करतात ? परंतु हा मनुष्य ( सारासार विचारयुक्त ) असूनही वेदांतून सांगितलेलें हरितत्त्व ( हरिभक्ति ) करीत नाहीं.

विठ्ठले निर्विकारेऽस्मिन्विपरीतमतिस्तु यः ।
कोऽसौ केवलमित्येतन्महाराष्ट्रान्विचारय ॥ ४३१ ॥

[ निर्विकार ] ह्मणजे परब्रह्म जो [ विठ्ठल ] त्याच्या ठिकाणीं ज्याची [ विपरीत ] ह्मणजे उलट बुद्धि होते, तो कोण होतो ? हें महाराष्ट्रांतील लोकांना विचारावें ह्मणजे झालें.

श्लेष—[ विठ्ठल ] हा [ निर्विकार ] ह्मणजे त्यांत [ वि ] हें अक्षर नाहीं असा. ह्मणजे बाकी [ ठ्ठल ] राहिलें त्याच्या ठिकाणीं विपरीत ह्मणजे उलट भावना, अर्थात् तो शब्द उलट केला ह्मणजे [लठ्ठ] असा होतो, आणि महाराष्ट्र भाषेंत जो केवळ [ ढंढण्णा ] व धष्टपुष्ट असतो त्यालाच [ लठ्ठ ] असें ह्मणतात !

मत्तः सन्यो हरिं द्वेष्टि महिषः स हि पूरुषः ।
स नाम नैव कालेनाधिष्ठितः कथमुच्यताम् ॥४३२॥

जो मनुष्य मत्त होऊन हरीचा द्वेष करतो; तो महिषच ह्मणावा. मग तो कालानें ह्मणजे मृत्यूनें अधिष्ठित झाला नाहीं, त्यावर मृत्यूचा पगडा बसला नाहीं असें कसें होईल ? तो मृत्यूच्या तडाक्यांत सांपडलाच पाहिजे.

श्लेष—[ हरि ] ह्मणजे सिंह. गायीचा आणि व्याघ्राचा जसा द्वेष, तसाच सिंहाचा व महिषाचा द्वेष ह्मणजे नित्य वैर असतें. तेव्हां महिष हा नेहमीं सिंहाचा द्वेष करतो आणि अखेर मृत्यूच्या तडाक्यांत सांपडतो. कारण महिष ह्मणजे रेडा हें बोलूनचालून मृत्यूचें ह्मणजे यमाचें वाहनच आहे. तेव्हां तो मृत्यूनें अधिष्ठित झालाच पाहिजे.

यो जातप्रत्ययः स्वार्थे यश्चाल्पो यश्च कुत्सितः ।
नरास्त्रयस्ते नरकास्तत्संगं दूरतस्त्यजेत् ॥ ४३३ ॥

[ योजातप्रत्ययः स्वार्थे ] स्वार्थापुरतेंच ज्याला ज्ञान झालेलें आहे. [ यश्चाल्पो ] जो अल्पमति—हलक्या बुद्धीचा आणि [ कुत्सित ] दुष्ट स्वभावाचा. ह्या तीन जातींचे पुरुष नरकच ह्मणावयाचे. त्यांच्या संसर्गापासून नेहमीं दूरच असलें पाहिजे.

श्लेष—पाणिनीनें ( स्वार्थे अल्पे कुत्सिते चार्थे कप्रत्ययोनिहितः ) ' नर ' ह्या शब्दास ' क ' प्रत्यय लागला असतां ' स्व त्व ' ( उ. नर म्हणजेच नरक अर्थात् ' नरक ' ह्याचा एक अर्थ ' नर ' अथवा मनुष्य) अल्पत्व ( अल्पसा नर तो ' नरक ' ) व कुत्सितत्व ( कुत्सित अथवा वाईट मनुष्य तो ' नरक ' ) असे तीन अर्थ होतात असें ह्मटलें आहे. त्यावरून श्लेषार्थानें ( स्व–अर्थी ) जो नर तोही ( नरक ) होय. (नर एव नरकः ) आणि ( अल्पनरः) नरक हे तिन्ही प्रकारचे पुरुष ह्मणजे ( नर ) नव्हेत, तर ( नरक ) होत. नर ह्या शब्दापुढें ' क ' प्रत्यय लावला ह्मणजे ' नरक ' हा शब्द झालेला स्पष्टच दिसतो.

सुवृत्तदर्शिनां बाह्येऽभ्यंतरे कठिनात्मनाम् ।
बहुधान्योपमर्दाय खलानां दृश्यते स्थितिः ॥ ४३४ ॥

' खळ ' ह्मणजे दुष्ट आणि धान्य वगैरे मळण्यासाठीं जें शेतांत ' खळें ' करतात तें. हीं दोन्हीं सारखींच आहेत, कशीं तीं पहा—

पहिला अर्थ—( खळें ) कसें असतें ? तर ( सुवृत्तदर्शिनां बाह्ये ) दिसण्यांत वाटोळें गरगरीत; ( अभ्यंतरे काठिणताम् ) आंतून कठीण; ( बहुधान्योपमर्दाय ) पुष्कळसें धान्य ज्यांत मळलें जातें असें.

दुसरा अर्थ—आतां ' खळ ' ह्मणजे दुष्ट कसा असतो ? तर ( सुवृत्तदर्शिनां बाह्ये ) बाहेरून दिसण्यांत मोठा सभ्य; ( अभ्यंतरे काठिणताम् )परंतु आंतून शुद्ध पाषाणहृदयी-निर्दय. (बहुधा अन्य उपमर्दाय) दुसऱ्याचा उपमर्द करण्याविषयींच ज्याचें अस्तित्व असा खळ. तेव्हां खळ आणि खळें ह्या दोघांची स्थिति सारखीच असते.

अपकारस्य जनका उपकारविलोपकाः ।
पुरुषा न ततोऽन्ये तु दृश्यंते कठिना मम ॥ ४३५ ॥

( अपकारस्य जनकाः ) अपकार करणारे आणि ( उपकारविलोपकाः ) उपकार न स्मरणारे असे जे पुरुष असतात, त्यांच्यापेक्षा अधिक ( कठोर ) कठोर पुरुष मला तर कोणी दिसत नाहींत.

दुसरा अर्थ—श्लेष (अपकारस्य जनकाः) अकारयुक्त पकार उत्पन्न करणारे; व (उपकारविलोपकाः) आणि उकार व पकार ह्यांचा लोप करणारे जे पुरुष असतात ते अत्यंत कठिण होत. 'अकारयुक्त पकार' ह्मणजे (प) आणि (उ) ह्यांचा विलोप करणारे ह्मणजे (पुरुष) ह्या शब्दांतील (पु) या अक्षरांतील (उ) कार काढून टाकून अकार-युक्त पकार केला ह्मणजे (परुष) असा शब्द होतो, [परुष] ह्मणजे कठीण--निर्दय असा अर्थ. तो शब्दरचनेवरूनही निघतो. मग प्रत्यक्ष तो तसाच असेल ह्यांत नवल तें काय ?

परस्परमतिप्रेमरसेनाश्लिष्टयोर्द्वयोः ।
सन्निविश्यांतरं कर्तुं बालिशः पंडितायते ॥ ४३६ ॥

परस्परांशीं दृढतर प्रेमानें बद्ध असलेल्या दोघांमध्यें शिरून त्यांना दूर करण्यांत, वैर उत्पन्न करून विघ्न आणण्यांत [बालिश] ह्मणजे मूर्ख ह्याच काय तो पंडित होय.

श्लेष–[बालिश] ह्मणजे मूल. मातापितरांच्या आलिंगनामध्यें विघ्न आणण्यांत मूलही कुशल ह्मणजे पटाईत असतें !

ओषधीशोऽमृतकरः सन्नपींदुः क्षयार्दितः ।
न हि प्रतिक्रियासंपत्सिद्धिर्दोषाकरे भवेत् ॥ ४३७ ॥

चंद्र कसा आहे ? तर [औषधिशः] वनस्पतींचा आधिपति. पक्षीं वैद्यही आहे; आणखी कसा ? तर [अमृतकरः] सुखकारक आहे. अमृत तर त्याच्या हातांत आहे. असें असतांही [क्षयार्दितः] तो क्षय-रोगानें त्रस्त झालेला दिसतो ! ह्याचें कारण काय ? तर तो [दोषाकर] ह्मणजे रात्र करणारा; पक्षीं सर्व पातकांची खाण आहे. आणि पातकांचें [प्रातीक्रिया संपत्सिद्धि] क्षालन करण्याचा उपाय कोणालाही सांपडत नसतो. अर्थात् पुण्याईचा यत्किंचितही सांठा नाहीं, आणि पदरीं पुण्याई असल्याशिवाय केवळ औषधी जवळ असल्यानें किंवा हातांत अमृताचा सांठा असूनही व्यर्थ होय. हें चंद्राच्या उदाहरणावरू स्पष्ट होतें.

मा खिद्यस्व यदि खलो बहुपचरितोऽपि नोपकुरुत इति ।
गरलमलंकृतमपि किं कथय सखे स्वस्वभावमुत्सृजति ॥ ४३८

अरे बाबा! खलांची म्हणजे दुष्टांची हवी तितकी सेवा केली तरी, तो कधीं उपकार म्हणून करित नाहीं, ह्याबद्दल खेद करीत बसूं नकोस. कारण [ गरल ] ह्मणजे विष, ह्याच्यावर कितीही संस्कार केले तरी, तें आपला स्वभाव सोडील काय? सांग.

श्लेष--[ अलंकृतमपि ] अ-लं-कृतम् लकारानें विरहित केलें तरी ह्मणजे [ ल ] कार काढून टाकला तरी ते जसेच्या तसेच राहतात: ह्मणजे गरल ह्या शब्दांतलि ल काढला तरी [ गर] राहतें म्हणजे पुन्हा विष तें विषच. त्याचप्रमाणें [ खल ] शब्दांतलि [ ल ] काढून टाकला तर बाकी [ ख ] म्हणजे पूज्यच ! त्याला कांहींच नाहीं.

कौटिल्यं शिथिलांतरत्वमपि सद्वृत्तत्वहानिं परं
पातित्यं वितनोति बालिशजनस्येह प्रसंगो नृणाम् ।
तादृग्बालिशदूषितस्य न पुनः शर्मप्रदः संस्तवः
प्रत्यक्षं तु न चैव पंकजदृशां वृक्षोरुहद्वंद्ववत् ॥ ४३९ ॥

पहिला अर्थ—मनुष्यांना [ बालिश ] म्हणजे मूर्ख जनांची संगतिही कुटिलपणा, मनाचें शिथिलत्व, सदाचाराची हानि आणि पतन हीं आपोआपच उत्पन्न करते. आणि अशा मूर्ख जनांच्या संगतीनें दूषित झालेल्या मनुष्याची संगति [ शर्मप्रद ] ह्मणजे कल्याणप्रद होत नाहीं. कोणासारखी? तर [ पंकजदृशस्तनवत् ] कमलनयन तरुणींच्या स्तनाच्या उदाहरणांत तर हें प्रत्यक्षच दिसून येतें.

दुसरा अर्थ—[ बालिश ] म्हणजे लहान मूल. हें मातेच्या स्तनाची अग्रें धरून तीं चोखतें यामुळें तीं मोठीं होतात. त्यांतील कठिणपणा जाऊन तीं शिथिल होतात आणि बालाशीं त्यांचा प्रसंग झाला असतां [ सद्धवृत्तहानि ] ह्मणजे वाटोळेपणाही मोडतो, आणि तीं खालीं पडून लोंबूं लागतात. त्यामुळें त्यांना विद्रूपता येते आणि तीं पुरुषांनाही [ शर्मप्रद ] ह्मणजे सुखकारक होत नाहींत.

सदासि चमत्कारकरश्चतुरतरश्चित्रबाणसंधाने ।
कोशधरोऽप्यर्थपरो रसेश्वरो जगति जयति कविराजः ॥ ४४०

पहिला अर्थ—सभेमध्यें चमत्कार करणारा, चित्रविचित्र शब्दरचनेंत चतुर; [ **कोशधर** ] अमरकोशादि सारे कोश मुखोद्गत असणारा; [ **अर्थपर** ] निरानिराळे अर्थ करण्यामध्यें निपुण; [ **रसेश्वर** ] कवितेंतील नव रसांवर ज्याचें प्रभुत्व असतें अशा कविराजाचा जयजयकार असो.

दुसरा अर्थ—कारण [ **सत्-असि** ] चांगल्या तरवारीच्या फेंका करणारा; [ **चित्रबाण संधाने** ] बाण मारण्यामध्यें पटाईत [ **कोशधरः** ] खजिना ज्याच्यापाशीं रगड आहे असा; [ **अर्थपरः** ] पैसा मिळविण्यामध्यें तरबेज; [ **रसेश्वरः** ] असा पृथ्वीपति असेल, त्याचा जयजयकार असतोच त्याप्रमाणें कवीचाही असलाच पाहिजे.

मथ्नंतु परमप्रेण्मा सारस्वतरसं मुहुः ।
यो मंदरागमथितोऽप्यसूत परमामृतम् ॥ ४४१ ॥

पहिला अर्थ—[ **मथ्नंतु परमप्रेम्णा** ] लोकांनीं पुनः पुन्हा मोठ्या आवडीनें मथन करून [**सारस्वतरसं**] वाङ्मयातील रस काढीत असावा. कारण, ( **मंद-राग-माथितापि** ) थोडक्याशा जोरानें जरी त्याचें मंथन केलें तरी तो परमामृत म्हणजे [श्रेष्ठ अमृत असें] आत्मज्ञानच उत्पन्न करतो.

दुसरा अर्थ—( **सारस्वतः** ) सरस्वती अर्थात नद्या ज्याला मिळत अशा समुद्राचें पाणी ( **मंदर-अग-मथितः** ) मंदर पर्वताची रवी करून मंथन केल्यानें जर अमृत उत्पन्न झालें, तर सारस्वताच्या मंथनानें परमामृत उत्पन्न होईल ह्यांत नवल तें कोणतें?

सरस्वती सद्युवती सत्कवीनां च भारती ।
प्रवर्तते गूढरसाः सज्जनानंददायकाः ॥ ४४२ ॥

( **सत्कवीनांचभारती** ) सरस्वती ही सत्कवींची वाणी आहे ती चांगल्या ( शृंगारादी ) रसांनीं युक्त असते. आणखी ती ( **सद्युवती** ) एखाद्या सुंदर स्त्रीसारखीच आहे. कारण, ( **सज्जनानंददायका** ) तिच्यापासून सज्जनांना आनंद देणारे असे रस ( **प्रवर्तते** ) उत्पन्न होतात.

दुसरा अर्थ—सरस्वती ही नदीसारखी आहे व तिच्यांतही ( गढ-रसाः ) ह्मणजे खोल पाणी असून तीही सज्जनांना आनंददायकच आहे.

तिसरा अर्थ—सरस्वती ही एखाद्या सुंदर स्त्रीप्रमाणेंच आहे. व तिच्यापासून ( गूढरस ) एकांतांतील रतीपासून होणारा आनंद म्हणजे काव्यांतलि नवरस उत्पन्न होतात, व तीही सज्जनांना आनंददायकच होते.

समलंकृताऽपि बहुधा सुगुणैरनुरंजिताऽपि नोपैति ।
कविना न विना श्लेषं कविता वनिता च सुरसभारतित्वम् ४४३

कविता आणि वनिता म्हणजे स्त्री ह्या दोन्हीही सारख्याच आहेत. 'कशा ? तर—

पहिला अर्थ—स्त्री कशी ? ( समलंकृतापि ) साखळ्या, वाळे, टिका, ठुशा, काप, बाळ्या इत्यादि कितीही दागदागिने घातले, ती ( सुगुणैः अनुरंजितापि ) शृंगारचेष्टांनीं कितीहि प्रसन्न झाली तरी, ( आश्लेषं विना ) आलिंगनाशिवाय तिच्या मनाला खरी प्रसन्नता येत नाहीं.

दुसरा अर्थ—आतां कविता कशी ? तर उपमा, उत्प्रेक्षा वगैरे कितीही अलंकार तींत असले, प्रसाद वगैरे गुणांनीं ती युक्त असली तरी [विना-श्लेषं ) तिच्यांत कांहींतरी श्लेष साधल्याशिवाय खरी मनाची तृप्ती होत नाहीं.

कवयः कुरुत सुकाव्यं नानालंकारसंकुलं तादृक् ।
येन श्रुतेन जात्वपि न भवेत्सत्हृदयमनस्यलंकारः ॥ ४४४ ॥

अहो ! कवि हो ! (नाना अलंकारसंकुलम्) नानाप्रकारच्या अलंकारांनीं खचलेलें असें सत्काव्य करा, कीं जें ऐकिलें असतां सहृदयांच्या मनामध्यें कधींच ( न अलंकारः ) म्हणजे कधींच तृप्ती होऊं नये. तें पुनः पुन्हां ऐकावेंसेंच वाटावें.

अलंकारसंकुल असेंही सत्काव्य 'अलंकार' रहित करणें हें अर्थात् दुर्घट. व तें सत्कवीशिवाय दुसऱ्यास साधणार नाहीं हा भाव.

न द्विष्मो द्विजराडसाविति धिया दोषाकरोऽप्येष सन्
सो यं त्वत्र बुधाय किं च कवये मह्यं जडो द्रुह्यति ।

इत्थं रुष्ट इवावतीर्य बहुधैनं न्यक्करोतीव किं
राज्ञां सद्यशसा मुखैरपि नखैः स्त्रीणां ज़ितोऽसाविति ॥ ४४५

चंद्र हा जरी दोषाकर आहे; अज्ञान [redacted] उत्पन्न करणारा आहे; किंवा दोषांची खाण आहे, तरी तो ( द्विजश्रेष्ठ आहे ) खराखुरा ब्राह्मण आहे. ह्मणून आम्ही कांही त्याचा द्वेष करित नाहीं. चंद्राचे द्वेष करणारे फल· ज्योतिषांत कोणी ग्रह नाहींत. सर्व ग्रहांची सुद्धां त्याच्याशीं मैत्रीच असते. परंतु शुक्र व बुध ह्मणतात कीं तो मात्र आमचा द्वेष करतो. ( शुक्र व बुध ह्यांच्याशीं चंद्राची मैत्री नाहीं.) कारण तो स्वतः (जड=जलमय–) मंदबुद्धि असा असल्यामुळें शुक्राचा म्हणजे कवीचा आणि बुधाचा म्हणजे शहाण्याचा द्वेष करतो. ह्मणून रागारागानें ह्या भूतलावर ( कवि व बुध ) ह्यांनीं ( श्लेष पक्षीं कवींनीं व शहाण्या लोकांनीं ) अवतार घेऊन त्याचा पाणउतारा करण्यासाठीं–त्याचा सूड उगाविण्यासाठीं··राजाच्या चांगल्या यशानें व स्त्रियांच्या मुखानें व नखांनीं तो जिंकलेला असतो-फिका पडतो-असें वर्णन केलेलें आढळतें !

भृशं दोषाहर्षं भजति न च निद्रां वितनुते
विधत्ते बालानां नवमुदमलंकाररचनैः ।
प्रियो यः प्रौढानां नवरसनिबंधैकनिपुणः
सदा श्लेषैस्तुष्टो जयति सुकविर्जारसदृशः ॥४४६॥

चांगला कवि जारासारखा आहे. कसा तें पहाः—

पहिला अर्थ—कवि कसा ? ( भृशं दोषा अहर्षं भजति ) ज्याला दोषांचें दुःख होतें. म्हणजे तो दोष टाळतो. ( नच निद्रां वितनुते ) तो कधीं निद्रा घेत नाहीं; दोष टाळण्याकारितां डोळ्यांत तेल घालून बसतो. ( नवमुदम्–अलंकाररचनैः ) यमक जुळविण्याच्या खटपटींत अलंकाराच्या चंचलतेच्या योगानें ( विधत्ते बालानां ) अज्ञानी लोकांना मोठा संतोष देतो आणि ( प्रियोयः प्रौढानां ) आणि जे प्रौढ आहेत, ज्ञाते आहेत ( नवरसनिबंधैकनिपुणः ) त्यांनाही शृंगारादि नऊ रसांची रचना करण्यामध्यें कुशल असल्यामुळें प्रिय होतो, आणि सदा ( श्लेष-

स्तुष्टो )श्लेष साधला म्हणजे त्याला मोठा संतोष होतो, अशा प्रकारें जाराप्रमाणें असणारा जो कवि त्याचा जयजयकार असो.

दुसरा अर्थ—आतां जार कसा असतो ? तर हुबेहुब तसाच. ( भृशं दोषाहर्षे ) रात्रीमध्यें सुख घेतो, ( नच निद्रां वितनुते) रात्रीची झोंप घेत नाहीं. संधीची वाट पहात बसतो, ( नवमुदम् अलंकाररचनैः) तरुण स्त्रीच्या सुरत चातुर्यानें ज्याला आनंद होतो आणि प्रौढ स्त्रियांच्या नवरस कौशल्यानें त्यांना प्रिय होतो. आणि ( सदा–आश्लेष--स्तुष्टः ) सदा आलिंगन दिल्यानेंच ज्याला संतोष होतो. तेव्हां जाराची वागणूक आणि कवीची वागणूक सारखीच होय.

अभ्युत्तिष्ठति यां प्रति द्रुततरं लोम्नां गणः सादरं
कर्णावर्पयतः सुखासनमथो पाद्यादिपूजाविधिम् ।
नेत्रे कल्पयतः, स्तवीति वदनं, यां साधुवादैर्मुहुः
सा साध्वी कविता जगत्सु विदिता मान्यातिधन्यात्मनाम् ४४७

कवितारूप साध्वी ही जगामध्यें अति धन्य पुरुषांना मान्य आहे, हें जगाला माहीतच आहे. जी कविता ऐकली असतां ( लोम्नां गणाः ) अंगावर थरारून रोमांच उभे राहतात, कान हे तिला सुखासन देतात, नेत्र हे तिची पादपूजा करितात--म्हणजे अश्रुधारा वाहतात. वदन हें जिला ( साधुवाद ) म्हणजे धन्य धन्य म्हणतें. अशी ही साध्वीरूप कविता मान देण्याला योग्यच आहे.

महांतं कौशल्यव्ययमिह विधायैव विहिता
विचित्रा सावर्णी विविधसदलंकाररचना ।
यदेषा सर्वेषां प्रियकरणसाद्गुण्ययुगपि
प्रसादश्चेन्नैकः सकलजनतोषं न तनुते ॥४४८॥

पुष्कळसें कौशल्य खर्च करून जरी केलेली असली, तिच्यांत कितीही वैचित्र्य साधलेलें असलें, ती ( सौवर्णी )म्हणजे चांगल्या प्रकारच्या अक्षर रचनेनें युक्त असली, हवीं तितकीं यमकें आणलेलीं असलीं, नानाप्रकारच्या अलंकारांनीं खचलेली असली, तसेंच सर्वांना प्रियकर होण्यासारख्या

गुणांनीं युक्त अशी जरी कविता असली तरी तींत जर एक प्रसाद नसेल तर ती सज्जनांना संतोषकारक होत नाहीं. श्लेषार्थः--कितीही कौशल्य खर्च करून निरनिराळ्या प्रकारचे सुवर्णालंकार एखाद्या सोनारानें केले व ते सर्वांना जरी प्रिय--हवे असले तरी ( **प्रसाद** ) सरते शेवटची झिलई दिल्याशिवाय सर्वांना संतोषकारक होत नाहींत. तशीच कविता प्रसादाशिवाय व्यर्थ होय.

**यो मूढो गुणदोषचिंतनविधौ स्वच्छंदसा यद्गति-**
**र्न स्वप्नेऽपि सुवर्णसंग्रहपरव्यापारविद्धांतरः ।**
**सच्छब्दान्विजहाति यः स कुकविर्वेदांतवित्तुल्यतां**
**यायादेकमसौ निरंतरतया सेवेत चेत्सद्रसम् ॥४४९॥**

वाईट कवि जर ब्रह्मानंदरस--चांगल्या कवितेंतील रस--निरंतर सेवन करील तर तो वेदांत्याशीं तुलना पावेल.

**पहिला अर्थ**--वेदांती कसा असतो ? तर ( **यो मूढो गुणदोषचिंतनविधौ** ) दुसऱ्यामध्यें गुण काय आहेत आणि दोष काय आहेत ह्याचा विचार करण्यामध्यें पूज्य; ( **स्वच्छंदसायद्गतिः** ) मनास येईल तसें भटकावयाचें. ( **न स्वप्नेपि सुवर्णसंग्रहपरव्यापारविद्धांतराः** ) कांहीं द्रव्य संग्रह करावयाचें काम करावें ही गोष्ट कधीं स्वप्नांत सुद्धां यावयाची नाहीं, ( **सच्छद्बान्विजहाति** ) चांगलें बोलावयाचें ज्याला ठाऊकच नसतें. असा एखाद्या कुकवीसारखा वेदांती असतो, पण तोच जर निरंतर सद्दढ ब्रह्मज्ञानाचा अनुभव घेत राहील तर तितक्या साऱ्यावरही पाणी पडतें.

**दुसरा अर्थ**--आतां वाईट कवि कसा असतो ? तर ( **यो मूढो गुणदोषचिंतनविधौ** ) कवितेंमध्यें गुण कोणते आणि दोष कोणते, हें समजण्याच्या कामीं शुद्ध ढ; ( **स्वच्छंदसायद्गतिः**) आपल्याला हवीं तशीं वृत्तें, गण, मात्रा दडपून द्यावयाच्या. छंदःशास्त्र ज्याला मुळीं अवगत सुद्धां असावयाचें नाहीं. ( **न स्वप्नेपि सुवर्णसंग्रहपरव्यापारविद्धांतराः** ) चांगले शब्द कसे आणावेत, व यमकें कशीं जुळवावींत हें कौशल्य तर

त्याच्या स्वप्नांत सुद्धां येत नाहीं. ( सच्छब्दान्विजहाति ) चांगले चांगले शब्द असतील ते वर्ज्य करावयाचे. इतकें असलें तरी त्या कवितेंत जर एक प्रसाद असेल तर इतक्यावरही पाणी पडतें.

**अनर्थपदपूरिता रुचिरवृत्तहीनाऽपि यां**
**श्रयंति किल कौरवा गुरुतिरस्कृता याऽनिशम् ।**
**सुयोधनमतिस्तथा कुकविता तयोरुत्तमा**
**मतिर्मम मता यतो भवति कर्णसंतोषदा ॥ ४५० ॥**

वाईट कविताही दुर्योधनाच्या बुद्धिसारखी आहे, इतकेंच नव्हे तर, तिच्यापेक्षां दुर्योधनाची बुद्धीच पुष्कळ बरी असें वाटतें. कशी तें पहाः—

**पहिला अर्थ**—दुर्योधनाची बुद्धि कशी होती ? तर [ **अनर्थपदपूरिता** ] अनर्थकारक गोष्टींनीं भरलेली; आणखी [**रुचिरवृत्तहीनापियां**] जिची वागणूकही चांगली नाहीं अशी; [ **श्रयंति किल कौरवाः** ] साऱ्या कौरवांना म्हणजे दुष्ट लोकांना आश्रय देणारी; [**गुरुतिरस्कृता यानिशम्**] द्रोणाचार्यासारख्या गुरुश्रेष्ठांनींहि जिचा निरंतर तिरस्कार करावयाचा; अशी होती तरी कुकवितेपेक्षां ती दुर्योधनाची बुद्धीच बरी असें मला वाटतें. कारण, दुर्योधनाची बुद्धि कर्णाला तरी संतोष देणारी होती.

**दुसरा अर्थ**—आतां वाईट कविता कशी ? तर [ **अनर्थपदपूरिता**] ज्यांतून कांहींच अर्थ निष्पन्न व्हावयाचा नाहीं, किंवा अर्थाचा अनर्थ व्हावयाचा, ह्मणजे विपरीत अर्थ उत्पन्न व्हावयाचा अशा शब्दांनीं भरलेली; [ **रुचिरवृत्तहीनापि या** ] चांगलासा छंद किंवा वृत्तही असावयाचें नाहीं. असलेंच तर सारे छंदोभंग; आणखी कशी ? [ **श्रयंति किल कौरवान्**] कर्णकटु शब्दांनीं भरलेली; [**गुरु तिरस्कृता यानिशम्**] मोठमोठ्या लोकांनीं नेहमीं नाकें मुरडावींत; अशी. आतां फक्त दुर्योधनाची बुद्धि [ **कर्णसंतोषदा** ] म्हणजे कर्णाला तरी संतोष देणारी होती, तशी जरी ही वाईट कवीची कविता असती तरी बरें होतें. परंतु ही कशी आहे ? तर कर्णाला ह्मणजे कानांना सुद्धां ( **असंतोषदा** ) असंतोष देणारी, अर्थात् [ **कर्णकटु** ] ह्याकरितां कुकवितेपेक्षां दुर्योधनाची बुद्धीच पुष्कळ बरी असें आह्मांस वाटतें.

सर्वदानवचिंतायां रतस्य महतः कवेः ।
अंतर्गतं विजानाति गुरुपुत्रस्तु केवलम् ॥ ४५१ ॥

**पहिला अर्थ**—[ **सर्वदा-नव-चिंतायां** ] सदासर्वदा नव्या नव्या कल्पना काढण्यामध्यें ( **रतस्य** ) गुंग झालेल्या ( **महतः कवेः** ) मोठ्या कवीचें ( **अंतर्गत** ) अंतरंग ( **केवलं गुरुपुत्रस्तु विजानाति** ) गुरुपुत्रा-शिवाय-शिष्याशिवाय--कोणास कळणार ?

**दुसरा अर्थ**—[ **सर्व-दानव-चिंतायां** ] सर्व राक्षसांबद्दल विचार करण्यामध्यें ( **रतस्य** ) निमग्न असणारा जो ( **महतःकवेः** ) श्रेष्ठ शुक्राचार्य त्याचें ( **अंतर्गत** ) म्हणजे अंतर्गत (**केवलं गुरुपुत्रस्तु विजानाति**) बृहस्पतीचा पुत्र जो कच त्यालाच कळलें, इतरांना काय कळणार ? कारण, तो शुक्राचार्यांच्या पोटांत जाऊन बाहेर आला होता.

समलंकरोति काव्यं सुकविः कुकविश्च तदुभयं काव्यम् ।
वर्धयति सुखं सद्यः सहृदयहृदयं प्रविष्टमात्रं चेत् ॥४५२॥

चांगला कवि काय आणि वाईट कवि काय, दोंघेही काव्याला (**समलंकरोति** ) समलच करणारे आहेत. चांगला कवि ( **सम्-अलं-करोति**) म्हणजे आपल्या काव्याला चांगलें सजवितो, आणि वाइट कवि असतो तो आपल्या काव्याला ( **स-मलं-करो ति** ) म्हणजे मलिन करतो इतकेंच नव्हे तर सहृदय लोक असतील त्यांच्या हृदयांत प्रविष्ट होतांच एक आनंद ( **वर्धयति** ) ह्मणजे वाढवितो, आणि दुसरा ( **वर्धयति** ) ह्मणजे छेदन करतो. कारण, 'वृद्ध' ह्मणजे छेदणें असाही दुसरा अर्थ आहे.

समलंकरोति काव्यं सुकविः कुकविश्च तदुभयं काव्यं ।
अनलं तनोति चित्ते सत्हृदयत्हृदयं प्रतिष्ठमात्रं चेत् ॥४५३॥

सुकवि असो कीं कुकवि असो; दोघेही आपआपल्या कवितेला (**समलंकरोति** ) सजवीतच असतात, सुकवि असतो तो आपल्या कवितेला ( **सम्-अलं-करोति** ) नीटनेटकी सजवितो, आणि कुकवि असतो तो ( **स-मलं-करोति** ) आपल्या कवितेला मलिन करतो, इतकेंच. अथवा

दुसरा श्लेष—सुकवीची कविता पुरेशी होत नाहीं. पुन्हा पुन्हा वाचावीशीच वाटते. आणि कुकवीची ( अनलं ) करोति—अग्नीसारखी संताप देते. येवढेंच अंतर.

**कविरहिताः कविलापा जायंते कंठशोषणायैव ।**
**संमुखगतः कविश्चेद्भवति कुलपिताऽपि कविकुलपितैव ॥४५४॥**

काव्यानें विरहित असे ( कवि कलाप ) कवीचे आलाप·कविता·कंठशोषणाला मात्र कारणीभूत होतात. कसे ? तर ( क–विलाप ) कचा विलाप केला ह्मणजे ' क ' काढून टाकला ह्मणजे ( विलाप ) रडणेंच होतें. नाहीं तर (कु–लपिता ) लप ह्मणजे बोलणें, वाईट भाषण करणारा जरी असला आणि त्याच्या समोर जर कवि म्हणजे ज्ञाता असला तर तो (कुलपिता) कविकुलपित्यासारखा ह्मणजेकालिदासासारखा श्रेष्ठ कवि होतो.

श्लेष—(संमुखगताः कविः ) कुलपित्याच्या आधीं कवि शब्द आला तर, ( कविकुलपिता ) असाच शब्द होतो; त्यामुळें ह्या ह्मणण्याला सहजच पुष्टि येते.

**बहुवृत्तोपकलितमप्यलंकरणयुगपि विपकथाढ्यमपि ।**
**कविजनकवनं चेत्कविहीनं न मनोज्ञभावमावहति ॥४५५॥**

पहिला अर्थ—कवीचें कवन निरानिराळ्या वृत्तांनीं व अलंकारांनीं युक्त असलें तरी ( वि-प ) ह्मणजे गरुडाचें पालन करणारा जो विष्णु, त्याची कथा त्यांत गोंवलेली असली तरी ( कविहीनंचेत् ) कवित्व रहित असेल तर ( न मनोज्ञभावं आवहति ) तिच्यांत मनोहरपणा येत नाहीं.

दुसरा अर्थ--( क-विजनकवनं ) ह्यांतील ( क·विहीनं ) दोन्हींही ककार काढले, तर (विजन वनं ) निर्जन अरण्यच होतें ! हें सांगणें नकोच. तसेंच ( बहुवृत्तोपकलितं ) ह्याच्यांतीलही ककार काढला तर ( बहुवृत्तोपलितं ) ह्मणजे पुष्कळशा वाटोळ्या दगडांनीं भरलेल आणि ( अलंकरणयुक् ) ह्यांतील ककार काढला तर ( अलं रणयुक् ) अनेक संकटांनीं युक्त. अनेक टकरा झाल्या आहेत अशी भूमी राहते.

आणि ( विपकथाढ्यं ) ह्यांतील क काढला तर ( विपथाढ्यं ) ह्मणजे वाईट मार्गांनी युक्त अशा तऱ्हेचें वन राहतें. मग त्यांत मनोहरपणा कोठचा ?

**तरंगिणी तथा वाणी पुरःस्थानपि भूभृतः ।**
**तिरस्कृत्य समभ्येति रसिकं रसवाहिनी ॥४५६॥**

वाणी आणि नदी ह्यांचें सादृश्य—

**पहिला अर्थ**—वाणी कशी आहे ? तर पुढें जरी राजे लोक बसलेले असले तरी, त्यांना मागें टाकून ती रसयुक्त असल्यामुळें जो मनुष्य रसिक असेल त्यालाच जाऊन गाठते.

**दुसरा अर्थ**—आतां नदी कशी आहे ? तर ( **तरंगिणी** ) ह्मणजे लाटांनीं युक्त ( **रसवाहिनी** ) पाणी भरून चाललेलें असल्यामुळें ( **भूभृतः** ) झाडांना न जुमानतां [ **रसिकं** ] समुद्राला जाऊन मिळतें.

**प्रजति वितानं विपुलं विरचयते सुमनसां महामोदम् ।**
**अतिमुक्तकवनमपि तद्रसिकस्थलमलमपेक्षते किमपि ॥४५७॥**

**पहिला अर्थ**—व्यासासारखे जे जीवन्मुक्तच असतात, त्यांचें कवन सुद्धां अत्यंत विस्तृत असतें. आणि त्यापासून ( **सुमनसा** ) सज्जनांना मोठा आनंदही होतो. तरी सुद्धां त्यांच्या सारख्यांच्या काव्यालाही. रसिक लोकांची अपेक्षा असते. रसिक लोकांवांचून त्यांचेंही अडतें. मग इतरांचें अडेल ह्यात नवल तें काय ?

**दुसरा अर्थ**—( **अविमुक्तक-वनं** ) मधुमाधवीच्या झाडांनीं गजबरलेलें अरण्य कितीही वाढलेलें असलें आणि त्याच्या सुवासिक पुष्पांचा वारा जिकडे तिकडे पसरला असला तरी, ( **रसिकस्थलम्** ) पाण्यानें भरलेलें आळें हें त्याला पाहिजेच. त्याची त्याला अपेक्षा असतेच.

**सुसंगतिवशाच्छ्लोकः सुश्लोको भवति स्फुटं ।**
**अलंचिकीर्षोः संसर्गाच्छूनः शोको भविष्यति ॥४५८॥**

श्लोकाला चांगल्या संगतीच्या योगानेंच सुश्लोकपणा येतो. चांगल्या-निर्मत्सर–श्रोत्यांच्या कानाशीं त्याचा संयोग झाला तरच त्याला सुश्लोकता येते, त्याची चीज होते आणि (**अलं चिकीर्षोः संसर्गात्**) पुरे पुरे ह्मणणाऱ्या मनुष्याच्या ह्मणजे अरसिकाच्या संगतीनें (लूनः) ह्मणजे छिन्न होऊन तो शोककारक होतो हें उघडच आहे. कसें ? तरः—

**श्लेष**—' सुसंगतिवशात् ' ' सु ' ह्या अक्षराच्या संगतीनें ( अर्थात तें अक्षर पूर्वीं जोडल्यानेंच ) ' श्लोक ' ह्या शब्दाला ' सुश्लोकत्व येतें. ( **अलंचिकीर्षोः संसर्गात्** ) श्लोक ह्या शब्दांतील ( अ+लं ) लकार काढून टाकला तर शोक राहतो हें स्पष्टच दिसतें.

**यस्मिन्नासुरसंपदः समभवन्नेकांततः संगताः**
**काव्यस्यास्य तमःसमागमवशाद्युक्तः प्रकाशो महान् ।**
**न स्वल्पोऽपि हि सूर्यवस्थितिमतस्तत्रापि चेत्स्तोककः**
**सोऽयं पूर्वतपःप्रभावमहिमा नान्यत्प्रपद्यामहे ॥४५९॥**

**पहिला अर्थ**— ज्या काव्यामध्यें सगळ्या ( **असुरसंपत्ति** ) ह्मणजे पानचट शृंगारादि हेंच सारें ( **एकांततः** ) निवळ खचून भरलेलें असतें, तें अज्ञ लोकांच्या पुढें म्हटलें म्हणजे मोठी वाहवा होते, हें युक्तच आहे. ( **सूरि** ) ह्मणजे शहाण्या लोकांपुढें ( **अवस्थिति** ) तें गाण्याची सोयच नसते. शहाण्या लोकांनाही जर अशा काव्याची थोडीतरी किंमत वाटेल, तर तो पूर्वजन्मीच्या पुण्याईचा प्रभावच म्हटला पाहिजे.

**दुसरा अर्थ**—( **काव्य** ) शुक्र किंवा शुक्राचार्य. त्याच्या ठिकाणीं सर्व असुरी संपत्ति एक मनानें जुळलेल्या आहेत. सर्व दैत्यांची त्याच्यावर दृढ निष्ठा आहे—( **तमः समागमवशात्** ) अशा अज्ञानी लोकांच्या समागमांत असूनही स्वतः शुक्र हा प्रकाशयुक्त होतो. आणि तो प्रकाश सुद्धां सामान्य नव्हे तर तो सूर्याच्या प्रकाशांत सुद्धां दिसतो. ह्याचें कारण पूर्वजन्मीचा महिमा, दुसरें कांहीं नाहीं.

' तप ' ह्मणजे माघ. माघमासाच्या आरंभीं शुक्र हा ग्रह दुपारीं सुद्धां नुसत्या डोळ्यांनीं दिसतो ! ह्या गोष्टीला अनुसरून हा श्लेष केला आहे.

कुटिलप्राया लक्ष्मीस्तत्र प्रभवति सरस्वती यत्र ।
प्रायः श्वश्रूस्नुषयोः सौहार्दं नैव दृश्यते क्वापि ॥४६०॥

सरस्वतीचें जेथें ठाणें असतें तेथें बहुधा लक्ष्मीची करडी कमान असते. ह्मणजे जेथें विद्या अधिक असतें तेथें बहुधा श्रीमंती असत नाहीं. कवि बहुतेक दरिद्रीच असतात. आणि लक्ष्मीपुत्र बहुधा मूर्ख असतात. ह्याचें कारण उघडच आहे कीं, सासवासुनांचें बहूधा कोठेंच जमलेलें जगांत दिसत नाहीं.

लक्ष्मी पुत्राच्या घरीं सरस्वती आली ह्मणजे ती लक्ष्मीची सूनच होय.

विभाति दिवि चंद्रिका, द्विजवरस्य विद्या भुवि
प्रयाति जडराशिरप्यतितरां प्रमोदं यया ।
तमोविशसनक्षमा कुवलयप्रकाशप्रदा
करोतु कमलोदयं कथमसावहो कथ्यतां ॥४६१॥

श्रेष्ठ ब्राह्मणांची विद्या आकाशांतील चंद्रिकेप्रमाणें शोभते. चंद्रिका कशी? तर जिच्या योगानें (जलराशी) ह्मणजे समुद्र त्याला आनंद होऊन तो उचंबळून येतो. आतां विद्या कशी? (जड–राशी) ह्मणजे मंद बुद्धि असतो त्यालाही विद्येपासून आनंद होतो, (तमोविशसनक्षमा) चंद्रिका तमाचा नाश करावयास समर्थ, व विद्या अज्ञानाचा नाश करावयास समर्थ.पहिली [कुवलयप्रकाशप्रदा] चंद्रविकासी कमलांचा विकास करणारी आणि दुसरी (कु वलयम्)भूतलावर कीर्तीरूप प्रकाश देणारी. परंतु चंद्रिका कमलोदय करित नाहीं, तशीच विद्येनें कमलेचा म्हणजे लक्ष्मीचा उदय तरी कोठून होणार?

हस्ताब्जे चतुराननस्य तनया धत्ते सरस्वत्यसौ
सद्वंशं गुणिनं रमा तु जलजं धत्ते जलध्यात्मजा ।
नैकस्या गुण एष संभवति नो दोषः परस्या यतः
प्रायः कारणनिष्ठधर्मसदृशं कार्यं समुत्पद्यते ॥ ४६२ ॥

चतुरानन ह्मणजे चार तोंडें आहेत ज्याला, असा जो ब्रह्मदेव त्याची

कन्या जी सरस्वती, ती आपल्या चांगल्या गुणांनीं—पक्षीं उत्तम तारांनीं युक्त—सद्वंशापासून झालेला—पक्षीं उत्तम बांबूचा केलेला वीणा, करकमलामध्यें धारण करते. परंतु ( रमा ) ह्मणजे लक्ष्मी ही [ जलज ] ह्मणजे कमलच धारण करते. ( जडज ) जडापासून उत्पन्न झालेलें. मंद कुलापासून उत्पन्न झालेल्यालाच धारण करते, ह्याचें कारण काय तर ती ( जलधीची ) जडधीची—मंदबुद्धीचीच मुलगी आहे. समुद्राची कन्या लक्ष्मी हें सर्व विश्रुतच आहे. हा कांहीं पहिलीचा गुण आहे असेंही वाटत नाहीं, किंवा दुसरीचा दोष आहे असेंही नाहीं, तर सामान्यतः कारणामध्यें राहात असलेला जो धर्म, त्यासारखेंच कार्य घडत असतें.

आवासं सरसीरुहं हिमकरं सद्भ्रातरं क्षीराधिं
तातं चापि नृपालकीर्तिललनासौंदर्ययोः संस्तवे ।
प्रेम्णात्युत्कटकोटिनाहृताधियो निंदंति ये नित्यदा
धृष्टेष्वेषु कथं कृपाविलुलितान्कुर्यात्कटाक्षान्रमा ॥ ४६३ ॥

लक्ष्मी ही शहाण्या लोकांवर म्हणजे कवीवर कृपा कां करीत नाहीं, तर कवि असतात ते सर्व मोठ्या धिटाईनें लक्ष्मीचें निवासस्थान जें कमल आणि तिचा प्रिय बंधु जो चंद्र आणि पिता क्षीरसागर, ह्या तिघांची, राजाची कीर्ती वर्णन करतांना, किंवा स्त्रीची स्तुति करतांना पराकाष्ठेच्या आवडीनें [ हृतधियः ] नष्टबुद्धीचे कवि ( अर्थात् लक्ष्मीच्या दृष्टीनें नष्ट बुद्धीचे ) लोक अवहेलना अथवा तिरस्कार करित असतात. तेव्हां अशा मनुष्यांवर लक्ष्मीनें आपल्या कृपेचे आर्द्र झालेले कटाक्ष कसे बरें फेकावेत ?

राजा पूर्णकलाधरः कुवलयानंदप्रदाता शुचिः
सद्वृत्तश्च तमोऽपहोऽमृतकरो मित्राश्रयश्चंद्रमाः ।
यायाच्छ्रीरघुनंदनस्य तुलनामेष क्षणं पर्वणि
स्याच्चेदेकमसौ तदापि कमलानंदप्रदानक्षमः ॥४६४॥

## संकीर्ण प्रकरणें.

चंद्र आणि श्रीरामचंद्र ह्यांचें साम्य—

पहिला अर्थ—चंद्र कसा आहे ? तर ( राजा पूर्ण कलाधरः )

राजा असून षोडश कलांनीं युक्त; ( **कुवलयानंदप्रदाता** ) चंद्रविकासी कमलांस आनंद देणारा; ( **शुचिः** ) पांढरा सफेत; ( **सद्वृत्तश्च** ) वाटोळा गरगरीत; ( **तमोपहः** ) अंधकाराचा नाश करणारा; ( **अमृतकरः**) शीत किरण आणि ( **मित्राचा** ) म्हणजे सूर्याचा आश्रय करून राहणारा असा चंद्र आहे.

**दुसरा अर्थ**—आतां राम कसा आहे ? तर ( **राजा पूर्ण कलाधराः**) अयोध्येचा राजा असून सर्व कलांनीं परिपूर्ण; ( **कु–वलयानंद प्रदाता** ) सर्व भूमंडळाला संतोष देणारा; (**शुचिः**) आचरणानें पवित्र; (**सद्वृत्तश्च**) ज्यांचें चरित अत्यंत मनोहर; ( **तमोपहः** ) अज्ञानाचा नाश करणारा; आणखी कसा ? तर ( **अमृतकरः** ) मोक्ष देणारा; आणि (**मित्राश्रयश्च**) सूर्याच्या कुलांत उत्पन्न झालेला; पक्षीं आप्तइष्टांना आश्रय देणारा; परंतु हा ( **कमला** ) म्हणजे लक्ष्मी तिला आनद देणारा आहे, आणि चंद्र मात्र कमलाला आश्रय देणारा नाहीं. येवढेंच चंद्रांत व रामचंद्रांत अंतर आहे. परंतु चंद्र पौर्णिमेच्या दिवशीं एक क्षणभरच खरा पूर्ण (वाटोळा) असतो.त्या क्षणाच्या पूर्वीं किंवा मागाहून त्याचा वाटोळेपणा पूर्ण नसतो. ह्मणून पौर्णिमेच्या दिवशीं तेवढ्या क्षणापुरता ( कलंकरहित ) असता तर आणि कमलानंददायक असता तर मात्र श्रीरामचंद्राशीं क्षणभर तरी तुलना करण्यास योग्य झाला असता. ह्यावरून चंद्रापेक्षां रामचंद्रच अधिक श्रेष्ठ आहे असें ह्मणावें लागतें.

**श्रीरामो दिनकृत्कुलैकतिलकस्तीरे सरय्वा वसन्**
**सीताश्लिष्टतनुः समीरशिशुना संसेव्यमानः सदा ।**
**साकेते मणिमंडपे जवनिकासंभारसंभाविते**
**देदीप्यच्छ्रुचि पुष्पकं प्रतिवसल्लोकाञ्शशासाखिलान् ॥४६५॥**

**पहिला अर्थ**—श्रीराम हे सूर्य कुलाला तिलकभूत एकटेच असे शरयू तीरावर वास करून ( **सीताश्लिष्टतनुः** ) सीतेनें ज्यांना आलिंगन दिलें आहे आणि वायुसुत मारुति, हा ज्यांची सदासर्वदा सेवा करीत आहे असे अयोध्येमध्यें ( **मणिमंडपे** ) रत्नखचित मंडपांत (**जवनिक**)

म्हणजे मोठमोठे जाळीचे पडदे सोडलेले आहेत अशा देदीप्यमान (शुचि) म्हणजे पवित्र अशा पुष्पक विमानांत राहून सर्व लोकांवर त्यांनीं राज्य केलें.

दुसरा अर्थ—राम ह्मणतात "मी सूर्यवंशांतील असूनही शरयूच्या तीरावर राहतों.( सीताश्लिष्टतनुः ) मला थंडी लागत आहे; ( समीर शिशुना संसेव्यमानः ) मी वारा घेत आहे आणि पडदे सोडलेले आहेत. व त्या थंडीच्या निवारण्यासाठीं ( पुष्पक ) म्हणजे शेगडी घेतली आहे." म्हणजे मी सूर्यासारखा तापदायक नसून लोकांस गारीगार करणारा आहें, हें तात्पर्य.

> श्रीरामचंद्रे रविवंशभूपे शासत्यभूद्भूमिरनामयेयम् ।
> तथाहि सोमस्य विभावसोश्च साम्ये व्यथा प्राणभृतः कुतः स्यात्
> ॥ ४६६ ॥

रविवंशोद्भव श्रीरामचंद्र राज्य करित असतां, सर्व भूमी रोगरहित झाली. कारण, चंद्र आणि सूर्य अथवा अग्नि. ( वि भावसु ) ह्यांचें समानत्व झाल्यावर [ भेट झाल्यावर ] जीवांना व्यथा कोठून होणार ? कारण, रविवंश म्हणजे उष्णता आणि रामचंद्र म्हणजे शीतलपणा ह्या दोहोंचें साम्य झाल्यावर बाधा न होणें हें साहजकिच आहे.

> साधं चापलतां द्विषां सहतयोत्थाप्य प्रकल्प्यानतिं
> सत्रा तत्र तया विधाय तादिव ज्याप्रापणं कुर्वतः ।
> जीवाकृष्टिमपीश मार्गणगणो लेभे स्वलक्ष्यं न य-
> त्तत्पूर्णं प्रतिमार्गणं प्रतिपदं प्रत्यर्पितं प्रत्यहं ॥४६७॥

हे ईश ! तुम्हीं जेव्हां धनुर्लता—धनुष्यरूपी लता हातांत घेतां तेव्हां ती शत्रूच्या [ चापलतेसह ] घेतां, ह्मणून तुमचे शत्रु कंप पावूं लागतात. आणि तुम्ही ज्या वेळेस धनुष्य वांकवूं लागतां त्या वेळेस शत्रूंही पण वांकूं लागतात. तसेंच ज्यावेळीं तुम्ही त्यास दोरी जोडतां त्या वेळेस तेही आपली 'ज्या' म्हणजे भूमि तुमच्या हवालीं करतात. आणि तुम्ही ज्या वेळेस ती [ ज्या ] ह्मणजे दोरी आकर्षण करता,ह्मणजे ओढतां त्या

वेळेस शत्रूंचे जीव ह्मणजे प्राणच (आकर्षण करता ) ह्मणून ते निघून जातात. त्यामुळे 'मार्गणगण' ह्मणजे शरसमुदायांना ( स्वलक्षं ) ह्मणजे निशाण असें कांहींच उरत नाहीं. ह्मणून दानशूरत्वानेंच त्यांनीं आपली इच्छा परिपूर्ण करून घेतली. ह्मणजे आपलें काम भागाविलें. कसें ? तर—

श्लेष—[ मार्गणगण ] ह्मणजे याचक समुदाय ह्यांना [ स्वलक्षं ]–लाखों रुपये, दरदिवशीं, प्रतिक्षणीं आपण देऊं लागलात.

मुक्तानां स्वातिरभुज्जननीत्येवं नु रोहिणी सुषुवे।
रत्नं किंचन सौम्यं मुक्तोत्तममृग्यमाणपदधूलि ॥४६८॥

[ स्वाति ] ही मोत्यांची जननी झाली, हें पाहून ( स्वाती नक्षत्राच्या पर्जन्यानें मोतीं उत्पन्न होतात हें प्रसिद्धच आहे. ) रोहिणीलाही विषाद वाटून तिनेंही मुक्तोत्तम—जीवन्मुक्त लोकही ज्याचें चरण, [ मृग्यमाण ] शोधतात—वंदन करतात असें एक सौम्य ( सत्वगुण संपन्न ) पक्षीं-सोम कुलांतील एका रत्नाला जन्म दिला. रोहिणी नक्षत्रावर श्रीकृष्ण जन्मास आले. स्वाती व रोहिणी ह्या दोघीही चंद्राच्या बायका असल्यामुळें मत्सर भावानेंच त्यांनीं आपआपल्या पुत्रांस जन्म दिलें. अशी येथें कल्पना केली आहे. नरसिंहाचा जन्म स्वाती नक्षत्रावरच झालेला आहे, पण तो सौम्य नव्हे. म्हणजे बापाच्या वळणावर नाहीं हें तात्पर्य,

स्त्रीष्वन्यासु सतीषु केवलमहं राज्ञः परा प्रेयसी-
त्येवं विष्टपवित्तमेव भगवानाविर्भविष्यन्कुले।
सत्कुर्याद्यदि मामलं तदिति साऽभूद्ब्रह्मभक्ता त●-
स्तेनास्या अनुरोधतोऽर्थित इवैनां सच्चकाराच्युतः ॥४६९॥

चंद्राच्या इतर बायकांमध्यें मीच अतिशय प्रियकर आहे, हें त्रिभुवनामध्यें प्रसिद्धच आहे. तेव्हां भगवंतांनीं जर आमच्या कुळांत जन्म घेऊन माझा सत्कार केला, तर त्यांत आणखी भरच पडेल. ह्मणून रोहिणीनें ब्रह्मदेवाची करुणा भाकली. रोहिणी नक्षत्राची देवता ब्रह्मदेव किंवा प्रजापति आहे म्हणून त्यानें तिच्या प्रार्थनेप्रमाणें विष्णूला अवतार येण्याबद्दल

याचनाकेली आणि मग अच्युतानें तिचा रोहिणी नक्षत्रावर जन्मून सत्कार केला.

औषधान्वेषणक्लेशैर्भृशमुत्क्लिश्यते कुतः ।
रुगब्धितरणे हेतु तरणिं शरणीकुरु ॥४७०॥

[ सूर्याचें वर्णन ]

अरे बाबा! औषधी शोधण्याचे तायास करून उगाच आपल्याला पीडा कां करून घेतोस? रोगरूपी समुद्रांतून पार करण्याला कारण जो तरणी ( सूर्य ) त्याचाच आश्रय कर ह्मणजे झालें.

श्लेष—( तरणी ) ह्मणजे सूर्य, किंवा नौका. अर्थात् 'तरणीई' ह्मणजे सूर्य हीच ( तरणी ) ह्मणजे नौका होईल.

वयस्य पश्य यस्यास्य पंचास्यास्यस्य वश्यता ।
शस्यस्य तस्य सस्यस्य संपत्किं नु विनश्यति ॥४७१॥

[ नारसिंह वर्णन. ]

ह्या श्लोकांत ( स्य ) हा अनुप्रास फार मौजेचा साधलेला आहे.

हे मित्रा ! सिंहासारखें ज्याचें तोंड आहे, अशा नरसिंहाच्या [ वश्यतेचें ] प्रसन्नतेचें फल काय मिळेल, तें पहा. कारण, [ शस्य ] ह्मणजे स्तुत्य असा जो नरहरी त्याची एकदां अनुकूलता झाल्यावर धन धान्य संपत्ति काय नाश पावणार? नाश तर पावणार नाहींच, पण उलट रगडून मिळेल. कारण त्याच्यापासून मोक्ष संपत्ति सुद्धां जर मिळते, तर धनधान्य संपत्तिही मिळेलच मिळेल.

योऽनंतभूषितभुजोऽधिकशैलवासः
संदर्शयन्द्रविणनायकसख्यमुच्चैः ।
भव्याकृतिर्बहुविसर्गनिबद्धभाषो
दुर्गाप्रियोऽवतु चिरं करहाटको नः ॥४७२॥

कऱ्हाडे ब्राह्मणांचें वर्णन.

पहिला अर्थ—शंकर कसा आहे ? तर [ यः अनंतभूषितभुजः ] जो सर्पांच्या अलंकारानें शोभणारा असा; आणखी कसा ? तर [अधिक शैल

वासः ] अत्युच्च असा जो कैलास पर्वत त्यावर राहणारा; आणखीं कसा? तर [ द्रविणनायकसख्यमुच्चैः ] कुबेराशीं मैत्री असल्याचे स्पष्ट दाखविणारा असा; आणखी कसा ? तर [ भव्याकृतिः ] भक्तजनांकरतां अवतार आहे ज्याचा असा; आणखी कसा ? तर [ बहु-विसर्ग-निबद्ध-माषः ] वरप्रदान देण्याविषयीं वाणीचा सढळ; आणखी कसा ? तर [ दुर्गाप्रिय ] पार्वती आहे प्रिय ज्याला असा; आणखी कसा ? तर [ करहाटकः ] हातामध्यें धत्तूर पुष्प धारण करणारा असा जो शंकर तो माझें संरक्षण करो.

दुसरा अर्थ—आतां कऱ्हाडे ब्राह्मणही ह्याच लक्षणांनीं युक्त आहेत. कसे तें पहा. कऱ्हाडे कसे असतात ? तर [ यः अनंतभूषित भुजः ] दंडामध्यें अनंताचा दोरा बांधलेले; [ आधि-कशैल-वासः ] मूळचें कोंकणांतील कशेळी गांवचे राहणारे; [ संदर्शयन् द्रविणनायक सख्यं उच्चैः ] घरांत अठरा विश्वे दरिद्र असलें तरी बाहेरून कुबेराचा आव आणणारे; [ भव्य-आकृति ] दिसण्यामध्यें भव्य. [ बहु-विसर्ग निबद्ध-भाषः ] विसर्ग आणि ' नि ' हीं ज्यांच्या भाषेमध्यें विशेष असतात. जसें:—[ ताकाः फोडणी ] [ दाराः कडी ] किंवा [ केलेनि - [ घेतलेनि ] [ पाहिलेनि ] इत्यादि. आणखी दुर्गादेवी हेंच आहे प्रिय दैवत ज्यांचे असे [ करहाटकः ] कऱ्हाडे नांवांचे ब्राह्मण होत.

अस्मिन्नीशे शशिशेऽभ्युदयाति न कदाऽनर्थकृत्प्रातिकूल्यं
कांते चावां तथेमे भगवत उचिते कालिका काशिका च ।
प्रायस्त्वेकांतरेयं जनयति हि सुतान्पंचवक्रांस्तथाऽहं
नातस्त्यागस्तु न स्यादिति गिरितनयार्द्धांगलग्नेव शंभोः ॥ ४७३ ॥

पार्वती ह्मणते—[ शशीश ] ह्मणजे चंद्र ज्याच्या शिरावर आहे असा शिव हा सौम्य स्वभावाचा असल्या कारणानें [ मी व काशी ह्यांमध्यें ] आमच्यामध्यें अनर्थकारक असें कांहीं भांडण होत नाहीं, हें खरें. (ह्या पदांवरील श्लेषाकरितां खालीं पहा.) तरी आह्मी त्याच्या खऱ्या बायका ह्मटल्या ह्मणजे दोघी आहोंत. एक कालिका आणि दुसरी काशिका

ह्मणजे काशी हें तीर्थ, परंतु त्यांतील काशिकाचें आपल्या भर्त्याशीं फार रहस्य आहे असें वाटतें. कारण त्यांचें ( शिवाचें व काशिकेचें) अंतःकरण एक आहे. [ श्लेष–शंशीश ] आणि [ काशिका ] ह्या शब्दांतील मघलें अक्षर एक आहे. ह्यावरून अंतःकरण एक आहे हें उघड आहे. आणखी शिवाय, तिचे सर्व मुलगे सारे पंचवक्त्र ह्मणजे शिवस्वरूपच होतात. (काशींत जे जे लोक देह ठेवतात ते शिवस्वरूपी होतात असें पुराणांतरीं वर्णन आहे.) माझे मुलगे दोनच. एक षडानन आणि दुसरा गजानन, ते पित्याशीं विसदृश आहेत. ह्यावरून शंकराचें व काशीचें कांहीं तरी विशेषच रहस्य असावें. ह्याकरितां आतां तरी आपण भर्त्याला सोडून क्षणभरही राहतां कामा नये. त्याचा आपल्याला घटकाभरही वियोग होऊं नये. ह्मणूनच पार्वती ही शंभूच्या अर्धांगाला नेहमीं चिकटून असते. अर्धनारीनटेश्वर झाली आहे असा भाव.

श्लेष—[ काशिका ] आणि [कालिका ] ह्या एकमेकीस प्रतिकूल नाहींत. अर्थात् त्यांचें भांडण होत नाहीं. कशावरून ? तर हे दोन्हीही शब्द उलट केले तरी त्यांच्यांत बदल होत नाहीं. हे शब्द उलटे वाचले तरी अर्थ तोच. त्याचें स्वरूप कायम असतें.

कालिकासन्निधानेन विना शैलेंद्रमूर्धनि ।
सानंदं नीलकंठस्य कथं स्यात्तांडवोत्सवः ॥ ४७४ ॥

कालिका ह्मणजे पार्वती, ती जवळ असल्याशिवाय कैलासाच्या शिखरावर आनंदयुक्त असणारा जो ' नीलकंठ ' म्हणजे शंकर, त्याचा तांडवोत्सव होणार कसा ? शिव हा कालिका देवीच्या समोरच नृत्य करतो अशी आख्यायिका आहे.

श्लेष—[ कारिका ] म्हणजे मेघपंक्ति. आणि नीलकंठ म्हणजे मोर. मेघपंक्ति असल्याशिवाय मोराचा नृत्योत्सव तरी होणार कसा ?

कपर्दमाली धृतभैक्ष्यपात्रो भूताधिपो नृत्यति तेन मन्ये।
आराधकोऽयं तव देवि वन्हेर्धृतिस्तु नित्यास्य ललाटपट्टे ॥४७५॥

हे देवी पार्वती ! शंकर हा तुझा आराधना करणारा आराधी--ह्मणजे भुत्याच आहे असें वाटतें.

**पहिला अर्थ**—शंकर कसा आहे ? तर [ **कपर्दमाली** ] जटाजूट असा; आणखी कसा ? तर [ **धृतभैक्ष्यपात्रः** ] भिक्षापात्र हातांत घेणारा; [ **भूताधिपः** ] तो भूतांचा अधिप आहे. ह्मणूनच तो तुझ्यापुढें नाचतो असें वाटतें. कारण हे देवी ! तो तुझें आराधन करणारा आहे. ह्मणूनच तो नेहमीं आपल्या कपाळावर अग्नि धारण करतो.

**दुसरा अर्थ**—आराधी किंवा भुत्याही असाच असतो. पहा. तो कसा ? तर [ **कपर्दमाली** ] कवड्यांच्या माळा गळ्यांत घालणारा; [ **धृतभैक्ष्यपात्रः** ] हातांत परडी घेतलेला; [ **भूताधिपः** ] भुत्यांतला अग्रगण्य; ह्मणून तोही तुझी आराधना करण्याकरितां तुझ्यापुढें नाचतो आणि त्याच्या हातांतही नेहमीं पोत जळत असतो.

> संसारं निजकर्मणैव भजते जंतुः परंतु ध्रुवं
> क्षेत्रेऽस्मिन्नाविमुक्तके पशुपतौ राजन्यहो तामसे ।
> स्यात्किं मुक्तिकथा नृणामिति महाकुत्साऽऽवयोः स्यादिति ।
> त्रस्तः सत्रविशेषतो व्यरचयत्किं मुक्तिसत्रं शिवः।। ४७६ ॥

काशीमध्यें शिवानीं जें मुक्तिछत्र काढलें आहे तें कशाकारितां ? [ जो प्राणी काशींत देह ठेवतो तो शिवस्वरूप होऊन मुक्तीला जातो. ] प्राणी हा आपल्या कर्मांनींच आपल्या संसारांत पडतो, हें जरी खरें आहे तरी, ह्या क्षेत्रामध्यें ( काशीमध्यें ) अनेक प्रकारचे श्रीमंत व व्यसनी लोक राहतात. त्यांत मूर्ख आहेत; आळशी आहेत; राजे इत्यादि जे लोक आहेत, आणि ' राज्यांतीं नरक ' अशी ह्मणही आहे, म्हणजे राजे हे नेहमीं नरकालाच जातात. असे नानाप्रकारचे लोक त्यांमध्यें आहेत, ते सारेच मुक्त कसे होतील ? बरें, त्या सर्वांस मुक्त करणारा कोण ? तर तोही तसाच. म्हणजे [ **पशुपति** ]–शंकर, तमोगुणी, ( पशूंतला राजा ) तेव्हां त्याच्या हातून उद्धार होणें तितक्या पुरतेंच दिसतें अशी कोणी शंका घेतील, आणि तसें झालें ह्मणजे आपल्याला मोठें दूषण लागेल.

हें मनांत आणून शिवानें काशीमध्यें येईल जाईल त्याला मुक्तिसत्र काढून ठेवलें आहे कीं काय ?

मार्तंडं वर्णयति--

स्वैरवंध्यगणैर्युक्तं वैरवंचितकैरवम् ।
स्वैरबंधच्छिदं देवं वंदे मार्तंडभैरवम् ॥ ४७७ ॥

मार्तंडाचें [ खंडोबाचें ] वर्णन.

आपल्या इच्छित कार्य करणाऱ्या गणांनीं युक्त, वैरामुळें दैत्यगणांचा ज्यानें नाश केला आहे, आपल्या इच्छेविरुद्धही संसाररूपी बंधन पाठीस लागलें असतां त्याचा छेद करणारा असा जो मार्तंडभैरव त्याला मी नमस्कार करतों.

चरंतं तं तुरंगेण रजनीचूर्णभासुरम् ।
प्रचंडकरपालं श्रीमार्तंडं प्रणमाम्यहम् ॥ ४७८ ॥

घोड्यावरून संचार करणारा [ रजनीचूर्ण भासुरम् ] हळद लावणारा; मोठी थोरली तरवार ज्याच्या हातांत आहे; अशा मार्तंडाला मी नमस्कार करतों.

दुसरा अर्थ—घोड्यावर बसून जाणारा; रात्रीचा नाश करणारा; उष्ण किरण धारण करणारा; अशा सूर्यालाही माझा नमस्कार असो.

काशीं वर्णयति--

महादोषाचारा भयलवविहीना अपि महा-
श्मशाने चासीना उषितावति भूताधिपतिना ।
महामंत्रं कंचित्सकृदुपगता एव सहसा
वशीकुर्वत्येते शिव शिव परां मुक्तिरमणीम् ॥४७९ ॥

[ काशीचें वर्णन. ]

पहिला अर्थ—[ महादोषाचाराः ] महान् महान् दोषांचें आचरण करणारे; लेशही भीती नाहीं असे; मोठा थोरला भूताधिप-भूतांचा स्वामी-जो रुद्र त्याचें वास्तव्य ज्यांत आहे अशा स्मशानांत बसणारे; कसला तरी एक

महामंत्र मिळतो न मिळतो तोंच श्रेष्ठ अशी मुक्तिरूपी स्त्री वश करून घेतात. ( काशींतल्या लोकांना यत्किंचितही पुण्याचरण झाल्याबरोबर मुक्ति मिळते. )

दुसरा अर्थ—[ महादोषाचाराः ] गर्द काळोख्या रात्रींत फिरणारे; भयाला न जुमानणारे; स्मशानामध्यें वास करणारे; भूतांचा राजा जो वेताळ त्याचा महामंत्र मिळाल्याबरोबर [ मुक्ति रमणी ] मोत्यानें गजबलेली स्त्री वश करून घेतात. वशीकरणासाठीं असे जारणमारणाचे प्रयोग करतात. ( काशींतील लोकांना जी मुक्ति रूपी स्त्री वश होते ह्याला कारण ते जारणमारणादि प्रयोग करितात असें रूपक केलें आहे. )

गंगां वर्णयाति.

एषादौ तु सुरापगाऽन्यदपि च ब्रह्मघ्नसंसर्गिणी
स्यादस्या गतिरस्य का नु जगतः स्यादेष दोषो मयि ।
यद्येतस्य समुद्धतौ विरचयाम्येषा विचारं मना-
गप्येवं मृशती समुद्धरति किं गंगाऽविशेषाज्जगत् ॥ ४८० ॥

गंगा ही [ सुरापगा ] म्हणजे देवांची नदी आहे. [ आपगा ] म्हणजे नदी आणि [ सुरा ] म्हणजे मद्य. ( श्लेष ) मद्याची नदी. आणखी कशी? तर [ ब्रह्मघ्नसंसर्गिणी ] ब्रह्मदेवाला मारणारा जो शिव त्याच्याशी संसर्ग ठेवणारी; ( ब्रह्मदेवाला पूर्वीं पांच तोंडें होतीं. त्यांपैकीं एक मुख शंकरांनीं छेदून टाकलें, असें पुराणांतरी वर्णन आहे. ) इतक्या दोषांनीं युक्त आहे, तेव्हां ही नदी आह्मांला तारणार कशी? अर्थात् जगाची गति काय होणार तें दिसतेंच आहे. हा दोष माझ्यावर येईल असा विचार करून सर्व जगाला म्हणजे चांगल्यांना आणि तसेंच वाइटांनाही भेदाभेद न करतां सर्वांचा सरसकटच उद्धार करीत गेलें म्हणजे लोक तरी ह्मणतील कीं, 'ही चांगली आहे' म्हणूनच सर्वांचा सरसकट ती उद्धार करते.

करवीरं वर्णयाति.

पत्ये श्रीः कुपिताऽत्र वस्तुमगमस्त्वेनं कुवासं धिया

पश्यंत्याः किल नीरजस्थलमिहानीत्सौमनस्यप्रदम् ।
त्रस्तास्मिन्मधुपसंगत इति श्रेष्ठं ततोऽधिष्ठिता
प्रेष्ठं किं करवीरमत्र यदसौ तद्वासवाक् त्वन्वथा ॥ ४८१॥

करवीर.

लक्ष्मी ही आपल्या भर्त्यावर ह्मणजे विष्णूवर रागावली होती ह्मणून ती ह्या जगांत वस्ती करावयास आली. परंतु ह्या पृथ्वीवर राहणें ह्मणजे तो [ कु-वास ] च आहे--पृथ्वीतला—मृत्युलोकचा वास आहे असें पाहून [ नी- रज स्थळ ] रज—धुरोळा--नाहीं असें स्थळ पाहून [ श्लेष ] (नीरज—कमळ ) तेथेंच राहणें तिला बरें वाटलें. ह्मणून ती तेथेंच राहिली. परंतु तेथें [ मधुपांचा ] ह्मणजे भुंग्यांचा फार त्रास. पक्षीं—मद्यप्यांचा फार त्रास—होऊं लागला. ह्मणून श्रेष्ठ असे मधुप जेथें येणार नाहीत असें [ करवीर ] कोल्हापूर—पक्षीं कण्हेरीचेंच फूल तिनें पसंत केलें. आणि तेथेंच ती वास करूं लागली. 'तिचा वास कमलांत आहे' अशी जी बोलवा आहे ती निराळ्याच अर्थानें आहे असें वाटतें. ती कशी ? तर कमलाच्या ठिकाणीं तिचा वास आहेच, पण निरनिराळ्या प्रकारानें ह्मणजे 'सुगंधाच्या' रूपानें आहे. ( वास ह्मणजे सुगंध हें सांगणें नकोच. )

भूमिं वर्णयति.

अप्यवर्णे जनैरेषा गमितोष्मपरोदयम् ।
क्षमामेव प्रथयति क्ष्मेव क्ष्मैव विराजते ॥ ४८२ ॥

जमीन तापली ह्मणजे हिच्यापासून अतिशय ताप होतो अशी लोकांनीं निंदा केली तरी सुद्धां जो क्षमा करते तीच ही [ क्ष्मा ] अशी पृथ्वी शोभते. ह्मणजे मूर्तिमंत क्षमा असल्याप्रमाणेंच ती शोभते आहे.

श्लेष—[ क्ष्मा ] ह्या शब्दामध्यें ऊष्म वर्ण जो 'ष' त्याच्यापुढें 'अ' ह्या वर्णाचा उदय झाला तर ( क्+ष्+अ+मा=क्ष्+अ=मा=क्षमा) 'अ' नांवाचें जें अक्षर आहे तें जर जनांनीं ऊष्म वर्ण जो 'ष' त्याच्यापुढें घातलें—अवर्णाचा उदय केला—तर क्षमाच होईल, 'क्ष्मा' ही प्रत्यक्ष क्षमाच होते.

' गौः; ग्मा; ज्मा; क्ष्मा; क्षमा; क्षोणी; पृथ्वी; ' हें निघटांतील पहिलेंच सूत्र आहे.

शास्त्रिणं वर्णयाति.

**अर्थाहरणकौशल्यं किं स्तुमः शास्त्रवादिनाम् ।**
**अव्ययेभ्योऽपि यैरर्था निष्काश्यंते ह्यनेकश : ॥ ४८३ ॥**

[ शास्त्रयाचें वर्णन. ]

पहिला अर्थ—'शास्त्रवादिनाम्' शास्त्रीबुवांचें [अर्थाहरणकौशल्यं ] पैसा काढून घेण्याचें कौशल्य काय वर्णन करावें ? कारण जे [ अव्यय ] ह्मणजे एक छदामही खर्च करणारे नव्हेत, अशा मनुष्यापासून सुद्धां अनेक वेळां ते पैसा काढतातच काढतात.

दुसरा अर्थ—शास्त्रीबुवांचें [ अर्थाहरणकौशल्यं ] शब्दांचे अर्थ-चमत्कार करण्याचें कौशल्य काय सांगावें ? [ अव्यया ] पासून सुद्धां ते अनेक अर्थ निष्पन्न करतात व व्याकरणांत ते तसे आहेत ह्मणूनच निघतात.

**भूपादयोऽपि वित्रस्ता नूनं यदुपसर्गतः ।**
**विसृजंति बहूनर्थांस्तस्मै ते शास्त्रिणे नम : ॥४८४ ॥**

पहिला अर्थ—शास्त्रीबुवा ! तुम्हांला नमस्कार असो. कारण, ' भूपादयः ' राजेलोकसुद्धां तुमच्या पीडेनें त्रस्त होऊन तुम्हांला पुष्कळसा पैसा देऊन टाकतात.

दुसरा अर्थ–' भू-पादयः ' ' भू ' आणि ' पा ' इत्यादि धातु ज्यांना उपसर्ग लागले असतां पुष्कळसे निरनिराळे अर्थ उत्पन्न करतात.

वैद्यं वर्णयाति.

**प्रवर्तंतेऽगदंकाराः सत्यंकारादनंतरम् ।**
**यदाह कारे सत्येति भगवान्पाणिनिः क्रमम् ॥ ४८५ ॥**

[ वैद्य. ]

वैद्य असतात ते ससकार दिल्यानंतरच आपल्या कामाला प्रवृत्त

होतात. हें बरोबरच आहे. कारण, भगवान् पाणिनींनीं सुद्धां आपल्या सूत्रांत हाच क्रम दिलेला आहे. ' कारे सत्यागदस्य ' सत्य आणि अगद यांना ' कार ' प्रत्यय लागतो, व सत्यंकार व अगदंकार अशीं रूपें होतात. ह्यांत सत्यंकार हें प्रथम आहे व नंतर अगदंकार आलें आहे. ' सत्यंकार ' झाल्यानंतरच अगदंकार व्हावयाचा, हा क्रमच आहे. श्लेष–[ सत्यंकार–सत्कार आणि अगदंकार–निरोगी. ] अर्थात् आधीं सत्कार दिल्यानंतर मगच रोगी बरा करावयाचा.

## रोगिणं वर्णयति.

देवोऽपि गदी नीचैर्भूत्वादौ प्राप्तरसतया प्रायः ।
कृतकार्यः पुनरेवं रसार्पकमवंचयन्नारि न चित्रम् ॥४८६ ॥

पहिला अर्थ—' गदी ' म्हणजे गदा धारण करणारा जो विष्णु, त्यानें सुद्धां वामनावतारामध्यें प्रथम ठेंगणें वामनाचें स्वरूप घेऊन ( रसा ) म्हणजे पृथ्वी–त्रिपाद भूमी मिळाल्यानंतर कृतकार्य होऊन नंतर पृथ्वी देणारा जो बळी, त्यालाच ठकाविलें. तेव्हां [ न·लीन ] लीन नव्हे अशा माणसामध्यें [ गदी ] म्हणजे रोग्यानें वैद्याला ठकविलें तर त्यांत कांहीं विशेष नाहीं. कसें नाहीं ? तर [ गदी ] म्हणजे रोगी प्रथम [ नीच ] म्हणजे नम्र होऊन [ प्राप्तरसा ] औषध मिळाल्यानंतर कृतकार्य होऊन रसायन देणारा जो वैद्य त्याला ठकविलें, तर त्यांत विशेष असें काहींच नाहीं.

येन स्वस्थाः संतस्तीर्त्वा दुस्तरतरोपतापभरम् ।
तं वैद्ययोगमिह ये त्यजंति तान्निर्गुणान्नरान्मन्ये ॥ ४८७ ॥

पहिला अर्थ—ज्याच्या योगानें अत्यंत दुस्तर अशा रोगाच्या भरांतून पार पडून स्वास्थ्य प्राप्त होतें अशा तऱ्हेच्या वैद्याची संगति जे मागाहून सोडतात-ते लोक [ निर्गुण ] म्हणजे गुणग्राही नव्हेत, [ मंद ]–मूर्ख होत.

दुसरा अर्थ—[ वैद्ययोग ] म्हणजे विद्येसंबंधी योग. ज्या

विद्येच्या योगानें अत्यंत दुस्तर असा संसारसागरही उतरून जाऊन मनः स्वास्थ्य प्राप्त होतें त्या विद्येची प्राप्ती जे टाकतात, ते निर्गुण म्हणजे जीवनमुक्तच असले पाहिजेत हें उघड आहे. त्या अर्थी वरील विधान उघड आहे.

### सभ्यं वर्णयति.

सभारतो यः पुरुषः स एवेदृङ् न चान्यथा ।
भूरिवित्तः पुमान्यस्तु स एवेदृङ् न चान्यथा ॥ ४८८ ॥

[ सभ्य. ]

[सभा-रतः ] सभेमध्यें जो रत होणारा पुरुष असेल, तो [ सभा-रत ] भारत सहितच असला पाहिजे. त्याला भारत अवगत असलेंच पाहिजे. आणि [ भूरि-वित्तः ] पुष्कळ ज्ञान ज्याच्यापाशीं आहे, तो पुरुष [ भूरिवित्तः ] पुष्कळ धनवानही असलाच पाहिजे.

### आश्चर्य.

प्रदाय शुणिकेभ्यस्तु स्वसकाशगतं धनम् ।
आधिं लब्ध्वा सुखीभूता धनिका इति विस्मयः ॥४८९॥

[ शुनिक ]

धन मागावयास येणाऱ्यांना पैसा उसनवार मागावयास येणारे लोक आपल्या जवळचें द्रव्य स्वतः [ आधि ] म्हणजे गहाण ( पक्षीं व्याधी ठेवून धनिक लोक सुखी होतात. हें खरोखर आश्चर्यकारकच आहे. ) द्रव्य देऊन जणूंकाय व्याधीच विकत घेणें हें आश्चर्य तर आहेच पण गहाण हेंही अशासारखेंच आहे.

### कामांधं.

श्रुत्वा विष्णोर्भक्तिमाहात्म्यचर्चा
कामांधानां मूर्ध्न्युदेतीव शूलम् ।
मूर्धांदोलं ग्राम्यगीते वदंते
वा वाः खाशी ठीक क्याबात होहो ॥ ४९० ॥

विष्णूच्या महात्म्याची चर्चा ऐकून कामांधाच्या डोक्यांत जणों काय शूळच उठतो. आणि ग्राम्यगीत म्हणजे लावण्या वगैरे ऐकून तो माना डोलवितो, आणि 'वाहवा ! वाहवा !' 'ओहो ! क्या बात है !' वगैरे म्हणत बसतो.

नैय्यायिकं.

लिंगपरामर्शपरा व्यभिचारविचारका हि तर्कज्ञाः ।
कलयंतीश्वरसिद्धिं ताद्धि विपुलमत्र चित्रकृभ्दवति ॥ ४९१ ॥

तर्कशास्त्री असतात ते न्यायशास्त्रांतील 'लिंगपरामर्शा' मध्येंच नेहमीं गुंतलेले असतात. ते व्यभिचाराचाच नेहमीं विचार करणारे. पण असे तर्कज्ञ लोक, ईश्वराची सिद्धी ह्मणजे ईश्वराचें आस्तित्व सिद्ध करतात हें फारच आश्चर्य आहे. लिंगपरामर्शी व व्यभिचारी लोकांना ईश्वर साध्य होत नाहीं. लिंगपरामर्श व व्यभिचार हे तर्कशास्त्रांतील दोन शब्द आहेत. लिंग ह्मणजे चिन्ह व परामर्श ह्मणजे विचार.तसेंच व्यभिचार ह्मणजे अपवाद. 'धूर' हा अग्नीचें लिंग किंवा चिन्ह होय. ह्याप्रमाणें कार्य जो धूर त्यावरून कारण जो विस्तव त्याचा विचार करणें ह्मणजे लिंगपरामर्श होय. व एखाद्या नियमाला असलेल्या अपवादांचा विचार करणें म्हणजे व्यभिचारविचार होय.नैयायिक हे अशाच तर्कानें ईश्वराचें आस्तित्व सिद्ध करितात.

प्रश्नोत्तरं.-

सकलंकस्य संसर्गान्नूनं भवति गार्हितम् ।
परिपाटी वराकस्थ हितमावहति ध्रुवम् ॥ ४९२ ॥

ह्या श्लोकांत प्रश्नांतच प्रश्नांचीं उत्तरें दिलेलीं आहेत. तीं अशीं—

सकलं–कस्म–संसर्गान्नूनं भवति गार्हितम्

कशाच्या सांसर्गानें सर्व कांहीं होतें ? ह्याचें उत्तर त्या प्रश्नांतच आहे. तें हें:—

स–कलंकस्य संसर्गात्

सकलंक ( ह्म. कलंकसहित ) दोषी असेल त्याच्या संसर्गानें.

### कस्य वरा परिपाटी–ध्रुवं हितं अवहति

कोणाचा श्रेष्ठ चरित्रक्रम खात्रीनें हितकारक होतो ? ह्याचें उत्तर ही त्या प्रश्नांत आहे ते हें:—

### वराकस्य परिपाटी

[ वराक ] ह्मणजे अनुद्धत–नम्र अशा पुरुषाचा.

### दैवं.

राजराजसखोऽप्येष महादेवोऽपि भिक्षते ।
वक्रे विधौ ललाटस्थे तत्रान्येषां तु का कथा ॥ ४९३ ॥

[ राजराजसखा ] राजांचा राजा जो कुबेर त्याचा परममित्र असा महादेव असून सुद्धां त्याला भिक्षा मागावी लागते. ह्यावरून दैव प्रतिकूल असलें म्हणजे बाकीच्याची कथा काय ? परंतु महादेवाचें दैव प्रतिकुल होतें कशावरून ? तर—

'वक्रे—विधौ ललाटस्थे'–अहो ! प्रत्यक्ष त्याच्या कपाळावर चंद्राची वांकडी कोरच जर आहे, तर मग बाकीच्याचें काय चालणार ? विधी म्हणजे चंद्र आाणि विधी म्हणजे दैव—ब्रम्हदेव !

### स्वभावं.

जानीमहे जगति जंतुजनस्य नूनं
योनिस्वभावसदृशी भवति क्रियेति ।
लब्ध्वाऽपि वक्षसि पदं जलराशिकन्या
श्रीवासुदेवचरणप्रवणैव नित्यम् ॥ ४९४ ॥

सर्व प्राण्यांचा ज्या मातापितरांपासून जन्म झालेला असेल, त्यांच्या स्वभावासारखीच त्यांची क्रिया होत असते. हें खात्रीनें आम्हांस माहित आहे. कारण, जलराशीची ह्मणजे समुद्राची कन्या जी लक्ष्मी, तिला [ वक्षसीं ] ह्मणजे छातीवर स्थल दिलें असतांही ती नेहेमी श्रीविष्णूच्या चरणापाशींच असते. ह्याचें कारण काय ? तर [ जड–राशीं ] मंदबुद्धिच्या अशा समुद्राची कन्या किंवा [ जलराशी ] ह्मणजे नेहेमी

सखलांतच जाण्याचा ज्याचा स्वभाव, त्याचीं अपत्यें अधोगतीकडे न जातील तर कोठें जाणार?

## मैत्री.

वन्यानामपि कोशेषु सुहृदां स्वोदयार्थिनां।
अर्प्यते स्वोदयादेव श्रीः सेयं मित्रता मता ॥ ४९५ ॥

[ मैत्री ]

पहिला अर्थ—आपला उदय व्हावा अशी इच्छा करणारे असे व वनांत राहणारे–अडाणी–असे जरी मित्र असले तरी, त्यांच्या [ कोशा–मध्यें ] पेटीमध्यें आपल्या उदया पासून ( भरभराटी पासून ) प्राप्त झालेल्या संपत्तींतूनच [ श्री–अर्प्यते ] जे द्रव्य देतात. तीच खरी मैत्री होय.

दुसरा अर्थ—[ वन्यानां ] ह्मणजे वनांत किंवा पाण्यांत उत्पन्न झालेल्या पद्मांचा–कमलांचा–मित्र असलेला जो सूर्य तो व उमलण्याला तयार असलेल्या अशा कमलाच्या कोशामध्यें आपल्या उदयानें [ श्रीः ] शोभाही घालतो, हीच खरी मित्रता म्हणावयाची. [ श्लेष ] ‘ मित्रता ’ म्हणजे सूर्यपणा !

सद्यो जातः सौहृदबालमरालोऽधिमानसं तनुयात्।
किं नु विनोदमुभयतः पत्राणि पुनर्न चेत्प्रवर्तेरन् ॥ ४९६ ॥

दोन्ही मित्रांमध्यें पुनःपुन्हा जर पत्रव्यवहार न होईल, तर नुकताच जडलेला मित्रतारूप बालहंस हा मनामध्यें–पक्षी–मानस सरोवरामध्यें आनंद कसा उत्पन्न करील?

दुसरा अर्थ—‘ पत्र ’ ह्मणजे पंख वारंवार हालविल्याशिवाय बालहंसाला तरी मानस सरोवरामध्यें आनंद कसा होईल? आकाशांत गमन करावें तेव्हांच त्यास आनंद होणार.

## मित्रपत्रं.

स्वांताक्षितौ स्नेहलता समुप्ता तर्ह्येव सा स्वास्तिमतीति मन्ये।
प्रवर्तयेच्चेत्सुमनोविनोदं पुनः पुनः पत्रवती प्रभूय ॥ ४९७ ॥

[ मित्रपत्र. ]

स्नेहरूपी लता आपल्या मनोभूमीमध्यें एकवार पेरली गेली, ह्मणजे ती कुशल आहे असें तरच मानतां येईल. केव्हां? तर अनेकवार पत्र व्यवहार करून दोघांचेंही मनोरंजन होईल तेव्हां.

दुसरा अर्थ—जमिनींत लावलेली आपली आवडती वेल तरच कुशल आहे म्हणावयाची. जर तां चांगलीं चांगलीं पानें व फुलें येऊन मनाला संतोष देईल व वारंवार तिला पालवीं फुटेल तरच ती सुस्थितींत आहे ह्मणावयाची.

समस्यां.

चंद्रो गजेंद्रः क्षितिनायकेंद्रो
धनुर्धरेंद्रः शिशुवाग्विलासः ।
स्याद्दातृभोक्ता चतुरश्च कीदृक्
गृहाण विद्वन् सुकलास्त एते ॥ ४९८ ॥

चंद्र, गजेंद्र, राजेंद्र, धनुर्धरामध्ये श्रेष्ठ, लहान मुलाचें बोबडें बोलणें, दाता, भोक्ता आणि चतुर हे कसे असतील? तर हे विद्वान् मनुष्या! [ सुकलाः ] हेंच त्याचें उत्तर घे.

'ल' च्या ठिकाणीं 'र' धरला म्हणजे हा शब्द सर्वांस लागू पडतो.
चंद्र कसा ? तर 'सुकलाः' सर्व कलांनीं युक्त.
गजेंद्र कसा ? तर 'सुकराः' उत्तम सोंडनें युक्त.
राजेंद्र कसा? तर 'सुकराः ?' उत्तम करभार घेण्यानें युक्त.
धनुर्धर कसा? तर 'सुकरा :' उत्तम नेम मारणारा-हस्तकुशल.
मुलाचे बोबडे बोल कसे? तर 'सुकलाः' मधुर आवाजानें युक्त. (कल म्हणजे मधुर आवाज.)
दाता कसा ? तर 'सुकलाः' धनाचा व्यय करणारा.
भोक्ता कसा ? तर 'सुकलाः' नृत्य गायनानें युक्त.
चतुर कसा ? तर 'सुकलाः' ६४ कलांनीं युक्त.

किंवा 'सुकल दातृभोक्तरि' ह्या अमरकोशांतील वचनाप्रमाणें 'सुकल' हा शब्दच दाता व भोक्ता ह्यांशीं समानार्थक आहे.

दैत्यजनोऽदितितनयान्, शीतं वन्यो जनो, युवा युवतीः, ।
किं बलमाश्रित्य जयति वद विद्वन्नयि गृहाण शुक्रबलम् ॥ ४९९.

दैत्यगण हे अदितीचे मुलगे जे देव त्यांना, वनवासी जन थंडीला; तरुण तरुणींना जिंकण्याला कोणतें बल कारणीभूत होतें ? तें सांग. हे विद्वाना ! घे तर उत्तर. 'शुक्रबल'

श्लेष–शुक्र म्हणजे अग्नि; शुक्र म्हणजे रेत; आणि शुक्र म्हणजे शुक्राचार्य.

दैत्य हे देवांना शुक्राचार्यांच्या बळावर जिंकतात; वनवासजिन अग्नीच्या बळावर थंडीला जिंकतात; आणि तरुण तरुणीला वीर्याच्या बळावर जिंकतात.

पर्जन्यं.

सरिच्छैलसमुद्रेषु कुतोऽभ्र वसु वर्षसि ।
भ्रातरेतन्मया ज्ञातं भ्रांतत्वं तत्र कारणम् ॥ ५०० ॥

[ पर्जन्य. ]

हे अभ्रा ! नदी, पर्वत आणि समुद्र, ह्या तिन्हीही ठिकाणीं तूं पाण्याचा वर्षाव कां करतोस ! पक्षीं--तूं द्रव्याचा ( वसु म्हणजे द्रव्य ) वर्षाव कां करतोस ? तर बाबारे ! कळलें ! कळलें ! मला. तुला भ्रांत झाली आहे असें वाटतें. कारण 'अभ्र' ह्या शब्दाच्या अंतीं 'भ्र' आहे तेव्हां 'भ्र' ज्याच्या अंतीं आहे तो 'भ्रांत' व्हावा, भ्रमिष्ट व्हावा हें साहजिकच आहे.

शीतकालं.

अस्तं यातो दिनेशः प्रबलमथ हिमं जातमेतत्स्वभावा-
च्छीतानां मामकानां कथमिव पयसां स्यादवस्थेत्यचिंत्यः॥
अंतस्त्रातुं प्रविष्टोऽनल इव कृपया तान्यथेष्यंतमर्के
ज्ञात्वा निर्गच्छतोऽग्रे चलति हुतभुजो धूम एष ध्वजोऽस्य ५०१

थंडीच्या वेळीं सकाळीं पाण्यांतून वाफा वर येतात व 'अग्नेरापः' म्हणजे अग्निपासून जल उत्पन्न झालें अशी श्रुति आहे. त्यास अनुसरून कवि उत्प्रेक्षा करतातः--

सूर्य अस्तास गेला आहे, थंडी तर मनस्वी पडली आहे. आतां ह्या माझ्या जलरूपी अपत्याची थंडीनें कुडकुडून काय बरे अवस्था होईल? ह्याबद्दल पोटांत दया येऊन अग्नि हा आपल्या जलरूपी मुलाच्या समाचाराकारितां आंत बुडून बसला होता. इतक्यांत सूर्य हा क्षितिजावर आला असें समजतांच त्याची काळजी दूर झाली, व तो बाहेर पडूं लागला. तोच हा वर येत असलेला दिसत आहे. कारण, त्याच्या बाहेर येणाऱ्या वाफा म्हणजे धूम्र हा त्याचा ध्वजच आहे.

शीतर्तुश्चंडभानौ सति न जगदिदं व्याप्तुमीष्टेऽथ तस्मि-
न्नस्तं यातेऽस्य धुर्यं ज्वलनमिह समाक्रम्य नीराशयाव्हे ।
कारागारे निवेश्य प्रसभमथ जगद्व्याप्तमेतन्निशम्य
प्राप्तं क्रुद्धं दिनेशं कथयति किमयं धूमदूतैः स्ववासम् ॥५०२॥

हिंवाळ्या दिवसांत सूर्याचें प्रखर उन्ह पडलें असतांना हिमऋतु सर्व व्यापूं शकत नाहीं. पण तो ( सूर्य ) अस्तास गेला म्हणजे त्याचा मुख्य कारभारी जो अग्नि, त्याला पाण्याच्या साठ्याच्या जलरूपी कारागृहामध्यें बलात्कारानें घालून त्या हिमऋतूनें सारें जग व्यापलें. ही बातमी ऐकून [ एतन्निशम्य ] सूर्य हा क्रुद्ध होऊन वर आला, व त्यास ( अग्नीस ) सोडवूं लागला. तेव्हां धूम्ररूपी दूत त्याला कोठें कोंडून ठेवलें होतें तें दाखवूनच देत आहे असें वाटतें. ( सकाळीं पाण्यांतून ज्या वाफा निघालेल्या दिसतात त्यावर ही कविकल्पना आहे.)

वक्षोजदुर्गे सुधने त्रिवलीपरिखावृते ।
श्रितः किमूष्मा विजितः शीतेनातिबलीयसा ॥ ५०३ ॥

अतिशय कडक थंडीनें हा उष्मा पराजित झाल्यामुळेंच जणों त्यानें [ वक्षोज ] म्हणजे छातीपासून जन्मलेल्या स्तनरूपी किल्ल्याचा आश्रय केला आहे. हा किल्ला चांगल्या धनानीं युक्त असून त्रिवळी म्हणजे

पोटावरच्या वळ्या हाच खंदक त्या खंदकांनीं बंदोबस्त केलेला असा आहे. अशा कोटामध्येंच ह्या उष्म्यानें आश्रय केला आहे कीं काय ? ( थंडीच्या दिवसांतील स्त्रीसमागम सुखावह होतो हें रूपक होय. )

दुसरा अर्थ—उष्मा वर्ण म्हणजे 'ष' तो [ वक्षोज ] यामध्यें आढळतो. ह्याचें कारण, थंडीनें त्याचा पराजय केल्यामुळें तो त्यांत लपून बसला आहे.

यद्यंबरांतः शयितः स पौरस्त्यः पयोधरः ।
कथं शीतकथाश्रोत्रपथमभ्येतुमर्हति ॥ ५०४ ॥

[ पौरस्त्य ] पूर्वेकडे उत्पन्न होणारा मेघ जरी आकाशामध्यें निजलेला असला तरी तो आला म्हणजे थंडीची गोष्ट कानावर कोठून येणार? (हस्त,चित्रा नक्षत्रानंतरचा मेघ याला 'पौरस्त्य' अथवा 'पूर्वेकडील मेघ' असें ह्मणतात. आक्टोबर महिन्यांतील उकाड्यासंबंधानें हें रूपक आहे. ) श्लेष— शद्बावरूनसुद्धां [ अंबर ] म्हणजे वस्त्र, त्यांत जरी असला तरी [ पौरस्त्य ] तारुण्यांतील पयोधर-स्तन-अर्थात् जवळ स्त्री असेल तर मग थंडी लागणार नाहीं.

हाहाहूव्हालापैर्धनंजयस्यातिसंस्तवो यत्र।
मकरारंभो जंभभिदालय इव सहातिलोत्तमारंभः ॥५०५ ॥

पहिला अर्थ—' हा हा हू हू ' अशा शद्बांनीं जेथें ' धनंजयाची ' म्हणजे अग्नीची स्तुती चालू असते, तेथें मकरसंक्रमणाचा आरंभ झाला आहे म्हणून समजावें. आणि [ जंभभिदालय ] म्हणजे इंद्राच्या घराप्रमाणें तेथें उत्तमोत्तम तिळ देण्याचाही समारंभ होतो.

श्लेष—इंद्राच्या घराप्रमाणें कसा ? तर ' हा हा हू हू ' शब्दांनीं इंद्राच्या सभेंत गंधर्वांचें गायन चालू असतें. व [ धनंजय ] म्हणजे अर्जुन हा त्याचा पुत्र असल्यानें, त्याचे गुणानुवाद स्तुतिपाठक करीत असतात. आणि रंभा व तिलोत्तमा ह्यांच्या नृत्याचाही समारंभ चालू असतो. ( श्लेष--तिलोत्तमा=एक अप्सरा, उत्तम तीळ ).

स्विन्नाः कंटकनिचिताः प्रकटितरागाश्च सहासिता मधुराः ।
दामोदरदर्शनजो राधावस्थाविशेष इव तिलकाः ॥ ५०६ ॥

तिळाची अवस्था, विशिष्ट तऱ्हेची जी राधेची अवस्था झाली होती, तशीच होते. ती कशी ? [ स्विन्नः ] अग्नीच्या उष्णतेनें तयार झालेले; काट्यांनीं भरलेलें; [ प्रकटितरागः ] बाहेरून लाल रंग दिसत आहे; [ सहसितः ] साखर घातलेले व गोड लागणारे असे तीळ असतात.

दुसरा अर्थ—आतां राधा कशी असे ? तर श्रीकृष्णाला पाहतांच [स्विन्नः] घाम आलेली; [कंटकनिचितः] रोमांच उभे राहिलेले; [प्रकटित रागाश्च ] प्रणय कोपानें युक्त; [ सऱ्हसिता ] हास्ययुक्त; [ मधुरः ] मधुर; अशीच तिळगुळाप्रमाणें म्हणजे हलव्याप्रमाणें होत असे.

उष्णकालं.

ग्रामे मुखध्वनिं श्रुत्वा भयसंविग्नमानसा ।
त्यक्त्वा वनविहारं श्रीरंतर्गंतुमना इव ॥ ५०७ ॥

गांवामध्यें शिमग्याची बोंब ऐकून पुढें कांहीं तरी अनर्थ ओढवला आहे असें वाटून जिचें मन व्याकुळ झाल्यामुळें वनविहार सोडून वनश्रीही अंतर्धान पावण्याच्या बेतांत आली आहे. कारण धान्यें लुप्त झालेलीं असतात. व झाडांची पालवी गळूं लागलेली असते.

बहुलोत्सवो जनोऽसावृतुश्रियःपुष्पसमय इति ।
कंदर्पः कथमिव न स्वध्वजमस्मिन्नुदूढयतु ॥ ५०८ ॥

लोक अतिशय उत्सव करीत आहेत; ( ऋतुश्रियः ) वसंतऋतूची शोभा दिसत आहे; वसंत ऋतु आहे; इतकी तयारी झाल्यावर [ कंदर्पानें ] ( मदनानेंच ) तेवढा आपला ध्वज कां लावूं नये ? श्लेष—कंदर्पाचा ध्वज ह्मणजे ऋतुप्राप्ति होय. आणि ध्वजा ह्मणजे गुढी उभारणें.

प्रातः कालं.

सूरे तूदयमासाद्य स्वप्रतापं वितन्वति ।

युक्तं नक्षत्रनिवहो निस्तेजस्को विलुप्यते ॥ ५०९ ॥

[ प्रातःकाल ]

सूर्य उदय पावून आपला प्रताप जिकडे तिकडे तो गाजवूं लागला ह्मणजे नक्षत्रगण तेजोरहित होऊन [ **विलोप** ] पावतो, ( नष्ट होतो ) हें सरळच आहे. कारण, सूर्य ह्मणजे ' सूर-' शूर पुरुषाचा उदय ह्मणजे पराक्रम पाहून [ न-क्षत्रगणः ] ह्मणजे क्षात्रतेज ज्यांच्या अंगीं नाहीं असे लोक निस्तेज होतील ह्यांत नवल तें काय ?

दोषोपचयस्तावज्जघन्यकर्मणि नरं नियोजयति ।
सुदिनं तु शुचौ कर्मणि सदसद्वस्तुस्वभाव एवायम् ॥५१०॥

दोषांचा पुष्कळसा साठा असला ह्मणजे तो मनुष्याला नीच कर्म करावयाला लावतो आणि चांगला दिवस असला ह्मणजे तो शुभ कर्म करावयाला लावतो. हा चांगल्या व वाईट वस्तूंचा स्वभावच आहे. कारण, [ **दोषोपचय** ] रात्र पुष्कळशी झाली ह्मणजे मनुष्य नीच कर्माला प्रवृत्त होतो. आणि सुदिन ह्मणजे चांगला ढळढळित दिवस असला ह्मणजे तो मनुष्याला सत्कर्म करावयाला लावतो. ह्यांत रात्र ही असद्वस्तु होय, व दिवस ही सद्वस्तु होय.

## पुरुषचर्या.

भवितव्यं प्रसिद्धेन नरेणातिप्रयत्नतः ।
पाणिन्याद्या ह्यविज्ञातं नरंनरकमूचिरे ॥ ५११ ॥

मनुष्यानें नानाप्रकारचे यत्न करून प्रसिद्ध व्हावें. कारण, पाणिन्यादि ऋषींनीं जो मनुष्य माहित नाहीं, अप्रसिद्ध आहे, अशा मनुष्याला ' नरक ' म्हटलें आहे. कारण ' क ' प्रत्यय हा अज्ञातार्थी असतो. श्लेष—[ **अज्ञातार्थी** ] अज्ञात–अप्रसिद्ध–लोकाकरितांच आहे. अर्थात् ' अज्ञात ' मनुष्य हा नरकच होय.

सदशन एव सदशनो विकलः किल जायते विकल एव ।
असुरत एवासुरतस्तद्वदविनयो जनोऽविनय एव ॥५१२ ॥

' स+दशन ' ज्या मनुष्याला दांत असतात त्यांना ' सत्-अशन ' चांगलें चाऊन खातां येतें. जो ' विकल ' ह्मणजे कलारहित असतो, पक्षीं--ज्याचें दांत हालत असतात तो ' विकल ' ह्मणजे दुःखी असतो. जो ' असुरत ' बलरक्षण करणारा असतो त्यानें ' अ सुरत ' विषयोपभोग टाकलेला असतो. आणि जो ' अ-विनय ' ह्मणजे विनय सोडलेला उद्धत असतो, तो 'अवि-नय' अवि ह्मणजे मेंढ्या--' नय '-नेणारा हांकणारा-अर्थात् धनगर असतो.

श्रैष्ठयस्योज्ज्वलतैव कारणमिति प्रायो वहिर्दृष्टय:
पश्यंत्यस्य जना न कर्म सहजं किं साधु वाऽसाध्विति ।
शृंगारो हि जघन्यकर्मसचिवो मूर्धन्यतां प्रापित:
शांत: पश्य जघन्यतां बत पुनर्मूर्धन्यकर्मापि सन् ॥ ५१३ ॥

जे बहिर्दृष्टी लोक असतात, ते श्रेष्ठत्त्वाचें कारण बाह्य उज्वलता ह्मणजे डामडौल असेंच मानतात. अशा दिखाऊ मनुष्याचें सहज कर्म चांगलें किंवा वाईट आहे हे लोक पहात नाहींत. उदाहरणार्थ, श्रृंगार हा नीच कर्मात श्रेष्ठ आहे. तरी पण त्याला श्रेष्ठत्त्व दिलेलें आहे. शांतरस आहे तो श्रेष्ठ कर्म करणारा असूनही त्याला सगळ्यांत खालचा दर्जा मिळतो.

बव्हर्थतामव्ययानां विद्वदुक्तां न धारय ।
सुप्प्रतिष्ठाऽत्रनास्तीति भगवान्पाणिनिर्जगौ ॥ ५१४ ॥

विद्वान् लोक ' अव्यया ' च्या ठाईं बहु अर्थता असते असें म्हणतात. पण तें तूं मनांत धरूं नकोस. त्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण, भगवान् पाणिनीनीं सांगितलें आहे कीं, अव्ययामध्यें ' सुप ' म्हणजे विभक्तीचे जे प्रत्यय त्यांची प्रतिष्ठा नसते. म्हणजे त्यांना प्रत्यय लागत नाहीं. व ' अव्यय ' म्हणजे जे खर्च करीत नाहींत ते. तें ' बहुअर्थी ' असल्यामुळें त्यांच्याजवळ पुष्कळ पैसा सांठतो हें खरें आहे. तरी तूं त्यांना खरें धनवान् समजूं नकोस. कारण, पुष्कळ अर्थ असला तरी त्यांत

चांगलीशीं प्रतिष्ठा नसते. असें प्रत्यक्ष भगवान् पाणिनींनीं सांगितलेलें आहे. ' सु ' प्रतिष्ठा म्हणजे चांगली प्रतिष्ठा त्यांना नसते.

सुवृत्तो बलिमूर्धन्यो घनः पीनोऽपि वा जनः ।
बालिश ( शा ) स्य प्रसंगेन पतत्येव यथा स्तनः ॥ ५१५ ॥

पहिला अर्थ—चांगल्या आचाराचा अत्यंत बळवान् ' घनः ' घष्ट-पुष्ट, लठ्ठ असा जरी मनुष्य असला तरी मूर्ख मनुष्याच्या संगतीनें स्तनाप्रमाणें पतन पावतो.

दुसरा अर्थ—स्तन कसे असतात ? तर ' सुवृत्त ' ह्मणजे वाटोळे; ' बलिमूर्धन्यो ' ज्याच्या मस्तकावर वळ्या आहेत; ' घनः ' कठीण; ' पीनोपि ' उच्च; तरी ' बालिशस्य प्रसंगेन ' मुलानें धरल्यामुळें पडतात, त्या प्रमाणें वर सांगितलेला मनुष्यही पतन पावतो.

महदाधारदानाय महांतो ऽर्हंति नेतरे ।
अचलाधारिणो नूनमचला एव केवलम् ॥ ५१६ ॥

मोठा आधार घ्यावयाला मोठे लोकच योग्य आहेत. ह्याला उदाहरण, ' अचल ' म्हणजे पृथ्वी, हिला धारण करणारे ' अचल ' म्हणजे पर्वतच आहेत.

द्विधापि लोके बन्हाशो विद्वानपि न राजते ।
द्विधापि सुकलस्त्वस्मिन्नाविद्वानपि राजते ॥ ५१७ ॥

' बन्हाशा '—ज्याला फार आशा आहे, असा आशेखोर व ' बहु-आशा ' पुष्कळ खाणारा—खादाड असा मनुष्य विद्वान् असला तरी तो शोभत नाहीं. दोघेही शोभत नाहींत. आणि ' सुकल ' द्रव्याचा सद्व्यय कसा करावा हें जाणतो तो; आणि 'सुकल' म्हणजे नृत्यगायनादि कला ज्याला अवगत आहेत असा मनुष्य अविद्वान् असला तरी तो असे दोघेही शोभतात.

## भोजनं.

तनुग्रासे स एव स्यादसुग्रासे ऽपि स स्मृतः ।
तस्मात्सर्वप्रयत्नेन भवेन्नित्यं सुभोजनः ॥ ५१८ ॥

'तनु--ग्रासे' थोडेंच खाल्लें 'तर तनु-ग्रास' तनूचा म्हणजे देहाचा ऱ्हास होईल. म्हणजे त्याला क्षीणता प्राप्त होईल. आणि 'अ-सुग्रास' चांगलें सुग्रास अन्न खाल्लें नाहीं तर 'असु-ग्रास' होईल. ह्मणजे मरण येईल. ह्याकरितां 'सुभोजनः' अहो सज्जनहो ! 'सु-भोजनः' चांगलें भोजन करीत जा.

## देशस्थं.

अधितिष्ठन्नभिमानं व्यालस्यधरः शिरःस्थितर्णभरः ।

भूतिव्ययकृत्तिक्तकभक्षपरः शंकरो ऽग्र्यदेशस्थः ॥ ५१९ ॥

ह्या श्लोकात देशस्थ ब्राह्मणांचें आणि शंकराचें साम्य मोठ्या चमत्कारिक रीतीनें दाखविलें आहे. तें असें:--

पहिला अर्थ—शंकर कसा आहे ? तर 'अधितिष्ठन्- अभिमानं' अहंकारानें युक्त, रुद्रावतार असा. आणखी कसा ? तर 'व्यालस्यधरः' सर्पांचीं भूषणें धारण करणारा; आणखी कसा ? तर 'शिरःस्थित--ऋण-भरः' मस्तकावर गंगा धारण करणारा असा; अंगास भस्म फासणारा; आणखी कसा ? तर 'तिक्तकभक्षणपरः' काळकूट प्राशन करणारा असा; आणखी कसा ? तर 'अग्र्यदेशस्थः' वर असणारा देश जो कैलास तेथें वासकरणारा असा शंकर.

दुसरा अर्थ—आतां देशस्थ ब्राह्मण कसे ! तर 'अधितिष्ठन् आभिमानं' अभिमानानें फुगणारे ;'वि—आलस्य—धर :' पक्के आळशी ; 'शिरस्थित तर्णभर :' डोक्यावर कर्जाचा बोजा घेणारे; आणखी कसे ? तर 'भूति--काय-- कृत्' पैशाची उधळपट्टी करणारे; आणखी कसे ? तर तिक्तक भक्षपर :' तिखट खाण्यांत पटाईत; आणखी कसे ! तर, 'अग्र्य देशस्थ :' घाट माथ्यावर राहणारे ते देशस्थ ब्राम्हण होत.

ह्यावरून शंकराचीं आणि देशस्थ ब्राम्हणांचीं लक्षणें एकसारखीं दिसतात. इतकेंच नव्हे तर शंकर हे देशस्थांचें अग्रणी ( अग्र्य देशस्थः) आहेत.

## मार्जारं.

अमृतैकलालसात्मा विगतस्नेहः स्वकार्भकेष्वपि यः ।

गिरिकाननासनोऽयं मार्जारः संयमीव मे भाति ॥ ५२० ॥

[ मांजर ]

मांजर हें 'मन:संयमी' म्हणजे मनोनिग्रही असल्याप्रमाणें दिसतें. पहिला अर्थ—मनः संयमी कसा असतो ? तर 'अमृतैकलालसात्मा' मोक्षाचीच लालसा--इच्छा--धरणारा; 'विगतस्नेहःस्वकार्भकेष्वपियः' आपल्या मुलांबाळावरही ममता नाहीं असा; 'गिरिकाननासनोयं' गिरिकंदरींत आसन घालून बसणारा; असा.

दुसरा अर्थ--आतां मांजर कसें असतें ! तर 'अमृतैकलालसात्मा' दुधा करतांच टपून बसणारें; 'विगतस्नेहःस्वकार्भकेष्वपियः' आपल्या पिलांवर ममता नाहीं असें. [ बोका आपलीं पिलीं खातो हें प्रसिद्ध आहेच. ] आणखी कसें ! तर 'गिरिक आननाआसनः' अयं, उंदरांचीं पिलें ह्यांना ज्याचें तोंड हें स्थान होतें असें. ह्यावरून मांजर आणि संयमी हीं सारखींच होत.

श्रृंगिणं वर्णयति.

शृंग्यर्भकोऽपि कुपितो घाताय महतां मतः ।
अचिरादेव यत्प्राप्तः पंचतां राजकुंजरः ॥ ५२१ ॥

[ शृंगीचें वर्णन ]

पहिला अर्थ--शृंगऋषीचा मुलगा सुद्धां कोपला असतां मोठ्या घातास कारण होतो असें समजतात. कारण, 'राजकुंजर' म्हणजे परिक्षिती राजा, हा त्याच्या शब्दानें तत्काल मरण पावला.

दुसरा अर्थ--श्रृंगी म्हणजे रान रेडे. रान रेडा सुद्धां मोठ्या रेड्याचा घात करणारा होतो. राजकुंजर म्हणजे महागज त्याला सुद्धां मारून टाकतो!

धूम्रपत्री.

तमाखुरिति भाषायां । तां वर्णयांति--
सुपर्णपरिशीलितो भवति साधुपूगाश्रितः
करोति सुदृढस्थितिं द्विजगणस्य सारान्वितः ।

सदा स्पृहयते सुधामिति बुधा गदा भृत्सम-
स्तमाखुरिति सेव्यतां न वितनोति रागं यत : ॥ ५२२ ॥

[तंबाकूचें वर्णन.]

तंबाकू आणि गदाधर जो परमेश्वर तो सारखाच आहे. तंबाकू कसा आहे? तर ' सुपर्णपरिशीलितो ' म्हणजे चांगल्या पानांत बांधलेला; विडयाच्या पानांत बांधलेला- पक्षीं विष्णु कसा? तर चांगली पंखें आहेत असा गरुड ज्याचें वाहन आहे असा; आणखी तंबाकू कसा? 'साधुपूगाश्रितः' चांगल्या सुपारीचा आश्रय केलेला; पक्षीं विष्णु कसा? तर 'साधु-पूग' म्हणजे साधुसमुदायानें ज्याचा आश्रय केला आहे असा; आणखी तंबाकू कसा? तर ' सारान्वितः' रसानें युक्त असल्यामुळें आपल्या दांतांना बळकटी आणणारा; पक्षीं विष्णु कसा? तर अरांसहित असें जें चक्र त्यानें युक्त असल्यामुळें द्विजांची म्हणजे ब्राम्हणांची स्थापना करणारा; अथवा शत्रूपासून रक्षण करणारा; आणखी तंबाकू कसा ? तर त्याला [ सुधा ] पाहिजे. त्याला चुना लागतो. आणि विष्णूपाशीं अमृत असतें. ह्मणूनच शहाण्या मनुष्याला विष्णूची आसक्ति सोडूं देत नाहीं. कारण असल्या तंबाखूनें तांबडेपणा ( चुन्याशिवाय )–तोंडाला तांबडेपणा येत नाहीं. अर्थात् आसक्ति हा दुर्गुण उत्पन्न होत नाहीं. ( तांबडेपणा= आसक्ति ) ह्मणून तंबाकूचें खुशाल सेवन करावें.

जर्दा.

जनार्दनो नरहितो भूत्वा ऽऽकारविपर्ययात् ।
अवतीर्ण इव प्रायः स जर्देत्याभिधीयते ॥ ५२३ ॥

[ जर्दा. ]

[ जनार्दन ] ह्मणजे विष्णु. हाच मनुष्यांना हितकर अशा तऱ्हेनें [ जर्दा ] हें रूपांतर करून अवतीर्ण झाला आहे कीं काय ? व ह्मणूनच त्याला [ जर्दा ] असें ह्मणतात कीं काय असें वाटतें.

श्लेष—[ जनार्दन ] ह्यांतील [ नरेहितः ] 'न' काढून टाकला तर 'ज '

हें आद्याक्षर आहे. त्याच्या पुढील ' न ' काढून टाकून तोच ' आ ' कार पुढें ठेवला ( आकारविपर्ययात् ) तर [ जर्दा ] असेंच नाम तयार होतें.

भर्तु : प्रियतमं वस्तु संगृण्हातु सदा सती ।
करोति यद्वैमवती विजयां निजसन्निधौ ॥ ५२४ ॥

ज्याला जी प्रियतम अशी वस्तु असेल ती त्याची साध्वी स्त्री सदा-सर्वदा संग्रह करित असते. कशावरून? तर [ हैमवती ] ह्मणजे पार्वती ही आपल्या भर्त्याला प्रिय असलेली भांग ही [ विजया ] नांवाच्या दासीच्या रूपानें जवळ बाळगीत होती. श्लेष—[ विजया ] भांग आणि [ विजया ] नांवाची दासी. भांग ही शंकराला प्रिय असल्याचें सर्वत्र प्रसिद्धच आहे.

### सायंकाल.

संध्या प्रौढवधूरिनो व्रजति मां हित्वेति रागाकुला
पृष्ठे यांत्यपि हस्तगो न स इति प्रायो विरक्ता ऽभवत्
तामिस्त्रैर्यमुनाजलैर्हरिपदं संस्नप्य दत्वा पुन-
र्गंधानिंदुमयांस्तनोति परितस्ताराप्रसूनांजलिम् ॥ ५२५ ॥

[ सायंकाळ. ]

संध्या ( संध्याकाळ ) ही प्रौढ स्त्री आपला [ इन ] म्हणजे स्वामी जो सूर्य, तो आपल्याला टाकून जात आहे, असें पाहून प्रेमानें ( रागा-कुला ) व्याकूळ होऊन ( संध्याकाळीं आकाश—तांबडें असतें ) त्याच्या मागें जात असतांही तो आपल्याला सांपडत नाहीं, असें पाहूनच जणों काय विरक्त झाली—लाली जाऊन पांढरसरपणा दिसूं लागला आणि काळसर अशा यमुनेच्या पाण्यानें—पक्षीं अंधेरयुक्त अशी--हरिचरणांना ( पक्षीं आकाशाला ) स्नान घालून चंद्ररूपी गंध लावून ( टिळा लावून ) सभों-वती तारकारूपी पुष्पांजलीच अर्पण करीत आहे असें वाटतें.

### कुक्कुरं.

मध्यऋतुसमय एव श्रियमुपगच्छत्यशेषभूतानाम् ।

यो जागर्ति निशायां शुनकः प्रातिभाति संयमीव मम ॥ ५२६ ॥

कुत्रा हा इंद्रियदमन करणाऱ्या पुरुषाप्रमाणेंच भासतो. कारण, तो मध्यऋतुंत म्हणजे वर्षा आणि शरत् ह्यांतच स्त्रीकडे जातो आणि सर्व भूतामध्यें--प्राण्यांत हाच एक रात्रीचा जागा असतो. ( ' या निशा सर्व भूतानां तस्यां जागर्ति संयमी' ह्या भगवदुक्तीवर ह्यांत कटाक्ष आहे. )

## मत्कुणं.

यो रात्रिंचरशेखरः किल दशास्यःकोणपाल्याश्रयो
वज्राबाधितशक्तिको नृरुधिरं पातुं सदा वांछति ।
उन्मत्तो मधुयोगतो भवति यस्तन्मत्कुणो रावण-
स्तस्मान्नश्यति पुत्रपौत्रसहितः सीताभिसंधानतः ॥ ५२७ ॥

## [ ढेकूण. ]

ढेकूण हा हुबेहुब रावणासारखा आहे. कसा तें पहाः----

**पहिला अर्थ**--रावण कसा ? तर ( योरात्रिंचरशेखरः ) राक्षसांचा राजा; ( किल दशास्यः ) त्याला दहा तोंडें होतीं; आणखी कसा होता ? तर [ कोणपाल्याश्रयः ] राक्षससमुदायांचा ज्याला पाठिंबा होता असा; [ वज्राबाधित शक्तिकः ] वज्रापुढेंही अबाधित शक्ति ज्याची असा; [ उन्मत्तः मधुयोगतो ] मद्य प्राशन करून मदोन्मत्त झालेला; [ नृरुधिरं पातुं सदावांछति ] नररक्त पान करावयास मिळावें हीच ज्याची निरंतर इच्छा; आणि ( सीताभिसंधानतः ) आणि सीतेच्या पायींच पुत्रपौत्रासह नष्ट होऊन गेला असा.

**दुसरा अर्थ**---आतां ढेकूण कसा ? तर ( योरात्रिंचरशेखरः ) रात्रींत फिरणाऱ्या कीटकांतलि राजा;(किलदशास्यः ) दशेसारख्या बारीक शेंड्यांनीं युक्त आहे तोंड ज्याचें असा; आणखी कसा?तर (कोणपाल्याश्रयः) कोपऱ्या कोपऱ्यांत वस्ती करणारा; ( वज्राबाधितशक्तिकः ) हिरा फोडण्याइतकी अबाधित शक्ति आहे ज्याला असा; ( ढेंकणाच्या रक्तानें हिरा फुटतो ही गोष्ट हिऱ्याचें भस्म वगैरे करतांना वैद्य लोकांच्या दृष्टीस पडतें असें म्हणतात. ' ढेंकणाच्या संगें हिरा जो भंगला ' असा तुकारामाच

अभंगही आहे. ) आणखी ढेंकूण कसा ? तर (नृरुधिरंपातुं सदा वांछति ) मनुष्याचें रक्त प्राशन करण्याचीच नेहमीं इच्छा करणारा ( उन्मत्तो मधुयोगतो ) वसंतऋतु आला-उन्हाळा लागला म्हणजे त्याला ऊत येतो; असा हा रावणासारखा ढेंकूण [ सीताभिसंधानतः ] थंडी पडली ह्मणजे पोराबाळां सहवर्तमान निजधामास जातो.

## संभोग.

सततं सुरताभिकांक्षिणो बालिमुख्या अपि शुक्रबृंहिताः ।
असुराः क्षयमाशु भेजिरे मनुजानां पुनरत्र का कथा ॥ ५२८॥

## [ संभोग. ]

पहिला अर्थ--निरंतर [ सुरता ] ह्मणजे देवपणाची इच्छा करणा जे राक्षस होते, त्यांत बाळिराजा हा प्रमुख होता. व शुक्राचार्यांच्या बळावर ते वृद्धि पावले होते. किंवा ते अतिशय वीर्यवान् होते तरी सुद्धां सर्व राक्षसांचा नायनाट झाला. मग मनुष्याची कथा काय ?

दुसरा अर्थ—सामर्थ्य हें नेहमीं वीर्यवृद्धीवर अवलंबून असतें. असें असतां नेहमीं ( सुरत-अभिकांक्षिणो ) बळवान् असूनही जे स्त्री समागमाची इच्छा करतील, त्यांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, शुक्र गेल्यानंतर सर्व राक्षसांचासुद्धां फडशा पडला, मग मनुष्याचा नाश होईल ह्यांत नवल तें काय ?

श्लेष—शुक्र म्हणजे वीर्य हा दुसरा अर्थ हें सांगावयास नकोच.

स्त्रीणामल्पापराधानां नैव कार्यं गवेषणम् ।
अपराधस्थितिं त्वस्या ( तासां ) निर्ममे स्वयमीश्वरः ॥ ५२९ ॥

स्त्रीचा कांहीं अल्पस्वल्प अपराध असेल तर त्याची चौकशी न करावी हेंच बरें. कारण, स्त्रीनें पुरुषांच्या सत्तेखालीं राहणें हा निर्बंध परमेश्वरानेंच लावून दिलेला आहे. ( अपर-अधसः-स्थिति. )

## स्तन.

पयोधरोद्गमस्यांतरंबरे प्रांशुभाविनः।
चाचल्युपस्थितिः कर्णेजपत्वमधिगच्छति ॥ ५३० ॥

[ स्तन. ]

[ चांचली–उपस्थितिः ] चंचलता उत्पन्न होणें हें [ अंबरे ] वस्त्राच्या आंत [ पयोधर ] मोठमोठे वाढणारे अशा स्तनांचा उद्गम होणार आहे ह्याचें सूचक असतें.

दुसरा अर्थ—चंचल अशी जी विद्युत् ती दिसावयाला लागली ह्मणजे [ प्रांशुभाविनः ] मोठ्या होणाऱ्या अशा मेघांचा उद्गम होणार आहे ह्याची सूचक होते ! ( कानांत येऊन सांगणारे ) असे होतात, म्हणजे सुचवितात.

धाराधराणां किल वृष्टिपातो धराधराणां शिखरेषु पूर्वम्।
तथैव यूनामपि दृष्टिपातः पयो धराणां शिखरेषु पूर्वम्॥ ५३१ ॥

[ धाराधर ] ह्मणजे मेघ, त्यांचा वृष्टिपात डोंगरावर जसा प्रथम होतो, तसा तरुण मनुष्याचा दृष्टिपात स्त्रियांच्या स्तनावर प्रथम होतो.

पयोधरघनीभावस्तावदंबरमध्यगः।
आश्लेषोपगमस्तत्र यावन्नैव प्रवर्तते ॥ ५३२ ॥

स्तनाचा कठीणपणा [ अंबर मध्यगः ] वस्त्राच्या आंत असतो. तो जेथपर्यंत आलिंगनाचा लाभ होत नाहीं, तेथपर्यंत टिकतो पुढें टिकत नाहीं.

दुसरा अर्थ—आकाशामध्यें मेघाचा दाटपणा आश्लेषा नक्षत्र लागलें नाहीं तेथपर्यंतच असतो, पुढें सारे मेघ विरळ होतात.

पयोधरघनीभावस्तावदंबरमध्यगः।
हस्तलीलायितं तत्र यावन्नैव प्रवर्तते ॥ ५३३ ॥

पहिला अर्थ—[ यावत् अंबर मध्यगः ] वस्त्राच्या आंत असणाऱ्या आणि जोपर्यंत [ हस्तलीलायितं तत्र यावन्नैव प्रवर्तते ] त्यांच्यावर हाताची लीला चालूं होत नाहीं तोपर्यंतच त्यांच्यांत काठिण्य असतें.

दुसरा अर्थ—[ हस्तलीलायतं तत्र यावन्नैव प्रवर्तते ) जेथपर्यंत हस्त नक्षत्राची लीला सुरू झाली नाहीं, तोंपर्यंतच आकाशांतील मेघांत दाटपणा असतो. पुढें ते पातळ होत जातात.

### प्रौढां प्रति भर्तुर्नर्मोक्तिं.

सद्वृत्तं स्तनमंडलं यदभवत्तत्किं पुनः सांप्रतम्
दूरादेव वलंबते भवति न स्प्रष्टुं यमत्यादरः ।
देवेनैव जघन्यकर्माणि बलादापीड्य संयोजितं
भूयो बालिशसंस्तवो बत ततः पातित्यमेयान्न किम् ५३४

प्रौढ स्त्रियेचें व नवऱ्याचें खोंचदार भाषणः--

हें स्तनमंडळ होतें तें [ सद्वृत्त ] चांगलें वाटोळें होतें. तें आतां लांबच लांब लोंबत आहे. त्याला [ स्प्रष्टुं ] हात लावावयाची इच्छाही होत नाहीं.

( ह्यावर पत्नीचें उत्तर ) ह्याचें कारण, देवेन म्हणजे तुम्ही किंवा ( दैवानेंच ) जबरीनें नीच कर्माच्या ठिकाणीं ओढून त्याची योजना केली आणि पुढें बालाची ( पक्षीं मूर्खांची ) त्यास संगति लागली, तेव्हां तें पतित होणार नाहीं का ? ह्यांत नवल तें काय ?

स्तनौ तवाशेषतनौ तु बाले त्वद्यावतीवेति तदीयभाले ।
कालेन लिप्त्वा जनदृष्टिभीत्या प्रीत्या महत्या किमिवावृणोषि ५३५.

हे बाले ! तुझ्या कपाळावर कालानें म्हणजे दैवानें असें लिहिलें आहे कीं, तुझ्या सर्व अवयवांमध्यें स्तन हे अतिशय रमणीय असतील. ह्याकरितां त्यांस दृष्ट लागेल ह्मणूनच कीं काय, तूं त्यांना प्रेमानें झांकून ठेवतेस ।

### वृद्धस्यभार्या.

पुरुषस्य पुराणस्य द्वितीया युवतिस्तु या ।
असौ वसुमती नैवेत्यवेवं हि कथमुच्यताम् ॥ ५३६ ॥

ह्यातान्याचो दुसरी बायको असते ती, तरुण असते. पण ती कधीं

[ वसुमती ] वसु ह्मणजे द्रव्य--ती श्रीमंत नसते; तिच्या हातांत सर्व संपत्ति नसतें असें कोणी ह्मणावें ? विष्णूची दुसरी स्त्री [ वसुमती ] म्हणजे पृथ्वी असलीच पाहिजे. ती [ वसुमती ] म्हणजे सारा कारभार तिच्याच हातांत असतो. त्याचप्रमाणें द्वितीय पत्नीच्या हातीं सर्व कारभार असतो.

**सर्वोत्तमस्यापि पुराणपुंसो योषिद्द्वितीया किल सारसाढ्या ।**
**नूनं पतत्येव विचलयमाना भुजंगराजस्य बतोत्तमांगे ॥ ५३७ ॥**

**पहिला अर्थ**—सर्वांत उत्तम असा जरी वृद्ध मनुष्य असला, तरी त्याची दुसरी स्त्री [ **सारसाढ्याः** ] प्रेम रसानें भरलेली-पक्षीं तारुण्यानें मुसमुसलेली अशी असल्यामुळें, भ्रष्ट होऊन ती शीलापासून ढळणाऱ्या [**भुजंग राजाच्या**] जाराच्या गळयांत जाऊन पडते. ह्याला उदाहरणः—

**दुसरा अर्थ**—सर्वोत्तम जो विष्णु अशा पुराण पुरुषाची म्हणजे वृद्धाची दुसरी भार्या कशी आहे ? तर [ **सा—रसाढ्या** ] ( जलानें युक्त अशी ) पृथ्वी; संपन्न. ती [ **नूनं पतत्येव विचलयमाना** ] ती भूकंप झाल्यावर कांपूं लागते. आणि [ **भुजंग राजस्य बतोत्तमांगे** ] भुजंगराज जो शेष, त्याच्या उत्तमांगावर म्हणजे मस्तकावर पडते. श्लेष–भुजंग म्हणजे जार, त्याचा राजा, त्याच्या अंगावर पडते. अर्थात् व्यभिचारिणी होते. शेषाच्या मस्तकावर पृथ्वी असल्याचें सर्वांस माहितच आहे.

**पुराणपुंसो ललनाद्वितीया विचलयमाना पतिता भुजंगे ।**
**विलोडयते ऽथापि कुनायकैः सा तत्साधु सर्वसहतां बिभर्ति ॥ ५३८**

वृद्ध पुरुषाची दुसरी बायको चांगल्या शीलापासून पतित होऊन जाराच्या ठिकाणीं जाऊन पडते, इतकेंच नव्हे, तर [ **कुनायक** ] नीच लोकांची सुद्धां [**विलोड्यते** ] संगति करते. [**तत्साधुसर्व सहतां बिभर्ति**] व हलकट लोकांच्या पाहिजे त्या चेष्टा सहन करते.

दुसरा अर्थ—पुराण पुरुष जो विष्णु, त्याची दुसरी भार्या चंचल चित्त होऊन भुजंगावर म्हणजे जाराच्या अंगावर पडते. विष्णूची दुसरी बायको ह्मणजे भूमि–पृथ्वी ही होय. ती [ कुनायक ] ह्मणजे अनेक पृथ्वीपतींशीं लंपट होते. त्यांची संगति धरते, ह्मणूनच [ सर्व सहा ] जगांतील सर्व सहन करणारी असें नांव तिला मिळालें आहे. 'क्षमा' म्हणजे पृथ्वी हें सांगणें नकोच. ( सर्व भूतांचा भार तिला सहन करावा लागतो ह्मणून 'सर्वसहा' असें तिला दुसरें नांव आहे. )

परस्त्री पराङ्मुखं.

मामकं कौशलं दृष्ट्वा मा कार्षीः किलाकिंचितम् ।
भुजंगेन विना भोगलाभो नैव भविष्यति ॥५३९ ॥

[ परस्त्री पराङ्मुखत्व. ]

माझें कौशल्य स्वरूपादि पाहून तूं श्रृंगारचेष्टा करूं नकोस. कारण, जाराशिवाय भोग लाभ होणार नाहीं—त्याची चिज होणार नाहीं. आणि मी कांहीं जार नाहीं.

दुसरा अर्थ—भुजंग ह्मणजे जार किंवा सर्प. आणि भोग ह्मणजे सर्पाचें शरीर. भुजंगाशिवाय [ भोगाचा ] ह्मणजे सर्पाच्या शरीराचा लाभ होणार नाहीं हें उघडच आहे.

जरा.

ब्रवीम्यहं किं बहुशः कवीश्वरा
जरा नराणा सुतरां दुरासदा ।
यया यियासोरपि निजरेशितुः
पादेऽपि वेधो रचितो निजोचितः ॥ ५४०

[ जरा. ]

अहो कविश्रेष्ठहो ! मी आणखी तें काय सांगूं ? मनुष्यांना जरा ही अत्यंत [ दुरासद ] जिंकावयाला फारच कठीण आहे. कारण निर्जर ह्मणजे जरा जिंकलेल्यामध्यें श्रेष्ठ देव जो श्रीकृष्ण, त्याला सुद्धां प्रयाण-कालाच्यावेळीं तिनें पायामध्यें वेध केला. निजधामीं जातांना सुद्धां आप-ल्याला उचित असा वेध केलाच.

श्लेष—'जरा' नांवाच्या व्याधानें श्रीकृष्णाच्या चरणावर बाण मारल्याची कथा भागवतांत श्रवण करावयास मिळतेच.

**कायापक्षयहेतू जरे परं तत्र राक्षसी प्रवरा ।**
**या किंचिदपि शरीरं सुदृढतरं संदधाति स्म ॥ ५४१**

शरीराच्या नाशाला कारण दोन तऱ्हेच्या जरा. एक वृद्धावस्था आणि दुसरी जरा नांवाची राक्षसी. शरीराच्या बरोबर मध्यांवर असणारी जी शिवण तिलाही जरा ह्मणतात. (जरासंधाच्या गोष्टीवरही येथें कटाक्ष आहेच) ह्या साऱ्या मारणाऱ्याच आहेत. परंतु त्यामध्यें राक्षसीच श्रेष्ठ आहे. कारण, तिनें विभागलेलें (जरासंधाचें) शरीर सुदृढ तर केलें होतें, आणि जरा ही सुंदर असलेल्या शरीराचा विध्वंस करून टाकते. तेव्हां तिच्यापेक्षां महाराक्षसीच बरी होय.

**सुप्रत्ययादजाद्याद्बहुशो भव्याकृतिध्याता ।**
**सत्वेक एव हि जराकारं कुर्यादसारचितम् ॥ ५४२ ॥**

[ **जराकारं** ] वृद्धत्व हें [ **असारचितं** ] तुच्छ व बलहीन करणारा असा पुरुष एकच. तो कोणता ? तर जो [ **बहुशाभव्याकृतिध्याता** ] अत्यंत सुंदर आकृति आहे ज्याची अशा विष्णूचें एकसारखें ध्यान करणारा. आणि [ **अजाद्यासुप्रत्ययात्** ] मी ( **अज** ) आहे—अजन्मा आहे इत्यादि ज्ञानाचा ज्याला ( **सुप्रत्यय** ) ह्मणजे अनुभव आलेला आहे, अशा ज्ञानानें ध्यान करित असेल, तोच एक जरेचा त्रास तुच्छ मानील.

**दुसरा अर्थ**—व्याकरणरीत्या [ **सुपप्रत्ययः** ] ह्मणजे नामाचा प्रत्यय. ( **सु** ) ह्या प्रत्ययानें आरंभ होतो. ( **अच्** ) म्हणजे स्वर, तो ज्याच्या आरंभी आहे असा अजा ( अजादि ) सुप्रत्यय. अशा स्वरादि अप्रत्ययापूर्वीं जरेचा—जरा शब्दाचा जो आकार—आहे तो [ **अस्** ] ह्यानें [ **रचितंकुर्यात्** ] आच्या ऐवजीं [ **अस्** ] घालून जरस् असें रूप कोण करील ? चांगल्या शोभणाऱ्या व्याकरणाचें ध्यान करणारा चांगला व्याकरणकार असेल तोच अस् घालतो, बाकीचे लोक चुकतात.

[ **जरा** ] शब्दाचें [ **जरस्** ] असें रूप स्वरादिप्रत्ययापूर्वीं विकल्पें

करून होतें असें सूत्र आहे. उदाहरणार्थ तृतीयेचें एकवचन ( जरा+आ =जरस्+आ=जरसा ) असें विकल्पानें होईल.

॥ इति संकीर्ण ॥

इंदोर्नैल्यमिदं वदंतु कवयो यत्किंचिदंकादिकं
सिद्धांतस्त्वमुनैष त्हत्प्रणिहितः श्रीकृष्ण आलोच्यताम् ॥
नोचेज्जातमिमं नमेत्कथमयं द्रुह्यंति नास्मै ग्रहा
ईहंते किल यद्बलं सुमनसां श्रेष्ठः कुले चाच्युतः ॥ ५४३ ॥

चंद्रावर जे डाग आहेत, त्यासंबंधानें कवि तो कलंक आहे असें ह्मणोत. माझा तर सिद्धांत असा आहे कीं, ह्या चंद्रानें हा श्रीकृष्णच हृदयामध्यें ठेविला आहे. हा माझा सिद्धांत कसा प्रत्ययास येतों तें पहा:—

तसें जर नसेल तर हे सगळे लोक तो ( द्वितीयेच्या दिवशीं उत्पन्न झाला न झाला तोंच त्याला नमस्कार कसा करतील ? ) त्याच्याशीं कोणताही ग्रह वैर करीत नाहीं. सर्व ग्रह ह्याच्या बळाचीच इच्छा करतात. ह्याच्या कुलामध्यें साधुश्रेष्ठ जो अच्युत तो उत्पन्न झालेला आहे. इतका प्रभाव दुसऱ्या कशाचा असणार ? ह्मणून ह्या चंद्राला ( चंद्रसूर्य ह्या दोघांनाही उपनिषिदांत 'पक्षी' 'सुवर्ण' असें म्हटलें आहे ) ' द्विज ' ह्मणजे पक्षी असें येथें ह्मटलें आहे व ' द्विज ' म्हणजे ' ब्राह्मण ' असा त्यावर श्लेष केलेला आहे. द्विजश्रेष्ठानें ह्मणजे ब्राम्हणानें आपल्या हृदयांत श्रीकृष्ण ठेवला आहे. [ ईहंतेबलं ] म्हणजे त्याच्यापासून कृष्णपक्षामध्यें देवही अमृत पिऊन बलिष्ठ होतात असाही अर्थ होईल.

तस्मात्—

ध्यातव्यं सर्वदा त्वत्पदमिति मम यश्चित्त आशांकुरोऽस्मिन्
बीजावापः कृपा ते रघुवर न परं किंचिदन्यद्विजाने ।
लोप्तुं दुर्वासनेयं शलभ इव मुहुः प्रेक्षते तत्कृपाब्धे
रक्षैनं स्वोप्तवृक्षानपि कृपणजना प्राय आप्याययंति ॥ ५४४॥

माझ्या मनामध्यें तुझ्या चरणाचें सर्वदा ध्यान करावें असा जो आशांकुर उत्पन्न झालेला आहे, त्याला बीजरूप तुझी कृपाच आहे. हे श्रीरामा !

दुसरें मला काहीं दिसत नाहीं. तरी त्याचा लोप करावयाला दुर्वासना ही शलभाप्रमाणें टपलेली आहे. तर हे कृपासागरा! पुनः पुनः तिच्यापासून तूं माझें संरक्षण कर. (बीजांकुराचें संरक्षण कर.) [ कृपणजनाः ] सामान्य किंवा कृपण बुद्धीचे लोकसुद्धां [ सोमवृक्षानपि ] आपण लावलेल्या आवडत्या वृक्षाची सुद्धां नेहमीं वाढच करित असतात—काळजी घेत असतात.

**कवयः कथयत कोऽन्यः कृष्णात्करुणाकराद्विनैकस्मात् ।**
**करकमलकोरके स्वे कामं कुर्वीत नरकभीरुजनम् ॥ ३४५ ॥**

हे कविजनहो! करुणासागर कृष्णाशिवाय नरकाला भ्यालेल्या मनुष्याला आपल्या कररूपी कमळाच्या कळीमध्यें कृष्णाशिवाय हातांत कोण बरें ठेवील!

**दुसरा अर्थ**—नरकापासून आणलेल्या १६००० बायकांचे पाणिग्रहण दुसरा कोण करणार? सांगा. ह्यांत 'क' काराच्या अनुप्रासाची रेलचेल करून सोडिली आहे.

**मृत्यूदर्कादघाद्धोरात्त्रातुं मुग्धजनं प्रति ।**
**कतमो नाम कुशलो विना कृष्णं कृपार्णवम् ॥ ६४६ ॥**

**पहिला अर्थ**—कृपासासागर कृष्णाशिवाय, मृत्यु हें ज्याचें फल आहे, अशा घोर पापापासून मूढजनांचें तारण करण्याला कोण बरें कुशल आहे?

**दुसरा अर्थ**—[ अघात ] ह्मणजे अघा सुरापासून हिंसक अशा पासूनही मुग्धजन जे गोप, त्यांचें पालन करण्यांत कुशल दुसरा कोण आहे?

**यत्कृपालेशवशतो मंदोऽपि धिषणायते ।**
**वंदे तं परमानंदकंदं श्रीनंद ( रघु ) नंदनम् ॥ ५४७ ॥**

ज्याच्या कृपालेशाच्या योगानें मंद सुद्धां बुद्धिमान् होतो, असा परमानंद कंद जो श्रीनंदनंदन त्याला मी वंदन करतों. येथेंही अनु प्रासांची बहार करून सोडिली आहे. तशीच पुढच्या श्लोकांतही आहे.

मम नाथ भवान् जननी जनकः सहजः सुहृदो गुरवो द्रविणम्
समुपेक्षत एष भवान्यदि मां वद यामि परं कमहं शरणम् ॥ ४८

माझा धनी तूं; माता तूं; पिता तूं; भाऊ, आप्त, इष्ट, स्नेही, सुहृद माझें सर्वस्व तूं. तूंच जर माझी उपेक्षा करशील तर मी कोणाला बरें शरण जाऊं ?

इयं स्वजननीमिति स्वयमिहादृतां मत्कृतिं
दधल्लघुधियं पुनर्मयि महात्मतां चात्मनि ।
वदेद्यदि महात्मनां सदसि योऽन्यदीयां पुमा
नलक्षणतया पितुः पितृकुटुंबिनीमप्यसौ ॥ ५४९ ॥

माझी कविता ही आपली जननी आहे. ही स्वजननी द्रव्य उत्पन्न करून देणारी म्हणून तिचा मोठा आदर कराल, व माझ्या ठायीं मात्र अनादर कराल किंवा स्वतःचो प्रौढी धरून जो मनुष्य ही कविता माझी असतां सभेमध्यें ती कोणी दुसऱ्याच कवीनें—कालिदासा—सारख्यानें केलेली आहे असें ह्मणेल, तो 'अलक्षणतया' दरिद्री होऊन करंटा--होऊन आपल्या बापाच्या बायकोलाही तसेंच ह्मणेल.

यस्य श्रीकरहाटकाभिधमहाक्षेत्रे निवासो महा-
देवो यस्य पिताऽच्युतांघ्रिनिरतो माता च गीताह्वया ।
सर्वस्वं रघुनंदनांघ्रियुगुलं यस्यैहिकामुष्मिकं
ग्रंथेऽस्मिन्स निमित्तमात्रमभवत्पंतादिमो विठ्ठलः ॥ ५५० ॥

श्रीक्षेत्र कऱ्हाड ह्या महाक्षेत्रांमध्यें राहणारा, ज्याचा पिता श्रीकृष्ण चरणीं तल्लीन झालेला महादेव व मातेचें नांव 'गीता' व ज्याला श्रीरामचंद्राचे चरण हेंच काय तें एक इहपर लोकीं सर्वस्व आहे, त्या ज्याच्या आधी पंत व मागाहून विठ्ठल असें लागतें, तो हा ग्रंथ करावयाला निमित्त मात्र कारण झालेला आहे.

हृत्पुंडरीकांतरसन्निविष्टः श्रीरामचंद्रः कुलदैवतं मे ।
यथा यथा प्रेरयदप्रमेयस्तथा तथाऽवोचमिदं समग्रम् ॥ ५५१

माझें कुलदैवत जें श्रीरामचंद्र तें माझ्या हृदयकमलामध्यें प्रगट होऊन त्यानें ज्या ज्या विचारांची प्रेरणा केली त्या त्या प्रमाणें मी सारें बोललों आहे.

शालिवाहनभूपालशकेऽक्षाश्वाश्वभूमिते [ १७७५ ]
ग्रंथोऽयं ग्रथितः संतः पंतविठ्ठलशर्मणा ॥ ५५२ ॥

शालीवाहन राजाचा शक ( अक्ष ) ५; ( अश्व ) ७; ( अश्व ) ७; व ( भूमि ) १; आणि ' अंकानां वामतोगतिः ' ह्या संस्कृताच्या नियमाप्रमाणें १७७५ मध्यें विठ्ठलपंत [ विठोबाअण्णा दप्तरदार ] ह्या कवीनें हा ग्रंथ रचला.

इति श्रीमद्राजाधिराजरघुनंदनसुंदरपदद्वंद्वारविंदमकरंदमिलिंदायमानमानसेन शांडिल्यकुलतिलकायमानेन पंतमहादेवनंदनेन गीतापराभिधानवाराणसीगर्भसमुद्भवेन ब्रह्मण्याग्रगण्यपदव्यारूढश्रीनिवासपंडितप्रतिनिधिधर्मपरिषत्पुरुषप्रवरोज्ज्वलेन पंतविठ्ठलेन विरचितं सुश्लोकलाघवं समाप्तम् ॥

REFBK-0001466
REFBK-0001466

१४६६

# विक्रीस तयार.

खालील पुस्तकें आमचेकडे विकत मिळतील.

| | |
|---|---|
| कीर्तनतरंगिणी भाग १ ला. | ०१८ |
| ,, ,, ,, २ रा. | १८२. |
| ,, ,, ,, ३ रा. | ०१४ |
| ,, ,, ,, ४ था. | १ |
| गौ[illegible]ामृत [illegible] बाबा गद्रे[illegible] | ०८ |
| [illegible] ,, | ०८ |
| एकनाथी भागवत बुक | २०८ |
| प्रा[illegible]योग ( उपयुक्त ज्योतिष ग्रंथ ) | २ |
| [illegible] ,, | १ |

हीं [illegible] सर्व प्रकारचीं [illegible] ज्योतिष वगैरे [illegible] शालोपयोगी सर्व प्रकारचीं पुस्तकें आमचेकडे विकत मिळतील.

मिळण्याचें ठिकाणः—लक्ष्मण नारायण गोडबोले

म्यानेजर डी, एस आण कंपनी, बुक

बुधवार पेट पुणें सिटी.